ॐ नमो भगवते वासुदेवाय

श्रीमद्भागवतमहापुराणम्

स्कन्ध दहावा

(पूर्वार्ध)

अध्याय पहिला

भगवंतांचे पृथ्वीला आश्वासन, वसुदेव - देवकीविवाह आणि कंसाकडून देवकीपुत्रांची हत्या

राजा परीक्षिताने विचारले- भगवन ! आपण चंद्रवंश आणि सूर्यवंशाचा विस्तार, दोन्ही वंशांच्या राजांची अत्यंत अद्‌भुत चरित्रे, तसेच धर्मप्रेमी यदूंचेसुद्धा विस्तारपूर्वक वर्णन केले. आता त्याच वंशात, आपला अंश असलेल्या श्रीबलरामांसह अवतीर्ण झालेल्या भगवान श्रीकृष्णांचे चरित्र आम्हांला ऐकवावे. प्राण्यांचे जीवनदाते आणि सर्वात्मा अशा भगवंतांनी यदुवंशात अवतार घेऊन ज्या ज्या लीला केल्या, त्या विस्ताराने आम्हांला सांगा. अनासक्त लोक ज्याचे गायन करीत असतात, जे भवरोगावरील औषध आहे, जे कानाला आणि मनाला परम आह्लाद देणारे आहे अशा भगवंतांच्या गुणवर्णनाला, आत्मघाती माणसाव्यतिरिक्त दुसरा कोण कंटाळेल ? युद्धात देवांनासुद्धा जिंकणारे भीष्मादी अतिरथीरूपी प्रचंड मासे ज्यात होते, असा कौरवसेनेचा अपार सागर, माझ्या आजोबांनी ज्यांच्या चरणरूप नौकेच्या साह्याने, वासराच्या खुराने तयार झालेल्या खड्ड्यातील पाणी ओलांडावे, तसा पार केला. कौरव आणि पांडव या दोन्ही वंशांचे बीज, असे माझे हे शरीर अश्वत्थाम्याच्या ब्रह्मास्त्राने जळून गेले होते, त्यावेळी माझी माता भगवंतांना शरण गेली. तेव्हा त्यांनी हातात चक्र घेऊन माझ्या मातेच्या गर्भात प्रवेश केला आणि माझे रक्षण केले. हे विद्वन ! सर्व शरीर धारण करणाऱ्यांच्या आत आत्मरूपाने राहून अमृतत्वाचे आणि बाहेर कालरूपाने राहून मृत्यूचे दान करणाऱ्या आणि मनुष्यरूपाने प्रगट होणाऱ्या त्यांच्या लीलांचे आपण वर्णन करावे. (१-७)

आपण आताच सांगितले की, बलराम रोहिणीचे पुत्र होते. त्यानंतर देवकीच्या पुत्रांमध्येसुद्धा आपण त्यांची गणना केलीत. दुसरे शरीर धारण केल्याशिवाय दोन मातांचा पुत्र होणे कसे शक्य आहे ? भगवान श्रीकृष्ण पित्याच्या घरातून व्रजभूमीकडे का गेले ? तसेच भक्तवत्सल प्रभूंनी नातलगांसह कोठे कोठे निवास केला ? केशवांनी गोकुळात आणि मथुरेत राहून कोणकोणत्या लीला केल्या ? तसेच त्यांनी कंस हा मामा असल्यामुळे त्याला मारणे योग्य नसूनही का मारले ? मनुष्यदेह धारण करून द्वारकापुरीमध्ये यादवांसह त्यांनी किती वर्षे निवास केला ? आणि त्यांना किती पत्न्या होत्या ? हे सर्वज्ञ मुनिवर ! श्रीकृष्णांवर नितांत श्रद्धा असणाऱ्या मला त्यांच्या या व इतरही सर्व कथा विस्ताराने सांगाव्यात. आपल्या मुखकमलातून पाझरणाऱ्या, भगवंतांच्या अमृतकथेचे पान करीत

असल्यामुळे पाणीही न पिणाऱ्या मला असह्य अशी ही तहानभूक मुळीच सतावीत नाही. (८-१३)

सूत म्हणतात- शौनका ! भगवंतांच्या भक्तात अग्रगण्य अशा सर्वज्ञ शुकदेवांनी परीक्षिताचा हा उत्तम प्रश्न ऐकून त्याचे कौतुक केले आणि कलिमलांना नाहीसे करणाऱ्या श्रीकृष्णचरित्राचे वर्णन करण्यास प्रारंभ केला. (१४)

श्रीशुकाचार्य म्हणाले- हे श्रेष्ठ राजर्षे ! तू जो काही निश्चय केला आहेस, तो अतिशय सुंदर आहे ; कारण श्रीकृष्णांच्या कथा श्रवण करण्यामध्ये तुला गाढ प्रीती निर्माण झाली आहे. भगवान श्रीकृष्णांच्या कथेसंबंधीचा प्रश्न वक्ता, प्रश्नकर्ता आणि श्रोता अशा तिघांनाही गंगाजलाप्रमाणे पवित्र करतो. (१५-१६)

त्यावेळी लाखो दैत्य गर्विष्ठ राजांचे रूप धारण करून पृथ्वीला भारभूत झाले होते. त्यापासून आपले रक्षण व्हावे म्हणून ती ब्रह्मदेवांना शरण गेली. त्यावेळी तिने गाईचे रूप धारण केले होते. तिच्या डोळ्यांतून आसवे वाहात होती. ती खिन्न होऊन करुण स्वरात हंबरडा फोडीत होती. ब्रह्मदेवांच्याकडे जाऊन तिने त्यांना आपले संकट सांगितले. ब्रह्मदेवांनी ते ऐकून तिला बरोबर घेतले आणि ते भगवान शंकर व अन्य देवांसह क्षीरसागराच्या किनाऱ्यावर गेले. तेथे जाऊन ब्रह्मदेवांनी एकाग्रचित्त होऊन पुरुषसूक्ताने जगत्पालक, सर्वांतर्यामी, देवाधिदेव श्रीविष्णूंची स्तुती केली. त्यांनी समाधी-अवस्थेत असतानाच आकाशवाणी ऐकली. त्यानंतर ब्रह्मदेव देवांना म्हणाले, देवांनो ! भगवंतांची आज्ञा तुम्ही माझ्याकडून ऐका आणि त्याप्रमाणे करा. वेळ लावू नका. पृथ्वीच्या कष्टांची भगवंतांना पूर्वीच कल्पना होती. ते देवाधिदेव आपल्या काल-शक्तीच्या द्वारा पृथ्वीचा भार हलका करीत जोपर्यंत पृथ्वीवर राहातील, तोपर्यंत तुम्ही यदुकुलात अंशरूपाने जन्म घेऊन राहा. वसुदेवांच्या घरी स्वतः भगवान पुरुषोत्तम प्रगट होतील. त्यांना आनंद देण्यासाठी देवांगनांनीही जन्म घ्यावा. (१७-२३)

स्वयंप्रकाश भगवान शेषसुद्धा, जे भगवंतांची कला असल्याकारणाने अनंत आहेत आणि ज्यांची सहस्र मुखे आहेत, ते भगवंतांचे प्रिय कार्य करण्यासाठी त्यांच्या अगोदरच अवतार घेतील. जिने साऱ्या जगाला मोहित केले आहे, ती भगवंतांची ऐश्वर्यशालिनी योगमायासुद्धा, त्यांच्या आज्ञेने त्यांचे लीलाकार्य संपन्न करण्यासाठी, अंशरूपाने अवतार घेईल. (२४-२५)

श्रीशुक म्हणतात- प्रजापतींचे स्वामी भगवान ब्रह्मदेवांनी देवतांना अशी आज्ञा केली आणि पृथ्वीची समजूत घालून तिला धीर दिला. त्यानंतर ते आपल्या परम धामाकडे गेले. पूर्वी यदुवंशी राजा शूरसेन मथुरानगरीत राहून माथुर आणि शूरसेन या देशांवर राज्य करीत होता. त्या वेळेपासून मथुरा ही सर्व यादवांची राजधानी झाली होती. भगवान श्रीहरी नेहमी तेथे विराजमान असतात. एकदा शूरसेनाचे पुत्र वसुदेव मथुरेमध्ये विवाह करून आपल्या नवपरिणीत पत्नी देवकीसह घरी जाण्यासाठी म्हणून रथावर आरूढ झाले. उग्रसेनाचा पुत्र कंस. याने आपली चुलत बहीण देवकी हिला खूष करण्यासाठी शेकडो सोन्याचे रथ तिला देऊन तिच्या रथाच्या घोड्याचे लगाम आपल्या हातात घेतले. देवकाचे आपल्या कन्येवर प्रेम होते, म्हणून तिला सासरी पाठवितेवेळी त्याने तिला सोन्याच्या हारांनी अलंकृत केलेले चारशे हत्ती, पंधरा हजार घोडे, अठराशे रथ तसेच सुंदर सुंदर वस्त्रालंकारांनी विभूषित दोनशे सुकुमार दासी हुंड्याच्या रूपाने दिल्या. निघण्याच्या वेळी वर-वधूंचे मंगल होण्यासाठी एकाच वेळी शंख, नौबती, मृदंग आणि दुंदुभी वाजू लागल्या. वाटेमध्ये ज्यावेळी घोड्यांचे लगाम पकडून कंस रथ चालवीत होता, त्यावेळी त्याला संबोधून आकाशवाणी झाली की, अरे मूर्खा ! जिला तू

रथात बसवून घेऊन चालला आहेस, तिचा आठवा पुत्र तुला मारील. (२६-३४)

कंस अत्यंत पापी व दुष्ट होता, तो भोजवंशाला कलंकच होता. आकाशवाणी ऐकताच त्याने तलवार उपसली आणि बहिणीची वेणी पकडून तिला मारायला तो तयार झाला. तो क्रूर, निर्लज्जपणे निंद्यकर्म करायला उद्युक्त झालेला पाहून महात्मा वसुदेव त्याला शांत करीत म्हणाले. (३५-३६)

वसुदेव म्हणाले- तू भोजवंशाची कीर्ती वाढविणारा आहेस. अनेक शूर तुझ्या गुणांची कीर्ती गातात. असे असता एका स्त्रीला, तेही स्वत:च्या बहिणीला या विवाहाच्या शुभसमयी मारायला तू कसा तयार झालास ? हे वीरा ! जे जन्म घेतात, त्यांच्या शरीराबरोबर मृत्यूसुद्धा उत्पन्न होतो. आज किंवा शंभर वर्षांनंतर प्राण्यांना मृत्यू अटळ आहे. जेव्हा शरीराचा अंत होतो, तेव्हा जीव आपल्या कर्मानुसार दुसरे शरीर ग्रहण करतो आणि आपले पहिले शरीर सोडतो. त्याची इच्छा नसली तरी त्याला असे करावेच लागते. ज्याप्रमाणे चालतेवेळी माणूस एक पाय जमिनीवर ठेवूनच दुसरा उचलतो, किंवा जशी अळी दुसरी गवताची काडी पकडते आणि मगच अगोदरची काडी सोडते, त्याचप्रमाणे जीवसुद्धा कर्मानुसार दुसरे शरीर प्राप्त केल्यानंतरच हे शरीर सोडतो. ज्याप्रमाणे एखादा पुरुष जागृत अवस्थेमध्ये राजाचे ऐश्वर्य पाहून आणि इंद्रादिकांचे ऐश्वर्य ऐकून मनाने त्याची अभिलाषा करू लागतो आणि त्याचे चिंतन करीत करीत त्याच गोष्टींमध्ये गुंतून त्यांच्याशी एकरूप होतो आणि स्वप्नामध्ये स्वत: राजा किंवा इंद्र बनतो. त्याचबरोबर आपले मूळ रूप विसरतो. त्याचप्रमाणे जीव कर्मानुसार कामना करून दुसऱ्या शरीराला जाऊन मिळतो आणि पहिल्या शरीराला विसरतो. देहांताच्यावेळी जीवाचे वासनायुक्त मन जन्मांच्या संचित आणि प्रारब्ध कर्मांच्या वासनांच्या अधीन होऊन मायेने रचलेल्या अनेक पांचभौतिक शरीरांकडे धावता धावता फलाभिमुख कर्माप्रमाणे ज्या शरीराच्या चिंतनामध्ये तल्लीन होते, तेच शरीर ग्रहण करते आणि त्या मनाशी तादात्म्य पावलेला जीव तेच शरीर धारण करतो. ज्याप्रमाणे सूर्य-चंद्रादी वस्तू पाणी, तेल इत्यादी द्रव पदार्थांमध्ये प्रतिबिंबित होतात आणि वाऱ्याने द्रवपदार्थ हलल्याने त्या प्रतिबिंबित वस्तूसुद्धा हलताना दिसतात, त्याचप्रमाणे जीव आपल्या स्वरूपाच्या अज्ञानाने रचलेल्या शरीरांवर प्रेम करून ते आपणच आहे, असे मानतो आणि मोहाने त्याच्या येण्या-जाण्याला आपले येणे-जाणे मानू लागतो. म्हणून ज्याला आपले कल्याण व्हावे असे वाटते, त्याने कोणाचाही द्रोह करता कामा नये. कारण जीव कर्माच्या अधीन असतो आणि जो द्रोह करील, त्याला या जीवनात शत्रूकडून आणि जीवनानंतर परलोकापासून भय असतेच. ही तुझी धाकटी बहीण अजून लहान असून बिचारी बाहुलीसारखी दीन झाली आहे. म्हणून तुझ्यासारख्या दीनवत्सल पुरुषाने ह्या बिचारीचा वध करणे बरे नव्हे ! (३७-४५)

श्रीशुक म्हणतात- परीक्षिता ! वसुदेवांनी अशा प्रकारे सामोपचाराने आणि भय दाखवून कंसाला समजाविले. परंतु तो क्रूर, राक्षसांच्या मताप्रमाणे वागणारा असल्यामुळे त्याने आपला निश्चय सोडला नाही. कंसाचा हा हट्ट पाहून वसुदेवांनी विचार केला की, कोणत्याही प्रकारे ही वेळ तर टाळली पाहिजे. तेव्हा त्यांनी ठरविले की, ''जोपर्यंत बुद्धी आणि शक्ती यांची जोड आहे, तोपर्यंत बुद्धिमान माणसाने मृत्यू टाळण्याचा प्रयत्न केला पाहिजे. प्रयत्न करूनही जर तो टळला नाही, तर त्यात प्रयत्न करणाऱ्याचा काही दोष नाही. म्हणून या मृत्युरूप कंसाला आपले पुत्र देऊन या बिचारीला वाचवावे. जर मला पुत्र झाले, आणि तोपर्यंत हा कंस मेला नाही तर (निदान ही तरी वाचेल.) न

जाणो, उलटेही होईल. कारण विधात्याचे विधान समजणे अत्यंत कठीण आहे. प्रसंगी मृत्यू समोर येऊन सुद्धा टळतो आणि टळलेलासुद्धा परत येतो.ज्यावेळी जंगलात आग लागते, त्यावेळी कोणते लाकूड जळेल आणि कोणते जळणार नाही, या गोष्टीला अदृष्टाशिवाय दुसरे कोणतेच कारण नाही. त्याचप्रमाणे प्राण्याचा शरीराशी होणारा संयोग व वियोग यांचे कारण कळणे अत्यंत अवघड आहे.'' आपल्या बुद्धीनुसार असा निश्चय करून वसुदेवांनी अत्यंत सन्मानपूर्वक त्या दुष्ट कंसाची अतिशय प्रशंसा केली. कंस अतिशय क्रूर आणि निर्लज्ज होता, म्हणून असे करतेवेळी वसुदेवांच्या मनाला अत्यंत क्लेश होत होते, तरीसुद्धा त्यांनी वरवर आपला चेहरा प्रफुल्लित करीत, हसत हसत ते म्हणाले. (४६-५३)

वसुदेव म्हणाले- हे सौम्य ! आकाशवाणी झाल्याप्रमाणे तुला देवकीपासून काही भीती नाही. भय तर पुत्रापासून आहे, म्हणून हिचे पुत्र मी तुझ्याकडे आणून सोपवीन. (५४)

श्रीशुक म्हणतात- वसुदेव खोटे बोलणार नाही, हे जाणून कंसाने बहिणीला मारण्याचा विचार सोडून दिला. तेव्हा वसुदेवांनी प्रसन्न मनाने त्याची स्तुती करून ते आपल्या घरी आले. योग्य वेळी सर्वदेवतास्वरूप देवकीने प्रतिवर्षी एक याप्रमाणे आठ पुत्रांना आणि एका कन्येला जन्म दिला. पहिल्या पुत्राचे नाव कीर्तिमान असे होते. वसुदेवांनी त्याला मोठ्या कष्टाने कंसाकडे आणून दिले. कारण त्याला असत्याचे अधिक भय वाटत होते. सज्जनांना असह्य असे काय असते ? ज्ञानी पुरुषांना कोणत्या गोष्टीची अपेक्षा असते ? नीच पुरुषांना न करण्याजोगे काय असते ? आणि जितेंद्रियांना त्याग न करण्यासारखे काय असते ? हे राजा ! वसुदेवांचा जीवन-मृत्यूमधील समान भाव आणि सत्याशी एकनिष्ठता पाहून कंस प्रसन्न होऊन हसत म्हणाला. आपण या बालकाला परत घेऊन जा. याच्यापासून मला काहीही भीती नाही; कारण तुमच्या आठव्या मुलाकडून माझा मृत्यू नेमलेला आहे. ''ठीक आहे'' असे म्हणून वसुदेव त्या बालकाला घेऊन परत आले. परंतु कंस दुष्ट आणि चंचल स्वभावाचा असल्यामुळे त्यांनी त्याच्या शब्दावर विश्वास ठेवला नाही. (५५-६१)

परीक्षिता ! इकडे देवर्षी नारद कंसाकडे आले आणि त्याला म्हणाले की, ''अरे कंसा ! गोकुळात राहाणारे नंद इत्यादी गोप, त्यांच्या पत्न्या, वसुदेव इत्यादी वृष्णिवंशी यादव, देवकी इत्यादी यदुवंशातील स्त्रिया आणि नंद, वसुदेव या दोघांचेही नातलग हे सर्वजण देव आहेत. यावेळी जे तुझी सेवा करीत आहेत, तेसुद्धा देवच आहेत. त्यांनी असेही सांगितले की, दैत्यांच्यामुळे पृथ्वीवरील भार वाढला आहे, म्हणून देव आता त्यांच्या वधाची तयारी करीत आहेत.'' असे म्हणून नारद जेव्हा निघून गेले, तेव्हा कंसाचा निश्चयच झाला की, हे यादव देव आहेत आणि देवकीच्या गर्भापासून भगवान विष्णूच मला मारण्यासाठी जन्म घेणार आहे; म्हणून त्याने देवकीला आणि वसुदेवांना बेड्या घालून कैदेत टाकले आणि त्या दोघांना जे जे पुत्र होत गेले, त्यांना विष्णू समजून मारून टाकले. पृथ्वीवर बहुधा स्वत:चेच पोषण करणारे लोभी राजे स्वार्थासाठी माता-पिता, बंधू किंवा इष्ट-मित्र यांचीही हत्या करतात. कंसाला हे माहीत होते की, आपण पूर्वजन्मी कालनेमी नावाचा असुर होतो आणि विष्णूने आपल्याला मारले होते. म्हणूनच त्याने यादवांशी वैर मांडले होते. बलवान कंसाने यदू, भोज आणि अंधक वंशांचे राजे असलेल्या आपल्या पित्याला-उग्रसेनाला कैद केले आणि तो स्वत: शूरसेनदेशाचे राज्य करू लागला.(६२-६९)

अध्याय पहिला समाप्त

अध्याय दुसरा

भगवंतांचा गर्भ-प्रवेश आणि देवतांकडून त्यांची स्तुती

श्रीशुक म्हणतात - बलवान कंसाने जरासंधाच्या साहाय्याने प्रलंबासुर, बकासुर, चाणूर, तृणावर्त, अघासुर, मुष्टिक, अरिष्टासुर, द्विविद, पूतना, केशी, धेनुक, बाणासुर, भौमासुर इत्यादी पुष्कळसे दैत्य व राजे यांना हाताशी धरून तो यादवांचा संहार करू लागला. (१-२)

तेव्हा ते भयभीत होऊन कुरू, पंचाल, केकय, शाल्व, विदर्भ, निषध, विदेह आणि कौशल या देशांत जाऊन राहिले. काही नातलग वरवर त्याच्या मनासारखे वागून त्याची सेवा करीत राहिले. कंसाने जेव्हा एक-एक करून देवकीची सहा मुले मारली, तेव्हा देवकीच्या सातव्या गर्भात भगवंतांचे अंशस्वरूप श्रीशेष, ज्यांना अनंत असेही म्हणतात, ते आले. त्यामुळे देवकीला स्वाभाविकच आनंद झाला, पण कंस कदाचित यालाही मारील, या भीतीने दु:खही झाले. (३-५)

मलाच आपले सर्वस्व मानणारे यादव कंसामुळे त्रस्त झाले आहेत असे पाहून विश्वात्मा भगवंतांनी योगमायेला आज्ञा केली. ''देवी ! कल्याणी ! तू गोकुळात जा. गवळी आणि गायी यांनी तो प्रदेश सुशोभित झाला आहे. तेथे नंदांच्या गोकुळात वसुदेवांची पत्नी रोहिणी राहात आहे. त्यांच्या इतर पत्न्याही कंसाच्या भीतीने गुप्त जागी राहात आहेत. सध्या माझा शेष नावाचा अंश देवकीच्या उदरात गर्भरूपाने राहिला आहे. त्याला तेथून काढून तू रोहिणीच्या पोटात नेऊन ठेव. हे कल्याणी ! नंतर मी माझ्या सर्व शक्तींसह देवकीचा पुत्र होईन आणि तू नंदपत्नी यशोदेच्या ठिकाणी जन्म घे. सर्व वर देण्यास समर्थ असणाऱ्या तुला माणसे आपल्या सर्व कामना पूर्ण करणारी समजून धूप, दीप, नैवेद्य इत्यादी अर्पण करून तुझी पूजा करतील. लोक पृथ्वीवर पुष्कळ ठिकाणी तुझी स्थापना करतील आणि तुला दुर्गा, भद्रकाली, विजया, वैष्णवी, कुमुदा, चंडिका, कृष्णा, माधवी, कन्या, माया, नारायणी, ईशानी, शारदा, अंबिका इत्यादी अनेक नावे ठेवतील. देवकीच्या गर्भातून काढून घेतल्यामुळे शेषाला लोक जगात 'संकर्षण' म्हणतील, तो लोकरंजन करणार असल्याने त्याला 'राम' म्हणतील आणि बलवानांमध्ये श्रेष्ठ असल्यामुळे 'बल' सुद्धा म्हणतील. (६-१३)

जेव्हा भगवंतांनी अशी आज्ञा केली, तेव्हा योगमायेने ''जशी आपली आज्ञा'' असे म्हणून त्यांचे म्हणणे शिरोधार्य मानले आणि त्यांना प्रदक्षिणा घालून ती पृथ्वीवर आली आणि भगवंतांनी जसे सांगितले तसे तिने केले. जेव्हा योगमायेने देवकीचा गर्भ नेऊन रोहिणीच्या उदरात ठेवला, तेव्हा तेथील नागरिक दु:खी अंत:करणाने देवकीचा गर्भपात झाला, असे म्हणू लागले. (१४-१५)

भक्तांना अभय देणारे विश्वरूप भगवान वसुदेवांच्या मनामध्ये आपल्या सर्व कलांसह प्रविष्ट झाले. भगवंतांचे तेज धारण केल्यामुळे वसुदेव सूर्याप्रमाणे तेजस्वी झाले. त्यांना पाहून लोकांचे डोळे दिपून जात. त्यांना कोणीही जिंकू शकत नव्हते. जगाचे मंगल करणाऱ्या, सर्वात्मक व आत्मरूप भगवंतांच्या अंशाला वसुदेवांनी मनाने प्रदान केल्यानंतर जशी पूर्वदिशा चंद्राला धारण करते, त्याचप्रमाणे देवकीने विशुद्ध मनानेच त्यांना धारण केले. (येथे भौतिक शरीराचा कोणताही संबंध नव्हता.) घड्यामध्ये बंद केलेल्या दिव्याचा प्रकाश किंवा आपली विद्या दुसऱ्याला न देणाऱ्या गर्विष्ठ ज्ञान्याच्या श्रेष्ठ विद्येचा प्रकाश जसा सगळीकडे पसरत नाही, त्याचप्रमाणे कंसाच्या कारागृहात बंद

असलेल्या देवकीचासुद्धा प्रभाव जगन्निवास तिच्यामध्ये राहात असूनही लोकांना जाणवला नाही. (हा आनंद बाहेर प्रगट न करता देवकी अंतर्मनातच तो अनुभवत होती.) देवकीच्या अंतरंगात भगवंत विराजमान झाले होते. तिच्या चेहऱ्यावर पवित्र हास्य होते; आणि तिच्या शरीराच्या कांतीने कारागृह झगमगत होते. कंसाने जेव्हा तिला पाहिले, तेव्हा तो मनात म्हणू लागला की, ''यावेळी माझे प्राण घेणारे विष्णूच हिच्यात राहिले आहेत. कारण यापूर्वी कधीही देवकी अशी दिसत नव्हती. आता या बाबतीत मला लवकरात लवकर काय केले पाहिजे बरे ? देवकीला मारणे तर उचित होणार नाही. कारण स्वार्थासाठी वीरपुरुष आपला पराक्रम कलंकित करीत नाही. शिवाय ही स्त्री असून, माझी बहीण आहे. तसेच गर्भवती आहे. हिला मारल्याने माझी लक्ष्मी आणि आयुष्य तत्काळ नष्ट होऊन जाईल आणि माझी कायमची अपकीर्ती होईल. जो अत्यंत क्रूरपणे वागतो, तो माणूस जिवंत असूनही मेल्यासारखाच आहे. त्याच्या मृत्यूनंतर लोक त्याला शिव्याशाप देतात, इतकेच नव्हे तर तो देहाभिमान्यांसाठी योग्य अशा नरकात निश्चितच जातो.'' कंस जरी देवकीला मारू शकत होता, तरीसुद्धा तो स्वत:च या अत्यंत क्रूर विचारांपासून परावृत्त झाला. आता भगवंतांच्याबद्दल दृढ वैरभाव बाळगणारा तो त्यांच्या जन्माची वाट पाहू लागला. (भगवत्सान्निध्यामुळेच त्याचे दुष्ट विचार मावळले.) तो उठता-बसता, खाता-पिता, जागेपणी-झोपेत आणि चालता-फिरताना नेहमी श्रीकृष्णांचाच विचार करीत असे. त्यामुळे त्याला सारे जगच श्रीकृष्णमय दिसत असे. (१६-२४)

भगवान शंकर, ब्रह्मदेव, सर्व देवता आणि नारदादी ऋषी तेथे आले आणि श्रीहरींची स्तुती करू लागले. ''प्रभो ! आपण सत्यसंकल्प आहात. सत्य हेच आपल्या प्राप्तीचे श्रेष्ठ साधन आहे. सृष्टीच्या पूर्वी, प्रलयानंतर आणि सृष्टी असताना या तिन्हीवेळी आपणच सत्य असता. (म्हणून असत्य सृष्टी सत्य वाटते.) पृथ्वी, जल, तेज, वायू अणि आकाश या पाच भासमान सत्यांचे आपणच कारण आहात आणि अंतर्यामीरूपाने त्यांमध्ये विराजमानसुद्धा आहात.'' आपण या दृश्यमान जगाचे आधार आहात. आपणच मधुर वाणी आणि समदृष्टीचे प्रवर्तक आहात. भगवन ! आपण केवळ सत्यस्वरूपच आहात. आम्ही सर्वजण आपल्याला शरण आलो आहोत. हा संसार एक सनातन वृक्ष आहे. एक प्रकृती ही या वृक्षाचा आधार आहे. सुख आणि दु:ख ही याला दोन फळे आहेत. सत्त्व, रज आणि तम ही तीन मुळे आहेत. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार रस आहेत. कान, त्वचा, नेत्र, जीभ आणि नाक हे याला जाणण्याचे पाच प्रकार आहेत. उत्पन्न होणे, स्थिर असणे, वाढणे, बदलणे, क्षय होणे आणि नष्ट होणे हे याचे सहा स्वभाव आहेत. रस, रक्त, मांस, मेद, अस्थी, मज्जा आणि शुक्र अशा सात धातू या वृक्षाच्या साली आहेत. पंचमहाभूते, मन, बुद्धी आणि अहंकार या आठ फांद्या आहेत. याला मुख, डोळे, कान, नाक, गुद, शिश्न अशी नऊ दारे म्हणजे ढोली आहेत. प्राण, अपान, व्यान, उदान, समान, नाग, कूर्म, कृकल, देवदत्त आणि धनंजय हे दहा प्राण ही याची दहा पाने आहेत. या संसाररूप वृक्षावर जीव आणि ईश्वर हे दोन पक्षी आहेत. या संसाररूप वृक्षाच्या उत्पत्तीचा आधार एकमात्र आपणच आहात. आपल्यामध्येच याचा प्रलय होतो आणि आपल्या कृपेनेच याचे रक्षणसुद्धा होते. ज्यांचे चित्त आपल्या मायेने झाकले गेले आहे, तेच उत्पत्ती, स्थिती आणि प्रलय करणाऱ्या ब्रह्मदेव इत्यादी देवांना अनेक रूपांत पाहातात, ज्ञानी नव्हेत. आपण ज्ञानस्वरूप आत्मा असून चराचर जगाच्या कल्याणासाठीच अनेक रूपे धारण करता. आपली

ती रूपे विशुद्ध सत्त्वमय असून ती संतांना सुख देणारी व दुष्टांचे अकल्याण करणारी असतात. हे कमलनेत्र ! सर्व पदार्थ आणि प्राण्यांच्या आश्रयस्वरूप आपल्या रूपात पूर्ण एकाग्रतेने आपले चित्त लावू शकणारे आणि आपल्या चरणकमलरूपी जहाजाचा आश्रय घेऊन या संसारसागराला, घासराच्या खुराने पडलेला खड्डा ओलांडावा तसे, सहजपणे पार करणारे लोक विरळच होत. संतांनी हाच मार्ग पत्करला आहे. हे प्रकाशरूप परमात्मन ! आपले भक्त जगाचे खरे हितैषी असतात. ते स्वत: तर या भयंकर आणि कष्टाने पार करता येण्यासारख्या संसारसागराला आपल्या चरणकमलांच्या नौकेने पार करतातच; परंतु इतरांच्या कल्याणासाठी ती येथेच ठेवतात. कारण आपण भक्तांवर अनुग्रह करणारेच आहात. हे कमलनयन ! जे लोक आपल्या चरणकमलांना शरण येत नाहीत, तसेच आपल्याबद्दल ज्यांच्या मनात भक्ती नाही, त्यांची बुद्धीसुद्धा शुद्ध होत नाही. ते स्वत:ला खोटे-खोटेच आपण मुक्त आहोत असे मानतात. त्यामुळे उत्तम कुळ, तपश्चर्या, ज्ञान इत्यादी साधने प्राप्त होऊनसुद्धा कोणत्याही प्रकारे का होईना, मोक्षपदाच्या जवळ पोहोचले तरी तेथून त्यांचे पतन होते. परंतु हे माधवा ! ज्यांचे आपल्या चरणांवर निस्सीम प्रेम आहे, असे आपले भक्त कधीही मोक्षाच्या मार्गापासून ढळत नाहीत. कारण हे प्रभो ! आपण त्यांचे रक्षण करत असल्यामुळे ते विघ्नकर्त्यांच्या डोक्यावर पाय ठेवून निर्भयपणे विहार करतात. आपण जगाच्या स्थितीसाठी, सर्व प्राण्यांचे कल्याण करणारे विशुद्ध सत्त्वमय, मंगलरूप धारण करता. ते रूप प्रगट होण्यानेच आपल्या भक्तांना वेद, कर्मकांड, अष्टांगयोग, तपश्चर्या, समाधी इत्यादी साधनांनी त्या रूपाचा आधार घेऊन आपली आराधना करता येते. हे प्रभो ! आपले हे विशुद्ध सत्त्वमय निजस्वरूप जर नसेल, तर अज्ञान आणि त्यामुळे उत्पन्न होणारी भेदबुद्धी नष्ट करणारे प्रत्यक्ष ज्ञान कोणालाही होणार नाही. तीन गुणही आपलेच आहेत आणि आपल्यामुळेच ते प्रकाशित होतात, परंतु या गुणांच्या प्रकाशात आपल्या स्वरूपाचे फक्त अनुमानच बांधता येते. हे भगवन ! मन आणि वेदवाणी यांच्या योगाने आपल्या स्वरूपाचे केवळ अनुमान करता येते. कारण आपण त्यांचे साक्षी आहात. म्हणून आपले गुण, जन्म आणि कर्म यांमुळे आपल्या नाम आणि रूपाचे निरूपण करता येत नाही. तरीसुद्धा आपले भक्त उपासनेने आपला साक्षात्कार करून घेतात. जो मनुष्य आपल्या मंगल नामांचे आणि रूपांचे श्रवण, कीर्तन, स्मरण आणि ध्यान करतो, तसेच आपल्या चरणकमलातच आपले चित्त गुंतवून ठेवतो, त्याला पुन्हा जन्माला यावे लागत नाही. हे हरे ! आमच्या भाग्यामुळे सर्वेश्वर अशा आपल्या अवताराने आपल्या चरणरूप पृथ्वीचा भार नाहीसा झाला. प्रभो ! आम्हांला आपल्या सुंदर चरणकमलांनी विभूषित झालेली पृथ्वी पाहायला मिळणार आणि आपल्या कृपेने स्वर्गलोकही कृतार्थ झालेला पाहायला मिळणार, हे आमचे केवढे सौभाग्य ! हे प्रभो ! आपण अजन्मा असून जन्म घेता, याचे कारण ही आपली एक लीला आहे, असेच आम्हांला वाटते. कारण, हे नित्यमुक्त ! जगाची उत्पत्ती, स्थिती आणि प्रलय हे आपल्यावर अज्ञानामुळे आरोपित केले जातात. प्रभो ! आपण जसे अनेक वेळा मत्स्य, हयग्रीव, कूर्म, नृसिंह, वराह, हंस, राम, परशुराम आणि वामन अवतार धारण करून आमचे आणि तिन्ही लोकांचे रक्षण केलेत, त्याचप्रमाणे यावेळीसुद्धा पृथ्वीचा भार हलका करावा. हे यदुश्रेष्ठ ! आम्ही आपल्या चरणांना वंदन करीत आहोत. हे देवकीमाते ! आपल्या उदरामध्ये आम्हा सर्वांचे कल्याण करण्यासाठी स्वत: भगवान पुरुषोत्तम

आपल्या शक्तींसह आले आहेत, ही मोठी भाग्याची गोष्ट आहे. आता आपण मृत्यूच्या दारी असलेल्या कंसाला अजिबात भिऊ नका. आपला पुत्र यदुवंशाचे रक्षण करील. (२५-४१)

श्रीशुक म्हणतात- परीक्षिता ! ब्रह्मदेवादी देवांनी ज्यांच्याविषयी निश्चितपणे काही सांगता येत नाही, अशा भगवंतांची अशी स्तुती केली आणि ते स्वर्गाकडे गेले. (४२)

अध्याय दुसरा समाप्त

अध्याय तिसरा

भगवान श्रीकृष्णांचा प्रादुर्भाव

श्रीशुक म्हणतात- नंतर जेव्हा सर्व गुणांनी युक्त अशी अतिशय उत्तम वेळ आली, तेव्हा रोहिणी नक्षत्र होते, आकाशातील सर्व नक्षत्रे, ग्रह आणि तारे शुभ होते, (त्यावेळी भगवान प्रगट झाले.)(१)

त्यावेळी दिशा प्रसन्न होत्या. आकाशामध्ये तारे तेजाने झगमगत होते. पृथ्वीवरील शहरे, गावे, गवळीवाडे आणि खाणी अत्यंत मंगलमय झाल्या होत्या, नद्यांचे पाणी स्वच्छ झाले होते, सरोवरांमध्ये कमळे उमलली होती, वनातील वृक्षांच्या रांगा फुलांच्या गुच्छांनी लहडल्या होत्या, त्यांवर पक्षी किलबिल करीत होते, तर कुठे भ्रमर गुणगुणत होते, पवित्र आणि सुगंधी वारा आपल्या स्पर्शाने लोकांना सुखी करीत वाहात होता, ब्राह्मणांच्या अग्निहोत्रांचे कधीही न विझणारे अग्नी कंसाच्या अत्याचारांनी विझले होते, ते यावेळी प्रज्वलित झाले. (२-४)

असुरांचा नाश इच्छिणाऱ्या सज्जनांची मने एकदम प्रसन्न झाली. अजन्मा जन्माला येण्याची वेळ आली, तेव्हा स्वर्गामध्ये देवतांच्या दुंदुभी वाजू लागल्या. किन्नर आणि गंधर्व गाऊ लागले. सिद्ध आणि चारण स्तुती करू लागले आणि विद्याधरांच्या स्त्रिया अप्सरांबरोबर नाचू लागल्या. देव आणि ऋषी आनंदित होऊन पुष्पवर्षाव करू लागले. पाण्याने भरलेले ढग समुद्राजवळ जाऊन सौम्य गर्जना करू लागले. जनार्दनांच्या अवताराची वेळ होती मध्यरात्र ! सगळीकडे अंधकाराचे साम्राज्य पसरले होते. त्याचवेळी सर्वांच्या हृदयामध्ये विराजमान असणारे भगवान विष्णू देवरूपिणी देवकीच्या ठिकाणी पूर्व दिशेला पूर्ण चंद्राचा उदय व्हावा, तसे प्रगट झाले. (५-८)

वसुदेवांनी पाहिले की, त्यांच्यासमोर एक अद्भुत बालक आहे. त्याचे नेत्र कमलाप्रमाणे असून त्याला चार हात आहेत. त्याने हातांमध्ये शंख, गदा आणि चक्र ही उत्कृष्ट आयुधे घेतली आहेत. वक्षःस्थळावर श्रीवत्सचिह्न असून गळ्यामध्ये कौस्तुभमणी झगमगत आहे. पावसाळ्यातील मेघांप्रमाणे सुंदर श्यामल शरीरावर मनोहर पीतांबर झळकत आहे. मौल्यवान असे वैडूर्यमणी जडवलेला किरीट आणि कुंडले यांच्या तेजाने दाट कुरळे केस चमकत आहेत. चमकणारा कमरपट्टा, दंडावर बाजूबंद आणि मनगटांमध्ये कंकणे यांनी तो विशेष शोभून दिसत होता. पुत्राच्या रूपाने स्वतः भगवंतच आले आहेत, असे पाहताच वसुदेवांचे डोळे आश्चर्याने विस्फारले. श्रीकृष्णांचा अवतार झाला, या अत्यानंदाच्या भरात त्यांनी त्याचवेळी ब्राह्मणांना दहा हजार गाई दान देण्याचा संकल्प केला. परीक्षिता ! भगवान श्रीकृष्ण आपल्या अंगकांतीने जन्मगृहात झगमगाट करीत होते. वसुदेवांना भगवंतांचा प्रभाव माहीत असल्याने त्यांची सर्व भीती नाहीशी झाली. आपली बुद्धी स्थिर करून

त्यांनी परमपुरुष भगवंतांच्या चरणांवर आपले मस्तक नमविले आणि हात जोडून ते त्यांची स्तुती करू लागले. (९-१२)

वसुदेव म्हणाले - आपण प्रकृतीच्या पलीकडील असे साक्षात पुरुषोत्तम आहात, हे मी जाणले. आपण केवलस्वरूप अनुभवगम्य व आनंदस्वरूप आहात. आपण सर्व बुद्धींचे एकमेव साक्षी आहात. आपणच सर्गाच्या सुरुवातीला आपल्या मायेपासून या त्रिगुणात्मक जगाची निर्मिती करता. नंतर त्यात आपण पहिल्यापासूनच असूनही नव्याने प्रविष्ट झालात, असे वाटते. जोपर्यंत महत्तत्त्व इत्यादी कारणतत्त्वे वेगवेगळी असतात, तोपर्यंत त्यांची शक्तीसुद्धा वेगवेगळी असते, पण जेव्हा ती इंद्रिये इत्यादी सोळा विकारांशी एकरूप होतात, तेव्हा या ब्रह्मांडाची रचना करतात आणि याची उत्पत्ती करून यांत ती प्रविष्ट झाली आहेत असे वाटते. परंतु ती कोणत्याही पदार्थात प्रवेश करीत नाहीत. कारण त्यांच्यापासून तयार झालेली जी जी वस्तू आहे, तीमध्ये ती अगोदरपासूनच असतात. त्यामुळे त्यांची उत्पत्ती संभवत नाही. त्याचप्रमाणे बुद्धीने फक्त गुणांच्या लक्षणांचेच अनुमान केले जाते आणि इंद्रियांच्या द्वारा फक्त गुणमय विषयांचेच ग्रहण होते. आपण जरी त्यामध्ये असता, तरीसुद्धा त्या गुणांच्या ग्रहणाने आपले ग्रहण होत नाही. कारण आपण सर्व काही आहात, सर्वांचे अंतर्यामी आणि आत्मस्वरूप आहात. गुणांचे आवरण आपल्याला झाकून टाकू शकत नाही. म्हणून आपण बाहेर नाहीत की आत नाहीत. तर मग आपण कशामध्ये प्रवेश कराल ? जो आपल्या या दृश्य गुणांना आपल्यापासून वेगळे समजून सत्य आहे असे मानतो, तो अज्ञानी होय; कारण विचार केल्यावर हे दृश्य पदार्थ वाग्विलासाखेरीज दुसरे काहीही नाही, हे सिद्ध होते. विचारांतून ज्या वस्तूचे अस्तित्व सिद्ध होत नाही, परंतु जी बाधित होते, तिला खरे समजणारा मनुष्य बुद्धिमान कसा असू शकेल ? हे प्रभो ! आपण स्वत: सर्व क्रिया, गुण आणि विकारांपासून अलिप्त असून या जगाची उत्पत्ती, स्थिती आणि प्रलय आपल्यापासूनच होतात, असे म्हणतात. ही गोष्ट सर्वसत्ताधीश परब्रह्म अशा आपल्याशी विसंगत नाही. कारण तिन्ही गुणांचे आश्रय आपणच आहात. म्हणून त्या गुणांचे कार्य इत्यादींचा आपल्यावरच आरोप केला जातो. आपणच तिन्ही लोकांचे रक्षण करण्यासाठी आपल्या मायेने सत्त्वमय शुक्लवर्ण (पोषणकारी विष्णुरूप) धारण करता, उत्पत्तीसाठी रज:प्रधान रक्तवर्ण (सृजनकारी ब्रह्मारूप) आणि प्रलयाच्या वेळी तमोगुणप्रधान कृष्णवर्ण (संहारकारी रुद्ररूप) यांचा स्वीकार करता. प्रभो ! आपण सर्व शक्तिमान आणि सर्वांचे स्वामी आहात. या जगाच्या रक्षणासाठीच आपण माझ्या घरी अवतार घेतला आहे. आजकाल कोटी कोटी असुर सेनापतींनी स्वत: राजे होऊन आपल्या आधिपत्याखाली मोठ-मोठ्या सेना तयार केल्या आहेत. आपण त्या सर्वांचा संहार कराल. हे देवाधिदेवा ! दुष्ट कंसाने तुमचा अवतार आमच्या घरी होणार हे ऐकून तुमच्या भीतीने तुमच्या मोठ्या भावांना मारून टाकले. आता त्याचे दूत, तुमच्या अवताराची बातमी त्याला सांगतील आणि तो आताच्या आता हातात शस्त्र घेऊन धावत येईल. (१३-२२)

श्रीशुक म्हणतात- परीक्षिता ! इकडे देवकीने पाहिले की, आपल्या पुत्रामध्ये पुरुषोत्तमाची सर्व लक्षणे आहेत. सुरुवातीला तिला कंसाची थोडीशी भीती वाटली. परंतु नंतर अत्यंत पवित्र हास्य करीत ती स्तुती करू लागली. (२३)

देवकी म्हणाली- प्रभो ! वेदांनी ज्या रूपाला अव्यक्त आणि सर्वांचे कारण संबोधले आहे, जे ब्रह्म, ज्योति:स्वरूप असून समस्त गुण आणि विकार यांनी रहित आहे, जे अनिर्वचनीय, निष्क्रिय व

फक्त विशुद्ध सत्तेच्या रूपात आहे ते, बुद्धी इत्यादींचे प्रकाशक रूप म्हणजेच विष्णू, आपण स्वत: आहात. ब्रह्मदेवाचे पूर्ण आयुष्य-दोन परार्ध वर्षे-समाप्त झाल्यावर सर्व लोक नष्ट होतात, पंचमहाभूते प्रकृतीमध्ये लीन होऊन जातात, कालशक्तीच्या प्रभावाने दृश्य विश्व अदृश्य होते, त्यावेळी एकमेव आपणच शेष (शिल्लक) राहाता. म्हणूनच आपले नाव ''शेष'' असेही आहे. हे प्रकृतीचे सहाय्यक प्रभो ! निमिषापासून वर्षापर्यंत अनेक भागांत विभागलेला असा जो हा महान काल आहे, ज्याच्यामुळे हे संपूर्ण विश्व कार्यरत होत आहे, ती आपली एक लीला आहे. आपण सर्वशक्तिमान आणि कल्याणाचे आश्रय आहात. मी आपणास शरण आले आहे. प्रभो ! हा जीव मृत्युरूप कराल सर्पापासून भयभीत होऊन अनेक लोकांमध्ये भटकत आहे. परंतु याला कोठेही निर्भय स्थान मिळू शकले नाही. आज मोठ्या भाग्याने हा आपल्या चरणारविंदांना शरण आल्यामुळे स्वस्थ होऊन सुखाने झोप घेत आहे. त्यामुळे मृत्यूसुद्धा याला घाबरून पळून गेला आहे. प्रभो ! आपण भक्तांचे भय हरण करणारे आहात; म्हणून आपण भ्यालेल्या आमचे दुष्ट कंसापासून रक्षण करावे. आपले हे चतुर्भुज दिव्यरूप ध्यानाची गोष्ट आहे. भौतिक शरीरावरच दृष्टी ठेवणाऱ्या माणसांसमोर हे प्रगट करू नका. हे मधुसूदना ! तुझा जन्म माझ्यापासून झाला, ही गोष्ट त्या पापी कंसाला कळता कामा नये. माझे धैर्य खचू लागले आहे. तुझ्यासाठी मी कंसाला अतिशय घाबरत आहे. हे विश्वात्मन ! आपले हे शंख, चक्र, गदा आणि कमल यांनी शोभणारे चतुर्भुज अलौकिक रूप आवरा. जसे एखादा मनुष्य आपल्या शरीरातील छिद्ररूप आकाशाला स्वाभाविकपणे धारण करतो, त्याचप्रमाणे प्रलयाच्या वेळी आपण या संपूर्ण विश्वाला आपल्या शरीरामध्ये धारण करता. तेच परम पुरुष आपण माझ्या गर्भात राहिलात, ही आपली अद्भुत मनुष्यलीलाच नाही का ? (२४-३१)

श्रीभगवान म्हणाले- हे माते ! स्वायंभुव मन्वन्तरामध्ये पूर्वजन्मी तू पृश्नी आणि हा वसुदेव सुतपा नावाचा पुण्यशील प्रजापती होता. जेव्हा ब्रह्मदेवांनी तुम्हा दोघांना संतती उत्पन्न करण्याची आज्ञा केली, तेव्हा तुम्ही दोघांनी इंद्रियनिग्रह करून तीव्र तपश्चर्या केली. तुम्ही पाऊस, वारा, ऊन, थंडी, उन्हाळा इत्यादी त्या त्या काळाचे गुणधर्म सहन केले आणि प्राणायामाने आपल्या मनाचे दोष धुऊन टाकले. तुम्ही दोघे कधी वाळलेली पाने खाऊन तर कधी वारा पिऊनच राहिलात. माझ्याकडून इष्ट वस्तू प्राप्त करण्यासाठी शांत चित्ताने माझी आराधना केलीत. माझ्या ठिकाणी चित्त एकाग्र करून असे अतिशय कठीण आणि घोर तप करता करता देवांची बारा हजार वर्षे निघून गेली. हे पुण्यमयी देवी ! त्या वेळी मी तुम्हा दोघांवर प्रसन्न झालो; कारण तुम्ही दोघांनी श्रद्धायुक्त तपश्चर्येने आणि प्रेममय भक्तीने आपल्या हृदयामध्ये नित्य माझेच चिंतन केले होते. त्या वेळी तुम्हा दोघांची अभिलाषा पूर्ण करण्यासाठी वर देणाऱ्यांचा राजा असा मी याच रूपाने तुमच्यासमोर प्रगट झालो आणि 'वर मागा' म्हणताच तुम्ही माझ्यासारखा पुत्र मागितलात. त्या वेळेपर्यंत विषयभोगांशी तुमचा काहीही संबंध आला नव्हता. तुम्हांला संततीही नव्हती. म्हणून माझ्या मायेने मोहित होऊन तुम्ही दोघांनी माझ्याकडून मोक्ष मागितला नाही. माझ्यासारखा पुत्र होण्याचा वर तुम्हांला प्राप्त झाला आणि मी तेथून निघून गेलो. आता आपले मनोरथ सफल झाले असे समजून तुम्ही विषयांचा भोग घेणे सुरू केले. या जगात स्वभाव, औदार्य तसेच अन्य गुणांच्या बाबतीत माझ्यासारखा दुसरा कोणी नाही, हे पाहून मीच तुम्हा दोघांचा पुत्र झालो आणि त्यावेळी मी 'पृश्निगर्भ' या नावाने प्रख्यात झालो. नंतर पुढील जन्मामध्ये तू अदिती झालीस आणि वसुदेव कश्यप झाले. त्या वेळीसुद्धा मी तुमचा पुत्र झालो. माझे नाव उपेंद्र होते. शरीर ठेंगू असल्यामुळे मला वामनसुद्धा म्हणत. हे माते !

तुमच्या या तिसऱ्या जन्मातसुद्धा मी त्याच रूपाने पुन्हा तुमचा पुत्र झालो. माझे वचन नेहमी सत्य असते.* (३२-४३)

मी तुम्हांला माझे हे रूप यासाठी दाखविले की, तुम्हांला माझ्या पूर्वीच्या अवतारांचे स्मरण व्हावे. मी जर असे केले नसते, तर केवळ मनुष्य-शरीरावरून माझा अवतार ओळखू आला नसता. तुम्ही दोघांनी माझ्याबद्दल पुत्रभाव आणि ब्रह्मभाव नेहमी ठेवावा. अशा प्रकारे स्नेह आणि चिंतन केल्याने तुम्हांला माझ्या परमपदाची प्राप्ती होईल. (४४-४५)

श्रीशुक म्हणतात- एवढे बोलून भगवान गप्प राहिले आणि माता-पिता (त्यांच्याकडे) पाहात असतानाच त्यांनी आपल्या योगमायेने ताबडतोब एका सामान्य बालकाचे रूप धारण केले. तेव्हा वसुदेवांनी भगवंतांच्या प्रेरणेने त्या मुलाला घेऊन सूतिकागृहाच्या बाहेर निघावे, असे ठरविले. त्याचवेळी नंदपत्नी यशोदेपासून जन्मरहित योगमाया प्रगट झाली. त्याच योगमायेने द्वारपाल आणि नगरातील लोकांच्या सर्व इंद्रियांच्या वृत्ती खेचून घेतल्या. त्यामुळे ते सर्वजण गाढ झोपी गेले. कारागृहाचे सर्व दरवाजे बंद होते. त्यांना मोठ-मोठ्या फळ्या, लोखंडाच्या साखळ्या आणि कुलपे लावलेली होती. त्यामुळे बाहेर जाणे अतिशय अवघड होते. परंतु वसुदेव श्रीकृष्णांना घेऊन जसे त्या दरवाजांजवळ पोहोचले, तसे ते सर्व दरवाजे आपोआप उघडले. सूर्योदय होताच अंधार नाहीसा होतो, त्याप्रमाणे. त्यावेळी ढग हळू-हळू गर्जना करीत वर्षाव करीत होते. म्हणून शेष आपल्या फणांनी पाऊस अडवीत भगवंतांच्या पाठोपाठ चालू लागला. त्या दिवसात वारंवार पाऊस पडत होता, त्यामुळे यमुनेचे पाणी वाढले होते. तिचा प्रवाह गंभीर आणि वेगवान झाला होता. पाण्याच्या लाटांमुळे त्यावर फेसच फेस दिसत होता. शेकडो भयानक भोवरे निर्माण झाले होते. तरीही ज्याप्रमाणे सीतापती श्रीरामांना समुद्राने वाट करून दिली होती, त्याचप्रमाणे यमुना नदीने भगवंतांना वाट करून दिली. नंदांच्या गोकुळात गेल्यावर वसुदेवांनी पाहिले की, सगळे गोप गाढ झोपी गेले आहेत. त्यांनी त्या मुलाला यशोदेच्या अंथरुणावर झोपविले आणि त्यांच्या कन्येला घेऊन ते कारागृहात परत आले. कारागृहात आल्यावर वसुदेवांनी त्या कन्येला देवकीच्या अंथरुणावर झोपविले आणि आपल्या पायात बेड्या अडकवून ते पहिल्यासारखे कारागृहात बंदिस्त झाले. तिकडे नंदपत्नी यशोदेला मूल झाल्याचे समजले. परंतु दमल्यामुळे व योगमायेने मोहित झाल्यामुळे ते मूल पुत्र की कन्या हे समजले नाही. (४६-५३)

अध्याय तिसरा समाप्त

अध्याय चौथा

कंसाच्या हातातून सुटून योगमायेचे आकाशात जाऊन भविष्यकथन

श्रीशुक म्हणतात- परीक्षिता ! जेव्हा वसुदेव परत आले, तेव्हा नगराच्या बाहेरील आणि आतील सर्व दरवाजे आपोआपच पहिल्याप्रमाणे बंद झाले. यानंतर बालकाच्या रडण्याचा आवाज ऐकून द्वारपाल उठले. ते ताबडतोब कंसाकडे गेले आणि देवकीला मूल झाल्याचे त्यांनी सांगितले. भयभीत कंस याच गोष्टीची वाट पाहात होता. ते ऐकताच तो ताबडतोब पलंगावरून उठून लगबगीने सूतिकागृहाकडे गेला.

* श्रीकृष्णांनी विचार केला की, 'माझ्यासारखा पुत्र होईल' असा मी वर दिला खरा; पण माझ्यासारखा दुसरा कोणी नसल्यामुळे मी माझे वचन सत्य करू शकत नाही. अशावेळी मागितलेल्या वस्तूच्या तिप्पट वस्तू दिली असता असत्याचा दोष लागत नाही. तेव्हा आपण स्वत:च तीन वेळा त्यांचा पुत्र व्हावे, म्हणजे आपले वचन सत्य होईल.

हा आपल्या काळाचाच जन्म आहे, असे समजून तो व्याकूळ झाला होता आणि यामुळे केस विस्कटलेल्या अवस्थेतच तो अडखळत चालला होता. तेथे येताच सती देवकी दीनवाणी होऊन रडत रडत त्या आपल्या भावाला म्हणाली, ''हे माझे हित चिंतिणाऱ्या बंधो ! ही कन्या तुला सुनेप्रमाणे आहे. शिवाय स्त्रीला मारणे मुळीच योग्य नाही. हे बंधो ! तू माझ्या पुष्कळ अग्नीसमान तेजस्वी बालकांना दैववशात मारले आहेसच. निदान आता ही कन्या तरी मला दे. हे राजा, माझी अनेक मुले मारल्यामुळे दु:खी झालेली मी तुझी बिचारी धाकटी बहीण आहे. म्हणून हे बंधो ! मला अभागिनीला हे शेवटचे मूल तरी दे.'' (१-६)

श्रीशुक म्हणतात- मुलीला कवटाळून देवकीने अत्यंत दीनपणे रडत रडत अशी याचना केली. परंतु दुष्ट कंसाने तिला अपशब्द बोलून तिच्या हातातून ती मुलगी हिसकावून घेतली. आपल्या त्या नवजात भाचीचे पाय पकडून कंसाने तिला जोराने एका खडकावर आपटले. त्याच्या हृदयातील प्रेमाला जणू स्वार्थाने मुळासकट उपटून टाकले होते. परंतु श्रीकृष्णाची ती धाकटी बहीण त्याच्या हातातून निसटून ताबडतोब आकाशात गेली आणि तीच आपल्या आठ हातात शस्त्रास्त्रे घेतलेली मोठी देवी झालेली त्याला दिसली. ती दिव्य माळा, वस्त्रे, चंदन आणि रत्नमय अलंकारांनी विभूषित होती. तिच्या हातामध्ये धनुष्य, त्रिशूळ, बाण, ढाल, तलवार, शंख, चक्र आणि गदा ही आठ आयुधे होती. सिद्ध, चारण, गंधर्व, अप्सरा, किन्नर आणि नाग पुष्कळशा भेटवस्तू तिला अर्पण करून तिची स्तुती करीत होते. देवी कंसाला म्हणाली. ''अरे मूर्खा ! मला मारून तुला काय मिळणार आहे ? तुझ्या मागील जन्मातील शत्रू तुला मारण्यासाठी दुसऱ्या ठिकाणी कोठेतरी जन्माला आला आहे. आता तू निर्दोष बालकांची विनाकारण हत्या करू नकोस.'' असे म्हणून भगवती योगमाया तेथून अंतर्धान पावली आणि पृथ्वीवरील अनेक ठिकाणी निरनिराळ्या नावांनी प्रसिद्ध झाली. (७-१३)

देवीचे हे म्हणणे ऐकून कंसाला अतिशय आश्चर्य वाटले. त्याने त्याचवेळी देवकी आणि वसुदेव यांना कैदेतून मुक्त केले आणि नम्रतेने तो त्यांना म्हणाला. अग ताई ! अहो भावोजी ! अरेरे ! मी अत्यंत पापी आहे. ज्याप्रमाणे राक्षस आपल्याच मुलांना मारून टाकतो, त्याचप्रमाणे मी तुमची बरीच मुले मारून टाकली. मी इतका दुष्ट आहे की, माझ्यामध्ये करुणेचा लवलेशही नाही. मी माझ्या बांधवांचा आणि मित्रांचाही त्याग केला आहे. आता मला कोणत्या नरकात जावे लागेल, बरे ! मी तर ब्रह्मघातकी माणसाप्रमाणे जिवंत असूनही मेल्यासारखाच आहे. फक्त माणसेच खोटे बोलतात असे नाही, तर विधाताही खोटे बोलतो. त्याच्यावर विश्वास ठेवूनच मी पाप्याने बहिणीची मुले मारली ! तुम्ही दोघेही महात्मे आहात. आपल्या पुत्रांसाठी शोक करू नका. त्यांना त्यांच्या कर्माचेच फळ मिळाले. सर्व प्राणी प्रारब्धाच्या अधीन आहेत. म्हणूनच ते सर्वकाळ एकमेकांबरोबर राहू शकत नाहीत. जशा मातीच्या वस्तू तयार होतात आणि मातीत मिसळतात, परंतु मातीमध्ये काही बदल होत नाही. त्याचप्रमाणे शरीरांचे उत्पन्न होणे, नाहीसे होणे, हे चालूच असते. परंतु आत्म्यावर याचा काही प्रभाव पडत नाही. (१४-१९)

जे लोक हे तत्त्व जाणत नाहीत, ते या शरीरालाच आत्मा समजतात. यामुळेच पुत्रादी देहांशी संयोग व वियोग होतो, तेव्हा (सुख-दु:खरूपी) संसारातून सुटका होत नाही. म्हणून हे ताई ! मी जरी तुझ्या पुत्रांना मारले असले तरी तू त्यांच्यासाठी शोक करू नकोस; कारण सर्व प्राण्यांना पराधीनपणे आपापल्या कर्मांचे फळ भोगावेच लागते. आपले स्वरूप न

जाणल्यामुळे जोपर्यंत जीव असे मानतो की, ''आपण मरणारा आहे किंवा मारणारा आहे,'' तोपर्यंत शरीराच्या जन्म-मृत्यूचा अभिमान धरणारा हा अज्ञानी जीव पीडा देणारा वा पीडा भोगणारा होतो. माझ्या या दुष्टतेला तुम्ही दोघांनी क्षमा करावी; कारण तुम्ही सज्जन असून दीनांचे रक्षण करणारे आहात. असे म्हणून कंसाने देवकी-वसुदेवांचे पाय धरले. त्यावेळी त्याच्या डोळ्यांतून अश्रू वाहात होते. यानंतर त्याने योगमायेच्या वचनावर विश्वास ठेवून स्वत:च्या सौजन्याने देवकी आणि वसुदेव यांना कैदेतून सोडून दिले. कंसाला पश्चात्ताप झालेला पाहून देवकीने त्याला क्षमा केली. तिचा राग मावळला. त्याचवेळी वसुदेव हसून त्याला म्हणाले. ''हे कंसा ! तू म्हणतोस ते खरे आहे. अज्ञानामुळेच जीव, शरीर इत्यादींना मी असे समजतो. यामुळेच आप-परभाव निर्माण होतो. आणि अशी भेददृष्टी झाल्यानेच शोक, हर्ष, भय, द्वेष, लोभ, मोह आणि मदाने लोक आंधळे होतात. आणि सर्वांना प्रेरणा देणारे भगवंतच एका वस्तूने दुसऱ्या वस्तूचा परस्पर नाश करीत आहेत, याचे त्यांना भान राहात नाही.'' (२०-२७)

श्रीशुक म्हणतात- अशा प्रकारे जेव्हा प्रसन्न होऊन निष्कपटभावाने वसुदेव आणि देवकी कंसाशी बोलले, तेव्हा त्यांची अनुमती घेऊन तो आपल्या महालाकडे निघून गेला. ती रात्र उलटून गेल्यावर कंसाने आपल्या मंत्र्यांना बोलावले आणि योगमायेने जे सांगितले होते, ते सर्व त्यांना कथन केले. कंसाचे मंत्री फारसे शहाणे नव्हते. दैत्य असल्यामुळे स्वभावत:च ते देवांचा द्वेष करीत. आपल्या स्वामींचे म्हणणे ऐकल्यावर ते देवशत्रू कंसाला म्हणाले. ''भोजराज ! असे असेल तर आम्ही आजच शहरे, गावे, गवळ्यांच्या वस्त्या इत्यादी ठिकाणी जेवढी लहान मुले असतील, मग ती दहा दिवसांच्या आतील किंवा बाहेरची असोत, सर्वांना आजच मारून टाकतो. रणांगणाला भिणारे देवगण युद्धाची तयारी करूनही काय करणार आहेत ? ते तर आपल्या धनुष्याचा टणत्कार ऐकूनच नेहमी घाबरलेले असतात. जेव्हा आपण त्यांच्यावर बाणवर्षाव करून त्यांना घायाळ करता, तेव्हा आपल्या प्राणांचे रक्षण करण्यासाठी युद्धभूमी सोडून देव पळू लागतात. काही देव तर आपली शस्त्रास्त्रे जमिनीवर टाकून हात जोडून दीनपणा प्रगट करू लागतात. तर काही जण शेंड्या सोडून व कासोटे फेडून आपल्याला शरण येतात आणि म्हणतात की, ''आम्ही भयभीत झालो आहोत. आमचे रक्षण करा.'' जे शत्रू शस्त्रास्त्रप्रयोग विसरले आहेत, ज्यांचे रथ मोडून पडले आहेत, जे भयभीत झाले आहेत, जे लोक युद्ध सोडून विमनस्क स्थितीत आहेत, ज्यांची धनुष्ये मोडली आहेत किंवा ज्यांनी युद्धाकडे पाठ फिरविली आहे, अशांना आपण मारीत नाही. जिथे भांडण-तंटा नसेल तेथेच देवांचे शौर्य. रणभूमीच्या बाहेरच ते फुशारकी मारतात. ते, तसेच एकांतवासात राहाणारा विष्णू , वनवासी शंकर, अल्प सामर्थ्य असणारा इंद्र आणि तपस्वी ब्रह्मदेव यांच्यापासून आपल्याला काय भय असणार आहे ? आमचे मत असे आहे की, असे असले तरी देवांची उपेक्षा करता कामा नये; कारण ते आपले शत्रू आहेत. म्हणून त्यांचे मूळच उखडून टाकण्यासाठी आपण आमच्यासारख्या विश्वासपात्र सेवकांची नेमणूक करावी. जेव्हा शरीरात रोग उत्पन्न होतो आणि त्याची उपेक्षा केल्यामुळे आपले मूळ घट्ट करतो आणि मग असाध्य होतो, किंवा इंद्रियांची उपेक्षा केल्यावर त्यांचे नियंत्रण करणे कठीण होते, त्याप्रमाणे जर शत्रूची आधी उपेक्षा केली तर तो आपले सामर्थ्य वाढवितो आणि मग त्याचा पराभव करणे अवघड होऊन बसते. देवांचा आधार विष्णू आहे आणि जिथे सनातनधर्म आहे, तिथे तो राहातो. वेद, गाय, ब्राह्मण, तपश्चर्या आणि ज्यामध्ये दक्षिणा

दिली जाते ते यज्ञ; ही सनातन धर्माची मुळे होत. म्हणून हे भोजराज ! वेदवेत्ते ब्राह्मण, तपस्वी, याज्ञिक आणि यज्ञासाठी तूप इत्यादी हविर्द्रव्य देणाऱ्या गाईंचा आम्ही संपूर्ण नि:पात करू. ब्राह्मण, गाई, वेद, तपश्चर्या, सत्य, इंद्रियदमन, मनोनिग्रह, श्रद्धा, दया, सहनशीलता आणि यज्ञ ही विष्णूची शरीरे आहेत. तो विष्णूच सर्व देवांचा स्वामी आणि असुरांचा द्वेष करणारा आहे. परंतु तो कुठेतरी गुहेत लपून राहातो. महादेव, ब्रह्मदेव आणि सर्व देवतांचे मूळ तोच आहे. सर्व ऋषींना मारून टाकणे, हाच त्याला मारण्याचा उपाय आहे. (२८-४२)

श्रीशुक म्हणतात - अशा रीतीने दुष्ट मंत्र्यांशी सल्ला - मसलत करून काळाच्या फासात सापडलेल्या दुष्ट कंसाने ब्राह्मणांनाच मारणे योग्य ठरवले. त्याने इच्छेनुसार रूप धारण करणाऱ्या हिंसाप्रेमी राक्षसांना सर्वत्र जाऊन संतपुरुषांची हिंसा करण्याची आज्ञा केली व आपल्या महालात प्रवेश केला. त्या असुरांचा स्वभाव रजोगुणी होता. तमोगुणामुळे त्यांचे चित्त, विवेक करू शकत नव्हते. मृत्यू त्यांच्या डोक्यावर नाचत होता; म्हणूनच त्यांनी संतांचा द्वेष केला. जे लोक संतांचा अनादर करतात, त्यांचे ते कुकर्म त्यांचे आयुष्य, लक्ष्मी, कीर्ती, धर्म, इह-परलोक, आशा-आकांक्षा आणि संपूर्ण कल्याण नष्ट करते. (४३-४६)

अध्याय चौथा समाप्त

अध्याय पाचवा

गोकुळात भगवंतांचा जन्म-महोत्सव

श्रीशुकाचार्य म्हणतात- उदार नंदमहाराजांना मुलगा झाल्याचे कळताच अतिशय आनंद झाला. त्यांनी स्नान केले आणि पवित्र होऊन नवीन वस्त्रालंकार परिधान केले. नंतर वेदवेत्त्या ब्राह्मणांना बोलावून पुण्याहवाचन करवून आपल्या पुत्राचा जातकर्म-संस्कार केला. त्याचबरोबर देवता आणि पितरांची विधिपूर्वक पूजा केली. त्यांनी ब्राह्मणांना वस्त्रालंकारांनी सुशोभित दोन लाख गाई दान दिल्या. तसेच रत्ने आणि सुंदर वस्त्रांनी झाकलेले तिळांचे सात ढीग दान दिले. कालगतीने (नवीन पाणी, अशुद्ध भूमी इ.), स्नानाने (शरीर इ.), धुण्याने (वस्त्रे इ.), संस्कारांनी (गर्भ इ.), तपश्चर्येने (इंद्रिये इ.), यज्ञाने (ब्राह्मण इ.), दानाने (धन, धान्य इ.) आणि संतोषाने (मन इ.) द्रव्ये शुद्ध होतात. आणि आत्म्याची शुद्धी आत्मज्ञानाने होते. त्यावेळी ब्राह्मण, मंगलमय आशीर्वाद देऊ लागले. पौराणिक, वंशाचे वर्णन करणारे व स्तुतिपाठक स्तुती करू लागले. गायक गाऊ लागले. भेरी आणि दुंदुभी वारंवार वाजू लागल्या. गोकुळातील सर्व घरांची दारे, अंगणे आणि आतील भाग झाडून पुसून घेतले गेले. त्यामध्ये सुगंधित द्रव्ये शिंपडली गेली. त्यांना रंगी-बेरंगी ध्वज, पताका, फुलांच्या माळा, रंगी-बेरंगी वस्त्रे आणि झाडांच्या पानांच्या तोरणांनी सजविले गेले. गाई, बैल आणि वासरांच्या अंगांना हळद-तेलाचा लेप दिला गेला आणि त्यांना गेरूने रंगविले. तसेच मोरपंख, फुलांचे हार, तऱ्हेतऱ्हेची सुंदर वस्त्रे आणि सोन्याच्या साखळ्यांनी सजविले गेले. राजा ! सर्व गोप बहुमूल्य वस्त्रे, अलंकार, अंगरखे आणि पगड्यांनी नटून थटून हातात नजराणे घेऊन नंदांच्या घरी आले. (१-८)

यशोदेला पुत्र झाला, हे ऐकून गोपींनासुद्धा अतिशय आनंद झाला. त्यांनी वस्त्रे, अलंकार आणि डोळ्यांत काजळ वगैरे घालून त्या नटल्या. गोपींची मुखकमले नुकत्याच लावलेल्या कुंकूरूपी परागांनी

अतिशय सुंदर दिसत होती. मोठमोठे नितंब असलेल्या त्या भेटवस्तू घेऊन लगबगीने यशोदेकडे गेल्या. त्यामुळे त्यावेळी त्यांची वक्ष:स्थळे हलत होती. गोपींच्या कानांमध्ये चमकणाऱ्या रत्नांची कुंडले झगमगत होती. गळ्यामध्ये सुवर्णहार चमचम करीत होते. त्यांनी सुंदर वस्त्रे परिधान केली होती. त्यांनी वेण्यांमध्ये घातलेली फुले वाटेत ओघळून पडत होती. हातामध्ये बांगड्या चमकत होत्या. लगबगीमुळे त्यांच्या कानातील कुंडले, वक्ष:स्थळे आणि हार हलत होते. अशा प्रकारे नंदांच्या घरी जाताना त्यांची आगळीच शोभा दिसत होती. त्या बाळाला आशीर्वाद देत होत्या की, "भगवान याचे दीर्घकाळ रक्षण करो." असे म्हणून हळद-तेल-मिश्रित पाणी आजूबाजूच्या लोकांवर शिंपडीत त्या उच्च स्वरात श्रीकृष्णाला उद्देशून गीत गात होत्या. (९-१२)

सर्व जगताचे स्वामी अनंत भगवान श्रीकृष्ण जेव्हा नंदराजांच्या व्रजामध्ये प्रगट झाले, तेव्हा त्यांच्या जन्माचा महान उत्सव साजरा केला गेला. त्यावेळी निरनिराळी मंगल वाद्ये वाजविण्यात येऊ लागली. आनंदाने बेहोष होऊन गोपगण एकमेकांवर दही, दूध, तूप आणि पाणी उडवू लागले. एकमेकांच्या तोंडाला लोणी माखू लागले आणि लोणी फेकून आनंदोत्सव साजरा करू लागले. नंद अतिशय उदार होते. त्यांनी गोपांना पुष्कळशी वस्त्रे, अलंकार आणि गाई दिल्या. सूत, मागध, बंदीजन तसेच नृत्य, वाद्य इत्यादी कलांवर उदरनिर्वाह करणाऱ्यांना नंदांनी आनंदाने त्यांनी त्यांनी मागितलेल्या वस्तू देऊन त्यांचा यथोचित सत्कार केला. यामुळे भगवान विष्णू प्रसन्न होऊन आपल्या मुलाचे कल्याण व्हावे, असे त्यांना वाटत होते. नंदांनी अभिनंदन केलेली भाग्यवती रोहिणीसुद्धा दिव्य वस्त्रे, हार आणि गळ्यातील वेगवेगळ्या अलंकारांनी नटून थटून वावरत होती. परीक्षिता ! त्याच दिवसापासून नंदांच्या व्रजामध्ये सर्व प्रकारची समृद्धी आली आणि भगवान श्रीकृष्णांचा निवास असल्यामुळे तसेच आपल्या स्वाभाविक गुणांमुळे ते लक्ष्मीचे क्रीडास्थळ बनले. (१३-१८)

परीक्षिता ! काही दिवसांनंतर गोकुळाच्या संरक्षणाची कामगिरी दुसऱ्या गोपांवर सोपवून नंद कंसाला वार्षिक कर देण्यासाठी मथुरेला गेले. आपला मित्र नंद मथुरेमध्ये आला आहे, असे जेव्हा वसुदेवांना समजले, तेव्हा कंसाला कर देऊन आलेल्या नंदाच्या वसतिस्थानावर ते गेले. वसुदेवांना पाहाताच नंद ताबडतोब उठून उभे राहिले. जणू काही मेलेल्या शरीरात प्राण परत आला आहे. त्यांनी मोठ्या प्रेमाने आपल्या प्रियतम वसुदेवांना दोन्ही हात धरून छातीशी कवटाळले. हे राजा ! नंदांनी वसुदेवांचा मोठा आदर-सत्कार केला. ते आरामात बसले, त्यावेळी वसुदेवांचे चित्त आपल्या पुत्रांकडे लागले होते. नंदांना खुशाली विचारून ते म्हणाले. (१९-२२)

(वसुदेव म्हणाले)- "बंधो ! तुझे वय झाले होते आणि आतापर्यंत तुला मूलबाळ झाले नव्हते. एवढेच काय, आता तुला संतान होण्याची आशाही नव्हती. पण तुला आता मुलगा झाला, ही मोठी भाग्याची गोष्ट आहे. आज आपली भेट झाली, ही सुद्धा अतिशय आनंदाची गोष्ट आहे. आपल्या प्रियजनांची भेट होणे हे सुद्धा अतिशय दुर्लभ आहे. या संसाराचे चक्र असेच आहे. याला तर एक प्रकारचा पुनर्जन्मच समजले पाहिजे. जसे नदीच्या प्रवाहात वाहणाऱ्या गवताच्या काड्या नेहमी एकमेकांबरोबर राहू शकत नाहीत, त्याचप्रमाणे वेगवेगळे प्रारब्ध असणाऱ्या प्रियजनांचेसुद्धा इच्छा असूनही एका ठिकाणी राहाणे संभवत नाही. हल्ली तू आपल्या बांधवांसह आणि स्वजनांसह ज्या महावनात राहातोस, तेथे पाणी, गवत आणि झाडे-वेली भरपूर आहेत ना ? ते जनावरांना अनुकूल आणि रोगराईपासून मुक्त आहे ना ? बंधो ! माझा मुलगा त्याच्या (रोहिणी) आईबरोबर तुमच्या

व्रजामध्ये राहात आहे. त्याचे पालन-पोषण तू आणि यशोदा करीत आहात. म्हणून तो तुम्हांलाच आपले माता-पिता मानीत असेल. तो सुखरूप आहे ना ? ज्यामुळे स्वजनांना सुख मिळते, तोच धर्म, अर्थ आणि काम शास्त्रविहित आहे. ज्यामुळे स्वजनांना त्रास होतो, तो धर्म, अर्थ आणि काम हितकारक नाही. (२३-२८)

नंद म्हणाले- कंसाने देवकीचे अनेक पुत्र मारले. शेवटी एक मुलगी वाचली होती, तीसुद्धा स्वर्गाकडे गेली. प्राण्यांचे सुख-दु:ख त्यांच्या भाग्यावरच अवलंबून असते यात काहीही संशय नाही. भाग्य हेच प्राण्याचा एकमेव आश्रय आहे. जीवनाच्या सुख-दु:खाचे कारण भाग्यच आहे. हे जो जाणतो, तो ते ते प्राप्त झाल्यावर मोहित होत नाही. (२९-३०)

वसुदेव म्हणाले- बंधो ! तू राजा कंसाला त्याचा वार्षिक कर चुकता केलास. आपली भेटही झाली. आता तू येथे अधिक दिवस राहू नकोस. कारण आजकाल गोकुळात मोठमोठे अपशकुन होऊ लागले आहेत. (३१)

श्रीशुक म्हणतात- वसुदेव जेव्हा असे म्हणाले, तेव्हा नंदादी गोपांनी त्यांचा निरोप घेतला आणि बैल जोडलेल्या छकड्यांवर स्वार होऊन त्यांनी गोकुळाची वाट धरली. (३२)

अध्याय पाचवा समाप्त

अध्याय सहावा

पूतना-उद्धार

श्रीशुकाचार्य म्हणतात- नंद मथुरेहून निघाले, तेव्हा वाटेत विचार करू लागले की, वसुदेवांचे म्हणणे खोटे असणार नाही; म्हणून संकट येईल, या भीतीने ते मनोमन भगवंतांना शरण गेले. पूतना नावाची एक अत्यंत क्रूर राक्षसी होती. लहान मुलांना मारणे एवढे एकच तिचे काम होते. कंसाच्या आज्ञेवरून ती नगरे, गावे आणि गवळ्यांच्या वस्त्यांमध्ये लहान मुले मारण्यासाठी फिरत असे. जेथील लोक आपल्या दैनंदिन कामांमध्ये राक्षसांची भीती घालविणाऱ्या भक्तवत्सल भगवंतांचे स्मरण इत्यादी करीत नाहीत, तेथेच राक्षसांचे फावते. आकाशमार्गाने जाऊ शकणारी ती पूतना इच्छेनुसार रूपे धारण करीत होती. एके दिवशी नंदांच्या गोकुळाजवळ येऊन मायेने स्वत:ला एक सुंदर तरुणी बनवून ती गोकुळात शिरली. तिने अंबाड्यावर मोगऱ्याची वेणी माळली होती. सुंदर वस्त्रे परिधान केली होती. जेव्हा तिची कर्णफुले हलत असत, तेव्हा त्यांच्या चमकण्याने तोंडावर आलेले तिचे कुरळे केस शोभिवंत दिसत होते. तिचे नितंब आणि स्तन उभार होते, तर कंबर बारीक होती. आपले मधुर हास्य आणि कटाक्षांनी ती व्रजवासियांचे चित्त वेधून घेत होती. हातात कमळ घेऊन येणाऱ्या त्या रूपवती रमणीला पाहून गोपींना वाटले की, जणू स्वत: लक्ष्मीच आपल्या पतीचे दर्शन घेण्यासाठी आली आहे. (१-६)

बालग्रहासारखी ती इकडे तिकडे लहान मुलांना शोधीत सहजपणे नंदांच्या घरात शिरली. तेथे दुष्टांचे काळ बालक श्रीकृष्ण पाळण्यात झोपलेले तिने पाहिले. परंतु राखेच्या ढिगात लपलेला अग्नी असतो, त्याचप्रमाणे त्यावेळी त्यांनी आपले प्रचंड तेज लपवून ठेवले होते. चराचराचा आत्मा असणाऱ्या त्यांनी लहान मुलांना मारणारा हा ग्रह आहे, हे जाणून आपले डोळे बंद केले. जसे एखाद्याने नकळत, झोपलेल्या सापाला दोरी समजून उचलून घ्यावे, त्याचप्रमाणे आपल्या काळरूप श्रीकृष्णांना पूतनेने उचलून मांडीवर घेतले. (७-८)

मखमली म्यानात लपविलेल्या तीक्ष्ण धारेच्या तलवारीप्रमाणे पूतनेचे हृदय क्रूर होते. परंतु वरवर मात्र ती अत्यंत मधुर व्यवहार करीत होती. रोहिणीने आणि यशोदेने तिला पाहिले, पण तिच्या सौंदर्यप्रभावाने हतप्रभ होऊन स्तब्धपणे त्या तिला पाहातच राहिल्या. इकडे तिने त्या बालकाला भयंकर मांडीवर घेऊन त्याच्या तोंडात आपला स्तन दिला. त्या स्तनाला अतिशय भयंकर आणि कोणत्याही प्रकारे न पचू शकणारे विष लावलेले होते. तेव्हा भगवंतांनी रागाने दोन्ही हातांनी तिचा स्तन जोरात दाबून तिच्या प्राणांसह तिचे दूध प्राशन केले. तिची सर्व मर्मस्थाने खिळखिळी झाली. "अरे सोड ! सोड ! पुरे कर !" असे ओरडत वारंवार आपले हात-पाय आपटीत ती रडू लागली. तिने डोळे फिरवले आणि तिचे शरीर घामाने थबथबले. तिच्या महाभयंकर आक्रोशाने डोंगरांसह पृथ्वी आणि ग्रहांसह अंतरिक्ष डगमगू लागले. सातही पाताळे आणि दिशा दुमदुमून गेल्या. विजा कोसळतात की काय, या शंकेने पुष्कळसे लोक जमिनीवर कोसळले. परीक्षिता ! अशा प्रकारे पूतनेच्या स्तनांमध्ये इतक्या वेदना झाल्या की, ती गतप्राण झाली. ती मूळ रूपाने प्रगट झाली. केस विस्कटले. इंद्राच्या वज्राने घायाळ होऊन वृत्रासुर जसा पडला होता, तशीच ती सुद्धा (बाहेर) गोठ्यात हातपाय पसरून पडली. (९-१३)

राजेंद्रा ! पूतनेच्या शरीराने खाली पडता पडता सुद्धा सहा कोस अंतरातील झाडे उन्मळून पाडली. ही तर मोठीच अद्भुत घटना घडली. पूतनेचे शरीर अत्यंत भयानक होते. तिचे तोंड नांगराच्या फाळाप्रमाणे तीक्ष्ण आणि भयंकर दाढा असलेले होते. तिच्या नाकपुड्या डोंगरातील गुहेप्रमाणे खोल होत्या आणि स्तन पहाडावरून निखळलेल्या कड्यांप्रमाणे होते. लाल लाल केस चारी बाजूंना विस्कटून पसरले होते. डोळे अंधाऱ्या विहिरीप्रमाणे खोल, नितंब नदीच्या उंच किनाऱ्याप्रमाणे भयंकर, हात, जांघा आणि पाय नदीच्या पुलांप्रमाणे वाटत होते. तसेच पोट पाणी नसलेल्या डोहाप्रमाणे दिसत होते. पूतनेचे ते शरीर पाहून गवळी आणि गोपी भयभीत झाले. तिची भयंकर किंकाळी ऐकून त्यांचे हृदय, कान आणि डोके अगोदरच फुटल्यासारखे झाले होते. जेव्हा गोपींनी पाहिले की, बाल श्रीकृष्ण निर्भयपणे तिच्या छातीवर खेळत आहेत, तेव्हा अत्यंत घाबरून लगबगीने तेथे जाऊन त्यांनी श्रीकृष्णांना उचलून घेतले. (१४-१८)

यानंतर यशोदा आणि रोहिणीसह गोपींनी गाईचे शेपूट अंगावरून फिरविणे इत्यादि उपायांनी त्या बाळाचे सर्वप्रकारे (दुष्ट शक्तींपासून) रक्षण केले. त्यांनी प्रथम त्याला गोमूत्राने स्नान घातले. नंतर सर्व अंगाला गायीच्या अंगावरील धूळ लावली आणि त्यानंतर बाराही अंगांना भगवंतांच्या नामांनी शेण लावून पीडाशमन केले. त्यानंतर गोपींनी आचमन करून अंगन्यास आणि करन्यास केले. तसेच बालकाच्या अंगावर बीजन्यास केले. (१९-२१)

गोपी म्हणू लागल्या- "अजन्मा भगवान तुझ्या पायांचे, मणिमान गुडघ्यांचे, यज्ञपुरुष मांड्यांचे, अच्युत कमरेचे, हयग्रीव पोटाचे, केशव हृदयाचे, ईश वक्षःस्थळाचे, सूर्य कंठाचे, विष्णू हातांचे, उरुक्रम तोंडाचे आणि ईश्वर मस्तकाचे रक्षण करोत. तुझ्या रक्षणासाठी चक्रधर भगवान तुझ्या पुढे राहोत, गदाधारी श्रीहरी पाठीमागे, धनुष्य आणि खड्ग धारण करणारे भगवान मधुसूदन आणि अजन दोघे दोन बाजूंना, शंखधारी उरुगाय चारी कोपऱ्यांमध्ये, उपेंद्र वर, गरुड पृथ्वीवर आणि भगवान परमपुरुष तुझ्या सर्व बाजूंनी रक्षणासाठी राहोत. हृषीकेश इंद्रियांचे आणि नारायण प्राणांचे रक्षण करोत. श्वेतद्वीपाचे अधिपती चित्ताचे आणि योगेश्वर मनाचे रक्षण करोत. पृश्निगर्भ तुझ्या बुद्धीचे आणि परमात्मा भगवान तुझ्या अहंकाराचे रक्षण करोत. खेळताना

गोविंद रक्षण करोत, निद्रेच्या वेळी माधव रक्षण करोत. चालताना वैकुंठ आणि बसलेल्यावेळी श्रीपती तुझे रक्षण करोत. सर्व ग्रहांना भयभीत करणारे यज्ञभोक्ते भगवान भोजनाचे वेळी तुझे रक्षण करोत. डाकिनी, राक्षसी, कूष्मांडा इत्यादी बालग्रह, भूत, प्रेत, पिशाच्च, यक्ष, राक्षस आणि विनायक, कोटरा, रेवती, ज्येष्ठा, पूतना, मातृका इत्यादी, शरीर, प्राण तसेच इंद्रियांचा नाश करणारे उन्माद अपस्मार इत्यादी रोग, स्वप्नात पाहिलेले महान उत्पात, वृद्धग्रह आणि बालग्रह इत्यादी सर्व अनिष्ट घटक, भगवान विष्णूंच्या नावाचा उच्चार केल्याने भयभीत होऊन नष्ट होऊन जावोत. (२२-२९)

श्रीशुकाचार्य म्हणतात- अशा प्रकारे प्रेम करणाऱ्या गोपींनी रक्षामंत्र म्हटल्यावर यशोदेने आपल्या मुलाला दूध पाजून पाळण्यात निजविले. त्याचवेळी नंद वगैरे गोप मथुरेहून गोकुळात पोहोचले. तेव्हा पूतनेचे ते भयंकर शरीर पाहून ते चकित झाले. ते म्हणू लागले, वसुदेवाच्या रूपात निश्चितच कोण्या ऋषीने जन्म घेतला असेल. किंवा हेही शक्य आहे की, वसुदेव पूर्वजन्मीचे कोणी योगेश्वर असतील. कारण ते जसे म्हणाले होते, तसेच संकट येथे दिसून आले. तोपर्यंत वज्रवासींनी कुऱ्हाडींनी पूतनेच्या शरीराचे तुकडे तुकडे केले आणि लांब नेऊन एकेक अवयव चितेवर ठेवून जाळून टाकले. कृष्णाने दूध प्याल्यामुळे ज्याची सर्व पापे तत्काळ नष्ट झाली, असा तो तिचा देह जळत असता, त्यातून धुपासारखा सुगंधी धूर निघू लागला. पूतना एक राक्षसी होती. लोकांच्या लहान मुलांना मारणे आणि त्यांचे रक्त पिणे हेच तिचे काम होते. श्रीकृष्णांनासुद्धा तिने मारून टाकण्याच्या इच्छेनेच स्तनपान करविले होते. तरीसुद्धा तिला सद्गती मिळाली. तर मग जे परमात्मा श्रीकृष्णांना श्रद्धा आणि भक्तीने मातेप्रमाणे प्रेमपूर्वक अतिशय प्रिय असणारी वस्तू समर्पित करतात, त्यांच्यासंबंधी काय बोलावे ? सर्वांना वंदनीय असणाऱ्या, ब्रह्मदेवादी देवांनासुद्धा वंदनीय आणि भक्तांच्या हृदयातील ठेवा असणाऱ्या चरणांनी पूतनेचे शरीर दाबून, भगवंतांनी तिचे स्तनपान केले होते. जरी ती राक्षसी होती, तरीसुद्धा मातेला मिळणारी स्वर्गगती तिला मिळाली. तर मग ज्यांच्या स्तनांचे दूध भगवंत (ब्रह्मदेवाने वासरे व गोपबालक यांना लपवून ठेवलेल्या वेळी) प्रेमाने प्याले, त्या गाई आणि मातांची गोष्ट काय सांगावी ? पुत्रप्रेमाने आपणहून पाझरणारे ज्यांचे दूध भगवंत भरपूर प्याले, त्यांना भगवान देवकीनंदनांनी मोक्षापर्यंत सर्व काही दिले. राजन ! ज्या गोपी व गाई नित्य भगवान श्रीकृष्णांना आपल्या पुत्राच्या रूपातच पाहात होत्या, त्या अज्ञानजनित संसारचक्रात कधीही अडकू शकत नाहीत. (३०-४०)

नंद वगैरे गोपांना जेव्हा चितेच्या धुराचा सुगंध येऊ लागला, तेव्हा, "हे काय आहे ? हा सुगंध कोठून येत आहे ?" असे म्हणत ते व्रजामध्ये पोहोचले. तिथे गोपांनी त्यांना पूतनेच्या येण्यापासून ते मरेपर्यंत सर्व वृत्तांत सांगितला. पूतनेचा मृत्यू आणि श्रीकृष्णाचे सुखरूप असणे, हे ऐकून ते लोक अतिशय आश्चर्यचकित झाले. परीक्षिता ! मृत्यूच्या तावडीतून सुटून आलेल्या आपल्या मुलाला, उदार नंदांनी उचलून घेतले आणि वारंवार त्याचे मस्तक हुंगून ते अतिशय आनंदित झाले. हा 'पूतना-मोक्ष' भगवान श्रीकृष्णांची अद्भुत बाल-लीला आहे. जो मनुष्य श्रद्धेने याचे श्रवण करतो, त्याला भगवान श्रीकृष्णांबद्दल प्रेम वाटू लागते. (४१-४४)

अध्याय सहावा समाप्त

अध्याय सातवा

छकडा मोडणे आणि तृणावर्त-उद्धार

राजाने म्हटले- गुरुवर्य ! सर्वशक्तिमान भगवान श्रीहरींनी जे जे अवतार धारण करून पुष्कळशा मनोहर आणि श्रवणीय लीला केल्या, ज्यांचे श्रवण केल्याने प्रेम वाढते आणि विषयांची आशा नाहीशी होते, मनुष्याचे अंत:करण तत्काळ शुद्ध होते, भगवंतांविषयी भक्ती आणि त्यांच्या भक्तांशी मैत्री जडते, त्या मनोहर लीलांचे आपल्याला योग्य वाटल्यास वर्णन करावे. भगवान श्रीकृष्णांनी मनुष्यलोकी प्रगट होऊन मनुष्य स्वभावाचे अनुकरण करीत ज्या बाललीला केल्या, त्याही अद्भुत असतील. तरी आपण त्यासुद्धा मला सांगाव्यात. (१-३)

श्रीशुक म्हणतात- एकदा भगवान श्रीकृष्णांचा कूस बदलण्याचा अभिषेक-उत्सव साजरा केला जात होता. त्याच दिवशी त्यांचे जन्मनक्षत्रही होते. त्यामुळे घरात पुष्कळ स्त्रियांची गर्दी झाली होती. गाणे-बजावणे चालले होते. ब्राह्मणांचा मंत्रघोष चालू होता. त्यावेळी यशोदेने मुलाला अभिषेक केला. नंदराणीने ब्राह्मणांचा मोठा सन्मान केला. त्यांना अन्न, वस्त्रे, पुष्पमाळा, गाई इत्यादी प्रिय वस्तू देऊन उत्तमप्रकारे ब्राह्मणपूजन केले. तेव्हा त्यांनी मंगल स्नान घातलेल्या त्या बाळाला आशीर्वाद दिले. नंतर लाडक्याच्या डोळ्यांवर झोप आली आहे, असे पाहून तिने त्याला हळुवारपणे अंथरुणावर झोपविले. थोड्याच वेळात जाग येऊन तो स्तनपान करण्यासाठी रडू लागला. त्यावेळी यशोदा उत्सवासाठी आलेल्या गोपगोपींचे स्वागत करण्यात गुंतली होती; त्यामुळे तिला त्याचे रडणे ऐकू आले नाही. तेव्हा रडत रडतच श्रीकृष्ण आपले पाय झटकू लागला. बाळ श्रीकृष्णाला एका छकड्याखाली झोपवले होते. त्याचे पालवीसारखे लाल चिमुकले पाय आपटताच तो छकडा उलटला. त्याच्यावर दूध, दही वगैरे पदार्थ घालून ठेवलेली भांडी होती, ती इकडे तिकडे विखरून पडली. तसेच त्या छकड्याची चाके, कणा आणि जोखड मोडून अस्ताव्यस्त होऊन पडली. उत्सवासाठी आलेल्या स्त्रिया, यशोदा, रोहिणी आणि नंद वगैरे गोप ही विचित्र घटना पाहून घाबरून गेले. ते म्हणू लागले, "अरे ! हा छकडा आपोआप कसा काय उलटला बुवा !" त्यांना याचे कोणतेच कारण कळले नाही. तेव्हा तेथे असलेली मुले गोप-गोपींना म्हणाली, "या कृष्णानेच रडताना आपल्या पायाने ठोकरून हा उलटविला, यात शंका नाही." परंतु त्या गोपांनी 'ती पोरांची बडबड' मानून त्यावर विश्वास ठेवला नाही. कारण त्या मुलाचा असामान्य पराक्रम त्यांना माहीत नव्हता. (४-१०)

हा ग्रहांचा कोप आहे, असे यशोदेला वाटले. तिने रडणाऱ्या लाडक्याला मांडीवर घेऊन ब्राह्मणांकडून वेदमंत्रांनी शांतिपाठ करविला आणि त्याला दूध पाजले. बलाढ्य गोपांनी छकडा पुन्हा व्यवस्थित ठेवून त्याच्यावर पहिल्याप्रमाणे सर्व साहित्य ठेवले. ब्राह्मणांनी हवन केले आणि दही, अक्षता, दर्भ आणि पाणी घेऊन त्या छकड्याची पूजा केली. असूया, असत्य, दंभ, ईर्ष्या, हिंसा आणि अभिमान नसलेल्या सत्यशील ब्राह्मणांचे आशीर्वाद कधी विफल होत नाहीत, असा विचार करून नंदांनी मुलाला उचलून घेतले आणि श्रेष्ठ ब्राह्मणांकडून सामवेद, ऋग्वेद आणि यजुर्वेदाच्या मंत्रांच्याद्वारे अभिमंत्रित आणि पवित्र औषधींनी युक्त पाण्याने त्याला स्नान घालून पुण्याहवाचन करविले. आणि हवन करवून ब्राह्मणांना पंचपक्वान्नांचे भोजन घातले. तेव्हा (कोठे) नंदांचे

समाधान झाले. नंतर त्यांनी मुलाच्या उत्कर्षासाठी ब्राह्मणांना सर्वगुणसंपन्न, वस्त्रे, पुष्पमाळा आणि सोन्याच्या साखळ्यांनी सजविलेल्या गाई दान दिल्या. तेव्हा ब्राह्मणांनी त्यांना आशीर्वाद दिले. जे वेदवेत्ते आणि सदाचारी ब्राह्मण असतात, त्यांचे आशीर्वाद कधी निष्फळ होत नाहीत, ही गोष्ट स्पष्टच आहे. (११-१७)

एके दिवशी यशोदा आपल्या मुलाला मांडीवर घेऊन त्याचे लाड करीत होती. त्यावेळी एकदम मोठ्या शिलाखंडाप्रमाणे तो जड वाटू लागला. त्या भाराने कासावीस होऊन तिने श्रीकृष्णाला जमिनीवर बसविले. याचे तिलाही आश्चर्य वाटले. यानंतर तिने भगवंतांचे स्मरण केले आणि ती घरकामाला लागली. (१८-१९)

तृणावर्त नावाचा एक दैत्य कंसाचा सेवक होता. कंसाच्या सांगण्यावरून प्रचंड वावटळीच्या रूपाने तो आला आणि बसलेल्या बालकाला उडवून घेऊन गेला. त्याने धुळीने सगळे गोकूळ झाकळून टाकले. त्यामुळे लोकांचे डोळे धुळीने भरून त्यांना काहीही दिसेनासे झाले. त्याने प्रचंड आवाजाने दाही दिशांचा थरकाप उडविला. संपूर्ण गोकूळ थोडा वेळ धुळीने आणि अंधाराने झाकोळून गेले होते. यशोदेने मुलाला जेथे ठेवले होते, तेथे जाऊन पाहिले, तर तेथे तो नव्हता. तृणावर्ताने उडविलेल्या धुळीने सर्वजण इतके त्रस्त झाले की, दुसऱ्याला तर सोडाच, पण स्वत:लाही ते पाहू शकत नव्हते. ते जोरदार वादळ आणि धुळीच्या वर्षावात मुलाचा पत्ता नाही, हे पाहून यशोदेला अत्यंत शोक झाला. पुत्राच्या आठवणीने ती अत्यंत व्याकूळ झाली आणि वासरू मेल्यावर गाईची जी अवस्था होते, तशी तिची दशा झाली व ती जमिनीवर कोसळली. तुफान शांत झाल्यावर धूळ कमी झाली, तेव्हा यशोदेच्या रडण्याचा आवाज ऐकून अन्य गोपी धावत तेथे आल्या. नंदनंदन न दिसल्याने त्या अत्यंत शोकाकुल झाल्या व त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या. त्याही रडू लागल्या. (२०-२५)

इकडे तृणावर्त वावटळीच्या रूपाने जेव्हा श्रीकृष्णाला आकाशात घेऊन गेला, तेव्हा त्याचे प्रचंड वजन त्याला सहन न झाल्याने त्याचा वेग शांत झाला. तो अधिक चालू शकला नाही. (२६)

स्वत:पेक्षाही जास्त वजनदार असल्याने तृणावर्त श्रीकृष्णाला शिलाखंड समजू लागला. कृष्णाने त्याचा गळा असा पकडला की, तो त्या अद्भुत बालकाला आपल्यापासून बाजूला करू शकला नाही. श्रीकृष्णाने इतक्या जोराने त्याचा गळा पकडला की, तो दैत्य निश्चेष्ट झाला. त्याची बुबुळे बाहेर आली, बोलणे बंद झाले व प्राण निघून गेले. अखेर त्या बालकासह तो व्रजामध्ये येऊन पडला. तेथे ज्या स्त्रिया रडत होत्या, त्यांनी पाहिले की, एक अक्राळविक्राळ राक्षस आकाशातून एका मोठ्या शिलेवर येऊन आपटला आणि त्याचे सर्व अवयव मोडून पडले. जणू श्रीशंकरांच्या बाणांनी घायाळ होऊन पडलेला त्रिपुरासुरच. श्रीकृष्ण त्याच्या वक्ष:स्थळावर लोंबकळत होते, हे पाहून नंदादी गोप-गोपींना विस्मय वाटला. लगबगीने तेथे जाऊन त्यांनी श्रीकृष्णांना उचलून मातेकडे आणून दिले. मृत्युमुखातून बालक सुखरूपपणे परत आले. जरी राक्षस त्याला आकाशात घेऊन गेला होता, तरीसुद्धा तो मृत्यूच्या तोंडून सुटून सुखरूप परत आला, हे पाहून सर्वांना अत्यंत आनंद झाला. ते म्हणू लागले- "अहो ! हे केवढे आश्चर्य ! किती अद्भुत घटना घडली ते पहा ना ! या मुलाला राक्षसाने मृत्यूच्या मुखात टाकले होते, परंतु हा परत आला आणि त्या हिंसाचारी दुष्टाला त्याच्या पापानेच गिळून टाकले. साधुपुरुष आपल्या समतेनेच भयांपासून वाचतात, हेच खरे ! आम्ही असे कोणते तप किंवा भगवंतांची पूजा केली होती ? किंवा पाणपोई घालणे, धर्मशाळा

ब्राह्मणे इत्यादी लोकोपयोगी कामे केली होती ? किंवा यज्ञ, दान वगैरे केले होते ? किंवा लोकांचे भले केले होते की ज्यामुळे हा बालक मृत्यूच्या तावडीतून सुटून आपल्या स्वजनांना सुखी करण्यासाठी पुन्हा परत आला. काय आमचे भाग्य ! त्या महावनामध्ये पुष्कळशा अद्भुत घटना घडताहेत हे पाहून नंदाला आश्चर्य वाटले. त्याला वसुदेवाचे म्हणणे पुन्हा पटले. (२७-३३)

एकदा यशोदा आपल्या बाळाला मांडीवर घेऊन मोठ्या प्रेमाने त्याला दूध पाजत होती. हे राजा ! त्याचे जवळ जवळ दूध पिऊन झाले होते. तेव्हा यशोदा त्याचे मधुर हास्ययुक्त मुख कुरवाळत होती. त्याचवेळी श्रीकृष्णांना जांभई आली आणि मातेने त्यांच्या मुखात असे पाहिले की, त्यात आकाश, अंतरिक्ष, ज्योतिर्मंडल, दिशा, सूर्य, चंद्र, अग्नी, वायू, समुद्र, द्वीप, पर्वत, नद्या, वने आणि सर्व चराचर पदार्थ भरले आहेत. परीक्षिता ! आपल्या पुत्राच्या मुखामध्ये अशा प्रकारे अचानक सर्व जग पाहून हरिणाच्या पाडसाच्या डोळ्यासारखे डोळे असलेली यशोदा थरथर कापू लागली. तिने अत्यंत आश्चर्यचकित होऊन आपले डोळे बंद करून घेतले. (३४-३७)

अध्याय सातवा समाप्त

अध्याय आठवा

नामकरण-संस्कार आणि बाललीला

श्रीशुक म्हणतात- परीक्षिता ! यदूंचे कुल-पुरोहित महातपस्वी श्रीगर्गाचार्य वसुदेवांच्या सांगण्यावरून नंदांच्या गोकुळात आले. त्यांना पाहून नंदांना अतिशय आनंद झाला. ते हात जोडून उठून उभे राहिले. नंतर त्यांच्या चरणांना वंदन करून त्यांना भगवत्स्वरूप मानून त्यांनी त्यांची पूजा केली. आदरातिथ्यानंतर जेव्हा गर्गाचार्य आरामात बसले, तेव्हा नंदांनी अत्यंत मधुर शब्दात त्यांचे अभिनंदन करून म्हटले- "भगवन ! आपण तर स्वत: पूर्णकाम आहात. तरीसुद्धा, मी आपली काय सेवा करू ? आपल्यासारख्या महात्म्यांचे आमच्यासारख्या सामान्य गृहस्थांच्या घरी येणे हे आमच्याच परम कल्याणासाठी होय. एरव्ही आपले येणे कठीणच. प्रभो ! जी गोष्ट साधारणपणे इंद्रियांनी जाणण्याच्या पलीकडील आहे, तीसुद्धा माणसाला ज्योतिष-शास्त्राच्याद्वारे प्रत्यक्ष जाणता येते. आपण त्याच ज्योतिषशास्त्राची रचना केली आहे. आपण ब्रह्मवेत्त्यांमध्ये श्रेष्ठ आहात; म्हणून माझ्या या दोन्ही मुलांचे नामकरणादी संस्कार आपणच करावेत. कारण ब्राह्मण जन्मानेच मनुष्यमात्राचा गुरू असतो." (१-६)

गर्गाचार्य म्हणाले- मी सगळीकडे यदुवंशीयांचा पुरोहित म्हणून प्रसिद्ध आहे. मी जर तुझ्या पुत्राचे संस्कार केले, तर लोकांना वाटेल की, हा देवकीचा पुत्र आहे. कंस दुष्ट बुद्धीचा आहे. वसुदेवाबरोबर तुझी घनिष्ठ मैत्री आहे. देवकीच्या कन्येकडून जेव्हापासून त्याने ऐकले आहे की, त्याला मारणारा दुसरीकडे कोठेतरी जन्मला आहे, तेव्हापासून तो असाच विचार करीत आहे की, देवकीच्या आठव्या गर्भापासून कन्येचा जन्म झाला नसला पाहिजे. जर मी तुझ्या पुत्राचा संस्कार केला, तर तो हा बालक वसुदेवाचा पुत्र समजून त्याला मारील. तो आपल्याकडून मोठाच अन्याय होईल. (७-९)

नंद म्हणाले- आपण गुपचूपपणे या एकांत गोशाळेमध्ये स्वस्तिवाचन करून या बालकाचा द्विजातीला योग्य असा नामकरणसंस्कार करावा.

इतरांची गोष्ट कशाला, माझ्या लोकांनाही ही गोष्ट समजणार नाही, (हे मी पाहीन.) (१०)

श्रीशुक म्हणतात- संस्कार करणे हे आपले कर्तव्य आहे, असे गर्गाचार्यांना वाटत होतेच. नंदांनी जेव्हा त्यांना अशी प्रार्थना केली, तेव्हा त्यांनी एकांतात बसून गुप्तपणे दोन्ही बालकांचा नामकरण-संस्कार केला. (११)

गर्गाचार्य म्हणाले- हा रोहिणीचा मुलगा आपल्या मित्रांना आपल्या गुणांनी आनंदित करील, म्हणून याचे नाव 'राम' असे राहील. याच्या शक्तीला काही सीमा नाही, म्हणून याला लोक 'बल' असे म्हणतील. हा यादव आणि तुमच्यामध्ये काही भेदभाव ठेवणार नाही म्हणून याचे एक नाव 'संकर्षण' असेही असेल. आणि हा जो सावळ्या वर्णाचा आहे, हा प्रत्येक युगामध्ये शरीर धारण करतो. मागील युगांमध्ये त्याने अनुक्रमे पांढरा, तांबडा आणि पिवळा असे तीन वेगवेगळे रंग स्वीकारले होते. यावेळी त्याचा कृष्णवर्ण आहे, म्हणून याचे नाव 'कृष्ण' असेल. नंद महोदय ! हा तुझा पुत्र पूर्वी कधी वसुदेवांचा पुत्र होता, म्हणून हे रहस्य जाणणारे लोक याला "श्रीमान वासुदेव" असेही म्हणतील. तुझ्या पुत्राची पुष्कळ नावे आणि रूपेसुद्धा आहेत. जितके गुण आणि जितकी कर्मे, त्या सर्वांना अनुसरून वेगवेगळी नावे आहेत. ती मी जाणतो, सर्वसामान्य लोक जाणत नाहीत. हा तुम्हा लोकांचे परम कल्याण करील. सर्व गोप आणि गाईंना हा अतिशय आनंदित करील. याच्या साहाय्याने तुम्ही मोठमोठ्या संकटांतून अगदी सहज पार पडाल. हे व्रजराज ! पूर्वी एकदा पृथ्वीवर राजा नव्हता, तेव्हा डाकूंनी पीडा दिलेल्या सज्जनांचे ह्यानेच रक्षण केले आणि याच्याकडूनच बळ प्राप्त करून त्या लोकांनी लुटारूंवर विजय मिळविला होता. जे भाग्यवान मनुष्य याच्यावर प्रेम करतात, त्यांचा शत्रू पराभव करू शकत नाहीत. जसे विष्णूंच्या छत्रछायेखाली राहाणाऱ्या देवांना असुर जिंकू शकत नाहीत. नंद महोदय ! गुण, संपत्ती, सौंदर्य, कीर्ती आणि प्रभाव यांमध्ये तुझा हा मुलगा भगवान नारायणांसारखाच आहे. तू अत्यंत सावधपणे याचे रक्षण कर. अशा प्रकारे नंदाला समजावून सांगून गर्गाचार्य आपल्या आश्रमाकडे परत गेले. त्यांचे म्हणणे ऐकून नंदाला अतिशय आनंद झाला. त्याला वाटले की, आपल्या सर्व आशा-आकांक्षा पूर्ण झाल्या. (१२-२०)

परीक्षिता ! थोड्याच दिवसांत गोकुळात राम-कृष्ण हात व गुडघे टेकून रांगू लागले. (२१)

ते दोघे भाऊ रांगत रांगत गोकुळातील धुळीतून चालत असत. त्यावेळी त्यांच्या पायातील घुंगरू रुणझुण वाजत असत. त्या कर्णमधुर आवाजाने आनंदित होऊन नकळत एखाद्या अनोळखी माणसाच्या मागे मागे जात. नंतर जेव्हा पाहात की, हा दुसराच कोणीतरी आहे, तेव्हा ते थांबत आणि भ्याल्यासारखे आपल्या मातांकडे परत येत. त्यांना पाहून मातांचा स्नेह दाटून येत असे. त्यांच्या स्तनांतून दुधाच्या धारा वाहू लागत. तेव्हा धुळीने माखूनही ते अधिकच सुंदर दिसत. त्यावेळी माता त्यांना दोन्ही हातांनी हृदयाशी कवटाळीत आणि स्तनपान देत. जेव्हा ते दूध पिऊ लागत आणि अधून-मधून आपल्या मातांकडे पाहात, तेव्हा त्यांचे ते मंद मंद हास्य, कुंदकळ्यांसारखे दात आणि भाबडा चेहरा पाहून त्या आनंदसमुद्रात डुंबू लागत. जेव्हा ते दोघे आणखी थोडे मोठे झाले, तेव्हा गोकुळात अशा काही बाललीला करू लागले की, त्या गोपी पाहातच राहात. कधी कधी ते वासरांचे शेपूट धरून ठेवीत आणि वासरे भिऊन इकडे तिकडे पळू लागली की, ते दोघेही त्यांच्याकडून ओढले जात. गोपी आपल्या घरातील कामधंदा सोडून जेव्हा हे सगळे पाहात असत, तेव्हा हसून हसून त्यांची मुरकुंडी वळत असे आणि त्या आनंदात

मग्न होत असत. कन्हैय्या आणि बलराम दोघेही अतिशय चंचल आणि फारच खोडकर होते. ते कधी हरीण, गायींसारख्या शिंगे असणाऱ्या जनावरांकडे पळत जात तर कधी धगधगणाऱ्या आगीजवळ जात. कधी दाताने चावणाऱ्या प्राण्यांजवळ जात तर कधी तलवारी उचलून घेत. कधी पाण्याकडे जात, कधी पक्ष्यांजवळ जात, तर कधी काट्या-कुट्यांत जात. त्यांच्या माता त्यांना त्यापासून अडवू पाहात, पण त्यांचे काही चालत नसे. अशा स्थितीत त्या घरातील कामसुद्धा धड करू शकत नव्हत्या. अशा द्विधा मन:स्थितीत त्या फारच बेचैन राहात. (२२-२५)

हे राजर्षे ! थोड्याच दिवसात रांगणे संपवून राम-कृष्ण सहजपणे गोकुळात हिंडू-फिरू लागले. आता भगवान कृष्ण आणि बलराम आपल्याच वयाच्या गवळ्यांच्या मुलांना आपल्याबरोबर घेऊन खेळण्यासाठी बाहेर पडत आणि व्रजातील गोपींना आनंदित करीत निरनिराळे खेळ खेळत. त्यांच्या लहानपणाच्या मनोहर खोड्या पाहून त्या यशोदेच्या घरी येऊन तिला सांगू लागत. (२६-२८)

"अग यशोदे ! हा तुझा कान्हा अतिशय खोडकर झाला आहे. गाईची धार काढण्याची वेळ झालेली नसतानासुद्धा हा वासरांना सोडतो आणि आम्ही रागावलो की, खो-खो करून हसू लागतो. हा चोरीच्या निरनिराळ्या युक्त्या योजून आमचे गोड गोड दही-दूध चोरून खातो. त्याने स्वत: खाल्ले, तर गोष्ट वेगळी; परंतु तो ते वानरांना घालतो आणि जेव्हा पोट भरल्यामुळे ते खाऊ शकत नाहीत तेव्हा आमचे माठ फोडून टाकतो. त्याला घरात जर एखादी वस्तू मिळाली नाही, तर तो घरातल्या लोकांवर रागावतो आणि आमच्या मुलांना रडवून पळून जातो. जेव्हा आम्ही दही-दूध शिंक्यावर ठेवतो आणि याचे हात तिथपर्यंत पोहोचत नाहीत, तेव्हा हा वेगवेगळ्या युक्त्या योजतो. कुठे दोन-चार चौरंग एकावर एक ठेवतो. कुठे उखळावर चढतो, तर कधी उखळावर चौरंग ठेवतो. एवढे करूनही जेव्हा काम भागत नाही, तेव्हा हा त्या भांड्यांना छिद्र पाडतो. कोणत्या शिंक्यावर कोणत्या भांड्यांत काय ठेवले आहे, याची त्याला पूर्ण माहिती असते. जेव्हा आम्ही या वस्तू अंधारात लपवून ठेवतो, तेव्हा तू याला जे पुष्कळसे रत्नांचे अलंकार घातले आहेस, त्यांच्या प्रकाशातच हा सर्व काही पाहातो. जेव्हा गोपी घरकामामध्ये व्यग्र असतात, तेव्हा हा हे सारे करतो. एवढे करूनही आपण त्या गावचेच नसल्याचे भासवतो. काही वेळा घरामध्ये लघवी वगैरेही करतो. निरनिराळ्या उपायांनी चोऱ्या करूनही पुतळ्यासारखा कसा स्तब्ध उभा आहे पाहा !" श्रीकृष्णाच्या भ्यालेल्या सुंदर मुखकमलाकडे पाहात गोपी याप्रमाणे यशोदेकडे तक्रारी सांगत असत. यशोदा मात्र त्याच्याकडे पाहून केवळ हसत असे. त्याला रागावण्याची गोष्ट तिच्या मनातसुद्धा येत नसे. (२९-३१)

एके दिवशी बलराम वगैरे गवळ्यांची मुले श्रीकृष्णांबरोबर खेळत होती. त्यांनी यशोदेला सांगितले, "आई ! कन्हैय्याने माती खाल्ली आहे." मुलाचे हित इच्छिणाऱ्या यशोदेने श्रीकृष्णाचा हात पकडला. त्यावेळी श्रीकृष्णाचे डोळे भीतीने गांगरले होते. यशोदेने रागावून विचारले. "काय रे खोडसाळा ! तू कोणाला नकळत माती का खाल्लीस ? पहा, तुझ्या बरोबरीची मुले काय म्हणतात ते ! तुझा बलरामदादासुद्धा तेच सांगतो." (३२-३४)

श्रीकृष्ण म्हणाले-"आई ! मी माती खाल्ली नाही. हे सर्वजण खोटे बोलत आहेत. तुला जर यांचेच म्हणणे खरे वाटत असेल, तर तू आपल्या डोळ्यांनीच माझ्या तोंडात पाहा !" यशोदा म्हणाली, "ठीक आहे. असे जर आहे, तर तोंड उघड पाहू !" मातेने असे म्हटल्यावर भगवान श्रीकृष्णांनी आपले तोंड उघडले. अनंत ऐश्वर्यसंपन्न असे ते केवळ लीला करण्यासाठीच मनुष्यबालक बनले होते. (३५-३६)

त्यांच्या मुखामध्ये चराचर विश्व, आकाश, दिशा, डोंगर, द्वीप आणि समुद्रांसहित सर्व पृथ्वी, वायू, अग्नी, चंद्र आणि ताऱ्यांसह संपूर्ण ज्योतिर्मंडल, पाणी, तेज, पवन, आकाश, वैकारिक अहंकाराचे कार्य असणारी इंद्रिये, पंचतन्मात्रा, तीन गुण, जीव, काल, स्वभाव, कर्म, वासना, शरीर इत्यादी विभिन्न रूपात दिसणारे हे विश्व आणि स्वत:सह सारे गोकुळ श्रीकृष्णांच्या उघडलेल्या लहानशा मुखात पाहून यशोदा साशंक झाली. ती विचार करू लागली, "हे स्वप्न आहे की भगवंतांची माया ? माझ्या बुद्धीत तर काही भ्रम निर्माण झाला नाही ना ? का माझ्या या मुलातच जन्मत: काही योगसिद्धी आहे ? जे चित्त, मन, कर्म आणि वाणीच्या द्वारा पूर्णपणे व सुलभतेने अनुमानाचा विषय असू शकत नाही, ते हे सर्व विश्व ज्याच्या आश्रयाने आहे आणि ज्याच्या सत्तेनेच याची प्रचीती येते, ज्याचे स्वरूप सर्वथैव अचिंत्य आहे, त्या परमपदाला मी नमस्कार करीत आहे. ही मी आहे आणि हे माझे पती आहेत, तसेच हा माझा मुलगा आहे, त्याचबरोबर मी व्रजराजाच्या सर्व संपत्तीची स्वामिनी, धर्मपत्नी आहे, या गोपी, गोप आणि गोधन माझे आहे - अशा प्रकारची माझी कुबुद्धी ही ज्यांची माया आहे, ते भगवंतच माझे एकमेव आश्रय आहेत. त्यांनाच मी शरण आहे." अशा प्रकारे जेव्हा यशोदेला ईश्वरी तत्त्वाचे ज्ञान झाले, तेवढ्यात सर्वशक्तिमान प्रभूंनी आपल्या पुत्रस्नेहरूप वैष्णवी योगमायेचा तिच्या हृदयात संचार केला. यशोदा ती घटना ताबडतोब विसरली. तिने आपल्या लाडक्याला उचलून मांडीवर घेतले. तिच्या हृदयाला पूर्वीप्रमाणेच प्रेमाचा पान्हा फुटला. (३७-४४)

सर्व वेद, उपनिषदे, सांख्य, योग आणि भक्तजन ज्यांच्या माहात्म्याचे गीत गातात, त्या श्रीहरींना ती आपला पुत्र मानू लागली. (४५)

राजाने विचारले- ब्रह्मर्षे ! नंदाने असे कोणते फार मोठे पुण्य केले होते ? तसेच भाग्यवती यशोदेनेसुद्धा अशी कोणती तपश्चर्या केली होती की, जिच्यामुळे स्वत: श्रीहरींनी तिचे स्तनपान केले. भगवान श्रीकृष्णांनी ज्या बाललीला केल्या, त्या इतक्या पवित्र आहेत की, त्यांचे श्रवण-कीर्तन करणाऱ्या लोकांचेसुद्धा सर्व पाप-ताप नाहीसे होतात. त्रिकालदर्शी ज्ञानी पुरुष आजसुद्धा त्यांचे गायन करीत असतात. त्यांच्या जन्मदात्यांनाही त्या पाहायला मिळाल्या नाहीत. (आणि नंद - यशोदा मात्र त्यांचे सुख लुटीत आहेत, याचे कारण काय ?) (४६-४७)

श्रीशुकदेव म्हणाले - नंद पूर्वजन्मी एक श्रेष्ठ वसू होते. त्यांचे नाव द्रोण होते आणि त्यांच्या पत्नीचे नाव धरा होते. त्यांनी ब्रह्मदेवांच्या आदेशांचे पालन करण्याच्या इच्छेने त्यांना म्हटले. "भगवन ! आम्ही जेव्हा पृथ्वीवर जन्म घेऊ, तेव्हा जगदीश्वर भगवान श्रीकृष्णांचेवर आमची अनन्य भक्ती निर्माण होवो. जिच्या योगाने संसारातील लोक सहजपणे दुर्गतीला पार करून जातात." ब्रह्मदेव म्हणाले, "ठीक आहे." तेच परम यशस्वी द्रोण व्रजामध्ये नंद नावाने जन्मले आणि तीच धरा यशोदा झाली. परीक्षिता ! भगवान आता त्यांचे पुत्र झाले आणि सर्व गोप-गोपींच्यापेक्षा नंद आणि यशोदा यांचे त्यांच्यावर अत्यंत प्रेम जडले. ब्रह्मदेवांचे वचन सत्य करण्यासाठी भगवान श्रीकृष्ण बलराम यांचेसह व्रजामध्ये राहून त्यांना आपल्या बाललीलांनी आनंदित करू लागले. (४८-५२)

अध्याय आठवा समाप्त

अध्याय नववा

श्रीकृष्णाला उखळाला बांधणे

श्रीशुकाचार्य म्हणतात - एकदा नंदराणी यशोदा घरच्या दासींना दुसऱ्या कामाला लावून स्वत: दही घुसळत होती. आतापर्यंत भगवंतांच्या ज्या ज्या बाललीलांचे वर्णन केले, त्या सर्वांचे दही घुसळण्याच्या वेळी स्मरण करीत ती त्यांचे गायनही करीत असे. (१-२)

यशोदा जेव्हा दही घुसळत होती, तेव्हा स्थूल कमरेवर ती रेशमी वस्त्र नेसली होती आणि त्यावर तिने सुती कमरपट्टा धारण केला होता. पुत्राबद्दलच्या स्नेहामुळे तिच्या स्तनातून दूध पाझरत होते आणि ते हलत होते. रवीची दोरी वारंवार ओढल्याने तिचे हात शिणले होते. हातातील बांगड्या आणि कानातील कर्णफुले हलत होती. चेहऱ्यावर घामाचे थेंब उठून दिसत होते. वेणीत घातलेली मोगऱ्याची फुले गळून पडत होती. (३)

श्रीकृष्ण त्याचवेळी स्तनपान करण्यासाठी दही घुसळीत असलेल्या आईजवळ आला. तिच्या हृदयाला प्रेमाचा पाझर आणीत त्याने रवी पकडली आणि आईचे दही घुसळणे थांबवले. यशोदेने श्रीकृष्णाला मांडीवर घेतले व स्तनातून प्रेमाने पाझरणारे दूध ती त्याला पाजू लागली आणि त्याचे मंद हास्ययुक्त मुख न्याहाळू लागली. इतक्यात चुलीवर ठेवलेले दूध उतू जाऊ लागल्याने यशोदेने त्याचे पिणे संपण्याआधीच त्याला खाली ठेवून गडबडीने दूध उतरविण्यासाठी ती निघून गेली. यामुळे श्रीकृष्णाला राग आला. थरथरणारे लालचुटुक ओठ दातांनी चावीत त्याने जवळच पडलेल्या दगडाने दह्याचे मडके फोडून टाकले, डोळ्यात खोटे अश्रू आणले आणि माजघरात जाऊन कोणाला नकळत तो लोणी खाऊ लागला. (४-६)

उतू जाणारे दूध खाली उतरवून यशोदा पुन्हा त्या खोलीत आली. तेथे पाहिले तर दह्याचे मडके फुटलेले. ही आपल्या लाडक्याचीच करामत आहे, हे तिने ओळखले. त्याचबरोबर तोही तेथे नाही, हे पाहून तिला हसू आवरेना. इकडे तिकडे शोधल्यावर समजले की, एका पालथ्या उखळावर श्रीकृष्ण उभा आहे आणि शिंक्यावरचे लोणी वानरांना घालीत आहे. शिवाय आपली चोरी उघडकीला येईल, याच्या भीतीने चारी बाजूंना पाहात आहे. हे पाहून यशोदा पाठीमागून येऊन हळूच त्याच्याजवळ जाऊन पोहोचली. श्रीकृष्णाने जेव्हा पाहिले की, आई हातात छडी घेऊन आपल्याकडेच येत आहे, तेव्हा उखळीवरून त्याने खाली उडी मारली आणि घाबरल्यासारखे दाखवून तो पळाला. योगी तपस्येने शुद्ध झालेल्या मनानेसुद्धा ज्यामध्ये प्रवेश करू शकत नाहीत किंवा ज्याला प्राप्त करू शकत नाहीत, त्याला पकडण्यासाठी यशोदा त्याच्यामागे धावली. अशाप्रकारे जेव्हा यशोदा श्रीकृष्णाच्या मागे धावू लागली, तेव्हा थोड्याच वेळात स्थूल व हलणाऱ्या नितंबांच्यामुळे तिची चाल मंदावली. जोराने धावण्यामुळे वेणी ढिली होऊन तीत माळलेली फुले खाली पडू लागली. अखेर कसेबसे तिने त्याला पकडले. श्रीकृष्णाचा हात पकडून ती त्याला रागावू लागली. त्यावेळी हातून चूक घडल्यामुळे रडत रडत तो हाताने डोळे चोळीत होता. डोळ्यांतून काजळ वाहून तोंडावर आले होते. नजर वर केली, तर ती भीतीने बावरलेली दिसत होती. बाळ फार घाबरला आहे, असे पाहून तिच्या हृदयात माया दाटून आली. तिने छडी फेकून दिली. पण असा विचार केला की, याला (जरब बसवण्यासाठी) दोरीने बांधले पाहिजे. खरे पाहू जाता यशोदेला त्याच्या सामर्थ्याची कल्पना नव्हती. (७-१२)

ज्याला बाहेर नाही की आत नाही, आदी नाही की अंत नाही, जो जगाच्या आदी-अंती, आत-बाहेर असून जगद्रूपातही आहे, जो सर्व इंद्रियांच्या पलीकडील असून अव्यक्त आहे, त्याच भगवंताने मनुष्यरूप घेतल्याने त्याला पुत्र समजून, एखाद्या साधारण बालकाला बांधावे, तसे यशोदा त्याला दोरीने उखळाला बांधू लागली. जेव्हा यशोदा त्या खोडकर मुलाला दोरीने बांधू लागली, तेव्हा ती दोरी दोन बोटे कमी पडली. तेव्हा तिने दुसरी दोरी त्या दोरीला बांधली. जेव्हा तीसुद्धा कमी पडू लागली, तेव्हा तिने आणखी एक तिला जोडली. अशाप्रकारे जी जी दोरी आणून ती जोडत असे, ती ती पुन्हा दोन बोटे कमीच पडत असे. यशोदेने घरातील सर्व दोऱ्या जोडल्या तरीसुद्धा त्या कमीच पडल्या. हे पाहून गोपी हसू लागल्या. त्यामुळे तिलाही हसू आले आणि आश्चर्यही वाटले. श्रीकृष्णांनी पाहिले की, आईचे शरीर घामाने ओलेचिंब झाले आहे, वेणी सैल होऊन फुलांची वेणी गळून पडली आहे. तेव्हा तिची करुणा येऊन त्याने स्वत:च स्वत:ला बांधून घेतले. परीक्षिता ! श्रीकृष्ण पूर्ण स्वतंत्र असून ब्रह्मदेव इत्यादींसह हे संपूर्ण विश्व त्यांच्या अधीन आहे. तरीसुद्धा अशा प्रकारे बांधले जाऊन त्यांनी आपण भक्तांच्या अधीन असल्याचे दर्शविले. गोपी यशोदेने मुक्तिदात्या मुकुंदांकडून जो कृपाप्रसाद प्राप्त करून घेतला, तो ब्रह्मदेव, शंकर आणि वक्ष:स्थळावर असलेली लक्ष्मी यांनासुद्धा प्राप्त झाला नाही. हे गोपिकानंदन अनन्य भक्तांना जितके सुलभ आहेत, तितके देहाभिमानी कर्मकांडी किंवा स्वरूपभूत झालेले ज्ञानी यांनासुद्धा नाहीत. (१३-२१)

यानंतर आई घरातील काम करण्यात व्यग्र झाली असता उखळाला बांधलेल्या कृष्णाने, जे अगोदर कुबेराचे पुत्र यक्ष होते, ते दोन अर्जुनवृक्ष पाहिले. नलकूबर आणि मणिग्रीव अशी त्यांची नावे होती. त्यांच्याजवळ विपुल ऐश्वर्य होते. त्यांना झालेला गर्व पाहूनच देवर्षी नारदांनी त्यांना शाप देऊन वृक्ष केले होते. (२२-२३)

अध्याय नववा समाप्त

अध्याय दहावा

यमलार्जुनांचा उद्धार

राजाने विचारले - भगवन ! आपण मला हे सांगा की, नलकूबर आणि मणिग्रीव यांना शाप का मिळाला ? त्यांनी असे कोणते निंद्यकर्म केले होते की, ज्यामुळे देवर्षींनाही क्रोध आला होता ? (१)

श्रीशुकाचार्य म्हणाले- नलकूबर आणि मणिग्रीव हे दोघे कुबेराचे पुत्र होते. ते रुद्राचे गण असूनही त्यांचा गर्व वाढतच गेला. एके दिवशी ते दोघेजण मंदाकिनी नदीच्या तटावर कैलास पर्वताच्या रमणीय उपवनामध्ये वारुणी मदिरा पिऊन मदोन्मत्त झाले होते. नशेमुळे त्यांचे डोळे भिरभिरत होते. पुष्कळ स्त्रिया त्यांच्याबरोबर गाणे-बजावणे करीत होत्या आणि ते फुलांनी लहडलेल्या वनामध्ये त्यांच्याबरोबर विहार करीत होते. त्यावेळी कमळांच्या ताटव्यांनी शोभणाऱ्या गंगेमध्ये स्त्रियांसह शिरून, हत्तिणींसह हत्ती जसे जलक्रीडा करतात, त्याप्रमाणेच ते जलक्रीडा करू लागले. परीक्षिता ! कर्मधर्म-संयोगाने देवर्षी नारदांनी त्यांना पाहून ते उन्मत्त झाले आहेत, हे जाणले. नारदांना पाहून विवस्त्र अप्सरा लाजल्या. शापाच्या भीतीने त्यांनी ताबडतोब कपडे परिधान केले. परंतु त्या नग्न यक्षांनी मात्र नाही. जेव्हा देवर्षी नारदांनी पाहिले की, ते देवपुत्र

असूनसुद्धा ऐश्वर्यमदाने आंधळे आणि मदिरापान करून उन्मत्त झाले आहेत. तेव्हा नारदांनी त्यांच्यावर कृपा करण्यासाठी त्यांना शाप देत म्हटले.(२-७)

नारद म्हणाले- जे लोक प्रिय विषयांचे सेवन करतात, त्यांच्या बुद्धीला बिघडवणारा महत्त्वाचा दोष म्हणजे संपत्तीची नशा. रजोगुणी कर्मे आणि कुलीनता इत्यादींचा अभिमानसुद्धा त्यापेक्षा अधिक बुद्धिभ्रंश करणारा नाही. कारण संपत्तीच्या पाठोपाठ स्त्री, जुगार आणि मद्य ही असतातच. श्रीमदाने अंध होऊन इंद्रियांचे गुलाम झालेले क्रूर पुरुष आपल्या नाशवान शरीराला अजरामर समजून आपल्याच-सारख्या देहधारी पशूंची हत्या करतात. ज्या शरीराला 'भूदेव', 'नरदेव', 'देव' इत्यादी नावांनी संबोधिले जाते, त्याची शेवटी काय अवस्था होते ? त्यात किडे पडतात, पशुपक्ष्यांनी खाऊन त्याची विष्ठा बनते किंवा ते जळून राखेचा ढीग होते. त्याच शरीरासाठी प्राण्यांशी द्रोह करण्यामध्ये मनुष्याला कोणता स्वार्थ वाटतो ? असे केल्याने शेवटी नरकाचीच प्राप्ती व्हायची. हे शरीर कोणाची संपत्ती आहे ते सांगा तर खरे ! अन्न देऊन पालन-पोषण करणाऱ्याची आहे की गर्भाधान करणाऱ्या पित्याची? हे शरीर त्याला नऊ महिने पोटात बाळगणाऱ्या मातेचे आहे की तिच्याही आईवडिलांचे ? जो बलवान पुरुष बळजबरीने याच्याकडून काम करवून घेतो त्याचे, की पैसे देऊन खरेदी करणाऱ्याचे ? हे जाळणाऱ्या आगीचे आहे की त्याला खाऊ इच्छिणाऱ्या कोल्ह्या-कुत्र्यांचे ? हे शरीर प्रकृतीपासून उत्पन्न होऊन तीमध्येच सामावून जाणारी एक सामान्य वस्तू आहे. अशा स्थितीत मूर्खाशिवाय दुसरा कोण बुद्धिमान मनुष्य याला आपला आत्मा मानून त्याच्यासाठी दुसऱ्यांचे प्राण घेईल ? जो उन्मत्त श्रीमदाने अंधळा झालेला आहे, त्याला दृष्टी येण्यासाठी दारिद्र्य हेच सर्वांत प्रभावी अंजन आहे. कारण दरिद्री मनुष्यच इतरांना आपल्यासारखे मानतो. ज्याच्या शरीराला एकदा काटा टोचलेला असतो, तो कोणत्याही प्राण्याला असा काटा टोचू नये, असे मानतो. कारण आपल्याला झालेल्या पीडेवरून दुसऱ्या जीवालासुद्धा असेच दुःख होते, हे त्याला कळते. परंतु ज्याला कधी काटा टोचलाच नाही, तो त्या दुःखाची काय कल्पना करणार ? दरिद्र्याला गर्व असत नाही. सर्व प्रकारच्या मदांपासून तो दूर असतो. उलट दैववशात त्याला जो त्रास सोसावा लागतो, तीच त्याच्यासाठी मोठी तपश्चर्या असते. ज्याला रोजच्या भोजनाची मारामार असते, भुकेने ज्याचे शरीर दुबळे झालेले असते, त्या दरिद्री माणसाची इंद्रियेसुद्धा अशक्त झालेली असतात. आणि त्यामुळे भोगांसाठी तो दुसऱ्या प्राण्यांना दुःख देत नाही. अशा रीतीने तो हिंसेपासून परावृत्त होतो. साधुपुरुष जरी समदर्शी असले तरीसुद्धा त्यांचा सहवास दरिद्री माणसांना सुलभ आहे. कारण त्याचे भोग तर अगोदरच सुटलेले असतात. आता संतांच्या संगतीने त्याची लालसासुद्धा नाहीशी होते आणि लवकरच त्याचे अंतःकरण शुद्ध होते. ज्या महात्म्यांच्या चित्तांमध्ये सर्वांबद्दल समभाव आहे. जे फक्त भगवंतांच्या चरणीच लीन असतात, त्यांना, दुर्गुणांची खाण असणाऱ्या आणि धनाच्या मदाने उन्मत्त झालेल्या दुष्टांशी काय कर्तव्य आहे ? त्यांची उपेक्षा करणेच योग्य. हे दोन्ही यक्ष वारुणी मदिरेचे पान करून उन्मत्त आणि धनाच्या मदाने आंधळे झाले आहेत. इंद्रियांचे गुलाम असणाऱ्या या स्त्री-लंपटांचा अज्ञानजनित मद आपण नाहीसा करावा. हे लोकपाल कुबेराचे पुत्र असूनही मदोन्मत्त होऊन अज्ञानात बुडालेले आहेत. आपण विवस्त्र आहोत, याचेही त्यांना भान नाही. म्हणून हे दोघेजण आता वृक्ष होण्याच्याच योग्यतेचे आहेत. तसे झाले तर यांना पुन्हा असा अभिमान निर्माण होणार नाही. तेथेसुद्धा माझ्या कृपेने यांना भगवंतांची स्मृती राहील आणि माझ्या अनुग्रहामुळे देवांची शंभर वर्षे

झाल्यानंतर यांना श्रीकृष्णांचे सान्निध्य लाभेल. मग पुन्हा भगवंतांच्या चरणांविषयी प्रेम उत्पन्न होऊन हे आपल्या लोकी निघून जातील.(८-२२)

श्रीशुक म्हणतात- असे म्हणून देवर्षी नारद नारायणांच्या आश्रमाकडे निघून गेले. नलकूबर आणि मणिग्रीव हे दोघे एकाच वेळी अर्जुनवृक्ष होऊन यमलार्जुन नावाने प्रसिद्ध झाले. आपल्या परम भक्त देवर्षी नारदांचे वचन सत्य करण्यासाठी श्रीकृष्ण हळू हळू उखळ ओढीत जेथे यमलार्जुन वृक्ष होते, तिकडे जाऊ लागले. (२३-२४)

भगवंतांनी विचार केला की, "देवर्षी नारद मला अत्यंत प्रिय आहेत आणि हे दोघेजणसुद्धा माझा भक्त कुबेर याचे पुत्र आहेत. म्हणून महात्मा नारद जे म्हणाले, ते मी तसेच सत्य करीन." असा विचार करून श्रीकृष्ण दोन्ही वृक्षांच्या मधून निघाले. ते तेथून बाहेर पडले. परंतु उखळ मात्र तिरपे होऊन अडकून बसले. कमरेला दोरी बांधलेल्या त्या मुलाने आपल्या पाठीशी असलेल्या उखळाला जोराने ओढले मात्र, तोच झाडांची सर्व मुळे उखडली गेली. सर्व बलविक्रमाचे केंद्र जे भगवान त्यांचा थोडासा धक्का लागताच झाडांच्या फांद्या, खोडे, डहाळ्या आणि पाने यांचा थरकाप होऊन दोन्ही वृक्ष जोराने कडकडाट करीत जमिनीवर कोसळले. त्या दोन्ही वृक्षांमधून अग्नीप्रमाणे तेजस्वी असे दोन सिद्ध पुरुष बाहेर पडले. त्यांच्या चमकणाऱ्या कांतीने दिशा उजळून निघाल्या. त्यांनी सर्व लोकांचे स्वामी भगवान श्रीकृष्णांच्या जवळ येऊन, त्यांच्या चरणांवर डोके टेकवून नमस्कार केला आणि हात जोडून शुद्ध हृदयाने ते त्यांची स्तुती करू लागले. (२५-२८)

ते म्हणाले, "हे महायोगेश्वर श्रीकृष्ण ! आपण प्रकृतीच्या पलीकडील पुरुषोत्तम आहात. हे व्यक्त आणि अव्यक्त संपूर्ण विश्व आपलेच रूप आहे, असे वेदवेत्ते जाणतात. आपणच सर्व प्राण्यांचे शरीर, प्राण, अंत:करण आणि इंद्रियांचे स्वामी आहात. आपणच सर्वशक्तिमान काल, सर्वव्यापक, तसेच अविनाशी ईश्वर आहात. आपणच महत्तत्त्व आणि सत्त्वगुण, रजोगुण व तमोगुणरूप सूक्ष्म प्रकृती आहात. आपणच समस्त स्थूल आणि सूक्ष्म शरीरांची कर्मे, भाव, धर्म आणि सत्तेला जाणणारे सर्वांचे साक्षी परमात्मा आहात. वृत्तींनी ग्रहण केल्या जाणाऱ्या प्रकृतीचे गुण आणि विकारांचे द्वारा आपले ज्ञान होऊ शकत नाही. स्थूल आणि सूक्ष्म शरीराच्या आवरणाने झाकला गेलेला कोणता मनुष्य त्यांच्याही आधीपासून असलेल्या आपल्याला जाणू शकेल ? सर्व प्रपंचाच्या निर्मात्या त्या तुम्हा भगवान वासुदेवांना आम्ही नमस्कार करीत आहोत. हे प्रभो ! आपल्या द्वारा प्रकाशित होणाऱ्या गुणांनीच ज्यांनी आपले माहात्म्य लपवून ठेवले आहे, त्या परब्रह्मस्वरूपाला आम्ही नमस्कार करीत आहोत. आपण प्राकृत शरीररहित आहात; तरीसुद्धा जेव्हा आपण असे असामान्य पराक्रम प्रगट करीत असता की जे शरीर धारण करणाऱ्यांना अशक्य आहेत. आणि त्यांच्यामुळेच त्या शरीरांमध्ये आपला अवतार आहे, हे लक्षात येते. प्रभो ! तेच सर्व अभिलाषा पूर्ण करणारे आपण, सर्व लोकांचे लौकिक आणि अलौकिक कल्याण करण्यासाठी यावेळी आपल्या संपूर्ण शक्तीनिशी अवतीर्ण झाला आहात. हे परम कल्याणस्वरूप ! हे परम मंगलस्वरूप ! आपणास नमस्कार असो ! शांत, सर्वांच्या हृदयात वास करणाऱ्या यदुवंशाधिपती श्रीकृष्णांना नमस्कार असो. हे अनंता ! आम्ही आपल्या दासांचे दास आहोत. देवर्षी नारदांच्या अनुग्रहामुळेच आम्हांला आपले दर्शन झाले. आपण आम्हांला जाण्याची अनुमती द्यावी. प्रभो ! आमची वाणी आपल्या गुणांचे वर्णन करीत राहो. आमचे कान आपल्या कथा ऐकण्याकडे लागून राहोत. आमचे हात आपल्या सेवेत आणि मन आपल्या चरणकमलांचे स्मरण करण्यात रममाण होवो ! आमचे मस्तक आपले निवासस्थान अशा जगासमोर नम्र राहो आणि आमचे नेत्र आपले प्रत्यक्ष शरीर अशा संतांचे दर्शन घेत राहोत." (२९-३८)

श्रीशुक म्हणतात- त्यांनी गोकुळेश्वर

श्रीकृष्णांची अशा प्रकारे स्तुती केल्यानंतर दोरीने उखळाला बांधलेले भगवान हसत हसत त्यांना म्हणाले. (३९)

श्रीभगवान म्हणाले- "तुम्ही मदाने आंधळे झाला होतात. अगोदरपासूनच मला हे माहीत होते की, परम कारुणिक देवर्षी नारदांनी शाप देऊन तुमचे ऐश्वर्य नष्ट केले आणि हीच तुमच्यावर कृपा केली. जे समदर्शी आहेत आणि ज्यांचे हृदय पूर्णपणे मला समर्पित आहे, त्या साधुपुरुषांच्या दर्शनाने संसारबंधन नाहीसे होते. जसा सूर्यदर्शनाने अंधार नाहीसा होतो. म्हणून नलकूबरा आणि मणिग्रीवा ! तुम्ही माझेच अनन्यचिंतन करीत आपापल्या घरी जा. जी तुमच्यासाठी कल्याणकारी आहे, त्या, तुम्हांला इष्ट असलेल्या व संसारचक्रातून सोडविणाऱ्या अनन्य भक्तीची प्राप्ती तुम्हांला झालेली आहे." (४०-४२)

श्रीशुक म्हणतात- भगवान असे म्हणाले, तेव्हा त्या दोघांनी त्यांना प्रदक्षिणा घातली आणि वारंवार नमस्कार केले. यानंतर उखळाला बांधलेल्या त्यांची आज्ञा घेऊन ते उत्तर दिशेला निघून गेले.(४३)

अध्याय दहावा समाप्त

अध्याय अकरावा

गोकुळातून वृंदावनात जाणे व वत्सासुर आणि बकासुराचा उद्धार

श्रीशुक म्हणतात- परीक्षिता ! वृक्ष पडताना जो प्रचंड आवाज झाला, तो ऐकून नंदादिक गोप वीजच पडली की काय असे वाटून तेथे आले. तेथे गेल्यावर त्या लोकांना, दोन्ही अर्जुनवृक्ष जमिनीवर उन्मळून पडलेले दिसले. वृक्ष उन्मळून पडण्याचे कारण जरी कळण्यासारखे होते, तरी ते स्पष्ट न कळल्याने त्यांची बुद्धी चक्रावून गेली. तेथे त्यांच्या समोरच दोरीने बांधलेला मुलगा उखळ ओढीत होता. "हे कोणाचे काम आहे, ही आश्चर्यकारक घटना कशी काय घडली ?" असा विचार करून ते भयभीत झाले. (१-३)

तेथे असलेली मुले म्हणाली- "अहो, याचेच हे काम आहे. हा दोन्ही वृक्षांच्या मधून जात होता. उखळ तिरपे झाल्यावर याने जोराने ओढले आणि झाडे उन्मळून पडली. त्यातून बाहेर पडलेले दोन पुरुषसुद्धा आम्ही पाहिले." परंतु गोपांनी मुलांच्या बोलण्यावर विश्वास ठेवला नाही. ते म्हणू लागले- "एवढा लहानसा मुलगा, इतकी मोठी झाडे पाडील, हे कधीच शक्य नाही." श्रीकृष्णाच्या अगोदरच्या लीलांची आठवण येऊन कोणाकोणाला ती शक्यताही वाटू लागली. नंदांनी पाहिले की, त्यांचा दोरीने बांधलेला मुलगा उखळ ओढीत घेऊन चालला आहे. ते हसू लागले आणि त्यांनी लागलीच त्याला सोडवले. कधी कधी गोपींनी फूस लावल्यावर भगवान सामान्य बालकाप्रमाणे नाचू लागत. कधी भाबडेपणाने गाऊ लागत. जणू ते त्यांच्या हातातील कठपुतळी झाले होते. कधी त्यांच्या आज्ञेवरून पाट आणीत, तर कधी तराजू आणीत. कधी पादत्राणे आणीत तर कधी आपल्या लोकांना आनंदित करण्यासाठी दंड थोपटीत. भगवान अशा प्रकारे आपल्या बाललीलांनी व्रजवासियांना आनंदित करीत आणि जगातील जे लोक त्यांना जाणणारे आहेत, त्यांना असे दाखवीत की, आपण आपल्या सेवकांच्या अधीन असतो. (४-९)

एके दिवशी एक फळे विकणारी बाई "फळे घ्या फळे" म्हणत आली. हे ऐकताच सर्व फळे देणारा अच्युत फळे खरेदी करण्यासाठी ओंजळीत धान्य घेऊन गेला. त्याच्या ओंजळीतून धान्य वाटेतच

सांडले; पण फळे विकणाऱ्या बाईने मात्र त्याचे दोन्ही हात फळांनी भरून टाकले. इकडे भगवंतांनीसुद्धा तिची फळांची टोपली रत्नांनी भरून टाकली. (१०-११)

एके दिवशी यमलार्जुन वृक्ष पाडणारा श्रीकृष्ण आणि बलराम मुलांसह खेळत खेळत यमुनेच्या तीराबर गेले आणि खेळातच दंग झाले. तेव्हा रोहिणी देवीने त्यांना हाका मारल्या. परंतु खेळात रमल्यामुळे रोहिणीच्या बोलावण्याने ते आले नाहीत. तेव्हा रोहिणीने मुलाचे लाड करणाऱ्या यशोदेला पाठवले. श्रीकृष्ण आणि बलराम मुलांबरोबर पुष्कळ वेळ खेळत होते. यशोदेने जाऊन त्यांना मोठ्याने हाका मारल्या. त्यावेळी पुत्राबद्दलच्या स्नेहामुळे तिच्या स्तनांतून दूध झिरपत होते. ''ए लाडक्या कृष्णा ! कमलनयना ! बाळा ये, दूध पी. खेळून खेळून दमला असशील. आता खेळ पुरे कर. भुकेने तू कासावीस झाला असशील. बाळ रामा ! कुलनंदना ! ये. लहान भावाला घेऊन लगेच ये. पहा, पुत्रा ! आज तू अगदी सकाळीच न्याहारी केली होतीस. आता तू जेवायला चल. बलरामा ! बाबा भोजनासाठी पानावर बसले आहेत. ते तुमची वाट पाहात आहेत, या ! आणि आम्हांला आनंद द्या ! मुलांनो ! आता तुम्हीही आपापल्या घरी जा. मुलांनो पहा तर खरे ! तुमचे अंग कसे धुळीने माखले आहे ते ! लवकर स्नान करा. आज तुमचे जन्मनक्षत्र आहे. आंघोळ करून ब्राह्मणांना गोदान करा. पहा ! पहा !! तुमच्या मित्रांना त्यांच्या आयांनी न्हाऊ-माखू घालून कसे सुंदर सुंदर दागिने घातले आहेत ते ! आता तुम्हीसुद्धा न्हाऊन छान छान कपडे घालून, खाऊन पिऊन, मग खेळायला जा.'' परीक्षिता ! चराचराचे शिरोमणी असलेल्या भगवंतांना प्रेमामुळे ती आपला पुत्र समजत होती. तिने एका हाताने बलरामाला आणि दुसऱ्या हाताने श्रीकृष्णाला पकडून त्यांना ती आपल्या वाड्यात घेऊन आली. नंतर तिने मुलांना न्हाऊ घालून त्यांचे औक्षण केले. (१२-२०)

नंदादी वृद्ध गोपांनी महावनामध्ये मोठमोठी संकटे येऊ लागली आहेत, असे पाहून सर्वांनी एकत्र येऊन यापुढे काय केले पाहिजे, याविषयी विचारविनिमय सुरू केला. त्यांपैकी उपनंद नावाचा वयाने व ज्ञानाने मोठा एक गोप होता व तो देश, काल व परिस्थिती यांचे रहस्य जाणणारा असून राम-कृष्णांचे कल्याण इच्छिणारा होता. तो म्हणाला. सध्या येथे मोठमोठी संकटे येऊ लागली आहेत. ती मुख्यत: लहान मुलांच्या नाशाला कारणीभूत ठरणारी आहेत. म्हणून, गोकुळ आणि गोकुळवासी यांचे कल्याण इच्छिणाऱ्या आपण इथून दुसरीकडे गेले पाहिजे. पहा ! मुलांना मारणाऱ्या राक्षसीच्या तडाख्यातून हा मुलगा कसाबसा वाचला. त्यानंतर भगवंतांच्या कृपेनेच याच्यावर हा मोठा छकडा पडला नाही. वादळरूपी दैत्याने याला आकाशात नेऊन घोर संकटातच टाकले होते. तेथून पुन्हा हा दगडावर आपटला, तेव्हासुद्धा देवाने याला वाचवले. यमलार्जुनांच्या मध्ये येऊनसुद्धा हा किंवा दुसरे मूल मेले नाही. हे सुद्धा भगवंतांनीच आमचे रक्षण केल्यामुळे. म्हणून जोपर्यंत एखादे फार मोठे अनिष्टकारक संकट या व्रजाला नष्ट करीत नाही, तोपर्यंतच आपण आपल्या मुलांना घेऊन सहपरिवार येथून दुसरीकडे निघून जाऊ. वृंदावन नावाचे एक नवे वन आहे. तेथे पवित्र पर्वत, गवत आणि वनस्पती आहेत. ते आमच्या जनावरांसाठी हितकारक आहे. गोप, गोपी आणि गाईंसाठी ते योग्य स्थान आहे. जर हे म्हणणे तुम्हांला पटत असेल, तर आजच आपण तिकडे जावयास निघू. उशीर करू नका. छकडे जोडा आणि आमची गुरे-वासरे पुढे जाऊ देत. (२१-२९)

उपनंदाचे म्हणणे ऐकून सर्व गोप एकमताने 'छान ! छान !' म्हणाले. त्यांनी आपल्या गाईंचे

कळप एकत्रित केले आणि छकड्यांवर सर्व सामग्री ठेवून ते वृंदावनाकडे निघाले. परीक्षिता ! गवळ्यांनी वृद्ध, मुले, स्त्रिया यांना आणि सर्व सामान छकड्यांवर ठेवले आणि स्वत: त्यांच्या पाठोपाठ ते धनुष्यबाण घेऊन अत्यंत सावधानपणे चालू लागले. गाई-वासरांना त्यांनी पुढे घातले आणि त्यांच्या पाठोपाठ रणशिंगे आणि तुताऱ्या जोरजोराने वाजवीत पुरोहितांसह ते चालले. वक्ष:स्थळांवर ताजी केशराची उटी लावून, सुंदर वस्त्रे परिधान करून, गळ्यामध्ये सोन्याचे दागिने घालून, रथांवर बसलेल्या गोपी आनंदाने श्रीकृष्णांच्या लीला गात चालल्या होत्या. तसेच यशोदा आणि रोहिणी श्रीकृष्ण आणि बलराम यांच्यासह एका छकड्यात बसल्या होत्या. त्या आपल्या दोन्ही मुलांचे बोबडे बोल ऐकण्यात गुंग झाल्या होत्या. सर्वकाळ आनंद देणाऱ्या वृंदावनात गेल्यावर गोपांनी आपले छकडे अर्धचंद्राकार उभे केले आणि गुरांना राहाण्यासाठी योग्य जागा तयार केल्या. परीक्षिता ! वृंदावन, गोवर्धन पर्वत आणि यमुना नदीचे विशाल वाळवंट पाहून श्रीकृष्ण आणि बलराम यांना खूप आनंद झाला. (३०-३६)

दोघेही राम-कृष्ण आपल्या बाललीलांनी आणि बोबड्या बोलण्याने व्रजवासियांना आनंद देत योग्य वेळी वासरे चारावयास नेऊ लागले. गवळ्यांच्या मुलांबरोबर खेळण्यासाठी निरनिराळे साहित्य घेऊन ते घराबाहेर पडत आणि व्रजभूमीजवळच वासरांना चारीत. ते कधी बासरी वाजवीत, तर कधी गोफणीने दगड फेकीत. काही वेळा आपल्या पायातील घुंघरांच्या नादावर नाचत तर कधी गाय-बैलांचे सोंग घेऊन खेळत. कधी वळू बनून हंबरत. आपापसात लढत तर कधी पशु-पक्ष्यांचे आवाज काढून सामान्य मुलांसारखे खेळत. (३७-४०)

एकदा कृष्ण आणि बलराम आपल्या मित्रांबरोबर यमुनातटावर वासरे चारीत असताना त्यांना मारण्यासाठी एक दैत्य आला. श्रीकृष्णांनी पाहिले की, हा खोट्या वासराचे रूप घेऊन वासरांच्या कळपात शिरला आहे. त्यांनी बलरामाला दाखविले आणि हळू हळू ते त्याच्यावर भालल्यासारखे दाखवून त्याच्याजवळ पोहोचले. श्रीकृष्णांनी शेपटासह त्याचे पाठीमागचे दोन पाय पकडून त्याला आकाशात फिरविले आणि मेल्यानंतर कवठाच्या झाडावर आपटले. त्याचे ते लांब-रुंद दैत्यशरीर कवठाची कित्येक फळे पाडत स्वत: खाली पडले. हे पाहून मुलांच्या आश्चर्याला पारावार राहिला नाही. "वा: ! वा: !" करून ते कन्हैय्याची प्रशंसा करू लागले. देवसुद्धा आनंदाने पुष्पवर्षाव करू लागले. (४१-४४)

जे सर्व लोकांचे एकमेव रक्षक आहेत, तेच आता गुराखी बनले. ते पहाटेच उठून न्याहारीचे पदार्थ घेऊन वासरांना चारीत वनात फिरत असत. एके दिवशी गवळ्यांची मुले आपापल्या वासरांचे कळप घेऊन त्यांना पाणी पाजण्यासाठी नदीकाठी घेऊन गेले. त्यांनी अगोदर वासरांना पाणी पाजले आणि नंतर ते स्वत: पाणी प्याले. त्या मुलांनी, तेथे एक प्रचंड प्राणी बसलेला पाहिला. तो जणू काही वज्राने तुटून पडलेला पर्वताचा तुकडाच वाटत होता. तो बक नावाचा एक मोठा असुर होता. त्याने बगळ्याचे रूप घेतले होते. त्याची चोच अत्यंत तीक्ष्ण होती आणि तो अतिशय बलवान होता. त्याने एकदम झेप घेऊन श्रीकृष्णाला गिळून टाकले. जेव्हा बलराम वगैरे मुलांनी बगळ्याने श्रीकृष्णाला गिळून टाकलेले पाहिले, तेव्हा प्राण निघून गेल्यावर इंद्रियांची जशी अवस्था होते, तशी त्यांची अवस्था झाली. पितामह ब्रह्मदेवाचासुद्धा पिता असलेला तो गोपाल-बालक जेव्हा बगळ्याच्या टाळूखाली पोहोचला, तेव्हा तो आगीप्रमाणे त्याची टाळू जाळू लागला. म्हणून त्या दैत्याने श्रीकृष्णाला शरीरावर कोणत्याही प्रकारे इजा न करता लगेच बाहेर टाकले आणि नंतर अतिशय क्रोधाने आपल्या कठोर चोचीने

त्यांना मारण्यासाठी तो त्यांच्यावर तुटून पडला. कंसाचा मित्र बकासुर भक्तवत्सल श्रीकृष्णांवर झडप घालणार, इतक्यात त्यांनी दोन्ही हातांनी त्याच्या दोन्ही चोची पकडल्या आणि मुलांच्या देखत गवताची काडी फाडावी तसे त्याला फाडले. यामुळे देवांना आनंद झाला. तेव्हा सर्व देव श्रीकृष्णांवर नंदनवनातील मोगरा इत्यादी फुलांचा वर्षाव करू लागले. तसेच नगारे, शंख इत्यादी वाजवून आणि स्तोत्रांनी त्यांना प्रसन्न करू लागले. हे पाहून गवळ्यांची मुले आश्चर्यचकित झाली. श्रीकृष्ण बगळ्याच्या तोंडातून निघून आपल्याकडे आलेले पाहून बलराम वगैरेंना आनंद झाला. जणू प्राणाचा संचार झाल्याने इंद्रियांत चैतन्य यावे. त्यांनी श्रीकृष्णांना मिठ्या मारल्या. नंतर आपापली वासरे वळवून सर्वजण व्रजामध्ये आले आणि तेथे त्यांनी घरच्या लोकांना सर्व घटना सांगितली. (४५-५३)

ते ऐकून गोपी-गोप आश्चर्यचकित झाले. कन्हैया जणू मृत्यूच्या जबड्यातूनच परत आला, असे वाटून अतिशय उत्सुकता, प्रेम आणि आदराने ते श्रीकृष्णांना अतृप्त नेत्रांनी निरखून पाहू लागले. ते आपापसात म्हणू लागले- "पहाना ! या बालकाला किती वेळा मृत्युमुखात जावे लागले ! परंतु ज्यांनी याचे अनिष्ट करण्याचे इच्छिले, त्यांचेच अनिष्ट झाले; कारण त्यांनी पहिल्यापासूनच दुसऱ्यांचे वाईट केले होते. एवढे सगळे होऊनही ते भयंकर असुर याचे काहीच वाकडे करू शकले नाहीत. याला मारण्याच्या उद्देशाने येतात, परंतु ज्योतीवर झडप घालणाऱ्या पतंगाप्रमाणे स्वत:च नष्ट होतात. ब्रह्मवेत्त्या महात्म्यांची वचने खोटी होत नाहीत, हेच खरे ! पहाना ! महात्म्या गर्गाचार्यांनी जे सांगितले होते, ते सर्व तंतोतंत खरे ठरले."अशा प्रकारे नंद इत्यादी गोपगण मोठ्या आनंदाने राम-कृष्णांसंबंधी गोष्टी करीत. ते त्यात इतके तन्मय होऊन जात की, त्यांना संसारातील दु:खांचा विसर पडे. अशाप्रकारे कृष्ण आणि बलराम गवळ्यांच्या मुलांबरोबर कधी लपंडाव खेळत, कधी पूल बांधीत तर कधी वानरांप्रमाणे उड्या मारीत. अशाप्रकारे बालोचित खेळ खेळून त्या दोघांनी व्रजामध्ये आपली बाल्यावस्था व्यतीत केली. (५४-५९)

अध्याय अकरावा समाप्त

अध्याय बारावा

अघासुराचा उद्धार

श्रीशुकाचार्य म्हणतात- एके दिवशी नंदनंदनाने वनातच भोजन करण्याच्या विचाराने सकाळी उठून तुतारीच्या मधुर आवाजाने बरोबरीच्या गवळ्यांच्या मुलांना जागविले आणि वासरांना पुढे करून तो व्रजमंडलातून बाहेर पडला. त्याच्याबरोबर त्याच्यावर प्रेम करणारी हजारो मुले सुंदर शिंकी, वेताच्या काठ्या, तुताऱ्या आणि बासऱ्या घेऊन तसेच आपली हजारो वासरे बरोबर घेऊन मोठ्या आनंदाने घरातून बाहेर पडली. श्रीकृष्णाच्या असंख्य वासरांत आपापली वासरे मिसळून त्यांना चारीत ठिकठिकाणी बाललीला करीत ते चालू लागले. त्या मुलांनी जरी काचा, गुंजा, रत्ने आणि सोन्याचे दागिने अंगावर घातले होते, तरीसुद्धा त्यांनी वृंदावनातील फळे, पालवी, रंगी-बेरंगी फुले, मोरपंख तसेच गेरूसारख्या रंगीत मातीनेही स्वत:ला सजविले होते. कोणी एखाद्याचे शिंके चोरून घेई, तर कोणी कोणाची काठी किंवा बासरी ! जेव्हा त्याच्या मालकाला हे कळे, तेव्हा ते घेणारा दुसऱ्याकडे

लांब फेकीत असे, दुसरा तिसऱ्याकडे आणि तिसरा आणखी लांब चौथ्याकडे. नंतर ते हसत हसत ज्याचे त्याला देत. श्रीकृष्ण जर वनाची शोभा पाहात थोडा पुढे निघून गेला तर "अगोदर मी त्याला शिवणार ! अगोदर मी शिवणार !" असे म्हणत सर्वजण त्याच्याकडे पळत जात आणि त्याला शिवून आनंदमग्न होऊन जात. कोणी बासरी वाजवीत, तर कोणी शिंगे फुंकीत, कोणी कोणी भ्रमरांच्याबरोबर गुणगुणत तर कोणी कोकिळांच्यासारखे "कुहू-कुहू" करीत. काही मुले आकाशात उडणाऱ्या पक्ष्यांच्या सावलीबरोबर धावत, तर काहीजण हंसांच्या बरोबर त्यांच्यासारख्या सुंदर गतीने चालत. काहीजण बगळ्यांच्या जवळ त्यांच्यासारखेच डोळे मिटून बसत, तर काहीजण मोरांना नाचताना पाहून त्यांच्याचसारखे नाचत. काहीजण वानरांचे शेपूट धरून ओढीत तर दुसरे त्यांच्या बरोबरीने झाडांवर चढत. काहीजण त्यांच्यासारख्या माकडचेष्टा करीत तर दुसरे काही त्यांच्या बरोबरीने एका डहाळीवरून दुसऱ्या डहाळीवर उड्या मारीत. काही मुले नदीच्या प्रवाहात बेडकांबरोबर पोहत त्यांना मागे टाकून पुढे जात. कोणी पाण्यात आपली प्रतिबिंबे पाहून त्यांना हसत; तर काहीजण आपल्याच आवाजाच्या प्रतिध्वनीला नावे ठेवत. श्रीकृष्ण ज्ञानी संतांच्यासाठी ब्रह्मानंदाचा मूर्तिमंत अनुभव आहेत, दास्य करणाऱ्या भक्तांचे ते आराध्यदैवत आहेत, आणि मायेने मोहित झालेल्या लोकांच्या दृष्टीने मनुष्य-बालक आहेत. त्याच भगवंतांच्याबरोबर ते पुण्यात्मे बालक खेळत होते. पुष्कळ जन्म श्रम करून जितेंद्रिय योग्यांनाही ज्यांच्या चरणकमलांची धूळ मिळणेही शक्य नाही, तेच भगवान व्रजवासी गवळ्यांना आपणहून दर्शन देत आहेत, त्यांच्या भाग्याचा महिमा काय वर्णावा ? (१-१२)

एवढ्यात अघासुर नावाचा महान दैत्य येऊन थडकला. त्याला त्या मुलांची चाललेली सुखमय क्रीडा पाहवली नाही. तो इतका भयंकर होता की, अमृतपान करून अमर झालेल्या देवतासुद्धा आपल्या जीवाचे रक्षण करण्यासाठी त्याच्या मृत्यूची वाट पाहात होते. अघासुर हा पूतना आणि बकासुराचा लहान भाऊ असून कंसाने त्याला पाठविले होते. श्रीकृष्ण इत्यादी मुलांना पाहून तो विचार करू लागला की, "माझ्या सख्ख्या भावाला आणि बहिणीला मारणारा हाच होय. म्हणून आज मी याला बलरामासह मारून टाकीन. हे जर मरून माझ्या भाऊ-बहिणीसाठी तिलांजली बनले, तर बाकी व्रजवासी आपोआप मेल्यासारखेच होतील. कारण संतान हेच प्राण्यांचे प्राण होत. जर प्राणच राहिले नाहीत, तर शरीराची काळजी कशाला ?" असा निश्चय करून त्या दुष्ट दैत्याने प्रचंड अजगराचे रूप धारण करून तो रस्त्यात पडून राहिला. त्याचे ते शरीर एक योजन लांब व मोठ्या पर्वताप्रमाणे प्रचंड होते. ते अत्यंत अद्भुत होते. सर्व बालकांना गिळून टाकावे, या इच्छेने त्याने गुहेप्रमाणे आपले अवाढव्य तोंड उघडून ठेवले होते. त्याचा खालचा जबडा जमिनीला आणि वरचा ओठ आभाळाला टेकला होता. त्याचे जबडे गुहांप्रमाणे होते आणि दाढा पर्वतशिखराप्रमाणे वाटत होत्या. तोंडात घोर अंधकार होता. लांबलचक जीभ सडकेप्रमाणे दिसत होती. श्वास तुफानाप्रमाणे आणि डोळे दावाग्नीप्रमाणे धगधगत होते. (१३-१७)

अघासुराचे असे रूप पाहून मुलांना वाटले की, हा सुद्धा वृंदावनाचाच एखादा देखावा असावा. ते गमतीने कल्पना करू लागले की, हे अजगराचे उघडलेले तोंड तर नसेल ! कोणी म्हणू लागला, "मित्रांनो ! सांगा पाहू ! हा जो आमच्यासमोर एखाद्या जीवाप्रमाणे बसला आहे, तो आम्हांला गिळून टाकण्यासाठी अजगराच्या उघडलेल्या तोंडाप्रमाणे दिसत नाही का ?" दुसरा म्हणाला, "सूर्याची किरणे पडल्याने खरोखरच हे जे लाल

झालेले ढग दिसत आहेत, ते असे वाटत आहेत की, तो याचा वरचा ओठ आहे; आणि त्याच आभाळाच्या सावलीने ही जी जमीन लाल दिसत आहे, तो त्याचा खालचा ओठ आहे.'' तिसरा म्हणाला, ''होय ! खरेच आहे ! पहा ना ! या डाव्या-उजव्या बाजूच्या गुहा अजगराच्या जबड्यांसारख्या नाहीत काय ? आणि ही उंच उंच शिखरे तर त्याच्या दाढाच वाटतात.'' चौथा म्हणाला, ''अरे मित्रा ! ही लांब-रुंद सडक तर नेमकी अजगराच्या जिभेसारखी वाटते आणि या पर्वत-शिखरांच्यामधील अंधकार तर त्याच्या तोंडातील आतल्या भागावरही मात करीत आहे.'' आणखी एकाने म्हटले, ''पहा ! पहा ! या जंगलाला आग लागल्यामुळे ही गरम, जळजळीत हवा येऊ लागली आहे. ती म्हणजे या अजगराचा श्वासच वाटतो. आणि त्या आगीने जळालेल्या प्राण्यांची दुर्गंधी तर अशी वाटत आहे की, जणू काही अजगराच्या पोटात मेलेल्या जीवांच्या मांसाचीच ती दुर्गंधी आहे.'' मग त्यांच्यापैकी एकजण म्हणाला- ''आम्ही जर याच्या तोंडात शिरलो, तर हा आम्हांला गिळून टाकील काय ? अरे ! हा काय गिळून टाकणार ? जर याने तशी आगळीक केली, तर हा एका क्षणात कृष्णाकडून बकासुराप्रमाणे मारला जाईल.'' असे म्हणत ती मुले बकासुराला मारणाऱ्या श्रीकृष्णांचे सुंदर मुख पाहात पाहात आणि टाळ्या पिटीत मोठ्याने हसत हसतच अघासुराच्या तोंडात घुसली. त्या अज्ञानी मुलांनी आपापसात केलेली भ्रामक वक्तव्ये ऐकून भगवान श्रीकृष्णांनी विचार केला की, ''अरे, यांना हा खरा अजगरसुद्धा खोटा वाटतो.'' सर्व प्राण्यांच्या हृदयात निवास करणाऱ्या त्यांनी, तो राक्षस आहे, हे ओळखून आपल्या मित्रांना त्याच्या तोंडात जाण्यापासून अडविण्याचे ठरविले. तेवढ्यात सारी मुले वासरांसह त्या असुराच्या पोटात घुसली. परंतु अघासुराने त्यांना गिळले नाही. कारण आपल्या भाऊ-बहिणीच्या वधाची आठवण होऊन, त्यांना मारणारा श्रीकृष्ण केव्हा मुखात येईल, याचीच अघासुर वाट पाहात होता. सर्वांना अभय देणाऱ्या श्रीकृष्णांनी, पाहिले की, ज्यांचे रक्षण करणारे केवळ आपणच, ती बिचारी मुले आपल्या हातातून निसटून मृत्युरूप अघासुराच्या जठराग्नीचे भक्ष्य बनली. तेव्हा दैवाच्या या विचित्र लीलेचा त्यांना विस्मय वाटला आणि त्यांचे हृदय दयेने द्रवले. ते विचार करू लागले. ''आता काय करावे ? ज्यामुळे या दुष्टाचा मृत्यू तर व्हावा आणि या भाबड्या मुलांची हत्यासुद्धा होऊ नये. ही दोन्ही कामे कशी होऊ शकतील ?'' सर्व काही प्रत्यक्ष पाहाणाऱ्या श्रीहरींनी काय करायचे ते ठरवून ते स्वत: त्याच्या मुखात शिरले. त्या वेळी ढगांआड लपलेल्या देवता भीतीने ''हाय ! हाय !'' म्हणू लागल्या आणि अघासुराचे हितैषी कंस वगैरे राक्षस आनंदित झाले. (१८-२९)

अघासुर, वासरे आणि मुले यांच्यासह श्रीकृष्णांना आपल्या दाढांनी चावून त्यांचे पीठ करू इच्छित होता, परंतु त्याचवेळी अविनाशी श्रीकृष्णांनी, देवतांचा हाहाकार ऐकून अत्यंत वेगाने आपले शरीर त्याच्या गळ्यात नेऊन खूप फुगविले. यानंतर भगवंतांच्या शरीरामुळे, त्या महाकाय अजगराच्या गळ्याचा श्वासमार्ग बंद झाला. बुबुळे उलटी झाली. तो व्याकूळ होऊन इकडेतिकडे वळवळू लागला. शेवटी आतल्या आत रोखला गेलेला श्वास ब्रह्मरंध्र फोडून बाहेर पडला. त्याच मार्गाने त्याची सर्व इंद्रियेसुद्धा शरीरातून बाहेर आली. त्याच वेळी भगवान मुकुंदांनी आपल्या अमृतदृष्टीने मेलेली वासरे व मित्र यांना जिवंत केले आणि त्या सर्वांना बरोबर घेऊन ते अघासुराच्या मुखातून निघून बाहेर आले. त्या अजगराच्या स्थूल शरीरातून एक अद्भुत अशी मोठी ज्योत बाहेर पडली. त्यावेळी त्या जोतीच्या प्रकाशाने दाही दिशा झगमगल्या. ती थोडावेळ आकाशात स्थिर होऊन भगवंतांच्या बाहेर येण्याची वाट पाहू लागली. जेव्हा ते बाहेर आले, तेव्हा ती

ज्योत सर्व देवतांच्या देखत त्यांच्यामध्ये मिसळून गेली. त्यावेळी देवतांनी फुलांचा वर्षाव करून, अप्सरांनी नृत्य करून, गंधर्वांनी गाऊन, वादकांनी वाद्ये वाजवून, ब्राह्मणांनी स्तुतिपाठ म्हणून आणि पार्षदांनी जयजयकार करून अतिशय आनंदाने भगवान श्रीकृष्णांचे पूजन केले. कारण त्यांनी अघासुराला मारून त्या सर्वांवर मोठे उपकार केले होते. ते अद्‌भुत स्तुतिपाठ, सुंदर वाद्ये, मंगलमय गीते, जयजयकार इत्यादी आनंदोत्सवाचे अनेक मंगल ध्वनी ब्रह्मलोकी जाऊन पोहोचले. ते ऐकून ब्रह्मदेव ताबडतोब तेथे आले आणि श्रीकृष्णांचा हा महिमा पाहून चकित झाले. परीक्षिता ! जेव्हा अजगराचे ते अद्‌भुत कातडे वृंदावनात सुकून गेले, तेव्हा ते व्रजवासियांसाठी पुष्कळ दिवसपर्यंत खेळण्याची एक अद्‌भुत गुहा बनून राहिले होते. भगवंतांनी हे जे आपल्याला मृत्युरूप अजगराच्या मुखातून वाचविले होते आणि अघासुराला संसारबंधनातून सोडविले होते, ती लीला भगवंतांनी आपल्या कुमार अवस्थेत म्हणजेच वयाच्या पाचव्या वर्षीच केली होती. गवळ्याच्या मुलांनी ती त्याचवेळी पाहिलीसुद्धा होती. परंतु पौगंडअवस्थेत म्हणजे सहाव्या वर्षी त्यांनी आश्चर्यचकित होऊन व्रजामध्ये येऊन ती नुकतीच घडल्याचे सांगितले. अघासुर मूर्तिमंत अघ (पाप) च होता. भगवंतांच्या केवळ स्पर्शाने त्याची सर्व पापे धुतली गेली आणि त्याला पापी लोकांना कधीही प्राप्त न होणाऱ्या सारूप्य-मुक्तीची प्राप्ती झाली. परंतु ही काही आश्चर्याची गोष्ट नाही; कारण माणसाच्या बालकासारखी लीला रचणारे हे तेच परमपुरुष परमात्मा आहेत, जे व्यक्त-अव्यक्त आणि कार्यकारणरूप अशा सर्व विश्वाचे एकमात्र विधाता आहेत. ज्यांच्या कोणत्याही एका अंगाची भावनिर्मित प्रतिमा जर ध्यानाच्या द्वारा एकदा जरी हृदयामध्ये स्थिर केली, तरी तीच केवळ भक्तांना मिळणाऱ्या मुक्ती प्रदान करते. तर मग आत्मानंदाच्या नित्य अनुभवाने ज्यांनी मायेचा निरास केला, तेच अंतरंगात शिरल्यामुळे अघासुराला सद्‌गती मिळाली, यात काय आश्चर्य ! (३०-३९)

सूत म्हणतात- शौनकादी ऋषींनो ! श्रीकृष्णांनी ज्याला जीवदान दिले होते, त्या आपल्या रक्षणकर्त्याचे हे अद्‌भुत चरित्र ऐकले, तेव्हा त्याने पुन्हा श्रीशुकांना त्यांच्याच पवित्र लीलांसंबंधी प्रश्न विचारला. कारण त्यांच्या लीलांनी परीक्षिताचे चित्त आपल्याकडे आकर्षित करून घेतले होते. (४०)

परीक्षिताने विचारले- मुनिवर्य ! आपण म्हणालात की, भगवंतांनी केलेली पाचव्या वर्षातील लीला मुलांनी व्रजामध्ये सहाव्या वर्षी (नुकतीच घडल्याप्रमाणे) सांगितली. भूतकाळी केलेली लीला वर्तमानकाळाप्रमाणे त्यांनी कशी काय सांगितली ? महायोगी गुरुदेव ! हे जाणून घेण्याचे मला मोठेच कुतूहल वाटून राहिले आहे. आपण कृपा करून सांगावे. हीदेखील त्या श्रीकृष्णांचीच माया असावी. कारण याखेरीज असे होऊ शकत नाही. गुरुदेव ! मी नाममात्र क्षत्रिय असूनही आमचे भाग्य एवढे मोठे की, आम्ही आपल्याकडून परम पवित्र श्रीकृष्णलीलामृताचे वारंवार पान करीत आहोत. (४१-४३)

सूत म्हणतात- भगवंतांच्या भक्तांमध्ये श्रेष्ठ अशा शौनका ! परीक्षिताने जेव्हा असे विचारले, तेव्हा श्रीशुकांना भगवंतांची ती लीला आठवली; त्यामुळे त्यांची सर्व इंद्रिये व अंत:करण भगवंतांच्या लीलेने स्वत:कडे खेचले. थोड्या वेळाने हळू-हळू मोठ्या कष्टाने पुन्हा भानावर आल्यावर ते परीक्षिताला सांगू लागले. (४४)

अध्याय बारावा समाप्त

अध्याय तेरावा

ब्रह्मदेवांचा मोह आणि त्याचा निरास

श्रीशुक म्हणतात- परीक्षिता ! तू फार भाग्यवान आहेस. भगवंतांच्या भक्तांमध्ये तुझे स्थान श्रेष्ठ आहे. म्हणून तर तू इतका सुंदर प्रश्न विचारलास. तुला वारंवार भगवंतांच्या कथा ऐकावयास मिळतातच. तरीसुद्धा तू त्यांच्यासंबंधी प्रश्न विचारून त्यांत आणखी नावीन्य आणतोस. जीवनाचे सार जाणणाऱ्या संतांची वाणी, कान आणि हृदय भगवंतांच्या लीलेचे गान, श्रवण आणि चिंतन करीत असते. त्यांचा हा स्वभावच असतो की, त्यांना प्रतिक्षणी भगवंतांच्या अपूर्व लीला नव्याप्रमाणे वाटतात. ज्याप्रमाणे स्त्रीलंपट पुरुषांना स्त्रियांसंबंधीच्या गोष्टीच आवडतात. राजा ! तू एकाग्र चित्ताने श्रवण कर. भगवंतांची ही लीला रहस्यमय असूनसुद्धा मी तुला ती ऐकवितो; कारण गुरुजन प्रिय शिष्याला गुप्त गोष्टीसुद्धा सांगत असतात. भगवान श्रीकृष्णांनी वासरांना व मुलांना मृत्युरूप अघासुराच्या जबड्यातून वाचविले आणि त्यांना यमुना नदीच्या किनारी आणून ते म्हणाले. मित्रांनो ! यमुनेचे हे वाळवंट अत्यंत रमणीय आहे. पहाना ! इथली वालू मऊ आणि स्वच्छ आहे ! आम्हांला खेळण्यासाठी उपयुक्त सामग्री येथे विद्यमान आहे. पहा ! एकीकडे रंगी-बेरंगी कमळे उमलली आहेत आणि त्यांच्या सुगंधाने आकर्षित झालेले भ्रमर गुंजारव करीत आहेत; तर दुसरीकडे पक्षी मधुर किलबिलाट करीत आहेत. त्यांच्या प्रतिध्वनीने सुशोभित झालेले वृक्ष या स्थानाची शोभा वाढवीत आहेत. आता आपण येथे भोजन करू. कारण दिवस बराच वर आला आहे आणि आपण भुकेने व्याकूळ झालो आहोत. वासरे पाणी पिऊन जवळपास सावकाश चारा खात राहातील. (१-६)

"ठीक आहे." असे म्हणून मुलांनी वासरांना थांबवून पाणी पाजून हिरव्यागार गवतावर सोडून दिले आणि आपापल्या शिदोऱ्या उघडून भगवंतांच्याबरोबर मोठ्या आनंदाने ते जेवू लागले. गवळ्यांच्या मुलांनी श्रीकृष्णाच्या चारी बाजूंनी पुष्कळशा गोलाकार पंक्ती बनविल्या आणि ते श्रीकृष्णांकडे तोंडे करून बसले. यावेळी सर्वांच्या डोळ्यांतून आनंद ओसंडत होता. कमळाच्या गड्ड्याच्या चारी बाजूंनी त्याच्या पाकळ्या शोभून दिसाव्या, तसे ते सारे कृष्णांभोवती शोभून दिसत होते. कोणी फुले, कोणी जून पाने, कोणी कोवळी पाने, अंकूर, फळे, शिंकी, साली, दगड यांची पात्रे तयार करून ते भोजन करू लागले. भगवान श्रीकृष्ण आणि बाल-गोपाल असे जणू सर्वजण एकमेकांना आपापल्या पदार्थांची वेगवेगळी चव दाखवत, एकमेकांना हसत-हसवत भोजन करू लागले. त्यावेळी श्रीकृष्णांनी मुरली कमरेच्या शेल्यात खोचली होती. शिंग आणि वेताची काठी डाव्या बगलेत धरली होती. सुंदर हातात दहीभाताचा घास होता. बोटांमध्ये जेवताना खाण्याची फळे धरली होती. आणि ते सर्वांच्या मध्ये बसून आपल्या विनोदपूर्ण बोलण्याने आपल्या सवंगड्यांना हसवीत होते. जे सर्व यज्ञांचे भोक्ते तेच आज मुलांसमवेत बाल-लीला करीत भोजन करीत होते आणि स्वर्गातील देव त्यांची ही लीला पाहात होते. (७-११)

हे भारता ! अशा प्रकारे बाल-गोपाल भगवंतांशी तन्मय होऊन जेवत असता त्यांची वासरे हिरव्यागार गवताच्या लोभाने जंगलात लांब निघून गेली. गोपालांचे जेव्हा तिकडे लक्ष गेले, तेव्हा ते घाबरले. त्यावेळी विश्वातील भयाला भिवविणारे श्रीकृष्ण म्हणाले, "मित्रांनो ! तुम्ही जेवण थांबवू नका. मी वासरांना येथे घेऊन येतो." भगवान

श्रीकृष्ण एवढे बोलून हातात घास घेऊनच पहाड, दऱ्या, कुंज, गुहा इत्यादी ठिकाणी आपल्या वासरांना शोधत निघाले. परीक्षिता ! ब्रह्मदेव आधीच येऊन आकाशात राहिले होते. प्रभूंच्या प्रभावाने अघासुराचा झालेला मोक्ष पाहून त्यांना अत्यंत आश्चर्य वाटले. लीलेने मनुष्य-बालक झालेल्या भगवंतांचा आणखी एखादा मनोहर महिमा पाहावा, असा विचार करून त्यांनी अगोदर वासरांना आणि श्रीकृष्ण निघून गेल्यावर गोपालांना दुसरीकडे नेऊन ठेवले आणि स्वत: अंतर्धान पावले. (१२-१५)

वासरे न सापडल्याने ते यमुनेच्या वाळवंटात परत आले. येऊन पाहिले तर गोपालसुद्धा नाहीत. तेव्हा त्यांनी वनात चारी बाजूला जाऊन त्यांना शोधले. सर्वज्ञ श्रीकृष्णांना जेव्हा त्या वनात गोपाल आणि वासरे कोठेच दिसली नाहीत, तेव्हा त्यांनी लगेच ताडले की, ही ब्रह्मदेवाची करणी आहे. तेव्हा श्रीकृष्णांनी, वासरे आणि गोपालांच्या मातांना तसेच ब्रह्मदेवालासुद्धा आनंदित करण्यासाठी स्वत: वासरे आणि गोपाल अशी दोन्ही रूपे घेतली. यात त्यांना अशक्य ते काय ? कारण तेच संपूर्ण विश्वाचे कर्ते ईश्वर आहेत ना ! ती बालके आणि वासरे संख्येने जितकी होती, जेवढी लहान त्यांची शरीरे होती, त्यांचे हात-पाय जसजसे होते, त्यांच्याजवळ जितक्या आणि जशा छड्या, शिंगे, बासऱ्या, पाने आणि शिंकी होती, जसे आणि जितके वस्त्रालंकार होते, त्यांचे स्वभाव, गुण, नावे, रूपे आणि वय जसजसे होते, ज्याप्रकारे ते खाणे-पिणे इत्यादी व्यवहार करीत, अगदी नेमके तसेच आणि तितक्याच रूपांमध्ये सर्वस्वरूप अजन्मा भगवान श्रीकृष्ण प्रगट झाले. त्यावेळी "हे संपूर्ण जग विष्णुरूप आहे" ही वेदवाणी सार्थ झाली. सर्वात्मा भगवान स्वत:च वासरे आणि गोपाल झाले. आत्मस्वरूप वासरांना आत्मस्वरूप गोपाळांनी वेढून आपल्याबरोबर आपणच अनेक प्रकारचे खेळ खेळत त्यांनी व्रजामध्ये प्रवेश केला. राजा ! ज्या गोपाळांची जी वासरे होती, त्यांना त्याच गोपाळांच्या रूपाने स्वतंत्रपणे घेऊन जाऊन त्यांच्या त्यांच्या गोठ्यांत बांधले आणि ते त्या त्या बालकांच्या रूपाने त्यांच्या त्यांच्या घरात गेले. (१६-२१)

बासरीची तान ऐकताच मुलांच्या माता लगेच धावून आल्या. गोपाळ बनलेल्या परब्रह्म श्रीकृष्णांना त्यांनी आपली मुले समजून, हातांनी उचलून घेऊन हृदयाशी घट्ट धरले. आणि प्रेमामुळे स्तनातून पाझणारे अमृतासारखे दूध त्या त्यांना पाजू लागल्या. परीक्षिता ! अशा प्रकारे दररोज संध्याकाळच्या वेळी श्रीकृष्ण त्या गोपाळांच्या रूपांत वनातून परत येत आणि आपल्या बालसुलभ लीलांनी मातांना आनंदित करीत. त्या माता त्यांना उटणे लावीत, न्हाऊ घालीत, चंदनाचा लेप लावीत आणि चांगल्या वस्त्रांनी तसेच अलंकारांनी सजवीत. नजर लागू नये म्हणून काजळाची तीट लावीत आणि जेवू घालीत. अशा रीतीने त्यांचे लालन-पालन करीत. गाईसुद्धा धावत धावत गोठ्यांत येत आणि त्यांचे हंबरणे ऐकून त्यांची वासरेही धावत त्यांच्याकडे जात. तेव्हा त्या वारंवार त्यांना जिभेने चाटून प्रेमामुळे सडांतून पाझरणारे दूध त्यांना पाजीत. या गाई आणि गौळणींचा आईपणा त्यांच्या ठिकाणी पहिल्याप्रमाणेच होता. मात्र त्यांचे प्रेम पहिल्या पुत्रांपेक्षा या नव्या पुत्रांवर जास्त होते. तसेच भगवानसुद्धा त्यांच्या पहिल्या पुत्रांप्रमाणेच त्यांच्याशी वागत. परंतु भगवंतांचे ठिकाणी मात्र त्या मुलांसारखा मोहाचा भाव नव्हता. आपापल्या मुलांबद्दलचे व्रजवासियांचे प्रेम वर्षभरात दिवसेंदिवस हळू-हळू वाढतच गेले. एवढेच नव्हे तर, श्रीकृष्णांबद्दल त्यांना जसे असीम प्रेम वाटत होते, तसेच त्यांना आपल्या या बालकांबद्दलही पूर्वीपेक्षा जास्त प्रेम वाटू लागले. अशा प्रकारे सर्वात्मा श्रीकृष्ण स्वत: गोपाळ असून शिवाय वासरे आणि इतर गोपाळ बनून स्वत:च

स्वत:चे पालन करीत एक वर्षपर्यंत वनांत आणि गौलवाड्यांत क्रीडा करीत राहिले. (२२-२७)

जेव्हा एक वर्ष पूर्ण होण्यास पाच-सहा दिवस शिल्लक होते, तेव्हा एके दिवशी श्रीकृष्ण बलरामांसह वासरे चारीत वनात गेले. त्यावेळी गोवर्धन पर्वताच्या माथ्यावर गाई चरत होत्या. तेथून त्यांनी व्रजाजवळच खूप लांब गवत खात असलेल्या आपल्या वासरांना पाहिले. वासरांना पाहाताच गाईंचे वात्सल्य उफाळून झाले. त्यांचे भान हरपले आणि गुराख्यांच्या अडविण्याची पर्वा न करता ज्या वाटेने जाणे कठीण होते, त्या वाटेनेही हंबरत जणू दोनच पाय असल्यासारख्या त्या अतिशय वेगाने पळत सुटल्या. त्यावेळी त्यांच्या सडांतून दुधाच्या धारा वाहात होत्या, माना वशिंडाकडे वळवून व शेपट्या आणि तोंडे वर करून त्या धावू लागल्या. ज्या गाईंना आणखी वासरे झाली होती, त्या सुद्धा गोवर्धनाच्या पायथ्याशी आपल्या अगोदरच्या वासरांकडे धावत आल्या आणि त्यांना ममतेने आपोआप वाहाणारे दूध पाजू लागल्या. त्या वेळी त्या आपल्या वासरांचे एक एक अंग असे कौतुकाने चाटीत होत्या की, जणू आता त्या त्यांना गिळून टाकतात की काय ! गोपांनी त्यांना अडविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण ते सर्व प्रयत्न व्यर्थ गेले. आपल्या अयशस्वी होण्याची त्यांना थोडीशी लाज वाटली आणि गायींचा अतिशय राग आला. जेव्हा ते अतिशय कष्टाने त्या दुर्गम वाटेने त्या ठिकाणी पोहोचले, तेव्हा त्यांनी वासरांसमवेत मुलांनाही पाहिले. आपल्या मुलांना पाहाताच त्यांचे हृदय प्रेमरसाने उचंबळून आले. प्रेमाचा पूर येताच क्रोध न जाणो कुठच्या कुठे पळून गेला. त्यांनी आपापल्या मुलांना उचलून घेऊन हृदयाशी कवटाळले आणि त्यांच्या मस्तकाचे अवघ्राण करून ते अत्यंत आनंदित झाले. आपल्या मुलांना आलिंगन दिल्याने वृद्ध गोपांना अतिशय आनंद झाला. नंतर मोठ्या कष्टाने त्यांना सोडून तेथून ते हळू-हळू निघून गेले. गेल्यानंतरसुद्धा त्यांची आठवण होऊन त्यांच्या डोळ्यांतून आनंदाचे अश्रू वाहात राहिले. (२८-३४)

ज्यांनी आईचे दूध पिणे सोडले होते, त्या बालकांवरसुद्धा गाई आणि गौळणींचे क्षणोक्षणी वाढणारे प्रेम आणि उत्कंठा पाहून बलराम विचारात पडले. कारण त्यांना त्याचे कारण माहीत नव्हते. "हे काय आश्चर्य आहे ! व्रजवासींचे आणि माझे सर्वात्मा श्रीकृष्णांवर जसे विलक्षण प्रेम आहे, तसेच ही बालके आणि वासरे यांच्यावरही वाढत चालले आहे ! ही कोणती माया आहे ? कुठून आली ? ही एखाद्या देवतेची, मनुष्याची की असुराची आहे ? नाही. हे शक्य नाही. ही तर माझ्या प्रभूचीच माया आहे. कारण मला मोहित करू शकेल असे अन्य कोणाच्याही मायेमध्ये सामर्थ्य नाही." (३५-३७)

असा विचार करून बलरामांनी ज्ञानदृष्टीने पाहिले, तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, ही सर्व वासरे आणि गोपाल म्हणजे श्रीकृष्णच आहेत. तेव्हा ते श्रीकृष्णांना म्हणाले- "भगवन ! हे गोपाळ देव नाहीत आणि वासरे ऋषी नाहीत. या वेगवेगळ्या रूपांचा आश्रय घेऊनसुद्धा आपण एकटेच या रूपांमध्ये दिसत आहात. आपण एकटेच अशा प्रकारे वेगवेगळेपणाने का दिसत आहात, ते थोडक्यात स्पष्ट करून सांगा." तेव्हा भगवंतांनी ब्रह्मदेवाची किमया सांगितली आणि बलरामांनी ती जाणली. (३८-३९)

तोपर्यंत ब्रह्मदेव ब्रह्मलोकातून व्रजामध्ये परत आले. त्यांच्या कालमानाने आतापर्यंत फक्त एक त्रुटी (तीक्ष्ण सुईने कमळाच्या पानाला छेद देण्यासाठी जेवढा वेळ लागेल तेवढा) इतका काळच झाला होता. त्यांनी पाहिले की, भगवान श्रीकृष्ण, गोपाल आणि वासरांच्याबरोबर एक वर्षापूर्वीप्रमाणेच क्रीडा करीत आहेत. ते विचार करू लागले, "गोकुळात

जितके गोपाळ आणि वासरे होती, ते तर माझ्या मायारूपी शय्येवर झोपलेले असून अजून उठलेले नाहीत. तर मग माझ्या मायेने मोहित झालेल्या गोपाळ आणि वासरांव्यतिरिक्त, हे तितकेच दुसरे बालक आणि वासरे, जे एक वर्षापासून भगवंतांच्या-बरोबर खेळत आहेत, ते कुठून आले ?'' ब्रह्मदेवांनी पुष्कळ वेळपर्यंत विचार करूनही या दोहोंपैकी कोणते खरे आणि कोणते कृत्रिम हे ते मुळीच जाणू शकले नाहीत. स्वत: मोहापासून दूर राहून विश्वाला मोहित करणाऱ्या श्रीकृष्णांना, ब्रह्मदेव आपल्या मायेने मोहित करावयास निघाले होते. परंतु ते स्वत:च आपल्याच मायेने मोहित झाले. ज्याप्रमाणे रात्रीच्या अंधारात धुक्याच्या अंधाराचा आणि दिवसाच्या प्रकाशात काजव्याच्या प्रकाशाचा मागमूसही लागत नाही, त्याचप्रमाणे जेव्हा क्षुद्र पुरुष महापुरुषांवर आपल्या मायेचा प्रयोग करतात, तेव्हा ते त्यांचे काहीही बिघडवू शकत नाहीत. उलट त्या क्षुद्रांचाच प्रभाव ते नाहीसा करून टाकतात. (४०-४५)

तेवढ्यात ब्रह्मदेवाना समोरच, सर्व गोपाळ आणि वासरे श्रीकृष्णांच्या रूपात दिसू लागले. ते सर्वजण ढगांप्रमाणे श्यामवर्ण, पीतांबरधारी, शंख, चक्र, गदा आणि पद्म यांनी युक्त असे चार हात असलेले, मस्तकांवर मुगुट, कानांमध्ये कुंडले, कंठांमध्ये मोत्यांचे हार व वनमाळा धारण केलेले दिसत होते. त्यांच्या वक्ष:स्थळावर श्रीवत्स चिह्ने, बाहूंमध्ये बाजूबंद, मनगटांमध्ये शंखाकार रत्नजडित कडी, पायांमध्ये नूपुरे आणि कडी, कमरेला करदोटे व बोटांमध्ये आंगठ्या झगमगत होत्या. त्यांनी पायापासून मस्तकापर्यंत सर्वांगावर, अत्यंत पुण्यवान भक्तांनी वाहिलेल्या कोमल आणि ताज्या तुळशीच्या माळा धारण केल्या होत्या. त्यांचे हास्य चांदण्याप्रमाणे उज्ज्वल होते आणि लालसर नेत्रांच्या कटाक्षांनी ते पाहात होते. असे वाटत होते की, जणू काही या दोहोंच्याद्वारा सत्त्वगुण आणि रजोगुणाचा स्वीकार करून भक्तजनांच्या मनांत इच्छा निर्माण करून त्या ते पूर्ण करीत आहेत. स्वत:पासून ते गवताच्या काडीपर्यंत सर्व चराचर जीव मूर्तिमंत होऊन नाचत-गात अनेक प्रकारच्या पूजासामग्रीने भगवंतांच्या त्या वेगवेगळ्या सर्व रूपांची उपासना करीत आहेत. अणिमा, महिमा इत्यादि सिद्धी, माया, विद्या इत्यादी विभूती आणि महत्तत्त्व इत्यादी चोवीस तत्त्वे यांनी त्यांना चारी बाजूंनी वेढले आहे. काल, स्वभाव, संस्कार, कामना, कर्म, विषय इत्यादी सर्व मूर्तिमंत होऊन भगवंतांच्या प्रत्येक रूपाची उपासना करीत आहेत. भगवंतांच्या समोर ती सर्व तत्त्वे आपले अस्तित्व गमावून बसली होती. ते सर्व सत्य, ज्ञान, अनंत, आनंदस्वरूप आहेत, एकरस आहेत. तसेच तत्त्वज्ञान्यांची सुद्धा दृष्टी त्यांच्या अनंत महिम्याला स्पर्शही करू शकत नाही. अशाप्रकारे ब्रह्मदेवांनी एकाच वेळी पाहिले की, ज्यांच्या प्रकाशाने हे सर्व चराचर जग प्रकाशित होत आहे, त्या परब्रह्मस्वरूप श्रीकृष्णांचीच ही रूपे आहेत. (४६-५५)

हे अत्यंत आश्चर्यमय दृश्य पाहून ब्रह्मदेव चकित झाले. त्यांची अकराही इंद्रिये भान विसरली. भगवंतांच्या तेजापुढे ते मौन झाले. जणू काही व्रजाच्या देवतेजवळ एखादी बाहुली उभी असावी. ज्यांचे स्वरूप जाणणे तर्काच्या पलीकडचे आहे, ज्यांचा महिमा असाधारण आहे, जे स्वयंप्रकाश, आनंदस्वरूप आणि मायेच्या पलीकडील आहेत, वेदांतसुद्धा ज्यांचे साक्षात वर्णन करण्यास असमर्थ असल्यामुळे त्यांच्यापेक्षा वेगळ्याचा निषेध करून आनंदस्वरूप ब्रह्माचे तो काहीसे दिग्दर्शन करतो, त्या भगवंतांचे दिव्य स्वरूप पाहून सरस्वतीपती ब्रह्मदेव हे काय आहे, हे न कळल्याने दिङ्मूढ झाले व त्यांच्या रूपांना पाहाण्यासही असमर्थ ठरले. हे जाणून श्रीकृष्णांनी लगेच आपल्या मायेचा पडदा हटविला. यामुळे ब्रह्मदेवांना बाह्यज्ञान झाले. ते

जणू मरून पुन्हा जिवंत झाले. त्यांनी कसेबसे डोळे उघडले. तेव्हा कुठे त्यांना आपले शरीर आणि हे जग दिसू लागले. नंतर जेव्हा ते चहूकडे पाहू लागले, तेव्हा त्यांना आधी दिशा आणि नंतर लगेच समोर असलेले, सर्वांना सारखेच प्रिय व जीवांना जीवन देणाऱ्या वनराईने व्यापलेले वृंदावन दिसू लागले. तेथे श्रीकृष्णांचा वास असल्यामुळे क्रोध, लोभ इत्यादी दोष तेथून पळून गेले आहेत आणि तेथे स्वभावत:च परस्परांविषयी हाडवैर असणारी माणसे आणि पशुपक्षीसुद्धा मित्रांप्रमाणे मिळून मिसळून राहात आहेत. वृंदावन पाहताना ब्रह्मदेवांना दिसले की, अद्वितीय परब्रह्म, गोपवंशातील बालकाप्रमाणे अभिनय करीत आहे. एक असूनही त्यांना मित्र आहेत, अनंत असूनही ते इकडे तिकडे फिरत आहेत आणि त्यांचे ज्ञान अगाध असूनही ते हातात घास घेऊन एकटेच पूर्वीप्रमाणेच आपल्या मित्रांना आणि वासरांना शोधीत आहेत. भगवंतांना पाहाताच ब्रह्मदेवांनी आपल्या वाहनावरून घाईघाईने उतरून सोन्याप्रमाणे चमकणाऱ्या आपल्या शरीराने जमिनीवर दंडवत घातले. त्यांनी आपल्या चारही मुकुटांच्या अग्रभागाने भगवंतांच्या चरणकमलांना स्पर्श करून नमस्कार केला आणि पवित्र आनंदाश्रूंनी त्यांना न्हाऊ घातले. श्रीकृष्णांच्या नुकत्याच पाहिलेल्या महिम्याचे वारंवार स्मरण करीत ते त्यांच्या चरणांवर लोटांगण घालीत आणि पुन्हा पुन्हा उठून पुन्हा लोटांगण घालीत. अशाप्रकारे पुष्कळ वेळपर्यंत ते भगवंतांच्या चरणांवरच पडून राहिले. नंतर हळू हळू ते उठले आणि त्यांनी डोळ्यांतील अश्रू पुसले. भगवंतांना पाहून ते नतमस्तक झाले. ते थरथर कापू लागले. नंतर दोन्ही हात जोडून अत्यंत नम्रतेने आणि एकाग्रतेने, सद्गदित वाणीने ते भगवंतांची स्तुती करू लागले. (५६-६४)

अध्याय तेरावा समाप्त

अध्याय चौदावा

ब्रह्मदेवांनी केलेली भगवंतांची स्तुती

ब्रह्मदेव म्हणाले- प्रभो ! केवळ आपणच स्तुती करण्यास योग्य आहात. आपले हे शरीर पावसाळ्यातील मेघाप्रमाणे श्यामल आहे; त्यावर विजेप्रमाणे झगमगणारा पीतांबर शोभून दिसत आहे, गुंजांची कर्णभूषणे आणि मोरपंखांचा मुगुट यामुळे आपले मुख सुंदर दिसत आहे. आपल्या वक्ष:स्थळावर वनमाला रुळत आहे. हातामध्ये घास, बगलेत वेताची काठी आणि शिंग व कमरेला खोचलेली बासरी सुरेख दिसत आहे. गोपालबालक असणाऱ्या आपले चरण सुकुमार आहेत. मी आपल्याला नमस्कार करीत आहे. हे देवा ! भक्तांच्या इच्छेनुसार धारण केले जाणारे हे स्वरूप मला अनुगृहीत करण्यासाठीच आपण प्रगट केले आहे. हे पांचभौतिक नाही. तरीही याचा महिमा कोणीही जाणू शकत नाही. तर मग साक्षात आत्मानंदानुभव-स्वरूप अशा आपला महिमा कोणी चित्त एकाग्र करूनसुद्धा कसा जाणू शकेल ? प्रभो ! जे लोक ज्ञानप्राप्तीसाठी प्रयत्न न करता केवळ आपापल्या ठिकाणीच राहून, संतांनी वर्णिलेल्या आपल्या कथांचे, शरीराने, वाणीने आणि मनाने विनम्रपणे सेवन करतात, किंबहुना तेच आपले जीवन मानतात, त्यांनी त्रैलोक्यात अजिंक्य अशा आपल्याला बहुधा जिंकल्यासारखेच असते. हे भगवन ! कल्याणाचा उगम असणारी आपली भक्ती सोडून जे लोक केवळ ज्ञानप्राप्तीसाठी श्रम करतात, त्यांना फक्त क्लेशच क्लेश हाती लागतात, अन्य काही नाही.

जसे भुसा कुटणाऱ्यांना फक्त श्रमच होतात, तांदूळ मिळत नाहीत. (१-४)

हे अच्युता ! हे अनंता ! या लोकी पूर्वीसुद्धा पुष्कळ योगी होऊन गेले. जेव्हा त्यांनी आपली सर्व कर्मे आपल्याला समर्पित केली, तेव्हा त्या कर्मांनी व आपल्या कथाश्रवणाने त्यांना आपली भक्ती प्राप्त झाली. त्या भक्तीनेच आपल्या स्वरूपाचे ज्ञान प्राप्त करून घेऊन त्यांनी सहजपणे आपल्या परमपदाची प्राप्ती करून घेतली. हे अनंता ! आपल्या निर्गुण स्वरूपाचा महिमा शुद्ध अंत:करण असलेलेच जाणू शकतात. विशेष आकाराचा व रूपाचा त्याग करून आत्माकार अंत:करण झाल्यावर स्वयंप्रकाशरूपाने तो जाणता येते. एरव्ही नाही. ज्या सामर्थ्यवान पुरुषांनी पुष्कळ काळ परिश्रम करून पृथ्वीचे परमाणू, आकाशातील हिमकण व चमकणारी नक्षत्रे यांचीसुद्धा गणती केली असेल, त्यांच्यापैकीसुद्धा असा कोण असू शकेल की, जो जगाच्या कल्याणासाठीच अवतीर्ण झालेल्या सगुण स्वरूपाच्या आपल्या गुणांची गणती करू शकेल ? म्हणून जो मनुष्य अत्यंत उत्सुकतेने आपल्या कृपेची वाट पाहात प्रारब्धानुसार प्राप्त होईल, ते सुख किंवा दु:ख भोगतो, तसेच कायावाचामनाने स्वत:ला आपल्याला समर्पित करून जीवन व्यतीत करतो, तोच मनुष्य आपल्या मोक्षपदाचा अधिकारी होतो. (५-८)

प्रभो ! माझा नीचपणा तर पहा ! आपण अनंत आदिपुरुष परमात्मा आहात आणि मोठ-मोठे मायावीसुद्धा आपल्या मायेच्या चक्रामध्ये आहेत. असे असूनही मी आपल्यावर आपली माया पसरून माझे ऐश्वर्य दाखविण्याची इच्छा प्रदर्शित केली. प्रभो ! मी आपल्यासमोर केवढा ? अग्नीसमोर ठिणगीची काय गणती ? हे भगवन ! रजोगुणापासून उत्पन्न झाल्यामुळे मी आपल्याला ओळखले नाही. म्हणूनच मी स्वत:ला आपल्यापासून वेगळा असा जगाचा स्वामी समजत होतो. मी अजन्मा जगत्कर्ता आहे, या मायाकृत मोहाच्या घनदाट अंधाराने अंध होऊ लागलो होतो. म्हणून आपण मला आपला समजून क्षमा करावी. प्रकृती, महत्तत्त्व, अहंकार, आकाश, वायू, अग्नी, जल आणि पृथ्वीरूप आवरणाने घेरलेले हे ब्रह्मांड हेच माझे अवघे सात वितींचे शरीर कोणीकडे आणि जसे झरोक्यातून येणाऱ्या सूर्याच्या किरणांमध्ये असंख्य धुळीचे कण उडतांना दिसतात, त्याप्रमाणे ज्यांच्या एकेका रोमातून अशी अगणित ब्रह्मांडे निर्माण होतात, त्या आपला महिमा कोणीकडे ! हे परमात्मन ! बाळ जेव्हा मातेच्या पोटात असते, तेव्हा लाथा मारते; परंतु तो मातेचा अपराध ठरतो काय ? 'आहे' आणि 'नाही' या शब्दांनी सांगितली जाणारी अशी कोणती वस्तू आहे की जी आपल्या उदरात नाही ? (९-१२)

वेद म्हणतात की, ज्यावेळी तिन्ही लोक प्रलयकालीन पाण्यामध्ये लीन झालेले होते, त्यावेळी त्या पाण्यात असलेल्या श्रीनारायणांच्या नाभिकमलापासून ब्रह्मदेवाचा जन्म झाला. त्यांचे हे म्हणणे मुळीच असत्य नाही. तर मग प्रभो ! आपणच सांगा, मी आपला पुत्र नाही काय ? ज्यांच्यापासून माझा जन्म झाला, ते नारायण आपणच नव्हे का ? आपणच नारायण. कारण सर्व जीवांचे आत्मा म्हणून आपण नारायण (नार-जीवसमूह आणि अयन-आश्रय) आहात. आपण सर्व जीवांचे अधीश्वर म्हणूनही नारायण (नार-जीवसमूह आणि अयन-प्रवर्तक) आहात. सर्व लोकांचे साक्षी म्हणूनसुद्धा नारायण (नार-जीवसमूह आणि अयन-जाणणारे) आहात. नरापासून उत्पन्न होणाऱ्या पाण्यात निवास करीत असल्याकारणाने ज्यांना नारायण (नार-जल आणि अयन-निवासस्थान) म्हटले जाते, तेसुद्धा आपले एक अंशच आहेत. ते अंशरूपाने दिसणेसुद्धा सत्य नाही, तर आपली मायाच आहे. भगवन ! जर आपले ते

नारायणस्वरूप खरे व पाण्यातच असते, तर त्याचवेळी मला कसे दिसले नसते ? आणि मी तपश्चर्या केली, त्याचवेळी माझ्या हृदयात त्याचे दर्शन कसे झाले ? आणि काही क्षणातच ते पुन्हा अंतर्धान कसे पावले ? हे मायेचा नाश करणाऱ्या प्रभो ! आता याच अवतारात आपण हे बाहेर दिसणारे सारे जग आपल्या पोटातच मातेला दाखविले. यावरून हे संपूर्ण विश्व आपली माया आहे, हेच सिद्ध होते. जर आपल्यासह हे संपूर्ण विश्व जसे बाहेर दिसते, तसेच आपल्या उदरातसुद्धा दिसले, तर हे सर्व मायेविनाच घडले काय ? आज आपण माझ्यासमोर आपल्या-व्यतिरिक्त या विश्वाला आपल्या मायेचा खेळ दाखविला नाही काय ? प्रथम आपण एकटेच होतात. नंतर सर्व गोपाळ, वासरे, काठ्या, शिंकीसुद्धा आपणच झालात. त्यानंतर ती सर्व रूपे चतुर्भुज झाली आणि माझ्यासह सर्व तत्त्वे त्यांची सेवा करू लागली. निरनिराळ्या तितक्याच ब्रह्मांडांचे रूप आपण धारण केले होते. परंतु आता मात्र आपणच अपरिमित अद्वितीय ब्रह्मरूपाने राहिला आहात. (१३-१८)

अजाणतेपणामुळे जे लोक आपल्या स्वरूपाला जाणत नाहीत, त्यांना आपण प्रकृतीमध्ये असलेल्या जीवाच्या रूपाने भासता. आणि त्यांच्यावर आपल्या मायेचा पडदा टाकून सृष्टिनिर्मितीच्या वेळी माझ्या (ब्रह्मा) रूपाने, पालन करतेवेळी आपल्या (विष्णु) रूपाने आणि संहाराच्या वेळी रुद्राच्या रूपाने प्रतीत होता. हे विश्वनिर्मात्या प्रभो ! अजन्मा असूनही आपण देवता, ऋषी, मनुष्य, पशु-पक्षी, जलचर इत्यादी योनींमध्ये अवतार ग्रहण करता, तो दुष्ट पुरुषांची घमेंड नाहीशी करण्यासाठी आणि सत्पुरुषांवर कृपा करण्यासाठी. भगवन ! आपण अनंत, परमात्मा आणि योगेश्वर आहात. ज्यावेळी आपण आपल्या योगमायेचा विस्तार करून लीला करू लागता, त्यावेळी त्रैलोक्यात असा कोण आहे की जो, आपली लीला कोठे, कशासाठी, केव्हा आणि किती असते, हे जाणू शकेल ? म्हणून हे संपूर्ण जग स्वप्नाप्रमाणे असत्य, अज्ञानरूप आणि दु:खच दु:ख देणारे आहे. सच्चिदानंदस्वरूप या अनंत अशा आपल्यामध्ये मायेने उत्पन्न आणि विलीन झाल्यानंतरही आपल्या सत्तेने ते खरे आहे, असे वाटते. प्रभो ! आपणच एकमेव सत्य आहात; कारण आपण सर्वांचे आत्मा आहात. आपण पुराणपुरुष, स्वयंप्रकाश, अनन्त व आद्य आहात. आपण अविनाशी असल्याकारणाने नित्य आहात. आपला आनंद कधीही खंडित होणारा नाही. आपल्यामध्ये कोणत्याही प्रकारचा दोष नाही. आपण पूर्ण, एक व सर्व उपाधींपासून मुक्त असून अमृतस्वरूप आहात. आपले हे असे स्वरूप सर्व जीवांचेसुद्धा स्वत:चे खरे स्वरूप आहे. जे गुरुरूप सूर्यापासून तत्त्वज्ञानरूप दिव्य दृष्टी प्राप्त करून घेऊन त्यापासून आपल्याला स्वत:च्या रूपात पाहातात ते, या असत्य संसारसागराला जणू पार करून जातात. जे लोक परमात्माच आपला आत्मा आहे असे जाणत नाहीत, त्यांना त्यांच्या त्या अज्ञानामुळेच या नामरूपात्मक अखिल प्रपंचाचा भ्रम होतो. परंतु ज्ञान होताच त्याचा आत्यंतिक लय होतो. जसे दोरीच्या ठिकाणी भ्रमामुळे साप आहे असे वाटते आणि भ्रम नाहीसा होताच साप नाहीसा होतो. (१९-२५)

संसारासंबंधी बंधन आणि त्यापासून मुक्तता ही दोन्ही नावे अज्ञानामुळेच कल्पिलेली आहेत. वास्तविक अज्ञानाचीच ही दोन नावे आहेत. सत्य आणि ज्ञानस्वरूप अशा परमात्म्याशिवाय यांना वेगळे अस्तित्व नाही. जसे सूर्याच्या ठिकाणी दिवस आणि रात्र असा भेद नाही, त्याचप्रमाणे विचार केला असता अखंड चित्स्वरूप केवळ शुद्ध आत्म-तत्त्वामध्ये बंधन नाही की मोक्ष नाही. आपण स्वत:चा आत्मा असून लोक आपल्याला परका

प्राणतात, आणि शरीर इत्यादी जे परके आहेत, त्यांना आत्मा समजतात; शिवाय आपल्याला दुसरीकडे शोधू लागतात. पहा ना ! अज्ञानी जीवांचे हे केवढे अज्ञान ! हे अनंता ! ज्ञानी लोक आपल्या व्यतिरिक्त जे काही प्रतीत होते, त्याचा त्याग करीत स्वत:च्या शरीरातच आपला शोध घेतात; कारण जरी दोरीमध्ये साप नसला, तरीसुद्धा जाणवणारा तो साप खोटा आहे असा निश्चय केल्याशिवाय, विचारी मनुष्य खऱ्या दोरीला कसे जाणू शकेल ? (२६-२८)

हे भगवंता ! आपल्या चरणकमलांचा थोडासाही कृपाप्रसाद मिळालेला मनुष्यच आपल्या महिम्याचे रहस्य जाणू शकतो. दुसरा कोणीही पुष्कळ काळपर्यंत ते शोधत राहिला, तरी जाणू शकत नाही. म्हणून हे नाथ ! मला या जन्मामध्ये किंवा कोणत्याही पशु-पक्षी इत्यादींच्या जन्मामध्येसुद्धा असे सौभाग्य प्राप्त होवो की मी आपल्या दासांपैकी एखादा दास होऊन आपल्या चरणकमलांची सेवा करावी. हे प्रभो ! आजपर्यंत जगात केलेले मोठ-मोठे यज्ञ आपल्याला तृप्त करू शकले नाहीत. (म्हणूनच की काय) आपण वासरे आणि बालक होऊन व्रजातील गायी आणि गौळणींचे दूधरूप अमृत मोठ्या आवडीने प्यालात. खरेच, त्यांचे केवढे हे भाग्य ! अहो ! नंद इत्यादी व्रजवासी गोप धन्य होत. केवढे त्यांचे भाग्य ! कारण परमानंदस्वरूप सनातन पूर्ण ब्रह्म (असे) आपण त्यांचे संबंधी आहात. हे अच्युता ! या व्रजवासियांच्या भाग्याचा महिमा लांबच राहो. मन इत्यादी अकरा इंद्रियांच्या देवतांच्या रूपाने राहाणारे महादेवादी आम्हीसुद्धा अतिशय भाग्यवान आहोत; कारण या व्रजवासियांच्या मन इत्यादी इंद्रियांचे पेले करून आम्ही आपल्या चरणकमलांच्या अमृतापेक्षाही गोड, मदिरेपेक्षाही मादक, मधुर अशा मकरंदाचे वारंवार पान करीत आहोत. प्रभो ! या व्रजभूमीतील कोणत्याही वनामध्ये आणि विशेषेकरून गोकुळामध्ये कोणत्याही योनीमध्ये आमचा जन्म होवो, ती आमच्यासाठी मोठी भाग्याचीच गोष्ट ठरेल. कारण इथे जन्म झाल्यावर आपल्या कोणत्या ना कोणत्या तरी भक्ताच्या चरणांची धूळ आमच्यावर पडेलच की, जी वेदसुद्धा अनादी कालापासून आजपर्यंत धुंडीतच आहेत. कारण या व्रजवासियांचे संपूर्ण जीवनच आपण आहात. हे देवा ! या व्रजवासियांना त्यांच्या सेवेच्या बदल्यात आपण संपूर्ण फलस्वरूप अशा आपल्यापेक्षा अधिक कोणते फळ कोठून द्याल, याचा विचार करून माझे चित्त गोंधळात पडले आहे. आपण त्यांना आपले स्वरूप देऊन त्यांच्या ऋणातून मुक्त होऊ म्हणाल, तर तेही शक्य नाही. कारण आपले स्वरूप तर त्या पूतनेनेसुद्धा भक्त असल्याचा केवळ बहाणा करून आपल्या आप्तांसह प्राप्त करून घेतले. आणि येथे तर यांनी आपले घर, धन, स्वजन, प्रिय, शरीर, पुत्र, प्राण, मन इत्यादी सर्व काही आपल्यालाच समर्पित केले आहे. हे श्रीकृष्णा ! जोपर्यंत जीव तुमचा होत नाही, तोपर्यंतच राग-द्वेषादी चोर राहातात, घर तुरुंग बनते आणि मोह पायातील बेडीप्रमाणे जखडून ठेवतो. हे प्रभो ! आपण प्रपंचरहित असूनसुद्धा शरणागत भक्तांना आनंद देण्यासाठी पृथ्वीवर अवतार घेऊन प्रपंचाला अनुसरून वागत असता. हे प्रभो ! फार काय सांगावे ! जे लोक आपला महिमा जाणणारे असतील, ते खुशाल जाणोत. माझे मन, वाणी आणि शरीर तर आपला महिमा जाणण्यास सर्वथैव असमर्थ आहे. हे श्रीकृष्ण ! आपण सर्वांचे साक्षी आहात; आपण सर्व काही जाणताच ! आपणच सर्व जगाचे स्वामी आहात. हे संपूर्ण विश्व आपल्यामध्येच राहिलेले आहे. आता मला अनुमती द्यावी. हे भगवन श्रीकृष्ण ! आपण यदुवंशरूपी कमळाला विकसित करणारे सूर्य आहात. तसेच पृथ्वी, देव, ब्राह्मण आणि पशुरूप समुद्राची

अभिवृद्धी करणारे चंद्र आहात. आपण पाखंडी लोकांचा धर्मरूप अंधकार नष्ट करणारे आहात. पृथ्वीवर राहाणाऱ्या राक्षसांना नष्ट करणारे आपण सूर्यादिकांनासुद्धा पूजनीय आहात. भगवन ! माझे कल्पान्तापर्यंत आपल्याला नमस्कार असोत. (२९-४०)

श्रीशुक म्हणतात- जग निर्माण करणाऱ्या ब्रह्मदेवांनी अशा प्रकारे भगवान श्रीकृष्णांची स्तुती केली. यानंतर तीन वेळा प्रदक्षिणा घालून त्यांच्या चरणांना प्रणाम केला आणि नंतर ते आपल्या इष्ट स्थानी गेले. भगवान श्रीकृष्णांनी ब्रह्मदेवांना निरोप दिला आणि पूर्वीच्या जागी असलेल्या वासरांना घेऊन ते जिथे त्यांनी आपल्या मित्रांना सोडले होते, त्या आपल्या वाळवंटात आले. परीक्षिता ! आपले जीवनसर्वस्व असणाऱ्या श्रीकृष्णांच्या वियोगामध्ये जरी एक वर्ष निघून गेले होते, तरीसुद्धा त्या मुलांना ती वेळ अर्ध्या क्षणासारखीच वाटली. कारण ते भगवंतांच्या मायेने मोहित झाले होते ना ! जगातील सर्व जीव त्याच मायेने मोहित झाल्यामुळेच वारंवार आपल्याच आत्म्याला विसरतात. मायेने चित्त मोहित झालेले जीव येथे काय काय म्हणून विसरत नाहीत बरे ! (४१-४४)

श्रीकृष्णांना पाहाताच अतिशय उतावळेपणाने ते मित्र म्हणाले- ''बंधो ! ये. तुझे स्वागत असो ! आम्ही तुझ्याशिवाय एक घाससुद्धा खाल्ला नाही. आता आनंदाने जेवू या.'' तेव्हा हसत हसत भगवंतांनी त्या मुलांबरोबर जेवण केले आणि त्यांना अजगराचे कातडे दाखवून ते वनातून व्रजाकडे परत आले. श्रीकृष्णांच्या मस्तकावर मोरपिसांचा मुगुट असून गळ्यात फुलांच्या माळा होत्या. रंगीत धातूंनी शरीरावर चित्रे काढली होती. ते उच्च स्वराने बासरी, पाने आणि शिंगे वाजवत आनंदोत्सव साजरा करीत होते. गोपाळ त्यांच्या पाठोपाठ चालत त्यांची लोकपावन कीर्ती गात होते. मधून मधून वासरांना हाकारीत त्यांनी व्रजात प्रवेश केला. त्यांना पाहताच गोपींच्या डोळ्यांत आनंद मावेना. त्याच दिवशी मुलांनी व्रजामध्ये जाऊन सांगितले की, ''आज या यशोदा-नंद-नंदनाने भयंकर मोठा अजगर मारून त्याच्या तावडीतून आम्हांला सोडवले.''(४५-४८)

परीक्षित म्हणाला- ब्रह्मन ! श्रीकृष्ण स्वत:चा पुत्र नसून इतर गोपगोपींचे त्याच्यावर इतके प्रेम कसे होते ? इतके प्रेम तर त्यांचे स्वत:च्या मुलांवरही नव्हते. याचे कारण काय, ते सांगावे. (४९)

श्रीशुक म्हणतात- राजन ! जगातील सर्व प्राणी आपल्या आत्म्यावरच सर्वाधिक प्रेम करतात. पुत्र, धन इत्यादींवर जे प्रेम असते, ते त्या वस्तू आत्म्याला प्रिय वाटतात म्हणून. हे राजेंद्रा ! म्हणूनच सर्व प्राण्यांचे आपल्या आत्म्यावर जितके प्रेम असते, तितके आपले म्हटल्या जाणाऱ्या पुत्र, धन, घर इत्यादींवरही असत नाही. हे नृपश्रेष्ठा ! जे लोक देहालाच आत्मा मानतात, तेसुद्धा आपल्या शरीरावर जेवढे प्रेम करतात, तेवढे शरीराशी संबंधित असणाऱ्यांवर करीत नाहीत. जेव्हा विचारांती असे समजते की, ''हे शरीर (म्हणजे) मी नाही, हे शरीर माझे आहे'' तेव्हा या शरीरावरसुद्धा आत्म्याइतके प्रेम राहात नाही. म्हणूनच तर देह आसन्नमरण झाल्यावरसुद्धा जगण्याची आशा प्रबळ असतेच. (तात्पर्य, देह जाणार, हे निश्चित झाल्यावरही तो राहावा, असे वाटते ते आत्म्यासाठीच.) यावरून हे सिद्ध होते की, सर्व प्राणी आपल्या आत्म्यावरच सर्वाधिक प्रेम करतात आणि त्याच्यासाठीच या सर्व चराचर जगावरसुद्धा प्रेम करतात. या श्रीकृष्णांनाच तू सर्व आत्म्यांचा आत्मा समज. जगाच्या कल्याणासाठीच मायेचा आश्रय घेऊन ते येथे देह धारण करणाऱ्यासारखे वाटतात. जे लोक श्रीकृष्णांचे खरे स्वरूप जाणतात, त्यांच्या दृष्टीने या जगामध्ये जे चराचर पदार्थ आहेत, ते सर्व श्रीकृष्णस्वरूपच आहेत. त्यांच्याव्यतिरिक्त दुसरी कोणतीच वस्तू नाही. सर्व वस्तू आपल्या कारणातच

राहात असतात. त्या कारणाचे सुद्धा परम कारण भगवान श्रीकृष्ण आहेत. तर आता सांग, कोणत्या वस्तूला श्रीकृष्णांपेक्षा वेगळी म्हणावे ? सत्पुरुषांचे सर्वस्व असणाऱ्या पुण्यकीर्ती मुरारींच्या पदपल्लवरूपी नौकेचा ज्यांनी आश्रय घेतला, त्यांच्या दृष्टीने हा भवसागर, वासराच्या खुराने पडलेल्या खड्ड्यातील पाण्याएवढाच आहे. त्यांना परमपदाची प्राप्ती खात्रीने होते आणि संकटांचे निवासस्थान अशा या संसारात यावे लागत नाही. (५०-५८)

तू मला विचारले होतेस की, भगवंतांनी पाचव्या वर्षी केलेली लीला, बालगोपालांनी सहाव्या वर्षी कशी सांगितली ? त्याचे हे सर्व रहस्य मी तुला सांगितले. भगवान श्रीकृष्णांनी बाल-गोपालांबरोबर केलेला वनविहार, अघासुराचा वध, हिरवळीवरचे जेवण, वासरे व गोपाळांचे अलौकिक चिद्विलासरूप आणि ब्रह्मदेवांनी केलेली ही श्रेष्ठ स्तुती- हे सर्व जो मनुष्य ऐकतो आणि कथन करतो, त्याला सर्व पुरुषार्थांची प्राप्ती होते. अशा प्रकारे श्रीकृष्ण आणि बलराम यांनी कुमार अवस्थेला अनुरूप असे लपंडाव, सेतुबंधन, वानरांप्रमाणे उड्या मारणे इत्यादी अनेक खेळ खेळत आपली कुमार-अवस्था व्रजामध्येच संपविली. (५९-६१)

अध्याय चौदावा समाप्त

अध्याय पंधरावा

धेनुकासुराचा उद्धार आणि गोपाळांचा कालियाच्या विषापासून बचाव

श्रीशुक म्हणतात- नंतर बलराम आणि श्रीकृष्ण यांनी सहाव्या वर्षात पदार्पण केले. आता ते गाई चारावयास पात्र ठरले. ते मित्रांसह गाई चारीत वृंदावनात जात आणि ते आपल्या चरणांनी अत्यंत पवित्र करीत. हे वन गुरांच्या चाऱ्याने भरलेले व फुलांनी लहडलेले होते. पुढे गाई, त्यांच्या पाठीमागे बासरी वाजवीत श्यामसुंदर, त्यांच्यामागे बलराम आणि त्यापाठोपाठ श्रीकृष्णांच्या यशाचे गायन करणारे गोपाळ असे सर्वजण विहार करण्यासाठी त्या वनात गेले. तेथे कोठे भ्रमर मधुर गुंजारव करीत होते, कोठे हरिणांचे कळप होते, तर कोठे पक्षी किलबिलाट करीत होते. तसेच कोठे कोठे महात्म्यांच्या हृदयाप्रमाणे स्वच्छ पाण्याने भरलेली सरोवरे होती. त्यांतील कमळांच्या सुगंधाने सुवासित झालेला वारा तेथे वाहात होता. ती रमणीयता पाहून भगवंतांनी तेथे विहार करण्याचे ठरविले. फुला-फळांच्या भारांनी वाकलेले वृक्ष लालसर पालवी फुटलेल्या फांद्यांनी आपल्या चरणांना स्पर्श करीत आहेत, असे पाहून आनंदाने स्मित हास्य करीत श्रीकृष्ण बलरामांना म्हणाले. (१-४)

श्रीकृष्ण म्हणाले- "हे देवश्रेष्ठा ! देव ज्यांची पूजा करतात, त्या चरणकमळांना हे वृक्ष फुले आणि फळे घेऊन आपल्या शेंड्यांनी नमस्कार करीत आहेत. असेही असेल की, ज्या पापामुळे त्यांना वृक्षजन्म घ्यावा लागला, ते पाप दूर करण्यासाठीच ते असे करीत असावेत. हे पुण्यशील आदिपुरुषा ! तू जरी या वृंदावनामध्ये तुझे मूळ रूप झाकून ठेवून राहात असलास, तरी तुझे श्रेष्ठ भक्त मुनिगण तूच आपली इष्टदेवता आहे, हे ओळखून बहुतेक भ्रमरांच्या रूपामध्ये तुझ्या त्रिभुवनपावन यशाचे गायन करीत तुझे भजन करतात. ते आपल्याला कधीही सोडू इच्छित नाहीत. हे स्तुत्य बंधो ! तू आपल्या घरी आल्याचे पाहून हे मोर आनंदाने नाचत आहेत. गोपिकांप्रमाणे या हरिणी तुझ्याकडे प्रेमळ नजरेने पाहून तुला प्रसन्न करीत आहेत. या कोकिळा मधुर कुहूरवाने आपले स्वागत

करीत आहेत ! घरी आलेल्या अतिथीचे स्वागत करणे हा सत्पुरुषांचा स्वभावच असतो. अतिथिधर्म पाळणारे हे वनवासी धन्य होत. येथील भूमी आज गवतझुडपांसह तुझ्या चरणांच्या स्पर्शाने धन्य झाली आहे. येथील वृक्ष-वेली तुझ्या हातांचा स्पर्श झाल्याने स्वत:ला धन्य मानीत आहेत. तुझ्या दयार्द्र दृष्टिक्षेपामुळे नद्या, पर्वत, पशु-पक्षी कृतार्थ होत आहेत आणि व्रजातील गोपी लक्ष्मीलाही स्पृहणीय अशा तुझ्या वक्ष:स्थळाच्या स्पर्शाने कृतकृत्य झाल्या आहेत. (५-८)

श्रीशुकदेव म्हणतात- अशाप्रकारचे सुंदर वृंदावन पाहून श्रीकृष्ण आनंदित झाले. आपल्या सवंगड्यांसह गोवर्धन पर्वतावर व यमुनातीरावर गाईंना चारीत ते रममाण झाले. गोपाळ ज्यांचे चरित्र गात आहेत, असे वनमाला धारण केलेले कृष्ण बलरामासह धुंद भ्रमरांच्या गुणगुणण्यात आपला स्वर मिळवून मधुर संगीत गात.(९-१०)

कधी कधी श्रीकृष्ण राजहंसांच्या कूजनाचे अनुकरण करीत तर कधी नाचणाऱ्या मोरांपेक्षा अधिक सुंदर नाचून मित्रांना हसवीत. कधी मेघाप्रमाणे गंभीर वाणीने दूर गेलेल्या गुरांना त्यांच्या नावाने प्रेमाने बोलावीत. त्यांची ती मधुर हाक गाई आणि गोपालांचे चित्त मोहवी. कधी चकोर, क्रौंच, चकवा, भारद्वाज आणि मोर या पक्ष्यांचे आवाज काढीत, तर कधी वाघ-सिंहांच्या गर्जनेने घाबरल्यासारखे दाखवीत. कधी कधी बलराम खेळून थकल्यावर एखाद्या गोपाळाच्या मांडीची उशी करून पहुडत, तेव्हा श्रीकृष्ण त्यांचे पाय वगैरे चेपून त्यांचा थकवा दूर करीत. जेव्हा गोपाळ नाचू-गाऊ लागत, फुशारक्या मारत किंवा एकमेकांशी कुस्ती खेळत, तेव्हा दोघे भाऊ हातात हात घालून उभे राहात आणि हसून "शाबास ! शाबास !" म्हणत. कधी कधी स्वत: श्रीकृष्णसुद्धा कुस्ती खेळता खेळता थकून जाऊन एखाद्या झाडाखाली कोवळ्या पालवीच्या शय्येवर एखाद्या गोपाळाच्या मांडीवर डोके ठेवून पहुडत. त्यावेळी काही पुण्यवंत श्रीकृष्णांचे पाय चेपू लागत आणि दुसरे काही पुण्यशील बालक त्यांना पंख्यांनी वारा घालू लागत. हे राजा ! जेव्हा हृदय प्रेमाने उचंबळून येई, तेव्हा काही गोपाळ हलक्या आवाजात श्रीकृष्णांच्या लीलांना अनुरूप (अशी) मनोहर गीते गाऊ लागत. अशा प्रकारे भगवंतांनी आपल्या योगमायेने आपले खरे स्वरूप झाकून ठेवले होते. ते अशा काही लीला करीत की ज्या हुबेहूब गोपबालकांच्यासारख्याच वाटत. स्वत: भगवती लक्ष्मी ज्यांच्या चरणकमलांच्या सेवेमध्ये संलग्न असे, तेच भगवान या खेड्यातील बालकांबरोबर ग्रामीण खेळ खेळत असत. परंतु कित्येक वेळा त्यांची ईश्वरी लीलासुद्धा प्रगट होत असे.(११-१९)

राम-कृष्णांचा श्रीदामा नावाचा एक मित्र, सुबल, स्तोककृष्ण इत्यादी गोपाळ त्यांना प्रेमाने म्हणाले. हे पराक्रमी बलरामा ! हे दुष्टांचा नाश करणाऱ्या श्रीकृष्णा ! येथून थोड्याच अंतरावर ताडवृक्षांनी भरलेले एक मोठे वन आहे. तेथे ताडाची पुष्कळ फळे खाली पडतात आणि पडलेलीही आहेत. परंतु धेनुक नावाचा दुष्ट दैत्य ती घेऊ देत नाही. हे रामा ! हे कृष्णा ! तो बलाढ्य दैत्य तेथे गाढवाच्या रूपात येऊन राहातो. त्याच्याबरोबर आणखीही पुष्कळसे त्याच्यासारखेच बलवान दैत्य त्याच रूपात तेथे राहातात. शत्रूचा नाश करणाऱ्या हे कृष्णा ! माणसांना खाणाऱ्या त्या दैत्याच्या भीतीने माणसे, इतकेच काय, पशु-पक्षीसुद्धा त्या जंगलात जात नाहीत. त्याची फळे सुगंधित आहेत, परंतु आम्ही कधी ती खाल्ली नाहीत. चारी दिशांना पसरलेला त्यांचा सुगंध ध्यानात येतो. हे श्रीकृष्णा ! त्यांच्या सुगंधाने आमचे मन मोहित झाले आहे. आणि ती मिळावीत, अशी फार इच्छा आहे. बलराम दादा ! आपली इच्छा असेल तर जाऊ या. (२०-२६)

आपल्या मित्रांचे हे म्हणणे ऐकून श्रीकृष्ण आणि बलराम, दोघेही हसले आणि त्यांची इच्छा पुरविण्यासाठी त्यांच्याबरोबर तालवनाकडे गेले. त्या वनात जाऊन बलरामांनी हातांनी ती ताडाची झाडे हत्तीप्रमाणे जोराने हलवून फळे खाली पाडली. गाढवरूपी दैत्याने जेव्हा फळे पडल्याचा आवाज ऐकला, तेव्हा तो पर्वतांसह पृथ्वीचा थरकाप उडवीत तेथे धावत आला. तो बलवान दुष्ट आवेशाने बलरामांसमोर आला आणि त्याने मागच्या पायांनी त्यांच्या छातीवर लाथा मारून खिंकाळत तेथून तो बाजूला सरकला. राजन ! तो गाढव क्रोधाने पुन्हा खिंकाळत बलरामांच्याजवळ आला आणि त्यांच्याकडे पाठ करून पुन्हा रागाने त्याने आपल्या मागच्या पायांनी त्यांच्यावर लाथा झाडल्या. बलरामांनी एकाच हाताने त्याचे दोन्ही पाय धरले आणि त्याला आकाशात गरगर फिरवीत एका ताडाच्या झाडावर आपटले. फिरवीत असतानाच त्या गाढवाचे प्राण निघून गेले होते. (२७-३२)

त्याच्या आपटण्याने ज्याचा वरील भाग अतिशय विस्तृत होता असा तो महान ताडवृक्ष स्वत: कडकडाट करीत तुटून पडलाच, पण पडताना दुसऱ्या एका वृक्षालासुद्धा त्याने पाडले. दुसऱ्याने तिसऱ्याला, तिसऱ्याने चौथ्याला असे करीत पुष्कळसे ताडवृक्ष मोडून पडले. बलरामांनी लीलेने फेकून दिलेल्या गाढवाच्या शरीराच्या आघाताने तेथील सगळे ताडवृक्ष सोसाट्याच्या वाऱ्याने हलावे तसे गदगदा हलले. हे राजा ! जगदीश्वर अनन्त भगवानांच्या बाबतीत यात काय आश्चर्य ! कारण वस्त्रामध्ये दोरे असावेत, त्याप्रमाणे हे सारे जग त्यांच्यामध्ये ओतप्रोत (भरलेले) आहे. त्यावेळी धेनुकासुराचे बांधव-गाढव, आपला नातलग मारला गेल्याचे पाहून क्रोधाने राम-कृष्णांवर आवेशाने तुटून पडले. राजन ! त्यांच्यापैकी जे जे कोणी जवळ आले, त्यांना त्यांना बलराम आणि श्रीकृष्णांनी अगदी सहजगत्या मागचे पाय पकडून ताडवृक्षांवर आपटले. त्यावेळी तेथे जमिनीवर चहूकडे पसरलेली ताडाची फळे, तुटून पडलेले वृक्ष व दैत्यांची प्रेते यांनी जमीन आच्छादली गेली. ढगांमुळे आकाश झाकोळून जावे तसे. त्यांचा हा महान पराक्रम पाहून देव त्यांच्यावर फुलांचा वर्षाव करू लागले आणि वाद्ये वाजवून स्तुती करू लागले. ज्या दिवशी धेनुकासुर मेला, त्या दिवसापासून लोक निर्भय होऊन त्या वनातील ताडफळे खाऊ लागले आणि जनावरे स्वच्छंदपणे चरू लागली. (३३-४०)

त्यानंतर ज्यांचे श्रवण-कीर्तन पुण्यकारक आहे, असे कमलदलाप्रमाणे डोळे असलेले श्रीकृष्ण ज्येष्ठ बंधू बलरामांसह व्रजामध्ये आले. त्यावेळी त्यांचे साथीदार त्यांच्याबरोबर त्यांची स्तुती करीत निघाले होते. त्यावेळी श्रीकृष्णांच्या कुरळ्या केसांवर गाईंच्या खुरांनी उडालेली धूळ पसरली होती, मस्तकावर मोरपंखांचा मुगुट होता आणि केसांमध्ये जंगली रानफुले घातलेली होती. त्यांचे पाहणे आकर्षक असून चेहऱ्यावर मनोहर स्मितहास्य होते. ते बासरी वाजवीत होते आणि त्यांचे सवंगडी त्यांची कीर्ती गात होते. बासरीचा आवाज ऐकून गोपी एकाच वेळी घरांतून बाहेर आल्या. केव्हापासून त्यांचे डोळे श्रीकृष्णांच्या दर्शनासाठी आतुर झाले होते. (४१-४२)

गोपींनी, नेत्ररूप भ्रमरांनी भगवंतांच्या मुखारविंदाच्या मधाचे पान करून दिवसभराच्या विरहाची आग शांत केली; आणि भगवंतांनी सुद्धा त्यांचे लज्जायुक्त हास्य आणि विनययुक्त नेत्रकटाक्षांनी केलेला सत्कार स्वीकारून व्रजामध्ये प्रवेश केला. त्यावेळी प्रेमळ यशोदा आणि रोहिणी यांनी त्यांना त्यावेळी देण्याजोग्या वस्तू हव्या तेवढ्या दिल्या. नंतर तेल-उटणे लावून त्यांना स्नान घातले. त्यामुळे त्यांचा दिवसभरातील हिंडण्या-फिरण्याने आलेला शीण नाहीसा झाला. नंतर त्यांना सुंदर

कपडे घालून, गंध लावून सुगंधी फुलांच्या माळा घातल्या. त्यानंतर दोघेही मातांनी वाढलेले स्वादिष्ट अन्न जेवले. त्यापाठोपाठ लडिवाळपणे त्यांना थोपटून आईनी सुंदर अंथरुणावर झोपविले. तेव्हा ते आरामात झोपी गेले. (४३-४६)

हे राजा ! अशा प्रकारे वृंदावनात राहात असता एके दिवशी श्रीकृष्ण बलरामाखेरीज इतर मित्रांना बरोबर घेऊन यमुनेवर गेले. त्यावेळी उन्हाळ्यातील उन्हाने गाई आणि गोपाल तहानेने व्याकूळ झाल्यामुळे यमुना नदीचे विषारी पाणी प्याले. परीक्षिता ! दैववशात लक्षात न आल्यामुळे ते विषारी पाणी पिताच सर्व गाई आणि गोपाळ निश्चेष्ट होऊन यमुनेच्या काठीच पडले. त्यांना त्या अवस्थेत पाहून योगेश्वरांचेसुद्धा ईश्वर असणाऱ्या श्रीकृष्णांनी आपल्या अमृतवर्षाव करणाऱ्या दृष्टीने त्यांना जिवंत केले. कारण त्यांचे रक्षणकर्ते श्रीकृष्णच होते ना ! तेव्हा शुद्धीवर आल्यावर ते सर्वजण पाण्याजवळच उठून उभे राहिले आणि आश्चर्यचकित होऊन एकमेकांकडे पाहू लागले. राजा ! विषारी पाणी प्याल्यामुळे मरूनही श्रीकृष्णांच्या कृपादृष्टीनेच आपला पुनर्जन्म झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. (४७-५२)

अध्याय पंधरावा समाप्त

अध्याय सोळावा

कालियावर कृपा

श्रीशुक म्हणतात- भगवान श्रीकृष्णांनी पाहिले की, कालिया नागाने यमुनेचे पाणी विषारी केले आहे. तेव्हा ते शुद्ध करण्यासाठी त्यांनी त्या सापाला तेथून दूर पाठविले. (१)

राजाने विचारले- ब्रह्मन ! यमुनेच्या खोल पाण्यात भगवान श्रीकृष्णांनी त्या सर्पाचे दमन कसे केले ? शिवाय तो जलचर नसूनही पुष्कळ काळ पाण्यात का आणि कसा राहिला, ते सांगावे. हे महात्मन ! स्वेच्छेनुसार वागणाऱ्या अनंत भगवानांनी गोपालरूपाने ज्या दिव्य लीला केल्या, त्या लीलामृताच्या सेवनाने कोण बरे तृप्त होऊ शकेल ? (२-३)

श्रीशुक म्हणाले- यमुना नदीत कालिया नागाचा एक डोह होता. त्यातील पाणी विषाच्या उष्णतेने उकळत असे. एवढेच काय, त्याच्यावरून उडणारे पक्षीसुद्धा होरपळून त्यामध्ये पडत असत. त्या विषारी पाण्याच्या लाटांवरून त्यातील लहान लहान तुषार घेऊन वाहाणारा वारा जेव्हा बाहेर येई, तेव्हा त्याच्या स्पर्शाने काठावरील झाडे व प्राणी मरून जात. भगवंतांचा अवतार दुष्टांचे दमन करण्यासाठीच होता. त्यांनी पाहिले की, विषाचा वेग प्रचंड असून तेच त्याचे बलस्थान आहे; तसेच त्यामुळेच यमुना दूषित झाली आहे. तेव्हा श्रीकृष्णांनी कमरेचा शेला घट्ट बांधून ते एका अतिशय उंच अशा कदंबाच्या वृक्षावर चढले आणि दंड थोपटून तेथून विषारी पाण्यात त्यांनी उडी मारली. सापाच्या विषामुळे यमुनेचे पाणी पहिल्यापासूनच उकळत होते. त्यावर लाल-पिवळ्या रंगांच्या अत्यंत भयंकर अशा लाटा उसळत होत्या. भगवंतांनी उडी मारल्याने ते पाणी आणखीच उसळले . त्यावेळी ते पाणी इकडे तिकडे चारशे हात पसरले. अनंत बलशाली, भगवंतांच्या बाबतीत यात आश्चर्य कसले ? (४-७)

परीक्षिता ! डोहात उडी मारून श्रीकृष्ण बलवान हत्तीप्रमाणे पोहू लागले. त्यावेळच्या त्यांच्या हाताच्या आपटण्याने पाण्यात मोठा आवाज होऊ लागला. कालिया नागाने तो आवाज ऐकला आणि आपल्या

निवासस्थानावर कोणीतरी आक्रमण केले आहे, हे पाहून ते सहन न झाल्यामुळे तो श्रीकृष्णांच्या समोर आला. त्याने पाहिले की, समोरच एक मेघाप्रमाणे सावळा सुंदर कुमार आहे. त्याच्या वक्षःस्थळावर श्रीवत्स चिह्न आहे. त्याने पीतांबर परिधान केला आहे. त्याच्या मनोहर चेहऱ्यावर मंद हास्य झळकत आहे. त्याचे पाय कमळाच्या गाभ्यासारखे कोमल आहेत. इतके असूनही तो येथे निर्भयपणे खेळत आहे. तेव्हा त्याने क्रोधाने श्रीकृष्णांच्या मर्मस्थानी दंश करून त्यांना आपल्या शरीराने वेढून टाकले. नागाने वेढलेले श्रीकृष्ण काहीच हालचाल करीत नसलेले पाहून त्यांचे प्रिय सखे गोपाळ अत्यंत दुःखी झाले. कारण त्यांनी आपले शरीर, सुहृद, धन, संपत्ती, स्त्री, पुत्र, इच्छा इत्यादी सर्व काही श्रीकृष्णांनाच समर्पित केले होते. त्यामुळे दुःख, शोक आणि भीतीने मूर्च्छित होऊन ते जमिनीवर पडले. गाई, बैल, वासरे अतिशय दुःखी होऊन हंबरडा फोडू लागली. भयभीत होऊन जणू काही रडत श्रीकृष्णांकडे ती एकटक पाहात राहिली. (८-११)

इकडे व्रजात पृथ्वी, आकाश आणि शरीर या तिन्हींमध्ये अतिशय भयंकर असे अपशकुन होऊ लागले. लवकरच एखादी अशुभ घटना घडणार असल्याचे ते सूचक होते. नंद इत्यादी गोपांनी ते अपशकुन पाहिले आणि बलरामाखेरीज श्रीकृष्ण गाई चारण्यासाठी गेला आहे, हे कळताच ते भीतीने व्याकूळ झाले. ते भगवंतांचा प्रभाव जाणत नव्हते; म्हणून ते अपशकुन पाहून त्यांच्या मनात आले की, श्रीकृष्णावर मरणप्राय संकट ओढवणार असे दिसते. या विचाराने ते त्याच क्षणी दुःख, शोक आणि भयाने ग्रस्त झाले. कारण श्रीकृष्णच त्यांचे प्राण, मन होते ना ! राजा ! व्रजातील मुले, वृद्ध आणि स्त्रिया यांचे कृष्णांवर गाईंसारखेच अतिशय प्रेम होते. त्यामुळे ते घाबरून कृष्णाला पाहाण्याच्या उत्कट लालसेने गोकुळातून बाहेर पडले. भगवान कृष्णाचे दुसरे रूप असे बलराम ते लोक इतके व्याकूळ झाल्याचे पाहून हसू लागले. परंतु काही बोलले नाहीत. कारण त्यांना धाकट्या भावाचा प्रभाव माहीत होता. ते प्रिय श्रीकृष्णाला शोधू लागले. वाटेतच त्यांना भगवंतांची चरणचिह्ने दिसली. त्या वाटेने यमुनेच्या तीरावर ते जाऊ लागले. (१२-१७)

परीक्षिता ! वाटेमध्ये गाई आणि इतरांच्या पावलांच्या ठशांव्यतिरिक्त अधून-मधून भगवंतांची चरणचिन्हेसुद्धा दिसत होती. त्यावर कमल, जव, अंकुश, वज्र आणि ध्वजाची चिह्ने दिसत होती. ती पाहाताच ते लगबगीने चालू लागले. त्यांनी लांबूनच पाहिले की, डोहात कालिया नागाच्या विळख्यात बांधले गेलेले श्रीकृष्ण निश्चेष्ट असून तीरावर गोपाळ किंकर्तव्यमूढ अवस्थेत पडलेले आहेत आणि गुरे आर्तस्वराने हंबरडा फोडीत आहेत. हे पाहून ते सर्व गोप अत्यंत व्याकूळ होऊन मूर्च्छित झाले. गोपींचे मन अनंत गुणांनी युक्त अशा भगवान श्रीकृष्णांच्या प्रेमरंगात रंगले होते. त्या नित्य भगवंतांचे प्रेम, स्मितहास्य, नेत्रकटाक्ष तसेच गोड वाणी यांचेच स्मरण करीत. त्यांनी जेव्हा पाहिले की, आपल्या प्रियतमाला नागाने विळखा घातला आहे, तेव्हा त्या अत्यंत दुःखाने करपून गेल्या. आपल्या प्रियतमाखेरीज त्यांना तिन्ही लोक भकास वाटू लागले. आपल्या लाडक्याच्या पाठोपाठ डोहात उडी मारावयास निघालेल्या यशोदेला गोपींनी कसेबसे धरून ठेवले. त्यांच्याही नेत्रांतून दुःखाने अश्रुधारा वाहात होत्या. सर्वांच्या नजरा श्रीकृष्णांच्या मुखाकडेच लागल्या होत्या. काहीजणी व्रजमोहन श्रीकृष्णांच्या कथा एकमेकींना सांगत परस्परांना धीर देत होत्या. काहीजणी तर मृतवत पडलेल्या होत्या. श्रीकृष्णच जीव की प्राण असणारे नंदादी गोप डोहात घुसू लागले, हे पाहून श्रीकृष्णांचा

प्रभाव जाणणाऱ्या भगवान बलरामांनी त्यांना थोपवून धरले. (१८-२२)

आपल्याशिवाय अन्य गती नसलेले व्रजातील सगळे लोक, स्त्रिया, मुले आणि गुरे आपल्यासाठी इतकी दु:खी झालेली आहेत, हे पाहून मानवी लीला करणारे भगवान थोडा वेळ सापाच्या विळख्यात राहून मग बाहेर आले. त्यावेळी त्यांनी आपले शरीर फुगविल्यामुळे सापाला वेदना होऊ लागल्या. तो वेटोळे सोडून क्रोधाने फणा उभारून फूत्कार सोडू लागला. तो त्यांच्याकडे टक लावून पाहू लागला. त्यावेळी त्याच्या नाकातून विषारी श्वास बाहेर पडत होता. त्याचे डोळे इतके लाल झाले होते की, जणू भट्टीवर तापविलेले खापरच ! त्याच्या तोंडातूनही आगीच्या ज्वाळा बाहेर पडत होत्या. त्यावेळी कालिया आपली दुभंगलेली जीभ फिरवून आपल्या दोन्ही ओठांचे कोपरे चाटीत होता आणि भयानक डोळ्यांनी विषाग्नीच्या ज्वाळा बाहेर टाकीत होता. गरुडाप्रमाणे श्रीकृष्ण त्याच्याबरोबर खेळत पवित्रे बदलू लागले, आणि तो सापसुद्धा दंश करण्यासाठी योग्य संधीची वाट पाहात पवित्रे बदलू लागला. अशा प्रकारे इकडे, तिकडे, मान फिरवून त्याची शक्ती क्षीण झाली. तेव्हा श्रीकृष्णांनी त्याचा उंच फणा वाकवून उडी मारून त्यावर ते स्वार झाले. नागाच्या मस्तकावर असणाऱ्या लाल मण्यांमुळे भगवंतांच्या सुकुमार पावलांची लाली अधिकच वाढली. सर्व कलांचे आद्य गुरू श्रीकृष्ण आता त्याच्या मस्तकावर सुंदर नृत्य करू लागले. भगवान नृत्य करणार असे पाहून त्यांचे प्रिय भक्त गंधर्व, सिद्ध, देव, चारण आणि देवांगना मोठ्या प्रेमाने मृदंग, ढोल, नगारे इत्यादी वाद्ये वाजवीत, सुंदर सुंदर गीते गात, पुष्पवर्षाव करीत भेटवस्तू घेऊन स्तुती करीत भगवंतांकडे आले. परीक्षिता ! कालिया नागाला एकशे एक फणा होत्या. तो आपली जी जी फणा वाकवीत नसे, ती ती, कठोर शासन करणारे भगवान आपल्या पायाने खाली दाबीत. यामुळे कालिया नागाची शक्ती क्षीण होऊ लागली. तो नाकातोंडातून भयंकर रक्त ओकू लागला. शेवटी त्याला चक्कर आल्याने तो बेहोश झाला. तो डोळ्यांतून विष बाहेर फेकू लागे आणि क्रोधामुळे जोरजोरात फूत्कार टाकीत जी जी फणा वर उचलीत असे, तिच्यावर नृत्य करीत श्रीकृष्ण आपल्या लाथेने वाकवून ती तुडवीत. त्यावेळी त्या पुराण पुरुषाच्या पायांवर जे रक्ताचे थेंब पडत, ते पाहून असे वाटत असे की, जणू काही लाल फुलांनी त्यांची पूजा केली जात आहे. राजा ! भगवंतांच्या या अद्भुत तांडवनृत्यामुळे कालियाचे फणारूपी छत्र छिन्नविच्छिन्न झाले. त्याचे अंग खिळखिळे झाले आणि तोंडातून रक्ताची उलटी होऊ लागली. आता त्याला सर्व जगाचे गुरू असणाऱ्या पुराणपुरुष नारायणांचे स्मरण झाले आणि तो मनोमन त्यांना शरण गेला. उदरामध्ये संपूर्ण विश्व धारण करणाऱ्या श्रीकृष्णांच्या वजनाने कालिया गलितगात्र झाला. त्यांच्या टाचेने केलेल्या आघातांमुळे त्याचे छत्रासारखे फणे छिन्नविच्छिन्न झाले. आपल्या पतीची ही अवस्था पाहून त्याच्या भयभीत पत्न्या भगवंतांना शरण गेल्या. भीतीने यावेळी त्यांची वस्त्रे, अलंकार अस्ताव्यस्त झाले होते आणि केसांच्या वेण्या विसकटल्या होत्या. त्यावेळी त्या साध्वी नागपत्न्या अतिशय घाबरल्यामुळे आपल्या मुलांना पुढे करीत लोटांगण घालून, हात जोडून त्यांनी चराचराचे स्वामी अशा श्रीकृष्णांना प्रणाम केला आणि आपल्या अपराधी पतीला सोडविण्याच्या इच्छेने त्या शरणागतवत्सल अशा त्यांना शरण गेल्या. (२३-३२)

नागपत्न्या म्हणाल्या- प्रभो ! दुष्टांना दंड देण्यासाठीच आपला अवतार झाला आहे; म्हणून या अपराध्याला दंड देणेच योग्य आहे. आपल्या दृष्टीने शत्रू आणि पुत्र समानच असतात. म्हणून

आपण ज्याला दंड देता, तो त्याच्या कल्याणासाठीच असतो. आपण आमच्यावर ही मोठीच कृपा केली आहे; कारण आपण दुष्टांना जो दंड देता, त्यामुळे त्याची सर्व पापे नाहीशी होतात. हा प्राणी अपराधी आहे, म्हणूनच याला ही सर्पयोनी मिळाली. म्हणून आम्ही आपल्या या क्रोधालासुद्धा आपला अनुग्रहच समजतो. मागील जन्मात याने निश्चितच (स्वत:) मानरहित होऊन आणि दुसऱ्यांचा सन्मान करीत मोठी तपश्चर्या केली असावी किंवा सर्व जीवांवर दया करण्याचा मोठा धर्म केला असावा. म्हणूनच तर सर्व जीवस्वरूप आपण याच्यावर संतुष्ट झाला आहात. भगवन ! हा आपल्या चरणकमलांच्या धुळीचा स्पर्श होण्याचा अधिकारी झाला, हे त्याच्या कोणत्या साधनेचे फळ आहे, हे आम्हांला माहीत नाही. यासाठी लक्ष्मीदेवीलासुद्धा पुष्कळ दिवसपर्यंत भोगांचा त्याग करून नियमांचे पालन करीत तपश्चर्या करावी लागली होती. प्रभो ! जे आपल्या चरणरजाला शरण जातात, ते भक्तजन स्वर्गाचे राज्य किंवा पृथ्वीचे सार्वभौमत्व इच्छित नाहीत, ब्रह्मपद इच्छित नाहीत की त्यांना रसातळाचे राज्य नको असते. त्यांना अणिमादि योगसिद्धींची अभिलाषा असत नाही की मोक्षाची इच्छा असत नाही. स्वामी ! हा नागराज तमोगुणी योनीमध्ये जन्मला असून अत्यंत क्रोधी आहे. असे असूनही इतरांना सर्वथैव दुर्लभ असणारे चरणरज याला प्राप्त झाले आहे. जे प्राप्त करण्याच्या केवळ इच्छेनेही संसारचक्रात पडलेल्या जीवाला साक्षात वैभवाची प्राप्ती होते. (३३-३८)

प्रभो ! आम्ही आपणास प्रणाम करीत आहोत. आपण अनंत ऐश्वर्याचा ठेवा आहात. आपण सर्वांच्या ठिकाणी विराजमान असूनही अमर्याद आहात. आपण सर्व प्राणी आणि पदार्थांचे आश्रय तसेच सर्व पदार्थांच्या रूपांमध्येसुद्धा विराजमान आहात. आपण प्रकृतीच्या पलीकडील परमात्मा आहात. आपण ज्ञान -विज्ञानाचा खजिना आहात. आपली शक्ती अनंत आहे. आपले स्वरूप अप्राकृत, विकाररहित व निर्गुण आहे. आम्ही आपणांस नमस्कार करीत आहोत. आपण प्रकृतीमध्ये क्षोभ उत्पन्न करणारे काल आहात. कालशक्तीचे आश्रय आहात आणि कालाच्या क्षण, कल्प इत्यादी सर्व अवयवांचे साक्षी आहात. आपण विश्वरूप असूनही त्यापासून वेगळे असे त्याचे द्रष्टे आहात. आपण ते (विश्व) बनविणारे निमित्तकारण व त्याच्या रूपात बनणारे उपादानकारणसुद्धा आहात. प्रभो ! पंचमहाभूते, त्यांच्या तन्मात्रा, इंद्रिये, प्राण, मन, बुद्धी आणि चित्त आपणच आहात. तिन्ही गुण आणि त्यांच्या कार्यरूप अभिमानाच्या योगाने आपण आपल्या साक्षात्काराला झाकून ठेवले आहे. आपण अनंत, सूक्ष्म, विकाररहित आणि सर्वज्ञ आहात. शास्त्रांच्या मतभेदांनुसार आपण तसतसे होत असता. शब्द व अर्थ यांचा संबंध जोडणारी शक्ती आपणच आहात. आम्ही आपणांस नमस्कार करीत आहोत. प्रत्यक्ष, अनुमान इत्यादी जितकी म्हणून प्रमाणे आहेत, त्या प्रमाणांचे मूळ आपणच आहात. आपण सर्वज्ञ असून सर्व शास्त्रे आपल्यापासूनच निघाली आहेत. प्रवृत्तिमार्ग आणि निवृत्तिमार्ग व या दोघांचे मूळ वेदसुद्धा आपणच आहात. आम्ही आपणांस वारंवार नमस्कार करीत आहोत. आपण वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न आणि अनिरुद्ध या चतुर्व्यूहाच्या रूपामध्ये असलेले भक्तांचे व यादवांचे स्वामी श्रीकृष्ण आहात. आम्ही आपणांस नमस्कार करीत आहोत. आपण त्रिगुणांचे प्रकाशक असून त्यांच्याद्वारा स्वत:ला झाकूनही ठेवता. गुणवृत्तींमुळेच आपले थोडेसे ज्ञान होते. आपण ते गुण आणि त्यांच्या वृत्तींचे साक्षी असून स्वयंप्रकाश आहात. आम्ही आपणांस नमस्कार करीत आहोत. आपण मूळ प्रकृतीमध्ये विहार करीत असता. सर्व जग आपल्यापासूनच प्रगट होते. हे हृषीकेशा ! मौन हा स्वभाव असलेले आपण मुनी आहात. आपणांस आमचा नमस्कार असो ! आपण स्थूल,

सूक्ष्म अशा सर्व गतींना जाणणारे तसेच सर्वांचे साक्षी आहात. आपण नामरूपात्मक विश्व नसून अधिष्ठानदृष्ट्या विश्वरूपसुद्धा आहात. आपण विश्वाचे साक्षी व त्याचे कारणही आहात. आपल्याला आमचा नमस्कार असो. (३९-४८)

प्रभो ! आपण स्वत: कर्म करीत नाही, तरीसुद्धा कालशक्ती व प्रकृतीच्या गुणांच्या द्वारा आपण या विश्वाची उत्पत्ती, स्थिती आणि प्रलय करता; आपण सत्यसंकल्प आहात; आपण जीवांच्या संस्काररूपात असलेल्या स्वभावांना आपल्या दृष्टिक्षेपाने जागृत करून विश्वाची लीला करता. त्रैलोक्यामधील सत्त्वगुणी, रजोगुणी आणि तमोगुणी प्राणी या आपल्याच लीलामूर्ती आहेत. तरीसुद्धा यावेळी आपल्याला सत्त्वगुणी जनच प्रिय आहेत. कारण आपला हा अवतार आणि या लीला साधुजनांचे पालन तसेच धर्माचे रक्षण आणि विस्तार यासाठीच आहे. हे शांतस्वरूपा ! स्वामींनी प्रथमच केलेला आपल्या प्रजेचा अपराध सहन करावा. हा अज्ञानी असून आपल्याला ओळखत नाही. म्हणून आपण याला क्षमा करावी. भगवन ! कृपा करा. आता हा सर्प मरणाच्या दारी आहे. साधुपुरुष अबलांवर दया करीत असतात. म्हणून आपण आमच्या प्राणस्वरूप पतिदेवांना, आम्हांला परत द्या. आम्ही आपल्या दासी आहोत. आम्ही काय करावे याविषयी आपण आम्हांला आज्ञा करावी. कारण जो श्रद्धेने आपल्या आज्ञांचे पालन करतो, त्याची सर्व प्रकारच्या भयांपासून सुटका होते. (४९-५३)

श्रीशुक म्हणतात- भगवंतांनी केलेल्या लत्ताप्रहारांनी फणा घायाळ होऊन तो नाग बेशुद्ध झाला होता. नागपत्न्यांनी अशी स्तुती केली, तेव्हा त्यांनी त्याला दयाबुद्धीने सोडून दिले. कालियाची इंद्रिये आणि प्राण यांमध्ये हळू हळू चेतना आली. अतिशय कष्टाने तो श्वासोच्छ्वास करू लागला आणि थोड्या वेळानंतर अतिशय दीनतेने हात जोडून तो श्रीकृष्णांना म्हणाला. (५४-५५)

कालिया म्हणाला- नाथ ! आम्ही जन्मत:च दुष्ट, तमोगुणी आणि दीर्घद्वेषी आहोत. आपला स्वभाव सोडणे जीवांना अतिशय कठीण आहे; म्हणूनच तर लोकांना मिथ्या प्रपंचाविषयी (जन्मांतरीच्या स्वभावामुळे) आसक्ती वाटते. हे विश्वविधात्या ! आपणच गुणांच्या भेदांनुसार या जगात अनेक प्रकारचे स्वभाव, सामर्थ्य, बल, योनी, बीज, चित्त आणि आकृती निर्माण केल्या आहेत. भगवन ! आपल्याच सृष्टीमधील जन्मत:च अतिशय रागीट असे आम्ही सर्प आहोत. आपल्या त्याग करण्यास कठीण अशा मायेने मोहित झालेले आम्ही स्वप्रयत्नांनी या मायेचा त्याग कसा करू शकू ? सर्वज्ञ आणि संपूर्ण जगाचे स्वामी असे आपणच या सर्वाला कारणीभूत आहात. म्हणून आता आपण आपल्याला योग्य वाटेल, त्याप्रमाणे कृपा करा किंवा दंड द्या. (५६-५९)

श्रीशुक म्हणतात- कालिया नागाची प्रार्थना ऐकून कार्यासाठी मनुष्य झालेले भगवान म्हणाले, "सर्पा ! आता तू इथे राहू नकोस. तू आपले नातलग, पुत्र आणि स्त्रियांसह ताबडतोब येथून समुद्रात निघून जा. आता गाई आणि माणसे यमुनेच्या पाण्याचा उपभोग घेऊ देत." तुला दिलेल्या माझ्या या आज्ञेचे जो मनुष्य दोन्ही वेळेला स्मरण आणि पठण करील, त्याला सर्पांपासून कधीही भय असणार नाही. जो मनुष्य या माझ्या क्रीडास्थानात स्नान करून पाण्याने देव आणि पितरांचे तर्पण करील, तसेच उपवास करून माझे स्मरण करीत माझी पूजा करील, तो सर्व पापांपासून मुक्त होईल. ज्याच्या भीतीने रमणक द्वीप सोडून तू या डोहामध्ये येऊन राहिला आहेस, तो गरुड आता तुझे शरीर माझ्या चरणचिह्नांनी अंकित झालेले पाहून तुला खाणार नाही. (६०-६३)

श्रीशुक म्हणतात- अद्भुत लीला करणाऱ्या भगवान श्रीकृष्णांनी अशी आज्ञा केली, तेव्हा कालिया नाग आणि त्याच्या पत्न्यांनी अतिशय आनंदाने व मोठ्या आदराने त्यांची पूजा केली. (६४)

त्यांनी दिव्य वस्त्र, पुष्पमाळा, रत्ने, बहुमूल्य अलंकार, दिव्य गंध, उटणे आणि अति उत्तम कमळपुष्पांच्या हाराने, जगताचे स्वामी असलेल्या गरुडध्वज भगवंतांचे पूजन करून त्यांना प्रसन्न केले. यानंतर अतिशय प्रेमाने त्यांना प्रदक्षिणा घातली, वंदन केले आणि त्यांची अनुमती घेतली. त्यानंतर समुद्रात सर्पांना राहाण्याचे जे एक ठिकाण आहे, त्या रमणक द्वीपाकडे त्याने आपल्या पत्न्या, पुत्र आणि बांधवांसह, प्रयाण केले. लीलामनुष्य भगवान श्रीकृष्णांच्या कृपेने त्याच वेळी यमुनेचे पाणी केवळ विषरहितच नव्हे तर अमृताप्रमाणे मधुर झाले. (६५ - ६७)

अध्याय सोळावा समाप्त

अध्याय सतरावा

कालियाची कथा आणि गोपांचा दावानलापासून बचाव

राजाने विचारले- नागांचे निवासस्थान रमणक-द्वीप कालिया नागाने का सोडले होते ? आणि त्याने एकट्यानेच गरुडाचा असा कोणता अपराध केला होता ? (१)

श्रीशुक म्हणाले- परीक्षिता ! पूर्वी गरुडाच्या आहारासाठी जाणे आवश्यक असणाऱ्या सर्पांनी असा नियम केला होता की, दरमहा ठराविक वृक्षाखाली गरुडाला एक साप भेट म्हणून द्यायचा. या नियमानुसार प्रत्येक अमावास्येला, आपल्या रक्षणासाठी म्हणून सगळे साप शक्तिशाली गरुडाला आपापला भाग देत असत. त्या सर्पांपैकी कद्रूचा पुत्र कालिया नाग आपले विष आणि बळ यांच्या घमेंडीत उन्मत्त झाला होता. गरुडाला तुच्छ मानून स्वत: बळी देणे सोडून उलट गरुडाला दिलेला बळीच तो खात असे.

परीक्षिता ! हे ऐकून भगवंतांचा प्रिय पार्षद असलेल्या शक्तिशाली गरुडाला अतिशय क्रोध आला; म्हणून त्याने कालियाला मारून टाकण्यासाठी अत्यंत वेगाने त्याच्यावर आक्रमण केले. विषारी कालियाने पाहिले की, अत्यंत वेगाने गरुड आपल्यावर आक्रमण करण्यासाठी येत आहे, तेव्हा अनेक फणा उभारून तो त्याच्यावर तुटून पडला. विषारी दात हेच त्याचे शस्त्र होते, म्हणून दातांनी तो त्याला डसला. त्यावेळी तो भयानक जिभा हालवीत होता, दीर्घ फूत्कार टाकीत होता आणि त्याचे डोळे अतिशय भयानक दिसत होते. भगवंतांचे वाहन असणाऱ्या प्रचंड वेगवान गरुडाने क्रोधाने त्याला झटकून टाकले आणि अत्यंत पराक्रमी अशा त्याने डाव्या सोनेरी पंखाने कालिया नागाला तडाखा दिला. त्याच्या पंखाच्या प्रहाराने कालिया अत्यंत घायाळ झाला. आणि तेथून निघून यमुनेच्या खोल असल्यामुळे जाण्यास कठीण अशा या डोहात आला. एके दिवशी भुकेलेल्या गरुडाने तपस्वी सौभरींनी मनाई करूनही आपले इच्छित भक्ष्य असणाऱ्या माशाला बळजबरीने पकडून खाल्ले. मत्स्यराज मारला गेल्याने बिचारे मासे अतिशय दु:खी झाले. ते पाहून सौभरींना त्यांची दया आली. त्यांनी या डोहात राहाणाऱ्या सर्व जीवांच्या हितासाठी गरुडाला हा शाप दिला. "गरुड जर या डोहात येऊन माशांना खाईल तर त्याच क्षणी तो प्राणाला मुकेल. हे माझे म्हणणे खरे असेल." हे कालियाखेरीज इतर कोणत्याही सापाला माहीत नव्हते. म्हणून गरुडाच्या भीतीने तो तेथे राहू लागला होता. आणि आता श्रीकृष्णांनी त्याला तेथून घालवून दिले. (२-१२)

नंतर श्रीकृष्ण दिव्य माळा, गंध, वस्त्रे, महामूल्य रत्ने आणि सुवर्णमय अलंकारांनी विभूषित होऊन त्या डोहाच्या बाहेर आले. जसे प्राण परत आल्यानंतर

इंद्रिये सचेतन होतात, त्याप्रमाणे त्यांना पाहून सर्व गोप-गोपी उठून उभे राहिले. त्यांची हृदये आनंदाने भरून आली. अतिशय प्रेमाने ते कृष्णाला आलिंगन देऊ लागले. परीक्षिता ! श्रीकृष्णांना भेटून यशोदा, रोहिणी, नंद, गोपी आणि गोप यांच्या जिवात जीव आला. त्यांचे मनोरथ सफल झाले. बलरामाला भगवंतांचा प्रभाव माहीत होता. श्रीकृष्णांना हृदयाशी धरून तो हसू लागला. पर्वत, वृक्ष, गायी, बैल, वासरे अशा सगळ्यांनाच खूप आनंद झाला. गोपांच्या कुलगुरू ब्राह्मणांनी पत्नींसह नंदाकडे येऊन म्हटले ''कालियाच्या तावडीतून सुटून तुझा मुलगा परत आला, ही मोठीच भाग्याची गोष्ट आहे ! श्रीकृष्णाच्या सुटकेच्या निमित्ताने तू ब्राह्मणांना दान दे.'' राजा ! ब्राह्मणांचे म्हणणे ऐकून नंदांनी प्रसन्न मनाने पुष्कळ सोने आणि गाई ब्राह्मणांना दान केल्या. भाग्यवती यशोदासुद्धा काळाच्या जबड्यातून परत आलेल्या मुलाला मांडीवर घेऊन, हृदयाशी कवटाळून वारंवार आसवे ढाळू लागली. (१३-१९)

हे राजेंद्रा ! व्रजवासी लोक आणि गुरे त्यादिवशी अतिशय थकली होती. शिवाय त्यांना तहान-भूकही लागली होती. म्हणून त्या रात्री ते यमुनातीरावर झोपले. उन्हाळ्याचे दिवस होते, त्यामुळे तेथील वनाला वणवा लागला. त्या आगीने झोपलेल्या व्रजवासीयांना मध्यरात्री चारी बाजूंनी वेढून घेतले आणि ती आग त्यांना जाळण्यासाठी येऊ लागली. आगीची आच लागल्यामुळे व्रजवासी उठून घाबरून लीलामनुष्य भगवान श्रीकृष्णांना शरण गेले. ते म्हणाले, ''हे थोर श्रीकृष्णा ! हे अतिशय पराक्रमी बलरामा ! पहा ! पहा ! ही भयंकर आग तुमच्याच असलेल्या आम्हांला जाळू पाहात आहे. हे प्रभो ! आम्ही तुमचेच आहोत. म्हणून या भयंकर काळरूप आगीपासून आम्हांला वाचवा. तुमचे सर्वत्र अभय देणारे चरणकमल आम्ही नाही सोडू शकत.'' अनंत व अनंत शक्तींना धारण करणाऱ्या जगदीश्वराने स्वजन अशा प्रकारे व्याकूळ झालेले पाहून ती भयंकर आग पिऊन टाकली. (२०-२५)

अध्याय सतरावा समाप्त

अध्याय अठरावा

प्रलंबासुर-उद्धार

श्रीशुक म्हणतात- नंतर आनंदित झालेल्या स्वजनांसह त्यांच्या तोंडून आपल्या कीर्तीचे गोडवे ऐकत, श्रीकृष्णांनी गाईगुरांनी शोभणाऱ्या व्रजात प्रवेश केला. अशा प्रकारे योगमायेने गोपाळ झालेले राम-कृष्ण व्रजामध्ये लीला करीत होते. असाच एकदा ऐन उन्हाळा होता. प्राण्यांना हा तसा विशेष आवडत नाही. परंतु वृंदावनातील स्वाभाविक गुणांमुळे तेथे वसंत ऋतूच वाटत होता. कारण तेथे भगवान श्रीकृष्ण आणि बलराम निवास करीत होते ना ! तेथे रातकिड्यांचा कर्कश आवाज, झऱ्यांच्या खळखळाटामध्ये झाकला गेला होता. त्या निर्झरांतून सदैव पाण्याचे तुषार उडत असत. त्यामुळे ते वन हिरव्यागार वनराईने शोभिवंत झाले होते. (१-४)

नदी, सरोवरे व झऱ्यांच्या लाटांना स्पर्श करून जो वारा वाहात होता, त्यात पांढऱ्या, लाल, निळ्या कमळांचे पराग मिसळत होते. त्यामुळे हिरवळीने भरलेल्या त्या वनात राहाणाऱ्या लोकांना वणवा किंवा सूर्य यांच्या उष्णतेचा मुळीच त्रास नव्हता. नदीमध्ये भरपूर पाणी असे. तिच्या लाटा तटांवर येऊन थडकत. त्यामुळे आसपासच्या जमिनी ओलसर

राहात आणि सूर्याचे विषासारखे प्रखर किरण सुद्धा तेथील जमिनी आणि हिरवेगार गवत सुकवू शकत नसत. त्या वनामध्ये फुले विपुल असल्याने तेथे सौंदर्य ओसंडत होते. कुठे रंगीबेरंगी पक्षी किलबिलाट करीत, तर कुठे हरिणे चीत्कार करीत. कुठे मोर केकारव करीत, तर कुठे भ्रमर गुंजारव करीत. कुठे कोकिळा कुहू कुहू गात तर कुठे सारस पक्षी कूजन करीत. त्या वनात श्रीकृष्ण आणि बलराम यांनी क्रीडा करण्याचे ठरविले. म्हणून गोधन घेऊन बासरी वाजवीत ते त्या वनात शिरले. (५-८)

राम, कृष्ण इत्यादी गोपाळ कोवळी पाने, मोरपिसांचे गुच्छ, फुलांचे हार आणि गेरूसारखे रंग लावून सजले. नंतर कोणी नाचू लागले, कोणी कुस्ती खेळू लागले आणि काहीजण गाऊ लागले. ज्यावेळी श्रीकृष्ण नाचू लागत, त्यावेळी काहीजण गाऊ लागत तर काहीजण बासरी व शिंगे वाजवू लागत. काहीजण हातांनीच ताल धरीत, तर काहीजण "वाहवा, वाहवा !" म्हणत. परीक्षिता ! त्यावेळी नट जसे नायकाची प्रशंसा करतात, त्याप्रमाणे देव गोपांचे रूप धारण करून तेथे येत आणि गोप-जातीमध्ये जन्म घेऊन लपून राहिलेल्या बलराम व श्रीकृष्णांची स्तुती करू लागत. झुलपे असणारे श्रीकृष्ण आणि बलराम कधी एकमेकांचे हात धरून गोल गोल फिरत, कधी उंच उड्या मारत, कधी पैज लावून ढेकळे फेकीत, कधी दंड थोपटत, कधी गट करून एकमेकांना ओढीत, कधी एकमेकांशी कुस्ती खेळत. अशा प्रकारे निरनिराळ्या तऱ्हेचे खेळ खेळत. हे राजा ! कधी कधी जेव्हा इतर गोपाळ नाचू लागत, तेव्हा स्वतः राम-कृष्ण गात किंवा वाजवीत किंवा "शाबास, शाबास !" म्हणून त्यांची प्रशंसा करू लागत. कधी एक-दुसऱ्यावर बेल, जायफळे किंवा आवळे हातात घेऊन फेकीत. कधी लपंडाव खेळत. कधी एकमेकांना शिवण्यासाठी पुष्कळ लांबपर्यंत पळत जात, तर कधी पशु-पक्ष्यांच्या नकला करीत. कधी बेडकांप्रमाणे उड्या मारीत चालत, तर कधी वाकुल्या दाखवून एकमेकांची थट्टा करीत. कधी झाडावर दोराचा झोका तयार करून झोके घेत तर कधी राजाचा खेळ खेळत. अशा रीतीने सामान्यपणे मुले जे खेळ खेळतात, तसलेच खेळ ते वृंदावनातील नदी, पर्वत, दऱ्या, कुंज, वन, सरोवर वगैरे ठिकाणी खेळत. (९-१६)

एके दिवशी जेव्हा बलराम आणि श्रीकृष्ण गोपाळांसह त्या वनामध्ये गुरे चारीत होते, तेव्हा श्रीकृष्ण आणि बलराम यांना पळवून नेण्यासाठी गवळ्याच्या वेषामध्ये एक प्रलंब नावाचा असुर आला. भगवान श्रीकृष्ण सर्वज्ञ असल्याने त्यांनी त्याला ओळखले. तरीही त्यांनी त्याची मैत्री मान्य केली. कारण त्यांना त्याला मारायचे होते. क्रीडा-प्रकारात तज्ज्ञ असणाऱ्या श्रीकृष्णांनी गोपाळांना जवळ बोलावून म्हटले, "मित्रांनो ! आज आपण यथायोग्य रीतीने दोन गट करून खेळू." गोपाळांनी त्या खेळासाठी बलराम आणि श्रीकृष्णांना नायक बनविले. काहीजण श्रीकृष्णाचे तर काहीजण बलरामाचे साथीदार झाले. नंतर ते वाहून नेण्याच्या प्रकाराचे पुष्कळ खेळ खेळले. यामध्ये विजेता गट हरणाऱ्यांच्या पाठीवर बसत असे व हरणारा त्यांना वाहून नेत असे. अशा प्रकारे वाहणारे व वाहिले जाणारे असे दोन्ही गट श्रीकृष्णांच्या नेतृत्वाखाली गोधनाला चारीत भांडीरक नावाच्या वडाच्या झाडाजवळ जाऊन पोहोचले. (१७-२२)

परीक्षिता ! एकदा बलरामाच्या गटातील श्रीदामा, वृषभ इत्यादी मुलांनी खेळामध्ये बाजी मारली, तेव्हा श्रीकृष्ण वगैरे त्यांना आपल्या पाठीवर बसवून वाहून नेऊ लागले. हरलेल्या श्रीकृष्णांनी श्रीदाम्याला आपल्या पाठीवर बसवून घेतले, भद्रसेनाने वृषभाला आणि प्रलंबाने बलरामांना ! दानवश्रेष्ठ प्रलंबाने श्रीकृष्णाला हरवणे कठीण आहे

हे ओळखून तो त्यांच्याच गटात गेला. तो बलरामांना पाठीवर घेऊन वेगाने पळत सुटला व ठरलेल्या ठिकाणाच्याही पुढे निघून गेला. एखाद्या मोठ्या पर्वताइतक्या वजनदार बलरामांना घेऊन जाता जाता प्रलंबासुराचे चालणे थांबले; त्याने आपले खरे दैत्यरूप धारण केले. त्याच्या काळ्या शरीरावर सोन्याचे दागिने चमकत होते. गौरवर्ण बलरामांना पाठीवर घेतल्यामुळे तो असा दिसत होता की, जणू वीजयुक्त काळ्या ढगाने चंद्राला धारण केले आहे. त्याचे डोळे धगधगत होते. भयंकर दाढा भुवयांना जाऊन भिडल्या होत्या. त्याचे केस आगीच्या ज्वाळेसारखे दिसत होते. त्याच्या हातापायातील कडी, मुगुट आणि कुंडले यांच्या चमकण्याने तो अधिक भयानक वाटत होता. त्याला आकाशात जात असलेला पाहून बलराम थोडेसे घाबरले. परंतु दुसऱ्याच क्षणी त्यांना आपल्या स्वरूपाची जाणीव झाली आणि त्यांची भीती पळाली. धन चोरणाऱ्या चोराप्रमाणे आपल्याला चोरून घेऊन आकाशमार्गाने जाणाऱ्या त्या शत्रूच्या डोक्यावर, इंद्राने पर्वतावर वज्राचा प्रहार करावा, तसा बलरामांनी क्रोधाने एक ठोसा जोरात लगावला. ठोसा लागताच त्याचे मस्तक फुटले. तो तोंडातून रक्त ओकू लागला, त्याची शुद्ध हरपू लागली आणि इंद्राने वज्राने फोडलेल्या पर्वताप्रमाणे मोठ्याने आवाज करीत तो तत्काळ प्राण जाऊन जमिनीवर पडला. (२३-२९)

बलवान बलरामांनी प्रलंबासुराला मारलेले पाहून गोपाळांच्या आश्चर्याला सीमा राहिली नाही. ते वारंवार "वाहवा ! वाहवा !" म्हणू लागले. गोपाळांची मने प्रेमाने भरून आली. ते त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करू लागले. आणि मरणाच्या दारातून जणू परत आलेल्या त्यांना मिठ्या मारून स्तुतीला पात्र असणाऱ्या त्यांची प्रशंसा करू लागले. (३०-३१)

दुष्ट प्रलंबासुर मेल्यामुळे देवांना अत्यंत आनंद झाला. ते बलरामांवर पुष्पवर्षाव करून त्यांची "शाबास ! वाहवा !" म्हणून प्रशंसा करू लागले. (३२)

अध्याय अठरावा समाप्त

अध्याय एकोणिसावा

गाई आणि गोपांचा वणव्यातून बचाव

श्रीशुकदेव म्हणतात- एकदा गोपाळ खेळांमध्ये गुंग झाले असता त्यांची गुरे स्वच्छंदपणे चरत गवताच्या लोभाने घनदाट जंगलात गेली. त्यांची गुरे एका वनातून दुसऱ्या वनात जाता जाता उन्हाने तहान लागून व्याकूळ झाली आणि हंबरत हंबरत मुंज नावाच्या गवताने भरलेल्या वनात शिरली. श्रीकृष्ण, बलराम आदी गोपाळांना जेव्हा शोधूनही जनावरांचा काहीच ठावठिकाणा लागला नाही, तेव्हा त्यांना खेळण्याचा पश्चात्ताप झाला. आपल्या उपजीविकेचे साधनच नाहीसे झाल्याने ते बेचैन झाले. नंतर त्यांनी गाईंच्या पावलांनी तुडवलेले व दातांनी ओरबाडलेले गवत आणि जमिनीवर उमटलेल्या खुरांच्या खुणांच्या आधारे, त्यांचा शोध घेण्यासाठी ते निघाले. जाता जाता त्यांना आढळले की, त्यांची गुरे मुंजारण्यामध्ये वाट चुकली असून हंबरडा फोडीत आहेत. तेव्हा त्यांना त्यांनी तेथून वळवले. त्यावेळी ते अतिशय थकले होते. शिवाय त्यांना फार तहानसुद्धा लागली होती. भगवान श्रीकृष्ण आपल्या मेघगंभीर वाणीने, गाईंना नावांनी हाका मारू लागले. आपल्या नावाचा आवाज ऐकताच गाई अतिशय आनंदित होऊन हुंकार देऊ लागल्या. (१-६)

तेवढ्यात त्या वनाला सगळीकडून अचानक, जी वनवासी जीवांचा काळच अशी आग लागली. त्याचबरोबर वारे वाहू लागल्याने आग भडकली आणि आपल्या भयंकर लोळांनी चराचराला भस्मसात करू लागली. जेव्हा गोपाळांनी आणि गुरांनी पाहिले की, वणवा चारी बाजूंनी आपल्याकडेच येत आहे, तेव्हा ते अत्यंत भयभीत झाले; आणि मृत्यूच्या भीतीने घाबरलेले जीव ज्याप्रमाणे भगवंतांना शरण जातात, त्याचप्रमाणे ते श्रीकृष्ण आणि बलरामांना शरण जाऊन म्हणाले. "महावीर श्रीकृष्णा ! श्रीकृष्णा ! परम प्रतापी बलरामा ! आम्ही आपणांस शरण आलो आहोत. या दावानलात आम्ही होरपळून जाणार ! तुम्ही आम्हांला वाचवा. श्रीकृष्णा ! आमचे सर्व काही तूच आहेस. मग आमचा नाश कसा होणार ! हे सर्व धर्म जाणणाऱ्या श्यामसुंदरा ! तूच आमचा रक्षणकर्ता. आम्हांला फक्त तुझाच आधार." (७-१०)

श्रीशुक म्हणतात- आपल्या बांधवांची ही दीनवाणी प्रार्थना ऐकून भगवान श्रीहरी म्हणाले- "भिऊ नका. तुम्ही डोळे मिटा." "ठीक आहे," असे म्हणून त्यांनी डोळे मिटताच योगेश्वर भगवंतांनी ती भयंकर आग तोंडाने पिऊन टाकली; आणि त्यांना त्या घोर संकटातून सोडविले. यानंतर जेव्हा गोपाळ डोळे उघडून बघतात, तोच त्यांना आपण भांडीर वडाजवळ आहोत, असे दिसले. अशाप्रकारे त्यांची आणि गुरांची दावानलापासून सुटका झाल्याचे पाहून ते गोपाळ आश्चर्यचकित झाले. श्रीकृष्णांची ही योगसिद्धी आणि योगमायेचा प्रभाव तसेच दावानलापासून आपले रक्षण झाल्याचे पाहून ते श्रीकृष्णांना देव मानू लागले. (११-१४)

संध्याकाळ झाल्यानंतर बलरामाबरोबर भगवान श्रीकृष्ण गाईंना माघारी वळवून बासरी वाजवीत व्रजाकडे आले. त्यावेळी गोपाळ त्यांची स्तुती करीत येत होते. इकडे व्रजामध्ये श्रीकृष्णांच्या अनुपस्थितीत गोपींना एक एक क्षण शंभर शंभर युगांप्रमाणे वाटत होता. जेव्हा त्यांचे दर्शन झाले, तेव्हा त्यांना परमानंद झाला. (१५-१६)

अध्याय एकोणिसावा समाप्त

अध्याय विसावा

वर्षा आणि शरद ऋतूंचे वर्णन

श्रीशुकदेव म्हणतात- गोपाळांनी घरी आल्यावर घरातील स्त्रियांना श्रीकृष्ण आणि बलरामांची प्रलंबाला मारणे, आपल्याला वणव्यातून सोडवणे इत्यादी अलौकिक कृत्ये सांगितली. वृद्ध गोप आणि गोपी ते ऐकून आश्चर्यचकित झाल्या. ते सर्वजण मानू लागले की, "श्रीकृष्ण आणि बलरामाच्या वेषात आपल्याकडे आलेले हे कोणी मोठे देव आहेत." (१-२)

यानंतर वर्षा ऋतू सुरू झाला. या ऋतूमध्ये सर्व प्रकारच्या प्राण्यांची अधिक वाढ होते. त्यावेळी सूर्य आणि चंद्र यांच्याभोवती वारंवार खळी दिसू लागली. ढग इत्यादींमुळे आकाश क्षुब्ध दिसू लागले. काळ्या दाट ढगांमुळे व गडगडाट करणाऱ्या विजांनी व्यापलेल्या आकाशातील सूर्य, चंद्र आणि तारे झाकोळून जातात. त्यामुळे आकाश, गुणांनी झाकल्या गेलेल्या जीव नामक ब्रह्माप्रमाणे दिसू लागते. (सत्त्वगुणी वीज, रजोगुणी गडगडाट व तमोगुणी ढग आणि ब्रह्मरूप आकाश अशी ही उपमा आहे.) (राजाप्रमाणे) सूर्याने पृथ्वीरूप प्रजेकडून आठ महिनेपर्यंत पाण्याच्या रूपाने जो कर वसूल केला होता, तो वेळ आल्यावर सूर्य आपल्या किरणरूपी हातांनी पुन्हा वाटू लागला.

जसे दयाळू लोक दु:खी लोकांसाठी आपले प्राणसुद्धा समर्पित करतात; त्याप्रमाणे विजा असलेले ढग वेगवान वाऱ्याच्या प्रेरणेने प्राण्यांना तृप्त करणारे आपले जीवन (पाणी) देऊ लागतात. (३-६)

जसे सकामभावाने तपश्चर्या करणाऱ्यांचे शरीर आधी दुर्बळ होते, परंतु तेच फळ मिळताच पुष्ट होते, त्याप्रमाणे उन्हाने वाळलेली जमीन पावसाच्या पाण्याने ओलीचिंब होऊन पुन्हा फुगली. कलियुगात पापाचे सामर्थ्य वाढल्याने पाखंड मत वाढून वैदिक संप्रदाय लोप पावतो, त्याप्रमाणे पावसाळ्यातील संध्याकाळच्या वेळी ढगांमुळे अंधार पसरल्यामुळे काजवे चमकतात. तारे चमकत नाहीत. जसे नित्य-नैमित्तिक कर्मे आटोपल्यानंतर गुरूंच्या आज्ञेनुसार ब्रह्मचारी शिष्य वेदपठण करू लागतात, तसे जे बेडूक आधी गुपचूप झोपून पडले होते, ते आता ढगांची गर्जना ऐकून डराव डराव करू लागले. जसे इंद्रियांवर ताबा नसलेल्या माणसाची शरीर, धन इत्यादी संपत्ती कुमार्गाकडे जाते, तशा सुकून गेलेल्या लहान लहान नद्या आता पात्र सोडून वाहू लागल्या. हिरवळीने हिरवीगार झालेली, काही ठिकाणी पावसाळी किड्यांनी लाल दिसणारी आणि काही ठिकाणी पावसाळी पांढऱ्या छत्र्या उगवलेली जमीन अशी दिसत होती की, जणू एखाद्या राजाची रंगी-बेरंगी सेनाच ! शेते धान्यसंपत्तीने शेतकऱ्यांना आनंद देत होती, पण तीच सर्व काही प्रारब्धाच्या अधीन आहे हे न जाणणाऱ्या धनिकांच्या मनात मात्र मत्सर उत्पन्न करीत होती. (कारण आता ते त्यांना कर्जाच्या जोरावर मुठीत ठेवू शकणार नव्हते.) पावसाचे नवीन पाणी सेवन करून जलचर आणि स्थलचर प्राणी यांचे सौंदर्य वाढले होते. जसे भगवंतांची सेवा केल्याने अंतर्बाह्य सौंदर्य वाढते. ज्याप्रमाणे वासनायुक्त योग्याचे चित्त विषयांशी संपर्क होताच कामनांनी उद्दीप्त होते, त्याप्रमाणे तुफानी वाऱ्याने उसळणाऱ्या लाटांनी खवळलेला समुद्र नद्यांचे पाणी मिळाल्याने आणखीच खवळला. ज्यांनी आपले चित्त भगवंतांना समर्पित केले आहे, त्यांना ज्याप्रमाणे दु:खाचे डोंगर कोसळले तरी कोणत्याही प्रकारची व्यथा होत नाही, त्याचप्रमाणे मुसळधार पावसाचे आघात होत असतानाही पर्वतांना काहीच व्यथा होत नव्हती. जर द्विजांनी वेदांचा अभ्यास केला नाही तर कालांतराने ते विसरतात, त्याप्रमाणे ज्या वाटा साफ केलेल्या नव्हत्या, त्या गवताने झाकून गेल्यामुळे ओळखणे अवघड झाले. मेघ जरी लोकोपकारी असले तरी चंचल विजा त्यांच्यामध्ये स्थिर राहात नाहीत. जसे चंचल स्वभावाच्या स्त्रिया, पुरुष गुणी असले तरी त्यांच्याजवळ स्थिर चित्ताने राहात नाहीत. शब्दगुणयुक्त आकाशात निर्गुण (दोरी नसलेले) इंद्रधनुष्य शोभत होते, जसे त्रिगुणांच्या क्षोभामुळे व्यक्त होणाऱ्या जगाच्या पसाऱ्यात अव्यक्त निर्गुण ब्रह्म शोभत असावे. ज्याप्रमाणे स्वत:च्या चैतन्याने प्रकाशित होणारा अहंकारच जीवाला झाकून ठेवतो, त्याचप्रमाणे चंद्राच्या किरणांनी ढगांचे अस्तित्व दिसत असूनही तेच ढग चंद्राला झाकून निस्तेज करू लागले. जसे गृहस्थीच्या जंजाळात अडकून दु:खी झालेले लोक भगवंतांच्या भक्तांच्या शुभागमनाने आनंदमग्न होऊन जातात, त्याप्रमाणे ढगांच्या शुभागमनाने आनंदित झालेले मोर केकारवांनी आणि नृत्याने आनंद प्रगट करीत होते. जसे सकाम भावनेने तपश्चर्या करणारे सुरुवातीला कृश होतात परंतु कामना पूर्ण झाल्यावर पुष्ट होतात, तसे जे वृक्ष सुकून निष्पर्ण झाले होते, ते आता मुळांनी पाणी शोषून घेऊन पाना-फुलांनी डवरले होते. परीक्षिता ! जसे विषयी पुरुष काम-धंद्याच्या व्यापामुळे घरात नेहमी बेचैन असतात, तरीसुद्धा घरातच पडून राहातात, त्याप्रमाणे तळ्यांचे काठ काटे-कुटे आणि पाण्याच्या प्रवाहामुळे साधारणत: त्रासदायकच असतात, तरीसुद्धा सारस पक्षी ते

सोडीत नाहीत. जसे कलियुगामध्ये पाखंडी लोकांच्या निरनिराळ्या मिथ्या मतांमुळे वैदिक मार्ग शिथिल होतात, त्याप्रमाणे पावसाळ्यात इंद्राने पाऊस पाडल्यामुळे नद्यांचे आणि शेतांचे बांध फुटून गेले. जसे ब्राह्मणांनी प्रेरणा दिल्यानंतर धनिक लोक वेळोवेळी दान करून प्रजेच्या इच्छा पूर्ण करतात, त्याप्रमाणे वाऱ्याच्या प्रेरणेने ढग प्राण्यांसाठी अमृतमय पाण्याचा वर्षाव करू लागले. (७-२४)

वृंदावन अशा प्रकारे शोभिवंत आणि पिकलेले खजूर तसेच जांभळांनी बहरलेले होते. वनात विहार करण्यासाठी बलरामाबरोबर श्रीकृष्णांनी गोपाळ आणि गुरांना घेऊन प्रवेश केला. दुधाने भरलेल्या सडांमुळे गाई हळूहळू चालत होत्या. पण जेव्हा श्रीकृष्ण त्यांना हाका मारीत, तेव्हा त्या प्रेमामुळे भराभर चालू लागत. त्यावेळी त्यांच्या सडांतून दुधाच्या धारा जमिनीवर पडत असत. भगवंतांनी पाहिले की, वनवासी लोक आनंदात मग्न आहेत. वनराईतून मध गळत आहे. पर्वतातून झुळझुळ आवाज करीत झरे वाहात आहेत. आणि त्याचबरोबर पाऊस पडताना आसऱ्यासाठी गुहाही आहेत. जेव्हा पाऊस पडत असे, तेव्हा श्रीकृष्ण कधी एखाद्या वृक्षाच्या छायेत जाऊन बसत. कधी कधी एखाद्या गुहेमध्ये जाऊन बसत तर कधी कंदमुळे व फळे खाऊन गोपाळांबरोबर रमत. कधी पाण्याजवळच एखाद्या शिळेवर बसत आणि बलराम व गोपाळांच्यासह घरून आणलेला दहीभात, भाजी, चटणी इत्यादीबरोबर खात. वर्षा ऋतूमध्ये बैल, वासरे तसेच दुधाने भरलेल्या सडांच्या भारांनी थकलेल्या गाई पोट भरल्यावर हिरव्यागार गवतावर बसून डोळे मिटून रवंथ करीत असत. सर्व प्राण्यांना सुख देणाऱ्या त्यांच्याकडे व आपल्याच शक्तीचा विलास असलेल्या वर्षा ऋतूच्या सौंदर्याकडे पाहून भगवंत त्यांची प्रशंसा करीत. (२५-३१)

अशा प्रकारे श्याम आणि बलराम व्रजामध्ये राहात असता वर्षा ऋतू संपून शरद ऋतू आला. आता आकाशात ढग नव्हते. पाणी निर्मळ झाले आणि वारा संथ गतीने वाहू लागला. ज्याप्रमाणे योगभ्रष्ट पुरुषांची चित्ते पुन्हा योगसाधना केल्याने निर्मळ होतात, त्याप्रमाणे शरद ऋतूमुळे आणि कमळे तयार झाल्याने पाणी स्वच्छ झाले. जसे भगवंतांची भक्ती आश्रमानुसार वागणाऱ्यांचे पाप नष्ट करते, त्याचप्रमाणे शरद ऋतूने आकाशातील ढग, पावसाळ्यातील जीव, जमिनीवरचा चिखल आणि पाण्याचा गढूळपणा नाहीसा केला. जसे सर्व कामनांचा त्याग करून शांत झालेले मुनी पापमुक्त होऊन शोभतात, त्याप्रमाणे आपले सर्वस्व असलेल्या पाण्याचे दान करून ढग शुभ्र कांतीने शोभू लागले. जसे ज्ञानी पुरुष योग्य वेळी आपल्या अमृतमय ज्ञानाचे कोणा अधिकाऱ्याला दान करतात आणि कोणाकोणाला करीतही नाहीत, त्याप्रमाणे आता पर्वतांमधून कुठे कुठे झरे वाहात होते, तर कुठे कुठे वाहात नव्हते. जसे कुटुंबाचे पोषण करण्यात व्यग्र झालेले मूर्ख लोक स्वत:चे आयुष्य क्षणोक्षणी कमी होत चालले आहे, हे जाणत नाहीत, त्याप्रमाणे पाणी भरलेल्या लहान लहान खड्ड्यांतील जलचरांना खड्ड्यांतील पाणी दिवसेंदिवस कमी होत चाललेले कळत नव्हते. जसे इंद्रियांच्या ताब्यात राहणाऱ्या दीनवाण्या आणि दरिद्री गृहस्थाला निरनिराळे ताप सोसावे लागतात, त्याप्रमाणे थोड्या पाण्यात राहाणाऱ्या प्राण्यांना शरद ऋतूतील सूर्याच्या प्रखर किरणांचा अतिशय त्रास होऊ लागला. जसे विवेक-संपन्न साधक हळू हळू शरीर इत्यादी अनात्म पदार्थांबद्दल मी-माझेपण सोडून देतो, त्याप्रमाणे जमिनी हळू हळू चिखल सोडू लागल्या आणि वेली कोवळेपणा सोडू लागल्या. जसे मन संकल्परहित झाल्यानंतर आत्माराम पुरुष कर्मकांडाचा आग्रह सोडून देऊन शांत होतो, त्याप्रमाणे शरद ऋतूमध्ये समुद्राचे पाणी स्थिर, गंभीर आणि शांत झाले.

ज्याप्रमाणे योगीजन आपल्या इंद्रियांना विषयांकडे जाण्यापासून रोखून धरून क्षीण होत जाणाऱ्या ज्ञानाचे रक्षण करतात, त्याप्रमाणे शेतकरी शेतातील पाण्याचे बांध बंदिस्त करून वाहाणारे पाणी अडवू लागले. जसे देहाभिमानामुळे होणारे दु:ख ज्ञान नाहीसे करते आणि विरहाने गोपींना होणारे दु:ख श्रीकृष्ण नाहीसे करतात, त्याप्रमाणे शरद् ऋतूतील उन्हामुळे लोकांना होणारा त्रास चंद्र नाहीसा करू लागला. जसे वेदांचा अर्थ जाणणारे सत्त्वगुणी चित्त शोभते, त्याप्रमाणे शरद ऋतूमध्ये मेघविरहित निर्मळ आकाश ताऱ्यांच्या प्रकाशाने झगमगू लागले. जसे पृथ्वीतलावर यदुवंशीयांसमवेत यदुपती श्रीकृष्ण शोभतात, त्याचप्रमाणे आकाशात ताऱ्यांसमवेत पूर्णचंद्र शोभू लागला. वनातील फुलांतून वाहाणाऱ्या समशीतोष्ण वाऱ्याच्या स्पर्शाने लोकांचा ताप नाहीसा होत होता, तसा गोपींचा ताप मनाने श्रीकृष्णांना आलिंगन देऊन नाहीसा होत होता. जसे ईश्वराच्या आराधनेसाठी केलेल्या क्रियांचा पाठलाग त्यांची फळे करतात, तसेच शरद ऋतूमध्ये ऋतू प्राप्त झालेल्या गाई, हरिणी, चिमण्या आणि स्त्रिया यांचा वळू, हरीण, पक्षी आणि पुरुष पाठलाग करू लागले. हे राजा ! जसे राजामुळे चोरांशिवाय इतर सर्व लोक निर्भय होतात, त्याचप्रमाणे सूर्योदय झाल्यामुळे चंद्रविकासी कमळांशिवाय इतर सर्व प्रकारची कमळे उमलली. त्यावेळी शहरात आणि खेड्यांमध्ये नवान्नेष्टी व लौकिक मोठ्या उत्सवांमुळे आणि विशेषत: श्रीकृष्ण व बलरामांच्या उपस्थितीमुळे परिपक्व धान्याने संपन्न पृथ्वी अत्यंत शोभिवंत दिसू लागली. साधना करून सिद्ध झालेले पुरुष जसे योग्य वेळ येताच आपल्या देव इत्यादी शरीरांना प्राप्त होतात, त्याचप्रमाणे व्यापारी, संन्यासी, राजे आणि गुरुकुलातील विद्यार्थी, जे पावसाळा असल्यामुळे एकाच ठिकाणी राहिले होते, ते तेथून निघून आपापल्या कामाला लागले. (३२-४९)

अध्याय विसावा समाप्त

अध्याय एकविसावा

वेणुगीत

श्रीशुक म्हणतात- शरद ऋतूमुळे जेथील पाणी निर्मळ झाले होते आणि जलाशयात उमललेल्या कमळांचा सुगंध असलेला वारा वाहात होता, अशा वृंदावनात श्रीकृष्णांनी गाई व गोपाळांसह प्रवेश केला. तेथील फुलांनी बहरलेल्या वनराईत धुंद भ्रमर गुणगुणत होते आणि पक्ष्यांचे थवे किलबिलाट करीत होते. त्यामुळे तेथील सरोवरे, नद्या आणि पर्वत नादमय झाले होते. श्रीकृष्णांनी बलराम आणि गोपालांबरोबर तेथे गाई चारीत असताना वेणू वाजविण्यास सुरुवात केली. ते वेणुगीत भगवंतांविषयी प्रेमभाव जागृत करणारे होते. ते ऐकून काही गोपी सख्यांना श्रीकृष्णांच्या मागे त्यांच्याविषयी सांगू लागल्या. हे राजा ! श्रीकृष्णांच्या लीला आठवून त्यांचे त्यांनी वर्णन करण्यास सुरुवात केली खरी; पण उत्कट प्रेमाने मन व्याकूळ झाल्यामुळे त्यांचे बोलणेच खुंटले. (त्या सांगू लागल्या,) गोपाळांसह श्रीकृष्ण वृंदावनात आले पाहा ! त्यांच्या मस्तकावर मोरपंख आहे आणि कानांवर कण्हेरीचे गुच्छ आहेत. त्यांनी सोन्यासारखा पीतांबर परिधान केला असून गळ्यामध्ये वैजंयती माळा घातली आहे. त्यांचे रूप श्रेष्ठ नटासारखे किती सुंदर आहे बरे ! बासरीची छिद्रे ते आपल्या अधरामृताने भरत आहेत. गोपाळ त्यांच्या कीर्तीचे गायन करीत आहेत. हे वृंदावन त्यांच्या चरणांमुळे अधिकच रमणीय

झाले आहे. परीक्षिता ! चराचराचे मन आकर्षून घेणारा वेणुनाद ऐकून सर्व गोपी त्याचे वर्णन करू लागल्या. आणि ते करीत असतानाच तन्मय होऊन त्या श्रीकृष्णांना मनाने आलिंगन देऊ लागल्या.

(१-६)

गोपी म्हणाल्या- अग सख्यांनो ! आम्ही डोळे असणाऱ्यांच्या डोळ्यांची एवढीच सार्थकता मानतो, दुसरी नाही. ती हीच की, जेव्हा श्रीकृष्ण आणि बलराम मित्रांसह गुरे हाकीत वनात जातात किंवा परत येतात, तेव्हा वेणू वाजविणारे किंवा प्रेमळ नेत्रकटाक्षांनी आमच्याकडे पाहाणारे त्यांचे मुखकमल मनसोक्त पाहावे. (दुसऱ्या काहीजणी म्हणाल्या,) पीतांबरधारी सावळे श्रीकृष्ण आणि नीलांबर नेसलेले बलराम जेव्हा आंब्याची पालवी, मोरपंख, फुलांचे गुच्छ आणि रंगी-बेरंगी कमलांच्या माळा धारण करतात, तेव्हा त्यांचा वेष अतिशय देखणा वाटतो. गोपाळांच्यामध्ये बसून काहीवेळा जेव्हा ते गाऊ लागतात, तेव्हा रंगमंचावर अभिनय करणाऱ्या दोन चतुर नटांसारखे ते किती शोभून दिसतात म्हणून सांगू ? अग गोपींनो ! या वेणूने असे कोणते पुण्य केले आहे की, जो आम्हा गोपींचे हक्काचे दामोदरांचे अधरामृत स्वत:च अशाप्रकारे पीत आहे की, त्याचा फक्त रस शिल्लक उरला आहे. या वेणूला आपल्या पाण्याने वाढविणारे जलाशय कमळांच्या मिषाने रोमांचित होऊ लागले आहेत आणि आपल्या वंशामध्ये जन्मलेल्या भगवत्प्रेमी वेणूला पाहून वृक्षसुद्धा श्रेष्ठ पुरुषांप्रमाणे 'भगवद्भक्त आपला वंशज आहे' हा विचार मनात येऊन मधुबिंदूंच्या मिषाने आनंदाश्रू ढाळीत आहेत.

(७-९)

गडे ! देवकीनंदनाच्या चरणकमलांनी सुशोभित झालेले हे वृंदावन, पृथ्वीची कीर्ती चहूकडे पसरवीत आहे. जेव्हा श्रीकृष्ण मुरली वाजवितात, तेव्हा मोर धुंद होऊन नाचू लागतात आणि पर्वतशिखरांवरील पशु-पक्षी स्तब्धपणे हे पाहात राहातात. तसेच, जेव्हा सुंदर वेष धारण केलेले श्रीकृष्ण बासरी वाजवितात, तेव्हा मंदबुद्धीच्या हरिणीसुद्धा ती ऐकत कालविटांसमवेत त्यांच्याजवळ येऊन प्रेमपूर्ण नेत्रकमळांनी त्यांची जणू पूजा करतात.(१०-११)

स्वर्गातील देवी जेव्हा युवतींना आनंदित करणारे सौंदर्य आणि शील यांचा खजिना असलेल्या श्रीकृष्णांना पाहातात आणि त्यांनी बासरीवर गायिलेले मधुर संगीत ऐकतात तेव्हा मदनबाधेने विह्वल होऊन त्या विमानातच आपली शुद्ध हरपून बसतात, त्यामुळे वेणीतील फुले गळून जमिनीवर पडत आहेत याची त्यांना जाणीव नसते की शालू कमरेवरून निसटताहेत, याचेही त्यांना भान नसते. श्रीकृष्णांच्या मुखातून निघालेले वेणुगीतरूप अमृत गाई कान टवकारून पितात. आपल्या डोळ्यांतून श्यामसुंदरांना हृदयात घेऊन त्यांना आलिंगन देतात. त्यामुळे त्यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागतात. तसेच त्यांची वासरे गाईंच्या सडांतून कृष्णप्रेमाने आपोआप स्रवणारे दूध तोंडात घेऊन तशीच उभी राहातात. त्यांच्याही डोळ्यांतून आनंदाश्रू वाहात असतात. अग आई ! या वनातील पक्षी हे बहुधा मुनीच आहेत. ते सुंदर पालवी फुटलेल्या झाडांच्या डहाळ्यांवर श्रीकृष्ण दिसतील अशा जागी किलबिल न करता गुपचुप बसतात आणि पापण्या न हालवता डोळ्यांनी त्यांचे रूपमाधुर्य पाहात राहातात. आणि त्यांनी वाजवलेली मोहक बासरी ऐकतात.

(१२-१४)

या नद्यांनीही श्रीकृष्णांच्या बासरीचा आवाज ऐकला आणि त्यांच्या मनात प्रेमभाव जागृत झाला. तेच हे भोवरे. त्यामुळे त्यांचा वाहण्याचा वेगही मंदावला. त्या तरंगरूपी हातांनी त्यांचे चरण पकडून त्यांवर कमळे अर्पण करून त्यांना आलिंगन देत आहेत. श्रीकृष्ण आणि बलराम बालगोपालांसह भर उन्हात गाई चारीत आहेत आणि त्याचबरोबर बासरीही वाजवीत आहेत, असे पाहून कृष्णघनांच्या

हृदयात प्रेम उचंबळून येते. ते आपल्याच वर्णाच्या घनश्यामावर आपल्या शरीराचेच छत्र धरून त्यांच्यावर तुषाररूप पुष्पवर्षाव करतात.(१५-१६)

जेव्हा या भिल्लिणी कृष्णांना पाहातात, तेव्हा त्यांच्या हृदयामध्ये प्रेमाची व्याधी निर्माण होते. त्यावेळी त्या गोपींच्या वक्ष:स्थळावरील जे केशर श्यामसुंदरांच्या चरणांना लागलेले असते ते, श्रीकृष्ण जेव्हा गवतावरून चालतात, तेव्हा त्याला चिकटते. या भाग्यशाली भिल्लिणी ते त्या गवतांच्या काड्यांवरून काढून आपले स्तन आणि तोंडाला लावतात आणि अशाप्रकारे आपल्या हृदयातील प्रेमदाह शांत करतात. अग गोपींनो ! हा गोवर्धन भगवंतांच्या भक्तांमध्ये श्रेष्ठ आहे. धन्य आहे याचे भाग्य ! श्रीकृष्ण-बलरामांच्या चरणकमलांचा स्पर्श झाल्याने हा किती आनंदित होतो पाहा ! हा गोपाल आणि गाई यांच्यासह या दोघांचाही मोठाच सत्कार करतो. तो त्यांना पाणी देतो, गाईंसाठी गवत देतो. विश्रांतीसाठी गुहा आणि खाण्यासाठी कंदमुळे देतो. अग सख्यांनो ! जेव्हा हे डोक्याला (गाईची धार काढतेवेळी पायाला बांधण्याची) दोरी गुंडाळून आणि खांद्यावर फासा टाकून गोपाळांबरोबर गाईंना एका वनातून दुसऱ्या वनात हाकत जातात, आणि त्याचवेळी मधुर बासरीही वाजवतात, तेव्हा चालणारे देहधारी स्तब्ध होतात आणि अचल वृक्षसुद्धा रोमांचित होतात. (१७-१९)

वृंदावनविहारी श्रीकृष्णांच्या अशा एक नव्हे तर, अनेक लीलांचे आपापसात वर्णन करता करता गोपी तन्मय होऊन जात. (२०)

अध्याय एकविसावा समाप्त

अध्याय बाविसावा

वस्त्रहरण

श्रीशुक म्हणतात- हेमंत ऋतूतील मार्गशीर्ष महिन्यात नंदांच्या व्रजातील कुमारी हविष्यान्न खाऊन कात्यायनी व्रत करू लागल्या. राजा ! त्या अरुणोदय होत असतानाच यमुनेच्या पाण्यात स्नान करीत आणि तीरावर देवीची वाळूची मूर्ती तयार करून, सुगंधी चंदन, फुलांचे हार, निरनिराळ्या अन्नांचे नैवेद्य, धूप-दीप, लहान-मोठ्या भेटवस्तू, पाने, फळे, तांदूळ इत्यादींनी तिची पूजा करीत. त्याचबरोबर, "हे कात्यायनी ! हे महामाये ! हे महायोगिनी ! हे सर्वांच्या एकमात्र स्वामिनी ! नंदनंदनांना आमचा पती कर. देवी ! आम्ही तुला नमस्कार करतो." या मंत्राचा जप करीत त्या कुमारिका, देवीची आराधना करीत. ज्यांचे मन श्रीकृष्णांना समर्पित झाले होते, अशा त्या कुमारींनी नंदनंदन पती व्हावेत म्हणून एक महिनाभर भद्रकालीदेवीची अतिशय चांगल्या रीतीने पूजा केली. दररोज उष:कालीच त्या एकमेकींना हाका मारीत आणि एकमेकींच्या हातात हात घालून उच्च स्वरात भगवान श्रीकृष्णांच्या लीलांचे गायन करीत यमुनाजलात स्नान करण्यासाठी जात. (१-६)

दररोजच्याप्रमाणे एके दिवशी सर्व मुली यमुनेच्या तटावर आपापली वस्त्रे ठेवून श्रीकृष्णांचे गुणगान करीत आनंदाने जलक्रीडा करू लागल्या. योगेश्वरांचे ईश्वर भगवान श्रीकृष्ण गोपींचे मनोगत जाणून ते सफल करण्यासाठी आपल्या मित्रांसह यमुनाकाठी गेले. ते त्या मुलींची वस्त्रे उचलून लगबगीने एका कदंबाच्या झाडावर चढले. त्यांच्या बरोबरीचे गोपाळ खदखदा हसू लागले आणि स्वत: श्रीकृष्णसुद्धा हसत हसत त्यांची थट्टा करीत म्हणाले. "कुमारींनो ! येथे येऊन तुम्ही आपापली वस्त्रे

खुशाल घेऊन जा. मी खरेच सांगतो. कारण व्रत करून तुम्ही खंगलात, म्हणून मी तुमची थट्टा नाही करीत. मी यापूर्वी कधीच खोटे बोललो नाही, हे माझे मित्र जाणतातच. सुंदरींनो ! तुम्ही एकेकट्या येऊन आपापले वस्त्र घेऊन जा किंवा सगळ्याजणी एकदम या.'' (७-११)

भगवंतांची ही थट्टा पाहून गोपींची मने प्रेमाने ओथंबून गेली. त्या लाजल्या आणि एकमेकींकडे पाहून हसू लागल्या. पण पाण्याबाहेर आल्या नाहीत. श्रीकृष्ण जेव्हा असे म्हणाले, तेव्हा त्यांनी केलेल्या विनोदाने कुमारींचे चित्त आणखीच त्यांच्याकडे आकर्षित झाले. थंड पाण्यात गळ्यापर्यंत बुडालेल्या त्यांची शरीरे थंडीने थर थर कापत होती. त्या श्रीकृष्णांना म्हणाल्या. ''हे प्रिय श्रीकृष्णा ! तू असा अन्यायाने वागू नकोस. तू नंदबाबांचा लाडका आहेस, हे आम्हांला माहीत आहे. व्रजवासींचाही तू आवडता आहेस. आम्ही थंडीने कुडकुडत आहोत. आमची वस्त्रे दे ना ! हे श्यामसुंदरा ! आम्ही तुझ्या दासी आहोत. तू म्हणशील, ते आम्ही करू. तुला धर्म चांगला माहीत आहे. आमची वस्त्रे आम्हांला दे. नाहीतर आम्ही नंदबाबांना सांगू.'' (१२-१५)

श्रीभगवान म्हणाले - ''निरागस हसणाऱ्या मुलींनो ! तुम्ही स्वत:ला माझ्या दासी म्हणवता आणि मी सांगेन ते करू इच्छिता. तर मग येथे येऊन आपापली वस्त्रे घेऊन जा, म्हणजे झाले !'' तेव्हा त्या सर्व कुमारी थंडीने कुडकुडत दोन्ही हातांनी गुप्तांग झाकून, यमुनेच्या बाहेर आल्या. त्यावेळी थंडी त्यांना अतिशय सतावीत होती. (१६-१७)

त्यांच्या या शुद्ध भावाने भगवान अतिशय प्रसन्न झाले. त्या आपल्याजवळ आल्याचे पाहून त्यांची वस्त्रे त्यांनी आपल्या खांद्यावर ठेवली आणि प्रसन्नतेने हसत हसत म्हणाले. ''अग मुलींनो ! तुम्ही व्रतस्थ अवस्थेत विवस्त्र होऊन या पाण्यामध्ये स्नान केलेत, त्यामुळे जलदेवता वरुण आणि यमुना नदी यांची अवहेलना झाली आहे. म्हणून या दोषाचे निवारण करण्यासाठी तुम्ही आपले हात मस्तकावर जोडून लवून त्यांना नमस्कार करा आणि नंतर आपापली वस्त्रे घ्या.'' हे श्रीकृष्णांचे म्हणणे ऐकून त्या व्रजकुमारींना विवस्त्र होऊन स्नान केल्याने आपल्या व्रतात उणीव राहिली, असे वाटले. म्हणून त्याच्या पूर्ततेसाठी त्यांनी सर्व कर्मांचे साक्षी असणाऱ्या श्रीकृष्णांना नमस्कार केला; कारण पापांचे परिमार्जन करणारे तेच आहेत. भगवान श्रीकृष्ण, त्यांनी नमस्कार केलेला पाहून प्रसन्न झाले. त्यांची करुणा येऊन त्यांनी त्यांना वस्त्रे देऊन टाकली. श्रीकृष्ण कुमारींना टोचून बोलले, त्यांनी त्यांना लाज सोडायला लावली, त्यांची थट्टा केली आणि कठपुतळ्यांप्रमाणे त्यांना नाचविले; इतकेच काय त्यांची वस्त्रेसुद्धा हरण केली. तरीसुद्धा त्या त्यांच्यावर रागावल्या नाहीत. उलट प्रियतमाच्या भेटीने प्रसन्नच झाल्या. गोपींनी आपापली वस्त्रे परिधान केली; परंतु श्रीकृष्णांनी त्यांचे चित्त असे हिरावून घेतले होते की, त्या तेथून एक पाऊलही पुढे जाऊ शकल्या नाहीत. आपल्या प्रियतमाच्या सहवासासाठी तयार होऊन त्या त्यांच्याचकडे लाजलेल्या नजरांनी पाहात राहिल्या. (१८-२३)

आपल्या चरणकमलांच्या स्पर्शाची अभिलाषा धरूनच त्या कुमारींनी हे व्रत केले आहे, हे जाणून भगवान त्यांना म्हणाले. ''कुमारींनो ! तुम्ही माझी पूजा करू इच्छिता, हा तुमचा संकल्प मी जाणला. तुमच्या या इच्छेला माझी संमती आहे. तुमचा हा संकल्प पूर्ण होईल. ज्यांनी आपली बुद्धी मला समर्पित केली, त्यांची कामना त्यांना सांसारिक भोगांकडे नेण्यास असमर्थ असते. जसे भाजलेले किंवा उकळलेले बी पुन्हा उगवू शकत नाही.

म्हणून हे मुलींनो ! आता तुम्ही आपापल्या घरी जा. तुमची साधना सिद्ध झाली आहे. पुढे येणाऱ्या शरद ऋतूच्या रात्री तुम्ही माझ्याबरोबर विहार कराल.

सतींनो ! याच उद्देशाने तुम्ही हे व्रत आणि कात्यायनी देवीची पूजा केली होती ना !'' (२४-२७)

श्रीशुक म्हणतात- इच्छा पूर्ण झालेल्या त्या कुमारिका भगवंतांच्या आज्ञेने त्यांच्या चरणकमलांचे ध्यान करीत, जाण्याची इच्छा नसतानाही, कशाबशा व्रजामध्ये गेल्या. (२८)

एके दिवशी भगवान श्रीकृष्ण, बलराम आणि गोपालांसह गाई चारीत, वृंदावनापासून खूप दूर गेले. कडक उन्हाळ्यात वृक्ष आपल्याला सावली देऊन आपल्यावर छत्र धरण्याचे काम करीत आहेत, हे पाहून श्रीकृष्णांनी स्तोककृष्ण, अंशू, श्रीदामा, सुबल, अर्जुन, विशाल, ऋषभ, तेजस्वी, देवप्रस्थ, वरूथप इत्यादी गोपाळांना संबोधून म्हटले. ''मित्रांनो ! ज्यांचे सर्व जीवन फक्त दुसऱ्यांचे भले करण्यासाठीच आहे, अशा या भाग्यवान झाडांना पाहा. ही स्वत: वाऱ्याचे झोत, पाऊस, ऊन, थंडी असे सर्व काही सहन करीत आमचे त्यांच्यापासून रक्षण करतात. यांचे जीवन किती श्रेष्ठ आहे ! कारण यांच्यामुळेच प्राण्यांचा जीवननिर्वाह चालतो. ज्याप्रमाणे एखाद्या सज्जन पुरुषाच्या घरून कोणी याचक रिकाम्या हाताने परत जात नाही, त्याचप्रमाणे या वृक्षांकडूनसुद्धा काही न मिळता परत जात नाहीत. हे आपली पाने, फुले, फळे, सावली, मुळे, साली, लाकडे, सुगंध, डिंक, राख, कोळसा, अंकूर आणि पालवी देऊन प्राणिमात्राच्या इच्छा पूर्ण करतात. या जगात प्राण्यांच्या जन्माची सार्थकता यातच आहे की, त्यांनी धनाने, बुद्धीने, वाणीने आणि प्राणांनीसुद्धा इतरांचे नेहमी कल्याणच करावे.''

दोन्ही बाजूंचे वृक्ष पालवी, गुच्छ, फळे, फुले आणि पानांनी लहडलेले होते. त्यांच्या फांद्या जमिनीपर्यंत वाकल्या होत्या. अशाप्रकारे भाषण करीत श्रीकृष्ण त्यांच्यामधून यमुनेच्या काठी आले. राजन ! यमुनेचे पाणी अतिशय मधुर, शीतल आणि स्वच्छ होते. त्यांनी गाईंना पाणी पाजले आणि नंतर ते स्वत: स्वादिष्ट पाणी पोटभर प्याले. परीक्षिता ! ज्यावेळी ते यमुनेच्या काठावरील वनामध्ये मनसोक्तपणे गुरे चारीत होते, त्यावेळी भुकेलेले गोपाळ श्रीकृष्ण-बलरामांजवळ येऊन म्हणाले. (२९-३८)

अध्याय बाविसावा समाप्त

अध्याय तेविसावा

यज्ञपत्न्यांवर कृपा

गोपाळ म्हणाले- हे पराक्रमी बलरामा ! हे दुष्टनाशना श्यामसुंदरा ! आम्हांला खूप भूक लागली आहे. ती शमविण्याचा काही उपाय करा. (१)

श्रीशुक म्हणाले- गोपाळांनी जेव्हा देवकीनंदन भगवंतांना अशी प्रार्थना केली, तेव्हा त्यांनी मथुरेतील आपल्या भक्त ब्राह्मणपत्नींवर कृपा करण्यासाठी म्हटले. (२)

''येथून जवळच वेदवेत्ते ब्राह्मण स्वर्गाच्या इच्छेने आंगिरस नावाचा यज्ञ करीत आहेत. तुम्ही त्यांच्या यज्ञशाळेत जा. गोपाळांनो ! माझ्या सांगण्यावरून तुम्ही तेथे जाऊन माझे थोरले भाऊ भगवान बलराम आणि माझे नाव सांगून अन्न मागून आणा.'' जेव्हा भगवंतांनी अशी आज्ञा दिली, तेव्हा ते त्या ब्राह्मणांच्या यज्ञशाळेत गेले आणि त्यांनी अन्न मागितले. अगोदर त्यांनी जमिनीवर साष्टांग दंडवत घातले आणि मग ते हात जोडून म्हणाले. ''हे ब्राह्मणांनो ! आपले कल्याण असो ! आम्ही व्रजातील गवळी आहोत. भगवान

श्रीकृष्ण आणि बलरामांच्या आज्ञेने आम्ही आपल्याकडे आलो आहोत. आपण आमचे म्हणणे ऐकावे. बलराम आणि श्रीकृष्ण गाई चारीत येथे आले असून ते येथून जवळच आले आहेत. त्यांना भूक लागली असून आपणाकडून त्यांना अन्न पाहिजे आहे. ब्राह्मणांनो ! आपण धर्म जाणणारे आहात. आपल्याला मनापासून वाटत असेल तर भोजन करू इच्छिणाऱ्या त्यांना अन्न द्यावे. सज्जनांनो ! ज्या यज्ञात पशुबली दिला जातो, त्यामध्ये आणि सौत्रामणी यज्ञामध्ये यजमानाच्या घरचे अन्न खाता कामा नये. याव्यतिरिक्त इतर कोणत्याही यज्ञाच्या यजमानाचे अन्न खाण्याने दोष लागत नाही.'' अशी ही भगवंतांची विनंती ऐकूनही त्यांनी त्याकडे लक्ष दिले नाही. तुच्छ फळाच्या अपेक्षेने मोठ-मोठ्या कर्मांत अडकलेले ते ब्राह्मण अज्ञानी असूनही स्वत:ला ज्ञानवृद्ध मानीत होते. देश, काल, अनेक द्रव्ये, मंत्र, तन्त्र, ऋत्विज, अग्नी, देवता, यजमान, यज्ञ आणि धर्म ही सर्व रूपे वास्तविक भगवंतांचीच आहेत. तेच इंद्रियातीत साक्षात परब्रह्म भगवान श्रीकृष्ण होते. परंतु शरीराला आत्मा मानणाऱ्या त्या मूर्खांना भगवंत हे एक साधारण मनुष्य वाटल्यामुळे ते कळले नाही. परीक्षिता ! ते ब्राह्मण जेव्हा 'होय' किंवा 'नाही' काहीच बोलले नाहीत, तेव्हा गोपाळ निराश होऊन परतले आणि ती सर्व कहाणी त्यांनी राम-कृष्णांना सांगितली. ती ऐकून सर्व जगताचे स्वामी भगवान श्रीकृष्ण हसून गोपाळांना लोकव्यवहार समजावीत म्हणाले. ''आता तुम्ही त्यांच्या पत्न्यांकडे जा आणि त्यांना सांगा की, राम-कृष्ण येथे आले आहेत. तुम्हांला पाहिजे तेवढे अन्न त्या तुम्हांला देतील. कारण माझ्यावर त्यांचे फार प्रेम असून त्यांचे मन नेहमी माझ्याकडेच लागलेले असते.'' (३-१४)

यावेळी गोपाल पत्नीशाळेत गेले. तेथे ब्राह्मणांच्या पत्न्या सुंदर वस्त्रे आणि दागिन्यांनी नटून-थटून बसलेल्या पाहून त्यांना प्रणाम करून ते अतिशय नम्रतेने असे म्हणाले. ''आपणा विप्र पत्नींना आम्ही नमस्कार करीत आहोत. आपण आमचे म्हणणे ऐका. येथून जवळच श्रीकृष्ण आलेले असून त्यांनीच आम्हांला तुमच्याकडे पाठविले आहे. ते गोपाळ आणि बलरामांसह गाई चारीत इकडे पुष्कळ लांब आले आहेत. त्यांना आणि त्यांच्या सवंगड्यांना भूक लागली आहे. आपण त्यांच्यासाठी अन्न द्या.'' त्या ब्राह्मणपत्न्या पुष्कळ दिवसांपासून भगवंतांच्या लीला ऐकत होत्या. त्यामुळे त्यांचे मन त्यांच्याकडे आकर्षिले गेले होते. श्रीकृष्णांच्या दर्शनासाठी त्या नेहमीच उत्सुक असत. श्रीकृष्ण आल्याची वार्ता ऐकताच त्या उतावीळ झाल्या. त्यांनी भक्ष्य, भोज्य, लेह्य आणि चोष्य असे चारही प्रकारचे अत्यंत स्वादिष्ट अन्न भांड्यांत भरून घेतले आणि बंधू , बांधव, पती, पुत्र, नको, नको म्हणत असतानाही, जशा नद्या समुद्राकडे जातात, तशा त्या आपल्या प्रियतम श्रीकृष्णांकडे जाण्यासाठी निघाल्या. कारण फार दिवसांपासून पवित्रकीर्ती भगवंतांविषयी, बरेच काही ऐकून ऐकून त्यांचे मन त्यांच्या ठिकाणी जडले होते ! ब्राह्मणपत्नींनी यमुनेच्या तटाकी कोवळ्या पानांनी सुशोभित अशा अशोकवनामध्ये गोपालांनी वेढलेले, बलरामांच्या सह श्रीकृष्ण इकडे तिकडे फिरताना पाहिले. त्यांच्या सावळ्या शरीरावर सोनेरी पीतांबर फडफडत होता. गळ्यामध्ये वनमाला होती. मस्तकावर मोरपंखांचा मुगुट होता. अंगावर रंगीत धातूंनी चित्रे काढली होती. कोवळ्या पालवीचे गुच्छ शरीरावर धारण करून त्यांनी एखाद्या नटासारखा वेष केला होता. एक हात आपल्या मित्राच्या खांद्यावर ठेवून दुसऱ्या हाताने ते कमळ फिरवीत होते. कानांवर कमल ठेवले होते, कुरळे केस गालावर भुरभुरत होते आणि मंद हास्यामुळे मुखकमळ विशेष शोभत होते. परीक्षिता ! आतापर्यंत आपल्या प्रियतमाचे गुण कानांनी ऐकून ऐकून त्यांनी आपल्या मनाला त्यांच्याच प्रेमरंगाने रंगविले होते. आता डोळ्यांच्या

मार्गाने त्यांना आत घेऊन जाऊन पुष्कळ वेळपर्यंत त्या मनोमन त्यांना आलिंगन देत होत्या आणि अशाप्रकारे त्यांनी आपल्या हृदयातील ताप शांत केला. जसे, सुषुप्ती अवस्थेमध्ये मन तिच्या अभिमानी प्राज्ञात लीन होऊन शांत होते.

(१५-२३)

सर्वांच्या बुद्धीचे साक्षी असणाऱ्या भगवंतांनी ब्राह्मणपत्न्या सर्व विषयांची आशा सोडून फक्त आपल्या दर्शनासाठी आल्या आहेत, हे जाणून हसत हसत ते त्यांना म्हणाले. ''देवींनो ! तुमचे स्वागत असो ! या, बसा ! आम्ही तुमच्यासाठी काय करावे ? आपण आमच्या दर्शनाच्या इच्छेने येथे आला आहात, हे तुम्हांसारख्या भक्तांच्या दृष्टीने योग्यच आहे. आपले खरे हित पाहाणारे बुद्धिमान लोक आपल्या प्रियतमाप्रमाणे माझ्यावर प्रेम करतात आणि त्या प्रेमात कोणत्याही प्रकारची इच्छा किंवा आडपडदा नसतो, यात संशय नाही. प्राण, बुद्धी, मन, शरीर, स्वजन, स्त्री, अपत्य, धन इत्यादी सर्व वस्तू ज्याच्या सान्निध्यामुळे प्रिय वाटतात, त्या आत्मस्वरूप माझ्यापेक्षा अधिक प्रिय कोण असणार ? आता तुम्ही आपल्या यज्ञशाळेत परत जा. तुमचे पती ब्राह्मण गृहस्थ आहेत. ते तुमच्यामुळेच यज्ञ पूर्ण करू शकतील.''

(२४-२८)

ब्राह्मणपत्न्या म्हणाल्या- ''हे प्रभो ! आपण असे कठोर बोलू नये. आपल्याला प्राप्त झालेल्याला पुन्हा संसारात यावे लागत नाही, ही वेदवाणी आपण सत्य करा. आम्ही आपल्या नातलगांच्या आज्ञेचे उल्लंघन करून आपल्या चरणांपाशी यासाठी आलो आहोत की, आपल्या चरणांवरून पडलेली तुलसीमाला आपल्या केसांमध्ये धारण करावी. हे शत्रुदमना ! आमचे पति-पुत्र, माता-पिता, भाऊबंद किंवा हितचिंतकसुद्धा आता आमचा स्वीकार करणार नाहीत, तर मग दुसऱ्यांची काय कथा ? म्हणून आता आपल्या चरणांना शरण आलेल्या आम्हांला दुसऱ्या कोणालाही शरण जावे लागणार नाही, असे करा.'' (२९-३०)

श्रीभगवान म्हणाले- ''देवींनो ! तुमचे पति-पुत्र, माता-पिता, भाऊबंद किंवा इतर लोक, कोणीच तुमचा तिरस्कार करणार नाहीत. कारण तुम्ही माझ्याशी युक्त झाला आहात ! पहा ! हे देवही माझ्या म्हणण्याला अनुमोदन देत आहेत. देवींनो ! या संसारामध्ये माझ्या शरीराचा सहवास हाच काही माझ्या प्रेमाला किंवा अनुरागाला कारण ठरत नाही; म्हणून तुम्ही जा. आपले मन माझे ठिकाणी लावा. तुम्हांला लवकरच माझी प्राप्ती होईल.'' (३१-३२)

श्रीशुक म्हणतात- असे सांगितल्यावर त्या ब्राह्मणपत्न्या यज्ञशाळेत परत गेल्या. त्या ब्राह्मणांनी आपल्या पत्न्यांकडे दोषदृष्टीने न पाहाता त्यांच्यासह आपला यज्ञ पुरा केला. त्या स्त्रियांपैकी एकीला आधीच तिच्या पतीने कोंडून ठेवले. तेव्हा तिने पुष्कळ दिवसांपासून ऐकलेल्या भगवंतांच्या स्वरूपाचे ध्यान करून त्यांना मनोमन आलिंगन देऊन कर्मामुळे बनलेले आपले शरीर सोडले. इकडे भगवान श्रीकृष्णांनी, त्या चार प्रकारच्या अन्नाचे गोपालांना भोजन दिले आणि नंतर स्वत: भोजन केले. अशाप्रकारे लीलामनुष्य भगवान श्रीकृष्णांनी मनुष्यासारख्या लीला केल्या आणि आपले रूप, वाणी व कर्मांनी गाई, गोपाल आणि गोपींना आनंद देत ते स्वत:ही आनंदित झाले. (३३-३६)

इकडे ब्राह्मणांना जेव्हा माहीत झाले की, श्रीकृष्ण तर स्वत: भगवान आहेत, तेव्हा त्यांना अतिशय पश्चात्ताप झाला. ते विचार करू लागले की, जगदीश्वर भगवान श्रीकृष्ण आणि बलराम यांच्या आज्ञेचे उल्लंघन करून आम्ही फार मोठा अपराध केला आहे. ते तर, मनुष्यासारखी लीला करीत असूनही परमेश्वरच आहेत. आपल्या पत्नींची

भगवंतांविषयी अलौकिक भक्ती असून आपण मात्र त्याबाबत अगदी कोरडे आहोत, हे लक्षात येऊन ते पश्चात्ताप होऊन स्वत:चीच निंदा करू लागले. ते म्हणू लागले, ''अरेरे ! आम्ही भगवान श्रीकृष्णांना विन्मुख झालो, म्हणून आमचा जन्म, गायत्री मंत्र, वेदाध्ययन, बहुश्रुतपणा, उच्च घराणे, कर्मकांडात नैपुण्य या सर्वांचा धिक्कार असो ! धिक्कार असो !! भगवंतांची माया योगी लोकांनाही मोहित करते, हेच खरे. म्हणूनच तर आम्ही मनुष्यांचे गुरू ब्राह्मण असून आमचा खरा स्वार्थ आम्हांला कळला नाही. अहो, पहा ना ! या स्त्रिया असूनही जगद्गुरू श्रीकृष्णांबद्दलच्या अगाध प्रेमाने प्रपंच नावाचा मृत्यूचा पाशसुद्धा यांनी तोडून टाकला. यांचे उपनयन झाले नाही की यांनी गुरुकुलामध्ये निवास केला नाही. तपश्चर्या केली नाही की, आत्म्यासंबंधी काही विचार केला नाही. यांच्यामध्ये तशी पवित्रताही नाही किंवा यांनी कोणतीही सत्कर्मे केलेली नाहीत. तरीसुद्धा योगेश्वरांचे ईश्वर, पुण्यकीर्ती भगवान श्रीकृष्णांच्या चरणी यांची दृढ भक्ती आहे; आणि आम्ही संस्कार वगैरेंनी संपन्न आहोत, तरीसुद्धा भगवंतांवर आमचे प्रेम नाही. गृहस्थीच्या कामांत गुंतून आत्मकल्याणाला पारख्या झालेल्या आम्हांला गोपाळांकरवी भगवंतांनी आपली आठवण करून दिली. केवढी ही त्यांची कृपा ! भगवान स्वत: पूर्णकाम असून भक्तांच्या मोक्षापर्यंत सर्व कामना पूर्ण करण्यास समर्थ आहेत. आमच्यावर अहैतुक कृपा करण्याखेरीज आमच्यासारख्या क्षुद्र जीवांच्या बाबतीत त्यांचे दुसरे काय प्रयोजन असणार ? म्हणून त्यांनी याच उद्देशाने केलेली ही लीलाच म्हणावी लागेल ! स्वत: लक्ष्मी इतर देवांना सोडून आणि आपल्या चंचलता, गर्व इत्यादी दोषांचा त्याग करून ज्यांच्या चरणकमलांच्या निरंतर स्पर्शाच्या लोभाने सेवा करीत असते, तेच प्रभू दुसऱ्याकडे अन्नाची याचना करतात, हे लोकांना भुलविणेच नव्हे काय ? देश, काल, वेगवेगळी द्रव्ये, मंत्र, अनुष्ठानाची पद्धत, ऋत्विज, अग्नी, देव, यजमान, यज्ञ आणि धर्म हे सर्व काही भगवंतांचेच स्वरूप आहे. तेच योगेश्वरांचेसुद्धा ईश्वर साक्षात भगवान विष्णू स्वत: श्रीकृष्णांच्या रूपाने यदुवंशामध्ये अवतीर्ण झाले आहेत, ही गोष्ट आम्ही ऐकली होती. परंतु आम्ही मूर्खांनी मात्र त्यांना ओळखले नाही. आमचे भाग्य खरेच थोर म्हणून आम्हांला अशा पत्न्या मिळाल्या. त्यांच्या भक्तीमुळे भगवान श्रीकृष्णांविषयी आमचीही भक्ती निश्चल झाली. नित्यज्ञानसंपन्न भगवन श्रीकृष्ण ! आपल्याला नमस्कार असो. आपल्याच मायेने आमची बुद्धी मोहित होऊन आम्ही कर्मांच्या व्यापामध्ये भटकत आहोत. ते आमच्या या अपराधाची क्षमा करोत. कारण आमची बुद्धी त्यांच्या मायेने मोहित झाल्यामुळे त्यांचा प्रभाव जाणू शकली नाही.'' (३७-५१)

श्रीकृष्णांचा तिरस्कार केल्यामुळे आपला अपराध आठवून त्यांना श्रीकृष्ण-बलरामांच्या दर्शनाची इच्छा उत्पन्न झाली. परंतु कंसाच्या भीतीने ते त्यांच्या दर्शनाला गेले नाहीत. (५२)

अध्याय तेविसावा समाप्त

अध्याय चोविसावा

इंद्रयज्ञ-निवारण

श्रीशुक म्हणतात- भगवान श्रीकृष्ण बलरामांच्या सह वृंदावनामध्येच राहात होते. एके दिवशी त्यांनी पाहिले की, सर्व गोप इंद्रयज्ञ करण्याची तयारी करीत आहेत. भगवान श्रीकृष्ण सर्वांचे अंतर्यामी आणि सर्वज्ञ असल्यामुळे त्यांना ते माहीत होते, तरीसुद्धा विनम्रभावाने त्यांनी नंदबाबा इत्यादी

वृद्ध गोपांना विचारले. ''तात ! ही कोणत्या यज्ञाची गडबड चालू आहे ?त्याचे फळ काय ? कोणाला उद्देशून व कोणत्या साधनांनी हा यज्ञ केला जाणार आहे ? आपण मला सांगाल का ? बाबा ! हे ऐकण्याची मला अतिशय उत्कंठा आहे. जे संत पुरुष सर्वांना आपला आत्मा मानतात, ज्यांच्या दृष्टीत आपला आणि परका असा भेद नसतो, म्हणून ज्याला कोणी मित्र, शत्रू वा तिऱ्हाईत नसतो, त्याच्यापासून लपवून ठेवावी अशी कोणतीच गोष्ट नसते. परंतु असे नसेल, तर मात्र कोणतेही रहस्य शत्रूप्रमाणेच तिऱ्हाइतालाही सांगता कामा नये. मित्र तर स्वत:सारखाच असतो. म्हणून त्याच्यापासूनही कोणतीही गोष्ट लपवून ठेवू नये. हा संसारी मनुष्य समजून किंवा न समजता अनेक प्रकारच्या कर्मांचे अनुष्ठान करतो. त्यांपैकी समजून करणाऱ्यांची कर्मे जशी सफल होतात, तशी न समजता करणाऱ्यांची होत नाहीत. तर आपण जो यज्ञ करणार आहात, तो विचारपूर्वक आहे, की रूढी म्हणून आहे, हे मी जाणू इच्छितो. आपण मला सयुक्तिक सांगा.'' (१-७)

नंद म्हणाले- ''देवराज इंद्र ही पर्जन्यदेवता आहे. मेघ हे त्याचे स्वत:चेच रूप आहे. सर्व प्राण्यांना तृप्त करणारे आणि जीवनदान देणारे जे पाणी, त्याचा ते वर्षाव करतात. बाळा ! आम्ही आणि अन्य काही माणसे त्या मेघपती इंद्राची पाण्यापासूनच उत्पन्न झालेल्या पदार्थांनी यज्ञ करून पूजा करीत असतो. यज्ञ केल्यानंतर जे शिल्लक राहाते, त्याच अन्नाने सर्वजण धर्म, अर्थ आणि काम या तीन पुरुषार्थांच्या सिद्धीसाठी आपला जीवन-निर्वाह चालवितात. मनुष्यांच्या प्रयत्नांना फळ देणारा पाऊसच होय. कुलपरंपरेने चालत आलेला हा धर्म जो मनुष्य काम, लोभ, भय किंवा द्वेष या भावनेने सोडून देतो, त्याचे कधी कल्याण होत नाही.'' (८-११)

श्रीशुक म्हणतात- श्रीकृष्णाने नंद आणि अन्य व्रजवासींचे हे म्हणणे ऐकून इंद्राला क्रोध आणीत वडिलांना म्हटले. (१२)

श्रीभगवान म्हणाले- प्राणी आपल्या कर्मानुसारच जन्म घेतो आणि कर्मानेच मरतो. त्याला त्याच्या कर्मानुसारच सुख-दु:ख, भय आणि कल्याण यांची प्राप्ती होते. ईश्वर म्हणून जर कोणी असेल, तर जीवांनी केलेल्या कर्माचे फळ देणाराच ईश्वर होय. तो कर्म करणाऱ्यांनाच त्यांच्या कर्मानुसार फळ देतो. कर्म न करणाऱ्यांवर त्याचे काही चालत नाही. जर सर्व प्राणी आपापल्या कर्मांचेच फळ भोगत असतील तर आम्हांला इंद्राची काय आवश्यकता ? पूर्वसंस्कारानुसार प्राप्त होणाऱ्या माणसांच्या कर्मफलाला जर तो बदलू शकत नसेल, तर तो कशाला हवा ? मनुष्य आपल्या पूर्वसंस्कारांच्या अधीन आहे. तो त्यानुसारच वागतो. देव, असुर, मनुष्य या सर्वांसह हे जग स्वभावावरच अवलंबून असते. जीव आपल्या कर्मानुसारच उत्तम किंवा कनिष्ठ शरीर ग्रहण करतो आणि सोडतो. कर्मानुसारच शत्रू, मित्र, उदासीन असा व्यवहार करतो. किंबहुना कर्मच गुरू आहे आणि कर्मच ईश्वर आहे. म्हणून मनुष्याने पूर्वसंस्कारानुसार आपला वर्ण आणि आश्रम याला अनुकूल अशा धर्माचे पालन करीत कर्माचाच आदर करावा. जेणेकरून मनुष्याचे जीवन सुलभतेने चालेल तीच त्याची इष्टदेवता होय. जसे, जाराशी सहवास करणाऱ्या स्त्रीला कधीही शांती मिळत नाही, त्याचप्रमाणे जो मनुष्य आपले जीवन चालविणाऱ्या एका देवतेला सोडून अन्य देवाची उपासना करतो, त्यापासून त्याला कधीच सुख मिळत नाही. ब्राह्मणांनी वेदांचे अध्ययन-अध्यापन करून, क्षत्रियांनी पृथ्वीचे पालन करून, वैश्यांनी व्यापार करून आणि शूद्रांनी तीन वर्णांची सेवा करून आपला जीवननिर्वाह करावा.

वैश्यांचे व्यवसाय चार प्रकारचे आहेत. शेती, व्यापार, गुरांचे पालन आणि सावकारी. आम्ही त्यांपैकी फक्त गोपालनच नेहमी करीत आलो आहोत.

सत्त्वगुण, रजोगुण आणि तमोगुण हे या संसाराच्या स्थिती, उत्पत्ती आणि विनाश यांना कारणीभूत आहेत. हे विविध प्रकारचे संपूर्ण जग स्त्री-पुरुषांच्या संयोगाने रजोगुणामुळे उत्पन्न होते. त्या रजोगुणाच्या प्रेरणेने मेघ सगळीकडे पाऊस पाडतात. त्यापासून अन्न आणि अन्नापासून सर्व जीवांची उपजीविका चालते. यात इंद्र काय करतो ? (१३-२३)

तात ! आमच्याजवळ नगरे नाहीत, गावे नाहीत की घरेही नाहीत. आम्ही कायमचे वनवासी. जंगले, पर्वत हीच आमची घरे होत. म्हणून आपण गाई, ब्राह्मण आणि पर्वत यांच्याच पूजेला आरंभ करू. इंद्रयज्ञासाठी जी सामग्री गोळा केली आहे, त्यातूनच या यज्ञाचे अनुष्ठान होऊ द्या. वरण, शिरा, अनरसे, करंज्या, खीर इत्यादी अनेक प्रकारचे अन्नपदार्थ बनवा. सर्व दूधही बरोबर घ्या. वेदज्ञ ब्राह्मणांच्या द्वारा चांगल्या रीतीने अग्नीत हवन करा आणि तुम्ही त्यांना अनेक प्रकारचे अन्न, गाई आणि दक्षिणा द्या. याखेरीज चांडाळ, पतित इत्यादींपासून कुत्र्यांपर्यंत सर्व प्राण्यांना यथायोग्य अन्न देऊन गाईना चारा घालावा आणि गोवर्धन पर्वताची पूजा करावी. सर्वांनी अंगाला सुगंधी उटी लावून सुंदर वस्त्रे परिधान करून, अलंकार घालावेत आणि भोजन करून गायी, ब्राह्मण, अग्नी व गोवर्धनाला प्रदक्षिणा घालावी. बाबा ! माझे तर मत असे आहे. जर आपणाला योग्य वाटत असेल, तर तसे करा. हा यज्ञ गाई, ब्राह्मण, पर्वत यांना आणि मलासुद्धा अतिशय प्रिय आहे. (२४-३०)

श्रीशुक म्हणतात- कालरूप भगवंतांनी, इंद्राची घमेंड उतरवण्यासाठी जे सांगितले, ते नंदादी गोपांनी मनापासून स्वीकारले. भगवान श्रीकृष्णांनी जसे सांगितले होते, तसेच सर्व केले. अगोदर ब्राह्मणांकडून स्वस्तिवाचन करवून घेऊन इंद्रयज्ञाच्या सामग्रीने पर्वताला आणि ब्राह्मणांना आदरपूर्वक भेटवस्तू दिल्या. तसेच गुरांना चारा घातला. नंतर त्यांनी गुरांना पुढे घालून गोवर्धनाला प्रदक्षिणा घातली. ब्राह्मणांचे आशीर्वाद घेऊन आणि चांगल्या तऱ्हेने साजशृंगार करून गोपी-गोप, बैल जुंपलेल्या गाड्यांमध्ये बसून, भगवान श्रीकृष्णांच्या लीलांचे गायन करीत गिरिराजाची प्रदक्षिणा करू लागले. श्रीकृष्णच पर्वतावर गोपांचा विश्वास बसेल असे दुसरे विशाल शरीर धारण करून प्रगट झाले आणि ''मीच गोवर्धन आहे'' असे म्हणत सर्व अन्न खाऊ लागले. भगवान श्रीकृष्णांनी आपल्या त्या स्वरूपाला इतर व्रजवासींसह स्वत:सुद्धा नमस्कार केला आणि म्हणू लागले- ''पहा ! केवढे आश्चर्य आहे ! या गिरिराजाने साक्षात प्रगट होऊन आमच्यावर कृपा केली आहे. पाहिजे तसे रूप धारण करू शकणारा हा पर्वत, जे वनवासी याचा अनादर करतात, त्यांना नष्ट करतो. म्हणून आपले आणि गुरांचे कल्याण होण्यासाठी आपण याला नमस्कार करू या.''

अशा प्रकारे श्रीकृष्णांच्या प्रेरणेने त्या गोपांनी गोवर्धन, गाई आणि ब्राह्मणांची विधिपूर्वक पूजा केली आणि नंतर श्रीकृष्णांसह सर्वजण व्रजामध्ये परत आले. (३१-३८)

अध्याय चोविसावा समाप्त

अध्याय पंचविसावा

गोवर्धन-धारण

श्रीशुक म्हणतात- परीक्षिता ! आपली पूजा करणे बंद केले आहे, असे इंद्राला समजताच तो श्रीकृष्ण ज्यांचे रक्षणकर्ते आहेत, त्या नंद इत्यादी गोपांवर रागावला. इंद्र स्वत:लाच त्रैलोक्याचा ईश्वर समजत असे. त्याने संतापून प्रलय करणाऱ्या मेघांच्या सांवर्तक नावाच्या गणाला, गोकुळात पाऊस

पाडण्याची आज्ञा दिली आणि म्हटले, ''या जंगली गवळ्यांना केवढी ही संपत्तीची नशा चढली आहे, पहावा ! यांनी साधारण मनुष्य असणाऱ्या श्रीकृष्णाच्या बळावर देवराजाचा अपमान केला ! जसे या जगात काही लोक भवसागर पार करण्यासाठी अयशस्वी ब्रह्मविद्या हे खरे साधन सोडून फुटक्या नावेसारख्या असणाऱ्या असमर्थ कर्ममय यज्ञांनी या घोर संसारसागराला पार करू इच्छितात. कृष्ण हा एक बडबड करणारा पोरकट, अभिमानी आणि मूर्ख असूनसुद्धा स्वत:ला मोठा ज्ञानी समजतो. अशा मनुष्य असणाऱ्या कृष्णाचा आश्रय घेऊन या गवळ्यांनी माझी अवहेलना केली आहे. धनाची नशा चढलेल्या व कृष्णाने भडकावलेल्या यांची ही धनाची घमेंड जिरवा. तसेच यांच्या जनावरांचा संहार करा. तुमच्या पाठोपाठ मीसुद्धा ऐरावत हत्तीवर बसून नंदाच्या व्रजाचा नाश करण्यासाठी महापराक्रमी मरुद्गणांसह येत आहे.'' (१-७)

श्रीशुक म्हणतात- इंद्राने अशी आज्ञा दिली आणि मेघांचे बंधन काढून घेतले. तेव्हा ते जोराने मुसळधार पाऊस पाडून नन्दांच्या गोकुळाला पीडा देऊ लागले. विजा चमकू लागल्या, ढग एकमेकांवर आपटून गडगडाट करू लागले आणि प्रचंड वाऱ्याने ढकलले जाऊन मोठमोठ्या गारा पाडू लागले. अशा प्रकारे ढगांचे थव्यामागून थवे वारंवार येऊन खांबाएवढ्या पावसाच्या धारा पाडू लागले, तेव्हा व्रजभूमी पाण्याने भरून गेली आणि उंचसखल भाग दिसेनासे झाले. अतिवृष्टी आणि झंझावातामुळे जनावरे थरथर कापू लागली. तसेच गोपी-गोप थंडीने काकडून जाऊन श्रीकृष्णांना शरण गेले. मुसळधार पावसाने जेरीस आल्यामुळे सर्वांनी आपापली मस्तके झुकवून आणि मुलांना पोटाशी धरून थरथर कापत ते भगवंतांच्या चरणांजवळ आले. आणि म्हणाले, ''कृष्णा ! कृष्णा ! प्रभो ! या गोकुळाचा स्वामी तूच आहेस. हे भक्तवत्सला ! इंद्राच्या क्रोधापासून आमचे रक्षण कर.'' भगवंतांनी पाहिले की, मुसळधार पाऊस आणि गारांच्या माऱ्याने व्याकूळ होऊन सर्वजण बेहोश होत आहेत. ही सर्व रागावलेल्या इंद्राचीच करामत आहे, हे त्यांना कळले.

''आम्ही इंद्राचा यज्ञ बंद पाडला, म्हणून तो व्रजाचा नाश करण्यासाठी पावसाळा नसतानाही सोसाट्याचा वारा आणि प्रचंड गारांचा वर्षाव करू लागला आहे. ठीक आहे ! मी आपल्या योगमायेने याचा प्रतिकार करीन. स्वत:च्या मूर्खपणामुळे हे स्वत:ला लोकपाल समजतात. यांचा हा ऐश्वर्याचा गर्व व अज्ञान मी आता नाहीसे करतो. सत्त्वगुणी देवांना ऐश्वर्याचा अभिमान वाटता कामा नये. सत्त्वगुणापासून च्युत झालेल्या देवांचा मी मानभंग करीन. यामुळे त्यांना शेवटी शांतीच मिळेल. हे गोकुळ माझे आश्रित आहे. मी याचा आपलेपणाने स्वीकार केला आहे आणि मीच याचा रक्षणकर्ता आहे. म्हणून मी आपल्या योगमायेने याचे रक्षण करीन. हे तर माझे व्रत आहे.'' (८-१८)

असे म्हणून श्रीकृष्णांनी सहजपणे एकाच हाताने गोवर्धन पर्वत उखडून लहान मुलाने पावसाळी छत्री हातात घ्यावी, तसा तो पर्वत वर धरला. नंतर भगवान गोपांना म्हणाले- ''आई, बाबा आणि व्रजवासियांनो ! तुम्ही आपल्या गुरांसह या पर्वताच्या खाली आरामात बसा. माझ्या हातावरून हा पर्वत खाली पडेल अशी भीती बाळगू नका. आता वाऱ्याची आणि पावसाचीही भीती नको. तुमच्या रक्षणासाठी मी ही युक्ती योजिली आहे.'' श्रीकृष्णांनी जेव्हा असा धीर दिला, तेव्हा सर्व गवळी आपापली गुरे, छकडे आणि परिवाराला आपल्याबरोबर घेऊन सोयीनुसार गोवर्धन पर्वताच्या खाली गेले. सगळे व्रजवासी तहान-भुकेची व्यथा किंवा विश्रांतीची आवश्यकता विसरून श्रीकृष्णांकडेच पाहात राहिले. त्यांनी सलग सात दिवस तो पर्वत उचलून धरला. या दिवसांत एक पाऊलभरसुद्धा ते इकडे तिकडे

हालले नाहीत. श्रीकृष्णांच्या योगमायेचा हा प्रभाव पाहून इंद्राच्या आश्चर्याला पारावार राहिला नाही. त्याचा संकल्प धुळीला मिळाला. त्यामुळे त्याचा गर्व जिरला. त्याने आपल्या मेघांना आवरले. ते भयंकर तुफान आणि घनघोर पाऊस पडणे बंद झाले असून आकाशातून ढग निघून गेले आहेत आणि सूर्यही दिसू लागला आहे, असे पाहून गोवर्धनधारी श्रीकृष्ण गोपांना म्हणाले. ''प्रिय गोपांनो ! आता तुम्ही निर्भयपणे आपल्या स्त्रिया, गोधन, मुले वगैरेंना घेऊन बाहेर या. पहा ! तुफान व पाऊस बंद झाला असून नद्यांचे पाणीसुद्धा ओसरले आहे.'' तेव्हा ते गोप आपापले गोधन, स्त्रिया, मुले आणि वृद्ध यांना बरोबर घेऊन तसेच आपले सामान छकड्यांत ठेवून हळू हळू बाहेर आले. सर्वशक्तिमान भगवान श्रीकृष्णांनीसुद्धा सर्वांच्या देखत सहजपणे तो पर्वत त्याच्या जागेवर पूर्ववत ठेवला. (१९-२८)

व्रजवासींची मने प्रेमावेगाने भरून आली होती. श्रीकृष्णांकडे धावतच येऊन कोणी त्यांना कडकडून मिठी मारली, तर कोणी त्यांचे चुंबन घेतले. वयस्कर गोपींनी अतिशय आनंदाने प्रेमपूर्वक दही, तांदूळ, पाणी इत्यादी घेऊन त्यांचा मंगलविधी केला आणि त्यांना शुभाशीर्वाद दिले. यशोदा, रोहिणी, नंद आणि बलवानांमध्ये श्रेष्ठ असे बलराम यांनी प्रेमविह्वल होऊन श्रीकृष्णांना हृदयाशी कवटाळून आशीर्वाद दिले. परीक्षिता ! त्यावेळी आकाशात आलेले देव, साध्य, सिद्ध, गंधर्व, चारण इत्यादींनी प्रसन्न होऊन भगवंतांची स्तुती करीत त्यांच्यावर फुलांचा वर्षाव केला. राजन ! स्वर्गामध्ये देव शंख आणि नौबती वाजवू लागले आणि तुंबुरु इत्यादी गंधर्वराज गायन करू लागले. हे राजा ! नंतर श्रीकृष्ण, बलराम व प्रेमळ गोप यांच्यासह व्रजाकडे जावयास निघाले. त्यांच्याबरोबरच प्रेमळ गोपी आपले हृदय आकर्षित करणाऱ्या भगवंतांच्या गोवर्धनधारण इत्यादी लीलांचे गायन करीत मोठ्या आनंदाने व्रजामध्ये परत आल्या. (२९-३३)

अध्याय पंचविसावा समाप्त

अध्याय सव्विसावा

श्रीकृष्णांच्या प्रभावाविषयी गोपांचा नंदांशी वार्तालाप

श्रीशुक म्हणतात- श्रीकृष्णांची अशी अलौकिक कृत्ये पाहून गोपांना अतिशय आश्चर्य वाटले. त्यांच्या शक्तीची त्यांना कल्पना नसल्यामुळे ते एकत्र येऊन आपापसात म्हणू लागले. ''या मुलाची ही कृत्ये अतिशय आश्चर्यजनक आहेत. आमच्यासारख्या खेडवळ लोकांमध्ये याने जन्म घेणे ही त्याला कमीपणा आणणारी गोष्ट आहे. त्याला हे कसे योग्य आहे ? जसे हत्तीने सोंडेने कमळ उपटून वर धरावे, तसा या सात वर्षांच्या बालकाने एकाच हाताने गिरिराज उखडून सहजपणे कसा काय हातावर तोलला ? जेव्हा हा पाळण्यात होता, त्यावेळी भयंकर राक्षसी पूतना आली असता याने डोळे मिटूनच, काळाने शरीराचे आयुष्य प्यावे, तसे तिच्या स्तनातील दूध प्राणांसह प्राशन केले. जेव्हा हा फक्त तीन महिन्यांचा होता आणि छकड्याखाली झोपला होता, तेव्हा रडत-रडतच हा वर पाय हालवत असता त्याच्या ठोकरण्याने तो छकडा उलटून पडला. जेव्हा तृणावर्त दैत्याने वावटळीच्या रूपाने हा बसला असतानाच याला उचलून आकाशात नेले होते, तेव्हा हा फक्त एक वर्षाचा होता. त्यावेळी याने त्या तृणावर्त दैत्याचा गळा घोटून त्याला ठार मारले. एकदा लोणी

चोरल्यामुळे आईने त्याला उखळाला बांधले होते, तेव्हा याने दोन्ही अर्जुन वृक्षांच्यामधून रांगत जाता जाता ते वृक्ष उखडून टाकले. गोपाल आणि बलराम यांच्यासह हा जेव्हा वासरे चारण्यासाठी वनामध्ये गेला होता, तेव्हा याला मारण्यासाठी एक दैत्य बगळ्याच्या रूपाने आला आणि याने दोन्ही हातांनी त्याचे दोन्ही जबडे पकडून त्याला गवताच्या काडीप्रमाणे चिरून टाकले. जेव्हा याला मारण्याच्या हेतूने एक दैत्य वासराच्या रूपामध्ये वासरांच्या कळपात घुसला होता, त्यावेळी याने त्या दैत्याला मारून कवठांच्या झाडावर आपटून ती झाडेही उखडून टाकली. याने बलरामासह गाढवाच्या रूपात राहाणाऱ्या धेनुकासुराला व त्याच्या बांधवांना मारून टाकले आणि पिकलेल्या फळांनी परिपूर्ण असे ताडवन सर्वांसाठी उपयोगी बनविले. यानेच बलशाली बलरामाकडून क्रूर प्रलंबासुराला मारले. तसेच दावानलातून गुरांची आणि गोपालांची सुटका केली. यमुनेच्या डोहात वास्तव्य करणाऱ्या विषारी कालियाचे गर्वहरण करून बळजबरीने त्याला डोहातून हाकलून लावले आणि यमुनेचे पाणी विषरहित केले. नंदबाबा ! तुमच्या या मुलावर आम्हा सर्व व्रजवासियांचे अत्यंत प्रेम आहे आणि याचेसुद्धा आमच्यावर स्वाभाविक प्रेम आहे. याचे कारण काय ? कुठे हा सात वर्षांचा बालक आणि कुठे ते एवढा मोठा पर्वत उचलून धरणे ! व्रजराज ! म्हणूनच तुमच्या या पुत्रासंबंधी आम्हांला काही कळेनासे झाले आहे. (१-१४)

नंद म्हणाले - गोपांनो ! महर्षी गर्गांनी या बालकाला पाहून याच्याविषयी जे म्हटले होते, ते ऐका, म्हणजे या मुलाविषयीची तुमची शंका दूर होईल.

''तुझा हा मुलगा प्रत्येक युगामध्ये शरीर धारण करतो. वेगवेगळ्या युगांमध्ये याचे शुभ्र, लाल आणि पिवळा हे रंग होते. यावेळी हा काळा झाला आहे. हा तुझा पुत्र आधी कधीतरी वसुदेवाच्या घरीसुद्धा जन्माला आला होता. म्हणून हे रहस्य माहीत असणारे लोक याला श्रीमान वासुदेव असेही म्हणतात. तुझ्या मुलाची गुण आणि कर्मांना अनुरूप अशी आणखी पुष्कळशी नावे आणि रूपे आहेत. ती मी जाणतो, परंतु इतरांना माहीत नाहीत. सर्व गोप आणि गोकुळाला आनंद देणारा हा तुमचे कल्याण करील. याच्या साहाय्याने तुम्ही सर्व संकटांमधून सहजपणे निभावून जाल.

हे व्रजराज ! पूर्वी एकदा पृथ्वीवर कोणी राजा राहिला नव्हता. डाकूंनी चारी बाजूंनी लुटालूट चालविली होती. तेव्हा तुझ्या या पुत्राने सज्जनांचे रक्षण केले आणि याच्यापासून शक्ती प्राप्त करून घेऊन त्या लोकांनी लुटारूंवर विजय मिळविला. जे मानव तुझ्या या मुलावर प्रेम करतील, ते भाग्यवान होत ! ज्याप्रमाणे विष्णुभक्तांना असुर जिंकू शकत नाहीत, त्याचप्रमाणे याच्यावर प्रेम करणाऱ्यांना शत्रू जिंकू शकत नाहीत. नंदबाबा ! गुण, ऐश्वर्य, सौंदर्य, कीर्ती आणि प्रभाव या सर्व बाबतीत तुझा हा बालक भगवान नारायणांच्या समानच आहे. म्हणून तुम्हांला याच्या कृत्यांचे आश्चर्य वाटायला नको.''

असे मला सांगून गर्गाचार्य आपल्या घरी निघून गेले. तेव्हापासून मी सुखद कृत्ये करणाऱ्या या मुलाला भगवान नारायणांचाच अंश मानतो. व्रजवासियांनी जेव्हा नंदांच्या तोंडून गर्गाचार्यांचे हे कथन ऐकले, तेव्हा त्यांचा विस्मय नाहीसा झाला. कारण आता त्यांनी अपरिमित तेजस्वी अशा श्रीकृष्णांचा प्रभाव पूर्णपणे पाहिला आणि ऐकला होता. त्यामुळे मोठ्या आनंदाने त्यांनी नंद आणि श्रीकृष्णांची मनोमन पूजा केली. (१५-२४)

आपला यज्ञ न केल्याकारणाने जेव्हा इंद्र क्रोधाने विजा, गारा आणि तुफानी वारा यांच्यासह मुसळधार पाऊस पाडू लागला, तेव्हा स्त्रिया, जनावरे व

गवळी अत्यंत दु:खी झाले होते. आपलाच आधार असणाऱ्या व्रजवासियांची ही अवस्था पाहून भगवंतांचे हृदय करुणेने भरून आले. परंतु लगेच मंद हास्य करीत, एखाद्या मुलाने पावसाळी छत्रीचे फूल धरावे, त्याप्रमाणे त्यांनी एकाच हाताने पर्वत उपटून उचलून धरला आणि गोकुळाचे रक्षण केले. इंद्राची घमेंड धुळीला मिळविणारे तेच भगवान गोविंद आमच्यावर प्रसन्न होवोत. (२५)

अध्याय सव्विसावा समाप्त

अध्याय सत्ताविसावा

श्रीकृष्णांना अभिषेक

श्रीशुकाचार्य म्हणतात- श्रीकृष्णांनी गोवर्धन पर्वत उचलून धरून मुसळधार पावसापासून गोकुळाचे रक्षण केले, तेव्हा त्यांच्याकडे गोलोकातून कामधेनू आणि स्वर्गातून इंद्र आला. भगवंतांची अवहेलना केल्यामुळे इंद्र अतिशय लज्जित झाला होता. म्हणून त्याने एकांत स्थानी भगवंतांकडे जाऊन आपल्या सूर्याप्रमाणे तेजस्वी असलेल्या मुकुटाने त्यांच्या चरणांना स्पर्श केला. परम तेजस्वी भगवान श्रीकृष्णांचा प्रभाव पाहून-ऐकून आपणच तिन्ही लोकांचा स्वामी असल्याचा इंद्राचा गर्व नाहीसा झाला. आता तो हात जोडून त्यांची स्तुती करू लागला. (१-३)

इंद्र म्हणाला- "भगवन ! आपले स्वरूप परम शांत, ज्ञानमय, रजोगुण-तमोगुणरहित तसेच विशुद्ध सत्त्वमय आहे. गुणांमुळे प्रवाहरूपाने भासणारा हा मायामय प्रपंच सर्वज्ञ अशा आपल्या ठिकाणी नाही. कारण तो अज्ञानामुळे उत्पन्न होणारा आहे. देहसंबंधामुळे उत्पन्न होणारे व दुसऱ्या देहाच्या उत्पत्तीला कारण असणारे लोभादी दोष अज्ञानी लोकांच्या ठिकाणीच असतात. सर्वज्ञ अशा आपल्यामध्ये ते कोठून असणार ? तरीसुद्धा धर्माचे रक्षण आणि दुष्टांचा नाश करण्यासाठीच आपण शासन करीत असता. आपण जगाचे पिता, गुरू, स्वामी आणि शासन करणारे दुस्तर असे काल आहात. आपण लोककल्याणासाठी स्वेच्छेने लीला-शरीर प्रगट करून स्वत:लाच ईश्वर समजणाऱ्यांचा मान नष्ट करीत अनेक प्रकारच्या लीला करीत असता. माझ्यासारखे जे अज्ञानी आणि स्वत:ला जगाचा ईश्वर मानणारे आहेत, त्यांना जेव्हा कळते की, भीतीच्या प्रसंगी सुद्धा आपण निर्भय असता, तेव्हा ते आपली घमेंड सोडून देतात आणि गर्वरहित होऊन आपल्या भक्तीच्या मार्गाचा आश्रय घेतात. हे प्रभो ! आपली लीला ही दुष्टांनाही उपदेश देण्यासाठी असते. प्रभो ! ऐश्वर्याच्या मदामध्ये दंग होऊन मी आपला अपराध केला आहे, कारण आपला प्रभाव मला माहीत नव्हता. हे परमेश्वरा ! आपण मूर्ख असणाऱ्या माझ्या अपराधाची मला क्षमा करावी आणि पुन्हा मला अशी दुर्बुद्धी होऊ नये. हे इंद्रियातीत परमात्मन ! जे असुर सेनापती केवळ आपलेच पोट भरणारे आणि पृथ्वीला भारभूत झाले आहेत, त्यांच्या वधासाठी आणि आपल्या चरणांचे दास असणाऱ्यांच्या उत्कर्षासाठी आपला येथे अवतार झाला आहे. भगवन ! आपण पुरुषोत्तम असून सर्वात्मा वासुदेव आहात. आपण यदुवंशीयांचे स्वामी आणि सर्वांचे चित्त आकर्षित करणारे आहात. मी आपणास वारंवार नमस्कार करीत आहे. आपण आपल्या इच्छेनुसार शरीराचा स्वीकार केला आहे. आपले हे शरीरसुद्धा विशुद्ध ज्ञानस्वरूप आहे. आपण सर्व काही आहात, सर्वांचे कारण आहात आणि सर्वांचे आत्मा आहात. मी आपणास वारंवार

नमस्कार करीत आहे. भगवन ! मी अभिमानी आणि अतिशय क्रोधीसुद्धा आहे. म्हणूनच माझा यज्ञ केला नाही, असे पाहून मी मुसळधार पाऊस आणि तुफान यांच्याद्वारे सर्व व्रजमंडल नष्ट करण्याचे योजिले. परंतु प्रभो ! आपण माझ्यावर अतिशय कृपा केलीत. माझे प्रयत्न व्यर्थ झाल्याकारणाने माझी घमेंड मुळापासून उखडली गेली. आपण माझे स्वामी आहात. गुरू आहात आणि आत्मा आहात. मी आपल्याला शरण आलो आहे. (४-१३)

श्रीशुक म्हणतात- जेव्हा देवराज इंद्राने भगवान श्रीकृष्णांची अशी स्तुती केली, तेव्हा हसत हसत मेघाप्रमाणे गंभीर वाणीने ते त्याला म्हणाले.(१४)

श्रीभगवान म्हणाले- इंद्रा ! तू ऐश्वर्याने फार माजला होतास. म्हणूनच तुझ्यावर कृपा करून तुला माझे नित्य स्मरण राहण्यासाठी मी तुझा यज्ञ भंग केला. जो ऐश्वर्य आणि संपत्तीच्या मदाने आंधळा होतो, त्याला हे दिसत नाही की, मी परमेश्वर हातात दंड घेऊन त्याच्या शासनासाठी उभा आहे. मी ज्याच्यावर कृपा करू इच्छितो त्याचे ऐश्वर्य नाहीसे करतो. हे इंद्रा ! तुझे कल्याण असो. आता जा आणि माझ्या आज्ञेप्रमाणे वाग. तसेच कधीही गर्व न करता सावधपणे आपल्या अधिकाराचे पालन कर. (१५-१७)

नंतर मनस्विनी कामधेनूने आपल्या वासरांसह गोपवेषधारी परमेश्वर श्रीकृष्णांना वंदन केले आणि म्हणाली- हे श्रीकृष्णा ! आपण महायोगी आहात. आपण स्वत: विश्वरूप असून विश्वाचे परमकारण आहात. हे अच्युता ! संपूर्ण विश्वाचे स्वामी असलेल्या आपल्यामुळेच आम्ही सनाथ झालो आहोत. हे जगाचे स्वामी ! आपण आमचे परम दैवत आहात. आमचे आपणच इंद्र आहात. म्हणून आपणच गाय, ब्राह्मण, देव आणि साधुजनांच्या रक्षणासाठी आमचे इंद्र व्हा ! ब्रह्मदेवांच्या प्रेरणेने आम्ही गाई आपल्याला आमचा इंद्र मानून अभिषेक करू. हे विश्वात्मन ! आपण पृथ्वीचा भार उतरविण्यासाठीच अवतार धारण केला आहे. (१८-२१)

श्रीशुक म्हणतात- कामधेनूने भगवान श्रीकृष्णांना असे म्हणून आपल्या दुधाने आणि देवमातांच्या प्रेरणेने देवराज इंद्राने ऐरावताच्या सोंडेतून आणलेल्या आकाशगंगेच्या पाण्याने देवर्षींसह यदुनाथ श्रीकृष्णांना अभिषेक केला आणि त्यांना 'गोविंद' नाव ठेवले. त्यावेळी तेथे नारद, तुंबुरू इत्यादी गंधर्व, विद्याधर, सिद्ध आणि चारण आले होते, ते जगाचे पाप-ताप नाहीसे करणाऱ्या भगवंतांच्या यशाचे गायन करू लागले आणि अप्सरा आनंदाने नृत्य करू लागल्या. प्रमुख देवता भगवंतांची स्तुती करून त्यांच्यावर नंदनवनातील दिव्य फुलांचा वर्षाव करू लागल्या. तिन्ही लोकांमध्ये परमानंद ओसंडून वाहू लागला आणि गाईंच्या सडातून इतके दूध गळू लागले की, पृथ्वी ओलीचिंब झाली. नद्यांना वेगवेगळ्या रसांचा पूर आला. वृक्षांमधून मधाच्या धारा वाहू लागल्या. नांगरणी-पेरणी न करताही जमिनीतून अनेक प्रकारच्या औषधी, अन्न उत्पन्न झाले. पर्वतात दडून असलेली रत्ने बाहेर दिसू लागली. परीक्षिता ! भगवान श्रीकृष्णांना अभिषेक झाल्यानंतर जे जीव स्वभावत:च क्रूर होते, ते सुद्धा क्रूरपणा विसरले. अशा प्रकारे इंद्राने गायी आणि गोकुळाचे स्वामी श्रीगोविंदांना अभिषेक केला आणि त्यांची संमती घेऊन देव, गंधर्व इत्यादींसह तो स्वर्गाकडे निघून गेला. (२२-२८)

अध्याय सत्ताविसावा समाप्त

अध्याय अठ्ठाविसावा

नंदांना वरुण लोकातून सोडवून आणणे

श्रीशुक म्हणतात- नंदांनी एकादशीला उपवास करून भगवंतांची पूजा केली आणि त्या दिवशी रात्री द्वादशी लागल्यावर पारण्याचे स्नान करण्यासाठी यमुनेच्या पाण्यात प्रवेश केला. ही असुरांची वेळ आहे, हे लक्षात न आल्याने ते रात्रीच्या वेळीच यमुनेच्या पाण्यात उतरले. त्यावेळी वरुणाचा सेवक असलेल्या एका असुराने त्यांना पकडले आणि वरुणाकडे नेले. नंदबाबा न आढळल्याने गोप "कृष्णा ! बलरामा !" अशा हाका मारून 'नंदमहाराज कोठे दिसत नाहीत,' असे म्हणून रडू लागले. हे राजा ! श्रीकृष्णांनी जेव्हा त्यांचे रडणे ऐकले आणि आपल्या वडिलांना वरुणाकडे नेल्याचे त्यांना समजले, तेव्हा ते वरुणाकडे गेले. कारण प्रभू स्वकीयांना अभय देणारे होते ना ! श्रीकृष्ण आपल्याकडे आलेले पाहाताच त्यांच्या दर्शनाने अत्यानंद झालेल्या पश्चिम दिक्पाल वरुणाने त्यांची भव्य पूजा केली आणि म्हटले. (१-४)

वरुण म्हणाला- प्रभो ! आज माझे शरीर-धारणेचे सार्थक झाले. आज मला सर्व पुरुषार्थ प्राप्त झाले; कारण भगवन ! आपल्या चरणकमलांच्या सेवेची ज्यांना सुसंधी मिळते ते भवसागरातून तरून जातात. आपण परब्रह्म परमात्मा भगवान आहात. लोकसृष्टी निर्माण करणारी माया आपल्या ठिकाणी नाही, असे वेद प्रतिपादन करतात. मी आपणास नमस्कार करीत आहे. प्रभो ! माझा हा सेवक मूर्ख आहे. त्याला काय करावे, हे कळत नाही. तोच आपल्या वडिलांना नकळत घेऊन आला. आपण त्याबद्दल त्याला क्षमा करावी. हे पितृभक्त गोविंदा ! आपण आपल्या वडिलांना घेऊन जावे. हे सर्वसाक्षी श्रीकृष्णा ! आपण मज दासावरसुद्धा कृपा करावी. (५-८)

श्रीशुक म्हणतात- परीक्षिता ! ईश्वरांचे सुद्धा ईश्वर असणाऱ्या श्रीकृष्णांना वरुणाने अशा प्रकारे स्तुती करून प्रसन्न केले. यानंतर भगवान आपल्या वडिलांना घेऊन व्रजात परत आले आणि त्यांनी सर्वांना आनंदित केले. नंदांनी लोकपाल वरुणाचे पूर्वी कधी न पाहिलेले ऐश्वर्य पाहिले. तसेच तेथील लोक श्रीकृष्णांच्या चरणांवर नतमस्तक होत आहेत, हेही पाहिले. त्यांना अत्यंत आश्चर्य वाटले. घरी आल्यावर त्यांनी आपल्या बांधवांना ही हकीकत सांगितली. हे परीक्षिता ! हे ऐकून गोपांनी श्रीकृष्ण स्वत: भगवान आहेत, हे जाणले. त्यांनी मनातल्या मनात अत्यंत उत्सुकतेने असा विचार केला की, हे देवाधिदेव आपल्या ब्रह्मरूप स्वधामाला आपल्यालासुद्धा नेतील काय ? सर्वसाक्षी भगवान श्रीकृष्णांनी स्वत: आपल्या गोपांची ही इच्छा जाणली आणि त्यांचा संकल्प सिद्ध करण्यासाठी कृपायुक्त होऊन असा विचार केला. या जगामध्ये जीव अज्ञानाने शरीरालाच आत्मा मानून अनेक गोष्टींची इच्छा धरतो आणि त्यांची पूर्तता करण्यासाठी अनेक प्रकारची कर्मे करतो. त्यामुळे त्याचे फळ म्हणून तो श्रेष्ठ-कनिष्ठ योनींमध्ये भटकतो आणि आपल्या खऱ्या स्वरूपाला ओळखत नाही. (९-१३)

अशा प्रकारे विचार करून परमदयाळू भगवान श्रीकृष्णांनी त्या गोपांना मायेच्या पलीकडे असलेले आपले परमधाम दाखविले. भगवंतांनी प्रथम त्यांना ज्याचे स्वरूप सत्य, ज्ञान, अनंत, सनातन आणि ज्योति:स्वरूप आहे, तसेच समाधिनिष्ठ पुरुषच जे पाहू शकतात, त्या ब्रह्माचा साक्षात्कार करविला. भगवंतांनी अक्रूराला ज्या जलाशयात आपले स्वरूप दाखविले होते, त्याच ब्रह्मस्वरूप ब्रह्महृदामध्ये भगवान त्या गोपांना घेऊन गेले. तेथे त्यांनी त्यात

खुडी मारली. तेव्हा भगवंतांनी त्यांना त्यातून काढून आपल्या परमधामाचे दर्शन करविले. (१४-१६)

तो लोक पाहून नंद इत्यादी गोप परमानंदात निमग्न झाले. तेथे सर्व वेद श्रीकृष्णांची स्तुती करीत आहेत, हे पाहून ते सर्वजण अत्यंत आश्चर्यचकित झाले. (१७)

अध्याय अठ्ठाविसावा समाप्त

अध्याय एकोणतिसावा

रासलीलेचा प्रारंभ

श्रीशुक म्हणतात- शरद ऋतूतील पौर्णिमेची रात्र होती. मोगरा वगैरे सुगंधी फुले उमलली होती. ते पाहून भगवंतांनी योगमायेचा आश्रय करून, रासक्रीडा करण्याचा संकल्प केला. त्याचवेळी, फार दिवसांनी भेटलेल्या पतीने प्रियेच्या मुखाला केशर वगैरे लावून तिचा विरहताप दूर करावा, त्याप्रमाणे चंद्रमा पूर्वदिशेचे मुख आपल्या शीतल किरणरूप करांनी उदयकालीन रंगाने तांबूस करीत व चराचराचा ताप हरीत उदयाला आला. (१-२)

श्रीकृष्णांनी ताज्या केशरासारखे लालसर व लक्ष्मीच्या मुखकमलासारखे मनोहर पूर्ण चन्द्रबिंब आणि त्याच्या कोमल किरणांनी व्यापलेले वृंदावन पाहिले आणि वेणूवर व्रजसुंदरींना प्रिय असणारे गीत वाजविण्यास सुरवात केली. श्यामसुंदरांनी ज्यांचे मन आधीच आपल्या अधीन करून घेतले होते, त्या गोपी बासरीचे ते प्रेमवर्धक स्वर ऐकताच एकमेकींना न कळवताच प्रियतम जेथे होता, तिकडे जाण्यास निघाल्या. त्यावेळी भरभर चालण्याने त्यांच्या कानातील कुंडले झोके घेत होती.(३-४)

बासरीचे स्वर ऐकताच ज्या गोपी गाईंची धार काढीत होत्या, त्या अत्यंत उत्सुक होऊन धार काढणे अर्धवट टाकून निघाल्या. ज्या दूध तापवीत होत्या, त्या उतू जाणारे दूध तसेच सोडून, आणि ज्या लापशी करीत होत्या, त्या भांडे चुलीवरून खाली न उतरविताच निघाल्या. ज्या जेवावयास वाढीत होत्या, त्या वाढण्याचे काम सोडून, ज्या मुलांना दूध पाजीत होत्या त्या पाजणे सोडून, ज्या पतींची सेवा करीत होत्या त्या सेवा सोडून आणि ज्या स्वत: जेवीत होत्या, त्या भोजन करणे सोडून निघाल्या. काही गोपी आपल्या शरीराला चंदन आणि उटणे लावीत होत्या, तर काही डोळ्यांमध्ये काजळ घालीत होत्या. त्या ते करावयाचे सोडून आणि उलट-सुलट वस्त्रालंकार घालून श्रीकृष्णांकडे गेल्या. पतींनी, पित्यांनी, भाऊ आणि जाती-बांधवांनी त्यांना अडविले, तरी गोविंदाने चित्त हरण केल्यामुळे त्या इतक्या मोहित झाल्या होत्या की, त्या थांबल्या नाहीत. त्यावेळी काही गोपी घरांमध्ये होत्या. त्यांना बाहेर पडणे अशक्य झाले. तेव्हा त्यांनी आपले डोळे बंद केले आणि त्या अतिशय तन्मयतेने श्रीकृष्णांचे ध्यान करू लागल्या. आपल्या प्रियतम श्रीकृष्णांच्या असह्य विरहाच्या तीव्र वेदनांनी त्यांच्या हृदयात इतकी व्यथा निर्माण झाली की, त्यामुळे त्यांचे पाप भस्म होऊन गेले आणि ध्यानामध्ये श्रीकृष्णांना दिलेल्या आलिंगनाच्या सुखाने त्यांचे पुण्यही संपले. (अशा रीतीने पापपुण्य संपल्यामुळे त्यांचे गुणमय देह नाहीसे झाले.) जारबुद्धीने का असेना, त्या परमपुरुषाशी त्यांचे मिलन झाल्यामुळे त्यांचे कर्मबंधन तत्काळ नाहीसे झाले. त्यामुळेच त्यांनी त्रिगुणात्मक देहाचा त्याग केला (व त्या दिव्यदेही झाल्या.) (५-११)

राजाने विचारले- मुनिवर्य ! श्रीकृष्णांना गोपी फक्त आपला परम प्रियतमच मानीत होत्या. त्यांना

ते काही ब्रह्म वाटत नव्हते. अशा प्रकारे गुणांमध्येच आसक्त असणाऱ्या त्यांच्याबाबतीत गुणांचा प्रवाहरूप असलेल्या या संसाराची निवृत्ती होणे कसे शक्य आहे ? (१२)

श्रीशुक म्हणाले- मी तुला यापूर्वीच सांगितले होते की, चेदिराज शिशुपालाने भगवंतांबद्दल द्वेषभाव ठेवूनही त्याला भगवत्स्वरूपाची प्राप्ती झाली. तर मग ज्या गोपी श्रीकृष्णांवर अनन्य प्रेम करतात, त्या त्यांना प्राप्त होतील, यात काय आश्चर्य ! हे राजा ! अविनाशी, अनंत, निर्गुण असून त्रिगुणात्मक प्रकृतीचे नियंते असणाऱ्या भगवंतांचे प्रकट होणे, हे माणसांच्या परम कल्याणासाठीच आहे. म्हणून काम, क्रोध, भय, स्नेह, नातेसंबंध किंवा भक्ती यांपैकी कोणत्याही भावनेने भगवंतांशी नित्य जोडले गेलेले जीव त्या भगवंतांशी एकरूप होतात. तुला योगेश्वरांचे सुद्धा ईश्वर, अजन्मा भगवंतांच्या बाबतीत मुळीच आश्चर्य वाटायला नको. कारण त्यांच्या केवळ संकल्पाने स्थावरादिकही मुक्त होतात. त्या गोपी जवळ आलेल्या पाहून वक्त्यांत श्रेष्ठ असणाऱ्या भगवंतांनी आपल्या वाक्चातुर्याने त्यांना मोहित करीत म्हटले. (१३-१७)

श्रीभगवान म्हणाले- महाभाग्यवान गोपींनो ! तुमचे स्वागत असो. तुम्हांला आवडणारी कोणती गोष्ट मी करू ? व्रजामध्ये सर्व कुशल आहे ना ? यावेळी तुम्ही इकडे का आलात ? सांगा बरे ! हे सुंदरींनो ! आधीच ही रात्र भीतिदायक. त्यात यावेळी हिंस्र प्राणी इकडे तिकडे फिरत असतात. तुम्ही घरी परत जा. स्त्रियांनी येथे थांबणे बरे नव्हे. तुम्ही दिसत नाहीत, असे पाहून तुमचे आई-वडील, पति-पुत्र किंवा भाऊ तुम्हांला शोधतील. त्यांना घाबरवून सोडू नका. चंद्राच्या किरणांनी धवल झालेले, यमुनेवरील वाऱ्याच्या मंद गतीने हालणाऱ्या झाडांच्या पानांनी शोभणारे, फुलांनी बहरलेले हे वन तुम्ही पाहिले ना ! तर आता घरी परत जा. हे पतिव्रतांनो ! उशीर करू नका. आपल्या पतींची सेवा करा. तुमच्या घरांतील मुले रडत असतील, त्यांना दूध पाजा. आणि वासरे हंबरत असतील, त्यांना गायांजवळ सोडून गायांच्या धारा काढा. किंवा माझ्यावरील अत्यंत प्रेमाने पराधीन होऊन तुम्ही येथे आला असाल तर तेही योग्यच आहे. कारण जगातील सर्वच प्राणी माझ्यावर प्रेम करतात. कल्याणी गोपींनो ! पतीची आणि त्याच्या बांधवांची निष्कपटभावाने सेवा करणे आणि मुला-बाळांचे पालन-पोषण करणे हाच स्त्रियांचा श्रेष्ठ धर्म आहे. ज्या स्त्रियांना उत्तम लोक प्राप्त करून घेण्याची इच्छा असेल, त्यांनी पापी सोडून अन्य कोणत्याही प्रकारच्या पतीचा त्याग करू नये. मग तो वाईट स्वभावाचा, भाग्यहीन, वृद्ध, मूर्ख, रोगी किंवा निर्धन का असेना ! कुलीन स्त्रियांनी परपुरुषाकडे जाणे तर सर्वथैव निंद्यच आहे. हे कुकर्म स्वर्गप्राप्तीला विघातक, अपकीर्तिकारक, हीन, कष्टप्रद आणि नरकभयाला कारण आहे. गोपींनो ! माझ्या लीला आणि गुणांच्या श्रवणाने, रूपाच्या दर्शनाने, या सर्वांचे कीर्तन आणि ध्यान केल्याने, माझ्यावरील अनन्य प्रेमाची जशी प्राप्ती होते, तशी माझ्याजवळ राहून होत नाही. म्हणून तुम्ही घरी परत जा.

(१८-२७)

श्रीशुक म्हणतात - भगवान श्रीकृष्णांचे हे स्वत:ला न आवडणारे भाषण ऐकून गोपी खिन्न झाल्या. त्यांच्या आशा धुळीला मिळाल्या. त्यांना अपार चिंता लागून राहिली. शोकामुळे चाललेल्या उष्ण श्वासांमुळे त्यांचे तोंडल्यासारखे लाल ओठ पांढुरके झाले. त्यांनी माना खाली घातल्या आणि पायांच्या नखांनी त्या जमीन उकरू लागल्या. डोळ्यांतून काजळासह वाहणारे अश्रू वक्ष:स्थळापर्यंत पोहोचले आणि तेथे लावलेले केशर त्यांनी धुऊन टाकले. त्यांचे हृदय दु:खाने इतके भरून आले की, त्यांच्या तोंडून शब्द फुटेना. कृष्णासाठी गोपींनी

सर्व कामना सोडून दिल्या होत्या. श्रीकृष्णांवरच त्यांचे अनन्य प्रेम होते. त्यांचे हे निष्ठुर बोल ऐकून त्यांना रडू कोसळले. रडून रडून लाल झालेले डोळे पुसून प्रणयकोपामुळे सद्गदित झालेल्या वाणीने त्या प्रियतमाला म्हणू लागल्या. (२८-३०)

गोपी म्हणाल्या- हे प्रभो ! आपण असे निष्ठुर बोलू नये. आम्ही सर्व काही सोडून फक्त तुमच्या चरणांवरच प्रेम करीत आहोत. तुम्ही स्वत:चा निर्णय घ्यायला स्वतंत्र आहात. तरीही जसे आदिपुरुष मुमुक्षू भक्तांना भजतात, तसेच तुम्ही आमच्यावर प्रेम करा. आमचा त्याग करू नका. हे प्रियतमा ! धर्माचे मर्म तुम्ही जाणता. आपले पती, पुत्र आणि बांधवांची सेवा करणे हा स्त्रियांचा स्वधर्म आहे, असे तुम्ही म्हणालात. तर मग या उपदेशानुसार आम्हांला सर्वांचे पती असणाऱ्या तुमचीच सेवा केली पाहिजे. कारण तुम्हीच या उपदेशाचे विषय आहात. तुम्हीच तर शरीर धारण करणाऱ्यांचे प्रियतम आत्मा आणि बन्धू आहात. आत्मज्ञानी लोक तुमच्यावरच प्रेम करतात. कारण तुम्ही नित्य प्रिय असा त्यांचा आत्मा आहात. असे असता अनित्य आणि दु:खद पति-पुत्रांशी आम्हांला काय करायचे आहे ? हे परमेश्वरा ! म्हणून आमच्यावर प्रसन्न व्हा. आणि हे कमलनयना ! पुष्कळ दिवसांपासून तुमच्याच ठिकाणी जोपासलेली आशा धुळीला मिळवू नका. हे मनमोहना ! आजपर्यंत आमचे चित्त घरात रमत असे. म्हणूनच आमचे हातही घरकामात लागत. परंतु आनंदस्वरूप तुम्ही आमचे ते चित्त सहज चोरून घेतले. त्यामुळे आमचे हे पाय तुमचे चरणकमल सोडून एक पाऊलभर सुद्धा दुसरीकडे जाण्यास तयार नाहीत. तर मग आम्ही व्रजामध्ये कसे जावे ? आणि तेथे जाऊन काय करावे ? हे प्रिय सख्या ! तुमचे मधुर हास्य, प्रेमपूर्ण कटाक्ष आणि मनोहर संगीताने आमच्या हृदयामध्ये तुमच्याविषयीच्या प्रेमाची जी आग धगधगत आहे, ती तुम्ही तुमच्या अधरामृताच्या प्रवाहाने विझवून टाका. नाहीतर, आम्ही तुमच्या विरहव्यथेच्या आगीने आमची भौतिक शरीरे जाळून ध्यानाने तुमच्या चरणकमलांची प्राप्ती करून घेऊ. (३१-३५)

हे कमलनयना ! वनवासी लोक तुम्हांला प्रिय आहेत म्हणूनच ज्या चरणकमलांच्या सेवेची संधी लक्ष्मीलासुद्धा क्वचितच मिळते, त्या तुमच्या चरणांचा स्पर्श आम्हांला प्राप्त झाला. त्या दिवसापासून तुमच्याकडून आनंद मिळविलेल्या आम्ही दुसऱ्या कोणासमोर एक क्षणभरसुद्धा थांबण्यास असमर्थ ठरलो आहोत. मग सेवा तर दूरच ! स्वामी ! जिचा कृपाकटाक्ष प्राप्त करून घेण्यासाठी इतर देव प्रयत्न करीत असतात, ती लक्ष्मी तुमच्या वक्ष:स्थळावर स्थान मिळालेले असतानाही तुमच्या चरणांवर वाहिलेल्या तुळशीबरोबर तुमच्या चरणांची धूळ प्राप्त करण्याची अभिलाषा बाळगते. कारण सर्व भक्तांनी तिचेच सेवन केले आहे. म्हणून आम्हीसुद्धा त्याच तुमच्या चरणधुळीला शरण आलो आहोत. हे दु:खनाशना ! आता आमच्यावर कृपा करा. तुमच्या सेवेच्या अभिलाषेने आम्ही घर सोडून तुमच्या चरणांजवळ आलो आहोत. हे पुरुषोत्तमा ! तुमचे मधुर स्मित आणि प्रेमळ नेत्रकटाक्षाने आमच्या हृदयामध्ये मिलनाच्या आकांक्षेची आग भडकली आहे. आम्हांला केवळ आपल्या सेवेची संधी द्या. प्रियतमा ! ज्याच्यावर कुरळे केस भुरभुरत आहेत, असे तुमचे सुंदर मुखकमल, कुंडलांनी शोभणारे गाल, अधरामृत, स्मितहास्ययुक्त कटाक्ष, शरणागतांना अभय देणारे बाहू आणि तुमचे केवळ लक्ष्मीलाच रमविणारे हे वक्ष:स्थळ पाहून आम्ही तुमच्या दासी झालो आहोत. प्रिय श्यामसुंदरा ! त्रैलोक्यात तरी अशी कोणती स्त्री असेल की, जी तुमच्या बासरीवरील मधुर पदे आणि दीर्घ तान ऐकून, तसेच गाई, पक्षी, वृक्ष आणि हरीण यांनासुद्धा रोमांचित करणारे त्रैलोक्यसुंदर रूप पाहून आर्यमर्यादेपासून विचलित होणार नाही !

जसे नारायण देवतांचे रक्षण करतात, तसेच तुम्ही खात्रीने व्रजमंडलाचे भय आणि दुःख नाहीसे करण्यासाठीच प्रगट झालेले देव आहात. म्हणून दुःखितांचे कनवाळू हे प्रियतमा ! आपल्या या दासींच्या दुःखतप्त वक्षःस्थळावर आणि मस्तकावर तुम्ही आपले कोमल करकमल ठेवा. (३६-४१)

श्रीशुक म्हणतात- योगेश्वरांचे ईश्वर असणाऱ्या श्रीकृष्णांनी गोपींची व्यथा ऐकली, तेव्हा त्यांची त्यांना करुणा आली आणि जरी ते आत्माराम असले तरीसुद्धा हसून ते त्यांच्याबरोबर रममाण झाले. प्रियतमाच्या दर्शनाने ज्यांची मुखकमले प्रफुल्लित झाली आहेत अशा, एकत्र जमलेल्या त्या गोपींबरोबर उत्कृष्ट हावभाव करणारे श्रीकृष्ण जेव्हा खुलून हसत, तेव्हा त्यांच्या कुंदकळ्यांसारख्या दातांचे शुभ्र किरण बाहेर पडत. त्यामुळे ते तारकांनी वेढलेल्या चंद्राप्रमाणे शोभत होते. शेकडो गोपींच्या समूहांचे स्वामी श्रीकृष्ण वैजयंती माळ धारण करून, वृंदावनाला शोभा आणीत विहार करू लागले. त्यावेळी गोपी आपल्या प्रियतमाचे गुणगान करीत; तर श्रीकृष्ण गोपींचे गुण गात. यानंतर श्रीकृष्णांनी गोपींसह, शुभ्र वालू असणाऱ्या यमुनेच्या वाळवंटात जाऊन क्रीडा केली. ते वाळवंट हालल्यामुळे आनंद देणाऱ्या कुमुदिनींच्या सुगंधयुक्त वाऱ्याने सुवासित झाले होते. हात पसरून आलिंगन देणे, गोपींचे हात, वेणी, मांड्या, कमरपट्टा, स्तन वगैरे अंगांना स्पर्श करणे, विनोद करणे, नखे लावणे, कटाक्ष टाकणे, स्मितहास्य करणे इत्यादी क्रीडांनी गोपींचा दिव्य प्रेमभाव उत्तेजित करीत श्रीकृष्ण त्यांना रमवू लागले. अनासक्त असूनही भगवान श्रीकृष्णांकडून जेव्हा गोपींना असा मान मिळाला, तेव्हा त्या जगातील सर्व स्त्रियांमध्ये आपणच सर्वश्रेष्ठ आहोत, असे समजू लागल्या. त्यांना आपल्या भाग्याचा गर्व झालेला असून अहंकारही उत्पन्न झाला आहे, असे जाणून त्यांचा गर्व नाहीसा करून त्यांच्यावर कृपा करण्यासाठी श्रीकृष्ण तेथेच अंतर्धान पावले. (४२-४८)

अध्याय एकोणतिसावा समाप्त

अध्याय तिसावा

श्रीकृष्णांच्या विरहात गोपींची अवस्था

श्रीशुक म्हणतात- भगवान अचानकपणे अंतर्धान पावले, तेव्हा गजराजाविना हत्तिणी जशा दुःखी होतात, तशा व्रजयुवती ते दिसत नाहीत, असे पाहून दुःखाने व्याकूळ झाल्या. श्रीकृष्णांची चाल, प्रेमपूर्ण स्मितहास्य, विलासयुक्त नेत्रकटाक्ष, मनोरम प्रेमालाप, वेगवेगळ्या प्रकारच्या लीला आणि हावभाव यांनी त्यांचे चित्त वेधून घेतले होते. त्यामुळे श्रीकृष्णमय झालेल्या गोपी त्यांच्या वेगवेगळ्या कृतींचे अनुकरण करू लागल्या. आपल्या प्रियतमाच्या चालण्याची लकब, हास्य, पाहाणे, बोलणे इत्यादी बाबतीत त्या गोपी त्यांच्यासारख्याच होऊन गेल्या, त्यांच्या शरीरांमध्ये तीच हालचाल, त्याच भाव-भावना उतरल्या. त्या स्वतःला संपूर्णपणे विसरून श्रीकृष्णस्वरूप होऊन गेल्या आणि त्यांच्याच लीलाविलासाचे अनुकरण करीत ''मीच श्रीकृष्ण आहे'' असे म्हणू लागल्या. त्या सर्वजणी एकत्र येऊन उच्च स्वरात त्यांच्याच गुणांचे गायन करीत वेड्यासारख्या एका वनातून दुसऱ्या वनात त्यांना शोधू लागल्या. श्रीकृष्ण सर्व जड-चेतन पदार्थांमध्ये आकाशाप्रमाणे आत-बाहेर व्यापलेले असूनही गोपी मात्र वनस्पतींना त्यांचा ठावठिकाणा विचारू लागल्या. (१-४)

''हे पिंपळा ! हे पिंपरे ! हे वटवृक्षा ! नंदनंदन आपल्या प्रेमपूर्ण स्मितहास्याने आणि नेत्रकटाक्षांनी

आपले मन चोरून घेऊन गेले आहेत. तुम्ही त्यांना पाहिलेत काय ? हे कोरांटे ! अशोका ! नागकेशरा ! पुन्नागा ! चाफ्या ! ज्यांच्या केवळ स्मितहास्याने मानिनींचा मान धुळीला मिळतो, ते बलरामांचे धाकटे भाऊ येथे आले होते काय ? हे कल्याण करणाऱ्या तुळशी ! भगवंतांच्या चरणांना तू आवडतेस. म्हणूनच भ्रमर पिंगा घालीत असूनही ते तुझी माळ घालतात. तू आपल्या प्रियतम अच्युताला पाहिलेस काय ? हे मालती ! मल्लिके ! जाई आणि जुई ! प्रिय माधवाला तुम्ही पाहिलेत काय ? आपल्या हातांनी स्पर्श करून तुम्हांला आनंदित करीत ते येथून गेले असणार ! आम्रवृक्षा ! चारा ! फणसा ! आसण्या ! कांचना ! जांभळा ! रुई ! बेला ! बकुळा ! आम्रा ! कदंबा ! दुपारी ! तसेच इतर यमुनेच्या तीरावर असलेल्या परोपकारी वृक्षांनो ! श्रीकृष्णांशिवाय सुन्या झालेल्या आम्हांला त्यांचा मार्ग सांगा. हे पृथ्वीदेवी ! तू अशी कोणती तपश्चर्या केली आहेस की, ज्यामुळे श्रीकृष्णांच्या चरण-स्पर्शाच्या आनंदाने गवत-वेली इत्यादीच्या रूपाने अंगावर आलेले रोमांच प्रगट करीत आहेस ! तुझा हा आनंद श्रीकृष्णांच्या चरणस्पर्शामुळे आहे की, वामनावतारामध्ये त्यांनी तुला चरणाने मोजले होते, त्यामुळे आहे ? की त्याही अगोदर वराहांच्या अंग-स्पर्शाने तुझी ही स्थिती झाली नाही ना ? अग गडे हरिणी ! आपल्या शरीरदर्शनाने तुमच्या डोळ्यांना परमानंदाचे दान करीत श्रीकृष्ण आपल्या प्रियेसह येथून तर गेले नाहीत ना ? कारण त्यांच्या कुंदकळ्यांच्या माळेचा सुगंध येथे येऊ लागला आहे. जी माळ त्यांच्या प्रियेच्या अंगस्पर्शाच्यावेळी लागलेल्या स्तनावरील केशराने केशरी झालेली आहे. हे वृक्षांनो ! तुळशीच्या सुगंधाने धुंद झालेले भ्रमर ज्यांचा पाठलाग करीत आहेत, ज्यांच्या एका हातात कमळ असून दुसरा हात प्रियेच्या खांद्यावर ज्यांनी ठेवलेला असेल, ते बलरामाचे धाकटे बंधू विहार करीत येथून गेले असतील. तुम्ही त्यांना वंदन करण्यासाठी झुकलेले असताना त्यांनी आपल्या प्रेमपूर्ण नजरेने तुमच्या वंदनाचा स्वीकार केला असेल ना ? अग सख्यांनो ! या वेलींना विचारा बरे ! वृक्षरूप पतीच्या भुजांनी यांना आलिंगन दिले असले, तरी यांच्या शरीरावर जे कळ्यारूपी रोमांच उभे राहिले आहेत, ते भगवंतांच्या नखांच्या स्पर्शामुळेच आहेत ना !'' (५-१३)

याप्रमाणे वेड्यासारखे बडबडणाऱ्या गोपी श्रीकृष्णांना धुंडीत असताना व्याकूळ होत होत्या. आता तर त्या भगवन्मय होऊन भगवंतांच्या निरनिराळ्या लीलांचे स्वत: अनुकरण करू लागल्या. एक पूतना झाली तर दुसरी श्रीकृष्ण होऊन तिचे स्तन पिऊ लागली. कुणी छकडा झाली, तर कुणी बाळकृष्ण होऊन रडत त्याला पायाची ठोकर मारून उलटून टाकले. कोणी गोपी बाळकृष्ण झाली तर कुणी तृणावर्त दैत्याचे रूप धारण करून त्याला घेऊन गेली. एखादी गोपी पाय ओढत पैंजण वाजवीत रांगू लागली. एक कृष्ण झाली तर दुसरी बलराम आणि पुष्कळशा गोपी गोपाळ झाल्या. एक गोपी झाली वत्सासुर, तर दुसरी झाली बकासुर. मग दुसऱ्या गोपींनी श्रीकृष्ण होऊन वत्सासुर आणि बकासुर झालेल्या गोपींना मारले. जसे श्रीकृष्ण बासरी वाजवून लांब गेलेल्या गाईंना बोलावीत, तशी त्यांच्याप्रमाणे एक गोपी वेणू वाजवून खेळू लागली. तेव्हा बाकीच्या 'वाहवा ! वाहवा !!' म्हणून तिची प्रशंसा करू लागल्या. एक गोपी स्वत:ला श्रीकृष्ण समजून दुसऱ्या सखीच्या गळ्यात हात टाकून चालू लागे आणि दुसऱ्या गोपींना म्हणे- ''अग ! मी श्रीकृष्ण आहे. तुम्ही माझे हे मनोहर चालणे पहा तर खरे !'' एखादी गोपी श्रीकृष्ण होऊन म्हणे- ''अरे व्रजवासियांनो ! तुम्ही वादळ-पावसाला भिऊ नका. त्यापासून वाचण्याचा उपाय मी शोधला आहे.'' असे म्हणून गोवर्धन उचलून धरल्याची नक्कल करीत ती आपली ओढणी उचलून डोक्यावर धरीत होती. परीक्षिता !

एक गोपी दुसरीच्या डोक्यावर पाय ठेवून वर चढून म्हणाली- "अरे दुष्ट सर्पा ! तू येथून निघून जा. दुष्टांचे दमन करण्यासाठीच मी जन्माला आलो आहे." इतक्यात एक गोपी म्हणाली- "अरे गोपाळांनो ! केवढा भयंकर वणवा पेटला आहे, पाहा ! तुम्ही ताबडतोब डोळे बंद करा. मी सहजपणे तुमचे त्यापासून रक्षण करीन." एका गोपीने दुसरीला फुलांच्या माळेने उखळाला बांधले. आता ती बांधलेली सुंदर गोपी हातांनी तोंड झाकून ध्याल्याची नक्कल करू लागली. (१४-२३)

अशा प्रकारे खेळत गोपी वृंदावनातील झाडे, वेली इत्यादींना श्रीकृष्णांचा ठाव-ठिकाणा विचारीत जाऊ लागल्या. त्याचवेळी त्यांनी एके ठिकाणी भगवंतांच्या चरणांचे ठसे पाहिले. त्या आपापसात म्हणू लागल्या, "हे चरणांचे ठसे निश्चितच महात्म्या नंदनंदनांचे आहेत. कारण यामध्ये ध्वज, कमळ, वज्र, अंकुश, जव इत्यादी चिह्ने स्पष्ट दिसत आहेत." त्या पावलांच्या ठशांचा मागोवा घेत, भगवंतांना शोधीत, गोपी पुढे गेल्या. तेव्हा त्यांना श्रीकृष्णांच्या-बरोबर दुसऱ्या युवतीचीसुद्धा चरणचिह्ने दिसली. ती पाहून त्या व्याकूळ झाल्या आणि म्हणू लागल्या. जशी हत्तीण हत्तीबरोबर जावी, त्याचप्रमाणे नंदकुमारांबरोबर त्यांच्या खांद्यावर हात ठेवून चालणाऱ्या कोणत्या स्त्रीची ही चरणचिह्ने असावीत ? सर्वशक्तिमान भगवान श्रीकृष्णांची ही खात्रीने '(आ)राधिका' असली पाहिजे. म्हणूनच हिच्यावर प्रसन्न होऊन आमच्या गोविंदांनी आम्हांला सोडून हिला एकांतात आणले. सख्यांनो ! श्रीकृष्णांनी आपल्या चरणकमलांनी ज्या या धुळीला स्पर्श केला ती धन्य होय. कारण ब्रह्मदेव, शंकर आणि लक्ष्मीसुद्धा आपले पाप नष्ट करण्यासाठी ती धूळ आपल्या मस्तकावर धारण करतात. जी ही एकटीच एकांतात जाऊन श्रीकृष्णांचे अधरामृतपान करीत आहे, त्या गोपीची ही पावले तर आमच्या मनाला फारच पीडा देत आहेत. इथे मात्र तिच्या पाऊलखुणा दिसत नाहीत. कदाचित प्रियाने प्रियेच्या सुकुमार तळव्यांना गवताची टोके टोचू नयेत म्हणून तिला आपल्या खांद्यावर घेतले असावे ! सख्यांनो ! पाहा. येथे कामी श्रीकृष्णांची ही पावले प्रियेला उचलून नेताना झालेल्या ओझ्यामुळे अधिक खोल रुतलेली दिसतात. पाहा ! पाहा ! येथे वल्लभाने फुले तोडता यावीत, म्हणून प्रियेला खाली उतरविले आहे आणि येथे त्या प्रियाने प्रियेसाठी फुले तोडली आहेत. टाचा वर करून फुले तोडल्यामुळे इथे त्यांचे पाय पूर्ण उमटले नाहीत. येथे त्या कामीने आपल्या कामिनीची वेणी घातली असावी ! आणि ती फुले तिच्या वेणीत गुंफण्यासाठी ते येथे नक्कीच खाली बसले असतील." भगवान श्रीकृष्ण आत्माराम असून अखंड स्वत:मध्येच रमलेले असतात. तरीसुद्धा त्यांनी कामीजनांची दीनता व स्त्रियांची पुरुषांना वश करण्याची वृत्ती दाखवण्यासाठी त्या गोपीबरोबर एकांतामध्ये क्रीडा करण्याची लीला केली असावी. (२४-३५)

अशाप्रकारे बेभान होऊन एकमेकींना पाउलखुणा दाखवीत त्या वना-वनात भटकू लागल्या. इकडे श्रीकृष्ण दुसऱ्या गोपींना वनात सोडून ज्या गोपीला एकांतात घेऊन गेले होते, तिला वाटले की, "आपणच सर्व गोपींमध्ये श्रेष्ठ आहोत. म्हणून तर ज्या गोपी त्यांची इच्छा करतात, त्यांना सोडून ते माझे प्रिय श्रीकृष्ण माझ्याबरोबर राहिले." वनात गेल्यावर ती गोपी गर्विष्ठपणे श्रीकृष्णांना म्हणाली, "प्रियतमा ! माझ्याच्याने आता आणखी चालवत नाही. म्हणून तुम्हांला जेथे जायचे असेल, तेथे मला उचलून न्या." तिने असे सांगितल्यावर ते म्हणाले, "प्रिये, ठीक आहे. तू माझ्या खांद्यावर बस." आणि एकदम अंतर्धान पावले. तेव्हा मात्र ती गोपी पश्चात्ताप करू लागली. "हे नाथा ! हे रमणा ! हे श्रेष्ठा ! हे महाभुजा ! आपण कोठे आहात ? कोठे आहात ? माझ्या सख्या ! मी तुमची दीन दासी आहे. माझ्या जवळ या." भगवंतांच्या जाण्याचा मार्ग शोधीत गोपी

तेथे जाऊन पोहोचल्या. तेथे जवळच त्यांना दिसले की, प्रियतमाच्या वियोगाने त्यांची सखी दु:खाने बेशुद्ध होऊन पडली आहे. श्रीकृष्णांच्याकडून जो मान प्राप्त झाला होता, तो तिने त्यांना सांगितला. आणि आपल्याच गर्वामुळे आपला अवमान झाल्याचेही सांगितले. ते ऐकून गोपींच्या आश्चर्याला पारावार राहिला नाही. (३६-४२)

यानंतर, वनामध्ये जेथपर्यंत चंद्राचे चांदणे पडले होते, तेथपर्यंत त्या त्यांना शोधीत गेल्या. परंतु पुढे अंधार आहे, असे पाहून परत फिरल्या. गोपींचे मन श्रीकृष्णमय होऊन गेले होते. त्या त्यांच्याविषयीच बोलत होत्या. त्यांच्या हालचाली केवळ श्रीकृष्णांसाठीच होत्या. किंबहुना त्या कृष्णमयच झाल्या होत्या. त्यांच्या गुणांचेच गायन करणाऱ्या त्यांना आपल्या घरांची, इतकेच नव्हे तर शरीराचीही आठवण राहिली नाही. श्रीकृष्णांच्याच चिंतनात बुडून गेलेल्या गोपी यमुनेच्या वाळवंटात परत आल्या आणि त्यांच्या येण्याची वाट पाहात सर्व मिळून श्रीकृष्णांच्याच गुणांचे गायन करू लागल्या. (४३-४५)

अध्याय तिसावा समाप्त

अध्याय एकतिसावा

गोपी-गीत

गोपी गाऊ लागल्या- प्रियतमा ! तुमच्या जन्मामुळे व्रजाचा महिमा अधिक वाढला आहे. म्हणूनच तर लक्ष्मी कायमची येथे येऊन राहिली आहे; प्रियतमा ! पहा ! ज्यांनी तुमच्यासाठीच आपले प्राण धारण केले आहेत, त्या गोपी दिशादिशांमध्ये तुम्हांला शोधीत आहेत. हे प्रेमपूर्ण हृदयाचे स्वामी ! आम्ही वेतन न घेणाऱ्या तुमच्या दासी आहोत. शरत्कालीन जलाशयामधील सुंदर अशा कमळांच्या गाभ्यातील सौंदर्याला तुच्छ ठरवणाऱ्या नेत्रांनी तुम्ही आम्हांला घायाळ केले आहे. आमचे मनोरथ पूर्ण करणारे हे प्राणेश्वर ! नेत्रांनी मारणे हा वध नाही काय ? हे पुरुषोत्तमा ! यमुनेच्या विषारी पाण्यामुळे होणारा मृत्यू, अजगराच्या रूपाने खाणारा अघासुर, इंद्राने केलेला वर्षाव, तुफान, विजा, दावानल, वत्सासुर आणि व्योमासुर इत्यादींनी उत्पन्न केलेल्या सर्व प्रकारच्या भयांपासून तुम्ही वारंवार आमचे रक्षण केले आहे. तुम्ही केवळ यशोदानंदनच नाही, तर सर्व प्राण्यांच्या अंतरांत राहाणारे त्यांचे साक्षी आहात, हे सखया ! ब्रह्मदेवांनी प्रार्थना केल्यामुळे विश्वाचे रक्षण करण्यासाठी तुम्ही यदुवंशात अवतीर्ण झाला आहात. (१-४)

हे यदुवंशशिरोमणे ! जे लोक जन्म-मृत्युरूप संसाराच्या चक्राला भिऊन तुमच्या चरणांना शरण येतात, त्यांना निर्भय करणारे, सर्वांच्या अभिलाषा पूर्ण करणारे आणि लक्ष्मीचे पाणिग्रहण करणारे आपले करकमल, हे नाथ ! आमच्या मस्तकावर ठेवा. व्रजवासियांचे दु:ख दूर करणारे हे वीरश्रेष्ठ ! ज्यांच्या स्मिताने भक्तांचा गर्व मावळतो, अशा आमच्या प्रिय सख्या ! या तुमच्या दासींचा स्वीकार करा. आपले सुंदर मुखकमळ आम्हा अबलांना दाखवा. शरणागतांची पापे नाहीशी करणारे, गुरांच्या मागून जाणारे, लक्ष्मीचे निवासस्थान, कालियाच्या फणांवर ठेवलेले असे तुमचे चरणकमल तुम्ही आमच्या वक्ष:स्थळावर ठेवून आमच्या हृदयातील आग शांत करा. हे कमलनयना ! सुंदर सुंदर वाक्यांनी युक्त, विद्वानांनाही मोहविणाऱ्या तुमच्या गोड वाणीने या तुमच्या दासीही मोहित होत असतात. हे वीरा ! आपल्या अधरामृताने आम्हांला तृप्त करा. प्रभो ! तुमच्या कथासुद्धा अमृतस्वरूपच आहेत. विरहाने व्याकूळ झालेल्यांचे ते जीवनसर्वस्व आहे. ज्ञानी लोकांनी त्यांचे गायन केले आहे. त्या सगळे पाप-

ताप मिटवून श्रवणानेसुद्धा कल्याण करतात. तुमच्या त्या सुंदर कथांचे जे विस्ताराने वर्णन करतात, तेच वास्तविक सर्वांत मोठे दानशूर होत ! हे प्रियतमा ! तुमचे प्रेमपूर्ण हास्य आणि कटाक्ष तसेच तुमच्या लीलांचे ध्यान हे सुद्धा अत्यंत मंगलदायक आहे. पण तुम्ही एकांतात ज्या हृदयस्पर्शी प्रेमाच्या गोष्टी केल्या, त्या आठवून हे कपटनाटकसूत्रधारा ! आमच्या मनाची कालवाकालव होत आहे.(५-१०)

हे नाथ ! गुरे चारण्यासाठी तुम्ही जेव्हा वाड्यातून बाहेर जाता, तेव्हा तुमच्या कमलापेक्षाही कोमल पायांना काटे-सराटे लागून ते दुखत असतील, असा विचार मनात येताच हे मनमोहना ! आम्हांला अतिशय दु:ख होते. दिवस मावळल्यानंतर जेव्हा तुम्ही वनातून घरी येता, तेव्हा तुमच्या मुखावर काळे कुरळे केस रुळत असतात. जणू भ्रमरयुक्त कमळच. शिवाय गाईंच्या खुरांनी उडालेली दाट धूळही त्यावर पडलेली असते. हे वीरा ! तुम्ही आपले ते सौंदर्य आम्हांला दाखवून आमच्या मनात वारंवार प्रेम उत्पन्न करीत असता. हे प्रियतमा ! तुमचे चरणकमल शरणागत भक्तांच्या सर्व इच्छा पूर्ण करणारे आहे. स्वत: लक्ष्मी त्यांची सेवा करते आणि पृथ्वीचे तर ते भूषणच आहे. संकटकाळी फक्त त्याचेच चिंतन करणे योग्य आहे. आपले ते परम कल्याणस्वरूप चरणकमल आमच्या वक्ष:स्थळावर ठेवून आमच्या हृदयाची व्यथा शांत करा. तुमचे अधरामृत प्रेम वाढविणारे असून सगळा शोक नाहीसा करणारे आहे. गाणारी ही बासरी चांगल्या तऱ्हेने त्याचा आस्वाद घेते. ज्यांनी एकवेळ त्याचे पान केले, त्यांना पुन्हा प्रापंचिक विषयांची आठवणही होत नाही. हे वीरा ! आपले तेच अधरामृत आम्हांला द्या. हे प्रियतमा ! दिवसा जेव्हा तुम्ही वनामध्ये विहार करण्यासाठी जाता, तेव्हा तुम्ही न दिसल्यामुळे आम्हांला एक एक क्षण युगासारखा वाटतो आणि जेव्हा तुम्ही संध्याकाळी माघारी येता, तेव्हा कुरळ्या केसांनी शोभणारे तुमचे सुंदर मुख आम्ही पाहू लागतो, त्यावेळी डोळ्यांच्या पापण्या बनवून दर्शनात व्यत्यय आणणारा हा विधाता मूर्ख आहे, असे आम्हांला वाटते. हे अच्युता ! आम्ही आपले पति-पुत्र, बंधु-बांधव आणि कुळाचा त्याग करून तुमच्याकडे आलो आहोत. आम्ही तुमची एक-एक क्रिया जाणतो, संकेत समजतो. तुमच्या मधुर गीताच्या मोहिनीने आम्ही येथे आलो आहोत, हे तुम्हांला माहीत आहे. असे असताना हे कपटी ! अशा रात्रीच्या वेळी आलेल्या अबलांना तुमच्याखेरीज आणखी कोण वाऱ्यावर सोडील ! एकांतात तुम्ही मिलनाची आकांक्षा, प्रेमभाव, जागृत करणाऱ्या गोष्टी करीत होतात. थट्टा-मस्करी करीत प्रेमपूर्ण दृष्टीने आमच्याकडे पाहात होतात आणि आम्ही लक्ष्मीचे निवासस्थान असणारे तुमचे विशाल वक्ष:स्थळ पाहात असू. तेव्हापासून आपल्या भेटीची आमची लालसा वाढत चालली असून आमचे मन त्याच विचारांनी मोहित होत आहे. हे प्रियतमा ! तुमचे हे स्वरूप व्रजवनवासियांची सर्व दु:खे नाहीसे करणारे आणि विश्वाचे पूर्ण कल्याण करणारे आहे. आमच्या मनात फक्त तुमच्याविषयीच्याच लालसेने जी व्याधी उत्पन्न झाली आहे, तीवर असे काही थोडेसे औषध द्या की, जे तुमच्याच असलेल्या आमचा हृदयरोग समूळ नाहीसा करील. हे प्रियतमा ! तुमचे कमळापेक्षाही कोमल सुंदर चरण आम्ही आमच्या कठोर स्तनांवर भीत-भीतच अतिशय हळुवारपणे ठेवीत असतो. पण रात्रीच्या वेळी त्याच चरणांनी तुम्ही घनदाट जंगलामध्ये भटकत आहात. काटे, दगड वगैरे लागून त्यांना पीडा होत नाही काय ? आम्हांला तर नुसत्या त्या कल्पनेनेच चक्कर येऊ लागली आहे ! कारण आमचे जीवनच तुम्ही आहात. (११-१९)

अध्याय एकतिसावा समाप्त

अध्याय बत्तिसावा

भगवंतांकडून गोपींचे सांत्वन

श्रीशुकाचार्य म्हणतात- परीक्षिता ! अशा प्रकारे निरनिराळ्या रीतीने गाणाऱ्या आणि विलाप करणाऱ्या गोपी श्रीकृष्णांच्या दर्शनाच्या लालसेने मोठमोठ्याने रडू लागल्या. त्याचवेळी त्यांच्या मध्यभागी भगवान श्रीकृष्ण प्रगट झाले. त्यांचे मुखकमल स्मितहास्याने खुलले होते. गळ्यात वनमाला होती, पीतांबर धारण केला होता. त्यांचे हे रूप कामदेवालाही मोहविणारे होते. तो प्रियतम आल्याचे पाहून गोपींचे डोळे प्रेमाने आणि आनंदाने प्रफुल्लित झाले. जशी अचेतन शरीरांमध्ये प्राणांचा संचार होताच ती उठावी, त्याप्रमाणे त्या सर्वजणी एकदम उठून उभ्या राहिल्या. कोणी आनंदाने श्रीकृष्णांचा हात आपल्या दोन्ही हातांमध्ये धरला, तर दुसरीने त्यांचा चंदनचर्चित बाहू आपल्या खांद्यावर घेतला. कोणी भगवंतांनी खाल्लेला विडा आपल्या हातात घेतला. तर एका विरहतप्त गोपीने त्यांचे चरणकमल आपल्या वक्षःस्थळांवर ठेवून घेतले. एक गोपी प्रणयकोपाने क्रुद्ध होऊन, भुवया उंचावून, दात ओठ चावीत, आपल्या कटाक्षबाणांनी त्यांना घायाळ करीत, त्यांच्याकडे पाहू लागली. आणखी एक गोपी डोळ्यांच्या पापण्या न मिटता त्यांच्या मुखकमलातील मकरंद पिऊ लागली; परंतु ज्याप्रमाणे संतपुरुष भगवंतांच्या चरणांच्या दर्शनाने कधीही तृप्त होत नाहीत, त्याचप्रमाणे ती तृप्त होत नव्हती. कोणी एक गोपी डोळ्यांतून भगवंतांना हृदयात घेऊन गेली आणि तिने डोळे बंद केले. आता मनोमन भगवंतांना आलिंगन दिल्याने तिचे शरीर पुलकित झाले, रोम-अन्-रोम उभे राहिले आणि योग्याप्रमाणे ती परमानंदामध्ये मग्न झाली. परमात्म्याची भेट झाल्यावर ज्याप्रमाणे मुमुक्षू संसारतापातून मुक्त होतात, त्याप्रमाणे श्रीकृष्णांच्या दर्शनाने सर्व गोपींना परमानंद झाला आणि विरहामुळे झालेले दुःख त्या विसरल्या. परीक्षिता ! ज्याप्रमाणे शक्तींनी युक्त नारायण अधिक शोभावे, त्याप्रमाणे विरहव्यथेतून मुक्त झालेल्या गोपींमध्ये श्रीकृष्ण विशेषच शोभू लागले. (१-१०)

यानंतर भगवान श्रीकृष्णांनी त्या व्रजसुंदरींना आपल्याबरोबर घेऊन यमुनेच्या वाळवंटात प्रवेश केला. त्यावेळी उमललेल्या कुंद आणि मंदाराच्या फुलांचा सुगंध घेऊन सुगंधित वायू वाहात होता आणि त्याच्या वासाने धुंद झालेले भ्रमर इकडे तिकडे गुंजारव करीत होते. शरद-पौर्णिमेच्या चांदण्यामुळे रात्रीच्या अंधाराचा काही पत्ताच नव्हता. सगळीकडे मांगल्य पसरले होते. तेथे यमुना नदीने स्वतः आपल्या लाटांच्या हातांनी कोमल वाळू पसरली होती. श्रीकृष्णांच्या दर्शनाच्या आनंदाने गोपींच्या हृदयातील सगळी व्यथा नाहीशी होऊन त्यांचे मनोरथ पूर्ण झाले. जसे वेद कर्मकांडाचे वर्णन करूनही ईश्वरदर्शनाअभावी अतृप्त असतात, पण ज्ञानकांडाचे प्रतिपादन करून ईश्वरदर्शनाने कृतकृत्य होतात. आता त्यांनी आपल्या वक्षःस्थळावर लागलेल्या कुंकुम-केशराच्या रंगाने रंगलेली उपवस्त्रे आपल्या परमप्रियाला बसण्यासाठी अंथरली. योगेश्वरांनी आपल्या हृदयामध्ये ज्यांच्यासाठी आसन केलेले असते, तेच सर्वशक्तिमान भगवान तेथे गोपींच्या ओढण्यांवर बसले. गोपींच्या मध्यभागी त्यांच्याकडून पूजित होऊन भगवान अतिशय शोभून दिसत होते. त्रैलोक्यातील सौंदर्य ज्याच्या ठिकाणी एकवटले होते, असा श्रीविग्रह त्यांनी यावेळी धारण केला होता. भगवान श्रीकृष्ण आपल्या या अलौकिक सौंदर्याच्या द्वारा त्यांचे प्रेम आणि आकांक्षा आणखी

उंचावून ठेवीत होते. गोपींनी आपले सलज्ज पाहाणे, स्मितहास्य आणि विलासपूर्ण कटाक्ष यांनी त्यांचा सन्मान केला. कोणी त्यांचे चरणकमल मांडीवर घेऊन चुरले, तर कोणी त्यांचे हात कुरवाळले. जणू हीच त्यांनी केलेली स्तुती ! नंतर मात्र काहीशा रागावून त्या म्हणाल्या. (११-१५)

गोपी म्हणाल्या- हे श्रीकृष्णा ! काही लोक प्रेम करणाऱ्यांवरच प्रेम करतात आणि काही लोक प्रेम न करणाऱ्यांवरसुद्धा प्रेम करतात. परंतु काहीजण तर या दोघांवरही प्रेम करीत नाहीत. तर याविषयी आम्हांला समजावून सांगा. (१६)

श्रीभगवान म्हणाले- सख्यांनो ! जे प्रेम करणाऱ्यांवर प्रेम करतात, त्यांचा सर्व उद्योग हा केवळ स्वार्थासाठीच असतो. त्यामध्ये सौहार्द नाही की धर्म नाही. त्यांचे प्रेम फक्त स्वार्थापोटीच आहे; याखेरीज त्यांचा दुसरा कोणताही हेतू नाही. हे सुंदरींनो ! जे लोक प्रेम न करणाऱ्यांवरही प्रेम करतात- जसे, स्वभावत:च करुणाशील असलेले सज्जन आणि माता-पिता. त्यांच्या मनात दुसऱ्यांचे हित व्हावे, एवढीच इच्छा असते आणि त्यांच्या व्यवहारामध्येच खरा धर्म असतो. काही लोक प्रेम करणाऱ्यांवरही प्रेम करीत नाहीत, मग प्रेम न करणाऱ्यांच्यावर कोठून करतील ? असे लोक चार प्रकारचे असतात. एक, जे आपल्या स्वरूपातच रमणारे असतात. दुसरे, जे कृतकृत्य असतात. तिसरे, स्वत:वर कोण प्रेम करतात हे ज्यांना माहीतच नसते आणि चौथे, जाणून-बुजून परोपकारी गुरुतुल्य लोकांचासुद्धा द्रोह करणारे. सख्यांनो ! मी तर प्रेम करणाऱ्यांवर सुद्धा प्रेम करीत नाही. कारण त्यांची चित्तवृत्ती माझ्याकडेच नेहमी लागून राहावी म्हणून. जसे एखाद्या निर्धन पुरुषाला कधी पुष्कळसे धन मिळावे आणि नंतर ते नाहीसे व्हावे तेव्हा त्याचे हृदय जसे हरवलेल्या धनाच्या चिंतेने भरून जाते, तसाच मीसुद्धा प्राप्त होऊन होऊन पुन्हा लपून राहातो. कारण नाहीशा झालेल्या माझेच भक्तांनी चिंतन करावे म्हणून. गोपींनो ! तुम्ही माझ्यासाठी लोकमर्यादा, वेदोपदेश आणि आपल्या नातलगांनाही सोडले आहे, याविषयी शंका नाही. अशा स्थितीत तुमची मनोवृत्ती माझ्या ठिकाणीच लागून राहावी, यासाठी अप्रत्यक्षपणे तुमच्यावर प्रेम करीत मी लपलो होतो. म्हणून हे प्रियांनो ! तुम्ही, तुम्हांला प्रिय असणाऱ्या माझ्या, तुमच्यावरील प्रेमात उणीव पाहू नका. घर-संसाराच्या तोडण्यास कठीण बेड्या तुम्ही माझ्यासाठी तोडून मला भजू लागलात. माझ्याशी तुमचा हा आत्मिक संयोग सर्वथैव निर्दोष आहे. देवांचे आयुष्य जरी मला मिळाले, तरी तुमच्या या प्रेम, सेवा आणि त्यागाचे ऋण मी फेडू शकणार नाही. म्हणून तुम्हीच मला आपल्या सौजन्याने तुमच्या ऋणातून मुक्त करावे. (१७-२२)

अध्याय बत्तिसावा समाप्त

अध्याय तेहतिसावा

महारास

श्रीशुकाचार्य म्हणतात- भगवंतांची ही सुमधुर वाणी ऐकून गोपींचा विरहजन्य ताप संपला आणि त्यांचे प्रेम मिळाल्याने गोपींचे मनोरथ पूर्ण झाले. भगवान श्रीकृष्णांच्या प्रेयसी आणि सेविका गोपी एकमेकींच्या हातात हात घालून उभ्या होत्या. त्या स्त्री-रत्नांच्याबरोबर भगवंतांनी रासक्रीडा सुरू केली. योगेश्वर भगवान श्रीकृष्ण दोन दोन गोपींच्या मध्ये प्रगट झाले आणि त्यांच्या गळ्यांत त्यांनी आपला

हात टाकला. प्रत्येक गोपीला असा अनुभव येत होता की, श्रीकृष्ण केवळ आपल्याच जवळ आहेत. अशा प्रकारे अनेक गोपींच्या समूहात श्रीकृष्णांचा रासोत्सव सुरू झाला. त्यावेळी आकाशामध्ये शेकडो विमानांची गर्दी झाली होती. रासोत्सवाच्या दर्शनाच्या उत्सुकतेमुळे स्वत:ला विसरलेले सर्व देव आपापल्या पत्नींसह तेथे येऊन पोहोचले. स्वर्गातील दुंदुभी वाजू लागल्या. स्वर्गीय पुष्पांचा वर्षाव होऊ लागला. गंधर्वगण आपापल्या पत्नींसह भगवंतांच्या निर्मल यशाचे गायन करू लागले. सर्व गोपी रासमंडलामध्ये आपल्या प्रियतमासह नृत्य करू लागल्या. त्यांच्या बांगड्या, पैंजण आणि कमरपट्ट्याचे घुंगरू या सर्वांचा प्रचंड आवाज होऊ लागला. तेथे व्रजसुंदरींच्या मध्ये भगवान श्रीकृष्ण अगणित पिवळ्याधमक सुवर्णमण्यांमध्ये तेजस्वी मोठा नीलमणी चमकावा तसे दिसत होते. नृत्याच्या वेळी गोपी निरनिराळ्या तऱ्हेच्या पायांच्या हालचाली व हातांचे हावभाव करीत. मधून मधून स्मितपूर्वक भुवयांचे विलास करीत. कंबर लचकावीत. कधी त्यांच्या छातीवरील दुपट्टे हेलकावे घेत तर कधी कुंडले गालांवर आपटत. चेहऱ्यावर घामाचे थेंब तरारले होते आणि वेण्या सैल झाल्या होत्या. तशाच कमरेच्या दुपट्ट्याच्या गाठीही सैलसर झाल्या होत्या. याचवेळी त्या गातही होत्या. मेघमंडलांत विजा शोभाव्या, तशा श्रीकृष्णांच्या सान्निध्यात त्या शोभत होत्या. त्या प्रेममग्न गोपिका नाचत-नाचत उंच स्वरात रागदारीत मधुर गायन करीत होत्या. श्रीकृष्णांच्या स्पर्शामुळे त्या अधिकच आनंदमग्न झाल्या होत्या. त्यांच्या गायनाने हे सर्व जग अजूनही गुंजन करीत आहे. एक गोपी भगवंतांच्या बरोबर त्यांच्या स्वरात स्वर मिळवून गात होती. ती त्यांच्यापेक्षाही वरच्या स्वरात गाऊ लागली. तेव्हा प्रसन्न होऊन त्यांनी तिला "वाहवा ! वाहवा !!" म्हणून शाबासकी दिली. दुसरीने तोच राग ध्रुपदतालात गाइला. त्याचेसुद्धा भगवंतांनी अतिशय कौतुक केले. एक गोपी नृत्य करता करता थकून गेली. तिच्या मनगटातून बांगड्या आणि वेणीतून मोगऱ्याची फुले गळू लागली. तेव्हा तिने शेजारीच उभे असलेल्या मुरलीमनोहरांचा खांदा आपल्या हाताने धरून ठेवला. एकीने श्रीकृष्णांनी खांद्यावर ठेवलेल्या, मुळातच कमलाप्रमाणे सुगंधी असलेल्या व त्यावर चंदनाची उटी लावलेल्या हाताचा वास घेतला. त्यामुळे रोमांचित होऊन तिने त्या हाताचे चुंबन घेतले. नाचताना एका गोपीचे कुंडल हालत होते, त्याच्या कांतीने तिचा गाल चमकत होता. तिने आपला गाल श्रीकृष्णांच्या गालाला लावला. तेव्हा भगवंतांनी आपल्या तोंडातील चावलेला विडा तिच्या तोंडात दिला. एक गोपी पैंजणांचा आणि कमरपट्ट्याच्या घुंगरांचा नाद करीत नाचत आणि गात होती. ती जेव्हा थकून गेली, तेव्हा तिने आपल्या शेजारीच उभे असलेल्या श्यामसुंदरांचा मंगल हात आपल्या दोन्ही स्तनांवर ठेवून घेतला. (१-१४)

लक्ष्मीचाच केवळ पती असणाऱ्या श्रीकृष्णांना आपला प्रियतम करून घेऊन, गोपी गायन करीत त्यांच्याबरोबर विहार करू लागल्या. यावेळी श्रीकृष्णांनी त्यांच्या गळ्यांत आपले हात घातले होते. कानावरील कमळे, गालावर रुळणारे कुरळे केस आणि घामाचे बिंदू यांनी ज्यांची मुखकमले शोभत आहेत, अशा गोपी भ्रमर गायक असणाऱ्या रासमंडलामध्ये श्रीकृष्णांच्याबरोबर नृत्य करीत होत्या. त्यावेळी त्यांच्या बांगड्या, पैंजण आणि अन्य वाद्ये वाजत होती. तसेच त्यांच्या वेण्यांमध्ये गुंफलेली फुले इतस्तत: विखरून पडत होती. लहान मुलाने आपल्याच प्रतिबिंबाशी खेळावे त्याचप्रमाणे रमारमण आपलीच प्रतिबिंबे असणाऱ्या त्यांना कधी छातीशी धरीत, कधी हाताने कुरवाळीत, कधी प्रेमपूर्ण नजरेने त्यांच्याकडे पाहात तर कधी लीलेने

मोठ्याने हसत. अशा प्रकारे त्यांनी व्रजसुंदरींबरोबर क्रीडा केली. परीक्षिता ! भगवंतांच्या अंगाच्या स्पर्शाने झालेल्या आनंदाने गोपी भान विसरल्या. फुलांचे हार तुटले. दागिने अस्ताव्यस्त झाले. त्या आपले विस्कटलेले केस, वस्त्रे आणि चोळ्यासुद्धा सांभाळण्यास असमर्थ झाल्या. श्रीकृष्णांची ही रासक्रीडा पाहून स्वर्गातील देवांगनासुद्धा काम-मोहित झाल्या आणि नक्षत्रांसह चंद्रसुद्धा चकित झाला. जरी भगवान स्वत:तच रमणारे असले, तरीसुद्धा त्यांनी जेवढ्या गोपी होत्या, तेवढीच रूपे सहज धारण केली आणि त्यांच्याबरोबर विहार केला. हे राजा ! जेव्हा पुष्कळ वेळपर्यंत विहार केल्यामुळे गोपी थकून गेल्या, तेव्हा करुणामय श्रीकृष्णांनी प्रेमाने आपल्या सुखद करकमलांनी त्यांच्या चेहऱ्यावरून हात फिरवून त्यांचा शीण दूर केला. भगवंतांच्या नखस्पर्शाने गोपींना अतिशय आनंद झाला. त्यांनी ज्यांच्यावर सोन्याची कुंडले झगमगत होती आणि कुरळे केस भिरभिरत होते, अशा आपल्या गालांच्या सौंदर्याने आणि अमृतासारख्या मधुर हास्ययुक्त नजरेने श्रीकृष्णांचा सन्मान केला आणि त्या प्रभूंच्या पवित्र लीलांचे गायन करू लागल्या. यानंतर जसा थकलेला हत्ती किनारे पाडत हत्तिणींबरोबर पाण्यात शिरून क्रीडा करतो, त्याचप्रमाणे (गुणातीत असल्यामुळे) लोकमर्यादा आणि वेदमर्यादा यांची पर्वा न करणाऱ्या भगवंतांनी थकवा दूर करण्यासाठी गोपींसह यमुनेच्या पाण्यात प्रवेश केला. त्यावेळी भगवंतांच्या गळ्यातील वनमाला गोपींचे अंग घासल्याने थोडीशी चुरगळली होती आणि त्यांच्या वक्ष:स्थळाच्या केशराचा तिला रंगही लागला होता. तिच्या चारी बाजूंनी गुणगुणणारे भुंगे त्यांच्या पाठोपाठ चालले होते. जणू गंधर्वराज त्यांच्या कीर्तीचे गायन करीत पाठोपाठ चालले आहेत. परीक्षिता ! यमुनेच्या पाण्यात गोपींनी प्रेमयुक्त कटाक्षांनी भगवंतांच्याकडे पाहात हसत-हसत त्यांच्यावर इकडून-तिकडून खूप पाणी उडविले. विमानात बसलेल्या देवता फुलांचा वर्षाव करून त्यांची स्तुती करू लागल्या. अशाप्रकारे यमुनेच्या पाण्यात आत्माराम श्रीकृष्णांनी गजराजाप्रमाणे विहार केला. यानंतर गोपी आणि भुंग्यांच्या थव्यांनी वेढलेले भगवान यमुनातीरावरील उपवनात गेले. ते अत्यंत रमणीय होते. त्याच्या चारी बाजूंनी पाण्यात आणि जमिनीवर उमललेल्या फुलांचा सुगंध घेऊन मंद मंद वारा वाहात होता. तेथे जसा मदोन्मत्त हत्ती हत्तिणींच्या कळपासह फिरतो, त्याप्रमाणे श्रीकृष्ण त्या वनात विहार करू लागले. जिच्यामध्ये अनेक रात्री एकत्रित झाल्या होत्या, अशी ती शरद ऋतूतील रात्र चंद्राच्या चांदण्याने सुंदर झाली होती. शरद ऋतूसंबंधी ज्या रसांचे वर्णन काव्यात वाचायला मिळते, त्यानुसारच ती रात्र होती. त्या रात्री सत्यसंकल्प श्रीकृष्णांनी आपल्या प्रेयसी गोपींसह शुद्ध सत्त्वमय रासक्रीडा करीत अनेक प्रकारे विहार केला. (१५-२६)

राजाने विचारले- जगाचे स्वामी भगवान यांनी आपला अंश श्रीबलरामांसह धर्माची स्थापना आणि अधर्माचा नाश करण्यासाठी अवतार धारण केला होता. ब्रह्मन ! ते धर्ममर्यादेचा उपदेश करणारे, स्वत: आचरण करणारे आणि त्या सर्वांचे रक्षण करणारे होते. असे असता त्यांनी स्वत: परस्त्रियांना स्पर्श करण्याचे धर्मविरोधी वर्तन कसे केले ? भगवान श्रीकृष्णांना कोणतीही इच्छा नव्हती, असे असतानाही त्यांनी कोणत्या उद्देशाने हे अयोग्य कर्म केले ? हे ब्रह्मचारी मुनीश्वर ! कृपा करून आपण माझा हा संशय दूर करा. (२७-२९)

श्रीशुक म्हणतात- अलौकिक पुरुषांची कधी कधी धर्माचे उल्लंघन आणि लौकिक दृष्ट्या अविचारी कृत्ये दिसतात. परंतु ही त्या तेजस्वी पुरुषांना दोषास्पद ठरत नाहीत. जसे, अग्नी सगळे खातो, परंतु त्यामुळे तो अपवित्र होत नाही. ज्या लोकांच्या

अंगी असे सामर्थ्य नसते, त्यांनी मनानेसुद्धा अशा गोष्टी करता कामा नयेत. एखाद्याने मूर्खपणामुळे असे कृत्य केलेच, तर त्याचा नाश होतो. जसे भगवान शंकर हालाहल विष प्याले, म्हणून दुसरा कोणी पिईल, तर तो जळून जाईल. म्हणून जे थोर आहेत, त्यांचा उपदेश नेहमी सत्य असतो. आणि आचरण काहीवेळा सत्य असते; म्हणून बुद्धिमान माणसाने त्यांचे जे आचरण त्यांच्या उपदेशानुसार असेल, तेवढेच आपल्या जीवनात उतरविले पाहिजे. परीक्षिता ! अशा सामर्थ्यवान पुरुषांच्या अंगी 'कर्ताभाव' नसतो. शुभकर्म करण्यामध्ये त्यांचा काहीही स्वार्थ नसतो आणि अशुभ कर्म करण्याने त्यांचे काही नुकसान होत नाही. असे जर आहे, तर मग जे पशू, पक्षी, मनुष्य, देव इत्यादी सर्व चराचर जीवांचे स्वामी आहेत, त्यांच्याशी मानवाच्या बाबतीतील शुभ आणि अशुभ यांचा संबंध कसा जोडता येईल ? ज्यांच्या चरणकमलांच्या परागांचे सेवन करून भक्तजन तृप्त होतात, ज्यांच्याशी जोडले गेलेले योगी त्याच्या प्रभावाने आपली सर्व कर्मबंधने तोडून टाकतात आणि ज्यांचे तत्त्व जाणणारे ज्ञानी पुरुष स्वच्छंदपणे वागूनही कर्मबंधनात अडकत नाहीत, तेच भगवान स्वत:च्या इच्छेने आपले स्वरूप प्रगट करतात, त्यांना कर्मबंधन कोठून असणार ? गोपी, त्यांचे पती आणि सर्व जीव यांच्या अंत:करणामध्ये जे आत्मरूपाने विराजमान आहेत, जे सर्वांचे साक्षी आहेत, त्यांची देह धारण करणे ही केवळ लीला आहे. भगवान (प्रपंचसुखांत रमलेल्या) जीवांवर कृपा करण्यासाठीच स्वत:ला मनुष्यरूपाने प्रगट करतात आणि तशाच क्रीडा करतात की, ज्या ऐकून जीवांनी भगवत्परायण व्हावे. व्रजवासी गोपांना श्रीकृष्णांबद्दल मुळीच मत्सर वाटला नाही. कारण ते त्यांच्या योगमायेने मोहित होऊन असे समजत होते की, आपल्या पत्न्या आपल्याजवळच आहेत. ब्राह्ममुहूर्त आला. (पहाट झाली.) आपल्या घरी परत जाण्याची गोपींची जरी इच्छा नव्हती, तरी भगवान श्रीकृष्णांच्या आज्ञेने भगवंतांना प्रिय असणाऱ्या गोपी आपापल्या घरी निघून गेल्या. (३०-३९)

परीक्षिता ! जो ज्ञानी मनुष्य श्रीकृष्णांची गोपींबरोबरची ही रास-लीला श्रद्धेने वारंवार श्रवण करतो आणि तिचे वर्णन करतो, त्याला भगवंतांच्या चरणांविषयी परम भक्तीची प्राप्ती होते आणि तो तत्काळ कामभावनेपासून स्वत:ची सुटका करून घेतो. (४०)

अध्याय तेहतिसावा समाप्त

अध्याय चौतिसावा

सुदर्शन आणि शंखचूड यांचा उद्धार

श्रीशुकाचार्य म्हणतात- एकदा गोपाल शिवरात्रीच्या उत्सवाच्या वेळी जत्रा पाहण्याच्या कुतूहलाने बैलगाड्यांत बसून अंबिकावनात गेले. राजन ! तेथे सर्वांनी सरस्वती नदीमध्ये स्नान केले आणि भगवान शंकरांचे व भगवती अंबिकादेवीचे भक्तिभावाने अनेक प्रकारच्या पूजासाहित्याने पूजन केले. तेथे त्यांनी आदरपूर्वक गाई, सोने, वस्त्रे, मध आणि मधुर अन्न भगवान शंकर आपल्यावर प्रसन्न व्हावेत, म्हणून ब्राह्मणांना दान दिले. नंद-सुनंद इत्यादी गोपांनी त्यादिवशी शिवरात्रीचा उपवास होता, म्हणून फक्त पाणी पिऊन ते रात्रीच्या वेळी सरस्वती नदीच्या तीरावर झोपी गेले. (१-४)

त्या वनामध्ये एक अत्यंत भयानक असा अतिशय भुकेलेला अजगर दैवयोगाने तेथे आला आणि झोपी गेलेल्या नंदांना गिळू लागला. अजगराने गिळायला लागताच नंद ओरडू लागले- "बाळा

कृष्णा ! कृष्णा !! धाव, धाव !! पहा पुत्रा ! हा अजगर मला गिळून टाकू लागला आहे. मला तुझाच आधार आहे. मला या संकटातून वाचव.'' नंदांचे ओरडणे ऐकून गोप एकदम उठून उभे राहिले आणि अजगराच्या तोंडात त्यांना पाहून घाबरले. त्याचवेळी पेटलेल्या कोलितांनी ते त्या अजगराला मारू लागले. परंतु कोलितांनी भाजूनसुद्धा अजगराने त्यांना सोडले नाही. इतक्यात भक्तवत्सल भगवान श्रीकृष्ण तेथे पोहोचले आणि त्यांनी आपल्या चरणाने अजगराला स्पर्श केला. भगवंतांच्या पवित्र चरणाचा स्पर्श होताच अजगराचे सर्व पाप नष्ट झाले आणि त्याच क्षणी अजगराचे शरीर सोडून त्याने विद्याधरांनी पूजावे, असे सुंदर रूप घेतले. त्या देदीप्यमान पुरुषाने सोन्याचा हार घातला होता. भगवंतांना प्रणाम करून तो जेव्हा हात जोडून त्यांच्यासमोर उभा राहिला, तेव्हा त्यांनी त्याला विचारले. ''तू कोण आहेस ? अतिशय सौंदर्याने झळकणारा तू दिसण्यात अद्भुत आहेस. ही किळसवाणी अजगरयोनी तुला कशी काय प्राप्त झाली ? इच्छेविरुद्धच तुला या योनीत यावे लागले असेल.'' (५-११)

अजगराच्या शरीरातून निघालेला पुरुष म्हणाला- भगवन ! मी पूर्वी सुदर्शन नावाचा एक विद्याधर होतो. मी अत्यंत सुंदर तर होतोच, शिवाय माझ्याजवळ संपत्तीही पुष्कळ होती. त्यामुळे मी विमानात बसून दिशा-दिशांना फिरत असे. एके दिवशी मी अंगिरा गोत्राच्या कुरूप ऋषींना पाहिले. मला माझ्या सौंदर्याचा गर्व असल्याने मी त्यांना हसलो. माझ्या या कुचेष्टेमुळे रागावून त्यांनी मला अजगर योनीत जाण्याचा शाप दिला. हे माझ्याच पापाचे फळ होते. माझ्यावर कृपा करण्यासाठीच त्या कृपाळू ऋषींनी मला शाप दिला होता; कारण त्या शापामुळेच आज चराचराचे गुरू असलेल्या आपण स्वत: आपल्या चरणाने मला स्पर्श केला. त्यामुळे माझे सर्व पाप नाहीसे झाले. सर्व पापांचा नाश करणाऱ्या हे प्रभो ! जे लोक जन्म-मृत्युरूप संसाराला भिऊन आपल्या चरणांना शरण जातात, त्यांना आपण सर्व भयांपासून मुक्त करता. आपल्या श्रीचरणस्पर्शाने मी शापातून मुक्त झालो आहे. आता आपल्या लोकी जाण्यासाठी मी आपला निरोप घेतो. हे भक्तवत्सला ! महायोगेश्वर पुरुषोत्तमा ! मी आपल्याला शरण आलो आहे. इंद्रादी समस्त लोकेश्वरांच्या परमेश्वरा ! स्वयंप्रकाशा ! मला अनुमती द्यावी. हे अच्युता ! आपल्या केवळ दर्शनानेच मी ब्राह्मणांच्या शापातून तत्काळ मुक्त झालो. जो मनुष्य आपल्या नामांचे उच्चारण करतो, तो स्वत:ला आणि सर्व श्रोत्यांनासुद्धा ताबडतोब पवित्र करतो. तर मग आपल्या श्रीचरणांचा साक्षात स्पर्श झालेल्या माझ्याबद्दल काय सांगावे ? सुदर्शनाने श्रीकृष्णांना प्रदक्षिणा घालून नमस्कार केला. नंतर त्यांची आज्ञा घेऊन तो स्वर्गात गेला आणि नंदानाही या संकटातून सोडविले. राजन ! व्रजवासियांनी जेव्हा श्रीकृष्णांचा हा अद्भुत प्रभाव पाहिला तेव्हा ते विस्मयचकित झाले. त्या क्षेत्रातील धार्मिक विधी पूर्ण करून अतिशय आदरपूर्वक श्रीकृष्णांच्या या लीलेविषयीच बोलत ते पुन्हा व्रजामध्ये परतले. (१२-१९)

एके दिवशी अलौकिक कर्म करणारे श्रीकृष्ण आणि बलराम रात्रीच्या वेळी गोपींसह वनामध्ये विहार करीत होते. निर्मळ वस्त्रे परिधान करून, गळ्यांमध्ये फुलांचे हार घातलेले, शरीराला सुगंधी चंदन लावलेले व सुंदर अलंकार धारण केलेले असे जे राम-कृष्ण त्यांच्या गुणांचे गोपी प्रेमाने आणि आनंदाने गोड स्वरात गायन करीत होत्या. तिन्हीसांज झाली होती. आकाशात चंद्र-तारे उगवू लागले होते. मोगऱ्याच्या सुगंधाने धुंद होऊन भुंगे इकडे तिकडे फिरत होते. आणि कमलपुष्पांचा सुगंध घेऊन वारा वाहात होता. त्यावेळी त्या सर्वांचा आनंद लुटत राम-कृष्णांनी मिळून स्वरांच्या चढ-उतारांसह अतिशय सुंदर राग आळविला. जगातील

सर्व प्राण्यांच्या मनाला आणि कानांना तो भरभरून आनंद देत होता. त्यांचे हे गायन ऐकून गोपी बेभान झाल्या. परीक्षिता ! त्यांना आपल्या शरीराचीसुद्धा शुद्ध राहिली नाही आणि त्यावरून निसटणारी वस्त्रे आणि वेण्यातून गळणारी फुले याचेही त्यांना भान नव्हते. (२०-२४)

हे दोघे भाऊ ज्यावेळी अशा प्रकारे स्वैरपणे विहार करीत होते आणि धुंद होऊन गात होते, त्याचवेळी तेथे शंखचूड नावाचा एक यक्ष आला. तो कुबेराचा सेवक होता. परीक्षिता ! दोन्ही भावांच्या देखत नि:संकोचपणे त्या गोपींना घेऊन तो उत्तरेकडे निघून गेला. ज्यांचे स्वामी श्रीकृष्ण आहेत, त्या गोपी त्यावेळी मोठ्याने ओरडू लागल्या. एखाद्या चोराने गाईंना पळवावे, त्याप्रमाणे हा यक्ष आपल्या प्रिय गोपींना घेऊन चालला आहे आणि त्या 'हे कृष्ण ! हे राम !' म्हणून मोठ्याने हाका मारीत आहेत, असे पाहून ते दोघेजण त्याचवेळी त्याच्यापाठोपाठ धावले. 'भिऊ नका !' असे म्हणून धीर देत, हातामध्ये सागवानाची झाडे घेऊन, अतिशय वेगाने, एका क्षणात ते त्या नीच यक्षाजवळ जाऊन पोहोचले. काळ आणि मृत्यू यांच्या समान असणारे हे दोघे आल्याचे पाहताच घाबरलेला तो मूर्ख, गोपींना तेथेच सोडून प्राण वाचविण्यासाठी पळू लागला. तेव्हा गोपींचे रक्षण करण्यासाठी बलराम तेथेच थांबले; परंतु श्रीकृष्ण मात्र जेथे जेथे तो जाई, तेथे तेथे त्याचा पाठलाग करीत पळत गेले. त्याच्या मस्तकावरील चूडामणी त्यांना काढून घ्यायचा होता. जवळ जाताच भगवंतांनी त्याला पकडले आणि त्या दुष्टाच्या मस्तकावर जोराने एक ठोसा लगावून चूडामणीसह त्याचे मस्तक धडापासून वेगळे केले. अशा प्रकारे श्रीकृष्ण शंखचूडाला मारून तो चमकदार मणी घेऊन परत आले आणि तो, सर्व गोपींच्या देखतच मोठ्या प्रेमाने त्यांनी बलराम दादांना दिला. (२५-३२)

अध्याय चौतिसावा समाप्त

अध्याय पस्तिसावा

युगलगीत

श्रीशुक म्हणतात- श्रीकृष्ण वनात जात, तेव्हा गोपींचे चित्तसुद्धा त्यांच्याबरोबरच जात असे. श्रीकृष्णांच्या लीलांचे गायन करीत त्या आपले दिवस कष्टाने घालवीत. (१)

गोपी म्हणत- सख्यांनो ! श्रीकृष्ण जेव्हा आपला डावा गाल डाव्या हाताच्या बाजूकडे वळवून भुवया नाचवीत, बासरी तोंडाला लावून आपली सुकुमार बोटे त्यांच्या छिद्रांवर फिरवून मधुर तान छेडतात, तेव्हा आकाशात पतींसह विमानात बसून आलेल्या सिद्धपत्न्या ती तान ऐकून प्रथम आश्चर्यचकित होतात. नंतर त्यांचे चित्त कामबाणांनी विद्ध होते. त्यामुळे लज्जित झालेल्या त्या पाहाता पाहाता बेभान होतात. इतक्या की त्यांना वस्त्राचीही शुद्ध राहात नाही. (अशा कृष्णांचा विरह आम्ही कसा बरे सहन करावा ?) (२-३)

अग सख्यांनो ! हे आश्चर्य तर ऐका ! हे नंदनंदन जेव्हा दु:खितांनाही आनंद देणारा वेणू वाजवू लागतात, तेव्हा त्यांचे हास्य हाच त्यांच्या छातीवर रुळणारा हार बनतो आणि चंचल लक्ष्मी तेथे स्तब्ध होऊन राहाते. त्या वेणुवादनाने चित्त आकर्षित झालेले व्रजातील बैल, गाई आणि हरीण यांचे कळप मुग्ध होऊन जातात. दातांनी चावत असलेला गवताचा घास त्यांच्या तोंडातच असतो, दोन्ही कान टवकारून ते असे उभे राहातात की,

जणू काही ते झोपी तरी गेले आहेत किंवा भिंतीवर काढलेली ती चित्रे तरी आहेत. (४-५)

गडे ! ते नंदलाल जेव्हा मस्तकावर मोरपंखांचा मुकुट घालून रंगीत धातूंनी आपले शरीर रंगवितात आणि पानांनी असे सजवून घेतात की, जसा एखादा पहिलवान असावा आणि नंतर जेव्हा बलराम आणि गोपालांसह बासरी वाजवून गाईंना साद घालतात, त्यावेळी त्या नादाने नद्यांचे वाहाणे थांबते. त्यांना असे वाटते की, श्रीकृष्णांच्या चरणांची धूळ वाऱ्याने उडवून आपल्याकडे आणावी. परंतु त्यासुद्धा आमच्यासारख्याच अभागिनी आहेत. जसे श्रीकृष्णांना आलिंगन देतेवेळी आमचे हात थरथरतात आणि नंतर जड होतात, त्याचप्रमाणे त्यासुद्धा तरंगरूप हात प्रेमाने वर उचलू पाहातात, परंतु पुन्हा असहाय होऊन स्थिर राहातात. (६-७)

गोपाल ज्यांच्या लीलांचे गायन करीत असतात, ते आदिपुरुषासारखे स्थिर ऐश्वर्यसंपन्न श्रीकृष्ण जेव्हा वृंदावनामध्ये विहार करीत असताना बासरी वाजवून पर्वतावर चरणाऱ्या गाईंना त्यांच्या नावांनी साद घालतात, त्यावेळी वनातील वृक्ष आणि वेली आपल्या अंतरंगात भगवान विष्णूंचे अस्तित्व सूचित करीत फुलांनी आणि फळांनी बहरून येतात, त्यांच्या भाराने फांद्या वाकून जमिनीवर टेकतात. प्रेमाने त्यांचा रोम-अन्-रोम प्रफुल्लित होतो आणि ते मधाच्या धारांचा वर्षाव करू लागतात. (८-९)

विश्वातील सुंदरांहून सुंदर असणाऱ्या मनमोहनांनी कपाळावर केशरी गंधाचा सुंदर तिलक लावलेला असून गळ्यामध्ये वनमाला धारण केली आहे. तीतून येणारा तुळशीचा दिव्य गंध आणि मधुर मध यांनी धुंद होऊन भुंग्यांच्या झुंडी उच्च स्वराने मधुर गुंजारव करीत असतात. त्या गुणगुणण्याचा आदर करीत त्यांच्या स्वरात स्वर मिळवून जेव्हा ते आपली बासरी वाजवू लागतात, त्यावेळी ते मधुर संगीत ऐकून सरोवरात राहाणाऱ्या सारस, हंस वगैरे पक्ष्यांचे चित्तसुद्धा मोहून जाते. ते श्यामसुंदरांजवळ येऊन बसतात आणि डोळे बंद करून, गुपचुप चित्त एकाग्र करून, ते संगीत ऐकू लागतात. (१०-११)

हे व्रजदेवींनो ! श्यामसुंदर जेव्हा फुलांची कुंडले कानांत घालून बलरामांसह आनंदाने पर्वतशिखरांवर उभे राहून, सगळ्या जगाला आनंदित करीत बासरीच्या मधुर आवाजाने सगळे विश्व भरून टाकतात, त्यावेळी मेघ बासरीच्या तानांबरोबर त्यांच्या वेणुवादनात व्यत्यय न येईल, अशा बेताने हळू हळू गर्जना करून त्यांना साथ देतात. शिवाय स्वत:सारखाच वर्ण असलेल्या घनश्यामांना ऊन लागू नये म्हणून ते त्यांच्या मस्तकावर सावली धरतात, त्यांचे छत्र होतात. तसेच बारीक तुषारांच्या रूपाने जणू दिव्य पुष्पांचा वर्षाव करतात. (१२-१३)

हे यशोदामाते ! तुझा पुत्र गोपाळांबरोबर खेळ खेळण्यात निपुण आहे. तसेच अनेक प्रकारे बासरी वाजविणे ते स्वत:च शिकले आहेत. जेव्हा तोंडल्यांसारख्या लाल ओठांवर बासरी ठेवून ते अनेक रागरागिणी वाजवू लागतात, त्यावेळी ते ऐकून ब्रह्मदेव, शंकर, इंद्र इत्यादी सर्वज्ञ असणारे मोठमोठे देवसुद्धा त्या रागरागिणी ओळखू शकत नाहीत. ते इतके मोहित होऊन जातात की, त्यांचे चित्त वेणुवादनात तल्लीन होऊन जाते, मस्तक नम्र होते आणि ते आपली शुद्ध हरवून बसतात. (१४-१५)

ज्यांच्या तळव्यांवर ध्वज, वज्र, कमळ, अंकुश इत्यादी वैशिष्ट्यपूर्ण सुंदर चिह्ने आहेत, अशा आपल्या चरणकमलांनी ते गाईंच्या खुरांनी खोदल्या गेलेल्या व्रजभूमीचे दु:ख नाहीसे करतात. तसेच गजराजाप्रमाणे चालत जेव्हा ते बासरी वाजवतात, तेव्हा त्यांचा तो बासरीचा आवाज, ते मोहक चालणे आणि त्यांचे ते विलासपूर्ण पाहाणे आमच्या

हृदयात प्रेमभाव वाढवितात. आम्ही त्यावेळी इतक्या मोहित होऊन जातो की, झाडांसारखी आमची स्थिती होते. त्यावेळी आम्हांला केसांची किंवा वस्त्रांची शुद्धही राहात नाही. (१६-१७)

जिचा वास त्यांना अतिशय प्रिय आहे, अशी तुळशीची माळ गळ्यात घालून जेव्हा ते मण्यांच्या माळेने गाई मोजता मोजता एखाद्या प्रिय मित्राच्या गळ्यात हात टाकून बासरीही वाजवितात, त्यावेळी बासरीच्या त्या मधुर स्वरांनी चित्त हरवलेल्या काळविटांच्या माद्या आम्हा गोपींप्रमाणे घराची अभिलाषा सोडून गुणसागर, नंदनंदनालाच वेढून राहातात. (१८-१९)

हे पुण्यशील यशोदामाते ! तुझा बाळ कुंदांचा हार गळ्यात घालून व कौतुकास्पद वेष धारण करून गोपालांसह गाईंच्याबरोबर यमुनेच्या काठी आपल्या मित्रांना आनंद देत खेळू लागतो, त्यावेळी तेथे मलय पर्वतावरील चंदनाने सुगंधित झालेला मंद मंद वारा वाहून तो तुझ्या लाडक्याची सेवा करतो आणि गंधर्व इत्यादी उपदेवता, भाटांप्रमाणे गाऊन-वाजवून त्याला संतुष्ट करतात. तसेच अनेक प्रकारचे नजराणे देऊन त्याला सगळीकडून वेढून त्याची सेवा करतात. (२०-२१)

व्रजातील गाईंवर गोवर्धनधरांचे अतिशय प्रेम आहे; म्हणून तर त्यांनी गोवर्धन पर्वत उचलून धरला होता. संध्याकाळ झाली आहे. आता ते सगळ्या गोधनाला वळवून घेऊन येतच असतील. वाटेत ब्रह्मदेवादी वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध त्यांच्या चरणांना प्रणाम करत असतील. आता बासरी वाजवीत ते येऊ लागले आहेत. आणि गोपाल त्यांच्या कीर्तीचे गायन करीत आहेत. पहा ना ! गाईंच्या खुरांनी उडालेली धूळ वनमालेवर बसली आहे. ते दिवसभर फिरून फिरून दमले असले तरीसुद्धा त्या श्रमांच्या सौंदर्यानेही आमच्या डोळ्यांना किती आनंद देत आहेत बरे ! हे देवकीपुत्र कृष्णचंद्र आम्हां प्रियजनांचे मनोरथ पूर्ण करण्यासाठीच आमच्याकडे येत आहेत. (२२-२३)

सखे ! ते पहा ! त्यांचे सुंदर डोळे काहीसे इकडेतिकडे पाहात आहेत. गळ्यात वनमाला डोलत आहे. सोन्याच्या कुंडलांच्या कांतीने त्यांचे कोमल गाल शोभिवंत दिसत आहेत. त्यामुळेच पिकलेल्या बोराप्रमाणे मुखकमल पिवळसर दिसत आहे. आपल्या बांधवांना व इष्टमित्रांना मान देणारे श्रीकृष्ण आपल्या गजराजासारख्या डौलदार चालीने या संध्याकाळच्या वेळी व्रजातच असलेल्या गाईंचा आणि आमचा, दिवसभरातील असह्य विरहताप नाहीसा करण्यासाठी, दिवसाची उष्णता दूर करणाऱ्या चंद्राप्रमाणे जवळ येऊ लागले आहेत. (२४-२५)

श्रीशुकाचार्य म्हणतात- राजा ! कृष्णमय झालेल्या भाग्यवान गोपी जेव्हा श्रीकृष्ण दिवसा वनात जात, तेव्हा त्या त्यांचेच चिंतन करीत आणि त्यांच्याच लीलांचे गायन करीत त्यातच रममाण होऊन जात. (२६)

अध्याय पस्तिसावा समाप्त

अध्याय छत्तिसावा

अरिष्टासुराचा उद्धार आणि कंसाने अक्रूराला व्रजात पाठविणे

श्रीशुकाचार्य म्हणतात- ज्यावेळी श्रीकृष्ण व्रजामध्ये प्रवेश करीत होते, त्याचवेळी अरिष्टासुर नावाचा एक दैत्य बैलाचे रूप घेऊन तेथे आला. त्याचे वशिंड आणि शरीर प्रचंड होते. तो खुरांनी जमीन उकरीत व तिला थरथर कापवीत गोठ्यात आला. तो मोठ्याने हंबरत होता आणि खुरांनी जमीन उकरीत होता. तो शेपूट उंचावून शिंगांनी तट इत्यादी ढासळवीत चालला होता. मधून मधून तो

पुरत आणि शेण टाकत होता. तो डोळे रोखून पाहात होता. हे राजा ! त्याच्या प्रचंड हंबरण्याने भयभीत झालेल्या स्त्रिया आणि गाई यांचे गर्भपात होत. त्याच्या वशिंडाला पर्वत समजून ढग त्यावर येऊन थांबत. राजा ! त्या तीक्ष्ण शिंगांच्या बैलाला पाहून गोपी आणि गोप सर्वजण भयभीत झाले. गुरे तर इतकी घाबरली की, गोठे सोडून ती पळू लागली. सर्व व्रजवासी त्यावेळी ''कृष्णा ! कृष्णा !! आम्हांला वाचव'' असा आक्रोश करीत श्रीकृष्णांना शरण आले. गोकुळ भयाने व्याकुळ झाले आहे, हे भगवंतांनीही पाहिले. ''भिऊ नका'' असे म्हणून श्रीकृष्णांनी सर्वांना धीर दिला आणि वृषासुराला युद्धाचे आह्वान दिले, ''अरे मूर्खा ! महादुष्टा ! या गाई आणि गवळ्यांना भिववून काय होणार ? तुझ्यासारख्या नीच दुष्टांच्या ताकदीचा गर्व नाहीसा करणारा हा मी इथे आहे'' असे म्हणून भगवंतांनी दंड थोपटले आणि त्याला चिडवण्यासाठी म्हणून आपल्या एका मित्राच्या खांद्यावर हात टाकून ते उभे राहिले. या आह्वानामुळे संतापून तो खुरांनी जोराने जमीन उकरीत श्रीकृष्णांच्या अंगावर धावला. त्यावेळी त्याने उंचावलेल्या त्याच्या शेपटाच्या धक्क्याने आकाशातील ढग गरगर फिरू लागले. त्याने आपली तीक्ष्ण शिंगे समोर धरली. लाल-लाल डोळ्यांनी श्रीकृष्णांकडे तिरप्या नजरेने रोखून पाहात तो त्यांच्यावर इतक्या वेगाने तुटून पडला की, जणू इंद्राने सोडलेले वज्रच ! भगवान श्रीकृष्णांनी आपल्या दोन्ही हातांनी त्याची दोन्ही शिंगे पकडली आणि जसा एक हत्ती दुसऱ्या हत्तीला मागे रेटतो, त्याप्रमाणे त्यांनी त्याला अठरा हात मागे रेटून जमिनीवर पाडले. भगवंतांनी त्याला याप्रमाणे ढकलल्यानंतर लगेच उठून संतापाने दीर्घ श्वास सोडीत पुन्हा त्याने त्यांच्यावर चढाई केली. त्यावेळी त्याचे सर्व शरीर घामाने डबडबले होते. तो अंगावर येत असलेला पाहून भगवंतांनी त्याची शिंगे पकडली आणि त्याला जमिनीवर पाडले. नंतर त्याला पायांनी दाबून ओला कपडा पिळावा, तसा त्याला पिळला. यानंतर त्याचे शिंग उखडून त्यानेच टोचून टोचून त्याला मारले. त्यामुळे तो तेथेच निपचित पडून राहिला. नंतर तोंडातून रक्त ओकीत आणि विष्ठा-मूत्र सोडीत तो दैत्य पाय झटकू लागला. त्याची बुबुळे उलटी झाली आणि अतिशय कष्टाने त्याने आपले प्राण सोडले. तेव्हा देव भगवंतांच्यावर पुष्पवर्षाव करीत त्यांची स्तुती करू लागले. श्रीकृष्णांनी जेव्हा बैलाच्या रूपाने आलेल्या अरिष्टासुराला मारले, तेव्हा सर्व गोप त्यांची प्रशंसा करू लागले. नंतर बलरामांसह त्यांनी वाड्यात प्रवेश केला आणि त्यांना पाहून गोपींचे नेत्र आनंदाने भरून गेले. (१-१५)

अद्‌भुत कृत्ये करणाऱ्या भगवंतांनी जेव्हा अरिष्टासुराला मारले, तेव्हा देवर्षी नारद कंसाला म्हणाले. ''अरे कंसा ! तुझ्या हातातून निसटून आकाशात गेलेली कन्या यशोदेची होती; आणि व्रजामध्ये जे श्रीकृष्ण आहेत, ते देवकीचे पुत्र आहेत. तेथे जे बलराम आहेत, ते रोहिणीचे पुत्र आहेत. तुझ्या भीतीने वसुदेवांनी त्या दोघांना आपला मित्र नंद यांच्याकडे ठेवले आहे. तुझ्या सेवकांचा त्यांनीच वध केला.'' हे ऐकताच कंसाचे अंग क्रोधाने कापू लागले. वसुदेवांना मारण्यासाठी त्याने लगेच तीक्ष्ण तलवार उचलली, परंतु नारदांनी त्याला अडविले. वसुदेवांची मुलेच आपल्या मृत्यूला कारण होणार आहेत, हे जेव्हा कंसाला समजले, तेव्हा त्याने देवकी आणि वसुदेव या दोघांनाही लोखंडी बेड्यांनी जखडून टाकून पुन्हा तुरुंगात डांबले. नारद निघून गेल्यावर कंसाने केशीला बोलावून म्हटले, ''तू व्रजात जाऊन बलराम आणि कृष्णाला मारून टाक.'' तो निघून गेला. यानंतर कंसाने मुष्टिक, चाणूर, शल, तोशल इत्यादी मंत्री आणि माहुतांना बोलावून म्हटले, ''हे वीरवर चाणूरा आणि मुष्टिका ! तुम्ही मी सांगतो ते ऐका. वसुदेवाचे दोन पुत्र बलराम आणि कृष्ण नंदाच्या व्रजामध्ये राहात

आहेत. त्यांच्याच हातून माझा मृत्यू होणार आहे, असे सांगितले जाते. जेव्हा ते येथे येतील, तेव्हा तुम्ही त्यांना कुस्ती खेळण्याचे निमित्त करून मारून टाका. आता तुम्ही आखाड्याच्या चारी बाजूंनी निरनिराळ्या प्रकारचे रंगमंच तयार करा. नगरवासी आणि ग्रामवासी त्यांवर बसून स्वच्छंदपणे ही कुस्ती पाहू देत. हे चतुर माहुता ! तू आखाड्याच्या फाटकावरच कुवलयापीड हत्तीला उभा कर आणि त्याच्याकडून माझ्या शत्रूंना मारून टाक. येत्या चतुर्दशीला विधिपूर्वक धनुष्ययज्ञाला आरंभ करा आणि त्यावेळी वर देणाऱ्या भूतनाथाला पवित्र पशूंचा बळी द्या.'' (१६-२६)

स्वार्थ साधण्यात कुशल असणाऱ्या कंसाने अशी आज्ञा देऊन श्रेष्ठ यदुवंशी अक्रूराला बोलाविले आणि त्याचा हात आपल्या हातात घेऊन म्हटले. ''हे दानशूर अक्रूरा ! तू मला आदरणीय आहेस. आज माझे मित्राने करण्याजोगे एक काम कर. कारण भोजवंशी आणि वृष्णिवंशी यादवांमध्ये माझा सर्वांत हितचिंतक तुझ्याखेरीज दुसरा कोणी नाही. हे मित्रा ! जसा इंद्र स्वत: समर्थ असूनसुद्धा विष्णूंचा आश्रय घेऊन आपला स्वार्थ साधत असतो, त्याप्रमाणे हे मोठे काम तुझ्याकडूनच होणार असल्याने मी तुझा आश्रय घेत आहे. (२७-२९)

तू नंदराजाच्या व्रजामध्ये जा. तेथे वसुदेवाचे दोन पुत्र आहेत. त्यांना याच रथात बसवून आण. उशीर करू नकोस. मी असे ऐकले आहे की, विष्णूंच्या भरवशावर असणाऱ्या देवांनी त्यांच्याकडून माझा मृत्यू व्हावा असे निश्चित केले आहे. म्हणून तू त्या दोघांना घेऊन ये. त्याचबरोबर नजराणे बरोबर घेतलेल्या नंद आणि इतर गोपांनाही घेऊन ये. येथे आणल्यानंतर मी त्यांना माझ्या काळासमान असलेल्या कुवलयापीड हत्तीकडून मारून टाकीन आणि जर कदाचित ते त्या हत्तीच्या तडाख्यातून वाचलेच तर मी आपल्या वज्राप्रमाणे मजबूत आणि चपळ, मुष्टिक व चाणूर या पहिलवानांकडून त्यांना मारीन. ते मारले गेल्यानंतर वसुदेव इत्यादी वृष्णी, भोज आणि दशार्हवंशी त्यांचे बांधव शोकाकुल होतील. मग मी त्यांना स्वत: मारीन. तसेच पिता उग्रसेन हे वृद्ध असूनही राज्याचे लोभी आहेत. मी त्यांना त्यांचे भाऊ देवक आणि अन्य जे जे कोणी माझे शत्रू आहेत, त्या सर्वांना, यमसदनाला पाठवीन. नंतर हे मित्रा ! ही पृथ्वी निष्कंटक होईल. कारण जरासंध आमचे श्वशुर आहेत आणि द्विविद हा प्रिय मित्र आहे. शंबरासुर, नरकासुर आणि बाणासुर यांची तर माझ्याशीच मैत्री आहे. या सर्वांच्या साहाय्याने मी देवांचे पक्षपाती असणाऱ्या राजांना मारून पृथ्वीचे राज्य भोगीन. हे लक्षात घेऊन बालक बलराम-कृष्णांना येथे लवकर घेऊन ये. त्यांना फक्त एवढेच सांग की, ''त्यांनी धनुष्य यज्ञ आणि मथुरेचे वैभव पाहाण्यासाठी येथे यावे.'' (३०-३७)

अक्रूर म्हणाला- महाराज ! आपण आपल्यावरील अरिष्ट दूर करू इच्छिता म्हणून आपला हा विचार योग्यच आहे. पण यशापयशाबद्दल समभाव ठेवून माणसाने आपले कर्तव्य करावे. फळ मिळणे हे दैवाच्या अधीन आहे. मनुष्य मोठमोठे मनोरथ करतो, परंतु दैवामुळे ते सफल होत नाहीत. याचमुळे माणसाला कधी आनंद तर कधी दु:ख होते. असे असून सुद्धा मी आपल्या आज्ञेचे पालन करीन. (३८-३९)

श्रीशुक म्हणतात- कंसाने मंत्री आणि अक्रूरांना अशी आज्ञा करून सर्वांना निरोप दिला. त्यानंतर तो आपल्या महालात आला आणि अक्रूर आपल्या घरी परतला. (४०)

अध्याय छत्तिसावा समाप्त

अध्याय सदतिसावा

केशी आणि व्योमासुर यांचा उद्धार आणि नारदांकडून भगवंतांची स्तुती

श्रीशुक म्हणतात- कंसाने ज्या केशी नावाच्या दैत्याला पाठविले होते, तो अतिशय मोठ्या घोड्याच्या रूपाने, मनोवेगाने दौडत नंदांच्या व्रजामध्ये आला. तो आपल्या टापांनी जमीन उकरत होता. त्याच्या मानेवरील आयाळीच्या झटकण्याने आकाशातील ढग आणि विमानांची गर्दी विखुरली जाऊ लागली. त्याच्या प्रचंड खिंकाळण्याने सर्वजण भयभीत झाले होते. त्याचे डोळे अतिशय विशाल होते. तोंड म्हणजे जणू काही वृक्षाची ढोलच ! मान अवाढव्य होती. प्रचंड काळ्या ढगांसारखे शरीर होते. श्रीकृष्णांना मारून कंसाचे कल्याण करण्यासाठी तो व्रजाचा थरकाप उडवीत आला. भगवान श्रीकृष्णांनी पाहिले की, त्याच्या खिंकाळण्याने आपले गोकुळ भयभीत झाले आहे. आणि त्याच्या शेपटीच्या केसांच्या फटकाऱ्यांनी ढग अस्ताव्यस्त होत आहेत. तसेच तो लढण्यासाठी आपला शोधही घेत आहे. तेव्हा ते आपणहून समोर आले आणि सिंहाप्रमाणे गर्जना करून त्यांनी त्याला आह्वान दिले. भगवंत समोर आलेले पाहून तो आणखी चिडला आणि तोंड पसरून त्यांच्याकडे असा धावला की जणू आकाशालाच पिऊन टाकील. त्याचा वेग खरोखर अतिशय प्रचंड होता. त्याच्यावर विजय मिळविणे तर कठीण होतेच, परंतु त्याला पकडणे सुद्धा सोपे नव्हते. भगवंतांच्याकडे जाऊन त्याने त्यांच्यावर लाथा झाडल्या. (१-४)

परंतु भगवंतांनी त्या लाथा चुकवून रागाने आपल्या दोन्ही हातांनी त्याचे मागचे दोन पाय पकडले आणि गरुड ज्याप्रमाणे सापाला झटकतो, त्याप्रमाणे स्वत: जराही न हालता त्याला तुच्छतेने चारशे हात लांब फेकून दिले. थोड्याच वेळात केशी सावध होऊन पुन्हा उठून उभा राहिला आणि चिडून आ वासून अतिशय वेगाने श्रीहरींच्या अंगावर धावला. तो जवळ आलेला पाहून भगवंतांनी हसून बिळात जाणाऱ्या सापाप्रमाणे आपला डावा हात त्याच्या तोंडात घातला. भगवंतांच्या तापलेल्या लोखंडासारख्या हाताचा स्पर्श होताच केशीचे दात तुटून पडले आणि जसे दुर्लक्ष केल्याने जलोदर रोग वाढतो, त्याप्रमाणे श्रीकृष्णांचा हात त्याच्या पोटात वाढू लागला. श्रीकृष्णांचा हात त्याच्या शरीरात जसजसा वाढू लागला तसा त्याचा श्वासोच्छ्वासाचा मार्ग बंद झाला. आता तो लाथा झाडू लागला. घामाने त्याचे शरीर डबडबले, डोळ्यातील बुबुळे उलटी झाली आणि तो लीद टाकीत गतप्राण होऊन जमिनीवर पडला. त्याचे निष्प्राण शरीर जमिनीवर आपटताच पिकलेल्या चिबडासारखे फुटले. महाबाहू श्रीकृष्णांनी त्याच्या तोंडातून आपला हात सहज ओढून काढला. विनासायास शत्रूचा नाश केला, याचे देवांना अतिशय आश्चर्य वाटले आणि ते भगवंतांवर फुलांचा वर्षाव करून त्यांची स्तुती करू लागले. (५-९)

परीक्षिता ! श्रेष्ठ भगवद्भक्त देवर्षी नारद अद्भुत कर्मे करणाऱ्या श्रीकृष्णांकडे आले आणि एकांतात नेऊन त्यांना म्हणाले. " हे श्रीकृष्णा ! आपले स्वरूप हे मन आणि वाणी यांचा विषय होऊ शकत नाही. आपण योगेश्वर आहात. साऱ्या जगाचेही ईश्वर आहात. आपण सर्वांच्या हृदयात निवास करता आणि सगळे आपल्या ठिकाणी निवास करतात. हे प्रभो ! आपण यदुवंशशिरोमणी आहात. जसा एकच अग्नी सर्व लाकडांमध्ये व्यापून असतो तसेच आपण एकटेच सर्व प्राण्यांचा आत्मा आहात. आत्मरूपाने असूनही आपण स्वत:ला झाकून ठेवता. पंचकोशरूप गुहेच्या आत राहाता;

आपण पुरुषोत्तम, सर्वांचे नियंते, आणि या सर्वांचे साक्षी आहात. प्रभो ! आपण सर्वांचे अधिष्ठान आणि स्वत: मात्र स्वत:चेच अधिष्ठान आहात. सृष्टीच्या प्रारंभी सत्यसंकल्प अशा आपण आपल्या मायेनेच गुणांची निर्मिती करता आणि त्या गुणांचाच स्वीकार करून जगाची उत्पत्ती, स्थिती आणि प्रलय करीत राहाता. तेच आपण राजांच्या रूपात असणाऱ्या दैत्य, प्रमथ आणि राक्षसांचा विनाश करण्यासाठी तसेच धर्ममर्यादांचे रक्षण करण्यासाठी अवतीर्ण झाला आहात. आपण सहजपणे घोड्याचे रूप घेऊन राहिलेल्या या केशी दैत्याला मारलेत, ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे. त्याच्या केवळ खिंकाळण्याला भिऊन देव आपला स्वर्ग सोडून पळून जात असत. (१०-१५)

हे प्रभो ! आता मी, परवा आपल्या हातून चाणूर, मुष्टिक, अन्य पहिलवान, कुवलयापीड हत्ती आणि कंस यांनासुद्धा मारलेले पाहीन. त्यानंतर शंखासुर, कालयवन, मुर आणि नरकासुर यांचा वध झाल्याचे पाहीन. आपण स्वर्गातून कल्पवृक्ष उखडून आणाल आणि इंद्राचा पराजय कराल. आपण आपले शौर्य, कृपा, सौंदर्य इत्यादींच्या आधारे वीरकन्यांबरोबर विवाह कराल आणि हे जगदीश्वरा ! आपण द्वारकेत राहून नृगाची पापातून मुक्तता कराल. आपण जांबवानांकडून जांबवती आणि स्यमंतक मणी घेऊन याल. तसेच आपल्या धामातून ब्राह्मणाच्या मृत पुत्रांना परत आणून द्याल. त्यानंतर आपण पौंड्रकाचा वध कराल. काशीपुरी जाळून टाकाल. युधिष्ठिराच्या राजसूय यज्ञामध्ये शिशुपाल आणि नंतर दंतवक्त्र यांचा वध कराल. प्रभो ! द्वारकेत निवास असताना आपण जे आणखी पुष्कळ पराक्रम कराल की ज्यांचे भविष्यामध्ये पृथ्वीवरील ज्ञानी पुरुष वर्णन करतील, ते सर्व मी पाहीन. यानंतर पृथ्वीवरील भार नाहीसा करण्यासाठी आपण कालरूपाने अर्जुनाचे सारथी व्हाल आणि कित्येक अक्षौहिणी सैन्याचा संहार कराल. हेही मी पाहीन. (१६-२२)

प्रभो ! आपण शुद्ध ज्ञानस्वरूप आहात. आपल्या परमानंदस्वरूपामध्येच आपण राहाता, म्हणून सर्व पदार्थ आपल्याला नेहमीच प्राप्त असतात. आपला संकल्प अमोघ आहे. आपल्या चिन्मय शक्तीसमोर हे संसारचक्र कधी नसतेच. अशा सच्चिदानंदस्वरूप भगवंतांना मी शरण आलो आहे. आपण सर्वांचे नियंते आहात. आपण स्वत:मध्येच राहून आपल्या मायेने विश्वातील सर्व गोष्टी उत्पन्न केल्या आहेत. यावेळी आपली लीला प्रगट करण्यासाठी आपण मनुष्याच्या रूपाने यदू, वृष्णी आणि सात्वतवंशियांचे अग्रणी झाला आहात. प्रभो ! मी आपल्याला नमस्कार करीत आहे. (२३-२४)

श्रीशुक म्हणतात- भगवद्दर्शनाने आनंदित झालेल्या भगवद्भक्त देवर्षी नारदांनी अशा प्रकारे भगवंतांची स्तुती करून त्यांना प्रणाम केला. त्यानंतर त्यांची आज्ञा घेऊन ते तेथून निघून गेले. इकडे भगवान श्रीकृष्णांनी केशीला युद्धात मारल्यामुळे आनंदित झालेल्या बालगोपालांसह ते पूर्वीप्रमाणे गाई चारू लागले आणि गोकुळवासियांना आनंद देऊ लागले. एकदा ते सर्व गोपाल पर्वतमाथ्यावर गुरांना चारीत होते. त्यावेळी ते चोर-शिपाई असा लपंडावाचा खेळ खेळत होते. राजन ! त्यांच्यापैकी काहीजण चोर, काहीजण शिपाई तर काहीजण बोकड बनले होते. अशा प्रकारे निर्भय होऊन ते खेळात रममाण झाले होते. त्याचवेळी गवळ्याचा वेष घेऊन महामायावी मयाचा मुलगा व्योमासुर तेथे आला. खेळामध्ये तो बऱ्याच वेळा चोर होई आणि बोकड झालेल्या पुष्कळ मुलांना चोरून नेऊन लपवून ठेवीत असे. तो महान असुर वारंवार त्यांना घेऊन जाऊन एका डोंगराच्या गुहेत ठेवून तिचे दार एका मोठ्या शिलाखंडाने झाकून टाकी. अशा प्रकारे गोपाळांपैकी फक्त चार-पाच शिल्लक राहिले. भक्तरक्षक भगवंतांनी त्याची ही चाल ओळखली. जेव्हा तो गोपालांना घेऊन जात होता, त्याचवेळी सिंह जसा लांडग्याला पकडतो, तसे

त्यांनी त्याला बळेच पकडले. बलवान व्योमासुराने एखाद्या पहाडाप्रमाणे आपले खरे रूप प्रगट केले आणि स्वत:ला सोडवून घेण्याचा प्रयत्न केला. परंतु भगवंतांनी पकडल्यामुळे कळवळणारा तो स्वत:ला सोडवून घेऊ शकला नाही. (२५-३२)

तेव्हा श्रीकृष्णांनी आपल्या दोन्ही हातांनी जखडून टाकून त्याला जमिनीवर पाडले आणि एखाद्या पशूप्रमाणे त्याचा गळा दाबून त्याला मारले. देवता विमानांत बसून त्यांची ही लीला पाहात होते. नंतर श्रीकृष्णांनी गुहेच्या तोंडाशी लावलेला शिलाखंड फोडला आणि गोपाळांना त्या अडचणीतून बाहेर काढले. तेव्हा देव आणि गोपाळ त्यांची स्तुती करू लागले आणि श्रीकृष्ण आपल्या गोकुळात परत आले. (३३-३४)

अध्याय सदतिसावा समाप्त

अध्याय अडतिसावा

अक्रूराचे व्रजगमन

श्रीशुकाचार्य म्हणतात- महाबुद्धिमान अक्रूरसुद्धा त्या रात्री मथुरेत राहून सकाळी रथात बसून नंदांच्या गोकुळाकडे निघाला. भाग्यवान अक्रूराची कमलनयन भगवंतांच्या ठिकाणी परम भक्ती होती. त्यामुळे गोकुळात जाताना तो असा विचार करू लागला. ''मी असे कोणते शुभ कर्म केले होते, अशी कोणती दीर्घ तपश्चर्या केली होती किंवा कोणत्या सत्पात्र व्यक्तीला असे कोणते दान दिले होते की, ज्याचे फळ म्हणून आज मला भगवान श्रीकृष्णांचे दर्शन होणार ! विषयासक्त अशा मला भगवंतांचे दर्शन अतिशय दुर्लभ वाटते. जसे शूद्र जातीतील माणसाला वेदपठन दुर्लभ असते. परंतु तसेच काही नाही. मला अधमालासुद्धा भगवान श्रीकृष्णांचे दर्शन होईलच; जसे काळरूप नदीतून वाहात जाणारा एखादा एखादेवेळी संसार पार करू शकतो. आज माझी सारी पापे नष्ट झाली. आज माझा जन्म सफळ झाला; कारण योग्यांच्यासुद्धा ध्यानाचा विषय असणाऱ्या भगवंतांच्या चरणकमलांना मी आज प्रत्यक्ष नमस्कार करणार आहे. अहो ! कंसाने आज माझ्यावर मोठीच कृपा केली आहे. त्याने पाठविल्यानेच मी या भूतलावर अवतीर्ण झालेल्या स्वत: भगवंतांच्या चरणकमलांचे दर्शन घेईन. त्यांच्या नखमंडलाच्या केवळ कांतीचे ध्यान करूनही पूर्वीचे ऋषी या अज्ञानरूप अपार अंधकारराशीला पार करू शकले. ब्रह्मदेव, शंकर इत्यादी देव ज्यांची उपासना करतात, लक्ष्मीदेवी आणि प्रेमी भक्तांसह मोठमोठे ज्ञानी लोकसुद्धा ज्यांची आराधना करतात, जे गाई चारण्यासाठी गोपालांबरोबर वनामध्ये भ्रमण करतात आणि जे गोपींच्या वक्ष:स्थळावर लागलेल्या केशराने रंगून जातात, त्या श्रीचरणांचे आज मला दर्शन होणार ! त्या मुकुंदांचे गाल व नाक देखणे आहे. त्यांचे लालसर कमलासारखे नेत्र स्मितपूर्वक पाहातात. त्यांचे ते कुरळ्या केसांनी शोभणारे मुखकमल मला आज खात्रीने पाहायला मिळणार ! कारण आज ही हरणे माझ्या उजव्या बाजूने जात आहेत. पृथ्वीवरील भार उतरविण्यासाठी भगवान विष्णूंनी स्वेच्छेने मनुष्यावतार घेतला आहे. सौंदर्याच्या खाणीचेच आज मला दर्शन होणार ! सहजपणे माझ्या दृष्टीला मिळणारा हा लाभ नव्हे का ? जे अहंकार न बाळगता या कार्यकारणरूप जगाचे फक्त द्रष्टे आहेत, त्यांच्या ठिकाणी असणाऱ्या स्वरूपसाक्षात्कारामुळे अज्ञानामुळे वाटणारा भेदभ्रम मुळीच असत नाही. ते आपल्या योगमायेनेच केवळ

संकल्प करून प्राण, इंद्रिये, बुद्धी इत्यादींसह आपल्या स्वरूपभूत जीवांची निर्मिती करतात आणि त्यांच्याबरोबर गोकुळातील घराघरांतून निरनिराळ्या प्रकारच्या लीला करीत असल्यासारखे भासतात. सर्व पापांचा नाश करणारे त्यांचे परम मंगल गुण, कर्म आणि जन्म यांनी युक्त असलेली वाणीच जगाला जीवन देते, सौंदर्य देते आणि पवित्र करते. परंतु, जी वाणी हे वर्णन करीत नाही, ती प्रेताच्या साजशृंगारासारखीच व्यर्थ होय. तेच भगवान स्वत: यदुवंशामध्ये आपणच घालून दिलेल्या मर्यादांचे पालन करणाऱ्या श्रेष्ठ देवतांचे कल्याण करण्यासाठी अवतीर्ण झाले आहेत. तेच भगवान आपली कीर्ती पसरवीत आज व्रजामध्ये निवास करीत आहेत. सर्व देवसुद्धा त्यांच्या संपूर्ण मंगलमय यशाचे गान करीत असतात. ते महापुरुषांचे आश्रय आणि गुरू आहेत. त्यांचे सौंदर्य तिन्ही लोकांना मोहित करणारे आहे. दृष्टी असणाऱ्यांचा ते परम आनंद आहेत; लक्ष्मीलासुद्धा हवेहवेसे वाटणारे रूप त्यांनी धारण केले आहे. त्यांचे मला आज खात्रीने दर्शन होणार ! कारण आज सकाळपासूनच मला शुभशकुन होत आहेत. (१-१४)

जेव्हा मी त्यांना पाहीन, तेव्हा सर्वश्रेष्ठ पुरुष बलराम तसेच श्रीकृष्णांच्या चरणांना नमस्कार करण्यासाठी लगेच रथातून खाली उडी टाकीन. योगी आत्मसाक्षात्कारासाठी ज्यांना आपल्या हृदयामध्ये धारण करतात, त्यांना मी आज प्रत्यक्ष पाहून त्यांच्या चरणांवर लोटांगण घालणार आहे. त्या दोघांच्याबरोबरच त्यांच्या वनवासी मित्रांनासुद्धा वंदन करणार. जेव्हा मी त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवीन, तेव्हा ते आपले करकमल माझ्या मस्तकावर ठेवतील ना ? जे कालरूपी सापाच्या आवेशाने घाबरून जाऊन त्यांना शरण जातात, त्या लोकांना या करकमलांनीच तर अभयदान दिले आहे. इंद्राने आणि दैत्यराज बलीने भगवंतांच्या याच करकमलांमध्ये भेटवस्तू समर्पित करून तिन्ही लोकांचे प्रभुत्व प्राप्त करून घेतले. ज्या करकमलांमधून कमलपुष्पासारखा सुगंध येतो, त्या याच करकमलांनी स्वत:च्या स्पर्शाने रासलीलेच्या वेळी व्रजयुवतींचा थकवा घालविला होता. कंसाने मला दूत म्हणून पाठविले असले, तरी अच्युत मला शत्रू समजणार नाहीत. कारण ते सगळ्या विश्वाचे साक्षी आहेत; म्हणून माझ्या अंत:करणाच्या आत-बाहेर काय चालले आहे, ते क्षेत्रज्ञरूपाने आपल्या निर्मल ज्ञानदृष्टीने ते पाहात असतात. मी त्यांच्या चरणांजवळ हात जोडून विनम्रभावाने उभा राहीन. तेव्हा स्मितहास्य करीत ते दयार्द्र दृष्टीने माझ्याकडे पाहातील. त्यावेळी माझे जन्मोजन्मींचे सगळे पाप त्याचवेळी नष्ट होऊन जाईल आणि मी नि:शंकपणे परमानंदामध्ये मग्न होऊन जाईन. मी त्यांच्या नात्यातील असून त्यांचा अत्यंत हितचिंतक आहे. त्यांच्याखेरीज माझे दुसरे दैवत नाही. म्हणून ते आपल्या पुष्ट बाहूंनी मला हृदयाशी धरतील. त्याचवेळी माझा देह तीर्थस्वरूप होईल आणि माझी कर्माची बंधने तुटून जातील. ते मला जेव्हा आलिंगन देतील आणि मी हात जोडून मस्तक लववून त्यांच्यासमोर उभा राहीन आणि जेव्हा ते मला 'अक्रूर काका' म्हणून हाक मारतील, तेव्हा माझे जीवन धन्य होईल. श्रीकृष्णांनी ज्याला आपले म्हटले नाही, त्याच्या त्या जन्माचा धिक्कार असो. त्यांना कोणी प्रिय नाही की कोणी अत्यंत जवळचा नाही. त्यांचा कोणी नावडता नाही, कोणी शत्रू नाही की त्यांच्या उपेक्षेला पात्र असाही कोणी नाही. तरीसुद्धा कल्पवृक्ष ज्याप्रमाणे आपल्या जवळ येऊन याचना करणाऱ्याला त्याने मागितलेली वस्तू देतो, त्याचप्रमाणे भगवानसुद्धा जो त्यांना जसा भजतो, त्याला ते तसाच भजतात. मी विनम्र भावाने मस्तक लववून जेव्हा बलरामदादांच्या समोर उभा राहीन तेव्हा हसत हसत ते मला आपल्या हृदयाशी धरून, माझे दोन्ही हात पकडून मला घरात घेऊन

जातील. तेथे माझा सर्व प्रकारे पाहुणचार करतील. त्यानंतर मला विचारतील की, "आमच्या धरत्र्यांच्याबरोबर कंस कसा वागतो ?"(१५-२३)

श्रीशुक म्हणतात- परीक्षिता ! श्वफल्काचा मुलगा अक्रूर वाटेत याच चिंतनात बुडून गेला असतानाच रथाने गोकुळात पोहोचला. तेव्हा सूर्य अस्ताचलाला गेला होता. ज्यांच्या चरणकमलांची पवित्र धूळ सर्व लोकपाल आपल्या किरीटांवर धारण करतात, त्यांच्या चरणचिह्नांचे अक्रूराने गोकुळात दर्शन घेतले. कमल, यव, अंकुश इत्यादी असाधारण चिह्नांमुळे त्यांची ओळख पटत होती आणि त्यांनीच पृथ्वीची शोभा वाढवली होती. त्या चरणचिह्नांचे दर्शन होताच अक्रूराच्या हृदयात आनंद मावेनासा झाला. प्रेमावेगाने त्याच्या अंगावर रोमांच आले. अश्रूंनी डोळे डबडबले. तेव्हा रथातून उडी मारून तो त्या धुळीत लोळू लागला आणि म्हणाला- "अहाहा ! हा तर आमच्या प्रभूंच्या चरणांच्या धुळीचा प्रसाद आहे." (२४-२६)

कंसाचा संदेश घेतल्यापासून श्रीहरींची चिह्ने, दर्शन, गुणश्रवण इत्यादीपर्यंत अक्रूराच्या चित्ताची जशी अवस्था झाली, तशी होणे हाच मनुष्याच्या देह धारण करण्याचा श्रेष्ठ लाभ आहे. म्हणून माणसाने दंभ, भय आणि शोक यांचा त्याग करून मनात नित्य असाच भाव बाळगावा. (२७)

अक्रूराने व्रजात पोहोचल्यावर श्रीकृष्ण आणि बलराम या दोन्ही भावांना गाईंची धार काढण्यासाठी गेलेले पाहिले. श्यामसुंदर श्रीकृष्णांनी पीतांबर आणि बलरामांनी नीलांबर धारण केले होते. त्यांचे डोळे शरत्कालीन कमळाप्रमाणे सुंदर दिसत होते. त्यांनी नुकताच किशोरावस्थेत प्रवेश केला होता. एक सावळा आणि दुसरा गोरा असे ते दोघेही सौंदर्याची खाण होते. पुष्ट बाहू, सुंदर वदन असलेले ते अतिशय मनोहर दिसत होते आणि हत्तीच्या पिल्लाप्रमाणे त्यांची डौलदार चाल होती. ते महात्मे ध्वज, वज्र, अंकुश आणि कमलाचे चिह्न असलेल्या पायांनी व्रजभूमी सुशोभित करीत. त्यांचे स्मितहास्यपूर्वक पाहाणे दयार्द्र होते. त्यांची लीला उदात्त आणि सुंदर होती. गळ्यांत वनमाला आणि मण्यांचे हार झगमगत होते. त्यांनी स्नान करून निर्मळ वस्त्रे परिधान केली होती आणि शरीराला सुगंधी उटणे लावले होते. जगाचे आदिकारण, जगाचे स्वामी, पुरुषोत्तमच जगाच्या रक्षणासाठी आपल्या संपूर्ण अंशांनी बलराम आणि श्रीकृष्ण यांच्या रूपामध्ये अवतीर्ण होऊन आपल्या अंगकांतीने दिशांचा अंधकार दूर करीत आहेत. ते असे दिसत होते की, जणू काही सोन्याने मढलेला पाचूचा आणि चांदीचा पर्वतच. त्यांना पाहाताच अक्रूराने प्रेमावेगाने अधीर होऊन रथातून खाली उडी मारली आणि राम-कृष्णांच्या चरणांना साष्टांग दंडवत घातले. हे राजा ! भगवंतांच्या दर्शनाने त्याला इतका आनंद झाला की, त्याचे डोळे पाण्याने भरून आले. सर्व शरीर पुलकित झाले. त्याचा गळा दाटून आल्याने तो आपले नावसुद्धा सांगू शकला नाही. शरणागत-वत्सल श्रीकृष्णांनी त्याच्या मनातील भाव जाणून प्रेमाने आपल्या चक्रांकित हाताने त्याला जवळ ओढून हृदयाशी धरले. यानंतर उदार मनाच्या श्रीबलरामांनी नमस्कार करणाऱ्या त्याला आलिंगन दिले आणि त्याचा एक हात श्रीकृष्णांनी तर दुसरा बलरामांनी पकडून दोन्ही भाऊ त्याला घरी घेऊन गेले. (२८-३७)

श्रीकृष्णांनी त्याचे चांगले स्वागत करून व खुशाली विचारून उच्च आसनावर बसविले आणि विधिपूर्वक पाय धुऊन मधुपर्कपूजा केली. यानंतर भगवंतांनी अतिथी म्हणून आलेल्या अक्रूराला एक गाय भेट दिली आणि त्याचे पाय चेपून त्याचा थकवा दूर केला. नंतर अतिशय आदराने पवित्र अशा मिष्टान्नाचे भोजन दिले. भोजन झाल्यानंतर धर्माचे मर्म जाणणाऱ्या बलरामांनी प्रेमाने मुखशुद्धीसाठी विडा देऊन सुगंधी माळ घालून

त्याला अतिशय आनंदित केले. अशा प्रकारे सत्कार झाल्यानंतर त्याच्याजवळ जाऊन नंद राजांनी विचारले, ''अक्रूर महोदय ! निर्दयी कंस जिवंत असताना आपण तेथे दिवस कसे घालविता ? कसायाने पाळलेल्या बोकडांसारखीच आपली अवस्था असणार ! ज्या इंद्रियलोलुप पापी माणसाने आपल्या विलाप करणाऱ्या बहिणीच्या कोवळ्या मुलांना ठार मारले, त्याचीच प्रजा असलेल्या आपले कुशल असेल, हा विचार तरी आम्ही कसे करू शकतो ?'' अक्रूराने नंदांना त्यांची खुशाली अगोदरच विचारली होती. त्यांनीही जेव्हा अशा प्रकारे मधुर वाणीने अक्रूराची चौकशी केली आणि त्याचा सन्मान केला, तेव्हा प्रवासामुळे अक्रूराच्या शरीराला आलेला शीण दूर झाला. (३८-४३)

अध्याय अडतिसावा समाप्त

अध्याय एकोणचाळिसावा

श्रीकृष्ण-बलरामांचे मथुरागमन

श्रीशुक म्हणतात- रामकृष्णांनी अक्रूराचे चांगल्या तऱ्हेने आदरातिथ्य केले. तो आरामात पलंगावर बसला. येताना वाटेत ज्या ज्या इच्छा त्याने मनात बाळगल्या होत्या, त्या सर्व पूर्ण झाल्या. राजा ! लक्ष्मीचे आश्रयस्थान असलेले भगवान प्रसन्न झाल्यावर मिळणार नाही, असे काय आहे ? तरीसुद्धा भगवत्परायण भक्तजन कोणत्याही वस्तूची इच्छा करीत नाहीत. (१-२)

संध्याकाळचे भोजन झाल्यानंतर देवकीनंदन भगवान श्रीकृष्णांनी अक्रूराला कंसाचे नातलगांशी वागणे कसे असते, हे विचारून त्याच्या पुढील कार्यक्रमाविषयी विचारले. (३)

श्रीकृष्ण म्हणाले- काका ! आपले मन पवित्र आहे. आपण आलात, आपले स्वागत असो. मी आपले कल्याण इच्छितो. मथुरेतील आमच्या आप्त-स्वकीयांचे कुशल आणि आरोग्य बरे आहे ना ? अहो ! आमचा फक्त नावाचा मामा कंस म्हणजे आमच्या कुलाची व्याधीच आहे. ती वाढत असेपर्यंत आम्ही आमचे आप्तेष्ट आणि त्यांची मुले-बाळे यांच्या खुशालीविषयी काय विचारावे ? काका ! किती ही खेदाची गोष्ट आहे ! माझ्यामुळेच माझ्या निरपराध आणि सदाचरणी माता-पित्यांना अनेक हाल-अपेष्टा सहन कराव्या लागल्या. माझ्यामुळेच त्यांना तुरुंगात टाकले गेले आणि माझ्यामुळेच त्यांची मुले मारली गेली. पुष्कळ दिवसांपासून माझी अशी इच्छा होती की, आपल्यापैकी कोणाची तरी भेट व्हावी. सुदैवाने आज ती इच्छा पूर्ण झाली. काका ! आता आपण मला हे सांगा की, आपण येथे येण्याचे कारण काय ? (४-७)

श्रीशुक म्हणतात- भगवान श्रीकृष्णांनी जेव्हा अक्रूराला असा प्रश्न केला, तेव्हा कंसाचे यादवांशी वैर आणि वसुदेवांना मारण्याचा त्याचा उद्योगसुद्धा त्याने त्यांना सांगितला. अक्रूराने कंसाचा संदेश, ज्या उद्देशाने त्याने आपल्याला दूत म्हणून पाठविले होते तो त्याचा उद्देश आणि नारदांनी वसुदेवांपासून श्रीकृष्णांचा जन्म घेण्याचा वृत्तांत जो कंसाला सांगितला होता तो, असा सर्व वृत्तांत सांगितला. शत्रुपक्षाचा नि:पात करणारे श्रीकृष्ण आणि बलराम, अक्रूराचे हे म्हणणे ऐकून हसू लागले आणि त्यानंतर त्यांनी नंदबाबांना कंसराजाची आज्ञा सांगितली. तेव्हा नंदांनीही सर्व गोपांना आज्ञा केली की, ''सगळे दूध एकत्र करा. नजराणे घ्या आणि छकडे जोडा.

उद्याच आपण मथुरेला जाणार आहोत आणि तेथे जाऊन राजा कंसाला दूध, दही वगैरे देऊ. तेथे एक मोठा उत्सव होत आहे. तो पाहाण्यासाठी देशातील पुष्कळ लोक एकत्र येणार आहेत. आम्हीसुद्धा तो पाहू !'' कोतवालामार्फत नंदांनी आपल्या गोकुळात अशी दवंडी पिटविली. (८-१२)

आपल्या राम-कृष्णांना मथुरेला घेऊन जाण्यासाठी अक्रूर व्रजामध्ये आला आहे, हे ऐकून गोपी अतिशय व्याकूळ झाल्या. भगवान श्रीकृष्ण मथुरेला जाणार ही बातमी ऐकूनच काही गोपी शोकाकुल झाल्या. त्यांच्या उष्ण श्वासांमुळे त्यांची मुखकमले म्लान झाली. काहींची अशी दशा झाली की, त्यांची वस्त्रे ढळली, हातातील काकणे गळून पडली आणि वेण्या सैल झाल्या तरी याचाही त्यांना पत्ता लागला नाही. भगवंतांच्या चिंतनाने काहींच्या चित्तवृत्तींचा लय झाला. जणू त्या समाधिस्थ झाल्या आणि त्यांना स्वत:चेही भान राहिले नाही. काही गोपी श्रीकृष्णांचे प्रेम, स्मितहास्य आणि हृदयस्पर्शी वैशिष्ट्यपूर्ण शब्दरचना असलेले बोलणे आठवून देहभान विसरल्या. भगवंतांचे आकर्षक चालणे, हाव-भाव, प्रेमपूर्ण स्मितहास्ययुक्त पाहाणे, सर्व शोक मिटविणारी थट्टा आणि अलौकिक लीला- हे सर्व आठवून त्यांच्या विरहाच्या भीतीने त्या व्याकूळ झाल्या. त्यांचे जीवनच श्रीकृष्णमय झालेले असल्यामुळे त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. साऱ्याजणी एकत्र येऊन गटागटाने आपापसात म्हणू लागल्या. (१३-१८)

गोपी म्हणाल्या- हे विधात्या ! हे विश्व घडवतोस खरे, परंतु तुझ्या हृदयात दयेचा लवलेश नाही. प्रथम तू मैत्रीने आणि प्रेमाने जीवांना एकमेकांशी जोडतोस, परंतु त्यांच्या इच्छा पूर्ण होण्याआधीच तू विनाकारणच त्यांची एकमेकांपासून ताटातूट करतोस. तुझा हा खेळ लहान पोरांसारखाच नव्हे का ? हे विधात्या ! आधी आम्हांला मुकुंदांचे मुखकमल दाखविलेस. किती सुंदर आहे ते ! काळे कुरळे केस ज्याच्यावर भुरभुरत आहेत, सुंदर गाल आणि उभार नाक यांनी शोभणारे आणि स्मितहास्याच्या लकेरीने सगळा शोक दूर करणारे असे ते मुखकमळ आता मात्र आमच्या दृष्टीआड करीत आहेस ! केवढा हा तुझा दुष्टपणा ! तूच क्रूर आहेस. मात्र अक्रूर नाव घेऊन येथे आलास आणि तूच आम्हांला दिलेले हे डोळे मूर्खासारखे आमच्यापासून काढून घेत आहेस. यांच्याद्वारेच आम्ही श्रीकृष्णांच्या एकेका अंगामध्ये तुमच्या सृष्टीचे संपूर्ण सौंदर्य निरखून पाहात होतो. (१९-२१)

काय आमचे दुर्दैव ! हे नंदनंदन एका क्षणात प्रेम सोडून देऊन, ज्या आम्ही आपले घर-दार, सगे-सोयरे, पती-पुत्र इत्यादींना सोडून यांच्या दासी झालो आणि ज्या यांच्यासाठीच आज शोकाकुल होत आहोत, त्या आमच्याकडे आज पाहातसुद्धा नाहीत. कारण यांना 'नवे ते हवे' ना ! आजच्या रात्रीनंतर येणारा उद्याचा प्रात:काल मथुरेतील स्त्रियांसाठी निश्चितच अतिशय आनंददायक असेल. त्यांची पुष्कळ दिवसांची इच्छा उद्या पूर्ण होणार ! कारण जेव्हा व्रजराज श्यामसुंदर मथुरेत प्रवेश करतील, तेव्हा त्यांना त्यांचे कटाक्षातून प्रगट होणाऱ्या स्मितरूप मधुरसाने युक्त श्रीमुख मनसोक्त पाहाता येईल ! आमचे नंदकुमार धैर्यवान असून जरी वडील माणसांच्या आज्ञेत वागणारे असले, तरी मथुरेतील युवती आपल्या मधाप्रमाणे मधाळ वचनांनी त्यांचे चित्त आपल्याकडे वेधून घेतील आणि हेही त्यांचे लज्जायुक्त स्मितहास्य आणि विलास पाहून तेथेच रमतील. मग ते आम्हां गावढळ गवळणींकडे परतून कशाला येतील बरे ? आज रमारमण, गुणसागर, देवकीनंदनांच्या दर्शनाने मथुरेतील दाशार्ह भोज, अंधक आणि वृष्णिवंशी यादवांचे डोळे निश्चितच धन्य होतील ! त्याचबरोबर जे लोक येथून मथुरेला

जाताना वाटेत त्यांना पाहातील, ते सुद्धा तृप्त होतील. (२२-२५)

पहा सख्यांनो ! इकडे आम्ही गोपी इतक्या दु:खित होत आहोत आणि हा अक्रूर आमच्या परम प्रियतम श्यामसुंदरांना आमच्या डोळ्यांआड लांब घेऊन निघाला आहे. शिवाय दोन गोष्टी सांगून आम्हांला धीरही देत नाही. अशा या अत्यंत क्रूर पुरुषाचे नाव अक्रूर असायलाच नको होते ! सख्यांनो ! जराही दयामाया नसलेले हे श्रीकृष्णही रथात बसलेसुद्धा ! वेडे गोपगणही छकड्यांतून त्यांच्याबरोबर जाण्याची किती घाई करीत आहेत ! आणि आमच्यातील जाणती वृद्ध मंडळीही तिकडे कानाडोळा करीत आहेत. आज दैवच आमच्यावर उलटले आहे, हेच खरे ! चला ! आपणच जाऊन माधवांना अडवू. आपल्या घरांतील वृद्ध किंवा नातलग आपले काय करणार आहेत ? अर्ध्या क्षणासाठीसुद्धा सोडण्यास कठीण अशी मुकुंदांची सोबत आमच्या दुर्भाग्याने आज आमच्यापासून हिरावून घेऊन आम्हांला व्याकूळ करून सोडले आहे. सख्यांनो ! ज्यांचे प्रेमपूर्ण मनोहर स्मितहास्य, गूढ अशा गोड गोड गोष्टी, प्रेमाने लीलेने पाहाणे, आणि दिलेली आलिंगने यांमुळे आपल्या त्या रासक्रीडेच्या रात्री, एका क्षणात संपल्या असे आपल्याला वाटले. आता त्यांच्याखेरीज ही अपार विरहव्यथा आम्ही कशी नाहीशी करावी बरे ? दररोज सायंकाळी गोपालांनी वेढलेले ते बलरामांसह गाई चारून वनातून परत येत, त्यावेळी त्यांचे काळेभोर कुरळे केस आणि गळ्यातील पुष्पहार गाईंच्या खुरांमुळे उडालेल्या धुळीने माखलेले असत. बासरी वाजवीत आणि स्मितहास्ययुक्त कटाक्ष टाकीत ते आमची हृदये विद्ध करीत. त्यांच्याखेरीज आम्ही कशा जिवंत राहू बरे ? (२६-३०)

श्रीशुक म्हणतात- असे बोलणाऱ्या अत्यंत विरहव्याकूळ गोपी लाज-लज्जा सोडून 'हे गोविंदा ! हे दामोदरा ! हे माधवा !' म्हणत गळा काढून रडू लागल्या. अशा प्रकारे रडण्यातच गोपींची सारी रात्र गेली. सूर्योदय झाला. संध्यावंदन वगैरे नित्यकर्मे आटोपून अक्रूर रथावर स्वार होऊन रथ हाकू लागला. नंद वगैरे गोपसुद्धा दूध, दही इत्यादींनी भरलेली मडकी आणि पुष्कळ भेटवस्तू घेऊन छकड्यात बसून त्यांच्या पाठोपाठ चालू लागले. याचवेळी प्रेमरंगात रंगलेल्या गोपी प्राणप्रिय श्रीकृष्णांजवळ गेल्या, तेव्हा त्यांनी वळून आपल्याकडे पाहिल्यामुळे त्या काहीशा आनंदित झाल्या. नंतर त्यांच्याकडून काही निरोप मिळेल, या आशेने तेथेच उभ्या राहिल्या. आपण निघाल्यामुळे गोपी शोकसंतप्त झालेल्या पाहून त्यांनी दूतामार्फत "मी येईन" असा प्रेमाचा संदेश पाठवून त्यांना धीर दिला. जोपर्यंत रथाचा ध्वज आणि चाकांमुळे उडणारी धूळ गोपींना दिसत होती, तोपर्यंत त्या चित्रासारख्या तटस्थ उभ्या राहिल्या; मात्र त्यांची मने नंदलालामागोमाग चालली होती. श्रीकृष्णांच्या परत फिरण्याची आशा मावळली, तेव्हा त्या घरी परतल्या. आता आपल्या प्रियतमाच्या लीलांचे गायन करीत त्या दिवस कंठू लागल्या आणि अशा प्रकारे आपला शोक हलका करू लागल्या. (३१-३७)

हे राजा ! इकडे भगवान श्रीकृष्णसुद्धा बलराम आणि अक्रूर यांच्यासह वायूसमान वेग असणाऱ्या रथात बसून पापनाशिनी यमुना नदीच्या तीरावर जाऊन पोहोचले. तेथे ते हात-तोंड धुऊन पाचूसारखे निळे आणि अमृताप्रमाणे गोड यमुना नदीचे पाणी प्याले. नंतर बलरामांसह भगवान वनराईत जाऊन रथात बसले. दोघा भावांना रथात बसवून अक्रूर त्यांचा निरोप घेऊन यमुनेच्या डोहावर येऊन विधिपूर्वक स्नान करू लागला. त्या पाण्यात बुडी मारून तो वेदमंत्रजप करू लागला. त्याचवेळी

पाण्यात तेच श्रीकृष्ण आणि बलराम एकत्र बसलेले त्याला दिसले. ''रथात बसलेले वसुदेवाचे पुत्र इथे पाण्यात कसे काय ? आणि येथे आहेत तर कदाचित रथात नसतील,'' असा विचार करून त्याने पाण्यातून डोके वर काढून पाहिले. तेथेही ते पहिल्याप्रमाणेच बसले होते. त्यांना पाण्यात पाहिले, तो आपला भ्रम असावा, असे वाटून त्याने पुन्हा बुडी मारली. परंतु पुन्हा त्याला असे दिसले की, तेथे साक्षात श्रीशेष विराजमान आहेत आणि सिद्ध, चारण, गंधर्व तसेच असुर मस्तक लववून त्यांची स्तुती करीत आहेत. त्यांना हजार मस्तके असून त्यांच्या प्रत्येक फण्यावर मुगुट शोभून दिसत आहे. कमळाच्या गाभ्याप्रमाणे असलेल्या उज्ज्वल शरीरावर त्यांनी नीलांबर परिधान केले आहे. त्यामुळे हजारो शिखरांनी युक्त अशा कैलासासारखे ते दिसत होते. त्यांच्याच अंगावर घनश्याम पहुडले आहेत. त्यांनी रेशमी पीतांबर परिधान केला आहे. ते अत्यंत शांत व चतुर्भुज असून त्यांचे तांबड्या कमळाच्या पाकळीसारखे लालसर डोळे आहेत. त्यांचे मुख मनोहर आणि प्रसन्न असून त्यांचे पाहाणे मधुर हास्याने शोभणारे आहे. भुवया सुंदर असून नाक अपरे आहे. त्यांचे कान, गाल आणि लालसर ओठ शोभिवंत दिसत आहेत. त्यांचे हात गुडघ्यापर्यंत लांब आणि पुष्ट आहेत. खांदे उंच असून वक्षःस्थळावर लक्ष्मीदेवी आहे. गळा शंखाप्रमाणे असून नाभी खोल आहे. तीन वळ्यांनी शोभणारे उदर पिंपळपानाप्रमाणे शोभत आहे. कंबर आणि नितंब स्थूल, हत्तीच्या सोंडेप्रमाणे जांघा, सुंदर गुडघे आणि पिंड्या आहेत. घोटे उंच असून लाल लाल नखांतून किरणे बाहेर पडत आहेत. चरणकमळ दहा बोटांच्या पाकळ्यांनी शोभून दिसत आहे. अत्यंत बहुमूल्य रत्नजडित असा मुगुट, कडी, बाजूबंद, करदोटा, यज्ञोपवीत, हार, नूपुरे आणि कुंडले यांनी ते अलंकृत आहेत. एका हातात कमळ शोभत आहे आणि इतर तीन हातांमध्ये शंख, चक्र व गदा आहे. वक्षःस्थळावर श्रीवत्साचे चिन्ह, गळ्यात कौस्तुभमणी आणि वनमाला शोभत आहे. नंद-सुनंद इत्यादी पार्षद आपले 'स्वामी'; सनकादी ऋषी 'परब्रह्म'; ब्रह्मदेव, महादेव इत्यादी देव 'सर्वेश्वर'; मरीची इत्यादी नऊ ब्राह्मण 'प्रजापती' आणि प्रह्लाद, नारद, वसू इत्यादी भगवंतांचे श्रेष्ठ भक्त त्यांना 'भगवान' समजून त्या त्या भावांनुसार निर्दोष वेदवाणीने त्यांची स्तुती करीत आहेत. त्याचबरोबर लक्ष्मी, पुष्टी, सरस्वती, कांती, कीर्ती आणि तुष्टी (म्हणजेच ऐश्वर्य, बल, ज्ञान, श्री, यश आणि वैराग्य- या षडैश्वर्यरूप शक्ती), इला (पृथ्वी-शक्ती), ऊर्जा (लीलाशक्ती), विद्या-अविद्या (जीवांना मोक्ष आणि बंधन यांना कारणरूप असणारी बहिरंग शक्ती) ह्लादिनी, संवित् (अंतरंग शक्ती) आणि माया या शक्ती मूर्तिमंत होऊन त्यांची सेवा करीत आहेत. (३८-५५)

हे सर्व पाहून अक्रूराला परमानंद झाला. मनात परम भक्तीचा उदय झाला. सारे शरीर पुलकित झाले. प्रेमभावाचा उद्रेक झाल्यामुळे त्याचे डोळे अश्रूंनी भरून आले. आता अक्रूराने धीर धरून भगवंतांच्या चरणांवर डोके टेकवून नमस्कार केला आणि हात जोडून हळू हळू सद्गदित वाणीने तो भगवंतांची स्तुती करू लागला. (५६-५७)

अध्याय एकोणचाळिसावा समाप्त

अध्याय चालिसावा

अक्रूराने केलेली भगवान श्रीकृष्णांची स्तुती

अक्रूर म्हणाला- प्रभो ! आपण प्रकृती इत्यादी सर्व कारणांचे कारण आहात. आपणच अविनाशी पुरुषोत्तम नारायण आहात. तसेच ज्यांनी या जगाची निर्मिती केली, त्या ब्रह्मदेवांची उत्पत्ती आपल्याच नाभिकमलातून झाली. मी आपल्याला नमस्कार करतो. पृथ्वी, जल, अग्नी, वायू, आकाश, अहंकार, महत्तत्त्व, प्रकृती, पुरुष, मन, इंद्रिये, सर्व इंद्रियांचे विषय आणि त्यांच्या अधिष्ठानभूत देवता हेच सर्व चराचर जगाला कारण आहेत. पण हे सगळे आपलेच अंगस्वरूप आहेत. प्रकृती इत्यादी सर्व पदार्थ अचेतन असल्यामुळे आत्मस्वरूप अशा तुमचे स्वरूप जाणू शकत नाहीत; ब्रह्मदेवसुद्धा प्रकृतीच्या गुणांनी युक्त आहेत. म्हणून तेसुद्धा आपले गुणांच्या पलीकडे असलेले स्वरूप जाणत नाहीत. साधू , योगी, अध्यात्म, अधिभूत व अधिदैव यांचे साक्षी महापुरुष व नियंत्रक ईश्वराच्या रूपामध्ये आपलीच उपासना करतात. काही कर्मकांडी ब्राह्मण वेदमंत्रांनी अनेक देवतावाचक नावे आणि अनेक रूपे असलेले यज्ञ करतात आणि त्याद्वारा आपलीच उपासना करतात. काही ज्ञानी सर्व कर्मांचा त्याग करून शांतभावात स्थिर राहातात आणि समाधीने ज्ञानस्वरूप अशा आपलीच आराधना करतात. आणखी काही शुद्धचित्त वैष्णव आपणच सांगितलेल्या पांचरात्र इत्यादी विधींनी आपल्याशी तन्मय होऊन आपल्या 'चतुर्व्यूह' इत्यादी अनेक किंवा 'नारायण' या एकाच स्वरूपाची पूजा करतात. भगवन ! दुसरे काही लोक शैवपंथानुसार आचार्यभेदामुळे अनेक अवांतर भेद असलेल्या शिवस्वरूप अशा आपलीच पूजा करतात. हे प्रभो ! जे लोक दुसऱ्या देवतांची भक्ती करतात आणि त्या देवतांना आपल्यापेक्षा भिन्न समजतात, ते सर्वजणसुद्धा वास्तविक आपलीच आराधना करतात. कारण आपणच सर्व देवतांच्या रूपांमध्ये आहात आणि सर्वेश्वरसुद्धा आहात. हे प्रभो ! जशा पर्वतात उगम पावणाऱ्या नद्या पावसाच्या पाण्याने भरून सर्व बाजूंनी समुद्रात प्रवेश करतात, त्याचप्रमाणे सर्व प्रकारचे उपासना-मार्ग शेवटी आपल्यालाच येऊन मिळतात. (१-१०)

प्रभो ! सत्त्व, रज आणि तम हे आपल्या प्रकृतीचे तीन गुण आहेत. ब्रह्मदेवापासून ते स्थावर वस्तूंपर्यंतचे सर्व चराचर जीव त्या गुणांनीच ओतप्रोत भरलेले आहेत. परंतु आपण सर्वस्वरूप असूनही त्या गुणांनी लिप्त झालेले नाहीत. आपण सर्व वृत्तींचे साक्षी आहात. तीन गुणांचा प्रवाह अज्ञानमूलक असून तो देवता, मनुष्य, पशु-पक्षी इत्यादी सर्व योनींमध्ये व्याप्त आहे. मी आपणांस नमस्कार करतो. अग्नी आपले मुख, पृथ्वी चरण, सूर्य आणि चंद्र नेत्र, आकाश नाभी, दिशा कान, स्वर्ग मस्तक, देवेंद्र भुजा, समुद्र उदर आणि वायू आपल्या प्राणशक्तीच्या रूपामध्ये उपासनेसाठी कल्पिलेला आहे. वृक्ष आणि वनस्पती हे रोम, मेघ डोक्यावरील केस, पर्वत आपली हाडे व नखे, दिवस व रात्र पापण्यांची उघडझाप, प्रजापती जननेंद्रिय आणि पाऊस हेच आपले वीर्य आहे. हे अविनाशी भगवन ! जसे पाण्यामध्ये पुष्कळसे जलचर जीव आणि औदुंबराच्या फळामध्ये लहान-लहान कीटक असतात. त्याचप्रमाणे उपासनेसाठी स्वीकारलेल्या आपल्या मनोमय पुरुषरूपामध्ये अनेक प्रकारच्या जीवजंतूंनी भरलेले असे लोक आणि त्यांचे लोकपाल कल्पिलेले आहेत. प्रभो ! आपण लीला करण्यासाठी पृथ्वीवर जी जी रूपे धारण करता, ते सर्व अवतार, लोकांचा शोक-मोह धुऊन टाकतात आणि नंतर तेच लोक मोठ्या आनंदाने

आपल्या यशाचे गायन करीत असतात. आपण वेद, ऋषी, वनस्पती यांचे रक्षण आणि सत्यव्रताला ज्ञान देण्यासाठी म्हणून मत्स्यरूप धारण करून प्रलयाच्या समुद्रामध्ये स्वच्छंद विहार केला होता. त्या मत्स्यरूपाला मी नमस्कार करतो. आपणच मधु आणि कैटभ नावाच्या असुरांचा संहार करण्यासाठी हयग्रीव अवतार धारण केला होता. मी आपल्या त्या रूपालासुद्धा नमस्कार करतो. आपणच ते विशाल कूर्माचे रूप धारण करून मंदराचलाला धारण केले होते. आपल्याला मी नमस्कार करतो. आपणच पृथ्वीच्या उद्धाराची लीला करण्यासाठी वराहरूपाचा स्वीकार केला होता. आपणास माझा नमस्कार असो. प्रह्लादासारख्या साधुजनांचे भय मिटविणाऱ्या हे प्रभो ! आपल्या त्या अलौकिक नृसिंह रूपाला मी नमस्कार करतो. आपण वामनरूप घेऊन आपल्या पायाने तीन लोक व्यापले होते. मी आपणास नमस्कार करीत आहे. धर्माचे उल्लंघन करणाऱ्या गर्विष्ठ क्षत्रियरूपी वनाला तोडणाऱ्या परशुरामाला मी नमस्कार करतो. रावणाचा नाश करणाऱ्या श्रीरामांना मी नमस्कार करतो. वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न आणि अनिरुद्ध या चतुर्व्यूहरूपात असणाऱ्या भागवतांच्या देवाला मी नमस्कार करतो. दैत्य आणि दानवांना मोहित करण्यासाठी शुद्ध असे बुद्धरूप घेणाऱ्या आपणास मी नमस्कार करीत आहे. पृथ्वीवरील क्षत्रिय जेव्हा म्लेंच्छांप्रमाणे वर्तन करू लागतील, तेव्हा त्यांचा नाश करण्यासाठी कल्किरूप घेणाऱ्या आपणास मी नमस्कार करतो. (११-२२)

भगवन ! हा जीवलोक आपल्या मायेने मोहित झाला आहे. त्यामुळेच 'मी-माझे' या खोट्या दुराग्रहात फसून कर्ममार्गामध्ये भटकत आहे. हे प्रभो ! मीसुद्धा किती मूर्ख ! स्वप्नात दिसणाऱ्या पदार्थांप्रमाणे भ्रामक असणारे देह-घर, पत्नी-पुत्र, धन-स्वजन इत्यादी खरे समजून त्यांच्या मोहात गुंतून भटकत आहे. (२३-२४)

प्रभो ! माझा मूर्खपणा तर पहा ! मी अनित्य वस्तूंना नित्य, अनात्म्याला आत्मा आणि दुःखाला सुख समजलो. अशा प्रकारे मी अज्ञानाने सांसारिक सुख-दुःखांतच रमून गेलो आणि ज्यांच्यावर खरे प्रेम करावे त्या आपल्याला विसरलो. जसे एखाद्या अडाणी माणसाने पाण्यासाठी तळ्याकडे जावे आणि त्याच्यावर त्याच्यामुळेच उत्पन्न झालेले शेवाळ पाहून तेथे पाणी नाही असे समजावे आणि याउलट मृगजळाकडे धाव घ्यावी, तसाच मीसुद्धा आपल्याला सोडून खोट्या सुखाच्या मागे भटकत आहे. माझी बुद्धी विषयवासनायुक्त आहे. माझ्या मनामध्ये अनेक वस्तूंच्या कामना आणि त्या पूर्ण करण्यासाठी कर्म करण्याचे संकल्प उठत असतात. शिवाय निग्रह करण्यास अत्यंत कठीण अशी ही इंद्रिये मनाला बळजबरीने इकडे तिकडे फरपटत नेतात, म्हणून मी या मनाला रोखू शकत नाही. तो मी, अभक्तांना अतिशय दुर्लभ अशा आपल्या चरणकमलांना शरण आलो आहे. हे स्वामी ! हासुद्धा मी आपला कृपाप्रसादच मानतो. कारण हे पद्मनाभ ! जेव्हा जीवाची संसारातून मुक्त होण्याची वेळ येते, तेव्हाच सत्पुरुषांची उपासना घडून चित्तवृत्ती आपल्या ठायी जडते. प्रभो ! आपण शुद्ध विज्ञानस्वरूप आहात. सर्व अनुभूतींचे आपणच कारण आहात. जीव, ईश्वर आणि प्रकृती आपणच आहात. आपल्या शक्ती अनंत आहेत. आपण स्वतः ब्रह्म आहात. मी आपणांस नमस्कार करीत आहे. प्रभो ! आपणच वासुदेव आणि सर्व जीवांचे आश्रयस्थान संकर्षण आहात. बुद्धी मनाच्या व अधिष्ठात्या (प्रद्युम्न आणि अनिरुद्ध) हृषीकेशा ! मी आपणांस नमस्कार करतो. प्रभो ! शरण आलेल्या माझे रक्षण करा. (२५-३०)

अध्याय चाळिसावा समाप्त

अध्याय एकेचालिसावा

श्रीकृष्णांचा मथुरेत प्रवेश

श्रीशुकाचार्य म्हणतात- अक्रूर अशी स्तुती करीत असतानाच एखाद्या नटाने एखादी भूमिका संपल्यावर पुन्हा मूळ रूपात यावे, त्याप्रमाणे भगवान श्रीकृष्णांनी त्याला पाण्यामध्ये आपल्या दिव्यरूपाचे दर्शन घडविले आणि पुन्हा ते आवरून घेतले. भगवंतांचे ते दिव्यरूप अंतर्धान पावलेले पाहून तो पाण्याबाहेर आला आणि लगबगीने सर्व आवश्यक नित्यकर्मे पार पाडून चकित अवस्थेत रथाकडे परतला. श्रीकृष्णांनी त्याला विचारले, ''काका ! आपण पृथ्वी, आकाश किंवा पाण्यामध्ये एखादी अद्‌भुत वस्तू पाहिलीत काय ? कारण आपल्याकडे पाहिल्यावर असेच वाटते.'' (१-३)

अक्रूर म्हणाला - प्रभो ! पृथ्वी, आकाश किंवा पाण्यामध्ये जितके म्हणून अद्‌भुत पदार्थ आहेत, ते सर्व विश्वस्वरूप आपल्यामध्येच आहेत. जर मी आपल्यालाच पाहात आहे, तर अशी कोणती अद्‌भुत वस्तू असणार आहे की, जी मी पाहिली नाही ? भगवन ! जेवढ्या म्हणून अद्‌भुत वस्तू आहेत, त्या पृथ्वीवर असोत, पाण्यात असोत, किंवा आकाशात असोत त्या सगळ्या ज्यांच्यामध्ये आहेत, त्या आपल्यालाच मी पाहिल्यावर त्याखेरीज अद्‌भुत वस्तू मी कोणती पाहणार ? गांदिनीपुत्र अक्रूराने असे म्हणून रथ हाकला आणि त्याने श्रीकृष्ण व बलरामांना दिवस मावळतेवेळी मथुरापुरीत आणले. परीक्षिता ! वाटेत ठिकठिकाणी लागणाऱ्या गावातील लोक भेटण्यासाठी येत आणि वसुदेवपुत्रांना पाहून इतके आनंदमग्न होऊन जात की, ते आपली दृष्टी बाजूला करू शकत नसत. नंद इत्यादी गोप अगोदरच तेथे जाऊन पोहोचले होते आणि मथुरेच्या बाहेर उपवनात त्यांची वाट पाहात होते. त्या सर्वांच्याजवळ जाऊन विनम्रपणे उभे असलेल्या अक्रूराचा हात आपल्या हातात घेऊन जगदीश्वर भगवान श्रीकृष्णांनी हसत हसत म्हटले. ''काका ! आपण अगोदर रथासह पुढे जाऊन मथुरेत प्रवेश करा आणि आपल्या घरी जा. आम्ही येथे थांबून नंतर नगर पाहू.'' (४-१०)

अक्रूर म्हणाला- प्रभो ! मी आपणा दोघांखेरीज मथुरेत जाऊ शकत नाही. स्वामी ! मी आपला भक्त आहे. हे भक्तवत्सल प्रभो ! आपण मला एकट्याला सोडू नका. भगवन ! या. आपण माझ्याबरोबर चला. हे परम हितैषी भगवन ! आपण स्वतः, बलराम, गोपाल, तसेच नंद इत्यादी आप्तांसह येऊन माझे घर सनाथ करा. आम्हां गृहस्थांची घरे आपल्या चरणधुळीने पावन करा. नंतर आम्ही आपले चरण धुऊ. त्या आपल्या चरणोदकाने अग्नी, देवता, पितर असे सर्वजण तृप्त होतील. प्रभो ! आपले पाद्यपूजन करूनच बली महान पुण्यश्लोक ठरला. इतकेच नव्हे तर अनन्य भक्तांना मिळणारे अतुलनीय ऐश्वर्य आणि मोक्ष त्याला प्राप्त झाला. आपले चरण धुतलेले पाणी हेच पवित्र गंगोदक होय. त्याने तिन्ही लोक पवित्र केले. त्याच्याच स्पर्शाने सगराच्या पुत्रांना सद्गती प्राप्त झाली आणि तेच जल शंकरांनी आपल्या मस्तकावर धारण केले. हे यदुश्रेष्ठा ! हे देवाधिदेवा ! हे जगताचे स्वामी ! आपल्या गुणांचे आणि लीलांचे श्रवण व कीर्तन मंगलकारक आहे. उत्तम पुरुष आपल्या गुणांचे कीर्तन करीत असतात. हे नारायणा ! मी आपणास नमस्कार करतो. (११-१६)

श्रीभगवान म्हणाले - काका ! मी माझ्या दादाबरोबर आपल्या घरी येईन, पण अगोदर या यादवांच्या शत्रूला मारून माझ्या आप्तेष्टांना सुखी करीन. (१७)

श्रीशुकदेव म्हणतात - भगवानांनी असे म्हटल्यानंतर थोडासा खिन्न झालेला अक्रूर नगरात गेला आणि त्याने कंसाला त्याचे काम केल्याचे निवेदन केले आणि तो आपल्या घरी गेला. नंतर तिसऱ्या प्रहरी, बलराम आणि गोपालांसह भगवान श्रीकृष्णांनी मथुरा पाहण्यासाठी त्या नगरात प्रवेश केला. भगवंतांनी पाहिले की, नगराच्या तटांना स्फटिकांची उंच उंच गोपुरे असून घरांना सुद्धा स्फटिकांची दारे लावलेली आहेत. त्यांना सोन्याचे मोठमोठे दरवाजे आणि सोन्याचीच तोरणे लावलेली आहेत. नगरात तांब्या-पितळेची धान्यांची कोठारे, पागा इत्यादी आहेत. चोहोबाजूंच्या खंदकामुळे कोठूनही त्या नगरात प्रवेश करणे कठीण आहे. जागोजागी असलेल्या फळबागांनी व रमणीय फुलबागांनी ती नगरी शोभिवंत दिसत आहे. सुवर्णाने सजविलेले चौक, धनिकांचे महाल, त्यांच्या सभोवतालचे बगीचे, कारागिरांचे बाजार व लोकांची निवासस्थाने नगराची शोभा वाढवीत आहेत. वैडूर्य, हिरे, स्फटिक, नील, पोवळी, मोती आणि पाचू इत्यादींनी मढविलेले सज्जे, चबुतरे, झरोके आणि फरशा झगमगत आहेत. त्यांच्यावर बसलेले मोर, कबूतर इत्यादी पक्षी निरनिराळ्या बोली बोलत आहेत. सडका, बाजार, गल्ल्या आणि चौकांमध्ये पुष्कळ सुगंधी पाणी शिंपडलेले आहे. ठिकठिकाणी फुले, जवाचे अंकूर, लाह्या आणि तांदूळ पसरलेले आहेत. घरांच्या दरवाजांपाशी दही आणि चंदनचर्चित असे पाण्याने भरलेले कलश ठेवले आहेत. तसेच ते दरवाजे फुले, दीपमाळा, पाने, घडांसह केळी आणि सुपारीची झाडे, झेंडे आणि रेशमी पताकांनी उत्तम रीतीने सजविले आहेत. (१८-२३)

हे राजा ! वसुदेवनंदन श्रीकृष्ण आणि बलराम यांनी मित्रांसह राजमार्गाने मथुरा नगरीत प्रवेश केला. त्यावेळी नगरातील स्त्रिया अतिशय उत्सुकतेने त्यांना पाहाण्यासाठी लगबगीने गच्च्यांवर चढून उभ्या राहिल्या. त्या गडबडीमध्ये काहींनी आपली वस्त्रे आणि दागिने उलट-सुलट परिधान केले. काहींनी चुकून कुंडले, बांगड्या इत्यादी दोन-दोन घालण्याऐवजी विसरून एक-एकच घातले. काहीजणींनी एकाच कानामध्ये तानवडे घातले तर कोणी एकाच पायाला पैंजण बांधले. कुणी एकाच डोळ्यात काजळ घातले. काही स्त्रिया भोजन करता करता हातातील घास तसाच टाकून निघाल्या. सर्वांची मने आनंदाने भरून आली होती. काहीजणी अंगाला तेल लावीत होत्या, त्या स्नान न करताच निघाल्या. ज्या झोपी गेल्या होत्या, त्या गडबड ऐकून उठून तशाच निघाल्या. ज्या माता मुलांना दूध पाजीत होत्या, त्या त्यांना खाली ठेवून निघाल्या. कमलनयन भगवान श्रीकृष्ण मदमस्त गजराजासारखे डौलाने चालत होते. लक्ष्मीलासुद्धा आनंदित करणाऱ्या आपल्या रूपाने नगरातील नारींच्या डोळ्यांना त्यांनी तृप्त केले आणि आपल्या विलासपूर्ण प्रगल्भ हास्ययुक्त नजरेने त्यांची मने आकर्षित करून घेतली. मथुरेतील स्त्रियांचे मन वारंवार श्रीकृष्णांच्या अद्भुत लीला ऐकूनच त्यांना पाहाण्यासाठी व्याकूळ झाले होते. आज त्यांनी त्यांना पाहिले. आणि श्रीकृष्णांनीसुद्धा आपल्या मंद स्मितहास्ययुक्त दृष्टीचा अमृतवर्षाव करून त्यांचा सन्मान केला. परीक्षिता ! त्या स्त्रिया आपल्या डोळ्यांच्याद्वारे भगवंतांना आपल्या हृदयात घेऊन गेल्या आणि त्यांच्या आनंदमय स्वरूपाला त्यांनी आलिंगन दिले. त्यांचे शरीर पुलकित झाले आणि पुष्कळ दिवसांची त्यांची विरहव्याधी शांत झाली. महालांच्या गच्च्यांवर चढून मथुरेतील स्त्रिया बलराम आणि श्रीकृष्णांवर पुष्पवर्षाव करू लागल्या. त्यावेळी त्या स्त्रियांची मुखकमले प्रेमाने प्रफुल्लित झाली होती. ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्यांनी ठिकठिकाणी दही, अक्षता, पाण्याने भरलेले घट, फुलांचे हार,

चंदन आणि भेटवस्तूंनी राम-कृष्णांची आनंदमय होऊन पूजा केली. राम-कृष्णांना पाहून नगरवासी म्हणू लागले, गोपींनी असे काय तप केले आहे की, जेणेकरून, मनुष्यमात्राला परमानंद देणाऱ्या या दोघांना त्या नेहमी पाहात असत. (२४-३१)

त्याच वेळी कपडे रंगविण्याचेही काम करणारा एक धोबी येत असलेला श्रीकृष्णांनी पाहिला व त्याच्याकडे त्यांनी धुतलेले अतिशय उत्तम कपडे मागितले. बंधो ! आमच्या अंगाला व्यवस्थित बसतील, असे कपडे ते घालण्यास पात्र असणाऱ्या आम्हांला दे. तू आम्हांला वस्त्रे दिलीस, तर तुझे परम कल्याण होईल, यात बिलकूल शंका नाही. सर्व दृष्टींनी परिपूर्ण असूनही भगवंतांनी वस्त्रांची मागणी केली; परंतु राजा कंसाचा तो अतिशय उर्मट सेवक रागावून तुच्छतेने म्हणाला, हे उद्दामांनो ! ''दऱ्या-खोऱ्यात आणि जंगलात राहाणारे तुम्ही नेहमी असेच कपडे घालता काय ? मग आजच तुम्हांला राजाचे कपडे कशाला पाहिजेत ? तर मूर्खांनो ! लवकर येथून निघून जा ! जगण्याची इच्छा असेल तर पुन्हा अशा तऱ्हेने मागू नका. तुमच्यासारख्या उन्मत्तांना राजाचे शिपाई कैद करतात, त्यांना मारहाण करतात आणि त्यांच्याजवळ जे काही असेल, ते हिसकावून घेतात.'' जेव्हा तो धोबी अशी बडबड करू लागला, तेव्हा श्रीकृष्णांनी हातानेच त्याचे मस्तक उडवले. हे पाहून धोब्याच्या हाताखाली काम करणारे सर्वजण, कपड्यांची गाठोडी तेथेच टाकून, इकडे तिकडे पळून गेले. ती वस्त्रे श्रीकृष्णांनी घेतली. मग श्रीकृष्ण आणि बलरामांनी आपल्या मनाजोगती वस्त्रे परिधान केली. आणि उरलेल्यांपैकी पुष्कळशी वस्त्रे गोपाळांना दिली. उरलेले कपडे जमिनीवर टाकून दिले.

(३२-३९)

ते थोडेसे पुढे गेले, तेव्हा त्यांना एक शिंपी भेटला. भगवंतांचे अनुपम सौंदर्य पाहून तो अत्यंत प्रसन्न झाला. त्या रंगी-बेरंगी सुंदर वस्त्रांतून त्याने त्यांना शोभणारे वेष तयार करून दिले. अनेक प्रकारच्या वेषांनी एक सावळा व दुसरा गोरा असे ते दोघेही आणखीच शोभू लागले. उत्सवाच्या वेळी उत्तम सजवलेली शुभ्र आणि सावळ्या रंगांची हत्तीची पिल्ले शोभावीत तसे. भगवान श्रीकृष्ण त्या शिंप्यावर प्रसन्न झाले. त्यांनी त्याला या लोकी भरपूर संपत्ती, शक्ती, ऐश्वर्य, आपले स्मरण आणि अतींद्रिय शक्ती दिल्या. तसेच मृत्यूनंतर आपले सारूप्यही दिले. (४०-४२)

नंतर ते दोघे सुदामा माळ्याच्या घरी गेले. दोघा भावांना पाहाताच त्याने उठून जमिनीवर डोके टेकवून त्यांना प्रणाम केला. नंतर त्यांना आसनावर बसवून त्याने त्यांचे पाय धुतले आणि गोपालांसह त्यांची अर्घ्य, फुलांचे हार, पाने, चंदन इत्यादी सामग्रीने विधिपूर्वक पूजा केली. आणि तो म्हणाला, ''हे प्रभो ! आपणा दोघांच्या आगमनाने आमचा जन्म सफळ झाला. कुळ पवित्र झाले. तसेच आज पितर, देव आणि ऋषी आमच्यावर संतुष्ट झाले, असे मी मानतो. आपण दोघेजण संपूर्ण जगताचे परम कारण आहात. आपण या संसाराचा अभ्युदय आणि मोक्ष यासाठीच या पृथ्वीवर आपल्या शक्तींसह अवतीर्ण झाला आहात. आपण जरी भजन करणाऱ्यांनाच भजता, तरीसुद्धा आपल्या दृष्टीत विषमता नाही. कारण आपण सर्व जगताचे सुहृद आणि आत्मा आहात. आपण चराचरामध्ये समरूपाने राहाता. मी आपला दास आहे. आपण दोघांनी मला आज्ञा करावी की, मी आपली काय सेवा करू ? भगवन ! आपण जीवाला आज्ञा देऊन एखाद्या कार्यासाठी त्याची नियुक्ती करता, हा आपला त्याच्यावर मोठाच अनुग्रह आहे.'' हे राजेंद्रा ! भगवंतांचे मनोगत जाणून सुदाम्याने मोठ्या प्रेमाने अतिशय सुंदर सुंदर सुगंधित पुष्पांनी गुंफलेले हार त्यांच्या गळ्यात घातले. गोपाल आणि

बलरामांसह भगवान श्रीकृष्ण जेव्हा त्या सुंदर-सुंदर हारांनी अलंकृत झाले, तेव्हा त्या वरदायक प्रभूंनी प्रसन्न होऊन विनम्र आणि शरण आलेल्या सुदाम्याला वर दिले. सुदाम्यानेही त्यांच्याकडे हाच वर मागितला की सर्वस्वरूप अशा त्यांच्या ठायी आपली दृढ भक्ती असावी, त्यांच्या भक्तांशी मैत्री असावी आणि सर्व प्राण्यांबद्दल अत्यंत दया असावी. (४३-५१)

हे वर त्याला देऊन शिवाय वंशपरंपरागत वाढत जाणारी लक्ष्मी, शौर्य, आयुष्य, कीर्ती आणि सौंदर्य हेही दिले. नंतर श्रीकृष्ण बलरामांसह पुढे गेले. (५२)

अध्याय एकेचाळिसावा समाप्त

अध्याय बेचाळिसावा

कुब्जेवर कृपा, धनुष्यभंग आणि कंसाची भीती

श्रीशुकदेव म्हणतात - यानंतर श्रीकृष्ण जेव्हा राजमार्गावरून पुढे चालले होते, तेव्हा त्यांनी एका युवतीला पाहिले. ती दिसायला सुंदर होती, परंतु शरीराने कुबडी होती. ती हातामध्ये उटण्यांचा डबा घेऊन चालली होती. भक्तांना आनंद देणारे श्रीकृष्ण हसत हसत तिला म्हणाले. "हे सुंदरी ! तू कोण आहेस ? हे उटणे कोणासाठी घेऊन चालली आहेस ? हे आम्हांला नीट सांग. बाई ग ! ही सुगंधी उटी तू आम्हांला दे. त्यामुळे लवकरच तुझे कल्याण होईल." (१-२)

सैरंध्री म्हणाली- "हे परम सुंदरा ! मी कंसाची त्रिवक्रा नावाची उटणे लावणारी आवडती दासी आहे. माझे उटणे भोजराज कंसाला अतिशय आवडते; परंतु आपणा दोघांखेरीज याला पात्र असा दुसरा कोण आहे बरे !" भगवंतांचे सौंदर्य, कोमलता, मधुरता, मंद हास्य, प्रेमालाप आणि पाहाणे यांमुळे प्रभावित होऊन तिने ते उटणे त्या दोन्ही भावांना भरपूर लावले. (३-४)

तेव्हा स्वत:च्या शरीराच्या रंगाखेरीज वेगळ्या रंगाचे उटणे अंगाला लावल्यामुळे ते फारच सुंदर दिसू लागले. भगवान त्या कुब्जेवर प्रसन्न झाले. आपल्या दर्शनाचे प्रत्यक्ष फळ दाखविण्यासाठी त्यांनी तीन ठिकाणी वाकड्या परंतु सुंदर चेहऱ्याच्या कुब्जेला सरळ करण्याचा विचार केला. भगवंतांनी आपल्या पायांनी कुब्जेची पावले दाबून धरली आणि दोन बोटांनी हनुवटी धरून तिचे शरीर किंचितसे वर उचलले. तत्क्षणी तिचे सर्व अंग सरळ झाले मुकुंदांच्या स्पर्शाने ती विशाल नितंब आणि स्तनांनी युक्त अशी एक उत्तम युवती झाली. (५-८)

रूप, गुण आणि औदार्याने संपन्न झालेल्या तिच्या मनात भगवंतांशी मिलन व्हावे, अशी इच्छा उत्पन्न झाली. त्यांच्या शेल्याचे टोक पकडून हसत-हसत ती त्यांना म्हणाली. "हे वीरा ! या. आपण घरी जाऊ. मी आपणास येथे सोडू इच्छित नाही; कारण आपण माझे चित्त विचलित केले आहे. हे पुरुषोत्तमा ! या दासीवर प्रसन्न व्हा." जेव्हा बलरामांच्या देखत कुब्जेने अशी विनवणी केली, तेव्हा श्रीकृष्ण बरोबरीच्या गोपालांकडे पाहात, हसत हसत तिला म्हणाले. "हे सुंदरी ! तुझे घर हे माणसांची काळजी मिटविणारे आहे. मी माझे कार्य पूर्ण करून तुझ्या घरी येईन. आमच्यासारख्या बेघर वाटसरूंना तुमच्यासारख्यांचाच तर आधार आहे." अशा प्रकारे गोड गोड बोलून त्यांनी तिला निरोप दिला. ते जेव्हा बाजारपेठेत पोहोचले, तेव्हा तेथील व्यापाऱ्यांनी त्यांचे आणि बलरामांचे विडे , फुलांचे हार, चंदन आणि निरनिराळे नजराणे देऊन पूजन केले. त्यांच्या दर्शनाने हृदयात प्रेमाचा आवेग उत्पन्न झालेल्या स्त्रियांचे भान हरपत असे. त्यांची

वस्त्रे, अंबाडे आणि हातातील काकणे शिथिल होत असत आणि त्या एखाद्या चित्रातील मूर्ती वाटत. (९-१४)

यानंतर नगरातील लोकांना धनुर्यज्ञाचे ठिकाण विचारीत श्रीकृष्ण तेथे जाऊन पोहोचले. तेथे त्यांनी इंद्रधनुष्याप्रमाणे असलेले एक अद्भुत धनुष्य पाहिले. (१५)

त्या मौल्यवान धनुष्याची पूजा केली होती आणि पुष्कळसे सैनिक त्याच्या रक्षणाकरिता ठेवले होते. रक्षकांनी मनाई करूनही श्रीकृष्णांनी बळजबरीने ते धनुष्य उचलले. सगळ्यांच्या देखतच त्यांनी ते धनुष्य डाव्या हाताने सहज उचलून त्याला दोरी लावली आणि एका क्षणात दोरी ओढून बलवान उन्मत्त हत्तीने ऊस मोडावा, तसे ते मधोमध मोडले. जेव्हा धनुष्य मोडले, तेव्हा त्या आवाजाने आकाश, पृथ्वी आणि दिशा दुमदुमून गेल्या. तो आवाज ऐकून कंससुद्धा भयभीत झाला. यावर धनुष्याचे रक्षण करणारे अविचारी रक्षक साथीदारांसह त्यांच्यावर अतिशय चिडले आणि त्यांनी त्यांना पकडण्याच्या इराद्याने "पकडा ! बांधा !" म्हणत वेढा घातला. त्यांचा दुष्ट हेतू जाणून बलराम आणि श्रीकृष्णसुद्धा रागावले आणि त्यांनी त्या धनुष्याचेच तुकडे उचलून त्यांनीच त्यांची पिटाई केली. त्याच तुकड्यांनी त्यांनी, कंसाने जी सेना पाठविली होती, तिचासुद्धा संहार केला. यानंतर ते यज्ञशाळेच्या मुख्य दरवाजातून बाहेर आले आणि आनंदाने मथुरानगरीचे वैभव पाहात फिरू लागले. या दोन्ही भावांच्या अद्भुत पराक्रमाची गोष्ट जेव्हा नगरवासियांनी ऐकली आणि त्यांचे तेज, साहस तसेच अनुपम रूप पाहिले, तेव्हा हे दोघेजण कोणीतरी श्रेष्ठ देव असावेत असे त्यांना वाटले. अशा प्रकारे ते दोघे स्वच्छंदपणे फिरत असता सूर्यास्त झाला. नंतर गोपालांसमवेत राम-कृष्ण नगराच्या बाहेर जेथे छकडे होते तेथे परत आले. लक्ष्मी आपणास मिळावी, असे इच्छिणाऱ्या इतरांचा त्याग करून लक्ष्मीने ज्यांना आपले निवासस्थान बनविले, त्याच पुरुषभूषण श्रीकृष्णांचे अंगोपांगांचे सौंदर्य मथुरावासी पाहात होते. भगवान इकडे येतेवेळी व्रजातील गोपी विरहातुर होऊन मथुरावासियांबद्दल जे जे काही बोलल्या होत्या, ते ते सर्व मथुरेत खरे ठरले. (१६-२४)

नंतर राम-कृष्णांनी हात-पाय धुऊन दुधाची खीर इत्यादी पदार्थांनी भोजन केले आणि कंसाचे मनोगत जाणून घेऊन त्या रात्री ते तिथेच आरामात झोपी गेले. (२५)

जेव्हा कंसाने असे ऐकले की, कृष्ण-रामांनी धनुष्य तोडले, त्याचे रक्षक आणि त्यांच्या मदतीसाठी पाठविलेल्या सेनेचासुद्धा संहार केला आणि हे सर्व म्हणजे त्यांचा एक खेळ होता, तेव्हा तो अतिशय घाबरला. त्या दुर्बुद्धीला रात्री उशिरापर्यंत झोप आली नाही. जागेपणी आणि स्वप्नातसुद्धा त्याला मृत्यूचे सूचक पुष्कळसे अपशकून झाले. जागेपणी त्याला असे दिसे की, त्याच्या शरीराचे प्रतिबिंब असूनही त्याला मस्तक नसे. मध्ये बोट वगैरे नसूनही चंद्र इत्यादी त्याला दोन दोन दिसत. सावली दुभंगलेली दिसे आणि कानात बोटे घालूनही घूं घूं असा आवाज ऐकू येत नसे. झाडे सोनेरी दिसत होती आणि धुळीत स्वत:च्या पायांचे ठसे दिसत नव्हते. कंसाला स्वप्नात दिसले की, तो प्रेतांना मिठी मारीत आहे, गाढवावर बसून चालला आहे आणि विषप्राशन करीत आहे. त्याचे सर्व शरीर तेलाने माखले आहे, गळ्यात जास्वंदीच्या फुलांची माळ आहे आणि तो नग्न होऊन कुठेतरी एकटाच जात आहे. स्वप्नात आणि जागेपणी त्याने अशा प्रकारचे पुष्कळसे अपशकुन पाहिले. त्यामुळे मृत्यूच्या भीतीने चिंताग्रस्त होऊन त्याची झोप उडाली. (२६-३१)

परीक्षिता ! जेव्हा रात्र संपली आणि सूर्यनारायण पूर्व समुद्राच्या वर आले, तेव्हा राजा कंसाने मल्ल-क्रीडामहोत्सवास प्रारंभ केला. राजाच्या कर्मचाऱ्यांनी

आखाडा चांगल्या रीतीने सजविला. नगारे, तुताऱ्या वाजू लागल्या. बैठकीच्या जागा फुलांचे गजरे, झेंडे, वस्त्रे आणि पानाफुलांच्या तोरणांनी सजविल्या गेल्या. त्यावर ब्राह्मण, क्षत्रिय इत्यादी नागरिक आणि गावातील लोक, असे सर्वजण नियोजित ठिकाणी बसले. राजेही आपापल्या आसनांवर जाऊन बसले. आपल्या मंत्र्यांसह कंस, मांडलिक राजांच्या मध्ये राजसिंहासनावर जाऊन बसला. अपशकून झालेले असल्याने यावेळीसुद्धा तो मनातून घाबरलेलाच होता. तेव्हा पहिलवानांच्या दंड थोपटण्यापाठोपाठ वाद्ये वाजू लागली आणि गर्विष्ठ पहिलवान खूप सजून आपापल्या उस्तादांसह आखाड्यात येऊन उतरले. चाणूर, मुष्टिक, कूट, शल आणि तोशल हे पहिलवान वाद्यांच्या सुमधुर आवाजाने उत्साहित होऊन आखाड्यामध्ये येऊन बसले. त्याचवेळी भोजराज कंसाने बोलाविलेले नंद इत्यादी गोप राजाला नजराणे देऊन एका मंचावर जाऊन बसले. (३२-३८)

अध्याय बेचाळिसावा समाप्त

अध्याय त्रेचाळिसावा

कुवलयापीडाचा उद्धार आणि आखाड्यात प्रवेश

श्रीशुक म्हणतात- हे परीक्षिता ! श्रीकृष्ण आणि बलराम स्नानादी नित्यकर्मे करून कुस्तीच्या नगाऱ्याचा आवाज ऐकून ती पाहाण्यासाठी निघाले. आखाड्याच्या दरवाजात जाऊन श्रीकृष्णांनी पाहिले तर तेथे माहुताने कुवलयापीड नावाचा हत्ती उभा केला आहे. तेव्हा श्रीकृष्णांनी कंबर कसली, कुरळे केस बांधले आणि मेघाप्रमाणे गंभीर वाणीने माहुताला म्हटले. ''माहुता ! अरे माहुता ! आम्हा दोघांना जाण्यासाठी वाट दे. बाजूला हो. वेळ लावू नकोस. नाहीतर मी हत्तीसह आताच्या आता तुला यमसदनाला पाठवितो.'' श्रीकृष्णांनी माहुताला असे धमकावल्यावर तो रागाने लालबुंद झाला आणि त्याने काळ, मृत्यू किंवा यमराजाप्रमाणे भयंकर असणाऱ्या कुवलयापीडाला क्रुद्ध करून श्रीकृष्णांच्या दिशेने सोडले. (१-५)

कुवलयापीडाने भगवंतांच्यावर झेप घेऊन त्यांना अत्यंत वेगाने सोंडेत लपेटून घेतले. परंतु भगवंत सोंडेतून बाहेर सटकले आणि सोंडेवर एक ठोसा लगावून त्याच्या पायांच्या मधोमध जाऊन लपले. ते दृष्टीआड झाल्याचे पाहून कुवलयापीडाला अतिशय राग आला. त्याने आपल्या सोंडेने हुंगून भगवंतांना शोधले आणि पकडलेसुद्धा. परंतु त्यांनी ताकदीने स्वत:स सोडविले. यानंतर भगवंतांनी त्या बलवान हत्तीचे शेपूट पकडून गरुड सापाला जसा फरपटत नेतो, त्याप्रमाणे अगदी सहजपणे त्याला शंभर हात फरपटत नेले. जसे गोल फिरणाऱ्या वासराबरोबर ते लहान असताना फिरत, त्याप्रमाणे त्याचे शेपूट पकडून ते त्याला फिरवू लागले. तो जेव्हा डावीकडे वळून त्यांना पकडण्याचा प्रयत्न करी, तेव्हा ते उजवीकडे जात आणि जेव्हा तो उजवीकडे वळे, तेव्हा हे डावीकडे जात. यानंतर त्यांनी हत्तीच्या समोर येऊन त्याला एक ठोसा लगावला आणि त्याला खाली पाडण्यासाठी म्हणून त्याच्या समोरून इकडे तिकडे ते असे पळू लागले की, तो जणू त्यांना आता पकडील किंवा नंतर पकडील. धावता धावता श्रीकृष्णांनी एकदम जमिनीवर पडण्याचे नाटक केले आणि लगेच उठून ते उभे राहिले. त्या वेळी ते जमिनीवर पडले असे वाटून त्याने रागाने आपले दोन्ही दात त्यांच्यावर मारण्याचा प्रयत्न केला, पण ते दात जमिनीवर आपटले. कुवलयापीडाची ही चढाई जेव्हा वाया गेली, तेव्हा तो आणखीनच चिडला. माहुतांनी हाकल्यावर तो

क्रुद्ध होऊन श्रीकृष्णांवर तुटून पडला. तो आपल्या अंगावर झेप घेत आहे असे पाहून भगवान मधुसूदन त्याच्याजवळ गेले आणि एकाच हाताने त्याची सोंड पकडून त्याला त्यांनी जमिनीवर आपटले. तो पडल्याबरोबर श्रीहरींनी सिंहाप्रमाणे सहज त्याला पायाने दाबून धरून त्याचा दात उपटला आणि त्याच दाताने हत्तीला आणि माहुतांना यमसदनाला पाठविले. (६-१४)

मेलेल्या हत्तीला तेथेच टाकून त्याचा दात घेऊन त्यांनी आखाड्याच्या जागी प्रवेश केला. यावेळची त्यांची शोभा काय वर्णावी ! हत्तीचा दात खांद्यावर होता, शरीरावर रक्त आणि हत्तीच्या मदाचे थेंब दिसत होते. आणि मुखकमलावर घामाचे बिंदू झळकत होते. (१५)

परीक्षिता ! श्रीकृष्ण आणि बलराम हातामध्ये शस्त्रासारखे गजदन्त घेऊन काही गोपालांबरोबर कुस्तीच्या मैदानापाशी आले. ज्यावेळी श्रीकृष्ण बलरामांसह समारंभभवनात आले, तेव्हा ते पहिलवानांना वज्रकठोर, सामान्य लोकांना नर-रत्न, स्त्रियांना मूर्तिमंत कामदेव, गोपांना आप्त, दुष्ट राजांना शासन करणारे, त्यांच्या माता-पित्यांना मुलगा, कंसाला मृत्यू, अज्ञानी लोकांना सामान्य बालक, योग्यांना परम तत्त्व आणि वृष्णिवंशियांना श्रेष्ठ देव आहेत असे वाटले. (सर्वांना एकाच भगवंतांमध्ये आपापल्या भावानुसार अनुक्रमे रौद्र, अद्‌भुत, शृंगार, हास्य, वीर, वात्सल्य, भयानक, बीभत्स, शांत आणि भक्ती या दहा रसांचा अनुभव आला.) राजन ! कंस मोठा धीराचा पुरुष होता, तरीसुद्धा कुवलयापीडाला मारल्याचे पाहून त्याच्या लक्षात आले की, यांना जिंकणे अत्यंत अवघड आहे. त्यावेळी तो अतिशय भयभीत झाला. महापराक्रमी श्रीकृष्ण आणि बलराम फुलांचे हार, वस्त्रे आणि अलंकार यांमुळे सुंदर दिसत होते. असे वाटत होते की, उत्तम वेष धारण करून दोन नटच आले आहेत. त्यांच्या तेजामुळे पाहाणाऱ्यांची मने त्यांच्यावरच खिळून जात. ते दोघेजण आखाड्यात असे शोभून दिसत होते. परीक्षिता ! त्या पुरुषोत्तमांना पाहून मंचावर बसलेले मथुरेचे नागरिक आणि देशांतील लोक यांचे डोळे अत्यानंदाने भरून आले आणि प्रफुल्लित चेहरे उत्कंठेने भरून आले. त्यांच्या मुखांकडे कितीही पाहिले, तरी लोकांचे डोळे तृप्त होतच नव्हते. जणू काही ते त्यांना डोळ्यांनी पीत, जिभेने चाटीत, नाकाने हुंगीत आणि हातांनी धरून हृदयाशी कवटाळीत. त्यांचे सौंदर्य, गुण, माधुर्य आणि निर्भयपणा यांनी जणू उपस्थितांना त्यांच्या लीलांचे स्मरण करून दिले आणि ते लोक आपापसात त्यांच्यासंबंधी पाहिलेल्या-ऐकलेल्या गोष्टींबद्दल एकमेकांना सांगू-ऐकू लागले. "हे दोघेजण साक्षात भगवान नारायणांचे अंश या पृथ्वीवर वसुदेवांच्या घरी अवतीर्ण झाले आहेत. हे सावळे देवकीपासून जन्मले होते. वसुदेवांनी यांना गोकुळात नेले होते. इतके दिवस ते तेथेच नंदांच्या घरी गुप्तपणे राहून मोठे झाले. यांनीच पूतना, तृणावर्त, शंखचूड, केशी, धेनुक आणि यांसारख्या दैत्यांचा वध केला. शिवाय यमलार्जुनांचा उद्धार केला. यांनीच गाई आणि गोपालांना दावानलापासून वाचविले होते. तसेच कालिया नागाचे दमन आणि इंद्राचासुद्धा मानभंग केला होता. यांनीच सात दिवसपर्यंत एकाच हातावर गिरिराज गोवर्धनाला उचलून धरून वादळ, पाऊस, वीज यांपासून गोकुळ वाचविले. यांच्या नेहमीच सहास्य नजरेने पाहाणाऱ्या मुखारविंदाच्या दर्शनाने आनंदित होणाऱ्या गोपी सर्व प्रकारच्या तापांपासून अनायासेच मुक्त होत. असे म्हणतात की, हे यदुवंशाचे रक्षण करतील आणि हा अत्यंत प्रसिद्ध वंश यांच्यामुळे समृद्धी, यश आणि गौरव प्राप्त करील. हे दुसरे याच श्यामसुंदरांचे मोठे भाऊ कमलनयन श्रीबलराम आहेत. यांनीच प्रलंबासुर, वत्सासुर आणि बकासुर इत्यादींना मारले आहे. (१६-३०)

उपस्थितांमध्ये जेव्हा ही चर्चा चालू होती

आणि तुतारी इत्यादी वाद्ये वाजत होती, त्यावेळी राम - कृष्णांना संबोधून चाणूर म्हणाला. "हे नंदनंदना ! आणि हे रामा ! तुम्ही दोघे वीरांना आदरणीय असून कुस्तीत अतिशय निपुण आहात. हे ऐकून तुमचे कौशल्य पाहाण्यासाठी राजाने तुम्हांला येथे बोलाविले आहे. जी प्रजा मन-वचन-कर्माने राजाला प्रिय असणारे कार्य करते, तिचे कल्याण होते आणि जी याविरुद्ध वागते, तिचे नुकसान होते. गाय आणि वासरे चारणाऱ्या गवळ्यांची मुले दररोज आनंदाने वनामध्ये कुस्त्या खेळत असतात आणि गायी चारीत असतात, हे सर्वांना माहीत आहे. म्हणून हे वीरांनो, तुम्ही आणि आम्ही मिळून महाराजांना आवडणारी गोष्ट करू. राजा सर्व प्रजेचा प्रतिनिधी असल्यामुळे आपल्या असे करण्याने सर्वजण आपल्यावर प्रसन्न होतील." (३१-३५)

यांच्याशी कुस्ती करावी अशी श्रीकृष्णांची इच्छा होतीच. म्हणून चाणूराचे म्हणणे ऐकून आणि त्याचे स्वागत करून देशकालानुरूप ते म्हणाले. "चाणूरा ! आम्हीसुद्धा या भोजराज कंसाची वनवासी प्रजा आहोत. त्यांना आवडणारी गोष्ट आम्ही नेहमी केली पाहिजे. त्यातच आमचे उत्तम कल्याण आहे. परंतु चाणूरा ! आम्ही लहान आहोत. म्हणून आम्ही आमच्या बरोबरीची ताकद असणाऱ्या मुलांबरोबरच कुस्ती खेळू. कुस्ती ही सारखी शक्ती असणाऱ्यांशीच झाली पाहिजे, त्यामुळे अन्यायाचे समर्थन केल्याचे पाप कुस्ती पाहाणाऱ्या सभासदांना लागणार नाही." (३६-३८)

चाणूर म्हणाला- अरे ! तू आणि बलराम दोघेही बाल नाहीत की किशोरही नाहीत. तुम्ही बलवानांमध्येही श्रेष्ठ आहात. तू एक हजार हत्तींचे बळ असणाऱ्या कुवलयापीडाला सहज मारलेस. म्हणून तुम्ही दोघांनी बलवानांबरोबरच लढावे यात अन्याय मुळीच नाही. म्हणून श्रीकृष्णा ! तू माझ्याबरोबर कुस्ती खेळ आणि बलरामाबरोबर मुष्टिक लढेल. (३९-४०)

अध्याय त्रेचाळिसावा समाप्त

अध्याय चव्वेचाळिसावा

चाणूर, मुष्टिक इत्यादी पहिलवानांचा व कंसाचा उद्धार

श्रीशुक म्हणतात - श्रीकृष्णांनी चाणूरादिकांना मारण्याचे निश्चित ठरवून स्वतः चाणूराला आणि बलराम मुष्टिकाला जाऊन भिडले. एकमेकांना जिंकण्याच्या हेतूने त्यांनी हातांना हात बांधले आणि पायांत पाय अडकवून ताकदीने ते आपापल्याकडे दुसऱ्यांना ओढू लागले. त्यांनी कोपरापासूनच्या हातांना हात, गुडघ्यांना गुडघे, डोक्यांना डोकी आणि छातींना छाती टेकवून ते एकमेकांवर आघात करू लागले. गरगर फिरवणे, लांब ढकलणे, मिठीत घेणे, खाली पाडणे, पुढे जाणे, मागे येणे इत्यादी प्रकारांनी ते एकमेकांवर डावपेच करू लागले. तसेच वर उठवणे, उचलणे, चाल करून जाणे किंवा स्तब्ध उभे राहाणे, अशा रीतीने ते शरीरांना इजा पोहोचवू लागले. (१-५)

परीक्षिता ! कुस्त्यांची ही दंगल पाहाण्यासाठी नगरातील पुष्कळशा महिलासुद्धा आल्या होत्या. मोठमोठ्या पहिलवानांबरोबर हे लहान अशक्त बालक लढत आहेत, असे पाहून त्या मुलांची दया येऊन त्या गटागटाने आपापसांत चर्चा करू लागल्या. "येथे हे राजसभेतील लोक केवढा अधर्म करीत आहेत पाहा ! राजाच्या समोरच हे बलवान आणि दुर्बल यांची कुस्ती करू पाहात आहेत. वज्राप्रमाणे

कठोर शरीर असणारे व मोठ्या पर्वतासारखे दिसणारे हे मल्ल कोणीकडे; आणि अजून तारुण्यात सुद्धा न आलेले अतिशय कोमल शरीराचे हे किशोर कोणीकडे ! या पाहाणाऱ्या लोकांना धर्माचे उल्लंघन केल्याचे पाप निश्चितच लागणार ! वास्तविक जेथे अधर्म असेल, तेथे कधीच थांबू नये. बुद्धिमान पुरुषाने सभेत उपस्थित असलेल्यांचे दोष जाणल्यास त्या सभेमध्ये जाऊ नये. कारण तेथे जाऊन त्यांचे अवगुण न सांगणे, गप्प बसणे किंवा मी जाणत नाही, असे म्हणणे, या तिन्ही गोष्टी मनुष्याला दोषाचे भागीदार बनवितात. शत्रूच्या चारी बाजूंनी फिरणाऱ्या श्रीकृष्णांच्या मुखकमलाकडे पाहा तरी ! कमळाच्या पानावर पाण्याचे बिंदू चमकावे, त्याप्रमाणेच त्यांच्या चेहऱ्यावर घामाचे बिंदू चमकत आहेत. मुष्टिकावर रागावल्यामुळे डोळे लाल झालेला बलरामांचा चेहरा तुम्हांला दिसत नाही का ? तरीसुद्धा त्यांच्या अनावर हास्यामुळे तो किती सुंदर दिसत आहे, नाही ? खरे पाहू जाता व्रजभूमी किती धन्य आहे ? कारण हे पुरुषोत्तम तेथे मनुष्याचा वेष घेऊन लपून राहातात. स्वत: भगवान शंकर आणि लक्ष्मी ज्यांच्या चरणांची पूजा करतात, तेच प्रभू तेथे रंगी-बेरंगी रानफुलांची माळ घालून बलरामांसह बासरी वाजवीत, गाई चारीत, निरनिराळे खेळ खेळत आनंदाने विहार करतात. दोन्ही डोळ्यांनी नित्यनिरंतर यांच्या रूप-माधुर्याचे पान करणाऱ्या गोपींनी कोणती तपश्चर्या केली होती, कोण जाणे ! यांचे स्वयंसिद्ध रूप म्हणजे लावण्याचे सारसर्वस्वच ! जगात कोणाचेही रूप यांच्या तोडीचेही नाही, तर मग अधिक कोठून असणार ! हे रूप क्षणाक्षणाला नवेच भासते. सर्व यश, सौंदर्य आणि ऐश्वर्य यांचे हे एकमेव आश्रयस्थान आहे. याचे दर्शन तर अतिशय दुर्लभ आहे. व्रजातील गोपी धन्य होत ! नेहमी श्रीकृष्णांमध्येच चित्त लागून राहिल्यामुळे प्रेमपूर्ण हृदयाने व प्रेमाश्रूंनी सद्गदित झालेल्या कंठाने त्या धार काढताना, दही घुसळताना, धान्य कांडताना, जमीन सारवताना, बालकांना झोके देताना, रडणाऱ्या बालकांची समजूत घालताना, त्यांना न्हाऊ-माखू घालताना, घरांची झाडझूड करताना, अशी सगळी कामे करीत असताना श्रीकृष्णांच्या गुणांचेच गायन करीत. ते जेव्हा प्रात:काळी गाईंना चारण्यासाठी व्रजातून वनामध्ये जातात आणि सायंकाळी त्यांना घेऊन परत येतात, तेव्हा त्यांनी वाजवलेली मधुर बासरी ऐकून गोपी लगबगीने घरातून बाहेर रस्त्यामध्ये येतात. त्यावेळी स्मितहास्य, तसेच दयेने भरलेल्या नजरेने युक्त असे त्यांचे मुखकमल त्यांना पाहायला मिळते. केवढे हे त्यांचे पुण्य ! (६-१६)

हे भरतश्रेष्ठा ! त्या स्त्रिया जेव्हा असे बोलत होत्या, त्याचवेळी भगवान श्रीकृष्णांनी शत्रूला मारण्याचा मनोमन निश्चय केला. स्त्रियांची ही भयाकुल बोलणी ऐकून त्यांचे आईवडील पुत्रस्नेहामुळे शोकाने विह्वळ झाले. कारण आपल्या पुत्रांचे शौर्य त्यांना माहीत नव्हते. श्रीकृष्ण आणि चाणूर हे दोघेही वेगवेगळ्या प्रकारचे डावपेच करीत एकमेकांशी ज्याप्रमाणे कुस्ती लढत होते, तसेच बलराम आणि मुष्टिकसुद्धा लढत होते. भगवंतांच्या वज्रापेक्षाही कठोर अशा अंगांच्या रगडण्याने चाणूराची अंगे खिळखिळी होऊ लागली. त्याला वारंवार मूर्च्छा येऊ लागली. शेवटी अत्यंत चिडून त्याने ससाण्याप्रमाणे झडप घातली आणि दोन्ही हातांच्या मुठी वळून त्याने भगवान श्रीकृष्णांच्या छातीवर प्रहार केला. ज्याप्रमाणे फुलांच्या गजऱ्यांच्या माऱ्याने हत्ती जराही विचलित होत नाही, त्याप्रमाणे त्याने केलेल्या प्रहाराने भगवान थोडेसेसुद्धा विचलित झाले नाहीत. त्यांनी चाणूराचे दोन्ही हात पकडले आणि त्याला अत्यंत वेगाने पुष्कळ वेळा गरगरा फिरवून जमिनीवर आपटले. त्या वेगानेच त्याचे प्राण निघून गेले. त्याची वेषभूषा अस्ताव्यस्त झाली

आणि त्याचे केस व फुलांच्या माळा विस्कटल्या. इंद्रध्वजाप्रमाणे तो खाली पडला. त्याचप्रमाणे मुष्टिकानेसुद्धा अगोदर बलरामांना एक ठोसा लगावला. त्यावर बलवान बलरामांनी त्याला अतिशय जोरात चापट मारली. चापट बसताच तो कापू लागला. अत्यंत व्यथित झालेला तो तोंडातून रक्त ओकीत प्राण जाऊन वादळाने उखडलेल्या झाडाप्रमाणे जमिनीवर पडला. हे राजन ! योद्ध्यांमध्ये श्रेष्ठ असणाऱ्या बलरामांनी यानंतर कूट नावाच्या पहिलवानाला समोर येताच बेफिकीरपणे अगदी सहज डाव्या हाताच्या ठोशाने मारले. भगवान श्रीकृष्णांनी त्याचवेळी पायाने ठोकर मारून शलाचे मस्तक उडवले आणि तोशलाला उभे चिरले. अशा प्रकारे दोघांचेही प्राणोत्क्रमण झाले. जेव्हा चाणूर, मुष्टिक, कूट, शल आणि तोशल हे पाचही पहिलवान मारले गेले, तेव्हा बाकीचे आपले प्राण वाचविण्यासाठी तेथून पळून गेले. त्यानंतर भगवान श्रीकृष्ण-बलरामांनी आपल्या बरोबरीच्या गोपांना जवळ बोलावून त्यांना भिडून नाचत-गात, ढोलाच्या नादात आपल्या नूपुरांचा आवाज मिसळून ते विजयोत्सव साजरा करू लागले. (१७-२९)

राम-कृष्णांच्या ह्या अद्भुत कृत्याने सर्व लोकांना अतिशय आनंद झाला. कंसाखेरीज श्रेष्ठ ब्राह्मण आणि साधुपुरुष "वाहवा ! वाहवा !" म्हणून प्रशंसा करू लागले. मोठमोठे पहिलवान मारले गेले किंवा पळून गेले. हे पाहून भोजराज कंसाने आपली वाद्ये वाजविणे बंद केले आणि आपल्या सेवकांना आज्ञा केली. "अरे ! वसुदेवाच्या या दुराचारी मुलांना नगराच्या बाहेर हाकलून द्या. गोपांचे सर्व धन हिसकावून घ्या आणि दुर्बुद्धी नंदाला कैद करा. अत्यंत कुबुद्धी आणि दुष्ट अशा वसुदेवाला ताबडतोब मारून टाका; तसेच, माझा बाप उग्रसेनही आपल्या अनुयायांसह शत्रूच्याच पक्षाला जाऊन मिळाला आहे. म्हणून त्यालासुद्धा जिवंत ठेवू नका." अशाप्रकारे बडबडणाऱ्या कंसावर अविनाशी श्रीकृष्ण चिडले आणि वेगाने सहजपणे त्या उंच मंचावर उडी मारून चढले. अहंकारी कंसाने जेव्हा पाहिले की, आपला मृत्यूच समोर येऊ लागला आहे, तेव्हा त्याने लगेच सिंहासनावरून उठून हातात ढाल-तलवार घेतली. हातात तलवार घेऊन प्रहार करण्यासाठी आकाशात उडणाऱ्या ससाण्याप्रमाणे तो कधी डावीकडे तर कधी उजवीकडे जाऊ लागला, तेवढ्यात गरुडाने सापाला पकडावे तसे असह्य प्रखर तेज असणाऱ्या भगवंतांनी त्याला घट्ट पकडले. याचवेळी कंसाचा मुगुट खाली पडला आणि भगवंतांनी त्याचे केस पकडून त्यालासुद्धा त्या उंच मंचावरून खाली आखाड्यात आपटले. आणि स्वतंत्र व सगळ्या विश्वाचा आश्रय असणाऱ्या पद्मनाभांनी स्वत: त्याच्यावर उडी मारली. त्यामुळे कंसाचा तत्काळ मृत्यू झाला. नंतर जसा सिंह हत्तीला फरपटत नेतो, त्याचप्रमाणे सर्वांच्या देखत श्रीकृष्णांनी कंसाचे प्रेत जमिनीवरून फरफटत नेले.* हे नरेंद्रा ! त्यावेळी सगळ्यांच्या तोंडून "हाय ! हाय" असे मोठ्याने उद्‌गार निघाले. अत्यंत भयभीत होऊन कंस नेहमी श्रीकृष्णांचेच चिंतन करीत असे. तो खाता-पिताना, झोपताना-चालताना, बोलताना, किंवा श्वास घेताना- अशा सर्वच वेळी आपल्या हातात सुदर्शन चक्र घेतलेल्या भगवान श्रीकृष्णांनाच पाहात होता. त्यामुळेच त्याला दुर्लभ अशी भगवंतांची सारूप्यमुक्ती मिळाली. (३०-३९)

कंक, न्यग्रोध इत्यादी कंसाचे धाकटे आठ भाऊ मोठ्या भावाच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी संतापून त्यांच्या अंगावर धावले. ते मोठ्या आवेशाने युद्धाच्या तयारीने येत असलेले पाहून बलरामांनी

* जन्मभर इतरांना पीडा देणाऱ्यांच्या देहाची मृत्यूनंतरही अशीच दुरवस्था होते, हे दाखवण्यासाठीच जणू त्यांनी असे केले असावे.

परिघाने, सिंह पशूंना मारतो, त्याप्रमाणे त्यांना मारले. त्यावेळी आकाशात दुंदुभी वाजू लागल्या. भगवंतांचे विभूतिस्वरूप असलेले ब्रह्मदेव, शंकर इत्यादी देव आनंदाने पुष्पवर्षाव करीत त्यांची स्तुती करू लागले. अप्सरा नृत्य करू लागल्या. महाराज ! कंस आणि त्याच्या भावाच्या पत्न्या स्वजनांच्या मृत्यूमुळे अत्यंत दुःखी झाल्या. त्या डोकी बडवून घेऊ लागल्या. त्यावेळी त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहात होत्या. वीरशय्येवर कायमची झोप घेणाऱ्या आपापल्या पतींना कवटाळून शोकग्रस्त झालेल्या त्या वारंवार अश्रू ढाळीत मोठ्याने आक्रोश करू लागल्या. ''हे नाथ ! हे प्रियतमा ! हे धर्मज्ञा ! हे करुणामया ! हे अनाथवत्सला ! आपल्या मृत्यूने आमचाही मृत्यू झाल्यासारखाच आहे. आमची घरे आज उजाड झाली. आमची मुले अनाथ झाली. हे पुरुषश्रेष्ठा ! या पुरीचे आपणच स्वामी होता. आपण गेल्याने येथील उत्सव संपले. मांगल्य लयाला गेले. ही मथुरानगरी आमच्याप्रमाणेच अशोभनीय झाली. स्वामी ! आपण निरपराध लोकांना अतिशय छळले. म्हणूनच आपली अशी दशा झाली. जीवांना पीडा देणाऱ्या कोणाचे कल्याण होणार ? हे भगवान जगातील सर्व प्राण्यांची उत्पत्ती, स्थिती आणि प्रलयाचे कारण आहेत. जो यांचे वाईट व्हावे, असे इच्छितो, तो कधीच सुखी होत नाही.''(४०-४८)

श्रीशुकदेव म्हणतात- जगाचे पोषण करणाऱ्या श्रीकृष्णांनी राण्यांचे सांत्वन केले आणि व्यवस्थित लोकरीतीनुसार मृतांचे क्रिया-कर्म करविले. त्यानंतर श्रीकृष्ण-बलरामांनी माता-पित्यांना बंधनातून सोडविले आणि त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवून त्यांना वंदन केले. परंतु आपल्या मुलांनी वंदन केल्यानंतरसुद्धा देवकी आणि वसुदेवांनी, ते जगदीश्वरच आहेत, पुत्र नव्हेत, असे समजून, त्यांना छातीशी कवटाळले नाही. (उलट स्वतःच हात जोडले.) (४९-५१)

अध्याय चव्वेचाळिसावा समाप्त

अध्याय पंचेचाळिसावा

श्रीकृष्ण-बलरामांचे उपनयन आणि गुरुकुलप्रवेश

श्रीशुक म्हणतात- श्रीकृष्णांच्या लक्षात आले की माता-पित्यांना माझ्या भगवद्भावाचे ज्ञान आले आहे. त्यामुळे यांना पुत्रस्नेहाचे सुख मिळणार नाही, असा विचार करून त्यांनी, लोकांना मोहित करणारी आपली योगमाया त्यांच्यावर पसरली. यादवश्रेष्ठ श्रीकृष्ण थोरल्या बंधूसह आई-वडिलांकडे गेले आणि आदरपूर्वक विनम्रपणे ''आई ! बाबा !'' अशी हाक मारून त्यांना आनंदित करीत म्हणू लागले. ''बाबा ! आई ! आम्ही आपले पुत्र असून आणि आमच्यासाठी आपण नेहमी उत्कंठित असूनसुद्धा आपण आमच्या बाल्य, पौगंड आणि किशोर या अवस्थांचे सुख आमच्याकडून मिळवू शकला नाहीत. आम्हांलासुद्धा दुर्दैवाने आपल्या-जवळ राहण्याचे सौभाग्य प्राप्त झाले नाही. त्यामुळे आईवडिलांच्या घरी असणाऱ्या मुलांना लाड करून घेण्याचे जे सुख मिळते, ते आम्हांला मिळू शकले नाही. माता-पिताच या शरीराला जन्म देऊन त्याचे लालनपालन करतात. तेव्हा कुठे ते शरीर पुरुषार्थप्राप्तीचे साधन बनते. म्हणून एखाद्याने शंभर वर्षे जिवंत राहून जरी माता-पित्यांची सेवा केली, तरी तो त्यांच्या ऋणातून मुक्त होऊ शकत नाही. सामर्थ्य असूनही जो पुत्र आपल्या आई-वडिलांची शरीराने आणि धनाने सेवा करीत नाही, त्याला मेल्यानंतर यमदूत त्याच्याच शरीराचे मांस खाऊ

घालतात. सामर्थ्य असूनही जो मनुष्य आपले म्हातारे माता-पिता, पतिव्रता पत्नी, लहान मुले, गुरू, ब्राह्मण आणि शरणागत यांचे पालनपोषण करीत नाही, तो जिवंत असूनही मेल्यासारखाच होय. आपली सेवा न करण्यामुळे आमचे इतके दिवस वाया गेले. कारण नेहमी कंसाच्या भीतीने आम्ही आपली सेवा करण्यास असमर्थ होतो. आई ! बाबा ! आपण दोघांनी तुमची सेवा न करणाऱ्या आम्हांला क्षमा करावी. दुष्ट कंसाने आपल्याला अतिशय कष्ट दिले. परंतु आम्ही परतंत्र असल्यामुळे आपली काही सेवा करू शकलो नाही.'' (१-९)

श्रीशुक म्हणतात- मायेने मनुष्य बनलेल्या विश्वात्मा श्रीहरींची ही वाणी ऐकून, मोहित होऊन, देवकी-वसुदेवांनी त्यांना उचलून आपल्या मांडीवर घेतले आणि छातीशी कवटाळून परमानंद प्राप्त करून घेतला. राजन ! स्नेहपाशाने बांधले जाऊन ते पूर्णत: मोहित झाले आणि अश्रुधारांनी त्यांना भिजवू लागले. अश्रूंनी कंठ दाटून आल्यामुळे ते काहीही बोलू शकले नाहीत. (१०-११)

अशा प्रकारे भगवान देवकीनंदनांनी आई-वडिलांचे सांत्वन करून आपले मातामह उग्रसेन यांना यादवांचा राजा केले. आणि त्यांना म्हटले- ''महाराज ! आम्ही आपली प्रजा आहोत. आपण आम्हांला आज्ञा करावी. ययातीचा शाप असल्यामुळे यदुवंशी राजसिंहासनावर बसू शकत नाहीत. (आपण यदुवंशी असूनही माझ्या आज्ञेमुळे आपल्याला काही दोष लागणार नाही.) मीच सेवक होऊन आपली सेवा करीत आहे, हे पाहून देवतासुद्धा मस्तक लववून आपल्याला नजराणे देतील, मग अन्य राजांबद्दल काय सांगावे ? जे कंसाच्या भीतीने व्याकूळ होऊन देशोधडीला लागले होते, त्या यदू, वृष्णी, अंधक, मधू, दाशार्ह, कुकुर इत्यादी वंशात जन्मलेल्या आपल्या नातेवाइकांचा शोध घेऊन श्रीकृष्णांनी त्यांना तेथून परत बोलाविले. घरापासून दूर परक्या जागी राहावे लागल्याने त्यांना अतिशय दु:ख भोगावे लागले होते. विश्वविधात्या भगवंतांनी सांत्वन करून त्यांचा सत्कार केला, त्यांना खूप धन-संपत्ती देऊन तृप्त केले आणि आपापल्या ठिकाणी पुन्हा स्थानापन्न केले. आता सर्वजण राम-कृष्णांच्या बाहुबलाखाली सुरक्षित होते. त्यांच्या कृपेने त्यांना कोणत्याही प्रकारचे दु:ख नव्हते. त्यांचे सर्व मनोरथ पूर्ण झाले होते. ते कृतार्थ झाले होते. आता ते आपापल्या घरांमध्ये आनंदाने राहू लागले. श्रीकृष्णांचे मुखकमल नेहमी प्रफुल्लित असे. त्यांचे सौंदर्य अपार होते. दयार्द्र हास्ययुक्त नजरेने पाहाणाऱ्या त्या मुखाचे दररोज दर्शन घेऊन ते आनंदमग्न होत. मथुरेतील म्हातारे लोकसुद्धा तरुणांप्रमाणे अत्यंत बलवान आणि उत्साही झाले होते, कारण ते आपल्या डोळ्यांची ओंजळ करून वारंवार भगवंतांच्या मुखारविंदाच्या अमृतमय मकरंदरसाचे पान करीत असत. (१२-१९)

हे राजेन्द्रा, नंतर भगवान देवकीनंदन आणि बलराम हे दोघेही नंदबाबांच्याजवळ आले आणि त्यांच्या गळ्याला मिठी मारून म्हणू लागले. बाबा ! आपण दोघांनी अत्यंत प्रेमाने आणि लाडाने आमचे पालन-पोषण केले. कारण आपल्या मुलांवर आई-बाप स्वत:च्या शरीरापेक्षाही अधिक प्रेम करतात, यात काहीच संशय नाही. पालन-पोषण करू शकत नसल्यामुळे स्वजनांनी ज्यांचा त्याग केला, त्या बालकांचे जे आपल्या मुलांप्रमाणे पालन-पोषण करतात, तेच त्यांचे खरे आई-बाप होत. बाबा ! आपण आता व्रजामध्ये परत जा. येथील सुहृद-संबंधितांना सुखी करून आमच्यावरील वात्सल्यामुळे दु:खी झालेल्या तुम्हा सर्वांना भेटण्यासाठी आम्ही येऊ. भगवान श्रीकृष्णांनी नंदादी गोपांची अशी समजूत घालून व त्यांना अत्यंत आदरपूर्वक वस्त्रे, अलंकार, भांडी इत्यादी देऊन त्यांचा सत्कार केला. भगवंतांचे म्हणणे ऐकून नंदबाबांनी प्रेमाने सद्गदित

होऊन दोन्ही मुलांना छातीशी धरले. नंतर अश्रुपूर्ण नेत्रांनी गोपांसह ते गोकुळात गेले. (२०-२५)

हे राजन ! नंतर वसुदेवांनी पुरोहित व अन्य ब्राह्मणांकरवी दोन्ही मुलांचे विधिपूर्वक मौंजीबंधन करविले. नंतर त्यांनी वस्त्रालंकारांनी ब्राह्मणांचा सत्कार करून त्यांना पुष्कळ दक्षिणा दिली. तसेच गळ्यांत सोन्याच्या व रेशमी वस्त्रांच्या माळा घातलेल्या सवत्स गाई दान दिल्या. महाबुद्धिमान वसुदेवांनी रामकृष्णांच्या जन्मनक्षत्राचे वेळी जितक्या गाई देण्याचा मनाने संकल्प केला होता व अगोदर कंसाने ज्या अन्यायाने हिरावून घेतल्या होत्या, त्याची आठवण ठेवून त्यांनी ब्राह्मणांना त्या दान दिल्या. अशा प्रकारे यदुवंशाचे पुरोहित गर्गाचार्य यांच्याकरवी यज्ञोपवीत संस्कार झाल्यावर राम-कृष्ण द्विज झाले. आता त्यांनी ब्रह्मचर्यव्रताचा स्वीकार करून त्याचे उत्तम पालन केले. ते जगाचे स्वामी होते. सर्वज्ञ होते. सर्व विद्यांची उत्पत्ती त्यांच्यापासूनच झाली आहे. त्यांचे निर्मल ज्ञान स्वत:सिद्ध होते. तरीसुद्धा मनुष्यासारख्या वागण्यामुळे त्यांनी ते लपवून ठेवले होते. (२६-३०)

आता ते दोघेजण गुरुकुलात निवास करण्याच्या इच्छेने अवंतिपुरात राहाणाऱ्या काश्य गोत्राच्या सांदीपनी मुनींच्याकडे गेले. ते दोघे संयमशील भाऊ विधिपूर्वक गुरुजींच्याजवळ राहून गुरूंची उत्तम सेवा कशी करावी, याचा आदर्श लोकांसमोर ठेवीत अतिशय भक्तिभावाने देव समजून त्यांची सेवा करू लागले. ते करीत असलेल्या शुद्ध भावनेने युक्त अशा सेवेने गुरुवर्य सांदीपनी अतिशय प्रसन्न झाले. त्यांनी त्यांना सहा अंगे आणि उपनिषदांसहित सर्व वेदांचे शिक्षण दिले. याखेरीज मंत्र आणि देवतांच्या ज्ञानासह धनुर्वेद, मनुस्मृती इत्यादी धर्मशास्त्रे, मीमांसा इत्यादी वेदांचे तात्पर्य सांगणारी शास्त्रे, तर्कविद्या, त्याचबरोबर संधी, विग्रह, यान, आसन, द्वैध आणि आश्रय या सहा भेदांनी युक्त अशा राजनीतीचेसुद्धा त्यांना शिक्षण दिले. परीक्षिता ! सर्व विद्यांचे प्रवर्तक असलेले ते दोघे पुरुषश्रेष्ठ गुरुजींनी फक्त एक वेळ सांगताच सर्व विद्यांत पारंगत झाले. परीक्षिता ! केवळ चौसष्ट दिवसांत त्यांनी तत्परतेने चौसष्ट कलांचे ज्ञान मिळविले. अशा प्रकारे अध्ययन संपल्यावर त्यांनी सांदीपनी मुनींना गुरुदक्षिणेविषयी प्रार्थना केली. महाराज ! सांदीपनी मुनींनी त्यांचा अद्भुत महिमा आणि अलौकिक बुद्धिमत्ता पाहून आपल्या पत्नीचा सख्खा पुत्र आणून देण्याची गुरुदक्षिणा मागितली. अपूर्व पराक्रमी असे ते दोघेही महारथी "ठीक आहे" असे म्हणून रथावर आरूढ होऊन प्रभासक्षेत्री गेले. तेथे समुद्रतटावर ते क्षणभर बसले. हे परमेश्वर आहेत असे जाणून समुद्राने त्यांच्यासाठी पूजा-सामग्री आणली. भगवान समुद्राला म्हणाले, "समुद्रा ! तू आपल्या मोठमोठ्या लाटांनी येथून ज्या गुरुपुत्राला वाहात घेऊन गेलास, त्याला ताबडतोब आणून दे." (३१-३९)

समुद्र म्हणाला- "हे देवा श्रीकृष्णा ! त्याला मी नेले नाही. माझ्या पाण्यात पंचजन नावाचा एक मोठा दैत्य शंखाच्या रूपाने राहात आहे. त्यानेच तो बालक नक्की चोरून नेला असला पाहिजे." ते ऐकून भगवान ताबडतोब पाण्यात शिरले आणि त्यांनी शंखासुराला मारले. परंतु त्याच्या पोटात तो बालक दिसला नाही. (४०-४१)

तेव्हा त्याच्या शरीराचा शंख घेऊन भगवान रथाकडे परतले. तेथून बलरामांसह यमराजाच्या आवडत्या 'संयमनी' नगरीत जाऊन त्यांनी आपला शंख वाजविला. सर्व प्रजेवर नियंत्रण असणारा यम शंखाचा आवाज ऐकून तेथे आला आणि अत्यंत भक्तिभावाने त्याने विधिपूर्वक त्यांची थाटामाटात पूजा केली. नंतर सर्व प्राण्यांच्या हृदयात

विराजमान असलेल्या श्रीकृष्णांना त्यांनी विनयाने म्हटले, ''स्वलीलेनेच मनुष्य झालेल्या हे सर्वव्यापक परमेश्वरा ! मी आपणा दोघांची काय सेवा करू ?''

(४२-४४)

श्रीभगवान म्हणाले- '' यमराज ! स्वत:च्या कर्मबंधनानुसार माझा गुरुपुत्र येथे आणला गेला आहे. तू माझ्या आज्ञेने त्याला माझ्याकडे घेऊन ये.'' ''जशी आपली आज्ञा'' असे म्हणून यमाने गुरुपुत्र आणून दिला. तेव्हा राम-कृष्णांनी तो मुलगा गुरुदेवांच्या स्वाधीन करून म्हटले की, ''आपणास आणखी काही पाहिजे असले तर मागावे.''

(४५-४६)

गुरुजी म्हणाले- ''मुलांनो ! तुम्ही दोघांनी उत्तम गुरुदक्षिणा दिलीत. आता आणखी काय पाहिजे ? तुमच्यासारख्यांच्या गुरूचे कोणते मनोरथ अपूर्ण राहू शकतील बरे ? वीरांनो ! तुम्ही दोघेही आता आपल्या घरी जा. लोकांना पवित्र करणारी कीर्ती तुम्हांला प्राप्त होवो ! तुम्ही शिकून घेतलेली विद्या इहपरलोकी नित्य नूतन राहो.'' परीक्षिता ! अशा रीतीने गुरुजींनी अनुमती दिल्यावर वायूप्रमाणे वेग आणि मेघाप्रमाणे आवाज असणाऱ्या रथावर आरूढ होऊन दोघे बंधू मथुरेला परतले. पुष्कळ दिवस राम-कृष्णांना न पाहिल्याने दु:खी झालेली मथुरेतील प्रजा ते आल्याचे पाहून आनंदित झाली. हरवलेले धन परत मिळाल्यावर व्हावी, तशी.

(४७-५०)

अध्याय पंचेचाळिसावा समाप्त

अध्याय शेहेचाळिसावा

उद्धवाचे व्रजगमन

श्रीशुकदेव म्हणतात - उद्धव हा एक वृष्णींचा श्रेष्ठ मंत्री होता. तो साक्षात बृहस्पतींचा शिष्य असून अतिशय बुद्धिमान होता. तसाच तो श्रीकृष्णांचा प्रिय मित्रही होता. शरणागतांची सर्व दु:खे नाहीशी करणारे भगवान श्रीकृष्ण एके दिवशी आपला अनन्य प्रिय भक्त उद्धव याचा हात हातात घेऊन म्हणाले. ''हे सौम्य उद्धवा ! तू व्रजामध्ये जा. तेथे जाऊन माझ्या माता-पित्यांना आनंदित कर. तसेच माझा विरह झाल्याने गोपींना जे दु:ख झाले, ते त्यांना माझा निरोप सांगून दूर कर. गोपींचे मन-प्राण नित्य माझ्यामध्येच लागून राहिलेले आहेत. त्यांचे जीवन, त्यांचे सर्वस्व, मीच आहे. माझ्यासाठी त्यांनी आपले पती, पुत्र इत्यादींना सोडले आहे. त्यांनी मनानेसुद्धा मलाच आपला प्रियतम आत्मा मानले आहे. ज्यांनी माझ्यासाठी लौकिक-पारलौकिक धर्म सोडून दिले, त्यांचे पालन-पोषण मी करतो. प्रिय उद्धवा ! त्या गोपींचा परम प्रियतम मी येथे दूर आल्यामुळे माझे स्मरण होऊन त्यांची शुद्ध हरपते. माझ्या विरहामुळे माझ्या भेटीची उत्कंठा वाढून त्या व्याकूळ होत असतात. मन्मय झालेल्या माझ्या गोपी, ''मी येईन'', असे सांगितल्यामुळेच अत्यंत कष्टाने कसेबसे आपले प्राण धरून आहेत.

(१-६)

श्रीशुक म्हणतात- राजा ! श्रीकृष्ण असे म्हणाले, तेव्हा अत्यंत आदरपूर्वक उद्धव आपल्या स्वामींचा संदेश घेऊन रथावर आरूढ होऊन नंदगोकुळाकडे निघाला. उद्धव सूर्यास्ताच्या वेळी नंदांच्या व्रजामध्ये पोहोचला. त्यावेळी रानातून परत येणाऱ्या गुरांच्या खुरांमुळे उडालेल्या धुळीने त्याचा रथ झाकून गेला होता. (७-८)

व्रजभूमीमध्ये माजावर आलेल्या गाईंसाठी माजलेले बैल आपापसात झुंजत होते. त्यांच्या हंबरण्याने व्रजभूमी दुमदुमून गेली होती. नुकत्याच व्यालेल्या गाई दुधाने भरलेल्या सडांनिशी आपापल्या वासरांकडे धावत निघाल्या होत्या. इकडे तिकडे उड्या मारणाऱ्या पांढऱ्या वासरांनी गोकुळ शोभत होते. गायींच्या धारा काढण्याचा आवाज आणि वेणूंचा मधुर आवाज ऐकू येत होता. तेथे सुंदर वस्त्रालंकार घातलेल्या गोपी व गोप श्रीकृष्ण-बलरामांच्या मंगलमय चरित्रांचे गायन करीत होते. त्यामुळे ते गोकुळ अधिक शोभत होते. तेथे गोपांच्या घरांमध्ये अग्नी, सूर्य, अतिथी, गाई, ब्राह्मण आणि देवतापितरांची धूप, दीप, फुले इत्यादींनी पूजा होत होती. त्यामुळे सगळा व्रज मनोरम दिसत होता. चारी बाजूंनी वने फुलांनी लहडलेली होती. पक्षी किलबिलाट करीत होते आणि भुंगे गुणगुणत होते. तेथील जलाशय कमळांच्या ताटव्यांनी व हंस, करडुवा इत्यादी पक्ष्यांनी शोभत होते. (९-१३)

श्रीकृष्णांचा प्रिय भक्त उद्धव जेव्हा व्रजामध्ये आला, तेव्हा त्याची भेट घेऊन नंद अतिशय प्रसन्न झाले. त्यांनी त्याला आलिंगन देऊन त्याचा श्रीकृष्ण समजून सन्मान केला. त्याला पक्वान्नाचे भोजन वाढले. नंतर तो आरामात पलंगावर पहुडला, तेव्हा त्याचे पाय वगैरे चेपून त्याचा प्रवासाचा शीण दूर केला. नंतर नंदांनी त्याला विचारले. "हे भाग्यवान उद्धवा ! आमचा मित्र वसुदेव आता तुरुंगातून मुक्त झाला. तो सुहृद, पुत्र इत्यादींसह खुशाल आहे ना ?" आपणच केलेल्या पापांचे फळ म्हणून पापी कंस अनुयायांसह मारला गेला, हे छान झाले ! कारण तो धार्मिक व सच्छील यदुवंशियांचा नेहमी द्वेष करीत असे. बरे तर ! उद्धवा ! श्रीकृष्णाला आम्हा लोकांची कधी आठवण येते का ? येथे त्याची आई आहे. हितचिंतक, मित्र असे गोप आहेत. त्यांनाच आपले स्वामी मानणारे हे व्रजातील लोक आहेत. गाई, वृंदावन आणि हा गोवर्धनही आहे. या सर्वांची त्याला कधी आठवण येते का ? (१४-१८)

आपल्या बांधवांना भेटण्यासाठी आमचा गोविंद एकदा तरी इकडे येईल का ? तो जर येथे आला, तर आम्ही त्याचे ते सुंदर नाक असलेले व सुहास्य नजरेने पाहणारे मुखकमल पाहू शकू ! उदारहृदयी श्रीकृष्णाने जे टाळण्याचा आमच्याकडे काहीही उपाय नव्हता, त्या वणवा, तुफान, पाऊस, वृषासुर, अजगर इत्यादी मृत्यूंच्या अनेक प्रसंगातून आमचे रक्षण केले. उद्धवा ! आम्हांला श्रीकृष्णांचे पराक्रम, विलासपूर्ण नेत्रकटाक्ष, मनोहर हास्य, मधुर भाषण इत्यादींची आठवण येते, तेव्हा आमची दुसरी कामे थांबतात. श्रीकृष्णाच्या चरणचिह्नांनी विभूषित झालेली नदी, पर्वत, वने, क्रीडांगणे इत्यादी आम्ही पाहू लागतो, तेव्हा आमचे मन तन्मय होऊन जाते. देवांच्या महान कार्यासाठी येथे अवतरलेले राम-कृष्ण हे श्रेष्ठ देव आहेत, असे मी मानतो. कारण गर्गाचार्यांनीच मला तसे सांगितले होते. सिंह जसा पशूंना सहज मारतो, त्याचप्रमाणे त्यांनी दहा हजार हत्तींचे बळ असणारा कंस, त्याचे दोन पहिलवान आणि गजराज कुवलयापीड यांना सहज मारले. हत्तीने एखादी काठी मोडावी, त्याप्रमाणे त्याने तीन ताड लांब असे अत्यंत बळकट धनुष्य तोडले. तसेच एकाच हाताने सात दिवसपर्यंत पर्वत उचलून धरला. ज्यांनी सुरासुरांवर विजय मिळविला होता, त्या प्रलंब, धेनुक, अरिष्ट, तृणावर्त, बक इत्यादी दैत्यांना त्याने सहज मारले. (१९-२६)

श्रीशुक म्हणतात- श्रीकृष्णांच्या प्रेमात रंगून गेलेले नंद अशाप्रकारे जेव्हा त्यांच्या एकेका लीलेचे स्मरण करू लागले, तेव्हा त्यांच्या प्रेमाला पूर आला. त्यामुळे ते व्याकूळ झाले आणि उत्कंठा अतिशय वाढल्यामुळे शेवटी स्तब्ध झाले. नंद सांगत

असलेल्या श्रीकृष्णाच्या लीला ऐकून यशोदेच्याही डोळ्यांतून अश्रू वाहू लागले होते आणि पुत्र-स्नेहामुळे तिच्या स्तनांतून दुधाच्या धारा वाहात होत्या. नंद आणि यशोदा यांचे श्रीकृष्णाबद्दलचे प्रगाढ प्रेम पाहून उद्धव आनंदमग्न होऊन त्यांना म्हणाला. (२७-२९)

उद्धव म्हणाला- हे मान्यवर ! चराचराचे गुरू असणाऱ्या नारायणांबद्दल आपल्या मनात इतका प्रेमभाव आहे, म्हणून आपण दोघे सर्वांमध्ये अत्यंत भाग्यवान आहात, यात संशय नाही. बलराम आणि श्रीकृष्ण पुराणपुरुष आहेत, ते साऱ्या विश्वाचे उपादानकारण आणि निमित्तकारणही आहेत. पुरुष आणि प्रकृती तेच आहेत. हेच दोघेजण सगळ्यांच्या शरीरांत प्रवेश करून त्या शरीरांमध्ये राहाणाऱ्या प्रकृतीहून निराळ्या ज्ञानस्वरूप जीवाचे नियमन करतात. जो जीव मृत्यूच्यावेळी आपले शुद्ध मन एक क्षणभर का होईना, त्यांचे ठिकाणी एकाग्र करतो, तो सर्व कर्मवासनांना धुऊन टाकतो आणि लगेच सूर्याप्रमाणे तेजस्वी असा ब्रह्ममय होऊन मोक्ष प्राप्त करून घेतो. जे सर्वांचे आत्मा आणि परम कारण आहेत, ते नारायणच दुष्टनिर्दालन व साधुरक्षण करण्यासाठी मनुष्यासारखे शरीर धारण करून येथे प्रगट झाले आहेत. हे महात्म्यांनो ! त्यांच्या ठिकाणीच असा सुदृढ प्रेमभाव धारण करा. मग आपल्या दोघांना कोणते शुभ कर्म करावयाचे शिल्लक राहणार आहे ? भक्तवत्सल यदुकुलश्रेष्ठ भगवान श्रीकृष्ण थोड्याच दिवसात व्रजामध्ये येतील आणि आपणा दोघा आई-वडिलांना आनंदित करतील. सर्व यादवांचा शत्रू असणाऱ्या कंसाला आखाड्यात मारून, आपल्याजवळ येऊन कृष्णांनी जे म्हटले, ते म्हणणे ते खरे करतील. हे भाग्यशाली मातापित्यांनो ! खेद करू नका. तुम्ही श्रीकृष्णांना आपल्याजवळच पाहाल. कारण, जसा लाकडामध्ये अग्नी नेहमी व्यापून असतो, त्याचप्रमाणे ते सर्व प्राण्यांच्या हृदयांमध्ये नेहमी विराजमान असतात. (३०-३६)

त्यांना अभिमान नसल्याकारणाने त्यांना कोणी प्रिय नाही की कोणी अप्रिय नाही. त्यांचा सर्वांमध्ये समभाव असल्यामुळे त्यांच्या दृष्टीने कोणी उत्तम नाही की कोणी अधम नाही. एवढेच काय, त्यांच्याशी शत्रुत्व करणाराही त्यांचा शत्रू नाही. त्यांचे कोणी माता-पिता नाहीत किंवा पत्नी-पुत्र नाहीत. त्यांना कोणी आपला नाही की परका नाही. तसाच देह नाही की जन्मही नाही. या लोकी त्यांना कोणतेही कर्तव्य नाही. तरीसुद्धा ते सज्जनांच्या संरक्षणासाठी, लीला म्हणून देव इत्यादी सात्त्विक, मत्स्य इत्यादी तामस, तसेच मनुष्य इत्यादी मिश्र योनींत शरीर धारण करतात. भगवान अजन्मा व गुणांपासून अलिप्त असूनही लीला करण्यासाठी सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांचा स्वीकार करून त्यांच्याद्वारा जगाची उत्पत्ती, पालन आणि संहार करतात. ज्याप्रमाणे मनुष्य वेगाने गोल फिरतो, तेव्हा सगळी पृथ्वी फिरते असे त्याला वाटते, त्याप्रमाणे सर्व काही करणारे चित्तच असूनही, त्या चित्तामध्ये अहंबुद्धी असल्याकारणाने, भ्रमाने आत्मा स्वत:लाच कर्ता समजू लागतो. भगवान श्रीकृष्ण हे फक्त आपल्या दोघांचेच पुत्र नाहीत, तर ते सर्व प्राण्यांचे आत्मा, पुत्र, पिता, माता आणि स्वामीसुद्धा आहेत. जे काही पाहिले किंवा ऐकले जाते, मग ते भूतकाळ, वर्तमानकाळ किंवा भविष्यकाळाशी संबंधित असो, स्थावर असो की जंगम, महान असो की लहान, अशी कोणतीच वस्तू नाही की, जी श्रीकृष्णांपासून वेगळी आहे. त्यांच्याव्यतिरिक्त खरे पाहाता, कोणतीच वस्तू नाही. वास्तविक सत्य फक्त तेच आहेत. (३७-४३)

परीक्षिता ! उद्धव आणि नंद अशाप्रकारे आपापसात गोष्टी करीत असता रात्र संपून गेली. पहाटे गोपी उठल्या. दिवे लावून त्यांनी वास्तुदेवतेचे

पूजन केले आणि नंतर त्या दही घुसळू लागल्या. गोपींच्या हातांतील बांगड्या दोरी ओढताना चमकत होत्या. त्यांचे नितंब, स्तन आणि गळ्यातील हार हालत होते. हालणारी कुंडले, त्यांच्या कुंकुममंडित गालांची लाली वाढवीत होती. त्यांच्या अलंकारांतील रत्ने दिव्यांच्या प्रकाशाने अधिकच झगमगत होती. त्याबेळी गोपी, कमलनयन श्रीकृष्णांच्या चरित्रांचे मोठ्याने गायन करीत होत्या. त्यांचे ते गाणे दही घुसळण्याच्या आवाजात मिसळून स्वर्गापर्यंत जाऊन पोहोचले. त्या स्वरलहरी सगळीकडे पसरून सर्व दिशांचे अमंगल नाहीसे करीत. (४४-४६)

जेव्हा भगवान सूर्यनारायणांचा उदय झाला, तेव्हा नंदांच्या दरवाजासमोर एक सोन्याचा रथ उभा असल्याचे व्रजांगनांनी पाहिले. ''हा कोणाचा रथ आहे ?'' असे त्या एकमेकींना विचारू लागल्या. एक गोपी म्हणाली, ''कंसाचा हेतू साध्य करण्यासाठी कमलनयन श्यामसुंदरांना येथून मथुरेला घेऊन जाणारा अक्रूर तर पुन्हा आला नाही ना ?'' दुसरी एक गोपी म्हणाली, ''आता तो आम्हांला घेऊन जाऊन काय करणार ? आपल्या मरण पावलेल्या राजा कंसाचे पिंडदान तर करणार नाही ना ?'' व्रजवासिनी स्त्रिया अशाप्रकारे आपापसात बोलत होत्या, तेवढ्यात नित्यकर्मे आटोपून उद्धव येऊन पोहोचला. (४७-४९)

अध्याय शेहेचाळिसावा समाप्त

अध्याय सत्तेचाळिसावा

उद्धव व गोपींचा संवाद आणि भ्रमरगीत

श्रीशुकाचार्य म्हणतात- गोपींनी श्रीकृष्णांचा सेवक असलेल्या उद्धवाला पाहिले. त्याचे हात गुडघ्यापर्यंत लांब होते. ताज्या कमलदलाप्रमाणे प्रसन्न नेत्र होते. त्याने पीतांबर धारण केला होता. त्याच्या गळ्यात कमळांची माळ व कानांमध्ये रत्नजडित कुंडले झगमगत होती आणि मुखकमल प्रफुल्लित होते. गोपी आपापसात म्हणू लागल्या, ''हा पुरुष अतिशय देखणा आहे. परंतु हा आहे कोण ? कोठून आला ? कोणाचा दूत आहे ? याने श्रीकृष्णांसारखी वेषभूषा कशासाठी धारण केली आहे ?'' हे सर्व जाणून घेण्यासाठी गोपी उत्सुक झाल्या आणि पवित्रकीर्ती श्रीकृष्णांच्या चरणकमलांचा आश्रित असणाऱ्या उद्धवाला चारी बाजूंनी घेरून पवित्र स्मित करीत उभ्या राहिल्या. हा रमारमणांचा संदेश घेऊन आला आहे, असे जेव्हा त्यांना समजले, तेव्हा त्यांनी अत्यंत विनम्रपणे, लज्जेने स्मित हास्य करीत त्याच्याकडे पाहून मधुर भाषणाने त्याचा चांगला सत्कार केला आणि एकांतात तो आसनावर बसल्यावर त्याला त्यांनी विचारले. ''उद्धवा ! आपण यदुनाथांचे दूत आहात. आपल्या स्वामींनी, त्यांच्या माता-पित्यांना खुशाली कळविण्यासाठी आपल्याला येथे पाठविले आहे, हे आम्हांला कळले. नाहीतर, आता या गोकुळात त्यांना आठवण यावी, अशी दुसरी वस्तू आम्हांला दिसत नाही. बांधवांवरचे प्रेम मुनीलासुद्धा सोडणे कठीण असते. मातापित्यांखेरीज इतरांबरोबर प्रेम-संबंधाचे जे सोंग आणले जाते, ते स्वार्थासाठीच असते. जसे भ्रमरांचे फुलांवर प्रेम असते तसेच पुरुषांचे स्त्रियांवरील प्रेम. धन संपलेल्या माणसाला गणिका, रक्षण करू न शकणाऱ्या राजाला प्रजा, शिक्षण पूर्ण झाल्यावर विद्यार्थी गुरूला आणि दक्षिणा मिळाली की ऋत्विज यजमानाला सोडून देतात. पक्षी फळे नसलेल्या झाडाला, भोजन झाल्यावर अतिथी गृहस्थाला, पशू जळलेल्या

जंगलाला आणि जार पुरुष उपभोगानंतर स्त्रीला सोडून जातात. गोपींचे मन, वाणी आणि शरीर श्रीकृष्णांमध्येच तल्लीन झालेले होते. श्रीकृष्णांचा दूत म्हणून जेव्हा उद्धव व्रजभूमीमध्ये आला तेव्हा त्या लोकव्यवहार विसरल्या आणि श्रीकृष्णांनी बालपणापासून किशोर अवस्थेपर्यंत जितक्या म्हणून लीला केल्या होत्या, त्या सर्वांची आठवण कर-करून त्या लीलांचे गायन करू लागल्या. शिवाय संकोच सोडून रडूही लागल्या. एका गोपीला श्रीकृष्ण भेटल्याचे स्मरण झाले. त्यावेळी एका भ्रमराला गुणगुणताना पाहून तिला वाटले की, आपली मनधरणी करण्यासाठी प्रियतमाने याला दूत म्हणून पाठविले आहे. ती त्याला म्हणाली. (१-११)

गोपी म्हणाली- अरे कपटी प्रियकराच्या सख्या मधुकरा ! तू आमच्या पायांना स्पर्श करून नमस्कार करू नकोस. कारण श्रीकृष्णांची जी वनमाला आमच्या सवतीच्या वक्षःस्थळाच्या घर्षणाने चुरगळली गेली, तिच्या वक्षाला लावलेले व माळेला लागलेले पिवळे केशर तुझ्या मिशांनासुद्धा लागले आहे. मधुपती श्रीकृष्ण मथुरेतील मानी नायिकांची मनधरणी करू दे आणि त्यांचा जो केशररूप प्रसाद, ज्याचा यादव सभेत उपहास होणार आहे, तो त्यांच्याजवळच राहू दे ! तो तुझ्याकडून येथे पाठविण्याची काय आवश्यकता आहे ? तू फुलांतील मध एकदा घेऊन उडून जातोस, तसेच तेही फक्त एकदाच आपले मोहक अधरामृत पाजून आम्हांला सोडून निघून गेले. बिचारी लक्ष्मी त्यांच्या चरणकमलांची सेवा कशी करते कोण जाणे ! बहुधा श्रीकृष्णाच्या गोड गोड बोलण्याने तिचेसुद्धा चित्त चोरले गेले असावे. (म्हणूनच तिला त्यांचे खरे रूप कळले नाही.) अरे भ्रमरा ! वनात राहाणाऱ्या आमच्यासमोर तू यदुपती श्रीकृष्णांचे पुष्कळसे गुण का गात आहेस ? ते आम्हांला काही नवीन नाहीत. ज्यांच्याजवळ सदा विजय असतो, त्या श्रीकृष्णांच्या नव्या सख्यांच्यासमोर जाऊन त्यांचे गुणगान कर. कारण यावेळी त्यांनी त्यांच्या हृदयाची पीडा शमविली असल्याने त्या त्यांना प्रिय आहेत. तू करीत असलेल्या गुणगानावर प्रसन्न होऊन तू मागशील ती वस्तू त्या तुला देतील. हे भ्रमरा ! त्यांचे कपटपूर्ण मनोहर हास्य आणि भुवयांच्या इशाऱ्याने त्यांना वश होणार नाहीत, अशा स्वर्गात, पृथ्वीवर किंवा पाताळात कोणत्या स्त्रिया आहेत ? स्वतः लक्ष्मीसुद्धा ज्यांच्या चरणरजांची सेवा करीत असते, तिच्यापुढे आमची काय योग्यता ? परंतु तू त्यांना सांग की, तुमचे नाव 'उत्तमश्लोक' आहे, ते दीनांवर दया करण्यामुळे. त्याला मात्र बट्टा लागेल. अरे मधुकरा ! तू माझ्या पायावर डोके टेकवू नकोस. तू मनधरणी करण्यात पटाईत आहेस, हे मी जाणते. दूताने काय केले पाहिजे, हे तू श्रीकृष्णांच्याचकडून शिकून आला आहेस, हे मला माहीत आहे. परंतु ज्यांनी त्यांच्यासाठीच आपल्या पती, पुत्र आणि अन्य नातेवाईकांना सोडले, त्या आम्हांला ते कृतघ्नपणे सोडून निघून गेले. अशा व्यक्तीशी आम्ही कशी तडजोड करावी ? अरे ए मधुकरा ! त्यांचा जेव्हा रामावतार होता, तेव्हा त्यांनी कपिराज वालीला व्याधाप्रमाणे लपून मारले. शूर्पणखा त्यांची कामना करीत होती, परंतु त्यांनी पत्नीप्रेमामुळे त्या बिचाऱ्या स्त्रीचे कान-नाक कापून तिला कुरूप केले. कावळा जसा बळी घालणाऱ्याचा बळी खाऊन पुन्हा त्यालाच त्रास देतो, त्याप्रमाणे बलीकडून वामनरूपाने दान घेऊन पुन्हा त्यालाच वरुणपाशाने बांधून पाताळात ढकलले. म्हणून या काळ्याशी आता मैत्री पुरे झाली. परंतु काय करणार ? आमची इच्छा नसली तरी आम्ही त्यांच्याविषयीच्या गोष्टी टाळू तर शकत नाही ना ! श्रीकृष्णांच्या लीलारूप कर्णामृताच्या एका थेंबाचेही जे फक्त एकदाच प्राशन करतात,

त्यांची राग-द्वेषादी सगळी द्वंद्वे समूळ नाहीशी होऊन ते असून नसल्यासारखेच होतात. एवढेच काय, पण पुष्कळसे लोक आपला दु:खमय प्रपंच तत्काळ सोडून अकिंचन होतात आणि सारासार विवेक करणाऱ्या हंसाप्रमाणे परमहंसाचे जीवन जगतात. (आमचीही अवस्था अशीच झाली आहे.) जशा काळविटाच्या भोळ्या माद्या हरिणी, कपटी व्याधाच्या मधुर गाण्यांवर विश्वास ठेवल्यामुळे त्याच्या बाणांनी विद्ध होतात, त्याचप्रमाणे आम्ही श्रीकृष्णांच्या प्रेयसी गोपीसुद्धा त्या कपटी कृष्णांचे गोड गोड कपटी बोलणे खरे समजलो आणि त्यांच्या नखस्पर्शाने उत्पन्न झालेल्या तीव्र प्रेमव्याधीचा वारंवार अनुभव घेत राहिलो. म्हणून हे उपमंत्र्या ! आता तू त्यांच्याशिवाय दुसरे काहीही सांग ! हे प्रियतमाच्या सख्या ! तू त्यांच्याकडे जाऊन परत आलास, वाटते. आमची मनधरणी करण्यासाठीच आमच्या प्रियतमाने तुला पुन्हा पाठविले काय ? प्रिय भ्रमरा ! तू आम्हांला आदरणीयच आहेस, म्हणून तुला जे पाहिजे ते माग. अरे ! ज्यांच्याकडे एकदा गेल्यानंतर परत येणे अतिशय कठीण, अशा आम्हांला येथून तेथे नेऊन काय करणार आहेस ? बाबा रे ! त्यांच्याजवळ, त्यांच्या वक्ष:स्थळावर त्यांची प्रिय पत्नी लक्ष्मी नेहमी राहात असते ना ? हे मधुकरा ! आम्हांला हे सांग की, आर्यपुत्र सध्या मथुरेत आहेत ना ? आई-बाबा, नातलग आणि गोपाळांची कधी त्यांना आठवण येते का ? आणि आम्हा दासींविषयी ते कधी काही सांगतात काय ? आणि अगुरूसारखे सुगंधी करकमल ते कधी आमच्या मस्तकावर ठेवतील काय ? (१२-२१)

श्रीशुक म्हणतात- श्रीकृष्णांच्या दर्शनाला लालचावलेल्या गोपींचे हे म्हणणे ऐकून उद्धवाने त्यांना त्यांच्या प्रियतमाचा संदेश सांगून, त्यांचे सांत्वन करीत म्हटले. (२२)

उद्धव म्हणाला- गोपींनो ! तुम्ही कृतकृत्य आहात. साऱ्या जगाला तुम्ही पूजनीय आहात; कारण तुम्ही भगवान श्रीकृष्णांना अशा प्रकारे आपले मन समर्पित केले आहे. दान, व्रत, तप, होम, जप, वेदाध्ययन, ध्यान, धारणा, समाधी आणि कल्याणाच्या विविध उपायांच्याद्वारा भगवंतांची भक्ती प्राप्त व्हावी, एवढाच उद्देश असतो. तुमची पवित्रकीर्ती भगवान श्रीकृष्णांच्या ठिकाणी मुनींनासुद्धा दुर्लभ अशी सर्वोत्तम भक्ती आहे आणि तिचा आदर्श तुम्ही लोकांपुढे ठेवला आहे, ही मोठी भाग्याचीच गोष्ट आहे. ही किती भाग्याची गोष्ट आहे की, तुम्ही पुत्र, पती, शरीर, स्वजन आणि घरे सोडून पुरुषोत्तम भगवान श्रीकृष्णांना वरले आहे. हे भाग्यशाली गोपींनो ! श्रीकृष्णांच्या वियोगात तुमची त्यांच्या ठिकाणी जी एकान्तभक्ती जडली, तिचे दर्शन मला झाले, ही माझ्यावर तुमची मोठी कृपाच होय. मी स्वामींचे गुप्त काम करणारा दूत आहे. देवींनो ! प्रियतम श्रीकृष्णांनी तुम्हांला आनंद देण्यासाठी एक संदेश पाठविला आहे. तोच घेऊन मी तुमच्याकडे आलो आहे, तो ऐका !(२३-२८)

श्रीकृष्णांनी सांगितले आहे- तुमचा माझ्याशी पूर्णपणे कधीही वियोग होऊ शकत नाही. सर्व भौतिक पदार्थांमध्ये ज्याप्रमाणे आकाश, वायू, अग्नी, जल आणि पृथ्वी ही पंचमहाभूते व्यापून आहेत, त्याचप्रमाणे मी मन, प्राण, पंचमहाभूते, इंद्रिये आणि त्यांच्या विषयांचा आश्रय आहे. मीच आपल्या मायेच्या द्वारे पंचमहाभूते, इंद्रिये आणि त्यांच्या विषयांच्या रूपाने स्वत:मध्ये स्वत:लाच उत्पन्न करतो, पाळतो आणि विलीन करतो. मायेपासून वेगळा असलेला आत्मा विशुद्ध ज्ञानस्वरूप असून त्रिगुणांशी त्याचा संबंध नाही. तथापि सुषुप्ती, स्वप्न व जागृती या मायेच्या तीन वृत्तींमुळे तो प्रत्ययाला येतो. जागा झालेला मनुष्य स्वप्नात

दिसलेले पदार्थ ज्या मनाने खोटे आहेत, हे जाणतो, त्याचप्रमाणे प्रत्यक्ष दिसणारे पदार्थही खोटे आहेत, असा त्याच मनाने निश्चय करून निरलसपणे इंद्रियांना विषयांपासून आवरावे. सर्व नद्या ज्याप्रमाणे वेगवेगळ्या मार्गांनी वाहात जाऊन समुद्रालाच मिळतात, त्याचप्रमाणे ज्ञानी माणसांचा वेदाभ्यास, योग, आत्मानात्मविवेक, त्याग, तपश्चर्या, इंद्रियसंयम, सत्य इत्यादी सर्वांचे खरे फळ मनाचा निग्रह करून परमात्म्याला मिळणे, हेच आहे. (२९-३३)

गोपींनो ! मी तुम्हांला प्रिय असूनही तुमच्या दृष्टीपासून दूर राहातो. याचे कारण तुम्ही नेहमी माझे ध्यान करीत राहाण्यामुळे मनाने अगदी माझ्या जवळ राहाण्याचा तुम्हांला अनुभव यावा, म्हणून. कारण स्त्रियांचे चित्त आपल्या दूरदेशी असलेल्या प्रियतमाच्या ठायी जितके गुंतून राहाते, तितके जवळ डोळ्यांसमोर राहाणाऱ्याच्या ठिकाणी लागत नाही. कोणतीही वृत्ती मनात उठू न देता संपूर्ण मन माझ्या ठिकाणी लावून जेव्हा तुम्ही माझे स्मरण कराल, तेव्हा लवकरच कायमच्या मला प्राप्त व्हाल. हे कल्याणींनो ! ज्यावेळी मी वृंदावनामध्ये पौर्णिमेच्या रात्री रासक्रीडा केली होती, त्यावेळी ज्या गोपी स्वजनांनी येऊ न दिल्यामुळे व्रजातच राहिल्या व माझ्याबरोबर रासक्रीडेत सामील होऊ शकल्या नाहीत, त्या माझ्या लीलांचे स्मरण केल्यानेच मला प्राप्त झाल्या होत्या. (३४-३७)

श्रीशुक म्हणतात- आपल्या प्रियतमाचा हा संदेश ऐकून गोपींना अतिशय आनंद झाला. त्यांच्या संदेशामुळे त्यांना श्रीकृष्णांचे स्वरूप आणि लीलेचे स्मरण होऊ लागले. त्या उद्धवाला म्हणाल्या.(३८)

गोपी म्हणाल्या - यादवांचा शत्रू पापी कंस आपल्या अनुयायांसह मारला गेला, ही अत्यंत आनंदाची गोष्ट झाली. तसेच श्रीकृष्णांच्या आप्तेष्टांचे सर्व मनोरथ पूर्ण झाले आणि ते सर्वजण आता अच्युतांसह खुशाल आहेत, हीसुद्धा काही कमी आनंदाची गोष्ट नाही. हे साधो ! एक गोष्ट तुम्ही आम्हांला सांगा. ज्याप्रमाणे आम्ही आमचे प्रेमयुक्त लज्जापूर्ण स्मितहास्य आणि त्यांच्याकडे मनसोक्त पाहाणे, या उपचारांनी त्यांची पूजा करीत होतो व तेही आमच्यावर प्रेम करीत होते, त्याच रीतीने मथुरेतील स्त्रियांवरही ते प्रेम करतात का ? तोपर्यंत दुसरी म्हणाली- ''अग सखी ! आमचे श्यामसुंदर प्रेमाची मोहिनी घालण्यात निष्णात आहेत आणि श्रेष्ठ स्त्रियाही त्यांच्यावर प्रेम करतात. तर मग जेव्हा नगरातील स्त्रिया गोड गोड बोलण्याने आणि विलासांनी त्यांची पूजा करतील, तेव्हा ते त्यांच्यात का बरे रममाण होणार नाहीत ?'' दुसरी एकजण म्हणाली- ''हे साधो ! जेव्हा कधी नागरी स्त्रियांच्या समूहात काही गप्पा चालतात आणि आमचे प्रिय श्रीकृष्ण स्वच्छंदपणे, त्यांच्यांत सामील होतात, तेव्हा कधीतरी प्रसंगवशात आम्हा ग्रामीण गवळणींचीसुद्धा ते आठवण काढतात काय ?'' आणखी एकीने विचारले- ''जेव्हा कमळे आणि कुंदफुले उमलली होती, सगळीकडे चांदणे पसरले होते आणि त्यामुळे वृंदावन रमणीय दिसत होते, त्या रात्री त्यांनी रासमंडल तयार करून आमच्याबरोबर नृत्य केले होते. त्यावेळी आमच्या पायांतील नूपुरे वाजत होती. आम्ही सगळ्याजणी त्यांच्याच सुंदर सुंदर लीलांचे गायन करीत होतो आणि ते आमच्या बरोबर विहार करीत होते. त्या रात्रींची ते कधी आठवण काढतात का ?'' आणखी कुणी म्हणाली- ''आम्ही सगळ्याजणी त्यांच्या विरहाग्नीमध्ये पोळत आहोत. इंद्र ज्याप्रमाणे पाऊस पाडून वनाला जिवदान देतो, त्याप्रमाणे श्रीकृष्णसुद्धा कधीतरी आपल्या करस्पर्श इत्यादींनी आम्हांला जीवनदान देण्यासाठी येथे येतील काय ?'' तोपर्यंत आणखी एक गोपी म्हणाली- ''अग ! आता तर त्यांनी शत्रूंना मारून

राज्य मिळविले आहे. आता ते राजकुमारींशी विवाह करून सर्व आप्तेष्टांबरोबर आनंदाने राहातील. आता इकडे कशाला येतील बरे ?'' दुसरी गोपी म्हणाली- ''महात्मा श्रीकृष्ण स्वत: लक्ष्मीपती आहेत. त्यांना कसलीच कामना नाही. ते कृतकृत्य आहेत. आम्ही वनवासी गौळणी किंवा दुसऱ्या राजकुमारी यांच्याशी त्यांना काय करायचे आहे ?'' ''संसारात कोणतीही आशा न धरणे हेच सगळ्यांत मोठे सुख आहे.'' असे पिंगला हिने वेश्या असूनही योग्य तेच सांगितले. हे माहीत असूनही आम्ही श्रीकृष्णांच्या भेटण्याची आशा सोडून देऊ शकत नाही. ज्यांची कीर्ती महात्मे गातात, त्यांनी एकांतात आमच्याशी ज्या प्रेमाच्या गोष्टी केल्या, त्या विसरणे, कोणाला शक्य आहे ? पहा ना ! त्यांची इच्छा नसतानासुद्धा त्यांना वरणारी स्वत: लक्ष्मी एक क्षणभरसुद्धा त्यांना सोडून दूर जात नाही. उद्धव महोदय ! बलरामांसह श्रीकृष्ण जेथे विहार करीत, तीच ही नदी, तोच हा पर्वत आणि तेच हे वनप्रदेश. ज्यांना ते चारण्यासाठी नेत, त्याच या गाई. आणि त्यांच्या वेणूचे ते स्वर अजूनही येथे घुमत आहेत. येथील प्रत्येक जागी त्यांच्या परम सुंदर चरणकमलांची चिह्ने उमटली आहेत. ती आम्हांला वारंवार नंदनंदनांचीच आठवण करून देतात. त्यांना आम्ही विसरूच शकत नाही. त्यांची ती सुंदर चाल, उन्मुक्त हास्य, विलासपूर्ण पाहाणे आणि मधुर वाणी ! या सर्वांनी आमचे चित्त हिरावून घेतले आहे. त्यांना आम्ही कशा विसरू ? हे स्वामी ! हे लक्ष्मीनाथ ! हे व्रजनाथ ! आमची संकटे दूर केलीत. हे गोविंदा ! दु:खसागरात बुडालेल्या या गोकुळाला तुम्हीच वाचवा.''

(३९-५२)

श्रीशुक म्हणतात- श्रीकृष्णांचा संदेश ऐकून गोपींच्या विरहाची व्यथा शांत झाली. कारण इंद्रियातीत श्रीकृष्णच आपला आत्मा आहे, हे त्यांना कळले. आता त्यांनी उद्धवाचा सत्कार केला. गोपींचा शोक मिटविण्यासाठी उद्धव काही महिने तेथे राहिला. श्रीकृष्णांच्या अनेक लीला आणि गोष्टी वारंवार सांगून तो व्रजवासियांना आनंदित करीत असे. जितके दिवसपर्यंत नंदांच्या व्रजामध्ये उद्धव राहिला, तितके ते दिवस श्रीकृष्णांशी संबंधित गोष्टींमुळे व्रजवासियांना क्षणासारखे वाटले. भगवंतांचा भक्त उद्धव नदी, वन, पर्वत, दऱ्या आणि फुलांनी लहडलेले वृक्ष पाहून तेथे श्रीकृष्णांनी कोणती लीला केली होती, असे विचारून विचारून व्रजवासियांना श्रीकृष्णांचेच स्मरण करून देऊन त्या स्मरणात त्यांच्यासह स्वत: रमत असे.

(५३-५६)

उद्धवाने गोपींची अशा प्रकारची श्रीकृष्णांमध्येच तन्मयता झाल्याचे पाहून त्याचेही मन कृष्णविषयक प्रेमाने अतिशय भरून गेले. गोपींना नमस्कार करीत तो असे म्हणाला. (५७)

''फक्त या गोपींचेच शरीर धारण करणे या पृथ्वीवर सार्थकी लागले, कारण सर्वात्मा भगवान श्रीकृष्णांच्या ठिकाणीच यांचे प्रगाढ प्रेम आहे. प्रेमाच्या या स्थितीची मुमुक्षू पुरुष आणि आम्ही भक्तसुद्धा अपेक्षा करतो. ज्यांना भगवान श्रीकृष्णांच्या कथांची गोडी लागली, त्यांना ब्रह्मदेवासारख्या श्रेष्ठ जन्माची तरी काय आवश्यकता ? कोठे ह्या आचारहीन, रानात राहाणाऱ्या स्त्रिया आणि कोठे सच्चिदानंदघन भगवान श्रीकृष्णांचे ठायी त्यांचे हे अनन्य प्रेम ! जसे एखाद्याने अजाणतेपणाने अमृत प्राशन केले तरी ते पिणाऱ्याला अमर करते, त्याप्रमाणे जर कोणी भगवंतांचे स्वरूप न जाणताही त्यांच्यावर निरंतर प्रेम केले, तर ते स्वत: त्याचे परम कल्याण करतात. रासलीलेच्या वेळी भगवान श्रीकृष्णांनी या गोपींच्या गळ्यांत हात टाकून यांना जो कृपा-प्रसाद दिला, तसा परम प्रेम करणाऱ्या लक्ष्मीलासुद्धा

दिला नाही किंवा कमलासारख्या सुगंध आणि कांतीने युक्त अशा देवांगनांनासुद्धा मिळाला नाही; तर मग अन्य स्त्रियांची काय कथा ! मी या वृंदावनामध्ये एखादे झुडूप, वेल किंवा वनस्पती झालो, तरी ते मी माझे भाग्य समजेन. कारण त्यामुळे मला या व्रजांगनांची चरणधूळ सेवन करण्यास मिळेल. ज्यांनी सोडण्यास कठीण असा स्वजनांचा मोह आणि शिष्टाचार सोडून भगवंतांचे पद प्राप्त करून घेतले की, जे वेदांनाही अद्यापि सापडलेले नाही. (५८-६१)

स्वत: लक्ष्मीने व ब्रह्मदेव, शंकर इत्यादी पूर्णकाम देवांनी ज्यांची पूजा केली, योगेश्वर आपल्या हृदयामध्ये ज्यांचे (सदैव) चिंतन करीत असतात, त्याच भगवान श्रीकृष्णांच्या चरणारविंदांना गोपींनी रासलीलेच्यावेळी आपल्या वक्ष:स्थळावर ठेवून घेतले आणि त्यांनाच आलिंगन देऊन आपल्या हृदयाचा ताप शांत केला. नंदांच्या व्रजात राहाणाऱ्या गोपांगनांच्या चरणधुळीला मी वारंवार नमस्कार करतो. ज्या गोपींनी श्रीकृष्णांच्या कथांसंबंधी जे काही गायन केले, ते तिन्ही लोकांना पवित्र करीत आहे. (६२-६३)

श्रीशुक म्हणतात- नंतर उद्धव गोपी, नंद आणि यशोदा यांची अनुमती घेऊन आणि गोपाळांचा निरोप घेऊन मथुरेला जाण्यासाठी रथावर स्वार झाला. तो निघालेला पाहून नंद इत्यादी गोपगण हातात पुष्कळशा भेटवस्तू घेऊन त्याच्याजवळ आले आणि डोळ्यांत अश्रू आणून मोठ्या प्रेमाने म्हणाले. "आमच्या मनाच्या वृत्ती श्रीकृष्णांच्या चरण-कमलांच्या आश्रयाने राहोत. आमच्या वाणी त्यांच्याच नामांचे उच्चारण करोत आणि शरीरे त्यांनाच प्रणाम इत्यादी करीत राहोत. भगवंतांच्या इच्छेने आमच्या कर्मानुसार आम्हांला कोणत्याही योनीमध्ये जन्म येवो, मात्र तेथे आम्ही शुभ आचरण करावे, दान करावे आणि त्यांचे फळ म्हणून भगवान श्रीकृष्णांचे ठायीच आमचे प्रेम असावे." परीक्षिता ! गोपांनी अशा प्रकारे कृष्णाप्रमाणेच समजून उद्धवाचा सन्मान केला. नंतर श्रीकृष्णांनी रक्षण केलेल्या मथुरेला तो परतला. तेथे पोहोचल्यावर त्याने भगवान श्रीकृष्णांना नमस्कार केला आणि व्रजवासियांची प्रगाढ भक्ती त्यांना कथन केली. त्यानंतर नंदांनी दिलेल्या भेटवस्तू त्याने वसुदेव, बलराम आणि राजा उग्रसेनाला दिल्या. (६४-६९)

अध्याय सत्तेचाळिसावा समाप्त

अध्याय अठ्ठेचाळिसावा

भगवंतांचे कुब्जा आणि अक्रूराच्या घरी जाणे

श्रीशुक म्हणतात- सर्वांचे आत्मा व सर्वसाक्षी भगवान श्रीकृष्ण, त्यांना भेटण्यासाठी व्याकूळ झालेल्या कुब्जेला सुखी करण्यासाठी तिच्या घरी गेले. बहुमोल सामग्रीने कुब्जेचे घर भरलेले होते. शृंगाराला उपयोगी अशी पुष्कळ सामग्री तेथे ठेवलेली होती. ठिकठिकाणी मोत्यांच्या झालरी आणि पताका लावलेल्या होत्या. चांदवे लावलेले होते. शय्या अंथरलेल्या होत्या आणि बसण्यासाठी आसने ठेवली होती. धुपाचा सुगंध दरवळत होता. दिवे प्रकाशत होते. फुलांचे हार आणि सुगंधी द्रव्ये ठेवलेली होती. भगवंत आपल्या घरी आलेले पाहून कुब्जा लगबगीने आपल्या आसनावरून उठून उभी राहिली आणि आपल्या सख्यांसह पुढे होऊन तिने भगवंतांना उत्तम आसन वगैरे देऊन त्यांची पूजा

केली. त्याचप्रमाणे उद्धवाची सुद्धा तिने योग्य पद्धतीने पूजा केली. परंतु तो सन्मानासाठी तिने दिलेल्या आसनाला केवळ स्पर्श करून जमिनीवरच बसला. श्रीकृष्णाही लोकरीतीचे अनुकरण करीत लगेच तिच्या बहुमूल्य शय्येवर जाऊन बसले. तेव्हा कुब्जेने स्नान करून उटणे, रेशमी वस्त्रे, अलंकार, पुष्पहार, गंध, विडा, सुधासव इत्यादींनी स्वत:ला खूप सजविले. आणि लज्जायुक्त स्मितहास्य व हावभाव करीत विलासपूर्ण नजरेने पाहात पाहात ती भगवंतांच्याकडे आली. मिलनाची पहिलीच वेळ असल्याने कुब्जा संकोचाने थोडीशी थबकली. तेव्हा श्रीकृष्णांनी तिला आपल्याजवळ बोलाविले आणि कंकणांनी सुशोभित असा तिचा हात धरून तिला पलंगावर बसवून घेऊन ते तिच्याशी रममाण झाले. या जन्मामध्ये कुब्जेने भगवंतांना फक्त सुगंधी उटणे अर्पण केले होते. त्या एका शुभकर्माचे हे फळ होते. भगवान श्रीकृष्णांचे चरण कुब्जेने आपले कामसंतप्त हृदय, वक्ष:स्थळ आणि डोळ्यांवर ठेवून घेऊन त्यांचा दिव्य सुगंध ती घेऊ लागली. अशा प्रकारे तिने आपली सर्व व्यथा नाहीशी करून घेतली. आनंदमूर्ती प्रियतम श्यामसुंदरांना आपल्या दोन्ही हातांनी गाढ आलिंगन देऊन कुब्जेने प्रदीर्घ कालापासूनचा आपला विरहताप शांत केला. कुब्जेने फक्त सुगंधी उटणे दिले होते. तेवढ्यानेच तिला मोक्ष देण्यास समर्थ व मिळण्यास कठीण अशा भगवंतांची प्राप्ती झाली. परंतु त्या अभागिनीने मात्र हेच मागितले. ''हे प्रियतमा ! आपण काही दिवस येथेच राहून माझ्याबरोबर रमावे. कारण हे कमलनयना ! माझ्याच्याने आपली संगत सोडवत नाही.'' सर्वेश्वर श्रीकृष्णांनी तिच्या म्हणण्याला मान देऊन वस्त्रालंकारांनी तिची संभावना केली व तिला इच्छिलेला वर देऊन, उद्धवाबरोबर ते आपल्या संपन्न घरी परतले. आराधना करण्यासही अत्यंत कठीण अशा सर्वदेवाधिदेव विष्णूंना प्रसन्न करून घेऊन जो कोणी त्यांना तुच्छ विषयसुख मागतो, तो निश्चितच मूर्ख होय. (१-११)

त्यानंतर भगवान श्रीकृष्ण, बलराम आणि उद्धवासह, अक्रूराची मनोकामना पूर्ण करण्यासाठी तसेच त्याच्याकडून काही काम करून घेण्यासाठी त्याच्या घरी गेले. आपले बांधव असणारे ते पुरुषोत्तम येत असल्याचे लांबूनच अक्रूराने पाहिले आणि तातडीने उठून तो सामोरा गेला आणि आनंदाने त्यांचे स्वागत करून त्याने त्यांना आलिंगन दिले. अक्रूराने राम-कृष्णांना नमस्कार केला. तसाच त्या तिघांनी अक्रूरालाही केला. सर्वजण आसनावर बसल्यावर अक्रूराने त्यांची विधिवत पूजा केली. परीक्षिता ! प्रथम त्याने भगवंतांचे चरणोदक मस्तकी धारण केले. नंतर दिव्य वस्त्रे, गंध, माळा, मौल्यवान अलंकार इत्यादी पूजासामग्रीने त्यांचे पूजन केले, मस्तक लववून त्यांना नमस्कार केला व त्यांचे चरण आपल्या मांडीवर घेऊन तो ते चेपू लागला. त्याचवेळी विनम्र भावाने तो राम-कृष्णांना म्हणाला. ''तुम्ही पापी कंसाला त्याच्या अनुयायांसह मारले, हे छान झाले ! त्याला मारून आपण दोघांनी यदुवंशाला मोठ्या संकटातून वाचविले आणि तो वंश समृद्ध केला. आपण दोघे जगाचे कारण आणि जगत्स्वरूप आदिपुरुष आहात. आपल्याव्यतिरिक्त अन्य कोणतीही वस्तू कारण नाही की कार्य नाही. हे परमात्मन ! आपणच निर्माण केलेल्या या विश्वात आपल्या शक्तींसह आपण प्रवेश केला. म्हणूनच ज्या ज्या वस्तू पाहिल्या आणि ऐकल्या जातात, त्यांच्या रूपाने आपलाच प्रत्यय येत असतो. जसे पृथ्वी इत्यादी पंचमहाभूतांपासून जी स्थावर-जंगम शरीरे बनतात, त्यात तीच महाभूते वेगवेगळ्या रूपांमध्ये अनुभवाला येतात. त्याचप्रमाणे आपणही आपल्या या कार्यरूप विश्वामध्ये स्वेच्छेने अनेक रूपांमध्ये प्रतीत होता. प्रभो ! आपण आपल्या

रजोगुण, सत्त्वगुण आणि तमोगुणरूप शक्तींनी विश्वाची उत्पत्ती पालन आणि संहार करता. परंतु आपण त्या गुणांनी किंवा त्यांच्या द्वारा होणाऱ्या कर्मांनी बंधनात पडत नाही. कारण आपण शुद्ध ज्ञानस्वरूप आहात. तर मग आपल्याला बंधनाचे कारण कोणते असणार ? प्रभो ! स्थूलदेह, सूक्ष्मदेह इत्यादी उपाधी आत्म्याला नसल्यामुळे त्याला जन्म-मृत्यू नाही की त्याच्याहून दुसरा कोणता पदार्थ नाही. म्हणूनच आत्मस्वरूप आपल्याला बंधन किंवा मोक्ष नाही. तरीही आत्म्याविषयी बंधमोक्षाची जी कल्पना असते, ती केवळ आमच्या अविवेकामुळे. आपण जगाच्या कल्याणासाठी हा सनातन वेदमार्ग प्रगट केला आहे. या मार्गाची जेव्हा जेव्हा नास्तिक वृत्तीच्या दुष्टांकडून पायमल्ली होते, तेव्हा तेव्हा आपण शुद्ध सत्त्वमय शरीर धारण करता. प्रभो ! तेच आपण यावेळी आपले अंश श्रीबलराम यांचेसह पृथ्वीचा भार नाहीसा करण्यासाठी येथे वसुदेवांच्या घरी अवतीर्ण झाला आहात. असुरांच्या अंशापासून उत्पन्न झालेल्या नामधारी राजांच्या शेकडो अक्षौहिणी सेनेचा आपण संहार कराल आणि यदुवंशाच्या यशाचा विस्तार कराल. हे परमात्मन ! सर्व देव, पितर, भूतगण, मनुष्य आणि वेद (हे पाच यज्ञ) या आपल्या मूर्ती आहेत. आपले चरणतीर्थ अशी गंगा तिन्ही लोकांना पवित्र करते. आपण जगद्गुरू आहात. तेच आपण आज आमच्या घरी आला आहात. आज आमचे घर धन्य धन्य झाले. त्याच्या भाग्याला सीमाच उरली नाही. प्रभो ! आपण भक्तप्रिय, सत्यवक्ते, अकारण हितचिंतक आणि कृतज्ञ आहात. आपण आपले भजन करणाऱ्या भक्तांच्या सर्व अभिलाषा पूर्ण करता; एवढेच काय पण स्वत:लाही देऊन टाकता. तरीही आपल्यामध्ये कमी-जास्तपणा उत्पन्न होत नाही. अशा तुम्हांला सोडून कोणता बुद्धिमान मनुष्य दुसऱ्या कोणाला शरण जाईल ? हे प्रभो ! मोठमोठे योगी आणि देवराजसुद्धा ज्यांचे स्वरूप जाणू शकत नाहीत; त्या आपले आम्हांला साक्षात दर्शन झाले, ही केवढी भाग्याची गोष्ट आहे ! प्रभो ! आम्ही स्त्री, पुत्र, धन, स्वजन, घर, देह इत्यादीरूप मोहाच्या दोरीने बांधले गेलो आहोत. हा आपल्याच मायेचा खेळ आहे. कृपा करून आपण आमचे हे बंधन लगेच तोडून टाका. (१२-२७)

श्रीशुक म्हणतात- परीक्षिता ! भक्त अक्रूराने अशा प्रकारे भगवान श्रीकृष्णांची पूजा आणि स्तुती केली. नंतर त्यांनी स्मित हास्य करून, त्यांना जणू मोहित करीत आपल्या मधुर वाणीने म्हटले.(२८)

श्रीकृष्ण म्हणाले- काका ! आपण आमचे हितोपदेशक, चुलते आणि आदरणीय बांधव आहात. आम्ही आपल्या मुलासारखे आहोत. आपणच आमचे रक्षण, पालन करून आमच्यावर कृपा करायची. जे आपले कल्याण इच्छितात, त्यांनी आपल्यासारख्या परमपूजनीय आणि महाभाग्यवान संतांची नेहमी सेवा केली पाहिजे. संत देवतांपेक्षाही श्रेष्ठ होत. कारण देवता स्वार्थी असतात, संतांचे ठिकाणी स्वार्थ नसतो. फक्त पाणी म्हणजे तीर्थ नव्हे, फक्त माती आणि पाषाण यांनी बनविलेल्या मूर्तीच देवता नव्हेत. कारण तीर्थे व देव कालान्तराने पवित्र करतात; परंतु संत मात्र दर्शन होताच पवित्र करतात. आपण आमच्या हितचिंतकांमध्ये श्रेष्ठ आहात; म्हणून आपण पांडवांचे हित करण्यासाठी तसेच त्यांची खुशाली जाणून घेण्यासाठी हस्तिनापुरला जावे. (२९-३२)

आम्ही ऐकले आहे की, पांडूच्या मृत्यूनंतर माता कुंतीसह युधिष्ठिर इत्यादी पांडव अत्यंत दु:खी झाले होते. धृतराष्ट्राने आता त्यांना राजधानीत आणले असून ते तेथेच राहातात. धृतराष्ट्र एक तर अंध आहे आणि मनाने कणखर नाही. दुष्ट पुत्रांच्या

अधीन झाल्याकारणाने तो भावाच्या मुलांशी आपल्या पुत्रांसारखा व्यवहार खात्रीने करत नसणार. म्हणून आपण तेथे जावे आणि त्यांची स्थिती चांगली आहे की वाईट, हे जाणून घ्यावे. ते समजताच त्या आप्तांना सुख कसे मिळेल, ते आपण पाहू. भगवान श्रीकृष्ण, अक्रूराला असे सांगून बलराम आणि उद्धवासह आपल्या घरी परतले. (३३-३६)

अध्याय अठ्ठेचाळिसावा समाप्त

अध्याय एकोणपन्नासावा

अक्रूराचे हस्तिनापुरला गमन

श्रीशुक म्हणतात- अक्रूर पुरुवंशी राजांच्या कीर्तीने मंडित असलेल्या हस्तिनापुरला गेला. तो तेथे धृतराष्ट्र, भीष्म, विदुर, कुंती, बाल्हीक आणि त्याचा पुत्र सोमदत्त, द्रोणाचार्य, कृपाचार्य, कर्ण, दुर्योधन, अश्वत्थामा, पांडव व इतर इष्टमित्रांना भेटला. अक्रूर जेव्हा सर्व संबंधितांना आस्थेवाईकपणे भेटला, तेव्हा तेथील लोकांनी मथुरावासी स्वजनांची खुशाली त्याला विचारली. त्याचे उत्तर देऊन अक्रूरानेसुद्धा त्यांच्या खुशालीसंबंधी चौकशी केली. राजाचे पांडवांबरोबरचे वर्तन जाणून घेण्यासाठीच अक्रूर काही महिने तेथे राहिला. खरे पाहू गेले तर, आपल्या दुष्ट पुत्रांच्या इच्छेविरुद्ध काहीही करण्याचे धाडस, शकुनी इत्यादी दुष्टांच्या सल्ल्यानुसार काम करणाऱ्या धृतराष्ट्रामध्ये नव्हते. (१-४)

धृतराष्ट्राचे दुर्योधन इत्यादी पुत्र पांडवांचा प्रभाव, शस्त्रकौशल्य, बल, शौर्य आणि विनय इत्यादी सद्गुण पाहून त्यांचा द्वेष करतात. प्रजा पांडवांवरच अधिक प्रेम करते, हेही त्यांना सहन होत नाही. म्हणून त्यांनी पांडवांवर विषप्रयोग इत्यादी करून त्यांच्यावर अत्याचार केलेले आहेत. कुंतीने आणि विदुराने हे सारे अक्रूराला सांगितले. (५-६)

अक्रूर जेव्हा कुंतीच्या घरी गेला, तेव्हा ती आपल्या भावाजवळ जाऊन बसली. अक्रूराला पाहून कुंतीच्या मनात आपल्या माहेराची आठवण जागी झाली आणि तिच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. ती म्हणाली. दादा ! माझे आई-वडील, भाऊ-बहिणी, पुतणे, इतर नातलग स्त्रिया आणि मैत्रिणी माझी कधी आठवण काढतात का ? माझा भाचा भक्तवत्सल आणि शरण आलेल्यांचे रक्षण करणारा भगवान श्रीकृष्ण आणि कमलनयन बलराम यांना आपल्या या आतेभावांची कधी आठवण येते का ? शत्रूंच्या गराड्यात असल्याने मी शोकाकुल आहे. लांडग्यांच्या कळपात हरिणी सापडावी, तशी माझी अवस्था आहे. श्रीकृष्ण कधी येथे येऊन माझे आणि या अनाथ बालकांचे सांत्वन करील काय ? '' हे सच्चिदानंदस्वरूप श्रीकृष्णा ! तू महायोगी आहेस, विश्वात्मा आहेस आणि तूच सगळ्या विश्वाचा जीवनदाता आहेस. हे गोविंदा ! आपल्या मुलांसह दुःखी असलेली मी तुला शरण आले आहे. आमचे रक्षण कर ! हे जग मृत्यूने व्याप्त आहे आणि तुझे चरण मोक्ष देणारे आहेत. जे लोक या जगाला भ्यालेले आहेत, त्यांच्यासाठी शरण जाण्याला तुझ्या चरणांव्यतिरिक्त आणखी दुसरा कोणताही आश्रय नाही. हे श्रीकृष्णा ! तू परम शुद्ध परब्रह्म परमात्मा आहेस. सर्व योगांचा स्वामी असून तू स्वतः योगसुद्धा आहेस. तुला मी शरण आले आहे. तू माझे रक्षण कर.'' (७-१३)

श्रीशुक म्हणतात- परीक्षिता ! तुझी पणजी कुंती अशाप्रकारे स्वजनांचे आणि जगदीश्वर भगवान श्रीकृष्णांचे स्मरण करून अत्यंत दु:खी होऊन रडू लागली. अक्रूर आणि कीर्तिमान विदुर हे दोघेही सुख-दु:खाला समदृष्टीने पाहात होते. त्यांनी तिच्या पुत्रांच्या जन्मदात्या देवतांचे तिला स्मरण करून देऊन तिचे सांत्वन केले. अक्रूर मथुरेला जाण्यासाठी निघाला, तेव्हा राजा धृतराष्ट्राकडे गेला. राजा आपल्या पुत्रांचा पक्षपाती होता आणि पांडवांशी त्याचे वर्तन पुत्रांसारखे नव्हते. अक्रूराने सर्वांसमक्ष श्रीकृष्णांचा मित्रत्वाचा संदेश त्याला सांगितला. (१४-१६)

अक्रूर म्हणाला- कुरूंची कीर्ती वाढविणारे विचित्रवीर्यपुत्र महाराज धृतराष्ट्र ! आपला बंधू पांडू स्वर्गाला गेल्यावर आपण आता राज्यावर बसला आहात. आपण धर्मानुसार पृथ्वीचे पालन करावे. सदाचरणाने प्रजेला प्रसन्न ठेवावे आणि स्वजनां-बरोबर समान वर्तन ठेवावे. असे करण्याने आपल्याला लोकांमध्ये यश आणि परलोकी सद्गती प्राप्त होईल. आपण जर याच्या विपरीत आचरण कराल, तर या लोकी निंदा होईल आणि मृत्यूनंतर नरकात जावे लागेल; म्हणून आपले पुत्र आणि पांडव या दोघांशीही समानतेने वागा. आपल्याला माहीतच आहे की, या जगात कधीही, कोणीही, कोणाहीबरोबर कायमचा राहू शकत नाही. राजन ! हीच गोष्ट आपल्या शरीराच्या बाबतीतही आहे. तर मग स्त्री-पुत्रादिकांविषयी काय सांगावे ? जीव एकटाच जन्माला येतो आणि एकटाच मरून जातो. आपल्या कर्मानुसार पाप-पुण्याचे फळसुद्धा एकटाच भोगतो. ''आमचे पालन-पोषण करणे हा तुमचा धर्मच आहे'' असे म्हणून अधर्माने मिळविलेले मूर्खांचे धन स्वजन लुटतात. जसे पाण्यात राहाणाऱ्या जंतूंचे सर्वस्व असलेले पाणी त्यांचे संबंधितच संपवून टाकतात. जो माणूस, आपले समजून ज्यांचे अधर्मानेही पालनपोषण करतो, तेच प्राण, धन, पुत्र इत्यादी त्या मूर्खाला त्याच्या इच्छा अपुऱ्या ठेवूनच निघून जातात. खरे म्हणाल तर, जो आपल्या धर्माला विन्मुख आहे, त्याला व्यावहारिक स्वार्थसुद्धा समजत नाही. ज्यांच्यासाठी तो अधर्म आचरतो, ते तर त्याला वाऱ्यावर सोडतातच, शिवाय त्याला कधीच समाधान लाभत नाही आणि शेवटी तो घोर नरकात जातो. म्हणून महाराज ! हा संसार म्हणजे स्वप्न, जादू किंवा मनोराज्यासारखा आहे, असे समजून स्वत:च स्वत:वर नियंत्रण ठेवून समत्वामध्ये स्थिर राहा आणि शांत व्हा. (१७-२५)

धृतराष्ट्र म्हणाला- हे उत्तम सल्ला देणारे अक्रूर महोदय ! आपण माझ्या कल्याणाचीच गोष्ट सांगत आहात. मनुष्याला अमृत मिळाले, तर तो जसा तृप्त होत नाही, त्याचप्रमाणे मीसुद्धा आपल्या या उपदेशाने अजूनही तृप्त झालो नाही. असे असूनही, हे साधो ! आपण करीत असलेला हा हिताचा उपदेश, माझ्या चंचल चित्तात स्थिर होत नाही. कारण पुत्रांच्या ममतेमुळे माझे मन विषम झाले आहे. जशी स्फटिकमय पर्वतावर चमकलेली वीज दुसऱ्याच क्षणी दिसेनाशी होते, तीच दशा आपल्या उपदेशाच्या बाबतीत होत आहे. सर्वशक्तिमान भगवान पृथ्वीवरील भार उतरविण्या-साठी यदुकुलात अवतीर्ण झाले आहेत. त्यांच्या विधानामध्ये कोण बदल करू शकेल ? (त्यांची जशी इच्छा असेल, तसेच होईल.) भगवंतांच्या मायेचा मार्ग अचिंत्य आहे. त्या मायेच्या द्वाराच ते या जगाची निर्मिती करून त्यात प्रवेश करतात आणि कर्म व कर्मफलाची वाटणी करतात. या जगच्चक्राच्या निर्वेध चालीमागे त्यांच्या अचिंत्य लीलाशक्तीव्यतिरिक्त दुसरे कोणतेच कारण नाही. त्याच परमैश्वर्यशाली प्रभूंना मी नमस्कार करतो. (२६-२९)

श्रीशुक म्हणतात - अशाप्रकारे धृतराष्ट्राचा अभिप्राय जाणून घेऊन आणि स्वजनसंबंधितांचा निरोप घेऊन अक्रूर मथुरेला परतला. (३०)

परीक्षिता ! तेथे त्याने राम-कृष्णांना धृतराष्ट्राचे पांडवांशी असलेले वर्तन सांगितले. कारण त्याला त्यासाठीच हस्तिनापुरला पाठविले होते. (३१)

अध्याय एकोणपन्नासावा समाप्त

स्कन्ध दहावा (पूर्वार्ध) समाप्त.

॥ हरिः ॐ तत्सत् ॥

ॐ नमो भगवते वासुदेवाय

श्रीमद्भागवतमहापुराणम्

स्कन्ध दहावा

(उत्तरार्ध)

अध्याय पन्नासावा

जरासंधाशी युद्ध आणि द्वारकेची निर्मिती

श्रीशुकाचार्य म्हणतात- अस्ती आणि प्राप्ती अशा कंसाच्या दोन राण्या होत्या. पतीच्या मृत्यूने दु:खी झालेल्या त्या वडिलांच्या घरी गेल्या. मगधराज जरासंध हे त्यांचे वडील. त्यांनी दु:खी अंत:करणाने त्यांना आपल्या वैधव्याचे कारण सांगितले. परीक्षिता ! ही अप्रिय बातमी ऐकून जरासंधाला दु:ख झाले. परंतु नंतर त्याने क्रोधाने पृथ्वी यादवरहित करण्याचा निश्चय करून युद्धाची जंगी तयारी केली. तेवीस अक्षौहिणी सेनेसह यदूंची राजधानी असलेल्या मथुरेला त्याने चारी बाजूंनी वेढा दिला. (१-४)

श्रीकृष्णांनी पाहिले की, जरासंधाची सेना म्हणजे जणू खवळलेला समुद्रच ! त्याने आपल्या राजधानीला वेढा दिला असून आपले लोक भयभीत झाले आहेत. भगवान श्रीकृष्णांनी पृथ्वीचा भार उतरविण्यासाठीच मनुष्यावतार धारण केला होता. देशकालानुसार आपल्या अवताराचा उद्देश काय आहे, याचा आता त्यांनी विचार केला. त्यांनी विचार केला की, जरासंधाने आपले मांडलिक असलेल्या सर्व राजांच्या पायदळ, घोडदळ, रथी आणि हत्तींनी युक्त अशा अनेक अक्षौहिणी सेना एकत्र केल्या आहेत. पृथ्वीला भार झालेल्या यांचा आपण नाश करावा. परंतु जरासंधाला यावेळी मारता कामा नये, कारण तो जिवंत राहिल्यास पुन्हा असुरांची पुष्कळशी सेना घेऊन येईल. माझा अवतार पृथ्वीचा भार हलका करणे, सज्जनांचे रक्षण करणे आणि दुर्जनांचा संहार करणे यासाठीच आहे. धर्माचे रक्षण करण्यासाठी आणि वाढत्या अधर्माला आळा घालण्यासाठी वेळोवेळी मी अनेक शरीरे धारण करतो. (५-१०)

श्रीकृष्ण असा विचार करीत होते, तेवढ्यात सूर्याप्रमाणे तेजस्वी दोन रथ आकाशातून खाली उतरले. त्यांमध्ये युद्धाची सर्व सामग्री आणि दोन सारथी होते. त्याच वेळी भगवंतांची दिव्य आणि सनातन आयुधेसुद्धा आपणहून तेथे आली. ती पाहून श्रीकृष्ण बलरामांना म्हणाले. ''दादा ! यावेळी आपण रक्षण करीत असलेल्या यादवांवर मोठे संकट आले आहे. पहा ! हा आपला रथ आला आहे आणि ही आवडती आयुधे. आता आपण या रथावर आरूढ होऊन शत्रुसेनेचा संहार करा आणि आपल्या स्वजनांना या संकटापासून वाचवा. कारण हे भगवन ! साधूंचे कल्याण करण्यासाठीच आपण अवतार धारण केला आहे. म्हणून आता आपण हा तेवीस अक्षौहिणी सेनारूप पृथ्वीचा प्रचंड भार नष्ट करा.'' श्रीकृष्ण आणि बलरामांनी असा निश्चय करून कवचे धारण केली व रथात बसून ते मथुरेतून निघाले. त्यावेळी त्यांनी आपापली आयुधे आणि

थोडीशी सेनाही बरोबर घेतली. दारुक सारथी असलेल्या श्रीकृष्णांनी नगराबाहेर आल्यावर आपला पांचजन्य शंख वाजविला. तो नाद ऐकून शत्रुसेनेच्या हृदयात धडकी भरली. त्यांना पाहून मगधराज म्हणाला- "हे पुरुषाधम कृष्णा ! तू अजून लहान आहेस. लपून छपून वावरणाऱ्या तुझ्या एकट्याशी लढण्याची मला लाज वाटते. अरे मूर्खा ! तू तर आपल्या मामाचीच हत्या केली आहेस. म्हणूनही मी तुझ्याबरोबर लढू इच्छित नाही. जा, माझ्या समोरून निघून जा. हे बलरामा ! युद्धात मेल्याने स्वर्ग मिळतो, अशी जर तुझी श्रद्धा असेल, तर हिंमत दाखवून तू माझ्याशी लढ. आणि माझ्या बाणांनी छिन्नविच्छिन्न झालेले शरीर येथे सोडून स्वर्गात जा किंवा शक्ती असेल तर मला मार. (११-१९)

श्रीभगवान म्हणाले- हे मगधराजा ! जे शूर असतात, ते तुझ्यासारखी प्रौढी मिरवीत नाहीत; ते शौर्यच दाखवितात. पहा ! आता तुझा मृत्यू जवळ आला आहे. मरताना रोगी जसा बरळतो, तशी तुझी ही बडबड आहे. आम्ही तुझ्या बोलण्याकडे लक्ष देत नाही. (२०)

श्रीशुक म्हणतात- जसा वारा ढगांनी सूर्याला आणि धुराने आगीला झाकून टाकतो, त्याचप्रमाणे जरासंधाने राम-कृष्णांसमोर येऊन, आपल्या अत्यंत बलवान आणि अपार सेनेद्वारा त्यांना चारी बाजूंनी वेढले. इतके की, त्यांची सेना, रथ, ध्वज, घोडे आणि सारथीही दिसेनासे झाले. मथुरेतील स्त्रिया महालांच्या गच्च्या, वाडे आणि गोपुरांवर चढून युद्ध पाहात होत्या. युद्धभूमीवर श्रीकृष्णांचा गरुड-चिह्नांकित आणि बलरामांचा ताडचिह्नांकित ध्वज असलेले रथ त्यांना दिसले नाहीत, तेव्हा त्या शोकावेगाने मूर्च्छित होऊन पडल्या. श्रीकृष्णांनी शत्रुसेनेचे वीर आपल्या सेनेवर, जसे ढग पाण्याच्या थेंबांचा पाऊस पाडतात, त्याप्रमाणे बाणांचा वर्षाव करीत आहेत आणि त्यामुळे आपल्या सेनेला अत्यंत पीडा होत आहे असे पाहिले, तेव्हा त्यांनी देव-दैत्यांना पूज्य असलेल्या शार्ङ्गधनुष्याचा टणत्कार केला. यानंतर ते भात्यातून बाण काढून, ते धनुष्याला लावून आणि धनुष्याची दोरी ओढून बाणांचा वर्षाव करू लागले. त्यावेळी त्यांचे ते धनुष्य इतक्या वेगाने फिरत होते की, जणू वेगाने फिरणारे जळते कोलीतच. अशाप्रकारे श्रीकृष्ण जरासंधाच्या हत्ती, घोडे, रथ आणि पायदळ अशा चतुरंग सेनेचा संहार करू लागले. यामुळे मस्तके छिन्नविच्छिन्न झालेले हत्ती मरून पडू लागले. बाणांच्या वर्षावाने अनेक घोड्यांची डोकी धडापासून वेगळी झाली. रथदळांतील घोडे, ध्वज, सारथी आणि रथी नष्ट झाले आणि पायदळांतील सैनिकांचे हात, जांघा, मस्तके इत्यादी तुटून तेही खाली पडले. अत्यंत तेजस्वी अशा भगवान बलरामांनी त्या युद्धात मुसळाच्या प्रहाराने पुष्कळशा उन्मत्त शत्रूंना मारून व माणसे, हत्ती, घोडे यांना घायाळ करून त्यांच्या अंगांतून निघालेल्या रक्ताच्या शेकडो नद्या वाहविल्या. त्या नद्यांमध्ये माणसांचे तुटलेले हात हेच साप, माणसांची मस्तके हीच कासवे, मेलेले हत्ती ही बेटे आणि घोडे हे मगर होते. हात आणि जांघा माशांप्रमाणे, माणसांचे केस शेवाळाप्रमाणे, धनुष्ये तरंगांप्रमाणे आणि शस्त्रास्त्रे गवतांच्या झुडपांप्रमाणे दिसत होती. ढाली भोवऱ्यासारख्या भयानक दिसत होत्या. बहुमूल्य रत्ने आणि अलंकार दगड व वाळूप्रमाणे दिसत होते. त्या नद्या पाहून भित्री माणसे घाबरत होती आणि वीरांचा आपापसात उत्साह वाढत होता. परीक्षिता ! जरासंधाची ती सेना समुद्राप्रमाणे दुर्गम, भयावह आणि अपार होती. परंतु जगदीश्वर वसुदेवपुत्रांनी ती नष्ट करून टाकली. सेनेचा नाश करणे हा त्यांच्या दृष्टीने एक खेळच होता. जे अनंत गुणसागर भगवान लीलेने तिन्ही लोकांची उत्पत्ती, स्थिती आणि संहार करतात,

त्यांना शत्रूंच्या सेनेचा असा नाश करणे ही काही आश्चर्याची गोष्ट नाही; परंतु जेव्हा ते मनुष्यावताराने अशी कृती करतात, तेव्हा तिचे वर्णन करणे योग्यच नाही का ? (२१-३०)

अशा प्रकारे जरासंधाची सर्व सेना मारली गेली. रथसुद्धा मोडून पडला. फक्त शरीरात प्राण शिल्लक राहिले. तेव्हा जसा एक सिंह दुसऱ्या सिंहाला पकडतो, तसे बलरामांनी वेगाने महाबली जरासंधाला पकडले. जरासंधाने शत्रुपक्षातील पुष्कळशा राजांचा वध केला होता. परंतु आज त्याला बलराम वरुणपाशाने आणि दोराने बांधीत होते. याला सोडून दिले, तर हा आणखी सेना आणील व तिचाही नाश करता येईल, असा विचार करून श्रीकृष्णांनी बलरामांना अडविले. मोठमोठे वीर जरासंधाचा सन्मान करीत. राम-कृष्णांनी दया दाखवून आपल्याला सोडून दिले, याची त्याला लाज वाटली; त्याने तपश्चर्या करण्याचा निश्चय केला. परंतु वाटेत इतर राजांनी त्याला अडवून धर्मोपदेश, राजनीती व लौकिक दृष्टांत देऊन समजाविले की, यदूंकडून तुमचा पराभव हा केवळ प्रारब्धामुळेच झालेला आहे. सर्व सेना मरण पावल्यावर बलरामांनी जरासंधाची उपेक्षा करून त्याला सोडून दिले. त्यामुळे अतिशय उदास होऊन तो मगधदेशी निघून गेला. (३१-३५)

भगवान श्रीकृष्णांच्या सेनेमध्ये कोणाचेच नुकसान झाले नाही आणि समुद्राप्रमाणे असणाऱ्या जरासंधाच्या तेवीस अक्षौहिणी सेनेवर मात्र त्यांनी सहजगत्या विजय प्राप्त केला. त्यावेळी देवतांनी त्यांच्यावर फुलांचा वर्षाव करून त्यांचे अभिनंदन केले. जरासंधाच्या पराजयामुळे मथुरावासी भयमुक्त झाले होते आणि श्रीकृष्णांच्या विजयामुळे त्यांचे हृदय आनंदाने भरून गेले होते. श्रीकृष्ण त्यांना येऊन भेटले, त्यावेळी सूत, मागध आणि बंदीजन त्यांच्या विजयाची गीते गात होते. श्रीकृष्णांनी नगरात प्रवेश करताच शंख, नगारे, भेरी, तुतारी, वीणा, बासरी, मृदंग इत्यादी अनेक प्रकारची मंगल वाद्ये वाजू लागली. मथुरेतील रस्त्यांवर चंदनाचे सडे घातले होते. नागरिक आनंदोत्सव साजरा करीत होते. संपूर्ण नगर पताकांनी सजविले गेले होते. ब्राह्मणांचे वेदघोष घुमत होते आणि जिकडे तिकडे मंगलसूचक तोरणे बांधलेली दिसत होती. ज्यावेळी श्रीकृष्ण नगरात प्रवेश करीत होते, त्यावेळी नगरातील स्त्रिया प्रेम आणि उत्कंठेने भरलेल्या नेत्रांनी त्यांना न्याहाळीत होत्या आणि फुले, दही, अक्षता, अंकुर यांचा त्यांच्यावर वर्षाव करीत होत्या. श्रीकृष्णांनी रणभूमीवरून अपरंपार धन आणि वीरांचे अलंकार आणले होते. ते सर्व त्यांनी यादवराज उग्रसेनाला दिले. (३६-४१)

अशा प्रकारे सतरा वेळा, दरवेळी तेवीस अक्षौहिणी सेना एकत्रित करून मगधराज जरासंधाने श्रीकृष्णांच्या छत्राखाली असलेल्या यादवांशी युद्ध केले. परंतु श्रीकृष्णांच्या प्रभावामुळे यादवांनी प्रत्येक वेळी सर्व सेना नष्ट केली. जेव्हा सर्व सेना नष्ट होत असे, त्यावेळी यादवांनी सोडून दिलेला जरासंध आपल्या राजधानीकडे परतत असे. (४२-४३)

जेव्हा अठरावे युद्ध होणार होते, त्याचवेळी नारदांनी पाठविलेला वीर कालयवन राम-कृष्णांच्या दृष्टीस पडला. युद्धामध्ये कालयवनासमोर उभा राहील असा दुसरा कोणताही वीर त्यावेळी जगात नव्हता. यादव आपल्यासारखेच बलवान आहेत, हे ऐकून त्याने तीन कोटी म्लेंच्छ सेना आणून मथुरा नगरीला वेढा दिला. (४४-४५)

ते पाहून श्रीकृष्ण आणि बलराम यांनी विचार केला की, "अहो ! यावेळी यादवांवर तर जरासंध आणि कालयवन या दोघांकडून एकाचवेळी संकट आले आहे. आज या अतिशय बलशाली यवनाने

येऊन आम्हांला घेरले आहे आणि जरासंधसुद्धा आज, उद्या किंवा परवा येईलच. जर आम्ही दोघेही याच्याबरोबर लढू लागलो आणि त्याचवेळी बलवान जरासंध येऊन पोहोचला, तर तो आमच्या बांधवांना मारील किंवा कैद करून आपल्या नगरात घेऊन जाईल. म्हणून आज आम्ही अशा ठिकाणी एक नगर बांधू की, ज्यामध्ये कोणाही मनुष्याला प्रवेश करणे अवघड जाईल. नंतर आपल्या बांधवांना तेथे पोहोचवून या यवनाचा वध करवू.'' बलरामांशी अशा प्रकारे सल्लामसलत करून श्रीकृष्णांनी समुद्राच्या आत मनुष्यांना जाण्यास कठीण असे एक नगर बनविले. त्यातील सर्वच वस्तू अद्‌भुत होत्या आणि त्या नगराची लांबी-रुंदी शहाण्णव मैल होती. त्या नगरात सर्वत्र विश्वकर्म्याचे वास्तुज्ञान आणि शिल्पकलेचे नैपुण्य प्रगट झाले होते. वास्तुशास्त्रानुसार तेथे सडका, चौक आणि व्यापारी पेठा यांची रचना केली होती. देववृक्ष आणि वेली असलेली उद्याने व वैशिष्ट्यपूर्ण उपवनांनी युक्त असे ते नगर होते. सोन्याची शिखरे असलेले, स्फटिकांच्या गच्च्या आणि गगनचुंबी गोपुरे यांनी ते सुंदर दिसत होते. तेथे धान्य ठेवण्यासाठी चांदी-पितळेची गोदामे बनविली होती. तेथील महाल सोन्याचे होते व त्यांवर सुवर्णकलश बसविलेले होते. त्यांची शिखरे रत्नांची होती आणि फरशी मोठमोठ्या पाचूंची बनविलेली होती. तसेच त्या नगरात वास्तुदेवतेचे मंदिर आणि सज्जेसुद्धा होते. चारही वर्णांचे लोक तेथे राहाणार होते. तसेच तेथे यादवप्रमुखांचे महालही उठून दिसत होते.

(४६-५४)

इंद्राने त्यावेळी श्रीकृष्णांसाठी पारिजात वृक्ष आणि सुधर्मा सभा पाठविली. तेथे बसलेल्या मनुष्याला मर्त्यलोकातील दुःखांचा स्पर्श होत नसे. ज्यांचा एक एक कान काळा होता, असे मनोवेगाने धावणारे पांढरे घोडे वरुणाने पाठविले. धनपती कुबेराने आठ निधी पाठविले आणि अन्य लोकपालांनीसुद्धा स्वतःकडील महत्त्वाच्या संपत्ती भगवंतांकडे पाठविल्या. परीक्षिता ! लोकपालांना आपापली कामे करण्यासाठी श्रीकृष्णांनी जे जे दिले होते, ते ते सर्व श्रीकृष्ण पृथ्वीवर अवतीर्ण झाले, तेव्हा त्यांनी त्यांना अर्पण केले. आपल्या योगमायेने श्रीकृष्णांनी सर्व संबंधितांना द्वारकेमध्ये नेऊन पोहोचविले. उरलेल्या प्रजेच्या रक्षणासाठी बलरामांना मथुरापुरीत ठेवून त्यांच्या सल्ल्याने गळ्यात कमळांची माळ घालून, कोणतेही शस्त्र हातात न घेता ते स्वतः नगराच्या प्रमुख दरवाजातून बाहेर पडले. (५५-५८)

अध्याय पन्नासावा समाप्त

अध्याय एकावन्नावा

कालयवनाचे भस्म व मुचुकुंदाची कथा

श्रीशुक म्हणतात - श्रीकृष्ण मथुरा नगरीच्या मुख्य दरवाजातून उगवणाऱ्या चंद्राप्रमाणे बाहेर पडले. त्यांचे श्यामल शरीर अत्यंत देखणे होते. त्यांनी रेशमी पीतांबर परिधान केला होता. त्यांच्या वक्षःस्थळावर श्रीवत्सचिह्न शोभून दिसत होते. गळ्यात कौस्तुभमणी झगमगत होता. लांब व पिळदार असे चार हात होते. ताज्या कमळाप्रमाणे तांबूस नेत्र होते. नित्य आनंद ओसंडून वाहणारे, सुंदर गालांनी युक्त, चमकणारी मकराकृती कुंडले असलेले त्यांचे सुंदर मुखकमल पवित्र हास्याने शोभत होते. त्यांना पाहून कालयवनाचाही निश्चय झाला की, हाच पुरुष वासुदेव होय. कारण नारदांनी जी जी

लक्षणे सांगतिली होती- वक्ष:स्थळावर श्रीवत्साचे चिह्न, चार भुजा, कमलपुष्पाप्रमाणे नेत्र, गळ्यात वनमाला आणि अपार सौंदर्य, हे सर्व याच्याशी जुळणारे आहे. म्हणून हा दुसरा कोणी असू शकत नाही. यावेळी हा कोणतेही शस्त्र हातात न घेता पायीच निघाला आहे. तेव्हा आपण सुद्धा त्याच्याशी शस्त्राविनाच लढावे. (१-५)

असा निश्चय करून कालयवन श्रीकृष्णांच्या दिशेने धावत सुटला. त्यावेळी ते तोंड फिरवून रणभूमीवरून पळून जाऊ लागले आणि त्या योग्यांनाही दुर्लभ अशा प्रभूंना पकडण्यासाठी कालयवन त्यांच्या मागे मागे धावू लागला. पावलोपावली स्वत: हातात सापडल्याचे भासवीत भगवान त्या यवनराजाला पुष्कळ लांब एका पर्वताच्या गुहेत घेऊन गेले. पाठीमागून (पळत येणारा) कालयवन वारंवार हरकत घेत, "यदुवंशामध्ये जन्मलेल्या तुला पळून जाणे शोभत नाही, असे त्यांना टाकून बोलत त्यांच्या मागे मागे पळत होता. परंतु अजून त्याची पापे नष्ट झाली नव्हती, त्यामुळे भगवंतांना तो प्राप्त करून घेऊ शकला नाही. त्याच्या निंदेकडे लक्ष न देता भगवान त्या पर्वताच्या गुहेत शिरले. त्यांच्या पाठोपाठ कालयवनही गेला. तेथे त्याने एक दुसराच मनुष्य झोपल्याचे पाहिले. त्याला पाहून कालयवनाने विचार केला की, "हा मला इतक्या लांब घेऊन येऊन आता साळसूदपणाने झोपला आहे." तो श्रीकृष्ण आहे, असे वाटून त्या मूर्खाने त्याला जोरात एक लाथ मारली. तो पुरुष तेथे पुष्कळ दिवसांपासून झोपला होता. लाथेच्या तडाख्याने तो जागा झाला आणि हळू हळू त्याने आपले डोळे उघडले. इकडे तिकडे पाहात असतानाच जवळच तो कालयवन उभा असल्याचे त्याला दिसले. परीक्षिता ! रागावलेल्या त्याची दृष्टी पडताच कालयवनाच्या शरीरातील अग्नी प्रज्वलित होऊन तो क्षणभरात जळून भस्मसात झाला. (६-१२)

राजाने विचारले- ब्रह्मन ! ज्याच्या केवळ दृष्टिक्षेपाने कालयवन जळून भस्म झाला, तो पुरुष कोण होता ? तो कोणाचा पुत्र होता ? त्याच्यामध्ये कोणत्या प्रकारची शक्ती होती ? तो पर्वताच्या गुहेत जाऊन का झोपला होता ? (१३)

श्रीशुक म्हणाले - तो इक्ष्वाकुवंशातील मांधात्याचा पुत्र मुचुकुंद होता. तो ब्राह्मणभक्त, सत्यप्रतिज्ञ महापुरुष होता. एकदा असुरांना भ्यालेल्या इंद्रादी देवांनी आपल्या रक्षणासाठी राजा मुचुकुंदाला प्रार्थना केली. तेव्हा त्याने पुष्कळ काळपर्यंत त्यांचे रक्षण केले. पुष्कळ दिवसांनंतर देवतांना जेव्हा कार्तिकेय सेनापती म्हणून मिळाले, तेव्हा ते मुचुकुंदाला म्हणाले- "राजन ! आमच्या रक्षणासाठी आपण पुष्कळ श्रम घेतले. आता विश्रांती घ्यावी. हे श्रेष्ठ वीरा ! आमचे रक्षण करता यावे म्हणून आपण मनुष्यलोकातील आपले निष्कंटक राज्य सोडून दिले. तसेच जीवनातील सर्व भोगांचाही त्याग केलात. आता आपले पुत्र, राण्या, बांधव आणि अमात्य, मंत्री, त्याचप्रमाणे त्यावेळच्या प्रजेपैकी कोणीही जिवंत नाही. सर्वांना काळाने गिळून टाकले. सर्व बलवानांपेक्षाही काळ बलवान आहे. तो स्वत: परम समर्थ, अविनाशी आणि भगवत्स्वरूप आहे. गवळी जसा जनावरांना आपल्या ताब्यात ठेवतो, त्याप्रमाणेच काळ सहजपणे सगळ्या प्रजेला आपल्या अधीन ठेवतो. राजा ! आपले कल्याण असो. मोक्षाखेरीज आमच्याकडून कोणताही वर मागून घ्या. कारण मोक्ष देण्याचे सामर्थ्य फक्त अविनाशी भगवान विष्णूंपाशीच आहे. असे सांगितल्यावर परम यशस्वी मुचुकुंदाने देवांना नमस्कार केला आणि झोपेचा वर घेऊन, तो पर्वताच्या गुहेत जाऊन झोपला. त्यावेळी देवांनी सांगितले

होते की, "हे राजा ! झोप घेत असताना जर एखाद्या अजाण माणसाने तुला मध्येच जागे केले, तर तो तुझ्या दृष्टीस पडताच त्याच क्षणी भस्म होऊन जाईल." (१४-२२)

परीक्षिता ! कालयवनाला भस्मसात करून यदुश्रेष्ठ भगवान श्रीकृष्णांनी बुद्धिमान मुचुकुंदाला दर्शन दिले. वर्षाकालीन मेघाप्रमाणे सावळे रूप असलेल्या भगवान श्रीकृष्णांनी त्यावेळी रेशमी पीतांबर परिधान केला होता, वक्ष:स्थळावर श्रीवत्स चिह्न होते आणि तेजस्वी कौस्तुभमण्याने ते शोभत होते. त्यांना चार हात होते. गळ्यात वैजयंतीमाला शोभत होती. सुंदर मुखकमल प्रसन्नतेने खुलले होते. मकराकृती कुंडले कानात झगमगत होती. प्रेमपूर्ण स्मितहास्ययुक्त नजर लोकांना आकर्षित करीत होती. अत्यंत देखणे तारुण्य आणि मदोन्मत्त सिंहाप्रमाणे निर्भय चाल ! अत्यंत बुद्धिमान राजा त्यांच्या तेजाने हतप्रभ झाला. तेजामुळे जवळ जाण्यासही कठीण अशा त्यांना राजाने भीतभीतच विचारले. (२३-२७)

मुचुकुंद म्हणाला- "आपण कोण आहात ? काट्या-कुट्यांनी भरलेल्या या निबिड जंगलात आपल्या कमलाप्रमाणे कोमल असणाऱ्या चरणांनी का बरे फिरत आहात ? आणि या पर्वताच्या गुहेत येण्याचा आपला हेतू कोणता ? आपण सर्व तेजस्वी पुरुषांचे मूर्तिमंत तेज किंवा भगवान अग्निदेव किंवा सूर्य, चंद्र, देवराज इंद्र किंवा दुसरे कोणी लोकपाल आहात काय ? मला वाटते की, आपण तीन मुख्य देवांपैकी पुरुषोत्तम आहात; कारण दिवा ज्याप्रमाणे तेजाने अंधार नाहीसा करतो, त्याचप्रमाणे आपण आपल्या अंगकांतीने या गुहेतील अंधार घालविला आहे. हे पुरुषश्रेष्ठ ! आपल्याला योग्य वाटत असेल, तर आम्हांला आपले जन्म, कर्म आणि गोत्र सांगा. कारण आम्ही ते ऐकण्यासाठी अंत:करणापासून [illegible] ! आम्ही इक्ष्वाकुवंशी क्षत्रिय आहोत. हे प्रभो, माझे नाव मुचुकुंद असून युवनाश्वनंदन मान्धात्याचा मी पुत्र होय. पुष्कळ दिवसांचे जागरण झाल्याने मी थकलो होतो. माझ्या सर्व इंद्रियांची शक्ती झोपेने हिरावून घेतली होती म्हणून या निर्जन ठिकाणी मनसोक्त झोप घेत होतो. आताच मला कोणी तरी उठविले. (२८-३३)

खात्रीने त्याच्या पापानेच त्याला जाळून टाकले. त्यानंतर शत्रूंचा नाश करणाऱ्या, परम सुंदर अशा आपण मला दर्शन दिलेत. हे महाभाग ! सर्व प्राण्यांना आपण आदरणीय आहात. आपल्या असह्य तेजाने माझी शक्ती क्षीण झाली आहे. मी आपल्याला फार वेळ पाहू शकत नाही. राजा मुचुकुंद असे म्हणाला, तेव्हा सर्व प्राण्यांचे जीवनदाते भगवान हसत हसत मेघध्वनीप्रमाणे गंभीर वाणीने त्याला म्हणाले. (३४-३६)

श्रीभगवान म्हणाले- मुचुकुंदा ! माझे जन्म, कर्मे आणि नामे हजारो आहेत. ती अनंत असल्याने मीही त्यांची गणती करू शकत नाही. एखादा पुरुष आपल्या अनेक जन्मांमध्ये पृथ्वीवरील धुळीचे कण मोजू शकेल, परंतु माझे जन्म, गुण, कर्मे आणि नामे यांची कधीच गणती करू शकणार नाही. हे राजा ! श्रेष्ठ ऋषीसुद्धा माझ्या तिन्ही कालांतील जन्म आणि कर्मांचे वर्णन करीत असतात, परंतु त्यांना त्यांचा अंत लागत नाही. असे असूनही राजा ! मी आपला वर्तमान जन्म, कर्मे आणि नामे तुला सांगतो, ऐक ! धर्माचे रक्षण आणि पृथ्वीला भारभूत झालेल्या असुरांचा संहार करण्यासाठी पूर्वी ब्रह्मदेवांनी मला प्रार्थना केली होती. त्यानुसार मी यदुवंशामध्ये वसुदेवांच्या घरी अवतार ग्रहण केला आहे. मी वसुदेवांचा पुत्र असल्यामुळे लोक मला 'वासुदेव' म्हणतात. आतापर्यंत मी कंसाच्या रूपाने जन्म घेतलेल्या कालनेमी, प्रलंब इत्यादी साधुद्रोही असुरांचा संहार केला आहे. राजन ! आणि हा

कालयवन तुझी तीक्ष्ण दृष्टी पडताच भस्म झाला. तोच मी, तुझ्यावर कृपा करण्यासाठी या गुहेत आलो आहे. तू भक्तवत्सल अशा माझी यापूर्वी फार आराधना केली आहेस. म्हणून हे राजर्षे ! वर माग. तुझ्या सर्व इच्छा मी पूर्ण करीन. जो पुरुष मला शरण येतो, त्याला पुन्हा शोक करावा लागत नाही. (३७-४४)

श्रीशुक म्हणतात- भगवान श्रीकृष्ण जेव्हा असे म्हणाले, तेव्हा गर्गांच्या वाणीचे राजा मुचुकुंदाला स्मरण झाले आणि ते भगवान नारायण आहेत, हे जाणून अतिशय आनंदाने त्याने भगवंतांच्या चरणांना प्रणाम केला आणि स्तुती केली. (४५)

मुचुकुंद म्हणाला- हे प्रभो ! जगातील सर्व प्राणी आपल्या मायेने अत्यंत मोहित होऊन राहिले आहेत. ते आपल्याला न भजल्याने अनर्थ होतो, हे जाणूनही आपले भजन करीत नाहीत. ते सुखासाठी सर्व दु:खांचे मूळ असलेल्या घरादारांत आसक्त होतात. अशा तऱ्हेने स्त्रिया आणि पुरुष परमार्थाला मुकतात. हे पुण्यशील प्रभो ! या कर्मभूमीत दुर्लभ असा निर्दोष मनुष्यजन्म कसाबसा अनायासे मिळूनही दुर्बुद्धी मनुष्य, पशूप्रमाणे संसाररूप अंधाऱ्या विहिरीत पडून राहातो आणि भगवंतांच्या चरणकमलांची उपासना करीत नाही. हे भगवन ! मी राजा होतो. राज्यलक्ष्मीच्या गर्वाने उन्मत्त झालेल्या, या शरीरालाच आत्मा मानणाऱ्या आणि पुत्र, पत्नी, खजिना तसेच पृथ्वीच्या लोभामध्येच गुंतलेल्या व त्यांचीच अखंड चिंता करणाऱ्या माझ्या जीवनाचा हा अमूल्य समय अगदीच व्यर्थ गेला. मातीचा घडा किंवा भिंतीप्रमाणे असलेले हे शरीर, यालाच मी राजा समजलो होतो. अशा प्रकारे मदांध होऊन मी आपली पर्वा न करता रथ, हत्ती, घोडे, पायदळ आणि सेनापती यांना बरोबर घेऊन या पृथ्वीवर इकडे तिकडे फिरत राहिलो. निरनिराळ्या कामांच्या चिंतेत पडून बेसावध असलेल्या, विषयासक्त लोभी माणसाला नित्य सावध असणारे कालरूप आपण अचानक पकडता. जसा भुकेने व्याकूळ झालेला साप जीभ हालवीत बेसावध उंदराला पकडतो. जे आधी सोन्याच्या रथावर किंवा मोठमोठ्या हत्तींवर बसून जात असे आणि स्वत:ला राजा म्हणवीत असे, तेच शरीर नंतर आपल्या अटळ काळामुळे विष्ठा, किडे किंवा राखेचा ढीग बनते. हे प्रभो ! ज्याने सर्व दिशांवर विजय प्राप्त केला आहे आणि ज्याच्याशी लढणारा जगात कोणीही राहिला नाही, जो श्रेष्ठ सिंहासनावर बसतो आणि बरोबरीचे राजे ज्याच्या चरणांवर नम्र होतात, तोच पुरुष जेव्हा स्त्रियांकडे विषयसुख भोगण्यासाठी जातो, तेव्हा तो त्यांच्या हातचे खेळणे बनतो. एखादा मनुष्य विषयभोगांचा त्याग करून पुन्हा आपण सम्राट व्हावे, या इच्छेने दानादि पुण्ये, तपश्चर्या किंवा सत्कर्मे करतो, परंतु ज्याची तृष्णा वाढलेली असते, तो कधीच सुखी होऊ शकत नाही. हे भगवंता ! जन्म-मृत्युरूप संसाराच्या चक्रात भटकणाऱ्या जीवाची त्या चक्रातून बाहेर पडण्याची जेव्हा वेळ येते, तेव्हा त्याला सत्संग प्राप्त होतो आणि जेव्हा सत्संग प्राप्त होतो, त्याचवेळी संतांचे आश्रय, कार्य-कारणरूप जगताचे एकमात्र स्वामी असलेल्या आपल्या ठिकाणी जीवाची बुद्धी स्थिर होते. भगवन ! मी तर असे समजतो की, आपण माझ्यावर कृपेचा वर्षाव केला आहे. कारण अनायासेच माझे राज्याचे बंधन तुटले. सज्जन चक्रवर्ती राजेसुद्धा वनात एकांतात तप:साधन करण्याच्या उद्देशाने जाऊ इच्छितात, तेव्हा तेही याच अनुग्रहाची प्रार्थना करतात. हे प्रभो ! आपल्या चरणांच्या सेवेव्यतिरिक्त दुसरा कोणताही वर मला नको. कारण अनासक्त लोकसुद्धा फक्त त्याचीच प्रार्थना करीत असतात. हे भगवन ! मोक्ष देणाऱ्या आपली आराधना करून कोणता शहाणा मनुष्य आपल्याला बांधणाऱ्या संसारातील विषयांचा वर मागेल बरे ! (४६-५६)

म्हणून हे प्रभो ! सत्त्वगुण, रजोगुण आणि तमोगुण यांच्याशी संबंध ठेवणाऱ्या सर्व कामना सोडून मी फक्त, मायेशी किंचितही संबंध नसलेल्या, गुणातीत, अद्वितीय, चित्स्वरूप, परमपुरुष अशा आपणांस शरण आलो आहे. भगवन ! अनादि-कालापासून मी या जगात आपल्या कर्मफळांच्या भोगाने त्रस्त झालो आहे. पुन्हा त्यांच्या वासनांनी तप्त झालो आहे. माझ्या इंद्रियरूप सहा शत्रूंची हाव कधीही संपत नाही. त्यामुळे मला क्षणभरसुद्धा शांती मिळत नाही. म्हणून आत्मज्ञान करून देणाऱ्या हे प्रभो ! आता मी आपल्या निर्भय, सत्यस्वरूप आणि शोकरहित चरणकमलांना शरण आलो आहे. आपण माझे रक्षण करा. (५७-५८)

श्रीकृष्ण म्हणाले- हे सार्वभौम महाराजा ! तुझी बुद्धी, अतिशय पवित्र आणि उच्च कोटीची आहे. मी तुला वर देण्याचे वारंवार प्रलोभन दाखविले, तरीसुद्धा ती कामनांनी चळली नाही. मी तुला जे वर देण्याचे प्रलोभन दाखविले, ते फक्त तुझ्या निश्चयाची परीक्षा घेण्यासाठी ! माझे जे अनन्य भक्त असतात, त्यांची बुद्धी कामनांमुळे कधीही सैरभैर होत नाही. जे लोक माझे भक्त नाहीत, ते प्राणायाम इत्यादी साधनांनी मनाला वश करण्याचा कितीही प्रयत्न करोत, त्यांच्या वासना क्षीण होत नाहीत आणि हे राजन ! त्यांचे मन विषयांसाठी पुन्हा उचल खाते. तू आपले मन माझे ठिकाणी लाव आणि खुशाल पृथ्वीवर राहा. तुझी अखंड भक्ती नेहमी माझ्या ठिकाणी राहो. क्षत्रियधर्माचे आचरण करतेवेळी तू शिकार इत्यादी करताना जो पुष्कळ प्राण्यांचा वध केलास, त्याचे पाप आता एकाग्रचित्ताने माझी उपासना करीत तपश्चर्येने धुऊन टाक. राजन ! पुढच्या जन्मी तू ब्राह्मणकुळात जन्माला येशील आणि सर्व प्राण्यांचा परम सुहृद होशील आणि मला परमात्म्यालाच प्राप्त होशील. (५९-६४)

अध्याय एकावन्नावा समाप्त

अध्याय बावन्नावा

द्वारकागमन, बलरामांचा विवाह व श्रीकृष्णांकडे रुक्मिणीचा संदेश घेऊन ब्राह्मणाचे येणे

श्रीशुक म्हणतात - अशा प्रकारे श्रीकृष्णांनी इक्ष्वाकुनंदन मुचुकुंदावर कृपा केली. नंतर त्याने भगवंतांना प्रदक्षिणा घालून नमस्कार केला आणि तो गुहेच्या बाहेर पडला. त्याने बाहेर येऊन पाहिले, तर माणसे, पशू, वेली आणि झाडे पहिल्यापेक्षा पुष्कळच लहान आकाराची झाली आहेत. त्यावरून कलियुग आले असे जाणून तो उत्तर दिशेकडे निघून गेला. तो तपश्चर्या, श्रद्धा, धैर्य आणि अनासक्तीने युक्त होता. तसेच संशयापासून मुक्त होता. आपले चित्त श्रीकृष्णांचे ठायी ठेवून तो गंधमादन पर्वतावर गेला. नर-नारायणांचे निवासस्थान असलेल्या बदरिकाश्रमात जाऊन अतिशय शांत चित्ताने ऊन-थंडी इत्यादी द्वंद्वे सहन करीत तो तपश्चर्येने भगवंतांची आराधना करू लागला. (१-४)

इकडे भगवान पुन्हा मथुरापुरीला परतले. कालयवनाच्या सेनेने अजूनपर्यंत तिला वेढा दिलेलाच होता. आता त्यांनी म्लेंच्छांच्या सेनेचा संहार केला आणि त्यांचे सर्व धन ते द्वारकेला घेऊन गेले. जेव्हा श्रीकृष्णांच्या आज्ञेनुसार माणसांवर आणि बैलांवर लादून ते धन नेले जाऊ लागले, त्यावेळी मगधराज जरासंध पुन्हा तेवीस अक्षौहिणी सेना घेऊन आला. परीक्षिता ! शत्रुसेनेचा प्रचंड वेग पाहून राम-कृष्ण

मनुष्यांसारखे त्यांच्या समोरून वेगाने पळू लागले. निर्भय असून सुद्धा जणू काही फार भ्यालो आहोत, असे भासवीत ते दोघे सगळे धन तेथेच सोडून पुष्कळ अंतरपर्यंत कमलदलाप्रमाणे कोमल पायांनीच पळू लागले. महाबली मगधराज ते पळून जात आहेत, असे पाहून मोठ्याने हसू लागला आणि आपल्या रथदळाने वेगाने त्यांचा पाठलाग करू लागला. कारण ईश्वरस्वरूप त्यांचा प्रभाव व भाव त्याला ज्ञात नव्हता. पुष्कळ लांबपर्यंत पळण्यामुळे ते थकले आणि अतिशय उंच अशा प्रवर्षण पर्वतावर चढले. तेथे नेहमीच मेघ पाऊस पाडीत असतात. परीक्षिता ! लपून राहिलेल्या त्यांचा ठावठिकाणा समजला नाही, तेव्हा जरासंधाने इंधनाने भरलेल्या प्रवर्षण पर्वताला चारी बाजूंनी पेटवून दिले. तेव्हा दोन्ही भावांनी अतिशय वेगाने त्या चव्वेचाळीस कोस उंच पर्वताच्या जळत्या कड्यावरून एकदम खाली जमिनीवर उडी टाकली. राजन ! जरासंधाला किंवा त्याच्या कोणत्याही सैनिकाला न दिसता ते दोघे यदुश्रेष्ठ तेथून निघून समुद्राने वेढलेल्या आपल्या द्वारकापुरीला परतले. जरासंधाला उगीचच वाटले की, राम-कृष्ण जळून गेले आणि मग तो आपली प्रचंड सेना माघारी फिरवून मगधदेशाकडे आला. (५-१४)

हे मी तुला अगोदरच सांगितले आहे की, आनर्त देशाचा राजा श्रीमान रैवत याने आपल्या रेवती नावाच्या कन्येचा विवाह ब्रह्मदेवांच्या प्रेरणेने बलरामांशी लावून दिला होता. परीक्षिता ! भगवान श्रीकृष्णांनीसुद्धा स्वयंवरासाठी आलेल्या शिशुपाल आणि त्याचे पक्षपाती असलेल्या शाल्व इत्यादी राजांना मोठ्या शौर्याने हरवून सगळ्यांच्या देखत गरुडाने अमृत हरण केले त्याप्रमाणे विदर्भ देशाच्या राजकुमारी रुक्मिणीचे हरण केले आणि तिच्याशी विवाह केला. लक्ष्मीचा अवतार असलेली रुक्मिणी राजा भीष्मकाची कन्या होती. (१५-१७)

परीक्षिताने विचारले- मुनिवर्य ! आम्ही ऐकले आहे की, भगवान श्रीकृष्णांनी, भीष्मकनंदिनी सुंदरी रुक्मिणीदेवीशी राक्षसविधीने विवाह केला होता. आता मी हे सविस्तर ऐकू इच्छितो की, परम तेजस्वी भगवान श्रीकृष्णांनी जरासंध, शाल्व इत्यादी राजांना जिंकून कोणत्या प्रकारे रुक्मिणीचे हरण केले ?

हे ब्रह्मर्षे ! कोणता रसिक भक्त, पवित्र, मधुर, पापनाशक व नित्य नवीन वाटणाऱ्या श्रीकृष्णकथा ऐकून तृप्त होईल ? (१८-२०)

श्रीशुक म्हणतात- महाराज भीष्मक विदर्भ देशाचा अधिपती होता. त्याला पाच पुत्र आणि एक सुंदर कन्या होती. थोरल्या पुत्राचे नाव रुक्मी होते आणि धाकट्यांची नावे क्रमशः रुक्मरथ, रुक्मबाहू, रुक्मकेश आणि रुक्ममाली अशी होती. सुशील रुक्मिणी यांची बहीण होती. रुक्मिणीने राजवाड्यात येणाऱ्या अतिथींच्या तोंडून भगवान श्रीकृष्णांचे सौंदर्य, पराक्रम, गुण आणि वैभवाबद्दल प्रशंसा ऐकली, तेव्हा तिने निश्चय केला की, भगवान श्रीकृष्णच आपल्याला अनुरूप पती आहेत. श्रीकृष्णांनीसुद्धा बुद्धी, लक्षणे, उदारता, सौंदर्य, शील आणि इतरही गुणांमध्ये अद्वितीय अशीच रुक्मिणी आहे, हे जाणून स्वतःला अनुरूप अशा तिच्याशी विवाह करण्याचा निश्चय केला. आपल्या बहिणीचा विवाह श्रीकृष्णांशीच व्हावा, असेच रुक्मिणीच्या बांधवांनासुद्धा वाटत होते. परंतु रुक्मी श्रीकृष्णांचा द्वेष करीत असे. त्याने त्यांना विरोध करून शिशुपाल हाच आपल्या बहिणीसाठी योग्य वर ठरवला. (२१-२५)

सुंदरी रुक्मिणीला जेव्हा हे समजले, तेव्हा ती अतिशय उदास झाली. विचारांती तिने एका विश्वासपात्र ब्राह्मणाला श्रीकृष्णांकडे ताबडतोब पाठविले. जेव्हा तो ब्राह्मण द्वारकापुरीत पोहोचला, तेव्हा द्वारपाल त्याला राजमहालात घेऊन गेले. तेथे

त्याने आदिपुरुष भगवान श्रीकृष्ण सोन्याच्या सिंहासनावर विराजमान झाले आहेत, असे पाहिले. त्याला पाहाताच ब्राह्मणांचे परम भक्त भगवान श्रीकृष्ण आपल्या आसनावरून खाली उतरले आणि त्याला आसनावर बसवून जसे देव भगवंतांची पूजा करतात, तशीच त्यांनी त्याची पूजा केली. ब्राह्मणाचे भोजन व विश्रांती झाल्यावर संतांचे आश्रयस्थान असणारे भगवान त्याच्याजवळ गेले आणि आपल्या हातांनी त्याचे पाय चेपीत अत्यंत शांतपणे विचारू लागले. (२६-२९)

श्रीकृष्ण म्हणाले- ''हे थोर ब्राह्मणा ! आपले चित्त नेहमी संतुष्ट असते ना ? आपल्या पूर्वजांपासून चालत आलेल्या धर्माचे पालन करण्यात आपल्याला काही अडचण तर येत नाही ना ? जे काही मिळेल त्यातच जर ब्राह्मण संतुष्ट राहिला आणि आपल्या धर्मापासून तो च्युत झाला नाही, तर तो संतोषच त्याच्या सर्व कामना पूर्ण करतो. असंतुष्ट मनुष्य देवांचा राजा झाला तरी त्याला सुखासाठी एका लोकातून दुसऱ्या लोकात वारंवार भटकावे लागेल. परंतु संतुष्ट मनुष्य काहीही नसले तरी सर्व प्रकारच्या तापांपासून मुक्त होऊन सुखाने झोप घेऊ शकतो. सहजपणे प्राप्त झालेल्या वस्तूंमुळे जे संतुष्ट असतात, ज्यांचा स्वभाव संतांसारखा असतो आणि जे सर्व प्राण्यांचे परम हितैषी असतात, जे अहंकाररहित व शांत असतात, त्या ब्राह्मणांना मी सदैव मस्तक लववून नमस्कार करतो. हे ब्रह्मन ! राजाकडून आपल्याला सर्व प्रकारचे सुख मिळते ना ? ज्याच्या राज्यामध्ये प्रजेचे चांगल्या तऱ्हेने पालन होते आणि ती आनंदाने राहाते, तो राजा मला प्रिय असतो. हे ब्रह्मन ! आपण कोठून, कोणत्या हेतूने आणि कोणती इच्छा मनात धरून एवढा अवघड मार्ग आक्रमण करून येथे आला आहात ? जर काही विशेष गुपित नसेल, तर आम्हांला सांगा. आम्ही आपले कोणते काम करावे ? लीलेनेच मनुष्यरूप धारण करणाऱ्या भगवान श्रीकृष्णांनी जेव्हा ब्राह्मणाला असे विचारले, तेव्हा त्याने त्यांना रुक्मिणीच्या विवाहाविषयी सांगितले. (त्याने भगवंतांना रुक्मिणीने दिलेले सात श्लोकी पत्र दिले. नंतर श्रीकृष्णांच्या आज्ञेवरून तो ते वाचू लागला.) (३०-३६)

रुक्मिणींनी म्हटले आहे- ''हे त्रिभुवनसुंदरा ! ऐकणाऱ्याच्या कानांमार्फत आपले गुण ज्याच्या हृदयात प्रवेश करून त्याचा त्रिविध ताप दूर करतात, तसेच जे आपले रूप डोळे असणाऱ्या जीवांच्या डोळ्यांना सर्व पुरुषार्थ प्राप्त करून देते, असे आपले गुण-सौंदर्य वर्णन ऐकून, हे अच्युता ! संकोच सोडून माझ्या चित्ताने आपल्या ठिकाणी प्रवेश केला आहे. हे मुकुंदा ! पुरुषोत्तमा ! कुल, शील, स्वभाव, सौंदर्य, विद्या, वय, द्रव्य अशा कोणत्याही बाबतीत अद्वितीय असलेल्या व सर्वांचे मन मोहविणाऱ्या आपल्याला कोणती कुलवती आणि धैर्यशील अशी श्रेष्ठ कन्या विवाहकाली पती म्हणून वरणार नाही ? म्हणून हे प्रभो ! मी आपल्याला पती म्हणून वरले आहे. मी माझे सर्वस्व आपल्याला अर्पण केले आहे. आपण येथे येऊन माझा पत्नी म्हणून स्वीकार करा. हे कमलनयना ! आपल्यासारख्या वीराचा हा भाग, सिंहाचा वाटा कोल्ह्याने न्यावा, तसा शिशुपालाने येऊन पळवू नये. मी जर यापूर्वी जन्मजन्मांतरी पूर्त (विहिरी, तलाव इत्यादी खोदणे), इष्ट (यज्ञादि करणे), दान, नियम, व्रते करून तसेच देव, ब्राह्मण आणि गुरू इत्यादींच्या पूजेने भगवान परमेश्वरांची पूर्णपणे आराधना केली असेल, तर भगवान श्रीकृष्णांनी येऊन माझे पाणिग्रहण करावे, शिशुपालादी इतरांनी नव्हे. हे अजिता ! विवाहाच्या आदल्या दिवशी आपण आमच्या राजधानीमध्ये गुप्तरूपाने या आणि नंतर सेनापतींसह शिशुपाल व जरासंधाची सेना बळाने उध्वस्त करून टाका आणि आपल्या शौर्याचे

बोल देऊन, राक्षसविधीने माझे पाणिग्रहण करा. आपण जर असा विचार करीत असाल की, अंत:पुरात असणाऱ्या माझ्याशी बंधूंना न मारता विवाह कसा करावा ? तर मी आपणास एक उपाय सांगते. विवाहाच्या आदल्या दिवशी कुलदेवतेचे दर्शन करण्यासाठी एक मोठी मिरवणूक निघते, तीमधून नववधूला नगराबाहेरच्या गिरिजादेवीच्या मंदिरात जावे लागते. हे कमलनयना ! शंकरांसारखे मोठ-मोठे देवसुद्धा आत्मशुद्धीसाठी आपल्या चरणकमलांच्या धुळीने स्नान करू इच्छितात. मी जर आपला तो प्रसाद प्राप्त करू शकले नाही, तर व्रते करून शरीराला कृश करून प्राणत्याग करीन. मग आपल्या कृपेसाठी शेकडो जन्म का घ्यावे लागेनात ! (३७-४३)

ब्राह्मण म्हणाला- हे यदुश्रेष्ठा ! रुक्मिणीचा हा अत्यंत गुप्त असा संदेश मी आपल्याकडे आणला आहे. यासंबंधी जे काही करावयाचे असेल, त्याबद्दल विचार करून ताबडतोब त्यानुसार करा. (४४)

अध्याय बावन्नावा समाप्त

अध्याय त्रेपन्नावा

रुक्मिणीहरण

श्रीशुक म्हणतात - रुक्मिणीचा हा संदेश ऐकून श्रीकृष्ण ब्राह्मणाचा हात हातात घेऊन हसत-हसत म्हणाले. (१)

श्रीभगवान म्हणाले- माझेही मन तिच्यातच लागून राहिल्यामुळे मला रात्री झोपसुद्धा लागत नाही. माझ्या द्वेषामुळे रुक्मीने माझ्याशी तिच्या विवाहाला विरोध केला आहे, हे मला माहीत आहे. परंतु मी त्या नीच क्षत्रियांना पराभूत करून माझ्यावर प्रेम करणाऱ्या त्या सुंदर राजकुमारीला लाकडातून अग्निज्वाळा आणावी, तशी घेऊन येईन. (२-३)

श्रीशुक म्हणतात- रुक्मिणीचा विवाहमुहूर्त जाणून श्रीकृष्णांनी सारथ्याला आज्ञा केली की, "दारुका ! ताबडतोब रथ जोड." शैब्य, सुग्रीव, मेघपुष्प आणि बलाहक नावाचे चार घोडे रथाला जुंपून तो रथ तेथे आणून, दारुक हात जोडून भगवंतांच्या समोर उभा राहिला. श्रीकृष्णांनी ब्राह्मणाला अगोदर रथात बसवून नंतर आपणही बसले व त्या वेगवान घोड्यांच्या साह्याने एका रात्रीत काठेवाडातून विदर्भ देशाला जाऊन पोहोचले. (४-६)

पुत्रप्रेमामुळे कुंडिननरेश भीष्मक, आपली कन्या शिशुपालाला देण्यासाठी विवाहाच्या उत्सवाची तयारी करीत होता. नगरातील राजमार्ग, चौक, झाडून साफ केले गेले होते. त्यांच्यावर सडा-संमार्जन केले होते. रंगी-बेरंगी ध्वज आणि पताका लावलेल्या होत्या. तोरणे बांधली गेली होती. (७-८)

तेथील स्त्री-पुरुष पुष्पमाळा, अत्तरे, दागिने आणि निर्मल वस्त्रांनी नटले होते. तेथील वैभवसंपन्न महालांतून धुपाचा सुगंध दरवळत होता. परीक्षिता ! राजा भीष्मकाने देव, पितर आणि ब्राह्मणांचे विधिपूर्वक पूजन करून, पुण्याहवाचन करून ब्राह्मणांना भोजन घातले. शुभ्र दंतपंक्ती असणाऱ्या राजकुमारीला मंगल स्नान घालून हातात लग्नकंकण बांधले. दोन नवीन वस्त्रे नेसविली आणि अंगावर उत्तमोत्तम अलंकार घातले. श्रेष्ठ ब्राह्मणांनी साम, ऋक् आणि यजुर्वेदातील मंत्रांनी तिच्यासाठी रक्षणकवच तयार केले. तसेच अथर्ववेदाच्या विद्वान पुरोहितांनी ग्रहशांतीसाठी हवन केले. शास्त्र जाणणाऱ्या राजाने सोने, चांदी, वस्त्रे, तिळगूळ आणि गाई ब्राह्मणांना दान दिल्या. (९-१३)

याचप्रकारे सेदिवरेश दमघोषानेसुद्धा आपला पुत्र शिशुपाल याचे मंत्रज्ञ ब्राह्मणांकडून विवाहा-संबंधीचे मंगलविधी करविले. त्यानंतर तो मदरस वाहात असणाऱ्या हत्तींचे दळ, सोन्याच्या हारांनी सजविलेले रथ, पायदळ आणि घोडेस्वारांची सेना बरोबर घेऊन कुंडिनपुरला जाऊन पोहोचला. विदर्भराज भीष्मकाने सामोरे जाऊन त्यांचे स्वागत करून प्रथेनुसार त्यांचे पूजन केले. त्यानंतर, अगोदरच त्यांच्यासाठी निश्चित केलेल्या ठिकाणी आनंदाने त्यांची निवासाची व्यवस्था केली. त्यांच्याबरोबर शिशुपालाचे शाल्व, जरासंध, दंतवक्त्र, विदूरथ, पौंड्रक इत्यादी हजारो मित्रराजे आले होते. ते सर्वजण राम-कृष्णांचे शत्रू होते आणि रुक्मिणी शिशुपालालाच मिळावी, ह्यासाठी आले होते. त्यांनी अगोदरच निश्चय केला होता की, श्रीकृष्ण बलरामादी यादवांना आपल्याबरोबर आणून कन्येचे हरण करण्याचा प्रयत्न करील, तर सर्वांनी मिळून त्यांच्याशी लढाई करायची. त्या राजांनी याचसाठी आपापली संपूर्ण सेना आणि वाहने बरोबर आणली होती.

(१४-१९)

शत्रुपक्षाच्या राजांच्या या तयारीची माहिती भगवान बलरामांना मिळाली आणि बंधू श्रीकृष्ण एकटाच राजकुमारीचे हरण करण्यासाठी गेला आहे, असेही जेव्हा त्यांनी ऐकले, तेव्हा त्यांना तेथे लढाई होण्याची दाट शंका आली. बंधुप्रेमामुळे त्यांचे हृदय भरून आले. त्यामुळे ते लगेच हत्ती, घोडे, रथ आणि पायदळ अशी चतुरंग सेना बरोबर घेऊन कुंडिनपुराकडे गेले. (२०-२१)

इकडे सुंदरी रुक्मिणी श्रीकृष्णांच्या आगमनाची प्रतीक्षा करीत होती. परंतु ब्राह्मणसुद्धा अजून परतला नाही, हे पाहून ती चिंतातुर झाली. ''अहो ! माझ्या अभागिनीच्या विवाहाला आता फक्त एक रात्र शिल्लक राहिली, परंतु कमलनयन भगवान अजूनही आले नाहीत, याचे कारण कळत नाही. एवढेच काय, माझा संदेश घेऊन गेलेला ब्राह्मणसुद्धा अजून परतला नाही. विशुद्धस्वरूप श्रीकृष्ण माझ्यामध्ये काही दोष दिसल्यामुळेच माझे पाणिग्रहण करण्याचे ठरवूनही खात्रीने येथे आले नसतील. मीच अभागिनी आहे. त्यामुळेच विधाता आणि भगवान शंकरसुद्धा मला अनुकूल नाहीत, असे दिसते. रुद्रपत्नी गिरिराजकुमारी सती पार्वती देवीही माझ्यावर प्रसन्न नसावी.'' जिचे मन भगवंतांनी हिरावून घेतले होते, त्यांचाच विचार करता करता, ''अजून वेळ आहे'' असे म्हणून तिने आपले अश्रूंनी भरलेले डोळे मिटून घेतले. परीक्षिता ! श्रीकृष्णांच्या आगमनाची अशा प्रकारे वाट पाहणाऱ्या रुक्मिणीची डावी मांडी, हात आणि डोळा फडफडू लागला. ही चिह्ने मनासारखे घडणार असल्याची सूचक होती. इतक्यात श्रीकृष्णांनी पाठविलेला तोच ब्राह्मण आला व त्याने राजकुमारीची अंत:पुरात भेट घेतली. ब्राह्मणाचा चेहरा प्रफुल्लित व निश्चिंत आहे, असे पाहून लक्षणांवरून कार्यसिद्धी ओळखून प्रसन्नतेने स्मित करीत तिने ब्राह्मणाला विचारले. ब्राह्मणाने सांगितले की, ''श्रीकृष्ण येथे आलेले असून त्यांनी तुम्हांला घेऊन जाण्याची सत्यप्रतिज्ञा केली आहे.'' ते आल्याचे कळताच रुक्मिणीचे हृदय आनंदाने भरून आले. त्याच्या मोबदल्यात त्याला देण्याजोगी कोणतीही गोष्ट न दिसल्याने तिने फक्त नमस्कार केला. (लक्ष्मीचा ब्राह्मणाला नमस्कार म्हणजे जगातील सर्व संपत्ती त्याला देणेच नव्हे का ?)

(२२-३१)

राम-कृष्ण आपल्या कन्येचा विवाह पाहाण्याच्या उत्सुकतेने आले आहेत, हे ऐकून भीष्मक मंगल वाद्ये वाजवीत, पूजेची सामग्री घेऊन, त्यांना सामोरा गेला. त्यानंतर मधुपर्क करून उत्तम वस्त्रे व उत्तमोत्तम भेटवस्तू देऊन विधिपूर्वक त्याने त्यांची पूजा केली. नंतर बुद्धिमान भीष्मकाने सेना व परिवारासह त्या दोघांची सर्व सामग्रींनी युक्त अशा

निवासस्थानात राहाण्याची व्यवस्था केली आणि त्यांचा यथोचित आदरसत्कार केला. भीष्मकाकडे जे राजे आले होते, त्या सर्वांचे पराक्रम, वय, शौर्य, धन इत्यादी पाहून त्यांच्या त्यांच्या योग्यतेनुसार त्यांना सर्व वस्तू देऊन त्याने त्यांचा मोठा सत्कार केला. श्रीकृष्ण येथे आले आहेत, असे विदर्भ देशाच्या नागरिकांनी जेव्हा ऐकले, तेव्हा ते भगवंतांच्या निवासस्थानी आले आणि त्यांनी आपल्या डोळ्यांच्या ओंजळींनी त्यांच्या मुखारविंदाच्या सौंदर्याचे आकंठ पान केले. ते आपापसात म्हणू लागले की, "रुक्मिणीच यांची पत्नी होण्यास योग्य आहे, दुसरी कोणी नव्हे आणि परमपवित्र असे हेच रुक्मिणीसाठी योग्य पती आहेत." आम्ही जर काही सत्कर्म केले असेल, तर त्रिलोकविधाता आमच्यावर प्रसन्न होवो आणि अशी कृपा करो की, श्रीकृष्णच रुक्मिणीचे पाणिग्रहण करो." (३२-३८)

रुक्मिणीबद्दलच्या प्रेमामुळे जेव्हा नागरिक आपापसात असे बोलत होते, त्याचवेळी रुक्मिणी अंत:पुरातून बाहेर येऊन सैनिकांच्या पहाऱ्यात देवीच्या मंदिराकडे जाण्यासाठी निघाली. श्रीकृष्णांच्या चरणकमलांचे मन:पूर्वक चिंतन करीत ती भवानीच्या चरणांचे दर्शन घेण्यासाठी पायीच निघाली. तिने मौन धारण केले होते आणि तिच्या माता व मैत्रिणी बरोबर होत्या. हातात शस्त्रास्त्रे घेतलेले शूर राजसैनिक, कवच अंगावर घालून, त्यांचे रक्षण करीत होते. त्यावेळी मृदंग, शंख, ढोल, तुताऱ्या आणि भेरी वाजत होत्या. (३९-४१)

पुष्कळशा ब्राह्मणपत्न्या, चंदन इत्यादी सुगंधी द्रव्ये लावून, गजरे घालून आणि वस्त्रालंकारांनी नटून थटून तिच्याबरोबर चालल्या होत्या. तसेच अनेक प्रकारचे नजराणे घेऊन हजारो वारांगना बरोबर चालल्या होत्या. गवई गात चालले होते, वाद्ये वाजविणारे वाद्ये वाजवीत चालले होते आणि सूत, मागध व भाट वधूच्या चारी बाजूंनी त्यांची स्तुती गात चालले होते. देवीच्या मंदिराजवळ पोहोचल्यावर रुक्मिणीने हात-पाय धुतले. आचमन केले. नंतर अंतर्बाह्य पवित्र होऊन शांत मनाने ती देवीजवळ जाऊन बसली. कर्मकांड जाणणाऱ्या वृद्ध ब्राह्मणस्त्रिया तिच्याबरोबर होत्या. त्यांनी रुक्मिणीला शिवपार्वतींना वंदन करावयास लावले. तेव्हा रुक्मिणीने देवीला प्रार्थना केली, "हे अंबिके ! तुझ्या स्कन्द व गणेश या पुत्रांसह मंगल करणाऱ्या तुला मी वारंवार नमस्कार करीत आहे. भगवान श्रीकृष्णच माझे पती व्हावेत, असा मला वर दे." नंतर तिने पाणी, गंध, अक्षता, धूप, वस्त्रे, फुलांच्या माळा, फुले, अलंकार, अनेक प्रकारचे नैवेद्य, भेटवस्तू आणि आरती इत्यादी सामग्रींनी अंबिकादेवीची पूजा केली. त्यानंतर तिने वरील सामग्रीने तसेच मीठ, अनरसे, विडे, मंगळसूत्र, फळे आणि ऊस यांनी सौभाग्यवती ब्राह्मण स्त्रियांचेसुद्धा पूजन केले. तेव्हा ब्राह्मणस्त्रियांनी तिला आशीर्वादपूर्वक प्रसादमाला दिली आणि वधूनेही ब्राह्मणस्त्रिया व माता अंबिकेला नमस्कार करून ती प्रसादमाला ग्रहण केली. नंतर मौन सोडून रत्नजडित अंगठीने शोभणाऱ्या हाताने एका दासीचा हात धरून ती मंदिराच्या बाहेर पडली. (४२-५०)

भगवंतांच्या मायेप्रमाणे, तीही वीरांना मोहित करणारी होती. तिचा कटिप्रदेश सुंदर होता. मुखावर कुंडलांचे तेज झगमगत होते. त्या कुमारीने कमरेवर रत्नांचा कमरपट्टा धारण केला होता. वक्ष:स्थळ काहीसे उभार होते आणि तिची दृष्टी केसांच्या बटांमुळे काहीशी चंचल होत होती. (५१)

तिच्या ओठांवर पवित्र हास्य होते. तिची दंतपंक्ती कुंदकळ्यांप्रमाणे शुभ्र होती, परंतु पिकलेल्या तोंडल्याप्रमाणे लाल असलेल्या ओठांच्या कांतीने

लालसर दिसत होती. तिच्या पायांत नूपुर चमकत होते आणि त्यांचा रुणझुण आवाज होत होता. ती जेव्हा पायीच राजहंसाच्या गतीने चालली होती, तेव्हा तिला पाहून तेथे आलेले, युद्धात कीर्ती मिळवलेले वीरही मोहित झाले. कामदेवाच्या बाणांनी जणू त्यांचे हृदय विदीर्ण करून टाकले होते. अशाप्रकारे चालण्याच्या निमित्ताने रुक्मिणी आपले सौंदर्य श्रीहरींना अर्पण करीत होती. तिला पाहून तसेच तिचे मनमोकळे हास्य आणि लाजरी नजर यांनी ज्यांचे चित्त ठिकाणावर राहिले नाही, त्या राजांच्या हातातून शस्त्रास्त्रे गळून पडली व ते स्वत:सुद्धा रथ, हत्ती तसेच घोड्यांवरून खाली जमिनीवर केव्हा पडले, त्यांना कळलेच नाही. अशा प्रकारे रुक्मिणी श्रीकृष्णांच्या प्राप्तीची प्रतीक्षा करीत, कमळाच्या कळीप्रमाणे असणारी पावले हळू हळू पुढे टाकीत होती. तिने आपल्या डाव्या हाताच्या बोटांनी केस बाजूला सारले आणि तिथे आलेल्या राजांकडे लज्जित नजरेने पाहिले. त्याचवेळी तिला श्रीकृष्णांचे दर्शन झाले. रथावर चढू पाहाणाऱ्या त्या राजकन्येला श्रीकृष्णांनी, सर्व शत्रू पाहात असतानाच, गरुडाचे चिह्न असलेल्या रथात बसविले आणि त्या राजांचा पराभव करून तिला नेले. यानंतर कोल्ह्यांच्या कळपातून सिंह ज्याप्रमाणे आपला भाग घेऊन जातो, त्याचप्रमाणे रुक्मिणीला घेऊन भगवान श्रीकृष्ण, बलराम इत्यादींसह तेथून निघून गेले. जरासंधाच्या पक्षाच्या अभिमानी राजांना त्यावेळी आपला हा केलेला मोठा पराभव आणि कीर्तीचा नाश सहन झाला नाही. ते म्हणू लागले- "अहो ! आम्हा धनुर्धरांच्या यशाचा धिक्कार असो ! या गवळ्यांच्या मुलांनी, सिंहाचा भाग हरिणांनी घेऊन जावा, त्याप्रमाणे आमचे यश हिरावून नेले." (५२-५७)

अध्याय त्रेपन्नावा समाप्त

अध्याय चौपन्नावा

शिशुपालाचे सहकारी राजे आणि रुक्मी यांचा पराभव व श्रीकृष्ण-रुक्मिणी विवाह

श्रीशुक म्हणतात - अशा प्रकारे क्रोधाविष्ट झालेले सर्व राजे अंगावर चिलखत घालून आपापल्या वाहनांवर स्वार झाले आणि धनुष्ये घेऊन, आपापल्या सेनेसह श्रीकृष्णांवर धावले. राजन ! यादवांच्या सेनापतींनी जेव्हा पाहिले की, शत्रू आपल्यावर चढाई करीत आहेत, तेव्हा त्यांनीसुद्धा आपापल्या धनुष्यांचा टणत्कार केला आणि तोंड फिरवून ते त्यांच्या समोर उभे राहिले. जरासंधाच्या सेनेतील काहीजण घोड्यांवर, काहीजण हत्तींवर तर काहीजण रथांत बसलेले होते. धनुर्विद्येत निष्णात असणारे ते यादवांवर बाणांचा असा वर्षाव करू लागले की, जसा ढगांनी डोंगरावर पाडलेला मुसळधार पाऊस. रुक्मिणीने आपल्या पतीची सेना बाणवर्षावाने आच्छादिली गेलेली पाहिली, तेव्हा लाजून, भयभीत नेत्रांनी, तिने भगवान श्रीकृष्णांच्या मुखाकडे पाहिले. भगवान हसून म्हणाले, "सुंदरी ! भिऊ नकोस ! तुझ्या सेनेकडून आत्ताच शत्रूच्या सेनेचा नाश होईल." इकडे गद, संकर्षण इत्यादी यदुवंशी वीरांना शत्रूचा पराक्रम सहन न होऊन त्यांनी शत्रूंचे हत्ती, घोडे व रथ यांच्यावर बाणांचा वर्षाव केला. त्यांच्या बाणांनी रथ, घोडे आणि हत्तींवर बसलेल्या शत्रुपक्षाच्या वीरांची कुंडले, किरीट व पगड्यांनी सुशोभित झालेली कोट्यवधी मस्तके, खड्ग, गदा आणि धनुष्ययुक्त हात, मनगटे, मांड्या तसेच पाय तुटून जमिनीवर पडू लागले. अशाच प्रकारे घोडे, खेचर, हत्ती, उंट, गाढवे आणि माणसांची मस्तकेसुद्धा

तुटून रणभूमीवर पडू लागली. शेवटी विजयाची अपेक्षा करणाऱ्या यादवांनी शत्रूच्या सेनेचा धुव्वा उडविला. जरासंध इत्यादी सर्व राजे युद्धाकडे पाठ फिरवून निघाले. (१-९)

आपल्या भावी पत्नीला पळविल्यामुळे दुःखी झालेल्या निस्तेज, निरुत्साही, तोंड वाळलेल्या शिशुपालाजवळ जाऊन त्याला ते म्हणाले. "हे पुरुषसिंहा ! ही उदासीनता सोडून दे; कारण हे राजन ! प्राण्यांच्या बाबतीत कोणतीही गोष्ट मनासारखीच होईल किंवा मनाविरुद्धच होईल याची खात्री देता येत नाही. कठपुतळी ज्याप्रमाणे सूत्रधाराच्या इच्छेनुसार नाचत असते, त्याचप्रमाणे हा जीवसुद्धा भगवंतांच्या इच्छेनुसारच सुख-दुःखासंबंधी प्रयत्न करीत असतो. तेवीस तेवीस अक्षौहिणी सेनेसह माझा श्रीकृष्णाने सतरा वेळा पराभव केला. मी मात्र एकदाच त्यांच्यावर विजय मिळविला. तरीसुद्धा या घटनेबद्दल मी कधी शोक करीत नाही की आनंदित होत नाही. कारण मला हे माहीत आहे की, प्रारब्धानुसार कालच या जगाला नाचवीत असतो. आम्ही सर्वजण मोठमोठ्या वीर सेनापतींचे सुद्धा अधिपती असून श्रीकृष्णाच्या आधिपत्याखाली असलेल्या यादवांनी थोड्याशा सेनेनिशीच आमचा पराजय केला. यावेळी शत्रूंचा विजय झाला, कारण काल त्यांना अनुकूल होता. जेव्हा तो आम्हांला अनुकूल होईल, तेव्हा आम्हीसुद्धा त्यांना जिंकू." जेव्हा मित्रांनी त्याला अशाप्रकारे समजावले, तेव्हा तो आपल्या अनुयायांसह आपल्या राजधानीला परत गेला आणि त्याचे वाचलेले मित्रराजेसुद्धा आपापल्या नगरांकडे गेले.(१०-१७)

पण कृष्णद्वेष्ट्या रुक्मीला मात्र बहिणीचा श्रीकृष्णांशी राक्षसविवाह सहन झाला नाही. त्यामुळे बलवान रुक्मीने एक अक्षौहिणी सेनेसह श्रीकृष्णांचा पाठलाग केला. महाबाहू रुक्मी खवळला. कवच अंगात घालून आणि धनुष्य घेऊन त्याने सर्व राजांच्या समोर प्रतिज्ञा केली. "आपणा सर्वांसमक्ष मी प्रतिज्ञा करतो की, जर युद्धात श्रीकृष्णाला मारून मी रुक्मिणीला परत आणले नाही, तर कुंडिनपुरात प्रवेश करणार नाही." असे म्हणून तो रथावर आरूढ झाला आणि सारथ्याला म्हणाला, "जेथे कृष्ण असेल, तेथे घोड्यांना ताबडतोब पिटाळ. आज मला त्याच्याबरोबर युद्ध करायचे आहे. आज मी माझ्या तीक्ष्ण बाणांनी त्या दुष्ट गवळ्याच्या शौर्याचा गर्व धुळीला मिळवीन. कारण माझ्या बहिणीला तो बळजबरीने घेऊन गेला आहे." भगवंतांचा प्रभाव न ओळखणारा तो मूर्ख अशी बडबड करीत फक्त एकच रथ घेऊन श्रीकृष्णांना "थांब ! थांब !" म्हणून आह्वान देऊ लागला. त्याने धनुष्याची दोरी ताकदीने ओढून श्रीकृष्णांना तीन बाण मारले आणि तो म्हणाला, "यदूंच्या कुलकलंका ! जरा थांब. कावळ्याने हविर्द्रव्य पळवावे, त्याप्रमाणे तू माझ्या बहिणीची चोरी करून कुठे पळून चाललास ? अरे मूर्खा ! तू मायावी आणि कपटयुद्धात कुशल आहेस. आज मी तुझा गर्व पार धुळीला मिळवतो. माझे बाण जोपर्यंत तुला जमिनीवर आडवे करीत नाहीत, तोवरच या मुलीला सोडून दे." तेव्हा श्रीकृष्णांनी किंचित हसून त्याचे धनुष्य तोडून टाकले आणि त्याच्यावर सहा बाण सोडले. तसेच त्याच्या चार घोड्यांवर आठ बाण आणि सारथ्यावर दोन बाण सोडले. शिवाय तीन बाणांनी ध्वज तोडून टाकला. तेव्हा रुक्मीने दुसरे धनुष्य घेऊन श्रीकृष्णांवर पाच बाण सोडले. ते बाण लागल्यावर त्यांनी त्याचे तेही धनुष्य तोडून टाकले. नंतर रुक्मीने आणखी एक धनुष्य घेतले, परंतु अच्युतांनी तेही तोडून टाकले. रुक्मीने परिघ, पट्टिश, शूल, ढाल, तलवार, शक्ती, तोमर इत्यादी जी जी शस्त्रास्त्रे हातात घेतली, ती ती सर्व भगवंतांनी तोडून टाकली. तेव्हा संतापून रुक्मीने हातात तलवार घेऊन श्रीकृष्णांना मारण्याच्या

हेतूने रथातून खाली उडी टाकली आणि पतंग जसा दिव्यावर झेप घेतो, त्याप्रमाणे त्याने त्यांच्यावर झेप घेतली. रुक्मी चाल करून येत असलेला पाहून श्रीकृष्णांनी आपल्या बाणांनी त्याच्या ढाल-तलवारीचे तुकडे तुकडे केले आणि त्याला मारण्यासाठी म्हणून तीक्ष्ण तलवार हातात घेतली. आपले पती भावाला मारू पाहात आहेत, हे पाहून रुक्मिणी भीतीने व्याकूळ झाली आणि पतींच्या चरणांवर लोटांगण घालून काकुळतीने म्हणाली. "हे देवदेवा ! हे जगत्पते ! हे योगेश्वरा ! आपले स्वरूप कोणी जाणू शकत नाही. हे महापराक्रमी ! हे कल्याणस्वरूप ! आपण माझ्या भावाला मारू नये." (१८-३३)

श्रीशुक म्हणतात- रुक्मिणी भीतीने थरथर कापत होती. शोकामुळे तिचा चेहरा सुकला होता, गळा दाटून आला होता. भीतीमुळे सोन्याचा हार तिच्या गळ्यातून खाली पडला होता. अशा अवस्थेत तिने भगवंतांचे चरण पकडले. तेव्हा भगवंतांचे हृदय करुणेने द्रवले आणि त्यांनी रुक्मीला मारण्याचा विचार सोडून दिला. तरीसुद्धा मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या त्याला श्रीकृष्णांनी दुपट्ट्याने बांधून व त्याच्या दाढी-मिशांचे पाट काढून त्याला विद्रूप केले. तोपर्यंत यदुवीरांनी शत्रूच्या अद्भुत सेनेला हत्ती जसे कमळांचे ताटवे चुरगळून टाकतो, त्याप्रमाणे छिन्नविच्छिन्न करून टाकले. नंतर ते लोक तेथून माघारी फिरून श्रीकृष्णांच्याजवळ आले आणि पाहातात तर दुपट्ट्याने बांधलेला रुक्मी अर्धमेल्या अवस्थेत पडला आहे. त्याला पाहून भगवान बलरामांना त्याची दया आली आणि त्यांनी त्याला मोकळे केले. नंतर ते श्रीकृष्णांना म्हणाले, "हे कृष्णा ! तू हे चांगले केले नाहीस. असे करणे आम्हांला शोभत नाही. आपल्या नातलगाच्या दाढी-मिशा छाटून त्याला कुरूप करणे, हा तर एक प्रकारे त्याचा वधच होय." त्यानंतर रुक्मिणीला उद्देशून ते म्हणाले- "हे पतिव्रते ! तुझ्या भावाला विद्रूप केले, म्हणून आमच्यावर तू रागावू नकोस. कारण जीवाला सुख-दुःख देणारा दुसरा-तिसरा कोणी नसून त्याला स्वतःच्याच कर्माचे फळ भोगावे लागते." नंतर श्रीकृष्णाला म्हणाले - "कृष्णा ! आपल्या नातेवाईकाने वध करण्यायोग्य अपराध केला, तरीसुद्धा आपल्याकडून त्याचा वध होणे योग्य नाही. त्याला सोडून दिले पाहिजे. स्वतःच्या अपराधामुळे तो अगोदरच मेल्यासारखा झालेला असतो. मेलेल्याला पुन्हा काय मारणार ?" पुन्हा रुक्मिणीला म्हणाले - "हे पतिव्रते ! ब्रह्मदेवांनी क्षत्रियांचा धर्मच असा केला आहे की, भावानेसुद्धा आपल्या भावाला मारावे. म्हणून हा क्षात्रधर्म अत्यंत कठोर आहे." नंतर श्रीकृष्णांना म्हणाले - "जे अभिमानी लोक संपत्तीच्या गर्वाने आंधळे झालेले असतात, ते राज्य, पृथ्वी, पैसा, स्त्री, मान, तेज किंवा अन्य कोणत्याही कारणाने आपल्या बांधवांचासुद्धा तिरस्कार करतात." (३४-४१)

पुन्हा ते रुक्मिणीला म्हणाले- "तुझा भाऊ सर्व प्राण्यांचा द्वेष करणारा आहे. त्याच्या कल्याणासाठीच आम्ही हा दंड त्याला दिला आहे; त्याला तू अज्ञानी लोकांप्रमाणे अनुचित मानीत असलीस, तर हा तुझ्या बुद्धीचा दोष आहे. हे देवी ! जे लोक भगवंतांच्या मायेने मोहित होऊन देहालाच आत्मा मानतात, त्यांनाच हा आपला मित्र, हा शत्रू आणि हा त्रयस्थ असा मोह होतो. देह धारण करणाऱ्या सर्वांचा मायातीत आत्मा एकच आहे. पाणी, घडा या उपाधिभेदाने जसे सूर्य, चंद्र इत्यादी आणि आकाश एकच असून अनेक वाटतात, त्याचप्रमाणे मूर्ख लोक शरीरभेदाने आत्मा भिन्न आहे, असे मानतात. या शरीराला उत्पत्ती आणि नाश आहे. पंचमहाभूते, पंचप्राण, तन्मात्रा आणि त्रिगुण हे याचे स्वरूप आहे. देहाची अज्ञानामुळेच आत्म्याच्या ठिकाणी कल्पना केली गेलेली आहे आणि या कल्पनेनेच प्राणी जन्म-मृत्यूच्या फेऱ्यात अडकतो. हे साध्वी ! डोळे आणि रूप ही दोन्हीही

सूर्यामुळे प्रकाशित होतात. सूर्य हेच त्यांचे कारण आहे. म्हणून सूर्यापासून डोळे आणि रूपाचा कधी वियोग होत नाही की संयोग होत नाही. त्याचप्रमाणे सर्व जगाची सत्ता आत्मसत्तेमुळे प्रत्ययास येते, सर्व जगाचा प्रकाशक आत्माच आहे. तर मग आत्म्याशी दुसऱ्या असत पदार्थांचा संयोग किंवा वियोग कसा होऊ शकेल ? जन्म घेणे, असणे, वाढणे, बदलणे, क्षीण होणे आणि मरणे हे सर्व विकार शरीराचेच असतात; आत्म्याचे नव्हेत. जसे कृष्णपक्षामध्ये कलांचा क्षय होतो, चंद्राचा नाही; परंतु अमावास्येच्या दिवशी लोक व्यवहारात चंद्राचाच क्षय झाला असे म्हणतात. त्याचप्रमाणे जन्म-मृत्यू इत्यादी सर्व विकार शरीराचेच असतात. परंतु भ्रमाने लोक त्याला आत्म्याचेच समजतात. जसा झोपलेला मनुष्य स्वप्नात कोणताही पदार्थ अस्तित्वात नसतानाही, भोगणारा, भोगली जाणारी वस्तू आणि भोगरूप फळांचा अनुभव घेतो. त्याचप्रमाणे अज्ञानी लोक खोट्या प्रपंचाचा खरा समजून अनुभव घेतात. म्हणून हे सुहास्यवदने ! अज्ञानामुळे होणाऱ्या या शोकाचा त्याग कर. हा शोक अंत:करणाला उदास करतो, मोहित करतो. म्हणून तत्त्वज्ञानाने याला पूर्णपणे सोडून देऊन तू आपल्या स्वरूपात स्थिर हो.'' (४२-४९)

श्रीशुक म्हणतात - बलरामांनी जेव्हा रुक्मिणीची अशी समजूत घातली, तेव्हा रुक्मिणीने मनातील कटुता काढून टाकून विवेकबुद्धीने मनाचे समाधान केले. शत्रूंनी ज्याचे सैन्य आणि तेज नाहीसे केले होते, त्या रुक्मीचे फक्त प्राणच वाचले होते. त्याचे मनोरथ धुळीला मिळाले. आपल्याला विद्रूप केले गेले, ही आठवण तो विसरू शकत नव्हता. म्हणून त्याने आपल्याला राहाण्यासाठी भोजकट नावाची एक मोठी नगरी वसविली. त्याने अगोदरच प्रतिज्ञा केली होती की, ''दुर्बुद्धी कृष्णाला मारल्याशिवाय आणि आपल्या धाकट्या बहिणीला परत आणल्याशिवाय आपण कुंडिनपुरात प्रवेश करणार नाही.'' म्हणून रागाने तो तेथेच राहू लागला. (५०-५२)

परीक्षिता ! अशा प्रकारे भगवान श्रीकृष्णांनी सर्व राजांना जिंकून रुक्मिणीला द्वारकेमध्ये आणून विधिपूर्वक तिचे पाणिग्रहण केले. हे राजन ! द्वारकेतील लोकांना यदुपती श्रीकृष्णांबद्दल अनन्य प्रेम होते. त्यामुळे तेथे घरोघर मोठा उत्सव साजरा केला जाऊ लागला. तेथील आनंदित झालेल्या स्त्री-पुरुषांनी रत्नांची चमकणारी कुंडले घातली होती. त्यांनी सुंदर पोषाख परिधान केलेल्या वधू-वरांना अनेक नजराणे अहेर म्हणून दिले. त्यावेळी द्वारकेत कोठे कोठे ध्वज उंच ठिकाणी फडकत होते. ठिकठिकाणी रंगीबेरंगी माळा, वस्त्रे आणि रत्नांची तोरणे बांधलेली होती. घरांच्या दारांवर मंगल वस्तू लावल्या होत्या. पाण्याने भरलेल्या कलशांनी, अगुरू आणि धुपाच्या सुगंधाने व दीपमाळांमुळे ती नगरी विलक्षण शोभून दिसत होती. अत्यंत जिवलग राजांना आमंत्रित केले होते. त्यांच्या उन्मत्त हत्तींच्या मदाच्या झिरपण्याने द्वारकेतील सडका भिजल्या होत्या. प्रत्येक दरवाजावर केळीचे खांब आणि सुपारीची झाडे लावलेली असल्याने ती नगरी विलक्षण सुंदर दिसत होती. त्या उत्सवात इकडे तिकडे घाईघाईने धावणाऱ्या कुरू, सृंजय, कैकेय, विदर्भ, यदू आणि कुंती या वंशांचे लोक एकमेकांसमवेत आनंदोत्सव साजरा करीत होते. जिकडे तिकडे रुक्मिणीहरणाचा प्रसंग ऐकून व त्याचेच गुणगान ऐकून राजे आणि राजकन्या अत्यंत आश्चर्यचकित झाल्या. महाराज ! रुक्मिणीरूपी लक्ष्मीला साक्षात लक्ष्मीपती भगवान श्रीकृष्णांच्या बरोबर पाहून द्वारकावासी स्त्री-पुरुषांना अत्यंत आनंद झाला. (५३-६०)

अध्याय चौपन्नावा समाप्त

अध्याय पंचावन्नावा

प्रद्युम्नाचा जन्म आणि शंबरासुराचा वध

श्रीशुक म्हणतात- वासुदेवांचा अंश असणाऱ्या कामदेवाला शिवांच्या क्रोधाग्नीने पूर्वी जाळून टाकले होते. आता पुन्हा शरीर धारण करण्यासाठी त्याने वासुदेवांचाच आश्रय घेतला. तोच काम यावेळी श्रीकृष्णांपासून रुक्मिणीच्या ठिकाणी उत्पन्न झाला. तो प्रद्युम्न नावाने प्रसिद्ध झाला. तो कोणत्याही बाबतीत पित्यापेक्षा कमी नव्हता. प्रद्युम्नाला अजून दहा दिवससुद्धा झाले नव्हते, तेवढ्यात, तो आपला शत्रू आहे, हे जाणून इच्छेनुसार रूप घेणारा शंबरासुर त्याला पळवून घेऊन गेला आणि त्याला समुद्रात फेकून देऊन आपल्या घरी परतला. प्रद्युम्नाला समुद्रात एका मोठ्या माशाने गिळून टाकले. एकदा कोळ्यांनी मोठ्या जाळ्यात इतर माशांसह या माशालाही पकडले. त्यांनी तो मासा शंबरासुराला भेट म्हणून दिला. शंबरासुराच्या आचाऱ्यांनी तो अद्भुत मासा पाकगृहात नेऊन कुऱ्हाडीने तोडला. आचाऱ्यांनी माशाच्या पोटात बालक पाहून ते शंबरासुराची दासी मायावतीकडे सोपविले. तिच्या मनात शंका उत्पन्न झाली. तेव्हा नारदांनी येऊन तिला त्या मुलाचे मूळ स्वरूप, उत्पत्ती, माशाच्या पोटात जाणे इत्यादी सर्व सविस्तर सांगितले. ती मायावती म्हणजे कामदेवाची कीर्तिमती पत्नी रतीच होती. ज्या दिवशी शंकरांच्या क्रोधाग्नीने कामदेवाचे शरीर भस्म झाले, त्या दिवसापासून ती त्याचा देह पुन्हा उत्पन्न होण्याची वाट पाहात होती. त्याच रतीला शंबरासुराने आपल्या घरी स्वयंपाक करण्यासाठी नेमले होते. तिला ते मूल म्हणजे कामदेव आहेत असे कळले, तेव्हा ती त्याच्यावर अतिशय प्रेम करू लागली. तो कृष्णकुमार थोड्याच दिवसात तरुण झाला. जेव्हा स्त्रिया त्याच्याकडे पाहात, तेव्हा त्यांच्या मनात प्रेमभाव उद्दीपित होत असे. (१-९)

हे राजा ! कमलदलाप्रमाणे विशाल नेत्र, गुडघ्यापर्यंत लांब हात आणि मनुष्यलोकात सर्वांत सुंदर शरीर असणाऱ्या त्याच्याकडे लज्जापूर्ण हास्ययुक्त भ्रूविलासाने रती पाहात असे आणि प्रेमाने स्त्री-पुरुषसंबंधी भाव व्यक्त करीत त्याची सेवा करीत असे. श्रीकृष्णनंदन प्रद्युम्नाने तिला म्हटले, "आई ! तुझी बुद्धी अशी कशी बदलली ? तू आईची माया टाकून माझ्याशी कामिनीप्रमाणे वागत आहेस." (१०-११)

रती म्हणाली- "हे प्रभो ! आपण स्वत: भगवान नारायणांचे पुत्र आहात. आपल्याला त्यांच्या घरातून शंबरासुराने पळवून आणले होते. आपण माझे पती कामदेव आहात आणि मी आपली धर्मपत्नी रती आहे. हे स्वामी ! आपण पुरते दहा दिवसांचेसुद्धा नव्हतात, तेव्हा या शंबरासुराने आपल्याला समुद्रात फेकून दिले होते. तेथे एका माशाने आपणांस गिळले आणि त्याच्याच पोटातून आपण येथे आला आहात. हा शंबरासुर शेकडो प्रकारच्या माया जाणतो. त्याला वश करून घेणे किंवा जिंकणे अत्यंत कठीण आहे. आपण आपल्या या शत्रूला मोहन इत्यादी मायांच्याद्वारे नष्ट करा. हे स्वामी ! आपला मुलगा (म्हणजे आपण) हरवल्यामुळे आपली माता पुत्रस्नेहाने व्याकूळ झाली आहे. पिल्लू हरवलेल्या टिटवीसारखी किंवा वासरू हरवलेल्या गायीसारखी दीनवाणी होऊन ती रात्रंदिवस शोक करीत आहे." असे सांगून मायावतीने महात्म्या प्रद्युम्नाला महामाया नावाची सर्व प्रकारच्या माया नष्ट करणारी विद्या दिली. तेव्हा प्रद्युम्न शंबरासुराकडे जाऊन त्याच्यावर असे असह्य आरोप करू लागला की, त्यामुळे त्याने भांडण काढावे. त्यानंतर त्याने त्याला युद्धासाठी आव्हान दिले. (१२-१७)

प्रद्युम्नाच्या कठोर बोलण्याने शंबरासुर पायाने

डिवचलेल्या सापासारखा चिडला. त्याचे डोळे क्रोधाने लाल झाले. हातामध्ये गदा घेऊन तो बाहेर आला. त्याने आपली गदा वेगाने फिरवून प्रद्युम्नावर फेकली आणि विजेच्या कडकडाटासारखी गर्जना केली. (१८-१९)

परीक्षिता ! भगवान प्रद्युम्नाने आपल्यावर येणारी त्याची गदा आपल्या गदेच्या तडाख्याने तटवून अत्यंत क्रोधाने त्याच्यावर आपली गदा फेकली. तेव्हा त्या दैत्याने मयासुराने दिलेल्या आसुरी मायेचा आश्रय घेतला व आकाशात जाऊन तेथूनच प्रद्युम्नावर तो अस्त्रांचा वर्षाव करू लागला. महारथी प्रद्युम्न त्या अस्त्रांच्या वर्षावाने व्यथित झाला, तेव्हा त्याने सर्व मायांचा नायनाट करणाऱ्या सत्त्वमय महाविद्येचा प्रयोग केला. त्यानंतर शंबरासुराने यक्ष, गंधर्व, पिशाच, नाग आणि राक्षसांच्या शेकडो मायांचा त्याच्यावर प्रयोग केला, परंतु कृष्णकुमाराने त्या सर्वांचा नाश केला. त्यानंतर त्याने एक तीक्ष्ण तलवार हातात घेऊन वेगाने शंबरासुराचे किरीट-कुंडलांनी सुशोभित आणि लाल दाढी-मिशा असलेले डोके धडापासून वेगळे केले. देव फुलांचा वर्षाव करीत स्तुती करू लागले. त्यानंतर आकाशातून फिरू शकणाऱ्या मायावतीने त्याला आकाशमार्गाने द्वारकेत नेले. (२०-२५)

परीक्षिता ! विजेसह असणाऱ्या मेघाप्रमाणे दिसणाऱ्या प्रद्युम्नाने आकाशातून शेकडो रमणी निवास करीत असलेल्या उत्तम अंत:पुरात पत्नीसह प्रवेश केला. प्रद्युम्नाचे शरीर पावसाळ्यातील मेघाप्रमाणे श्यामवर्ण होते. त्याने रेशमी पीतांबर परिधान केला होता. गुडघ्यापर्यंत पोहोचणारे त्याचे हात लांब होते. नेत्र लालसर होते. सुंदर मुखमंडलावर मंद हास्य तरळत होते. त्याच्या मुखकमलावर काळे कुरळे केस भ्रमरांसारखे झेपावत होते. अशा त्याला पाहाताच त्या सगळ्याजणी त्याला श्रीकृष्ण समजून संकोचाने इकडे तिकडे लपून राहिल्या. नंतर हळू हळू त्या स्त्रियांना समजले की, हे श्रीकृष्ण नाहीत; कारण त्यांच्यापेक्षा याच्यामध्ये काहीतरी वेगळेपण आहे. तेव्हा त्या चकित होऊन अत्यंत आनंदाने या सुंदर दांपत्याकडे आल्या. त्याचवेळी डोळ्यांच्या कडा काळसर असलेली, मधुरभाषिणी रुक्मिणी तेथे आली. तिला आपल्या हरवलेल्या मुलाची आठवण झाली आणि पुत्रप्रेमाने तिच्या स्तनांतून दूध स्रवू लागले. (२६-३०)

रुक्मिणी विचार करू लागली, "हे नररत्न कोण आहे ? हा कमलासारखे डोळे असलेला पुत्र कोणाचा आहे ? कोणत्या भाग्यवान स्त्रीने याला आपल्या गर्भामध्ये धारण केले असेल ? याला ही कोण पत्नी म्हणून मिळाली आहे ? माझासुद्धा लहान मुलगा हरवला होता. त्याला सूतिका गृहातूनच पळवले होते. तो जर कुठे जिवंत असेल, तर त्याचे वय आणि रूप याच्यासारखेच असेल. याला श्यामसुंदरांसारखे रूप, अंगाची ठेवण, चालणे, आवाज, हास्य, पाहाणे हे सारे कोठून प्राप्त झाले ? किंवा हाच तो मुलगा असेल का, ज्याला मी गर्भामध्ये धारण केले होते. कारण मला याच्याबद्दल खूपच प्रेम वाटत आहे आणि माझा डावा हातसुद्धा लवत आहे." (३१-३४)

रुक्मिणी असा विचार करीत होती, त्याचवेळी पवित्रकीर्ती श्रीकृष्ण देवकी-वसुदेवांसह तेथे आले. श्रीकृष्णांना सर्व काही माहीत होते, परंतु ते काही बोलले नाहीत. इतक्यात तेथे येऊन नारदांनी शंबरासुराने प्रद्युम्नाचे हरण करण्यापासूनची सर्व हकीकत सांगितली. नारदांच्या तोंडून या सर्व आश्चर्यकारक घटना ऐकून श्रीकृष्णांच्या अंत:पुरातील स्त्रिया आश्चर्यचकित झाल्या आणि पुष्कळ वर्षेपर्यंत हरवल्यानंतर परत आलेल्या प्रद्युम्नाचे, मेल्यानंतर पुन्हा जिवंत होऊन आल्याप्रमाणे कौतुक करू लागल्या. देवकी, वसुदेव, श्रीकृष्ण, बलराम, रुक्मिणी आणि इतर स्त्रिया त्या नवदांपत्याला

हृदयाशी घट्ट धरून आनंदित झाल्या. द्वारकेतील लोकांना जेव्हा हे समजले की, हरवलेला प्रद्युम्न परत आला आहे, तेव्हा ते आपापसात म्हणू लागले- 'अहो ! ही किती भाग्याची गोष्ट आहे की, हा मुलगा जणू मरून परत जिवंत होऊन आला.' प्रद्युम्न सर्व बाबतीत वडिलांच्या सारखाच असल्यामुळे त्याला पाहून त्याच्या मातांनासुद्धा तो पतीच वाटत असे व त्यांच्या मनात मधुर भाव उत्पन्न होई, यात काही आश्चर्य नाही. कारण प्रद्युम्न हा मुळात स्मरण होताच मन चंचल करणारा काम होता. त्यात तो त्रिभुवनसुंदर श्रीकृष्णांचे प्रतिबिंब होता. तो समोर दिसल्यावर असे होणे स्वाभाविकच होते. तर मग त्यांना पाहून अन्य स्त्रियांची अवस्था काय होईल, हे काय सांगावयास पाहिजे ? (३५-४०)

अध्याय पंचावन्नावा समाप्त

अध्याय छप्पन्नावा

स्यमंतक मण्याची कथा, जांबवती आणि सत्यभामा ह्यांच्याशी श्रीकृष्णांचा विवाह

श्रीशुक म्हणतात - सत्राजिताने श्रीकृष्णावर खोटाच आळ घेतला होता; त्या अपराधाचे परिमार्जन करण्यासाठी त्याने स्वत: स्यमंतकमण्यासह आपली कन्या श्रीकृष्णांना दिली. (१)

राजाने विचारले - ब्रह्मन ! सत्राजिताने श्रीकृष्णांचा कोणता अपराध केला होता ? त्याला स्यमंतकमणी कोठून मिळाला होता ? आणि त्याने आपली कन्या त्यांना का दिली ? (२)

श्रीशुक म्हणाले- भक्त असलेल्या सत्राजिताचा सूर्य हा परम मित्र होता. त्याच्या भक्तीने प्रसन्न होऊन सूर्याने त्याला स्यमंतकमणी दिला होता. तो मणी गळ्यात घातला असता सत्राजित सूर्यासारखा चमकू लागला. परीक्षिता ! सत्राजित द्वारकेत आला, तेव्हा मण्याच्या अत्यंत तेजामुळे लोक त्याला ओळखू शकले नाहीत. त्याला लांबूनच पाहून त्याच्या तेजाने लोकांचे डोळे दिपून गेले. लोकांना तो सूर्यच वाटला. द्यूत खेळत असलेल्या भगवंतांना त्यांनी जाऊन ही गोष्ट सांगितली. लोक म्हणाले, "हे शंख - चक्रगदाधारी नारायणा ! कमलनयन दामोदरा ! यदुनंदन गोविंदा ! आपणांस नमस्कार असो. हे जगदीश्वरा ! आपल्या चमकणाऱ्या किरणांनी लोकांचे डोळे दिपवीत हा प्रखरकिरण सूर्य आपल्या दर्शनासाठी येत आहे. प्रभो ! सर्व श्रेष्ठ देव त्रैलोक्यामध्ये आपल्याला प्राप्त करण्याचा मार्ग शोधीत असतात. परंतु आपण यदुवंशात गुप्तपणे राहिला आहात, हे जाणून आज स्वत: सूर्यनारायण आपल्या दर्शनासाठी येत आहे." (३-८)

श्रीशुक म्हणतात- अज्ञानी लोकांचे हे बोलणे ऐकून कमलनयन भगवान श्रीकृष्ण हसून म्हणाले, "अहो ! हे सूर्यदेव नाहीत. हा मण्यामुळे चमकणारा सत्राजित आहे." यानंतर सत्राजित आपल्या मंगल उत्सव चालू असलेल्या समृद्ध घरामध्ये आला. ब्राह्मणांकरवी त्याने तो मणी देवघरात स्थापन केला. परीक्षिता ! तो मणी दररोज आठ भार सोने देत असे. आणि जेथे त्याचे पूजन होत असे, तेथे दुर्भिक्ष, महामारी, ग्रहपीडा, सर्पभय, मानसिक आणि शारीरिक व्यथा तसेच निरनिराळ्या मायांचा उपद्रव इत्यादी काहीही अशुभ घडत नसे. एकदा प्रसंगवशात श्रीकृष्ण त्याला म्हणाले, "सत्राजिता ! तू तुझ्याजवळचा मणी राजा उग्रसेन

यांना दे.'' परंतु तो लोभी असल्यामुळे त्याने तो मणी दिला नाही. यामुळे भगवंतांच्या आज्ञेचे उल्लंघन होईल, याचा विचारही त्याच्या मनात आला नाही. एके दिवशी सत्राजिताचा भाऊ प्रसेन याने तो अतिशय प्रकाशमान मणी आपल्या गळ्यात घातला आणि घोड्यावर स्वार होऊन तो शिकारीसाठी वनात गेला. तेथे एका सिंहाने घोड्यासह प्रसेनाला मारून तो मणी काढून घेतला. तो आता पर्वतात शिरणार इतक्यात जांबवानाने त्या मण्यासाठी त्याला मारले. तो मणी आपल्या गुहेमध्ये नेऊन त्याने तो मुलाला खेळावयास दिला. आपला भाऊ परत न आल्याचे पाहून सत्राजिताला अतिशय दुःख झाले. ''गळ्यात मणी घालून वनात गेलेल्या माझ्या भावाला श्रीकृष्णानेच मारले असावे.'' सत्राजिताचे हे म्हणणे ऐकून लोकही आपापसात तेच कुजबुजू लागले. श्रीकृष्णांनी जेव्हा हे ऐकले, तेव्हा आपल्याला लागलेला हा कलंक पुसून टाकण्यासाठी, ते नगरातील काही पुरुषांना बरोबर घेऊन प्रसेनाला शोधण्यासाठी वनात गेले. तेथे शोध घेत असता लोकांना दिसले की, जंगलामध्ये सिंहाने प्रसेन आणि त्याच्या घोड्याला मारले आहे. आणि पुढे जाऊन पाहातात, तर पर्वतावर एका अस्वलाने सिंहालाही मारून टाकले आहे. (९-१८)

भगवान श्रीकृष्णांनी सर्वांना बाहेरच बसवून आपण एकट्यानेच त्या घोर अंधकाराने भरलेल्या अस्वलाच्या भयंकर गुहेत प्रवेश केला. मुलाला खेळण्यासाठी दिलेला तो मौल्यवान मणी पाहून त्याच्याकडून काढून घेण्याच्या उद्देशाने ते मुलाजवळ जाऊन उभे राहिले. त्या गुहेत एका अपरिचित माणसाला आल्याचे पाहून मुलाची दाई घाबरून ओरडू लागली. ते ऐकून महाबलवान ऋक्षराज जांबवान रागावून तेथे धावत आला. परीक्षिता ! जांबवानाला तो सामान्य मनुष्य वाटल्यामुळे त्याचा राग आला. त्याचे सामर्थ्य त्याला माहीत नव्हते. त्यामुळे तो आपल्या स्वामींशीच युद्ध करू लागला. मांसाच्या तुकड्यासाठी ज्याप्रमाणे दोन ससाणे आपापसात लढतात, त्याचप्रमाणे विजयाच्या इच्छेने श्रीकृष्ण आणि जांबवान आपापसात घनघोर युद्ध करू लागले. अगोदर शस्त्रांनी, नंतर मोठमोठ्या दगडांनी, नंतर झाडांनी आणि शेवटी बाहूंनी ते युद्ध करू लागले. वज्रप्रहाराप्रमाणे कठोर ठोसे एकमेकांना मारीत ते दोघे अठ्ठावीस दिवसपर्यंत विश्रांती न घेता, रात्रंदिवस लढत होते. शेवटी श्रीकृष्णांच्या ठोशांमुळे जांबवानाची हाडे खिळखिळी झाली. त्याचा उत्साह मावळला. शरीर घामाने डबडबले. तेव्हा त्याने अत्यंत आश्चर्यचकित होऊन भगवान श्रीकृष्णांना म्हटले. ''हे प्रभो ! मी आता जाणले की, आपणच सर्व प्राण्यांचे स्वामी, रक्षणकर्ते, पुराणपुरुष भगवान विष्णू आहात. आपणच सर्वांचे प्राण, इंद्रियबल, मनोबल आणि शरीरबल आहात. विश्वाची उत्पत्ती करणाऱ्यांचीही उत्पत्ती करणारे आपणच आहात. उत्पन्न केलेल्या पदार्थांमध्ये सुद्धा सत्तारूपाने आपणच विराजमान आहात. काळाचे जितके म्हणून अवयव आहेत, त्या सर्वांचे नियमन करणारे काळ आपणच आहात आणि शरीरभेदामुळे वेगवेगळे भासणाऱ्या अंतरात्म्यांचे परम आत्मासुद्धा आपणच आहात. हे प्रभो ! जेव्हा आपण जरासे रागावून क्रुद्ध नजरेने समुद्राकडे पाहिले होते, त्यावेळी समुद्रात राहाणाऱ्या मोठमोठ्या सुसरी व मासे घाबरले आणि समुद्राने आपल्याला वाट करून दिली. तेव्हा आपण त्याच्यावर आपल्या कीर्तीचाच पूल बांधला. लंका जाळली आणि राक्षसांची मस्तके आपल्या बाणांनी छिन्नविच्छिन्न करून जमिनीवर पाडली. तेच माझे श्रीराम आपण असून आज श्रीकृष्णांच्या रूपाने येथे आला आहात.'' परीक्षिता ! जेव्हा ऋक्षराज जांबवानाने भगवंतांना ओळखले, तेव्हा कमलनयन भगवान श्रीकृष्णांनी आपला कल्याणकारी हात त्याच्या शरीरावरून फिरविला आणि नंतर

परम कृपेने, प्रेमपूर्ण गंभीर वाणीने, आपल्या त्या भक्त जांबवानाला म्हटले. "ऋक्षराज ! आम्ही मण्यासाठी तुझ्या या गुहेत आलो आहोत. या मण्यामुळे माझ्यावर आलेला खोटा आळ मी पुसून टाकू इच्छितो." भगवंतांनी असे म्हटल्यावर जांबवानाने मोठ्या आनंदाने त्यांचा सन्मान करण्यासाठी आपली कन्या जांबवती मण्यासह त्यांना अर्पण केली. (१९-३२)

गुहेत गेलेले श्रीकृष्ण बारा दिवस झाले तरी गुहेच्या बाहेर आले नाहीत, असे पाहून बाहेर थांबलेले लोक अत्यंत दु:खी होऊन द्वारकेला परत आले. तेथे जेव्हा माता देवकी, रुक्मिणी, वसुदेव तसेच इतर संबंधित आणि कुटुंबियांना श्रीकृष्ण गुहेच्या बाहेर आले नाहीत हे समजले, तेव्हा त्यांना अतिशय दु:ख झाले. सर्व द्वारकावासी दु:खी होऊन सत्राजिताला शिव्याशाप देऊ लागले आणि श्रीकृष्ण परत यावेत, म्हणून महामाया दुर्गादेवीला शरण जाऊन तिची उपासना करू लागले. त्यांच्या उपासनेने दुर्गादेवी प्रसन्न झाली आणि तिच्या आशीर्वादाने त्याचवेळी तेथे नववधू जांबवतीसह कार्यसिद्धी केलेले श्रीकृष्ण सर्वांना आनंदित करीत प्रगट झाले. भगवान श्रीकृष्ण पत्नीसह गळ्यात मणी धारण करून आलेले पाहून सर्व द्वारकावासी परमानंदात मग्न झाले. कारण ते जणू मेलेलेच जिवंत होऊन परत आल्यासारखे त्यांना वाटले. (३३-३७)

त्यानंतर भगवंतांनी सत्राजिताला राजसभेमध्ये महाराज उग्रसेनांकडे बोलावले आणि मणी कसा परत मिळाला, त्याची सर्व हकीकत सांगून त्यांनी तो मणी सत्राजिताकडे सोपविला. सत्राजित अत्यंत खजिल झाला. मणी त्याने परत घेतला. परंतु त्याची मान खाली झाली. आपण केलेल्या अपराधाबद्दल त्याला अत्यंत पश्चात्ताप होत होता. कसातरी तो आपल्या घरी जाऊन पोहोचला. (३८-३९)

त्याच्या मनात नेहमी स्वत:चा अपराधच येऊ लागला. बलवानाबरोबर वैर केल्यामुळे तो अत्यंत भयभीत झाला होता. तो विचार करत होता की, "मी आपल्या अपराधाचे परिमार्जन कसे करावे ? श्रीकृष्ण आपल्यावर कसे प्रसन्न होतील ? काय केल्याने माझे कल्याण होईल आणि लोक माझी निर्भर्त्सना करणार नाहीत. मी खरोखरच अदूरदर्शी, क्षुद्र आहे. धनाच्या लोभाने मी मूर्खपणा करून बसलो. आता मी स्त्रियांमध्ये रत्नासमान असणारी माझी कन्या सत्यभामा आणि हा स्यमंतकमणी, हे दोन्हीही श्रीकृष्णांना देईन. हा उपाय अत्यंत चांगला आहे. यामुळे माझ्या अपराधाचे परिमार्जन होऊ शकेल. याशिवाय दुसरा उपाय नाही." सत्राजिताने विवेकबुद्धीने असा निश्चय करून तो अमलात आणण्यासाठी तो स्वत:च उद्योगाला लागला आणि त्याने आपली सुंदर कन्या व स्यमंतकमणी श्रीकृष्णांना अर्पण केले. सत्यभामा शील, सौंदर्य, औदार्य इत्यादी गुणांनी युक्त होती. बऱ्याच जणांनी तिला मागणीही घातली होती. परंतु आता श्रीकृष्णांनी विधिपूर्वक तिचे पाणिग्रहण केले. परीक्षिता ! भगवान श्रीकृष्ण सत्राजिताला म्हणाले, "आम्ही स्यमंतकमणी घेणार नाही. तू सूर्याचा भक्त आहेस. म्हणून तो तुझ्याजवळच राहू दे. आम्ही फक्त त्याच्यापासून मिळणाऱ्या फळाचा म्हणजे सोन्याचा स्वीकार करू." (४०-४५)

अध्याय छप्पन्नावा समाप्त

अध्याय सत्तावन्नावा

स्यमंतक-हरण, शतधन्व्याचा उद्धार आणि अक्रूराला पुन्हा द्वारकेला बोलावणे

श्रीशुक म्हणतात- लाक्षागृहाला लावलेल्या आगीमुळे पांडवांचा केसही वाकडा झाला नाही, हे जरी श्रीकृष्णांना माहीत होते, तरीसुद्धा कुंती आणि पांडव जळून मेले आहेत, हे कळल्यावर कुळाची रीत पाळण्यासाठी ते बलरामांसह हस्तिनापुराला गेले. तेथे जाऊन भीष्म, कृपाचार्य, विदुर, गांधारी आणि द्रोणाचार्यांना भेटून त्यांचे सांत्वन करून, सहानुभूती दाखवून ते त्यांना म्हणाले- "अरेरे ! फार वाईट झाले !" (१-२)

ही संधी साधून अक्रूर आणि कृतवर्मा शतधन्व्याला म्हणाले- "तू सत्राजिताकडून मणी का घेत नाहीस ? ज्याने आपली सुंदर कन्या तुला देण्याचे वचन दिले होते, त्यानेच आता आम्हांला झिडकारून श्रीकृष्णांना ती दिली. तर सत्राजिताला-सुद्धा भावामागोमाग यमपुरीत का पाठवू नये ?" शतधन्वा मुळचा दुष्ट होता आणि आता तर त्याचा मृत्यूही जवळ आला होता. त्या दोघांनी असा बुद्धिभेद केल्यामुळे त्याने लोभाने, झोपलेल्या स्थितीत सत्राजिताला ठार केले. यावेळी त्याच्या स्त्रिया अनाथाप्रमाणे रडू-ओरडू लागल्या. परंतु तिकडे लक्ष न देता कसाई जशी पशूंची हत्या करतो, त्याप्रमाणे शतधन्वा सत्राजिताला मारून व मणी घेऊन तेथून पसार झाला. (३-६)

वडिलांना मारलेले पाहून सत्यभामा शोकाकुल झाली आणि "बाबा ! बाबा ! माझा घात झाला !" म्हणून विलाप करू लागली. मधून मधून ती बेशुद्धही पडत होती. नंतर पित्याचे शव तेलाच्या कढईत ठेवून ती हस्तिनापुरला गेली. अत्यंत दुःखी अंतःकरणाने श्रीकृष्णांना तिने आपल्या वडिलांच्या हत्येची बातमी सांगितली. वास्तविक हे सर्व त्यांना अगोदरच माहीत होते. राजा ! श्रीकृष्ण व बलराम ते ऐकून सामान्य मनुष्यासारखे अश्रू गाळू लागले आणि म्हणू लागले, "अरेरे ! आमच्यावर दुःखाचा केवढा मोठा डोंगर कोसळला !" यानंतर भगवान, सत्यभामा आणि बलराम यांच्यासह द्वारकेला परत आले आणि शतधन्व्याला मारून त्याच्याकडून मणी काढून घेण्याचा विचार करू लागले. (७-१०)

श्रीकृष्णाचे मनोगत शतधन्व्याला समजले, तेव्हा तो अतिशय घाबरला आणि आपले प्राण वाचविण्यासाठी त्याने कृतवर्म्याकडे मदत मागितली, तेव्हा कृतवर्मा म्हणाला. "श्रीकृष्ण आणि बलराम सर्वशक्तिमान आहेत. मी त्यांच्याशी सामना करू शकणार नाही. त्यांच्याशी वैर करून कोणाचे भले होणार आहे ? त्यांचा द्वेष केल्याने कंस राज्य घालवून आपल्या अनुयायांसह मारला गेला. तसाच जरासंध सतरा वेळा युद्धात हार पत्करून रथाशिवायच राजधानीकडे परत गेला." जेव्हा कृतवर्म्याने त्याला असे वाटेला लावले, तेव्हा शतधन्व्याने अक्रूराला साहाय्य करण्याची विनंती केली. तोही म्हणाला, "त्या समर्थांचे बळ जाणणारा कोण त्यांच्याशी वैर करील ? जे लीलेने या विश्वाची रचना, संरक्षण आणि संहार करतात, तसेच ते केव्हा काय करू इच्छितात, ही गोष्ट त्यांच्या मायेने मोहित झालेले ब्रह्मदेव इत्यादी विश्व-विधातेसुद्धा समजू शकत नाहीत, सात वर्षांचे असतानाच ज्यांनी एका हातानेच गोवर्धन पर्वत जमिनीतून उखडला आणि लहान मुलाने पावसाळी छत्री धरावी त्याप्रमाणे उचलून धरला. मी तर त्या अचाट कर्मे करणाऱ्या भगवान श्रीकृष्णांना नमस्कार करतो. ते अनंत, अनादी, निष्क्रिय आणि आत्मस्वरूप आहेत. मी त्यांना नमस्कार करतो." अक्रूरानेही त्याला असे वाटेला लावले, तेव्हा शतधन्व्याने तो स्यमंतकमणी

अक्रूराजवळ ठेव म्हणून ठेवला आणि आपण चारशे कोस सलगपणे चालणाऱ्या घोड्यावर स्वार होऊन तेथून मोठ्या वेगाने निघून गेला. (११-१८)

राजन ! गरुडचिह्न असलेला ध्वज ज्याच्यावर फडकत होता आणि अतिशय वेगवान घोडे ज्याला जोडले होते, त्या रथावर आरूढ होऊन राम-कृष्ण सासऱ्याला मारणाऱ्या शतधन्व्याचा पाठलाग करू लागले. मिथिलेच्या जवळ एका उपवनात शतधन्व्याचा घोडा जमिनीवर कोसळला. त्यामुळे तो घोड्याला तेथेच टाकून पायीच पळू लागला. तो अत्यंत भयभीत झाला होता. श्रीकृष्णसुद्धा रागाने त्याचा पाठलाग करू लागले. शतधन्वा पायीच पळत होता. म्हणून भगवंतांनीसुद्धा पायीच त्याचा पाठलाग करून तीक्ष्ण धारेच्या सुदर्शन चक्राने त्याचे मस्तक छाटले आणि त्याच्या अंगावरील कपड्यांत स्यमंतकमण्याचा शोध घेतला. परंतु मणी सापडला नाही, तेव्हा श्रीकृष्ण वडील बंधूकडे येऊन म्हणाले, ''आम्ही शतधन्व्याला उगीचच मारले. कारण त्याच्याजवळ स्यमंतकमणी नव्हता !'' तेव्हा बलराम म्हणाले, ''शतधन्व्याने स्यमंतकमणी कोणाजवळ तरी ठेवला आहे, यात शंका नाही. आता तू द्वारकेला जा आणि त्याचा शोध घे. मला विदेहराजाची भेट घ्यावयाची आहे. कारण तो माझा अतिशय प्रिय मित्र आहे.'' परीक्षिता ! असे म्हणून बलराम मिथिला नगरीमध्ये गेले. पूजनीय बलरामांना येताना पाहून मिथिलाधिपतीचे हृदय आनंदाने भरून आले. त्याने ताबडतोब आसनावरून उठून पूजासाहित्याने त्यांची यथासांग पूजा केली. यानंतर बलराम काही वर्षे मिथिला नगरीतच राहिले. महात्मा जनकाने अतिशय प्रेमाने आणि सन्मानाने त्यांना ठेवून घेतले. त्यानंतर योग्य वेळी धृतराष्ट्र-पुत्र सुयोधनाने बलरामांकडून गदायुद्धाचे शिक्षण घेतले. प्रिय पत्नी सत्यभामेचे आवडते कार्य करून भगवान श्रीकृष्ण द्वारकेला परतले आणि त्यांनी शतधन्व्याला मारले, परंतु स्यमंतकमणी त्याच्याजवळ मिळाला नाही, असे त्यांनी सत्यभामेला सांगितले. त्यानंतर त्यांनी बांधवांसह आपले सासरे सत्राजित यांच्या सर्व और्ध्वदैहिक क्रिया करविल्या.

(१९-२८)

अक्रूर आणि कृतवर्मा यांनी शतधन्व्याला सत्राजिताच्या वधासाठी उद्युक्त केले होते. म्हणून श्रीकृष्णांनी शतधन्व्याला मारलेले ऐकून ते अत्यंत भयभीत होऊन द्वारकेतून पळून गेले. परीक्षिता ! काही लोक म्हणतात की, अक्रूर द्वारकेतून निघून गेल्यानंतर द्वारकेत राहाणाऱ्यांना अनेक प्रकारच्या संकटांना तोंड द्यावे लागले. दैविक आणि भौतिक कारणांनी तेथील नागरिकांना वारंवार शारीरिक आणि मानसिक कष्ट सहन करावे लागले. परंतु जे असे म्हणतात, ते या अगोदर सांगितलेल्या गोष्टी विसरून जातात. ज्या श्रीकृष्णांच्यामध्ये सर्व मुनी निवास करतात, त्यांचे निवासस्थान असलेल्या द्वारकेत उपद्रव होईल, हे कधीतरी शक्य आहे काय ? त्यावेळी नगरातील वृद्ध नागरिक म्हणाले- ''एकदा काशीनरेशाच्या राज्यामध्ये पाऊस पडत नव्हता. तेव्हा त्यांनी आपल्या राज्यात आलेल्या अक्रूराचा पिता श्वफल्क याला आपली कन्या गांदिनी दिली. तेव्हा त्या राज्यात पाऊस पडला. अक्रूरसुद्धा श्वफल्काचाच पुत्र आहे आणि त्याचाही तसाच प्रभाव आहे. म्हणून तो जेथे राहातो, तेथे भरपूर पाऊस पडतो आणि तेथे कोणत्याही प्रकारचे कष्ट, रोगराई इत्यादी उपद्रव होत नाहीत.'' परीक्षिता ! त्या लोकांचे हे म्हणणे ऐकून भगवंतांनी विचार केला की, ''या उपद्रवाचे एवढे एकच कारण नाही.'' हे माहीत असूनसुद्धा भगवंतांनी दूत पाठवून अक्रूराला शोधून आणून त्याला म्हटले. भगवंतांनी त्याचा मोठा सत्कार केला आणि गोड-गोड गोष्टी बोलून त्याच्याशी संभाषण केले. नंतर सर्वांचे अंत:करण जाणणारे भगवान हसत हसत अक्रूराला म्हणाले. ''हे दानशूर काका ! संपत्ती देणारा स्यमंतकमणी शतधन्व्याने आपल्याजवळ ठेवला आहे, ही गोष्ट आम्हांला अगोदरच माहीत

होती. सत्राजिताला पुत्र नसल्यामुळे त्याच्या मुलीची मुलेच त्यांना तिलांजली देऊन पिंडदान करतील, त्याचे ऋणही फेडतील आणि त्यातून जे काही शिल्लक राहील, त्याचे उत्तराधिकारी होतील. अशारीतीने जरी तो मणी माझ्याकडेच असला पाहिजे, तरीसुद्धा तो तुमच्याजवळच ठेवा. कारण आपण व्रतनिष्ठ आहात. शिवाय तो मणी इतरांना सांभाळणे कठीण आहे. परंतु माझ्या थोरल्या बंधूंना त्या मण्यासंबंधी माझ्यावर विश्वास नाही. म्हणून हे अक्रूरा ! आपण तो मणी दाखवून आमच्या बांधवांची शंका दूर करून त्यांना समाधान द्या. त्या मण्याच्या सामर्थ्यावरच आपण आजकाल लागोपाठ सोन्याची वेदी बनवून यज्ञ करीत आहात.''

श्रीकृष्णांनी अशाप्रकारे त्याची समजूत घातली, तेव्हा अक्रूराने वस्त्रात लपवून ठेवलेला तो सूर्यासारखा प्रकाशमान मणी बाहेर काढला आणि श्रीकृष्णांना दिला. श्रीकृष्णांनी तो स्यमंतक मणी आपल्या बांधवांना दाखवून आपल्यावर आलेला आळ दूर केला आणि तो मणी अक्रूराला परत दिला.

(२९-४१)

सर्वशक्तिमान, सर्वव्यापक, भगवान श्रीकृष्णांच्या पराक्रमांनी परिपूर्ण असे हे आख्यान सगळी पापे दूर करणारे व परम मंगलमय आहे. जो हे वाचतो, ऐकतो किंवा याचे स्मरण करतो, तो सर्व प्रकारची अपकीर्ती आणि पापांपासून मुक्त होऊन शांती प्राप्त करून घेतो. (४२)

अध्याय सत्तावन्नावा समाप्त

अध्याय अठ्ठावन्नावा

भगवान श्रीकृष्णांच्या अन्य विवाहांच्या कथा

श्रीशुक म्हणतात - लाक्षागृहात न जळता परत आलेल्या पांडवांना भेटण्यासाठी भगवान श्रीकृष्ण इंद्रप्रस्थाला गेले. त्यांच्याबरोबर सात्यकी इत्यादी यादवही होते. सर्वेश्वर भगवान श्रीकृष्ण आलेले पाहून सर्व वीर पांडव एकदम उठून उभे राहिले. जसे, प्राणवायूचा संचार झाल्याबरोबर सर्व इंद्रिये उठतात. वीर पांडवांनी भगवान श्रीकृष्णांना आलिंगन दिले. त्यांच्याशी झालेल्या अंगस्पर्शाने त्यांची सर्व पापे धुऊन गेली. भगवंतांचे प्रेमपूर्ण स्मितहास्याने सुशोभित असे मुखारविंद पाहून ते आनंदमग्न झाले. श्रीकृष्णांनी युधिष्ठिर आणि भीमसेनाच्या चरणांना वंदन केले. अर्जुनाला आलिंगन दिले. नकुलाने आणि सहदेवाने भगवंतांच्या चरणांना वंदन केले. जेव्हा भगवान श्रीकृष्ण श्रेष्ठ सिंहासनावर विराजमान झाले, तेव्हा सर्वांगसुंदरी नववधू द्रौपदी, लाजत लाजत हळू हळू श्रीकृष्णांजवळ आली व तिने त्यांना नमस्कार केला. तसेच पांडवांनी वीर सात्यकीचासुद्धा सत्कार करून त्याला वंदन केले. तो दुसऱ्या एका आसनावर बसला. इतर यादवांचाही सत्कार केल्यावर तेसुद्धा श्रीकृष्णांच्या चारी बाजूंना आसनावर बसले. यानंतर श्रीकृष्णांनी आत्या कुंतीजवळ जाऊन तिच्या चरणांना वंदन केले. तिने अत्यंत स्नेहाने त्यांना हृदयाशी धरले. त्यावेळी तिच्या डोळ्यांतून प्रेमाश्रू वाहू लागले. कुंतीने श्रीकृष्णांना बांधवांची खुशाली विचारली आणि भगवंतांनीसुद्धा त्याचे यथोचित उत्तर देऊन तिला तिच्या सुनेची व तिची स्वत:ची खुशाली विचारली. त्यावेळी प्रेमविव्हल झाल्याने कुंतीचा गळा दाटून आला होता, डोळ्यांतून अश्रू वाहात होते. भगवंतांनी विचारल्यावर तिला आपले पूर्वीचे पुष्कळ क्लेश आठवले आणि ज्यांचे दर्शन सर्व क्लेशांचा अंत करण्यासाठीच होते, त्या श्रीकृष्णांना ती म्हणू लागली. (१-८)

''हे कृष्णा ! ज्यावेळी तू आम्हांला आपले संबंधी समजून आमची आठवण केलीस आणि आमची खुशाली समजून घेण्यासाठी बंधू अक्रूराला पाठविलेस, त्याचवेळी आमचे कल्याण झाले. आम्हां अनाथांना तू सनाथ केलेस. तू संपूर्ण विश्वाचा हितैषी आणि आत्मा आहेस. तुझ्याजवळ आपपरभाव नाही. असे असूनही जे तुझे सदैव स्मरण करतात, त्यांच्या हृदयात तू येऊन बसतोस आणि त्यांना होणारे क्लेश मिटवितोस.''(९-१०)

युधिष्ठिर म्हणाला- ''हे सर्वेश्वर श्रीकृष्णा ! आम्ही कोणते पुण्य केले होते, कळत नाही. योगेश्वरसुद्धा अत्यंत प्रयासाने ज्यांचे दर्शन घेतात, त्या आपण आम्हा सामान्यांना अनायासे दर्शन दिलेत.'' नंतर युधिष्ठिराने भगवंतांना काही दिवस तेथेच राहाण्याची प्रार्थना केली, तेव्हा भगवान श्रीकृष्ण इंद्रप्रस्थातील लोकांच्या डोळ्यांना आनंद देत पावसाळ्याचे चार महिने तेथे सुखाने राहिले. एकदा वीर अर्जुन कवच अंगावर चढवून गांडीव धनुष्य आणि अक्षय बाणांचे दोन भाते घेऊन श्रीकृष्णांसह वानरध्वज असलेल्या रथात बसून पुष्कळ हिंस्र प्राणी असलेल्या निबिड अरण्यात शिकारीसाठी गेला. तेथे त्याने बाणांनी वाघ, डुकरे, रेडे, काळवीट, चित्ते, गौरेडे, गेंडे, हरीण, ससे, साळी इत्यादी प्राणी मारले. त्यांपैकी पवित्र पशू, पर्वकाळ आलेला पाहून, सेवकांनी राजा युधिष्ठिराकडे नेले. इकडे अर्जुन शिकार करून दमल्यामुळे व तहान लागल्यामुळे यमुनेवर गेला. श्रीकृष्ण आणि अर्जुन हे दोन्ही महारथी यमुनेच्या पाण्यात हात-पाय धुऊन नदीचे निर्मल पाणी प्याले. इतक्यात तेथे तपश्चर्या करीत असलेली सुंदर कन्या त्यांनी पाहिली. त्या श्रेष्ठ सुंदरीच्या मांड्या, दात आणि चेहरा अतिशय सुंदर होता. मित्राने पाठविल्यावरून अर्जुनाने जाऊन तिला विचारले. ''हे सुंदरी ! तू कोण आहेस ? कुणाची कन्या आहेस ? कोठून आलीस ? आणि येथे काय करू इच्छितेस ? मला वाटते की, तू पतीची इच्छा करीत आहेस. हे कल्याणी ! तू तुझा सर्व वृत्तांत सांग.'' (११-१९)

कालिंदी म्हणाली- ''मी सूर्यदेवाची कन्या आहे. सर्वश्रेष्ठ, वर देणारे भगवान विष्णू मला पती म्हणून मिळावेत, म्हणून ही कठोर तपश्चर्या मी करीत आहे. हे वीर अर्जुना ! लक्ष्मीचे आश्रय असणाऱ्या भगवानांखेरीज आणखी कोणालाही मी पती म्हणून वरणार नाही. अनाथांचे आश्रय असणारे ते भगवान मुकुंद माझ्यावर प्रसन्न होवोत. माझे नाव कालिंदी आहे. माझ्या पित्याने यमुनेच्या पाण्यात बांधलेल्या भवनात मी राहाते. भगवंतांचे दर्शन होईपर्यंत मी येथेच राहणार.'' अर्जुनाने श्रीकृष्णांना हा सर्व वृत्तांत सांगितला. त्यांना हे आधीच माहीत होते. त्यांनी कालिंदीला रथात बसवून धर्मराजाकडे आणले. (२०-२३)

यानंतर पांडवांनी विनंती केल्यावरून श्रीकृष्णांनी पांडवांना राहाण्यासाठी म्हणून एक अत्यंत अद्भुत आणि विलक्षण नगर विश्वकर्म्याकडून तयार करवून दिले. यावेळी पांडवांना आनंद देण्यासाठी भगवान त्यांचेकडे राहात असता, अग्निदेवाला खांडववन देण्यासाठी ते अर्जुनाचे सारथी झाले. खांडववन मिळाल्याने प्रसन्न झालेल्या अग्नीने अर्जुनाला गांडीव धनुष्य, चार पांढरे घोडे, एक रथ, अक्षय बाणांचे दोन भाते आणि शस्त्रास्त्रांनी न तुटणारे एक कवच दिले. खांडववन जळत असताना अर्जुनाने मय दानवाला अग्नीपासून वाचविले होते. म्हणून त्याने अर्जुनाशी मैत्री करून त्याच्यासाठी एक सभागृह तयार करून दिले. त्याच सभागृहात दुर्योधनाला पाण्याचे ठिकाणी जमीन आणि जमिनीच्या ठिकाणी पाण्याचा भास झाला होता. (२४-२७)

काही दिवसांनंतर अर्जुनाचा आणि इतर

संबंधितांचा निरोप घेऊन श्रीकृष्ण, सात्यकी इत्यादींसह पुन्हा द्वारकेला परतले. तेथे आल्यानंतर त्यांनी विवाहासाठी योग्य ऋतू आणि मुहूर्त पाहून त्या मुहूर्तावर संबंधितांना परम मंगल आणि परमानंदाची प्राप्ती करून देण्यासाठी कालिंदीचे पाणिग्रहण केले. (२८-२९)

विंद आणि अनुविंद हे दोघे अवंती देशाचे राजे होते. ते दुर्योधनाच्या मनाप्रमाणे वागणारे होते. त्यांची बहीण मित्रविंदा हिची स्वयंवरामध्ये श्रीकृष्णांना वरण्याची इच्छा होती. परंतु त्यांनी तिला विरोध केला. परीक्षिता ! श्रीकृष्णांची आत्या राजाधिदेवी हिची मित्रविंदा ही कन्या होती. राजांच्या भर सभेतून भगवान श्रीकृष्ण तिला आपल्या सामर्थ्यावर घेऊन गेले. (३०-३१)

परीक्षिता ! कोसलदेशाचा राजा नग्नजित हा अत्यंत धार्मिक होता. त्याची सत्या नावाची मुलगी होती. नग्नजिताची कन्या असल्याने नाग्नजिती या नावानेही ती ओळखली जात होती. राजाच्या अटीनुसार, सात तीक्ष्ण शिंगांच्या, अजिंक्य, वीरांचा वासही सहन न करणाऱ्या, दुष्ट बैलांवर विजय मिळवल्याशिवाय राजे त्या कन्येशी विवाह करू शकत नव्हते. यदुश्रेष्ठ भगवान श्रीकृष्णांनी जेव्हा हा वृत्तांत ऐकला की जो पुरुष त्या बैलांवर प्रभुत्व मिळवील, त्यालाच सत्या मिळेल; तेव्हा ते मोठी सेना घेऊन कौसल्यपुराला गेले. कोसलनरेशाने आनंदाने उठून त्यांचे स्वागत केले आणि आसन देऊन मौल्यवान पूजासामग्रीने त्यांची पूजा केली. तेव्हा श्रीकृष्णांनीसुद्धा त्याचे अभिनंदन केले. राजकन्येने वर म्हणून आपल्याला प्रिय असणारे श्रीकृष्ण आलेले पाहून मनोमन अशी इच्छा केली की, "जर मी व्रतांचे पालन करून यांचेच चिंतन केले असेल, तर हेच माझे पती व्हावेत आणि यांनी ही माझी पवित्र लालसा पूर्ण करावी. लक्ष्मी, ब्रह्मदेव, शंकर आणि लोकपाल ज्यांच्या चरणकमलांची धूळ आपल्या मस्तकावर धारण करतात, आणि जे आपणच स्थापन केलेल्या धर्ममर्यादेचे रक्षण करण्यासाठी वेळोवेळी अनेक लीलावतार धारण करतात, ते प्रभू माझ्या कोणत्या सत्कर्माने प्रसन्न होणार आहेत ?" नग्नजिताने श्रीकृष्णांची विधिपूर्वक पूजा करून प्रार्थना केली की, "हे जगत्पते नारायणा ! आपण आपल्या स्वरूपभूत आनंदानेच परिपूर्ण आहात आणि मी एक तुच्छ मनुष्य आहे ! मी आपली काय सेवा करू ?" (३२-३८)

श्रीशुक म्हणतात- परीक्षिता ! नग्नजिताने दिलेल्या आसनावर बसून त्यांनी केलेल्या पूजेने संतुष्ट झालेले भगवान हसत हसत मेघाप्रमाणे गंभीर वाणीने त्याला म्हणाले. (३९)

श्रीभगवान म्हणाले- राजन ! आपल्या धर्माप्रमाणे वागणाऱ्या क्षत्रियाच्या याचनेची विद्वानांनी निंदा केली आहे. तरीसुद्धा मी आपल्याशी मैत्रीसंबंध प्रस्थापित करण्यासाठी आपल्या कन्येला मागणी घालतो. या बदल्यात काहीही शुल्क देण्याची आमच्यामध्ये प्रथा नाही. (४०)

राजा म्हणाला- "प्रभो ! आपण सर्व गुणांचे निवासस्थान आहात. आपल्या वक्षःस्थळावर लक्ष्मी नित्यवास करते. माझ्या कन्येसाठी आपल्याहून श्रेष्ठ असा दुसरा कोणता वर असू शकेल बरे ? परंतु हे यदुश्रेष्ठा, आम्ही पूर्वीच याविषयी एक पण केला आहे. कन्येसाठी योग्य वर शोधण्याकरता पुरुषांच्या सामर्थ्याची परीक्षा घेण्यासाठीच आम्ही असे केले आहे. हे वीरश्रेष्ठा ! आमचे हे सात बैल माजलेले असून कोणालाही न आवरणारे आहेत. पुष्कळशा राजकुमारांना यांनी घायाळ करून त्यांचा पराभव केला आहे. हे श्रीकृष्णा ! आपणच जर यांना वेसण घातलीत, तर हे लक्ष्मीपते ! आपणच आमच्या कन्येसाठी योग्य वर ठराल." नग्नजिताचा हा पण ऐकून श्रीकृष्णांनी कंबर कसली आणि सात रूपे घेऊन जाता जाता त्या बैलांना वेसण घातली.

त्यामुळे बैलांची मस्ती जिरली आणि त्यांचे बळ खच्ची झाले. आता भगवान श्रीकृष्ण त्यांना दोरीने बांधून, एखादे मूल लाकडी बैलांना ओढते, तसे त्या बैलांना ओढू लागले. राजाला अतिशय आश्चर्य वाटले. प्रसन्न होऊन त्याने श्रीकृष्णांना आपली कन्या दिली. आणि सर्वशक्तिमान भगवान श्रीकृष्णांनीसुद्धा आपल्याला अनुरूप अशा सत्येचे विधिपूर्वक पाणिग्रहण केले. आपल्या कन्येला प्रिय असे भगवान श्रीकृष्णच पती मिळाल्याचे पाहून राण्यांना अतिशय आनंद झाला आणि सगळीकडे मोठा उत्सव साजरा होऊ लागला. शंख, ढोल, नगारे वाजू लागले. सगळीकडे गाणे-बजावणे सुरू झाले. ब्राह्मण आशीर्वाद देऊ लागले. सुंदर वस्त्रे, फुलांचे हार आणि दागिन्यांनी नटून-थटून नगरातील स्त्री-पुरुष आनंदोत्सव साजरा करू लागले. राजाने दहा हजार गाई आणि सुंदर वस्त्रे परिधान करून गळ्यात सुवर्णहार घातलेल्या तीन हजार तरुण दासी वरदक्षिणा म्हणून दिल्या. त्याचबरोबर नऊ हजार हत्ती, नऊ लाख रथ, नऊ कोटी घोडे आणि नऊ अब्ज सेवकसुद्धा वरदक्षिणा म्हणून दिले. नग्नजिताने त्या दांपत्याची रथात बसवून विशाल सेनेसह पाठवणी केली. त्यावेळी वात्सल्याने त्याचे हृदय भरून आले होते. (४१-५२)

यादवांनी आणि नग्नजिताच्या बैलांनी या आधी ज्या राजांचे बळ धुळीस मिळविले होते, त्या राजांनी जेव्हा हा वृत्तांत ऐकला, तेव्हा ते सहन न होऊन सत्याला घेऊन जात असताना त्या राजांनी वाटेत श्रीकृष्णांना वेढा घातला. आणि ते त्यांच्यावर बाणांचा वर्षाव करू लागले. त्यावेळी अर्जुनाने आपल्या मित्राचे प्रिय करण्यासाठी गांडीव धनुष्य हातात घेऊन, सिंह ज्याप्रमाणे क्षुद्र पशूंना पळवून लावतो, त्याप्रमाणे त्या राजांना त्याने पिटाळून लावले. त्यानंतर यदुश्रेष्ठ देवकीनंदन ती वरदक्षिणा आणि सत्या यांना घेऊन द्वारकेत आले आणि तिच्यासह आनंदात राहू लागले. (५३-५५)

श्रीकृष्णांनी केकय देशातील आत्या श्रुतकीर्ती हिच्या भद्रा नावाच्या कन्येशी विवाह केला. तिच्या संतर्दन इत्यादी भावांनी स्वत:च तिला श्रीकृष्णांना दिले होते. मद्र देशाच्या राजाची लक्ष्मणा नावाची एक कन्या होती. ती अत्यंत सुलक्षणी होती. गरुडाने ज्याप्रमाणे स्वर्गातून अमृत पळविले, त्याचप्रमाणे श्रीकृष्णांनी स्वयंवरामध्ये एकट्यानेच तिचे हरण केले. (५६-५७)

भगवान श्रीकृष्णांच्या अशा आणखीही हजारो स्त्रिया होत्या. भौमासुराला मारून त्याच्या बंदिगृहातून त्यांनी त्या सुंदरींना सोडवून आणले होते. (५८)

अध्याय अठ्ठावन्नावा समाप्त

अध्याय एकोणसाठावा

भौमासुराचा उद्धार आणि सोळा हजार एकशे राजकन्यांचा भगवंतांबरोबर विवाह

परीक्षित म्हणाला - ज्या भौमासुराने त्या स्त्रियांना बंदिगृहात कोंडून ठेवले होते, त्याला श्रीकृष्णांनी कसे मारले ? त्या शार्ङ्गधनुष्यधारी श्रीकृष्णांचा तो पराक्रम आपण मला सांगावा. (१)

श्रीशुक म्हणाले- वरुणाचे छत्र, अदितीची कुंडले आणि मेरु पर्वतावरील देवतांचे मणिपर्वत नावाचे स्थान, भौमासुराने हिसकावून घेतले होते. ही हकीकत इंद्राने श्रीकृष्णांना सांगितली. तेव्हा श्रीकृष्ण सत्यभामेसह गरुडावर स्वार होऊन भौमासुराची राजधानी प्राग्ज्योतिषपूर येथे गेले. प्राग्ज्योतिषपुरात प्रवेश करणे अत्यंत कठीण होते. तेथे चारी बाजूंनी डोंगरांची रांग होती, त्याच्या

आत शस्त्रे लावून ठेवली होती, त्याच्या आत पाण्याने भरलेले खंदक होते, त्याच्या आत अग्नी पेटवलेले खंदक होते आणि त्याच्याही आतल्या बाजूला प्रचंड वारा वाहणारा तट होता. त्याच्यापुढे मूर नावाच्या दैत्याने नगराच्या चारी बाजूंना दहा हजार भयंकर आणि घट्ट असे फास लावून ठेवले होते. श्रीकृष्णांनी गदेच्या प्रहारांनी डोंगर फोडून टाकले आणि शस्त्रांची तटबंदी बाणांनी छिन्न-विच्छिन्न करून टाकली. सुदर्शन चक्राने अग्नी, पाणी आणि वायूचे तट उध्वस्त करून टाकले. तसेच मूर दैत्याने लावलेले फास तलवारीने तोडून टाकले. यंत्रे आणि वीर पुरुषांची हृदये, शंखनादाने विदीर्ण करून टाकली आणि नगराचे कोट गदाधर भगवंतांनी भारी गदेने उध्वस्त करून टाकले.

(२-५)

भगवंतांच्या पांचजन्य शंखाचा आवाज प्रलयकालीन विजेच्या कडकडाटाप्रमाणे महाभयंकर होता. तो ऐकून पाच डोक्यांचा मूर दैत्य झोपेतून जागा झाला आणि पाण्यातून बाहेर आला. तो दैत्य प्रलयकालीन सूर्य आणि अग्नी यांच्यासारखा प्रचंड तेजस्वी होता. तो इतका भयंकर होता की, त्याच्याकडे डोळे वर करून पाहाणेसुद्धा कठीण होते. त्याने त्रिशूळ उचलला आणि साप गरुडावर तुटून पडतो, त्याप्रमाणे तो भगवंतांच्या अंगावर धावला. त्यावेळी असे वाटत होते की, जणू तो आपल्या पाचही मुखांनी त्रैलोक्य गिळून टाकील. त्याने आपला त्रिशूल प्रचंड वेगाने फिरवून गरुडावर फेकला आणि नंतर आपल्या पाचही मुखांनी तो गंभीर गर्जना करू लागला. त्याने केलेला प्रचंड आवाज पृथ्वी, आकाश, पाताळ आणि दाही दिशांना पसरून सर्व ब्रह्मांडात घुमू लागला. मूर दैत्याचा त्रिशूळ गरुडाकडे येताना पाहून त्यांनी दोन बाण त्याला मारले. त्यामुळे त्याच्या त्रिशूळाचे तीन तुकडे झाले. त्याचबरोबर मूर दैत्याच्या तोंडातसुद्धा भगवंतांनी पुष्कळसे बाण मारले. यामुळे त्या दैत्यानेही चिडून भगवंतांवर आपली गदा फेकली. परंतु श्रीकृष्णांनी आपल्या गदेच्या प्रहाराने, मूर दैत्याच्या गदेचा आपल्यापर्यंत येण्यापूर्वीच चुरा करून टाकला. आता तो शस्त्रहीन झाल्यामुळे आपले हात उंचावून श्रीकृष्णांच्या अंगावर धावून आला. तेव्हा त्यांनी आपल्या चक्राने सहजपणे त्याची पाचही मस्तके छाटून टाकली. मस्तके छाटली जाताच दैत्याचे प्राणोत्क्रमण झाले आणि ज्याप्रमाणे इंद्राच्या वज्राने शिखर तोडलेला एखादा पर्वत समुद्रात कोसळतो, त्याप्रमाणे तो दैत्य पाण्यात पडला. ताम्र, अंतरिक्ष, श्रवण, विभावसू, वसू, नभस्वान आणि अरुण असे मूर दैत्याचे सात पुत्र होते. आपल्या पित्याच्या मृत्यूने ते अत्यंत शोकाकुल झाले आणि बदला घेण्यासाठी क्रोधयुक्त होऊन शस्त्रास्त्रांनी सुसज्ज झाले. पीठ नावाच्या दैत्याला आपला सेनापती बनवून, भौमासुराच्या आदेशावरून त्यांनी श्रीकृष्णांवर चढाई केली. तेथे जाऊन अत्यंत क्रोधाने त्यांनी भगवान श्रीकृष्णांवर बाण, खड्ग, गदा, शक्ती, ऋष्टी, त्रिशूळ इत्यादी शस्त्रांचा वर्षाव केला. भगवंतांची शक्ती अमोघ असल्यामुळे त्यांनी आपल्या बाणांनी त्यांच्या शस्त्रास्त्रांचे तिळतिळ तुकडे केले. भगवंतांनी सेनापती पीठ इत्यादी दैत्यांची मस्तके, मांड्या, हात, पाय आणि कवचे तोडून त्यांना यमसदनाला पाठविले. जेव्हा पृथ्वीपुत्र नरकासुराने पाहिले की, भगवान श्रीकृष्णांच्या चक्र आणि बाणांनी आपल्या सेनापतींचा संहार झाला आहे, तेव्हा त्याचा क्रोध अनावर झाला. समुद्रातून उत्पन्न झालेल्या व मद पाझरणाऱ्या उन्मत्त हत्तींची सेना घेऊन तो नगराच्या बाहेर आला. त्याने पाहिले की, सूर्याच्या वर विजेसह पावसाळ्यातील काळा मेघ शोभावा त्याप्रमाणे भगवान श्रीकृष्ण आपल्या पत्नीसह आकाशात गरुडावर बसले आहेत. भौमासुराने स्वत: भगवंतांवर शतघ्नी नावाची शक्ती

फेकली आणि त्याच्या सगळ्या सैनिकांनीसुद्धा एकदम त्यांच्यावर आपापली शस्त्रास्त्रे सोडली. भगवान श्रीकृष्ण चित्रविचित्र पंख असणारे तीक्ष्ण बाण नरकासुराच्या सैन्यावर सोडू लागले. त्यामुळे लगेचच भौमासुराच्या सैनिकांचे हात, मांड्या, मुंडकी आणि धडे तुटून खाली पडू लागली. हत्ती आणि घोडेसुद्धा मरून पडले. (६-१६)

परीक्षिता ! भौमासुराच्या सैनिकांनी भगवंतांवर जी जी शस्त्रास्त्रे चालविली होती, त्यांपैकी प्रत्येक, भगवंतांनी तीन तीन तीक्ष्ण बाणांनी तोडून टाकली. त्यावेळी श्रीकृष्ण ज्या गरुडावर बसले होते, तो आपल्या पंखांनी हत्तींना मारीत होता. तसेच चोचीने आणि नखांनी त्याने हत्तींना घायाळ केले, तेव्हा ते घाबरून रणांगण सोडून नगरामध्येच घुसले. तेथे आता एकटा भौमासुर लढत राहिला. गरुडाच्या माराने घायाळ होऊन आपली सेना पळून जाऊ लागलेली पाहून त्याने त्याच्यावर वज्रालासुद्धा निष्प्रभ करणारी शक्ती फेकली. परंतु तिच्या माराने गरुड जरासुद्धा विचलित झाला नाही. फुलांच्या माळेच्या प्रहाराने हत्ती विचलित होऊ नये तसा. सर्व प्रयत्न निष्फळ झालेले पाहून त्याने श्रीकृष्णांना मारण्यासाठी हातात त्रिशूळ घेतला. परंतु तो त्याने फेकण्यापूर्वीच श्रीकृष्णांनी तीक्ष्ण धारेच्या चक्राने हत्तीवर बसलेल्या भौमासुराचे मस्तक उडविले. त्याचे कुंडले आणि सुंदर किरीटाने झगमगणारे मस्तक जमिनीवर पडले. ते पाहून भौमासुराचे संबंधी "हाय-हाय" करू लागले. ऋषी "वाहवा ! वाहवा !" म्हणू लागले आणि देव भगवंतांवर पुष्पवृष्टी करीत स्तुती करू लागले. (१७-२२)

तेव्हा पृथ्वी भगवंतांकडे आली. तिने भगवान श्रीकृष्णांच्या गळ्यामध्ये वैजयंतीमाळ आणि वनमाळा घालून, अदितीची तापलेल्या सोन्याप्रमाणे चमकणारी रत्नजडित कुंडले भगवंतांना दिली. त्याचबरोबर वरुणाचे छत्र आणि एक मौल्यवान रत्न त्यांना दिले. राजन ! मोठमोठ्या देवतांनी पूजन केलेल्या त्या विश्वेश्वरांना प्रणाम करून, हात जोडून, भक्तिभावयुक्त अंत:करणाने पृथ्वीदेवी त्यांची स्तुती करू लागली. (२३-२४)

पृथ्वी म्हणाली- हे शंखचक्रधारी देवदेवेश्वरा ! मी आपणास नमस्कार करीत आहे. हे परमात्मन ! आपण आपल्या भक्तांच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी त्यानुसारच आपले रूप प्रकट करता. आपणास मी नमस्कार करते. प्रभो ! आपल्या नाभीतून कमल प्रगट झाले आहे. आपण कमळांची माळ गळ्यात घालता. आपले नेत्र कमळासारखे असून चरणही कमलाप्रमाणे सुकुमार आहेत. आपणास मी वारंवार नमस्कार करीत आहे. आपण सर्व ऐश्वर्य, धर्म, यश, संपत्ती, ज्ञान आणि वैराग्याचे आश्रय आहात. आपण सर्वव्यापक असूनही स्वत: वसुदेवपुत्राच्या रूपाने प्रगट झाला आहात. मी आपणांस नमस्कार करीत आहे. आपण सर्व कारणांचेही परम कारण आदिपुरुष आहात. आपण स्वत: पूर्ण ज्ञानस्वरूप आहात. मी आपणांस नमस्कार करीत आहे. आपण स्वत: जन्मरहित असून या जगाचे जन्मदाते आहात. आपणच अनंत शक्तींचे आश्रय ब्रह्म आहात. जगाचे जे काही कार्यकारणमय रूप आहे, जे चराचर आहे, ते सारे आपलेच स्वरूप आहे. हे परमात्मन ! आपल्या चरणांना माझा वारंवार नमस्कार असो! (२५-२८)

प्रभो ! जेव्हा आपण जग उत्पन्न करू इच्छिता, तेव्हा उत्कट रजोगुणाचा, जेव्हा प्रलय करू इच्छिता, तेव्हा तमोगुणाचा आणि जेव्हा याचे पालन करू इच्छिता, तेव्हा सत्त्वगुणाचा स्वीकार करता. परंतु या तिन्ही गुणांनी आपण झाकले जात नाही. हे जगत्पते ! आपण स्वत:च प्रकृती, पुरुष आणि काळ आहात. तसेच या तिन्हींच्या पलीकडील आहात. हे भगवन ! मी (पृथ्वी), जल, अग्नी, वायू, आकाश, पंचतन्मात्रा, मन, इंद्रिये आणि

त्यांच्या अधिष्ठात्री देवता, अहंकार व महत्तत्त्व असे हे संपूर्ण चराचर जग आपल्या अद्वितीय स्वरूपामध्ये भ्रमामुळेच पाहात आहे. हे शरणागतभयभंजना, प्रभो ! माझा पुत्र असलेल्या भौमासुराचा हा भगदत्त नावाचा पुत्र भयभीत झाला आहे. मी याला आपल्या चरणकमलांजवळ घेऊन आले आहे. प्रभो ! आपण याचे रक्षण करावे आणि जे साऱ्या जगाचे पाप-ताप नष्ट करणारे आहे, ते करकमल याच्या मस्तकावर ठेवावे. (२९-३१)

श्रीशुक म्हणतात - पृथ्वीने भक्तिभावाने विनम्र होऊन जेव्हा अशा प्रकारे भगवान श्रीकृष्णांची स्तुती करून प्रार्थना केली, तेव्हा त्यांनी भगदत्ताला अभयदान दिले आणि सर्व प्रकारच्या संपत्तींनी संपन्न अशा भौमासुराच्या राजवाड्यात प्रवेश केला. तेथे गेल्यावर भगवंतांनी पाहिले की, भौमासुराने राजांना जिंकून त्यांच्या सोळा हजार राजकुमारी तेथे आणून ठेवल्या होत्या. अंत:पुरात आलेल्या नरश्रेष्ठ भगवान श्रीकृष्णांना जेव्हा त्या राजकुमारींनी पाहिले, तेव्हा त्या अत्यंत मोहित झाल्या आणि त्यांनी आपल्या भाग्यानेच आपल्याला मिळवून दिलेल्या त्यांना मनोमन प्रियतम पती म्हणून वरले. त्या राजकुमारींपैकी प्रत्येकीने स्वतंत्रपणे आपल्या मनात हाच भाव बाळगला की, "हे श्रीकृष्णच आपले पती व्हावेत आणि विधात्याने आपली ही अभिलाषा पूर्ण करावी." अशा प्रकारे त्यांनी आपले हृदय भगवंतांना अर्पण केले. तेव्हा श्रीकृष्णांनी त्यांना सुंदर सुंदर वस्त्रे परिधान करवून, पालख्यांत बसवून द्वारकेला पाठविले आणि त्यांच्याबरोबर पुष्कळसे धन, रथ, घोडे तसेच अमाप संपत्तीही पाठविली. ऐरावताच्या वंशात जन्मलेले, अत्यंत वेगवान, चार चार दातांचे, शुभ्र असे चौसष्ट हत्तीसुद्धा भगवंतांनी तेथून द्वारकेला पाठविले. (३२-३७)

यानंतर भगवान श्रीकृष्ण अमरावतीतील इंद्रभवनात गेले. तेथे देवराज इंद्राने पत्नी इंद्राणीसह सत्यभामा आणि श्रीकृष्णांची पूजा केली, तेव्हा भगवंतांनी अदितीची कुंडले तिला दिली. तेथून परत येताना सत्यभामेच्या सांगण्यावरून श्रीकृष्णांनी तेथील पारिजातक उपटून गरुडावर ठेवला. तेव्हा विरोध करणाऱ्या इंद्रासह सर्व देवांना जिंकले आणि तो द्वारकेत घेऊन आले. भगवंतांनी तो सत्यभामेच्या महालाच्या बागेत लावला. त्यामुळे बागेची शोभा अतिशय वाढली. त्या वृक्षाबरोबर त्याचा सुगंध आणि मध यांचे लोभी भ्रमर स्वर्गातून द्वारकेत आले होते. जेव्हा इंद्राला आपले काम साधावयाचे होते, तेव्हा त्याने आपले मस्तक लववून मुकुटाच्या टोकांनी भगवान श्रीकृष्णांच्या चरणांना स्पर्श करून त्यांच्याकडून साहाय्याची भिक्षा मागितली होती, परंतु जेव्हा काम झाले, तेव्हा त्यांनी त्याच श्रीकृष्णांशी लढाई केली. खरोखर या देवांच्या मूर्खपणाचा आणि वैभवाच्या मस्तीचा धिक्कार असो ! (३८-४१)

यानंतर अविनाशी भगवान श्रीकृष्णांनी एकाच मुहूर्तावर, निरनिराळ्या भवनांमध्ये, वेगवेगळी रूपे धारण करून, एकाच वेळी, त्या सर्व राजकुमारींचे शास्त्रोक्त विधीने पाणिग्रहण केले. त्या महालांमध्ये अशी दिव्य सामग्री भरलेली होती की, त्याच्या बरोबरीची जगात कोठेही असणार नाही. मग अधिकाची तर गोष्टच सोडा ! त्या महालांमध्ये राहून अतर्क्य लीला करणारे भगवान आत्मानंदात मग्न असूनही लक्ष्मीच्या अंशरूप अशा त्या पत्नींबरोबर, जसा एखादा सामान्य गृहस्थाश्रमी राहातो, त्याप्रमाणे राहून गृहस्थधर्माप्रमाणे आचरण करीत रमत होते. परीक्षिता ! ब्रह्मदेवादिकांनाही ज्यांना प्राप्त करून घेण्याचा उपाय माहीत नाही, त्याच रमारमणांना त्या स्त्रियांनी पतीच्या रूपाने प्राप्त करून घेतले होते. आता नित्य त्यांचे प्रेम आणि आनंदाची वृद्धी होत होती. त्या प्रेमपूर्ण हास्ययुक्त कटाक्ष, नवसमागम, प्रेमालाप व प्रेमभाव वाढविणाऱ्या लज्जेने युक्त होऊन भगवंतांची सर्वभावे सेवा करीत होत्या. (४२-४४)

पत्न्यांच्याबरोबर सेवा करण्यासाठी शेकडो

दासी राहात असत. तरीसुद्धा जेव्हा त्यांच्या महालात भगवान येत असत, तेव्हा त्या स्वत: पुढे होऊन आदराने त्यांना घेऊन येत, श्रेष्ठ आसनावर बसवीत, उत्तम सामग्रींनी त्यांची पूजा करीत, चरणकमले धूत, विडा करून देत, पाय चेपून थकवा दूर करीत, पंख्याने वारा घालीत, चंदन इत्यादी लावीत, फुलांचे हार घालीत, केस विंचरीत, झोपवीत, स्नान घालीत आणि अनेक प्रकारचे पदार्थ करून भोजन घालीत. अशा रीतीने स्वत:च्या हातांनी भगवंतांची सेवा करीत. (४८)

अध्याय एकोणसाठावा समाप्त

अध्याय साठावा

श्रीकृष्ण-रुक्मिणी-संवाद

श्रीशुकाचार्य म्हणतात - जगद्गुरू श्रीकृष्ण एके दिवशी रुक्मिणीदेवींच्या पलंगावर आरामात बसले होते. भीष्मकनंदिनी रुक्मिणी आपल्या सख्यांसह पतीची पंख्याने वारा घालून सेवा करीत होती. जे परमेश्वर सहजतया या जगाची निर्मिती, पालन आणि प्रलय करतात, तेच अजन्मा प्रभू आपणच तयार केलेल्या धर्ममर्यादांचे रक्षण करण्यासाठी यदुकुलात अवतीर्ण झाले आहेत. रुक्मिणीदेवीचे अंत:पुर अतिशय सुंदर होते. त्यामध्ये मोत्यांच्या लड्या लावलेले छत होते, रत्नांचे दिवे झगमगत होते. जाईच्या माळा लावलेल्या होत्या. भ्रमरांचे थवे त्या फुलांवर गुंजारव करीत होते. झरोक्यांच्या जाळीतून चंद्राची शुभ्र किरणे आत येत होती. राजा ! उपवनातील पारिजातकाचा सुगंध घेऊन बगीच्यात वारा वाहात होता. झरोक्यांच्या जाळ्यांतून धुपाचा धूर बाहेर जात होता. अशा महालात दुधाच्या फेसाप्रमाणे शुभ्र बिछाना घातलेल्या पलंगावर मोठ्या आनंदाने विराजमान झालेल्या त्रैलोक्याच्या स्वामींची रुक्मिणी सेवा करीत होती. रत्नाची दांडी असलेली चवरी सखीच्या हातातून रुक्मिणीने घेतली आणि त्याने वारा घालीत ती भगवंतांची सेवा करू लागली. तिच्या अंगठी व बांगड्या असलेल्या हातात चवरी शोभत होती. पायांत रत्नजडित पैंजणे रुणझुण करीत होती. पदराच्या आड लपलेल्या स्तनांच्या केशराच्या लालीमुळे गळ्यातील मोत्यांचा हार लालसर दिसत होता आणि कमरेवर बहुमूल्य कमरपट्टा चमकत होता. अशी ती भगवंतांच्या जवळ राहून त्यांची सेवा करीत होती. कुरळे केस, कुंडले आणि गळ्यातील सुवर्णाचे हार यांनी शोभणाऱ्या तिच्या मुखचंद्रावरून हास्यरूप चांदण्याचा अमृतवर्षाव होत होता. ती साक्षात एकनिष्ठ लक्ष्मीच होती. यावेळी तिने लीलेने भगवंतांना अनुरूप असे मनुष्यरूप धारण केले होते. तिला पाहून प्रसन्न झालेल्या श्रीकृष्णांनी हसत हसत तिला म्हटले. (१-९)

श्रीभगवान म्हणाले- हे राजकुमारी ! ज्यांच्याजवळ लोकपालांच्यासारखे ऐश्वर्य होते, जे मोठे प्रभावशाली आणि श्रीमंत होते, त्याचप्रमाणे सौंदर्य, औदार्य आणि ताकदीमध्येही जे असामान्य होते, असे राजे तुला इच्छित होते. तुझे वडील आणि भाऊ यांनीसुद्धा त्यांना शब्द दिला होता. जे कामोन्मत्त होऊन तुझे याचक बनले होते, त्या शिशुपाल इत्यादींना सोडून तुझ्या तोडीच्या नसलेल्या मला तू का वरलेस ? हे सुंदरी ! जरासंध इत्यादी राजांच्या भीतीने आम्ही समुद्रात वस्ती केली आहे. बलवानांशी आम्ही वैर धरले आहे आणि जवळ जवळ राजसिंहासनही आम्हांला मिळण्यासारखे नाही. हे सुंदरी ! आमचा मार्ग कोणता, हे सुद्धा

लोकांना माहीत नाही. लौकिक व्यवहार सोडून वागणारे आम्ही ! तसेच स्त्रियांना खूषही न करणाऱ्या पुरुषांना वरणाऱ्या स्त्रियांना बहुधा दु:खच भोगावे लागते. हे सुंदरी ! आम्ही असे जवळ काही न बाळगणारे ! आणि जे जवळ काही बाळगत नाहीत अशाच लोकांवर आम्ही प्रेम करतो. यामुळेच धनवान लोक बहुधा आमच्या वाऱ्यालाही राहात नाहीत. ज्यांच्या धन, कूळ, ऐश्वर्य, सौंदर्य आणि प्रताप या गोष्टी सारख्या असतात, त्यांचेच परस्पर विवाह आणि मैत्री होतात. श्रेष्ठ-कनिष्ठांचे नव्हेत. हे विदर्भराजकुमारी ! दूरदर्शीपणा नसल्यामुळे तू या गोष्टींचा विचार केला नाहीस आणि भिक्षुकांकडून माझी खोटी प्रशंसा ऐकून माझ्यासारख्या गुणहीनाला तू वरलेस. अजूनही तू आपल्याला अनुरूप अशा श्रेष्ठ क्षत्रियाशी विवाहबद्ध हो; त्यामुळे तुझ्या इह-परलोकातील आकांक्षा पूर्ण होऊ शकतील. हे सुंदरी ! तुला माहीतच आहे की, शिशुपाल, शाल्व, जरासंध, दंतवक्त्र इत्यादी राजे आणि तुझा थोरला भाऊ रुक्मीसुद्धा माझा द्वेष करीत आहेत. हे कल्याणी ! सामर्थ्याने मदांध झालेल्या, गर्विष्ठ अशा त्या दुष्टांचा गर्व नाहीसा करण्यासाठीच मी तुझे अपहरण करून तुला आणले. आम्ही खरोखरच देह व घरदार यांविषयी उदासीन आहोत. स्त्री, संतान आणि धन यांची आम्हांला आकांक्षा नाही. आम्ही निष्क्रिय असून दिव्यासारखे साक्षीदार आहोत. आम्ही आमच्या आत्म्याच्या साक्षात्कारानेच पूर्णकाम आहोत. (१०-२०)

श्रीशुक म्हणतात- श्रीकृष्ण आपल्यापासून कधीच दूर जात नसल्याकारणाने रुक्मिणीला 'आपणच यांना सर्वाधिक प्रिय आहे,' असा झालेला गर्व नाहीसा करण्यासाठीच भगवंत एवढे बोलले आणि गप्प राहिले. आपले प्रियतम त्रिलोकेश्वर भगवंतांचे पूर्वी कधीच न ऐकलेले हे अप्रिय बोल जेव्हा रुक्मिणीने ऐकले, तेव्हा ती भ्याली. तिचे हृदय धडधडू लागले. चिंतेच्या अथांग सागरात ती गटांगळ्या खाऊ लागली. अखेर ती रडू लागली. नखांच्या लालिम्यामुळे सुंदर दिसणाऱ्या पायाच्या नखाने ती जमीन उकरू लागली. डोळ्यांतील काजळाने काळे झालेले अश्रू केशराने रंगलेली वक्ष:स्थळे धुऊ लागले. ती मान खाली घालून उभी राहिली. अत्यंत दु:खाने तिच्या तोंडून शब्द फुटेना. आत्यंतिक व्यथा, भय आणि शोकामुळे तिची विचारशक्ती लोप पावली, वियोगाच्या शंकेने ती इतकी दुबळी झाली की, तिच्या मनगटातील बांगड्या ओघळू लागल्या. हातातील चवरी गळून पडली. बुद्धी व्याकूळ झाल्याने तिला एकाएकी घेरी येऊ लागली. आणि वाऱ्याने केळ उन्मळून पडावी, त्याप्रमाणे केस विस्कटून ती जमिनीवर कोसळली. भगवान श्रीकृष्णांच्या लक्षात आले की, विनोदाचे मर्म लक्षात न आलेल्या रुक्मिणीची माझ्यावरील अत्यंत प्रेमामुळे अशी अवस्था झाली आहे. स्वभावत:च दयाळू असणाऱ्या श्रीकृष्णांचे मन तिच्याबद्दलच्या करुणेने भरून आले. (त्यावेळी) चार हात धारण केलेले भगवान चटकन पलंगावरून खाली उतरले आणि रुक्मिणीला त्यांनी उठविले. तिचे मोकळे झालेले केस सावरले आणि आपल्या कमलकराने तिचे तोंड कुरवाळले. हे राजा ! भगवंतांनी तिच्या डोळ्यांतील अश्रू आणि दु:खाश्रूंनी भिजलेले स्तन पुसून आपल्याबद्दल अनन्य प्रेमभाव असणाऱ्या तिला बाहूंनी आलिंगन दिले. समजूत घालण्यात कुशल असणाऱ्या भक्तवत्सल प्रभूंनी रुक्मिणी विनोदाने गोंधळून जाऊन बेचैन झालेली पाहून 'तिची अशी थट्टा करायला नको होती,' असे वाटून त्यांनी तिची समजूत घातली. (२१-२८)

श्रीकृष्ण म्हणाले- हे विदर्भनंदिनी ! माझे बोलणे तू मनावर घेऊ नकोस. तू माझ्याशीच एकनिष्ठ आहेस, हे मला माहीत आहे. हे प्रिये ! तू काय म्हणतेस, ते ऐकण्यासाठीच मी तुझी थट्टा

केली होती. ज्यावरील ओठ प्रणयकोपाने थरथरत आहेत असे, रागामुळे डोळ्यांच्या कडा लाल झालेले आणि भुवया उंचावलेले, तुझे सुंदर मुखकमल पाहण्यासाठी मी हे बोललो. हे घाबरट प्रिये ! गृहस्थांनी आपल्या प्रिय पत्नीबरोबर हास्यविनोद करीत काही घटका आनंदात घालविणे, हाच त्यांचा मोठा विरंगुळा होय. (२९-३१)

श्रीशुक म्हणतात- राजन ! श्रीकृष्णांनी अशा प्रकारे समजाविले, तेव्हा त्यांचे ते चेष्टेचे बोलणे होते, हे लक्षात येऊन आपले प्रियतम आपल्याला सोडून देतील, ही तिची भीती दूर झाली. परीक्षिता ! सलज्ज हास्य आणि प्रेमपूर्ण मधुर कटाक्षाने श्रीकृष्णांच्या मुखाकडे पाहात ती त्या पुरुषोत्तमांना म्हणाली. (३२-३३)

रुक्मिणी म्हणाली- हे कमलनयना ! ऐश्वर्य इत्यादी सर्व गुणांनी युक्त अशा अनंत भगवानांना अनुरूप अशी मी नाही, हे आपले म्हणणे बरोबर आहे. आपल्या अखंड महिम्यात राहाणारे व ब्रह्मदेवादिकांचे अधिपती आपण कोठे आणि केवळ अज्ञानी लोकच जिची सेवा करतात, अशी मी गुणमय प्रकृती कोठे ? हे त्रिविक्रमा ! आपण राजे लोकांच्या भीतीने समुद्रात येऊन लपला आहात हे आपले म्हणणेही बरोबर आहे. परंतु हे राजे म्हणजे तीन गुण. आपण जणू त्यांच्याच भीतीने अंत:करणरूप समुद्रामध्ये चैतन्यघन अनुभूतिस्वरूप आत्म्याच्या रूपामध्ये विराजमान असता. आपले राजांशी वैर आहे हेही खरेच ! पण ते राजे म्हणजे ही क्षुद्र इंद्रिये ! यांच्याशी आपले वैर आहेच ! आणि, हे प्रभो ! आपणास राजसिंहासन नाही, हेही योग्यच आहे; कारण आपल्या भक्तांनीसुद्धा राजपद म्हणजे अज्ञानांधकार समजून त्याचा त्याग केला आहे. तर मग आपण त्याचा स्वीकार कसा कराल ? आपण म्हणता की, आपला मार्ग स्पष्ट नाही आणि लौकिकातील पुरुषांप्रमाणे आपण वागतसुद्धा नाही, हेही खरेच ! कारण जे मुनी आपल्या पादपद्मांचा मकरंदरस सेवन करतात, त्यांचा मार्गसुद्धा अस्पष्ट असतो आणि विषयांमध्ये गुरफटलेल्या नरपशूंना त्याची कल्पनाही करता येत नाही. आणि हे अनंता ! आपल्याला अनुसरणाऱ्या आपल्या भक्तांच्या क्रियाही जर अलौकिक असतात, तर मग सर्व शक्ती आणि ऐश्वर्यांचे आश्रय असणाऱ्या, आपल्या क्रिया अलौकिक असतील, यात काय आश्चर्य ! आपण स्वत:ला निष्किंचन म्हणवता, तेही बरोबर आहे. कारण आपल्याखेरीज दुसरी कोणतीच वस्तू या विश्वात नाही, म्हणून आपल्याला निष्किंचन म्हणायचे ! शिवाय ज्या ब्रह्मदेव इत्यादी देवांची पूजा सर्व लोक करतात, तेच देव आपली पूजा करतात. सर्वलोकपूज्य अशा त्यांना आपण प्रिय आहात आणि ते आपल्याला प्रिय आहेत. धनाढ्य लोक आपल्याला भजत नाहीत, हे आपले म्हणणेही योग्यच आहे. जे लोक धनाच्या अभिमानाने आंधळे होऊन इंद्रियांना तृप्त करण्याच्या मागेच लागलेले असतात, ते आपले भजन करीत नाहीत हे खरेच. कारण आपणच मृत्युरूप आहात, हे ते जाणत नाहीत. आपणच चतुर्विध पुरुषार्थ आणि त्यांचे आनंदरूप फलस्वरूप आहात. अशा आपल्याला प्राप्त करण्यासाठी विचारवंत सर्वस्वाचा त्याग करतात. भगवन ! त्याच विवेकी पुरुषांचा आपल्याशी सेव्यसेवक संबंध असणे उचित आहे. जे लोक स्त्री-पुरुषसंबंधाने प्राप्त होणाऱ्या सुख-दु:खाला वश होतात, त्यांच्याशी आपला संबंध कसा योग्य ठरेल ? भिक्षा मागून उदर-निर्वाह करणाऱ्यांनी आपली प्रशंसा केली नाही, तर क्षमाशील संन्यासी महात्म्यांनी आपला महिमा वर्णिला आहे. मी अदूरदर्शीपणाने नव्हे तर समजून उमजून आपल्याला वरले आहे. कारण आपण साऱ्या जगताचे आत्मा आहात आणि आपल्या प्रेमी जनांना आपण आत्मदानही करीत असता. मी जाणून-बुजूनच त्या ब्रह्मदेव, देवराज इंद्र इत्यादींचा त्याग केला. कारण आपल्या भुवयांच्या इशाऱ्यावर उठून

होणाऱ्या काळाच्या वेगाने त्यांच्या आशा-आकांक्षांवर पाणी पडते. मग इतरांची काय कथा ? (३४-३९)

हे गदाग्रजा ! आपण राजांच्या भीतीने समुद्रात निवास करू लागलात, हे आपले म्हणणे तर्कसंगत वाटत नाही. कारण आपण केवळ आपल्या शार्ङ्गधनुष्याच्या टणत्काराने माझ्या विवाहासाठी आलेल्या सर्व राजांना पळवून लावून मला पळवून आणलेत. जसा सिंह आपल्या आरोळीने वनातील पशूंना पिटाळून लावून आपला भाग घेऊन येतो. हे कमलनयना ! जे माझ्या मागे लागतात, त्यांना साधारणपणे कष्टच भोगावे लागतात, असे आपण कसे म्हणता ? प्राचीन काळी अंग, पृथू, भरत, ययाती, गय इत्यादी राजराजेश्वर आपापले एकछत्री साम्राज्य सोडून ज्या आपल्याला प्राप्त करून घेण्याच्या इच्छेने तपश्चर्या करण्यासाठी वनामध्ये गेले होते, त्यांना आपले अनुयायी होण्यामुळे काही कष्ट झाले काय ? आपण म्हणता की, मी एखाद्या राजकुमाराला वरावे. पण भगवन ! सर्व गुणांचे आश्रयस्थान असणाऱ्या संतांनी स्तविलेल्या, लोकांना पाप-तापापासून मुक्त करणाऱ्या, लक्ष्मीचे निवासस्थान असणाऱ्या आपल्या चरणकमलांचा सुगंध एकदा घेतल्यावर आपला स्वार्थ-परमार्थ जाणणारी कोणती मनुष्यस्त्री ते सोडून नेहमी मोठ्या भयांनी ग्रासलेल्यांचा स्वीकार करील ? हे प्रभो ! इह-परलोकातील सर्व आशा पूर्ण करणाऱ्या, तसेच सर्वांचे आत्मा असणाऱ्या व मला अनुरूप अशाच जगदीश्वरांना मी वरले आहे. मला माझ्या कर्मानुसार वेगवेगळ्या योनीत भटकावे लागले तरी नेहमी आपले भजन करणाऱ्यांचा मिथ्या संसारभ्रम नाहीसा करणाऱ्या व त्यांना आपले स्वरूपसुद्धा देऊन टाकणाऱ्या अशा आपल्या चरणांनाच मी शरण असावे. हे अच्युता ! हे शत्रुनाशना ! घरांमध्ये स्त्रियांची गाढवाप्रमाणे ओझी वाहाणारे, बैलांप्रमाणे कामाला जुंपलेले, कुत्र्यांप्रमाणे तिरस्कार सहन करणारे, बोक्यांप्रमाणे हिंसक, दासाप्रमाणे सेवा करणारे, आपण सांगितलेले शिशुपाल इत्यादी राजे आहेत. जिच्या कानांवर शंकर, ब्रह्मदेव इत्यादी देवेश्वरांच्या सभेत गायन केल्या जाणाऱ्या आपल्या कथा आल्या नसतील, तिलाच ते राजे लखलाभ होवोत. (४०-४४)

वरून कातडे, दाढी-मिशा, रोम, नखे आणि केसांनी झाकलेले व आत मांस, हाडे, रक्त, किडे, मल-मूत्र, कफ, पित्त आणि वायू यांनी भरलेले, म्हणूनच जिवंत असून प्रेतासारख्या असणाऱ्या या शरीराला, जिला आपल्या चरणारविंदाच्या मकरंदाचा सुगंध हुंगावयास मिळाला नाही, अशीच मूर्ख स्त्री आपला प्रिय पती समजून भजते. हे कमलनयना ! आपण आत्माराम असल्याने माझ्याकडे आपली दृष्टी जात नसली, तरी आपल्या चरणकमलांवर माझे दृढ प्रेम असावे. जेव्हा आपण या जगाच्या अभिवृद्धीसाठी उत्कट रजोगुणाचा स्वीकार करून माझ्याकडे पाहाता, तोसुद्धा आपला मोठा अनुग्रहच आहे, असे मी मानते. हे मधुसूदना ! एखाद्या अनुरूप वराला माळ घाल, असे आपण म्हणालात. तुमचे हे म्हणणेही मला खोटे वाटत नाही; कारण कधी कधी एखाद्या पुरुषाने जिंकल्यानंतर सुद्धा काशिराजाची कन्या अंबा हिच्याप्रमाणे एखादीचे दुसऱ्या पुरुषावर प्रेम असू शकते. कुलटा स्त्रीचे मन तर विवाह झाल्यानंतरही नवनवीन पुरुषांकडे ओढ घेते. बुद्धिमान पुरुषाने अशा स्त्रीला आपल्याजवळ ठेवू नये. तिला स्वीकारणारा पुरुष इहलोक आणि परलोक असे दोन्हीही घालवून बसतो. (४५-४८)

श्रीकृष्ण म्हणाले- साध्वी ! राजकुमारी ! तुझ्या तोंडून हेच ऐकण्यासाठी मी तुझी थट्टा केली. तू माझ्या म्हणण्याचा जो जो अर्थ लावलास, तो अक्षरशः खरा आहे. हे सुंदरी ! तू माझी अनन्य भक्त आहेस. तू माझ्याकडून ज्याची इच्छा धरशील, त्या तुझ्या इच्छा नेहमीच पूर्ण होतील. शिवाय

माझ्यासंबंधीच्या कामना सांसारिक बंधनात टाकणाऱ्या नसतात. हे पुण्यशीले ! मी तुझे पतिप्रेम आणि पातिव्रत्य चांगल्या तऱ्हेने पारखले. कारण मी अनेक प्रकारे तुला विचलित करण्याचा प्रयत्न केला असतानाही तुझी बुद्धी माझ्यापासून दूर गेली नाही. हे प्रिये ! मी मोक्ष देणारा आहे. असे असून जे सकाम पुरुष अनेक प्रकारची व्रते आणि तपश्चर्या करून दांपत्यसुखाची अभिलाषा करतात, ते माझ्या मायेने मोहित झाले आहेत, असे समजावे. हे मानिनी ! मोक्ष व सर्व प्रकारच्या संपत्तींचा स्वामी परमात्मा अशा मला प्राप्त करूनसुद्धा जे लोक फक्त संपत्तीचीच अभिलाषा धरतात, माझी नव्हे, ते अभागीच होत. कारण विषयसुख नरकामध्येही मिळू शकते. परंतु त्या लोकांचे मन विषयांमध्येच गुंतलेले असते. म्हणूनच त्यांना नरकात जाणे सुद्धा चांगले वाटते. हे गृहस्वामिनी ! तू आतापर्यंत संसार-बंधनातून मुक्त करणाऱ्या माझीच निरंतर सेवा केली आहेस, ही मोठीच आनंदाची गोष्ट आहे. संसारासक्त माणसे असे कधीच करू शकत नाहीत. ज्या स्त्रियांचे चित्त वाईट कामनांनी भरलेले असते आणि ज्या आपल्या इंद्रियांच्या तृप्तीसाठीच निरनिराळ्या प्रकारची कपटकारस्थाने करीत असतात, त्यांना तर असे करणे खूपच अवघड आहे. हे मानिनी ! मला आपल्या घरामध्ये तुझ्यासारखी प्रेम करणारी पत्नी दुसरी कोणीही दिसत नाही; कारण फक्त माझी कीर्ती ऐकून आपल्याशी विवाहासाठी आलेल्या राजांची उपेक्षा करून ब्राह्मणाकरवी तू मला एक गुप्त संदेश पाठविला होतास. तुझे हरण करतेवेळी मी तुझ्या भावाला युद्धात जिंकून त्याला विद्रूप केले होते आणि अनिरुद्धाच्या विवाहप्रसंगी द्यूत खेळतेवेळी बलरामाने तर त्याचा वध केला. परंतु आमच्याशी वियोग होईल, या भीतीने तू गुपचूपपणे सर्व दुःख सहन केलेस. मला एका शब्दानेसुद्धा तू बोलली नाहीस. ह्या गुणामुळेच तू मला जिंकलेस.(भगवान त्रिकालदर्शी असल्यामुळे त्यांनी हा वधाचा भविष्यकालीन उल्लेख केला असावा.) माझ्या प्राप्तीसाठी तू दूताकरवी आपला गुप्त संदेश पाठविला होतास. परंतु माझ्या येण्याला उशीर होत आहे असे दिसले, तेव्हा तुला हे सर्व जग असार वाटू लागले. त्यावेळी तू आपले हे शरीर दुसऱ्या कोणासाठीही योग्य नाही, असे समजून ते सोडण्याचा निश्चय केलास. तुझा हा प्रेमभाव तुझ्या ठिकाणीच राहू दे. आम्ही याची परतफेड करू शकत नाही. फक्त त्याचे कौतुक करतो. (४९-५७)

श्रीशुक म्हणतात- जगदीश्वर भगवान श्रीकृष्ण आत्माराम असूनही सामान्य मनुष्यासारखे असे प्रेमालाप करीत रुक्मिणीबरोबर रममाण झाले. जगाला उपदेश करणारे सर्वव्यापक भगवान श्रीकृष्ण याचप्रमाणे अन्य पत्न्यांच्या महालांमध्येसुद्धा गृहस्थाप्रमाणे गृहस्थाश्रमाला उचित अशा धर्माचे आचरण करीत. (५८-५९)

अध्याय साठावा समाप्त

अध्याय एकसष्टावा

भगवंतांच्या संततीचे वर्णन व अनिरुद्धाच्या विवाहामध्ये रुक्मीला मारणे

श्रीशुक म्हणतात - श्रीकृष्णांच्या प्रत्येक पत्नीला दहा दहा पुत्र झाले. ते सर्व गुणांच्या-बाबतीत वडिलांपेक्षा कमी नव्हते. श्रीकृष्ण आपल्या महालाबाहेर कधीही जात नाहीत, असे पाहून आपणच श्रीकृष्णांना अत्यंत प्रिय आहोत, असे त्या राजकन्यांना वाटे. कारण त्यांना श्रीकृष्णांच्या खऱ्या स्वरूपाची जाणीव नव्हती. आत्मानंदामध्ये असलेल्या श्रीकृष्णांचे कमळाच्या कळीप्रमाणे सुंदर

मुख, दीर्घ बाहू, आकर्ण नेत्र, प्रेममय हास्य, भावपूर्ण नजर आणि मधुर वाणी यांमुळे त्या सुंदरी स्वत:च मोहित झालेल्या असत. त्या आपल्या शृंगारपूर्ण हावभावांनी त्यांचे मन जिंकू शकत नसत. मंद हास्ययुक्त नेत्रकटाक्षांनी व भुवयांच्या विलासाने त्या सोळा सहस्र स्त्रिया कामकलेच्या भावांनी परिपूर्ण असे कामबाण त्यांच्यावर सोडीत, परंतु कोणत्याही साधनांनी, त्या भगवंतांचे मन विचलित करू शकल्या नाहीत. (१-४)

ब्रह्मदेव इत्यादी देवांनासुद्धा ज्यांचे खरे स्वरूप कळले नाही, त्याच रमारमणांना त्या स्त्रियांनी आपल्या पतीच्या रूपाने प्राप्त करून घेतले होते. आता नित्य त्यांचे प्रेम आणि आनंद वाढत होते. आणि त्या प्रेमपूर्ण हास्ययुक्त पाहाणे, नव्या समागमाची लालसा इत्यादींनी भगवंतांची सेवा करीत असत. त्या सर्व पत्न्यांच्याबरोबर सेवा करण्यासाठी शेकडो दासी असत. तरीसुद्धा जेव्हा त्यांच्या महालात भगवान येत, तेव्हा त्या स्वत: पुढे होऊन त्यांचे स्वागत करीत. श्रेष्ठ आसनावर बसवीत. उत्तम सामग्रीने त्यांची पूजा करीत. चरणकमले धूत. विडा देत. पाय चेपून त्यांचा थकवा दूर करीत. पंख्याने वारा घालीत. सुवासिक चंदन इत्यादी लावीत. फुलांचे हार गळ्यात घालीत. केस विंचरीत. झोपवीत. स्नान घालीत आणि अनेक प्रकारच्या पदार्थांचे भोजन करवून स्वत: भगवंतांची सेवा करीत. (५-६)

श्रीकृष्णांच्या प्रत्येक पत्नीला दहा दहा पुत्र होते, हे मी सांगितलेच आहे. त्यांपैकी ज्या आठ पट्टराण्या होत्या, त्यांच्या प्रद्युम्न इत्यादी पुत्रांविषयी मी आता सांगतो. प्रद्युम्न, चारुदेष्ण, सुदेष्ण, पराक्रमी चारुदेह, सुचारू, चारुगुप्त, भद्रचारू, चारुचंद्र, विचारू आणि दहावा चारू असे रुक्मिणीला दहा पुत्र झाले. हे सर्वजण कोणत्याही बाबतीत वडिलांहून कमी नव्हते. भानू, सुभानू, स्वर्भानू, प्रभानू, भानुमान, चंद्रभानू, बृहद्भानू, अतिभानू, श्रीभानू आणि प्रतिभानू असे सत्यभामेचे दहा पुत्र होते. जांबवतीचे सांब, सुमित्र, पुरुजित, शतजित, सहस्रजित, विजय, चित्रकेतू, वसुमान, द्रविड आणि क्रतू असे दहा पुत्र होते. हेही श्रीकृष्णांना प्रिय होते. नाग्नजितीला वीर, चंद्र, अश्वसेन, चित्रगू, वेगवान, वृष, आम, शंकू, वसू आणि कांतिमान कुंती असे दहा पुत्र झाले. कालिंदीचे हे दहा पुत्र होते. श्रुत, कवी, वृष, वीर, सुबाहू, भद्र, शांती, दर्श, पूर्णमास आणि धाकटा सोमक. (७-१४)

मद्रदेशाची राजकुमारी लक्ष्मणा हिच्यापासून प्रघोष, गात्रवान, सिंह, बल, प्रबल, ऊर्ध्वग, महाशक्ती, सह, ओज आणि अपराजित यांचा जन्म झाला. मित्रविंदेचे वृक, हर्ष, अनिल, गृध्र, वर्धन, अन्नाद, महाश, पावन, वह्नी आणि क्षुधी हे पुत्र होते. भद्रेचे संग्रामजित, बृहत्सेन, शूर, प्रहरण, अरिजित, जय, सुभद्र, वाम, आयू आणि सत्यक हे पुत्र होते. या पट्टराण्यांव्यतिरिक्त भगवंतांच्या रोहिणी इत्यादी आणखीही सोळा हजार एकशे पत्न्या होत्या. त्यांचे दीप्तिमान, ताम्रतप्त इत्यादी पुत्र होते. प्रद्युम्नाचा भोजकट नगरात राहाणाऱ्या रुक्मीची कन्या रुक्मवती हिच्याशी विवाह झाला होता. तिच्यापासून बलशाली अनिरुद्धाचा जन्म झाला. परीक्षिता ! श्रीकृष्णांच्या मुलांच्या सोळा हजार एकशे आठ माता होत्या. म्हणून त्यांच्या पुत्र-पौत्रांची संख्या कोट्यवधी झाली.(१५-१९)

राजाने विचारले- हे विद्वन ! भगवान श्रीकृष्णांनी रणभूमीवर रुक्मीचा पराभव केला होता. त्यामुळे तो श्रीकृष्णांना मारण्यासाठी संधीची वाट पाहात होता. अशा स्थितीत त्याने आपली कन्या शत्रूच्या मुलाला कशी दिली ? या दोन शत्रूंमध्ये पुन्हा परस्पर वैवाहिक संबंध कसा जुळून आला ? कारण योगीजन भूत, भविष्य आणि वर्तमानकाळातील इंद्रियातीत, पुष्कळ लांबच्या किंवा एखाद्या अडथळ्यामुळे न दिसणाऱ्या गोष्टीसुद्धा प्रत्यक्ष पाहात असतात. (२०-२१)

श्रीशुक म्हणतात- प्रद्युम्न मूर्तिमंत कामदेव होता. त्याला रुक्मवतीने स्वयंवरामध्ये स्वत:च

वरमाला घातली. त्यावेळी युद्धामध्ये प्रद्युम्नाने एकट्यानेच तेथे एकत्रित आलेल्या राजांना जिंकले आणि रुक्मवतीचे हरण केले. (२२)

श्रीकृष्णांकडून अपमानित झाल्यामुळे जरी रुक्मीच्या मनातील वैर कायम होते, तरीसुद्धा आपली बहीण रुक्मिणी हिला प्रसन्न करण्यासाठी त्याने आपला भाचा प्रद्युम्न याला आपली कन्या दिली. परीक्षिता ! रुक्मिणीची एक सुंदर चारुमती नावाची कन्या होती. कृतवर्म्याचा पुत्र बली याने तिच्याशी विवाह केला. (२३-२४)

रुक्मीचे श्रीकृष्णांशी वैर होते, तरीसुद्धा आपल्या बहिणीला प्रसन्न करण्यासाठी त्याने आपली नात रोचना हिचा विवाह रुक्मिणीचा नातू अनिरुद्ध याच्याशी लावून दिला. अशा प्रकारचा विवाह-संबंध शास्त्रविरुद्ध होता, हे रुक्मीला माहीत असूनसुद्धा बहिणीच्या प्रेमाखातर त्याने असे केले. राजा ! अनिरुद्धाच्या विवाहसोहळ्यासाठी भगवान श्रीकृष्ण, बलराम, रुक्मिणी, प्रद्युम्न, सांब इत्यादी भोजकट नगरीला आले. विवाहसोहळा संपल्यावर कलिंगनरेश इत्यादी गर्विष्ठ राजे रुक्मीला म्हणाले, "तू बलरामाला द्यूतात जिंकून दाखव. हे राजा रुक्मी ! बलरामाला द्यूत खेळता येत नाही. परंतु खेळण्याचे त्याला जबरदस्त व्यसन आहे." त्या लोकांनी इरेला घातल्याने रुक्मीने बलरामांना बोलावून तो त्यांच्याबरोबर द्यूत खेळू लागला. बलरामांनी अगोदर शंभर, नंतर हजार व त्यानंतर दहा हजार मोहरांचा डाव लावला. ते सर्व रुक्मीने जिंकले. तेव्हा कलिंगराजा दात विचकावून, खदखदा हसून बलरामांची खिल्ली उडवू लागला. बलरामांना ते सहन झाले नाही. यानंतर रुक्मीने एक लक्ष मोहरांचा पण लावला. तो बलरामांनी जिंकला. परंतु रुक्मी लबाडीने म्हणू लागला की, "मी जिंकलो." यावर बलराम पौर्णिमेच्या दिवशी समुद्र खवळावा, तसा रागाने खवळला. त्याचे डोळे स्वभावत:च लाल होते. क्रोधामुळे ते आणखीच लाल झाले. आता त्यांनी दहा कोटी मोहरांचा पण लावला. यावेळीसुद्धा द्यूताच्या नियमानुसार बलरामाचाच जय झाला. परंतु रुक्मीने कपटाने म्हटले, "मी जिंकलो ! या विषयातील तज्ज्ञ याचा निर्णय करू देत." (२५-३२)

त्यावेळी आकाशवाणी झाली की, "नियमानुसार बलरामांनीच हा डाव जिंकला आहे. रुक्मी खोटे बोलतो." यावेळी रुक्मीचा मृत्यू जवळ आला होता. त्यामुळे त्याच्या साथीदार दुष्ट राजांनी त्याला भडकावले. तेव्हा त्याने आकाशवाणीकडे लक्ष न देता बलरामाची खिल्ली उडवीत म्हटले. "तुम्ही वनात भटकणारे गवळी ! द्यूतातले तुम्हांला काय कळणार ? फाशांनी आणि बाणांनी फक्त राजे लोकांनीच खेळावे. तुम्ही नव्हे !" रुक्मीने असा अपमान केल्यामुळे आणि राजेलोकांनी चेष्टा केल्यामुळे बलरामांनी क्रोधाने एका लोखंडी काटे लावलेल्या सोट्याने त्या विवाहमंगलसभेतच रुक्मीला ठार केले. जो कलिंगनरेश अगोदर दात विचकावून हसत होता, तो आता तेथून निसटला, परंतु बलरामांनी दहा पावलांवरच त्याला गाठून क्रोधाने त्याचे दात पाडून टाकले. बलरामांनी त्याच सोट्याने दुसऱ्या राजांचेही हात, मांड्या, मस्तके इत्यादी तोडून टाकली. रक्ताने माखलेले ते भयभीत होऊन तेथून पळू लागले. परीक्षिता ! श्रीकृष्णांनी विचार केला की, बलरामांची प्रशंसा केली तर रुक्मिणी रागावेल आणि हे वाईट केले, असे म्हटले तर बलराम रागावेल. म्हणून आपला मेहुणा रुक्मी याच्या मृत्यूबद्दल ते चांगले अगर वाईट काहीच बोलले नाहीत. यानंतर अनिरुद्धाचा विवाह आणि शत्रूचा वध ही दोन्ही कामे पूर्ण करून भगवंतांचे आश्रित बलराम इत्यादी यादव नवविवाहिता रोचना हिच्यासह अनिरुद्धाला श्रेष्ठ रथात बसवून भोजकट नगरातून द्वारकापुरीला निघून आले. (३३-४०)

अध्याय एकसष्टावा समाप्त

अध्याय बासष्टावा

ऊषा- अनिरुद्ध-मिलन

परीक्षिताने म्हटले- हे महायोगी ! मी असे ऐकले आहे की, यदुश्रेष्ठ अनिरुद्धाने बाणासुराची कन्या ऊषा हिच्याशी विवाह केला होता आणि याप्रसंगी श्रीकृष्ण व शंकरांचे अतिशय घनघोर असे युद्ध झाले होते. हा वृत्तांत आपण विस्तारपूर्वक मला सांगावा. (१)

श्रीशुक म्हणाले- महात्मा बलीची कथा तर तू ऐकलीच आहेस. ज्याने वामनरूपधारी भगवंतांना साऱ्या पृथ्वीचे दान केले होते, त्या महात्म्या बळिराजाला शंभर मुलगे होते. त्यांपैकी सर्वांत थोरल्याचे नाव बाण होते. बळीचा औरस पुत्र भगवान शंकरांच्या भक्तीमध्ये नेहमी गढून गेलेला असे. समाजात त्याच्याविषयी मोठा आदर होता. त्याचे औदार्य आणि बुद्धिमत्ता प्रशंसनीय होती. स्वत:ची प्रतिज्ञा तो पूर्ण करीत असे. शिवाय तो निष्ठेने व्रतपालन करीत असे. त्या काळी तो रमणीय अशा शोणितपुरामध्ये राज्य करीत असे. भगवान शंकरांच्या कृपेने इंद्रादी देव नोकरांप्रमाणे त्याची सेवा करीत होते. त्याला एक हजार हात होते. एके दिवशी शंकर तांडवनृत्य करीत असताना त्याने एक हजार हातांनी अनेक प्रकारची वाद्ये वाजवून त्यांना प्रसन्न करून घेतले. भक्तवत्सल, शरणागताचे रक्षण करणारे आणि भूतमात्राचे स्वामी असलेले शंकर बाणासुराला म्हणाले, ''तुला हवा तो वर माग.'' बाणासुर म्हणाला- ''भगवन ! आपण माझ्या नगराचे रक्षण करीत राहावे.'' (२-५)

बळाचा गर्व चढलेल्या बाणासुराने एके दिवशी त्याच्या शेजारी असलेल्या भगवान शंकरांच्या चरणकमलांना सूर्याप्रमाणे चमकणाऱ्या मुकुटाने स्पर्श करून प्रणाम केला आणि म्हटले. ''हे महादेवा ! आपण सर्व चराचर जगाचे गुरू आणि ईश्वर आहात. मी आपणास नमस्कार करीत आहे. ज्या लोकांचे मनोरथ पूर्ण झालेले नसतात, त्यांचे ते मनोरथ पूर्ण करणारे आपण कल्पवृक्ष आहात. भगवन ! आपण मला एक हजार हात दिले आहेत. परंतु ते मला केवळ भाररूप झाले आहेत. कारण या त्रैलोक्यात आपणाखेरीज माझ्याबरोबरीचा दुसरा कोणीच योद्धा मला आढळत नाही. (६-८)

हे आदिदेवा ! एक दिवस लढाईसाठी माझे हात एवढे सळसळू लागले की, मी पर्वत फोडीत दिग्गजांवर चालून गेलो. परंतु तेसुद्धा मला भिऊन पळून गेले.'' ते ऐकून रागावून भगवान शंकर म्हणाले- ''अरे मूर्खा ! ज्यावेळी तुझी रथावरील ध्वजा मोडून खाली पडेल, त्यावेळी माझ्यासारख्याच योद्ध्याशी तुझे युद्ध होईल आणि तो तुझा गर्व नाहीसा करील.'' परीक्षिता ! हे ऐकून मूर्ख बाणाला अतिशय आनंद झाला आणि तो आपल्या घरी परतला. आता तो मूर्ख, भगवान शंकरांच्या सांगण्याप्रमाणे आपल्या सामर्थ्याचा नाश करणाऱ्या त्या युद्धाची वाट पाहू लागला. (९-११)

त्याची ऊषा नावाची एक कन्या होती. ती अजून कुमारीच होती. तरीसुद्धा एके दिवशी स्वप्नामध्ये तिने पाहिले की, ''अनिरुद्धाशी आपला समागम झालेला आहे.'' विशेष म्हणजे तिने अनिरुद्धाला कधी पाहिले नव्हते की त्याच्याविषयी काही ऐकलेही नव्हते. स्वप्नातच तो न दिसल्याने ती म्हणाली, ''नाथ ! आपण कोठे आहात ?'' असे म्हणतच ती जागी झाली व व्याकूळ होऊन उठून बसली. नंतर आपण सख्यांच्या मध्ये आहोत, असे पाहून अतिशय लज्जित झाली. बाणासुराच्या कुंभांड नावाच्या मंत्र्याची चित्रलेखा नावाची कन्या होती. ऊषा आणि चित्रलेखा एकमेकींच्या मैत्रिणी

होत्या. चित्रलेखेने ऊषेला कुतूहलाने विचारले. ''हे सुंदर राजकुमारी ! अजून तुझे कोणी पाणिग्रहण केलेले नाही. तर मग तू कोणाला शोधीत आहेस ? आणि तुझ्या मनात काय आहे ?'' (१२-१५)

ऊषा म्हणाली- ''गडे ! मी स्वप्नात एक पुरुष पाहिला. त्याच्या शरीराचा वर्ण सावळा असून नेत्र कमलदलाप्रमाणे होते. तो पीतांबर नेसलेला असून त्याचे बाहू पुष्ट होते. तो स्त्रियांना आवडेल, असाच होता. त्याने आपले अधरामृत मला पाजले. तो मला आणखी हवा होता, तेवढ्यात तो मला दु:खसागरात लोटून कुठेतरी निघून गेला. मी माझ्या त्याच प्राणवल्लभाचा शोध घेत आहे. (१६-१७)

चित्रलेखा म्हणाली- ''सखे ! तुझा चित्तचोर त्रैलोक्यात जर असेल, तर मला तो दाखव. मी त्याला आणीन आणि तुझी विरहव्यथा नाहीशी करीन.'' असे म्हणून चित्रलेखेने काही देव, गंधर्व, सिद्ध, चारण, पन्नग, दैत्य, विद्याधर, यक्ष आणि माणसांची हुबेहूब चित्रे काढली. मनुष्यांमध्ये तिने वृष्णिवंशातील शूरसेन, वसुदेव, बलराम आणि श्रीकृष्ण यांची चित्रे काढली. नंतर प्रद्युम्नाचे चित्र पाहाताच ऊषा लाजली. परीक्षिता ! जेव्हा तिने अनिरुद्धाचे चित्र पाहिले, तेव्हा तर लाजेने आपली मान खाली घातली. नंतर स्मितहास्य करीत ती म्हणाली- ''हाच. हाच तो माझा प्राणवल्लभ.'' (१८-२१)

परीक्षिता ! चित्रलेखा योगिनी होती. हा श्रीकृष्णांचा नातू आहे, हे ओळखून ती आकाशमार्गाने श्रीकृष्णांच्या द्वारकापुरीत पोहोचली. तेथे सुंदर पलंगावर झोपलेल्या अनिरुद्धाला योगसिद्धीच्या प्रभावाने चित्रलेखेने उचलून शोणितपुरात आणले आणि सखी ऊषेला तिच्या प्रियतमाचे दर्शन घडविले. आपल्या परमसुंदर प्राणवल्लभाला पाहून आनंदाने तिचे मुखकमल प्रफुल्लित झाले आणि ती त्याच्याशी रममाण झाली. तिच्या त्या अंत:पुराकडे कोणीही पुरुष डोकावूनसुद्धा पाहू शकत नव्हता. ऊषाचे त्याच्यावरील प्रेम दिवसेंदिवस वृद्धिंगत होऊ लागले. ती बहुमोल वस्त्रे, फुलांचे हार, सुगंधी द्रव्ये, धूप, दीप, आसन, सुमधुर पेये, खाद्यपदार्थ, मधुर वाणी इत्यादींनी त्याची सेवा करून त्याला खूष करीत असे. आपल्या प्रेमाने ऊषाने त्याचे मन जिंकून घेतले होते. त्या अंत:पुरात गुप्तपणे तिच्या सहवासात राहिलेल्या अनिरुद्धाला किती दिवस निघून गेले, याचा पत्ताच लागला नाही. (२२-२६)

यदुवीराच्या सहवासाने ऊषाचे कौमार्य नष्ट झाले होते. तिच्या शरीरावर अशी चिह्ने दिसू लागली होती की, जी कोणत्याही प्रकारे लपविली जाऊ शकत नव्हती. ऊषाही अतिशय आनंदी दिसत होती. पहारेकऱ्यांनी ते ओळखून बाणासुराकडे जाऊन सांगितले की, ''राजन ! आपल्या राजकुमारीचे जे काही रंग-ढंग आम्ही पाहात आहोत, ते आपल्या कुळाला बट्टा लावणारे आहेत. हे प्रभो ! सावधपणे आम्ही महालावर पहारा देत असतो. आपल्या कन्येला बाहेरचा मनुष्य पाहूसुद्धा शकत नाही. असे असता ही कलंकित कशी झाली, कळत नाही.'' (२७-२९)

आपल्या कन्येचा कलंक ऐकून बाणासुराला अतिशय वाईट वाटले. तो ताबडतोब ऊषेच्या महालात जाऊन पाहातो, तर तेथे अनिरुद्ध. अनिरुद्ध कामावतार प्रद्युम्नाचा पुत्र होता. त्याच्यासारखा सुंदर त्रिभुवनात दुसरा कोणी नव्हता. त्याच्या सावळ्या शरीरकांतीवर पीतांबर शोभत होता. लांब बाहू होते. कमलदलाप्रमाणे डोळे, कुरळे केस, कुंडलांची दीप्ती आणि मंद मंद हास्ययुक्त नजर यांमुळे मुखाचे सौंदर्य काही आगळेच दिसत होते. त्यावेळी अनिरुद्ध सुंदर वेषभूषा केलेल्या प्रियेबरोबर द्यूत खेळत होता. मोगऱ्याचा हार त्याच्या गळ्यात होता आणि त्या हाराला ऊषाच्या अंगाचा स्पर्श झाल्याने तिच्या वक्ष:स्थळाचे केशर लागले होते. त्याला ऊषेच्या जवळच बसलेला पाहून बाणासुर

आश्चर्यचकित झाला. बाणासुर पुष्कळशा शस्त्रास्त्रांनी सुसज्ज असलेल्या वीर सैनिकांसह महालात घुसल्याचे जेव्हा अनिरुद्धाने पाहिले, तेव्हा त्याला मारण्यासाठी तो लोखंडाचा एक भयंकर परिघ उगारून पवित्र्यात उभा राहिला. जणू कालदंड घेतलेला यमच. ते सैनिक त्याला पकडण्यासाठी जसजसे त्याच्या अंगावर धावून जात, तसतसा तो त्यांना, डुकरांच्या कळपाच्या नायकाने कुत्र्यांना मारावे, त्याप्रमाणे मारू लागला. अनिरुद्धाच्या फटकाऱ्याने त्या सैनिकांची मस्तके, हात, मांड्या इत्यादी अवयव तुटू लागले, तेव्हा ते महालाबाहेर पळून गेले. आपल्या सेनेचा संहार करणाऱ्या त्याला शूर बाणासुराने संतापून नागपाशांनी बांधले. आपल्या प्रियतमाला बांधलेले ऐकून ऊषा शोकाने आणि खेदाने अत्यंत विव्हळ झाली, तिच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहू लागल्या आणि ती रडू लागली. (३०-३५)

अध्याय बासष्टावा समाप्त

अध्याय त्रेसष्टावा

श्रीकृष्णांबरोबर बाणासुराचे युद्ध

श्रीशुक म्हणतात - परीक्षिता ! पावसाळ्याचे चार महिने निघून गेले; परंतु अनिरुद्धाचा शोध लागला नाही. यामुळे त्यांच्या घरातील लोक अतिशय शोकाकुल झाले होते. नारदांकडून अनिरुद्धाचा पराक्रम व त्याचे नागपाशात बांधले जाणे, या घटना ऐकून श्रीकृष्णांनाच आपले दैवत मानणाऱ्या यादवांनी शोणितपुरावर चढाई केली. श्रीकृष्ण आणि बलराम यांच्याबरोबर असलेल्या प्रद्युम्न, सात्यकी, गद, सांब, सारण, नंद, उपनंद, भद्र इत्यादी यादवश्रेष्ठांनी बारा अक्षौहिणी सेनेचा बाणासुराच्या राजधानीला चारी बाजूंनी वेढा दिला. यादवसेना नगरातील उद्याने, तट, बुरुज आणि गोपुरे यांची तोड-फोड करू लागली आहे, हे पाहून क्रोधाविष्ट बाणासुर बारा अक्षौहिणी सेना घेऊन नगराच्या बाहेर पडला. बाणासुराच्या बाजूने भगवान शंकर नंदीवर स्वार होऊन आपले पुत्र आणि गणांसह राम-कृष्णांशी युद्ध करू लागले. परीक्षिता ! ते युद्ध इतके अद्भुत आणि घनघोर झाले की, ते पाहून अंगावर रोमांच उठत. भगवान श्रीकृष्णांशी शंकरांचे आणि प्रद्युम्नाशी कार्तिकेयाचे युद्ध झाले. बलरामांशी कुंभांडाचे आणि कूपकर्णाचे युद्ध झाले. बाणासुराच्या पुत्राला सांब आणि बाणासुराला सात्यकी जाऊन भिडले. ब्रह्मदेव इत्यादी श्रेष्ठ देव, ऋषी, सिद्ध, चारण, गंधर्व, अप्सरा आणि यक्ष विमानांत बसून ते युद्ध पाहाण्यासाठी आले. श्रीकृष्णांनी आपल्या शार्ङ्ग धनुष्यावरून सोडलेल्या तीक्ष्ण टोकाच्या बाणांनी शंकरांचे सेवक असलेले भूत, प्रेत, प्रमथ, गुह्यक, डाकिणी, यातुधान, वेताल, विनायक, प्रेतगण, मातृगण, पिशाच, कूष्मांड आणि ब्रह्मराक्षस यांना मारून पळवून लावले. पिनाकपाणी शंकरांनी शार्ङ्गधारी श्रीकृष्णांवर निरनिराळ्या प्रकारची अस्त्रे फेकली, परंतु श्रीकृष्णांनी कोणत्याही प्रकारे विचलित न होता त्यांना आपल्या विरोधी अस्त्रांनी शांत केले. त्यांनी ब्रह्मास्त्राच्या शांतीसाठी ब्रह्मास्त्राचा, वायव्यास्त्रासाठी पार्वतास्त्राचा, आग्नेयास्त्रासाठी पर्जन्यास्त्राचा आणि पाशुपतास्त्रासाठी नारायणास्त्राचा प्रयोग केला. यानंतर भगवान श्रीकृष्णांनी जृंभणास्त्राने महादेवांना मोहित केले. त्यामुळे ते युद्ध सोडून जांभया देऊ लागले. तेव्हा श्रीकृष्ण तलवार, गदा आणि बाणांनी बाणासुराच्या सेनेचा संहार करू लागले. इकडे प्रद्युम्नाने बाणांच्या वर्षावाने कार्तिकेयाला घायाळ केले. त्याच्या अंगातून रक्ताच्या

धारा वाहू लागल्या. तो रणांगण सोडून आपले वाहन असणाऱ्या मयूरावर बसून निघून गेला. बलरामांनी आपल्या मुसळाच्या प्रहाराने कुंभांड आणि कूपकर्णाला घायाळ केले. ते रणभूमीवर कोसळले. अशा प्रकारे सेनापतींची वाताहत झालेली पाहून त्यांची सेना इकडे तिकडे पळू लागली. (१-१६)

रथावर स्वार झालेल्या बाणासुराला आपली सेना पळत असलेली पाहून अतिशय क्रोध आला. त्याने सात्यकीला सोडले आणि तो श्रीकृष्णांवर धावला. रणोन्मत्त बाणासुराने आपल्या एक हजार हातांनी एकाचवेळी पाचशे धनुष्यांच्या दोऱ्या खेचून प्रत्येकांतून दोन दोन बाण सोडले. परंतु भगवान श्रीकृष्णांनी एकाच वेळी त्याची सर्व धनुष्ये तोडून टाकली आणि त्याचे सारथी, रथ व घोड्यांना मारले व जयशंखध्वनी केला. कोटरा नावाची बाणासुराची एक धर्ममाता होती. आपल्या पुत्राच्या प्राणरक्षणासाठी आपले केस मोकळे सोडून नग्नावस्थेत, ती भगवान श्रीकृष्णांसमोर येऊन उभी राहिली. तिच्यावर आपली दृष्टी पडू नये, म्हणून श्रीकृष्णांनी आपले तोंड दुसरीकडे फिरविले. तोपर्यंत बाणासुराची धनुष्ये व रथ मोडल्यामुळे तो आपल्या नगराकडे परतला. (१७-२१)

इकडे शंकरांचे भूतगण जेव्हा इकडे-तिकडे विखुरले गेले, तेव्हा तीन मस्तके आणि तीन पायांचा ज्वर जणू दाही दिशा जाळीत श्रीकृष्णांवर धावला. तो आपल्याकडे येत असलेला पाहून भगवान श्रीकृष्णांनी आपला ज्वर सोडला. आता वैष्णव आणि माहेश्वर हे दोन्ही ज्वर आपापसात लढू लागले. तेव्हा वैष्णव ज्वराच्या तेजाने माहेश्वर ज्वर हवालदिल होऊन ओरडू लागला आणि तो भयभीत झाला. जेव्हा त्याला कोठेही आश्रय मिळाला नाही, तेव्हा आपले रक्षण व्हावे, म्हणून अत्यंत नम्रतेने हात जोडून तो श्रीकृष्णांना प्रार्थना करू लागला. (२२-२४)

माहेश्वर ज्वर म्हणाला- हे प्रभो ! आपली शक्ती अनंत आहे. आपण परमेश्वर आहात, आत्मा आहात. आपण अद्वितीय आणि परम ज्ञानस्वरूप आहात. संसाराची उत्पत्ती, स्थिती आणि संहार यांचे कारण आपणच आहात. श्रुती आपलेच वर्णन करतात. आपण समस्त विकाररहित असे स्वत: ब्रह्म आहात. मी आपणांस प्रणाम करीत आहे. काल, दैव, कर्म, जीव, स्वभाव, द्रव्य, शरीर, सूत्रात्मा प्राण, अहंकार, अकरा इंद्रिये आणि पंचमहाभूते या सर्वांचा समुदाय असलेले लिंग शरीर आणि बीजांकुर न्यायानुसार त्याचे कर्म व कर्मातून पुन्हा लिंगशरीराची उत्पत्ती, ही सर्व आपली माया आहे. आपण मायेच्या पलीकडे आहात. मी आपणास शरण आलो आहे. आपण लीलेनेच अनेक रूपे धारण करून देव, साधू व लोक-मर्यादांचे पालन करता. त्याचबरोबर उन्मत्त आणि हिंसक अशा असुरांचा संहारही करता. आपला हा अवतार पृथ्वीवरील भार उतरविण्यासाठी झाला आहे. हे प्रभो ! आपल्या शांत, उग्र आणि अत्यंत भयानक, दु:सह अशा तेजस्वी ज्वरामुळे मी अत्यंत तप्त होऊ लागलो आहे. भगवन ! देहधारी जीव जोपर्यंत आशेच्या फासात अडकून आपल्या चरणकमलांना शरण येत नाही, तोपर्यंत त्याचे ठिकाणी ताप राहातोच. (२५-२८)

श्रीभगवान म्हणाले - "हे त्रिशिरा ! मी तुझ्यावर प्रसन्न आहे; आता माझ्या या ज्वरा-पासूनचे तुला वाटणारे भय दूर होवो. जगात जो कोणी आम्हा दोघांच्या या संवादाचे स्मरण करील, त्याला तुझ्यापासून काहीही भय राहाणार नाही. श्रीकृष्णांनी असे म्हटल्यानंतर माहेश्वर ज्वर त्यांना प्रणाम करून निघून गेला. तोपर्यंत बाणासुर रथावर स्वार होऊन श्रीकृष्णांशी युद्ध करण्यासाठी पुन्हा आला. परीक्षिता ! बाणासुराने आपल्या हजार हातांमध्ये निरनिराळ्या प्रकारची शस्त्रे घेतली होती. आता तो अत्यंत क्रोधाने चक्रपाणी भगवंतांवर

बाणांचा वर्षाव करू लागला. श्रीकृष्णांनी एकसारखी अस्त्रे फेकणाऱ्या बाणासुराचे हात तीक्ष्ण धारेच्या चक्राने झाडाच्या फांद्या तोडाव्या, तसे तोडून टाकले. बाणासुराचे हात तोडले जात असताना भक्तवत्सल भगवान शंकर, चक्रधारी भगवान श्रीकृष्णांजवळ येऊन स्तुती करू लागले. (२९-३३)

भगवान शंकर म्हणाले - हे प्रभो ! वेदमंत्रांमध्ये आपण तात्पर्यरूपाने गुप्त असणारे, परम-ज्योतिस्वरूप, परब्रह्म आहात. शुद्ध हृदयाचे महात्मे आपल्या आकाशाप्रमाणे सर्वव्यापक आणि निर्विकार अशा स्वरूपाचा साक्षात्कार करून घेतात. आकाश आपली नाभी, अग्नी मुख आणि पाणी वीर्य आहे. स्वर्ग मस्तक, दिशा कान आणि पृथ्वी चरण आहे. चंद्र मन, सूर्य नेत्र आणि मी शिव आपला अहंकार आहे. समुद्र आपले पोट आणि इंद्र हात आहे. वनस्पती रोम आहेत, मेघ केस आहेत, ब्रह्मदेव बुद्धी आहे, प्रजापती लिंग आणि धर्म हृदय आहे. अशा प्रकारे आपणच विराट पुरुष आहात. हे अखंडज्योतिस्वरूप परमात्मन ! आपला हा अवतार धर्माचे रक्षण आणि जगाचे कल्याण व्हावे, यासाठी आहे. आम्ही सर्वजण आपल्या प्रभावानेच संपन्न होऊन सातही भुवनांचे पालन करीत असतो. आपण सजातीय, विजातीय आणि स्वगतभेदरहित. एकमेव आणि अद्वितीय असे आदिपुरुष आहात. तुर्यतत्त्व आपणच आहात. आपण स्वयंप्रकाश आहात. आपण सर्वांचे कारण आहात, परंतु आपले कोणीही कारण नाही. असे असूनही आपण तिन्ही गुणांचे वेगळेपण प्रकाशित करण्यासाठी आपल्या मायेने देव, पशु-पक्षी, मनुष्य इत्यादी शरीरांनुसार वेगवेगळ्या रूपाने प्रतीत होता. हे प्रभो ! ज्याप्रमाणे सूर्य आपलीच छाया असलेल्या ढगांनीच झाकला जातो आणि तो ढगाला व वेगवेगळ्या रूपांना प्रकाशित करतो, त्याप्रमाणे आपण स्वयंप्रकाश तर आहातच, परंतु गुणांमुळे जणू झाकले जाता आणि समस्त गुण तसेच गुणाभिमानी जीवांना प्रकाशित करता. वास्तविक आपण अनंत आहात. (३४-३९)

आपल्या मायेने मोहित होऊन लोक स्त्री-पुत्र, देह-घर इत्यादींमध्ये आसक्त होतात आणि पुन्हा दुःखाच्या अथांग समुद्रात गटांगळ्या खातात. जो मनुष्य हे मानवी शरीर मिळून सुद्धा आपली इंद्रिये ताब्यात ठेवीत नाही आणि तुमच्या चरणकमलांचा आश्रय घेत नाही, त्याचे जीवन अत्यंत शोचनीय होय. तो स्वतःच स्वतःला फसवणारा समजावा. सर्व प्राण्यांचे आत्मा, प्रियतम आणि ईश्वर असणाऱ्या आपल्याला जो मनुष्य सोडतो आणि याउलट असणाऱ्या तुच्छ विषयांमध्येच रमतो, तो अमृत सोडून विष पितो. मी, ब्रह्मदेव, सर्व देवता आणि विशुद्ध हृदयाचे ऋषी सर्वात्मभावाने आपल्यालाच शरण असतात. कारण आपणच सर्वांचे आत्मा, प्रियतम आणि ईश्वर आहात. आपण जगाची उत्पत्ती, स्थिती आणि लयाचे कारण आहात. आपण सर्वांचे ठायी, सम, परम शांत, सर्वांचे सुहृद, आत्मा आणि इष्टदेव आहात. आपण एक, अद्वितीय आणि जगताचे आधार तसेच अधिष्ठान आहात. हे प्रभो ! आम्ही सर्वजण या जन्म-मृत्युरूप संसारचक्रातून मुक्त होण्यासाठी आपले भजन करीत आहोत. (४०-४४)

हे देवा ! हा बाणासुर माझा परमप्रिय, कृपेला पात्र झालेला सेवक आहे. मी याला अभय दिले आहे. प्रभो ! याचे पणजोबा प्रह्लाद याच्यावर आपली जशी कृपा आहे, तशीच कृपा याच्यावरही असावी. (४५)

श्रीकृष्ण म्हणाले- भगवन ! आपण आम्हांला जे सांगितले, त्याप्रमाणे आपल्याला प्रिय असणारे मी करीन. याच्यासाठी आपण पूर्वी जे ठरवले होते त्याला अनुसरूनच मी याचे हात तोडले आहेत. बाणासुर बलीचा पुत्र आहे, म्हणून मी याचा वध

७७२ श्रीमद्भागवत [अ० ६१

करू शकत नाही. कारण मी प्रह्लादाला वर दिला आहे की, ''तुझ्या वंशातील कोणाचाही मी वध करणार नाही.'' याचा गर्व नाहीसा करण्यासाठीच मी याचे हात तोडले आहेत. तसेच जी सेना पृथ्वीला भार झाली होती, तिचा मी संहार केला. याचे चार हात अजून शिल्लक आहेत. ते अजर व अमर होतील. आपल्या पार्षदांमध्ये हा प्रमुख असेल. आता याला कोणापासूनही कोणत्याही प्रकारची भीती नाही. (४६-४९)

अशा प्रकारे श्रीकृष्णांकडून अभय मिळाल्यावर बाणासुराने त्यांच्याजवळ येऊन जमिनीवर डोके टेकवून त्यांना नमस्कार केला आणि आपली कन्या ऊषा हिच्यासह अनिरुद्धाला रथात बसवून भगवंतांकडे घेऊन आला. यानंतर श्रीकृष्णांनी महादेवांच्या संमतीने वस्त्रालंकारविभूषित ऊषा आणि अनिरुद्ध यांना पुढे करून एक अक्षौहिणी सेनेसह द्वारकेकडे प्रस्थान केले. इकडे द्वारका ध्वजतोरणांनी सजविली गेली. सडका आणि चौकांमध्ये चंदनमिश्रित पाण्याचा सडा शिंपडला गेला. नगरातील नागरिक, बांधव आणि ब्राह्मण सामोरे आले. त्यावेळी शंख, नगारे आणि ढोल यांचा तुंबळ आवाज होत होता. अशा प्रकारे भगवान श्रीकृष्णांनी आपल्या राजधानीमध्ये प्रवेश केला. (५०-५२)

परीक्षिता ! जो कोणी श्रीशंकरांच्याबरोबर श्रीकृष्णांचे युद्ध आणि त्यांचा विजय, या कथेचे प्रातःकाळी उठल्यावर स्मरण करतो, त्याचा कधीही पराजय होत नाही. (५३)

अध्याय त्रेसष्टावा समाप्त

अध्याय चौसष्टावा

नृग राजाची कथा

श्रीशुक म्हणतात- परीक्षिता ! एके दिवशी सांब, प्रद्युम्न, चारुभानू, गद इत्यादी यदुवंशी राजकुमार फिरण्यासाठी उपवनात गेले. तेथे पुष्कळ वेळपर्यंत खेळ खेळल्याने त्यांना तहान लागली. तेव्हा ते इकडे तिकडे पाण्याचा शोध घेऊ लागले. त्यांना एका पाणी नसलेल्या विहिरीत एक विचित्र प्राणी दिसला. तो प्राणी म्हणजे पर्वताच्या आकाराचा एक सरडा होता. त्याला पाहून ते आश्चर्यचकित झाले. त्यांना त्याची दया येऊन ते त्याला बाहेर काढण्याचा प्रयत्न करू लागले.परंतु ती मुले जेव्हा त्या विहिरीत पडलेल्या सरड्याला कातडी दोराने बांधूनही बाहेर काढू शकली नाहीत, तेव्हा कुतूहलाने जाऊन त्यांनी ती गोष्ट श्रीकृष्णांना सांगितली. जगाचे जीवनदाते कमलनयन भगवान श्रीकृष्ण त्या विहिरीपाशी आले. त्या सरड्याला पाहून आपल्या डाव्या हाताने सहज त्यांनी त्याला बाहेर काढले. भगवान श्रीकृष्णांच्या करकमलाचा स्पर्श होताच सरड्याचे रूप टाकून तो एका स्वर्गीय देवतेच्या रूपात प्रगट झाला. आता त्याच्या शरीराचा रंग तापलेल्या सोन्याप्रमाणे चमकू लागला होता; आणि त्याच्या शरीरावर अद्भुत वस्त्रे, अलंकार आणि फुलांचे हार दिसू लागले होते. या दिव्य पुरुषाला सरड्याची योनी का प्राप्त झाली, हे जरी श्रीकृष्णांना माहीत होते, तरीसुद्धा ते कारण सर्वसाधारण माणसांना माहीत व्हावे म्हणून त्यांनी त्याला विचारले, ''हे महाभागा ! तू अत्यंत रूपवान आहेस. कोण तू ? खात्रीने तू कोणीतरी श्रेष्ठ देव असावास, असेच मला वाटते. हे कल्याणमूर्ते ! कोणत्या कर्मामुळे तुला या योनीमध्ये यावे लागले ? तुझी अशी दशा होणे योग्य नव्हते. आम्ही तुझा

वृत्तांत जाणू इच्छितो. तो आम्हांला सांगणे तुला योग्य वाटत असेल, तर सांग." (१-८)

श्रीशुक म्हणतात- जेव्हा अनंतमूर्ती श्रीकृष्णांनी राजाला असे विचारले, तेव्हा त्याने आपला सूर्यासारखा तेजस्वी मुकुट भगवंतांच्या चरणांवर टेकवून त्यांना प्रणाम करून म्हटले. (९)

नृग म्हणाला- प्रभो ! मी इक्ष्वाकूचा पुत्र नृग नावाचा राजा आहे. जर एखाद्याने आपल्यासमोर दानशूर पुरुषांचा उल्लेख केला असेल, तर त्यावेळी माझे नावही आपल्या कानांवर आले असेल. हे प्रभो ! आपण सर्व प्राण्यांच्या अंत:करणाचे साक्षी आहात. काळाचा पडदा आपल्या अखंड ज्ञानामध्ये बाधा आणू शकत नाही. म्हणून आपल्याला अज्ञात असे काय असणार आहे ? असे असूनही 'आपली आज्ञा' म्हणून मी सांगतो. हे भगवन ! पृथ्वीवर जेवढे धुळीचे कण आहेत, आकाशात जितके तारे आहेत आणि पावसाळ्यात पाण्याच्या जेवढ्या धारा पडतात, तितक्या गायी मी दान केल्या होत्या. त्या गाई दुधाळ, तरुण, साध्या, सुंदर, सुलक्षणी आणि कपिला होत्या. न्यायार्जित धनाने मी त्या प्राप्त केल्या होत्या. सर्वांना वासरे होती. त्यांची शिंगे सोन्याने मढविलेली होती आणि खूर चांदीने. रेशमी वस्त्रे, हार आणि दागिन्यांनी त्यांना सजविले होते. अशा गायी मी दान दिल्या होत्या. जे श्रेष्ठ ब्राह्मणकुमार सद्गुणी, शीलसंपन्न, कुटुंबपोषणास असमर्थ, सत्यशील, तपस्वी, वेदपाठी, शिष्यांना विद्यादान करणारे, चारित्र्यसंपन्न आणि तरुण होते, त्यांना मी वस्त्रे, अलंकार देऊन गाईंचे दान करीत असे. अशा प्रकारे मी पुष्कळशा गायी, जमीन, सोने, घरे, घोडे, हत्ती, दासींसहित कन्या, तिळांचे पर्वत, चांदी, अंथरुणे, वस्त्रे, रत्ने, गृहसामग्री आणि रथ इत्यादींचे दान केले. अनेक यज्ञ केले आणि पुष्कळशा विहिरी, तलाव इत्यादी बांधले. (१०-१५)

एके दिवशी एका तपस्वी ब्राह्मणाची एक चुकलेली गाय माझ्या गायींमध्ये येऊन मिसळली. मला याची कल्पना नव्हती. मी नकळत ती गाय दुसऱ्या एका ब्राह्मणाला दान दिली. जेव्हा ती गाय तो ब्राह्मण घेऊन चालला, तेव्हा त्या गाईचा मूळ मालक त्याला म्हणाला, "ही गाय माझी आहे." दान घेणारा ब्राह्मण म्हणाला, "ही माझी आहे. कारण नृग राजाने मला ही दान दिली आहे." ते दोघे ब्राह्मण आपापसात भांडण करीत आपलेच म्हणणे खरे आहे, हे पटविण्यासाठी माझ्याकडे आले. एकजण म्हणाला, "ही गाय आपण मला दिली आहे;" व दुसरा म्हणाला, "असे असेल, तर तू माझ्या गाईची चोरी केली आहेस." ते ऐकून माझे चित्त गोंधळून गेले. मी धर्मसंकटात सापडलो आणि त्या दोघांना अत्यंत नम्रतेने म्हणालो की, "हिच्या बदल्यात मी आपणास एक लक्ष उत्तम गाई देईन. आपण ही गाय मला परत द्या. मी आपला सेवक आहे. नकळतपणे माझ्या हातून हा अपराध घडला आहे. आपण माझ्यावर कृपा करा आणि मला अमंगळ नरकात जाऊन पडण्याच्या संकटातून वाचवा." "राजन ! मी हिच्या बदल्यात काहीही घेणार नाही." असे म्हणून गाईचा मूळ मालक निघून गेला. "तू हिच्या बदल्यात एक लक्षच काय, दहा हजार आणखी गाई दिल्यास तरीसुद्धा मला नकोत," असे म्हणून दुसरा ब्राह्मणसुद्धा निघून गेला. देवाधिदेव जगदीश्वरा ! आयुष्य संपल्यावर यमराजाच्या दूतांनी मला यमपुरीला नेले. तेथे यमराजाने मला विचारले. राजा ! तू अगोदर आपल्या पापाचे फळ भोगू इच्छितोस की पुण्याचे ? तू केलेले दान आणि धर्म याचे फळ म्हणून तुला असा तेजस्वी लोक प्राप्त होणार आहे की, ज्याला तोड नाही. प्रभो ! तेव्हा मी यमराजाला म्हणालो, "देवा ! मी अगोदर पापाचे फळ भोगू इच्छितो." आणि त्याचक्षणी

यमराज म्हणाला, 'पड जा'. त्याने असे म्हणताच मी तेथून खाली पडत असतानाच पाहिले की, आपण सरडा झालो आहे. हे प्रभो ! मी ब्राह्मणांचा सेवक, दानशूर आणि आपला भक्त होतो. आपले दर्शन व्हावे, अशी माझी उत्कट इच्छा होती. आपल्या कृपेनेच माझी पूर्वजन्माची आठवण अजून नाहीशी झाली नाही. भगवन ! आपण परमात्मा आहात. शुद्ध अंत:करणाचे योगेश्वर उपनिषदांच्या दृष्टीने स्वत:च्या हृदयात आपले ध्यान करीत असतात. हे इंद्रियातीत परमात्मन ! सरडा होण्याच्या मोठ्या दु:खामुळे मी विवेकहीन झालो असतानाही आपण साक्षात माझ्या दृष्टीसमोर कसे आलात ? जेव्हा प्रपंचातून सुटण्याची वेळ येते, तेव्हाच आपले दर्शन होते. हे देवदेवा ! हे पुरुषोत्तमा ! गोविंदा ! हे अविनाशी अच्युता ! पवित्रकीर्ते ! हे नारायणा ! हे हृषीकेशा ! हे प्रभो ! मी आता देवलोकी चाललो. आपण मला अनुमती द्यावी. हे श्रीकृष्णा ! मी कोठेही असलो, तरी माझे चित्त नेहमी आपल्या चरणकमलांवर स्थिर असावे. सर्व विश्वरूप, अनंतशक्ती, ब्रह्मस्वरूप अशा आपणांस मी नमस्कार करीत आहे. हे वासुदेवा ! श्रीकृष्णा ! योगेश्वरा ! मी आपणांस नमस्कार करीत आहे. (१६-२९)

असे म्हणून नृगाने भगवंतांना प्रदक्षिणा घातली आणि आपल्या मुगुटाने त्यांच्या चरणांना स्पर्श करून नमस्कार केला. नंतर त्यांची आज्ञा घेऊन सर्वजण पाहात असतानाच तो श्रेष्ठ विमानात बसला. (३०)

ब्राह्मणांना देव मानणारे, धर्माचा आधार असलेले देवकीनंदन भगवान श्रीकृष्ण क्षत्रियांना उपदेश करण्यासाठी म्हणून तेथे उपस्थित असलेल्यांना म्हणाले. "जे लोक अग्नीसारखे तेजस्वी असतात, तेसुद्धा ब्राह्मणांचे अल्पसेसुद्धा धन हिरावून घेऊन पचवू शकत नाहीत. तर मग स्वत:ला लोकांचे स्वामी समजणारे राजे कसे पचवू शकतील ? मी हालाहल विषाला विष मानीत नाही. कारण त्याच्यावर उपाय आहे. पण ब्राह्मणांचे धनच महान विष आहे. ते पचविण्याचा पृथ्वीवर कोणताही उपाय नाही. विष केवळ खाणाऱ्याचेच प्राण घेते. आग पाण्याने विझविली जाऊ शकते. परंतु ब्राह्मणांच्या धनरूप अग्नीपासून जी आग उत्पन्न होते, ती सर्व कुळाला मुळापासून जाळून टाकते. जर ब्राह्मणाच्या पूर्ण संमतीशिवाय त्याचे धन उपभोगले, तर ते तीन पिढ्यांना नष्ट करते आणि जर बळजबरीने त्याचा उपभोग घेतला, तर त्यामुळे भोगणाऱ्याच्या पूर्वजांच्या दहा पिढ्या आणि भविष्यातीलसुद्धा दहा पिढ्या नष्ट होतात. जे मूर्ख राजे आपल्या राजलक्ष्मीमुळे आंधळे बनून ब्राह्मणांचे धन हिरावून घेऊ इच्छितात, ते नरकात जाण्याचीच इच्छा करतात. स्वत:ला अध:पतनाच्या किती खोल खड्ड्यात पडावे लागेल, हे ते पाहात नाहीत. ज्या उदारहृदय, कुटुंबवत्सल ब्राह्मणांच्या उदरनिर्वाहाचे साधन हिरावून घेतले जाते, त्यांच्या रडण्याने पडणाऱ्या त्यांच्या अश्रूंच्या थेंबांनी जमिनीवरील जितके धूलिकण भिजतात, तितकी वर्षेपर्यंत ब्राह्मणांचे धन हिरावून घेणाऱ्या उच्छृंखल राजांना आणि त्यांच्या वंशजांना कुंभीपाक नरकांमध्ये दु:ख भोगावे लागते. जो माणूस आपण किंवा दुसऱ्यांनी ब्राह्मणांना दिलेली वृत्ती हिरावून घेतो, तो साठ हजार वर्षे विष्ठेतील किडा होतो. म्हणून मला वाटते की, ब्राह्मणांचे धन नजरचुकीनेसुद्धा माझ्या खजिन्यात येऊ नये. कारण जे लोक ब्राह्मणांच्या धनाची इच्छा करतात, ते या जन्मामध्ये अल्पायुषी, शत्रूंकडून पराभूत आणि राज्यभ्रष्ट होऊन जातात. तसेच मृत्यूनंतरसुद्धा दुसऱ्यांना त्रास देणारे सापच होतात. म्हणून माझ्या आप्तांनो ! ब्राह्मणांनी जरी अपराध केला तरीसुद्धा त्यांचा द्वेष करू नका. त्यांनी जरी मारले किंवा पुष्कळसे शिव्याशाप दिले, तरी तुम्ही त्यांना नेहमी नमस्कारच करा. मी जसा

सावध राहून वेळोवेळी ब्राह्मणांना नमस्कार करतो, त्याचप्रमाणे तुम्हीही करा. जे असे करणार नाहीत, त्यांना मी शिक्षा करीन. नकळतही ब्राह्मणाचे हिरावून घेतलेले धन हिरावून घेणाऱ्याचा अध:पात करते. जसे ब्राह्मणाच्या गायीने राजा नृगाला सरडा केले. सर्व लोकांना पवित्र करणाऱ्या भगवान श्रीकृष्णांनी द्वारकावासियांना अशाप्रकारे उपदेश करून ते आपल्या महालात निघून गेले. (३१-४४)

अध्याय चौसष्टावा समाप्त

अध्याय पासष्टावा

श्रीबलरामांचे व्रजाकडे जाणे

श्रीशुक म्हणतात - परीक्षिता ! भगवान बलरामांना व्रजातील स्वजनांना भेटण्याची अत्यंत उत्कंठा लागली. म्हणून ते रथावर स्वार होऊन नंद-गोकुळात गेले. इकडे व्रजवासी गोप आणि गोपीसुद्धा त्यांना भेटण्यासाठी पुष्कळ दिवसांपासून उत्सुक होत्या. ते आल्याचे पाहून सर्वांनी त्यांना आलिंगन दिले. बलरामांनी माता-पित्यांना नमस्कार केला. त्यांनीसुद्धा त्यांना आशीर्वाद देऊन त्यांचे स्वागत केले. ''बलरामा ! जगदीश्वर असा तू धाकटा भाऊ श्रीकृष्णासह नेहमी आमचे रक्षण करीत राहा.'' असे म्हणून त्यांनी त्यांना मांडीवर घेऊन आलिंगन देऊन आपल्या प्रेमाश्रूंनी भिजविले. यानंतर ज्येष्ठ गोपांना बलरामांनी आणि कनिष्ठ गोपांनी बलरामांना नमस्कार केला. ते आपले वय, मैत्री आणि संबंधानुसार सर्वांना भेटले. नंतर गोपालांच्याजवळ जाऊन कोणाशी हस्तांदोलन केले. तर कोणाला खूप हसविले. यानंतर जेव्हा बलराम विश्रांतीनंतर निवांत बसले, तेव्हा सर्व गोपाल त्यांच्याजवळ आले. त्यांनी कमलनयन श्रीकृष्णांसाठी सर्व विषयांचा त्याग केला होता. बलरामांनी जेव्हा त्यांच्यासंबंधी आणि त्यांच्या घरच्यांच्यासंबंधी विचारपूस केली, तेव्हा त्यांनी प्रेमाने सद्गदित झालेल्या वाणीने त्यांना विचारले. ''बलरामा ! आमचे सर्व बांधव खुशाल आहेत ना ? आता तुम्ही बायकामुलांबरोबर राहात असता. तर आमची तुम्हांला कधी आठवण येते का ? पापी कंसाला आपण मारले आणि आपल्या आप्तेष्टांना मोठ्या संकटातून वाचविले, हे चांगले झाले. आपण आणखीही पुष्कळ शत्रूंना मारलेत किंवा जिंकलेत आणि अत्यंत सुरक्षित ठिकाणी जाऊन राहात आहात. हेही उत्तम झाले.'' (१-८)

बलरामांच्या दर्शनाने खूष झालेल्या गोपींनी हसून विचारले, ''बलरामा ! शहरी स्त्रियांचे प्राणवल्लभ श्रीकृष्ण खुशाल आहेत ना ? आपल्या बांधवांची, माता-पित्यांची त्यांना कधी आठवण येते का ? आपल्या आईला भेटण्यासाठी ते एकदा तरी येणार काय ? पराक्रमी श्रीकृष्णांना कधी आम्ही केलेल्या सेवेची आठवण येते का ? आपल्या माणसांना सोडणे किती कठीण असते ! तरीसुद्धा आम्ही त्यांच्यासाठी आमचे आई-वडील, भाऊ, पति-पुत्र, बहिणी यांनासुद्धा सोडून दिले. परंतु, हे प्रभो ! त्यांनी अगदी सहजपणे आमचे प्रेमाचे बंधन तोडून आम्हांला सोडून ते निघून गेले. त्यांच्या त्या गोड गोड बोलण्यावर आम्ही भाबड्या स्त्रिया विश्वास कसा बरे ठेवणार नाही ?'' एक गोपी म्हणाली, ''आम्ही तर अडाणीच. आमचे जाऊ दे. परंतु शहरातील चतुर स्त्रिया चंचल आणि कृतघ्न श्रीकृष्णांच्या बोलण्याला कशा बरे फसतील ?'' त्यावर दुसरी गोपी म्हणाली, ''अग ! का नाही फसणार ! ते गोड गोड बोलण्यात मोठे पटाईत आहेत ना ! शिवाय त्यांचे ते सुंदर स्मितहास्ययुक्त पाहाणे, यामुळे शहरातील त्या स्त्रियासुद्धा प्रेमावेगाने

स्वत:ला विसरून त्याकूल होत असतील आणि त्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवत असतीलच.'' तिसरी गोपी म्हणाली, ''गोपींनो ! त्यांच्याबद्दल कशाला बोलता ? दुसरा एखादा विषय काढा. जर त्या निर्दयाचा वेळ आमच्याखेरीज जात असेल, तर आमचाही वेळ त्याच्यासारखाच का जाऊ नये ?'' गोपी आता भगवान श्रीकृष्णांचे हसत बोलणे, सुंदर पाहाणे, चालणे, प्रेमालिंगन इत्यादी गोष्टी आठवून रडू लागल्या. (९-१५)

निरनिराळ्या प्रकारे समजूत घालण्यात निपुण असलेल्या भगवान बलरामांनी श्रीकृष्णांचे हृदयस्पर्शी संदेश सांगून गोपींचे सांत्वन केले. रात्रीच्या वेळी गोपींबरोबर राहून त्यांचे प्रेम वृद्धिंगत करीत भगवान रामांनी चैत्र आणि वैशाख असे दोन महिने तेथेच घालविले. (१६-१७)

त्यावेळी कमलपुष्पांचा सुगंध घेऊन मंद वारा वाहात असे. पूर्ण चंद्राचे चांदणे यमुनेच्या काठावरील उपवन शुभ्र करीत असे. आणि भगवान बलराम गोपींसह तेथेच विहार करीत असत. वरुणदेवाने आपली कन्या वारुणीदेवीला तेथे पाठविले होते. ती एका झाडाच्या खोडातून वाहात बाहेर पडून आपल्या सुगंधाने सगळे वन सुगंधित करी. मधुधारेचा तो सुगंध वायूने बलरामांना भेट म्हणून दिला. त्याच्या सुगंधाने आकृष्ट होऊन बलराम गोपींना घेऊन तेथे पोहोचले आणि त्यांच्यासह त्यांनी ती प्राशन केली. गोपी त्यावेळी बलरामांच्या चारही बाजूंनी राहून त्यांच्या चरित्राचे गायन करीत होत्या आणि ते धुंद होऊन वनामध्ये विहार करीत होते. आनंदाने त्यांचे डोळे मादक दिसत होते. गळ्यामध्ये फुलांचा हार व वैजयंतीमाला होती. त्यांच्या एका कानात कुंडल झळकत होते. मुखकमलावर स्मित होते. त्यावर आलेले घामाचे बिंदू दवबिंदूसारखे दिसत होते. जलक्रीडा करण्यासाठी सर्वशक्तिमान बलरामांनी यमुना नदीला बोलावले. हे यावेळी वारुणीच्या नशेत आहेत असे पाहून यमुना नदी आली नाही. तेव्हा तिने आपले म्हणणे मानले नाही म्हणून बलरामांनी क्रोधाने आपल्या नांगराच्या टोकाने तिला खेचून घेतले. ''हे पापिणी ! मी बोलावूनसुद्धा तू माझा अपमान करून इकडे आली नाहीस. आता मी नांगराच्या टोकाने स्वत:च्या मनाप्रमाणे वागणाऱ्या तुझे शेकडो तुकडे करतो.'' राजा ! बलरामांनी जेव्हा यमुनेला असे फटकारले, तेव्हा आश्चर्यचकित आणि भयभीत होऊन बलरामांच्या चरणांवर तिने लोटांगण घातले आणि ती त्यांची प्रार्थना करू लागली. ''हे रामा ! हे रामा ! हे महाबाहो ! हे जगत्पते ! ज्यांचा अंश असलेला शेष हे सर्व जग धारण करतो, त्या आपला पराक्रम माझ्या लक्षात आला नाही. हे सर्वस्वरूप भक्तवत्सल भगवन ! आपण परम ऐश्वर्यशाली आहात. आपले खरे स्वरूप न जाणल्याकारणानेच माझ्याकडून हा अपराध घडला. मी आपल्याला शरण आले आहे. मला सोडून द्यावे. (१८-२७)

त्या प्रार्थनेचा स्वीकार करून भगवान बलरामांनी तिला सोडून दिले. नंतर गजराज जसा हत्तिणींबरोबर क्रीडा करतो, त्याप्रमाणे ते गोपींबरोबर जलक्रीडा करू लागले. यथेष्ट विहार करून जेव्हा ते यमुना नदीच्या बाहेर आले, तेव्हा लक्ष्मीने त्यांना निळी वस्त्रे, बहुमोल अलंकार आणि सोन्याचा सुंदर हार दिला. बलरामांनी निळी वस्त्रे परिधान केली आणि सोन्याचा हार गळ्यात घातला. अंगाला चंदन लावून व सुंदर अलंकारांनी विभूषित होऊन ते ऐरावतासारखे शोभू लागले. परीक्षिता ! अजूनही बलरामांनी ओढून आणलेल्या मार्गानेच यमुना नदी वाहात आहे. त्यामुळे जणू अनंतशक्ती भगवान बलरामांच्या यशाचे ती गायन करीत आहे, असे वाटते. व्रजवासी गोपींच्या माधुर्याने बलरामांचे चित्त अशा प्रकारे मुग्ध झाले होते की, व्रजात विहार करताना पुष्कळ रात्री एकच रात्र असल्यासारख्या त्यांना वाटल्या. (२८-३२)

अध्याय पासष्टावा समाप्त

अध्याय सहासष्टावा

पौंड्रक आणि काशिराजाचा उद्धार

श्रीशुक म्हणतात - परीक्षिता ! बलराम जेव्हा नंदबाबांच्या व्रजामध्ये गेले होते, तेव्हा इकडे करूष देशाचा अज्ञानी राजा पौंड्रक याने श्रीकृष्णांकडे एक दूत पाठवून असे कळविले की, ''भगवान वासुदेव मी आहे.'' मूर्ख लोक त्याला चिथावणी देत होते की, ''आपणच भगवान वासुदेव आहात आणि जगाचे रक्षण करण्यासाठी पृथ्वीवर अवतीर्ण झाला आहात.'' त्यामुळे तो मूर्ख स्वत:लाच भगवान समजू लागला. लहान मुले खेळताना ज्याप्रमाणे एखाद्या मुलाला राजा करतात आणि तो राजाप्रमाणे त्यांच्याशी वागू लागतो. त्याप्रमाणे मंदबुद्धी अज्ञानी पौंड्रकाने, अचिंत्यस्वरूप भगवान श्रीकृष्णांकडे द्वारकेला आपला दूत पाठविला. पौंड्रकाचा दूत द्वारकेला आला आणि राजसभेत बसलेल्या कमलनयन भगवान श्रीकृष्णांना त्याने राजाचा निरोप सांगितला. (१-४)

''मीच एकमात्र वासुदेव आहे. दुसरा कोणी नाही. प्राण्यांवर कृपा करण्यासाठी मीच अवतार धारण केला आहे. तू आपले वासुदेव असे खोटेच नाव घेतले आहेस. ते आता टाकून दे. हे यादवा ! तू मूर्खपणाने माझी चिह्ने धारण केली आहेस. ती टाकून मला शरण ये. नाहीतर माझ्याशी युद्ध कर.'' (५-६)

श्रीशुक म्हणतात - मंदबुद्धी पौंड्रकाची ही बडबड ऐकून उग्रसेन इत्यादी सभासद जोरजोराने हसू लागले. त्या लोकांचे हसणे संपल्यावर भगवान श्रीकृष्ण दूताला म्हणाले - ''तू आपल्या राजाला सांग की, ''अरे मूर्खा ! मी माझी चक्र इत्यादी चिह्ने तुझ्यावर व ज्या साथीदारांच्या चिथावणीवरून तू ही बडबड करीत आहेस, त्यांच्यावरही सोडीन. त्यावेळी हे मूर्खा ! तू आपले तोंड लपवून घार, गिधाड, होला, इत्यादी मांसभक्षण करणाऱ्या पक्ष्यांच्या गराड्यात पडून राहाशील आणि कुत्र्यांना शरण जाशील.'' दूताने भगवंतांचा हा तिरस्कारयुक्त निरोप पौंड्रकाला जसाच्या तसा सांगितला. इकडे श्रीकृष्णांनीसुद्धा रथावर स्वार होऊन काशीवर चढाई केली. (कारण तो राजा त्यावेळी मित्र असलेल्या काशिराजाजवळ राहात होता.) (७-१०)

भगवान श्रीकृष्णांनी आक्रमण केल्याची बातमी ऐकून महारथी पौंड्रकसुद्धा दोन अक्षौहिणी सेनेसह ताबडतोब नगराच्या बाहेर आला. काशीचा राजा पौंड्रकाचा मित्र होता. म्हणून तो सुद्धा त्याला साहाय्य करण्यासाठी तीन अक्षौहिणी सेनेसह त्याच्या पाठोपाठ आला. परीक्षिता ! त्यावेळी श्रीकृष्णांनी पौंड्रकाला पाहिले. पौंड्रकानेसुद्धा शंख, चक्र, तलवार, गदा, शार्ङ्गधनुष्य आणि श्रीवत्सचिह्न इत्यादी धारण केले होते. त्याच्या छातीवर कौस्तुभमणी आणि गळ्यात वनमालासुद्धा होती. त्याने रेशमी पीतांबर परिधान केले होते आणि रथाच्या ध्वजावर गरुडचिह्नसुद्धा लावून ठेवले होते. त्याच्या मस्तकावर मौल्यवान मुगुट होता आणि कानांमध्ये मकराकृती कुंडले झगमगत होती. जशी एखाद्या नटाने रंगमंचावर वेषभूषा करावी, तशी आपल्यासारखीच त्याची कृत्रिम वेष-भूषा पाहून श्रीकृष्ण खदखदा हसू लागले. आता शत्रूंनी श्रीकृष्णांवर त्रिशूल, गदा, मुद्गर, शक्ती, ऋष्टी, प्रास, तोमर, तलवारी, पट्टिश आणि बाण या शस्त्रास्त्रांचा मारा केला. प्रलयाच्या वेळी ज्याप्रमाणे आग सर्व प्रकारच्या प्राण्यांना जाळून टाकते, त्याचप्रमाणे श्रीकृष्णांनीसुद्धा गदा, तलवार, चक्र आणि बाण या शस्त्रास्त्रांनी पौंड्रक व काशिराजाचे हत्ती, रथ, घोडे आणि पायदळ अशा चतुरंग सेनेला उध्वस्त केले. ती रणभूमी,

भगवंतांच्या चक्राने तुकडे तुकडे झालेल्या रथ, घोडे, हत्ती, सैनिक, गाढवे आणि उंटांनी भरून गेली. त्यावेळी असे वाटत होते की, जणू भूतनाथ शंकरांचे ते भयानक क्रीडास्थळच आहे. ते पाहून शूरांचा उत्साह अधिकच वाढत होता. (११-१८)

भगवान श्रीकृष्ण पौंड्रकाला म्हणाले, "ए, पौंड्रका ! तू दूताद्वारे मला जी माझी चिन्हे सोडून द्यायला सांगितली होतीस, ती मी आता तुझ्यावर सोडतो. तू जे खोटेच माझे नाव धारण केले आहेस, तेही मूर्खा ! आता तुला सोडायला भाग पाडतो. आणि जर मी तुझ्याशी युद्ध करू शकलो नाही, तर तुला शरणही येतो." श्रीकृष्णांनी त्याला अशा प्रकारे खडसावून तीक्ष्ण बाणांनी त्याच्या रथाचे तुकडे केले आणि जसे इंद्राने वज्राने पर्वताचे शिखर उडवावे तसे चक्राने त्याचे मस्तक उडविले. तसेच जशी वाऱ्याने कमळाची कळी जमिनीवर पाडावी, त्याप्रमाणे भगवंतांनी आपल्या बाणांनी काशी-नरेशाचे मस्तक धडावरून उडवून काशीपुरीत टाकले. अशा प्रकारे आपला द्वेष करणाऱ्या पौंड्रकाला आणि त्याचा मित्र काशिराज याला मारून श्रीकृष्ण द्वारकेला परतले. त्यावेळी सिद्धगण भगवंतांच्या अमृतमय कथांचे गायन करीत होते. परीक्षिता ! पौंड्रक भगवंतांच्या रूपाचे नेहमी चिंतन करीत असे. यामुळे त्याची सर्व बंधने गळून पडली. भगवंतांसारखा वेषही तो धारण करीत असे. त्यामुळे तो भगवंतांच्या सारूप्याला जाऊन मिळाला.

(१९-२४)

इकडे काशीनगरात राजमहालाच्या दरवाजावर एक कुंडले असलेले मस्तक पडल्याचे पाहून लोक विचार करू लागले की, हे काय आहे ? हे कोणाचे मस्तक आहे ? (२५)

ते काशीनरेशाचे मस्तक आहे, असे जेव्हा समजले, तेव्हा त्याच्या राण्या, पुत्र, बांधव, तसेच नागरिक हे नाथ ! हे राजन ! हाय ! हाय ! आमचा सर्वनाश झाला, असे म्हणून मोठ्याने रडू लागले. त्याचा सुदक्षिण नावाचा पुत्र होता. त्याने पित्याचे अंत्येष्टि संस्कार करून मनोमन निश्चय केला की, आपल्या पित्याचा वध करणाऱ्याला मारूनच मी पित्याच्या ऋणातून मुक्त होईन. असे ठरवून तो आपल्या कुलपुरोहितांसह एकाग्रतेने भगवान शंकरांची आराधना करू लागला. काशी नगरीमध्ये त्याच्या आराधनेने प्रसन्न होऊन भगवान शंकरांनी त्याला वर मागण्यास सांगितले. सुदक्षिणाने आपल्या पित्याचा वध करणाऱ्याला मारण्याचा उपाय सांगा, असा इच्छित वर मागितला. भगवान शंकर म्हणाले, "तू ब्राह्मणांसह यज्ञदेवता ऋत्विजस्वरूप दक्षिणाग्नीची आभिचारिक विधीने आराधना कर. यामुळे तो अग्नी प्रमथगणांसह प्रगट होईल व तू जर ब्राह्मणांचे भक्त नसणाऱ्यांवर त्याचा प्रयोग करशील, तर तो तुझा संकल्प सिद्धीला नेईल." असे सांगितल्यावर सुदक्षिण श्रीकृष्णांना मारण्यासाठी नियमपूर्वक अनुष्ठान करू लागला. अनुष्ठान पूर्ण होताच यज्ञकुंडातून अतिशय भीषण असा अग्नी मूर्तिमंत होऊन प्रगट झाला. त्याचे केस आणि दाढी-मिशा तापलेल्या तांब्याप्रमाणे लाल होत्या. डोळ्यांतून ज्वाळा बाहेर पडत होत्या. उग्र दाढा आणि चढवलेल्या भुवयांमुळे त्याच्या तोंडातून जणू क्रूरताच बाहेर पडत होती. तो आपल्या जिभेने तोंडाची दोन्ही टोके चाटीत होता. तो उघडाबंब असून त्याने हातात पेटता त्रिशूळ घेतला होता आणि तो वारंवार फिरवीत होता. त्याचे पाय ताडाच्या झाडाप्रमाणे लांब होते. त्याच्या चालण्याने जमीन हादरत होती आणि ज्वाळांनी आजूबाजूचा प्रदेश दग्ध करीत तो पुष्कळ भूतांसह द्वारकेजवळ जाऊन पोहोचला. ती आभिचारिक आग अगदी जवळ आल्याचे पाहून, जंगलाला आग लागल्यानंतर जसे पशू भयभीत होतात, त्याप्रमाणे द्वारकेतील लोक भयभीत झाले. ते लोक भयभीत होऊन

भगवंतांच्याकडे आले. भगवान त्यावेळी सभेमध्ये द्यूत खेळत होते. त्यांनी भगवंतांना प्रार्थना केली, "हे त्रैलोक्यनाथा ! वाचवा. नगर जाळणाऱ्या या आगीपासून आमचे रक्षण करा. स्वजन भयभीत झालेले पाहून व त्यांचा आक्रोश ऐकून शरणागतवत्सल भगवंत हसून म्हणाले- "घाबरू नका. मी तुमचे रक्षण करीन." (२६-३७)

सर्वांचे अंतर्बाह्य साक्षी असलेल्या भगवंतांनी ही माहेश्वरी कृत्या आहे, हे जाणून तिचा प्रतिकार करण्याची आपल्याजवळच असलेल्या सुदर्शन चक्राला आज्ञा केली. भगवान मुकुंदांचे अस्त्र सुदर्शन चक्रकोट्यवधी सूर्यांप्रमाणे तेजस्वी आणि प्रलयकालीन अग्नीप्रमाणे धगधगणारे होते. त्याच्या तेजाने आकाश, दिशा आणि अंतरिक्ष उजळून निघाले आणि त्याने अभिचार-अग्नीला निस्तेज केले. भगवान श्रीकृष्णांचे अस्त्र (असलेल्या) सुदर्शन चक्राच्या शक्तीने कृत्यारूप आगीचे मुख छिन्न-विच्छिन्न झाले. तिचे तेज नष्ट झाले, शक्ती कुंठित झाली आणि ती तेथून परतून काशीला आली व तिने ऋत्विज - आचार्यांसह सुदक्षिणाला जाळून भस्म केले. अशा प्रकारे त्याचा अभिचार त्याच्याच विनाशाला कारणीभूत ठरला. कृत्येच्या पाठोपाठ सुदर्शन चक्रसुद्धा काशीला येऊन पोहोचले. त्याने गच्च्या, सभागृहे, बाजार, गोपुरे, बुरुज, कोठारे, खजिने, हत्ती, घोडे, रथ आणि अन्नशाळा असलेली संपूर्ण काशी जाळून आनंदपूर्ण कृत्ये करणाऱ्या भगवान श्रीकृष्णांकडे ते परत आले. (३८-४२)

जो मनुष्य पुण्यकीर्ती श्रीकृष्णांचा हा पराक्रम एकाग्रतेने ऐकतो किंवा दुसऱ्याला ऐकवितो, त्याची सर्व पापांपासून सुटका होते. (४३)

अध्याय सहासष्टावा समाप्त

अध्याय सदुसष्टावा

द्विविदाचा उद्धार

परीक्षित म्हणाला- अनंत, मनबुद्धीला न कळणाऱ्या व अलौकिक कृत्ये करणाऱ्या भगवान बलरामांनी आणखी जी काही अद्‌भुत कर्मे केली असतील, ती मी पुन्हा ऐकू इच्छितो. (१)

श्रीशुक म्हणाले- द्विविद नावाचा एक वानर होता. तो भौमासुराचा मित्र, सुग्रीवाचा मंत्री आणि मैंदाचा शक्तिमान भाऊ होता. श्रीकृष्णांनी भौमासुराला मारल्याचे त्याने ऐकले, तेव्हा त्याचा सूड घेण्यासाठी त्याने श्रीकृष्णांच्या राज्याला उपद्रव देण्यास सुरवात केली. तो वानर नगरे, गावे, खाणी आणि गवळ्यांच्या वस्त्यांना आगी लावून त्या जाळू लागला. कधी कधी तो मोठमोठे पर्वत उखडून टाकून त्याने अनेक प्रदेशांचा चक्काचूर करीत असे आणि हे तो विशेष करून काठेवाडामध्ये करीत असे, कारण त्याच्या मित्राला मारणारे भगवान श्रीकृष्ण त्याच देशात राहात होते. द्विविद वानराच्या अंगी दहा हजार हत्तींचे सामर्थ्य होते. तो दुष्ट कधी-कधी समुद्रात उभा राहून हाताने इतके पाणी उडवीत असे की, त्यामुळे समुद्राच्या काठावरील देश बुडून जात.

तो दुष्ट मोठमोठ्या मुनींच्या आश्रमांतील झाडे उपटून उध्वस्त करीत असे आणि त्यांनी यज्ञासाठी बांधलेल्या अग्निकुंडात मल-मूत्र टाकून तो अग्नी दूषित करीत असे. ज्याप्रमाणे कुंभारमाशी दुसऱ्या किड्यांना आणून आपल्या बिळात त्यांना डांबून टाकते, त्याचप्रमाणे तो मदोन्मत्त वानर स्त्रिया आणि पुरुषांना घेऊन जाऊन डोंगराच्या गुहांमध्ये डांबून त्यांना बाहेरून मोठमोठ्या शिळा लावून

त्यांची तोंडे बंद करीत असे. तो अशा प्रकारे निरनिराळ्या ठिकाणच्या लोकांना त्रास देई. शिवाय कुलीन स्त्रियांनासुद्धा भ्रष्ट करीत असे. एके दिवशी तो दुष्ट मधुर संगीत ऐकून रैवतक पर्वतावर गेला. (२-८)

तेथे त्याने यदुश्रेष्ठ बलरामांना पाहिले. ते सर्वांगसुंदर असून त्यांनी कमळांची माळ गळ्यात घातली होती. त्यांच्या आजूबाजूला अनेक तरुणी होत्या. मधुपान करून ते मधुर संगीत गात होते. त्यावेळी त्यांचे डोळे आनंदाने धुंद झाले होते. त्यांचे शरीर एखाद्या मदोन्मत्त हत्तीप्रमाणे शोभून दिसत होते. तो दुष्ट वानर झाडांच्या फांद्यांवर चढून त्या जोराने हलवीत आपले अस्तित्व दाखविण्यासाठी किलकिलाटही करीत असे. स्वभावत:च चंचल आणि हसण्याची आवड असणाऱ्या बलरामाच्या तरुण भार्या त्याच्या माकडचेष्टा पाहून खदखदा हसू लागल्या. आता तो वानर बलरामांच्या देखतच त्या स्त्रियांना पाहून त्यांच्या समोरून जात, त्यांना आपला गुह्यभाग दाखवीत, तर कधी डोळे मिचकावीत त्यांची चेष्टा करू लागला. ते पाहून वीरश्रेष्ठ बलरामांनी रागाने त्याला एक दगड फेकून मारला, परंतु तो चुकवून द्विविदाने झेप घालून त्याचा मधुकलश पळविला आणि तो बलरामांची खिल्ली उडवू लागला. नंतर त्या लबाड वानराने तो कलश फोडून वस्त्रेही फाडली. आणि कुचेष्टेने हसून बलरामांना तो चिडवू लागला.

परीक्षिता ! जेव्हा अशा प्रकारे मदोन्मत्त बलवान द्विविद बलरामांना तुच्छ मानून त्यांची हेटाळणी करू लागला, तेव्हा त्यांनी त्याचा उर्मटपणा पाहून तसेच त्याने प्रदेशांची केलेली दुर्दशा पाहून त्याला मारण्याच्या हेतूने क्रोधाने आपला नांगर आणि मुसळ उचलले. द्विविदसुद्धा मोठा बलवान होता. त्याने एका हाताने सागवान उपटून मोठ्या वेगाने धावत जाऊन तो बलरामांच्या डोक्यावर मारला. पण बलरामांनी पर्वताप्रमाणे निश्चल राहून डोक्यावर पडणारा तो वृक्ष पकडला आणि आपल्या मुसंद नावाच्या मुसळाने त्याच्यावर प्रहार केला. मुसळाच्या घावाने द्विविदाचे डोके फुटले आणि त्यातून रक्ताच्या धारा वाहू लागल्या. एखाद्या पर्वतावरून पातळ कावेची धार वाहात आहे असे ते दृश्य दिसू लागले. परंतु द्विविदाने आपले डोके फुटल्याची पर्वा केली नाही. अतिशय रागाने त्याने दुसरा एक वृक्ष उपटला. त्याची पाने-फांद्या तोडून टाकल्या आणि त्याचा बलरामांवर जोराने प्रहार केला. बलरामांनी त्याचे शेकडो तुकडे केले. यानंतर द्विविदाने रागाने आणखी एक वृक्ष फेकला. परंतु बलरामांनी त्याचेसुद्धा शेकडो तुकडे केले. अशा प्रकारे तो वानर त्यांच्याशी वृक्षांनी युद्ध करीतच राहिला. एक वृक्ष तोडल्यावर तो दुसरा वृक्ष उपटत असे. अशा तऱ्हेने सगळीकडचे वृक्ष उपटून त्याने सर्व वनच वृक्षहीन केले. नंतर द्विविदाने संतापून बलरामांच्यावर दगडांचा वर्षाव सुरू केला. परंतु बलरामांनी मुसळाने त्या सर्व दगडांचा सहजपणे चक्काचूर केला. शेवटी कपिराज द्विविदाने आपल्या ताडाप्रमाणे लांब असलेल्या हाताच्या मुठींनी त्यांच्याजवळ जाऊन त्यांच्या छातीवर प्रहार केले. तेव्हा यदुवंशशिरोमणी बलरामांनी नांगर आणि मुसळ बाजूला ठेवून अत्यंत रागाने दोन्ही हातांनी त्याच्या मानेवर प्रहार केला. त्यामुळे तो वानर रक्त ओकीत जमिनीवर पडला. परीक्षिता ! वादळ आल्यावर नाव जशी पाण्यात डगमगू लागते, त्याप्रमाणे त्याच्या पडण्याने वृक्ष आणि शिलाखंडांसह सगळा पर्वत डळमळू लागला. आकाशात देवता 'जय-जय', सिद्ध लोक 'नमो नम:' आणि मोठमोठे ऋषी 'साधु-साधु' असे म्हणून बलरामांवर फुलांचा वर्षाव करू लागले. जगात उपद्रव माजविणाऱ्या द्विविदाला अशा प्रकारे मारून भगवान द्वारकापुरीला परतले. त्यावेळी सगळे नगरवासी त्यांची स्तुती करीत होते. (९-२८)

अध्याय सदुसष्टावा समाप्त

अध्याय अडुसष्टावा

कौरवांवर बलरामांचा कोप आणि सांबाचा विवाह

श्रीशुक म्हणतात - परीक्षिता ! युद्धात विजय मिळविणाऱ्या जांबवतीपुत्र सांबाने स्वयंवरात दुर्योधनाची कन्या लक्ष्मणा हिला पळविले. त्यामुळे कौरवांना राग आला. ते म्हणाले, ''हा मुलगा उर्मट आहे. त्याने आम्हांला तुच्छ लेखून बळजबरीने आमच्या कन्येचे तिच्या मर्जीविरुद्ध अपहरण केले. म्हणून या उद्धटाला पकडून बांधून टाका. यादव आमचे काय वाकडे करू शकणार ? ते आम्हीच दयाबुद्धीने दिलेल्या धान्यसंपन्न जमिनीचा उपभोग घेत आहेत. आपल्या मुलाला कैद केल्याचे ऐकून जर ते लोक इकडे आले, तर आम्ही त्यांची घमेंड जिरवू. त्यामुळे जसे संयमी पुरुष इंद्रियांना शांत करतात, त्याप्रमाणे तेही शांत होतील. असा विचार करून कर्ण, शल, भूरिश्रवा, यज्ञकेतू आणि दुर्योधन यांनी कुरुवंशातील ज्येष्ठांच्या संमतीने सांबाला पकडण्याची तयारी केली. (१-५)

कौरव पाठलाग करीत आहेत असे पाहून महारथी सांब एक सुंदर धनुष्य घेऊन सिंहासारखा एकटाच रणांगणात उतरला. इकडे कर्णाला सेनापती बनवून कौरववीर, धनुष्य घेतलेल्या सांबाजवळ येऊन पोहोचले आणि रागाने त्याला पकडण्याच्या इच्छेने ''थांब ! थांब !'' असे म्हणत त्याच्यावर बाणांचा वर्षाव करू लागले. परीक्षिता ! यदुनंदन सांब अचिंत्य ऐश्वर्यशाली अशा भगवान श्रीकृष्णांचा पुत्र होता. जसा सिंह तुच्छ पशूंच्या आक्रमणामुळे चिडतो, त्याप्रमाणे तो कौरवांच्या चढाईने त्यांच्यावर चिडला. सांबाने आपल्या सुंदर धनुष्याचा टणत्कार करून, जे वेगवेगळ्या सहा रथांवर स्वार झाले होते, त्या कर्ण इत्यादी सहा वीरांच्यावर एकदम सहा सहा बाणांनी वेगवेगळा वर्षाव केला.(६-९)

त्यांपैकी चार चार बाण त्यांच्या चार चार घोड्यांवर, एक एक त्यांच्या सारथ्यावर आणि एक एक त्या महान धनुष्यधारी वीरांवर सोडला. सांबाचे हे अद्भुत हस्तकौशल्यपाहून शत्रुपक्षातील वीरसुद्धा त्याची प्रशंसा करू लागले. नंतर त्या सहा वीरांपैकी चौघांनी एकेका बाणाने त्याचे चार घोडे मारले, एका वीराने सारथ्याला मारले आणि एका वीराने सांबाचे धनुष्य मोडून टाकले. अशा प्रकारे त्यांनी सांबाला रथहीन व शस्त्रहीन केले. अशा प्रकारे विजयी कौरवांनी रथहीन सांबाला कसेबसे बांधून त्याला आणि आपल्या कन्येला घेऊन ते हस्तिनापुरात परतले. (१०-१२)

परीक्षिता ! नारदांकडून हा वृत्तांत ऐकून यादवांना अतिशय क्रोध आला. उग्रसेनाच्या आज्ञेवरून ते कौरवांवर चढाई करण्याच्या तयारीला लागले. कलह नाहीसा करू इच्छिणाऱ्या बलरामांनी युद्धसज्ज यादवांचे सांत्वन केले. कारण कुरू आणि वृष्णी यांचे आपापसातील भांडण त्यांना योग्य वाटत नव्हते. नंतर स्वत: सूर्यासारख्या तेजस्वी रथावर स्वार होऊन ते हस्तिनापुरला गेले. त्यांच्याबरोबर काही ब्राह्मण आणि ज्येष्ठ यादव होते. ग्रहांसमवेत चंद्र असावा, तसे त्यांच्यासमवेत बलराम होते. हस्तिनापुरला जाऊन बलराम नगराच्या बाहेर एका उपवनात थांबले आणि कौरवांचा काय मानस आहे, हे जाणून घेण्यासाठी त्यांनी उद्धवाला धृतराष्ट्राकडे पाठविले. (१३-१६)

उद्धवाने कौरवांच्या सभेत जाऊन धृतराष्ट्र, भीष्म, द्रोणाचार्य, बाल्हीक आणि दुर्योधन यांना विधिपूर्वक प्रणाम करून निवेदन केले की, ''बलराम आले आहेत.'' आपले परम सुहृद बलराम आले आहेत, हे ऐकून कौरव अतिशय आनंदित झाले. उद्धवाचा सत्कार करून व आपल्या हातात पवित्र

सामग्री घेऊन बलरामाच्या स्वागतासाठी ते निघाले. नंतर आपापल्या वयोमानानुसार आणि संबंधानुसार सर्वजण बलरामांना भेटले आणि त्यांच्या सत्काराप्रीत्यर्थ त्यांना गाय अर्पण करून त्यांनी त्यांची पूजा केली. त्यांपैकी जे भगवान बलरामांचा प्रभाव जाणत होते, त्यांनी मस्तक लववून त्यांना नमस्कार केला. त्यानंतर त्यांनी एकमेकांना खुशाली विचारली आणि ती त्यांनी एकमेकांना सांगितली. नंतर निर्भयपणे बलराम त्यांना म्हणाले.(१७-२०)

राजाधिराज महाराज उग्रसेनांनी तुम्हांला एक आज्ञा केली आहे. ती तुम्ही शांतपणे ऐकून घेऊन ताबडतोब तिचे पालन करा. महाराजांनी सांगितले आहे - ''आम्हांस हे माहीत आहे की, तुम्ही पुष्कळांनी मिळून अधर्माने, धर्मशील, एकाकी सांबाला एकटाच जिंकून बंदिवान केले. आम्हा बांधवांत फूट पडू नये म्हणून आम्ही ते सहन केले. (असमर्थ होतो, म्हणून नव्हे.)'' (२१-२२)

बलरामांचे बोलणे वीरता, शौर्य आणि सामर्थ्य यांच्या उत्कर्षाने परिपूर्ण तसेच त्यांच्या शक्तीला अनुरूप असेच होते. ते ऐकून कौरव रागाने म्हणाले. ''अहो ! ही तर मोठ्या आश्चर्याचीच गोष्ट आहे. कालगती कोणी टाळू शकत नाही, हेच खरे ! म्हणून जेथे मुकुटाने बसावे, तेथे आज पायातील जोडे बसू इच्छितात ! यांच्याशी आम्ही विवाह-संबंध जोडला. हे आमच्याबरोबर झोपणे-बसणे, खाणे-पिणे करू लागले. आम्हीच त्यांना राजसिंहासन देऊन आमच्या बरोबरीला आणले. आम्ही दुर्लक्ष करतो, म्हणून हे यदुवंशी चवऱ्या, पंखा, शंख, पांढरे छत्र, मुगुट, राजसिंहासन आणि बहुमोल शय्या यांचा उपयोग करीत आहेत. यापुढे ही राजचिह्ने यादवांना द्यायलाच नकोत ! जसे सापाला दूध पाजणे घातक ठरते, त्याचप्रमाणे राज्य देणाऱ्या आमच्याच विरुद्ध हे वागत आहेत. आमच्याच कृपेने ज्यांची भरभराट झाली तेच यादव (कृतघ्न होऊन) निर्लज्जपणे आम्हांलाच आज्ञा करीत आहेत. धिक्कार असो यांचा ! सिंहाचा घास जसा मेंढा काढून घेऊ शकत नाही, त्याचप्रमाणे जर भीष्म, द्रोण, अर्जुन इत्यादी कौरववीरांनी राज्य द्यायचे नाकारले, तर स्वतः इंद्र तरी ते कसे घेऊ शकेल ?'' (२३-२८)

श्रीशुक म्हणतात- परीक्षिता ! कौरव उच्च कूळ, शूर बांधव आणि राज्यलक्ष्मी यांच्या गर्वाने उन्मत्त झाले होते. बलरामांना असभ्यपणे अशी दुरुत्तरे ऐकवून ते हस्तिनापुरात परतले. बलरामांनी कौरवांचे असभ्य वर्तन पाहिले, त्यांची दुरुत्तरेही ऐकली. त्यामुळे त्यांचा चेहरा रागाने लालबुंद झाला. त्यावेळी त्यांच्याकडे पाहावतही नव्हते. ते वारंवार जोरजोराने हसत म्हणू लागले. जे दुष्ट निरनिराळ्या मदांनी उन्मत्त होतात, त्यांना शांतीची इच्छा नसते. पशूंना वठणीवर आणण्यासाठी दंडुक्याचा प्रयोग करणे आवश्यक असते, त्याचप्रमाणे अशांना योग्य मार्गावर आणण्याचा उपाय म्हणजे त्यांना शासन करणे हेच होय. आता हेच पहा ना ! यादव आणि श्रीकृष्णसुद्धा रागाने लढाई करण्याच्या तयारीत होते. मीच त्यांना समजावून सांगून यांना शांत करण्यासाठी येथे आलो होतो. तरीसुद्धा हे भांडणाची खुमखुमी असणारे, अहंकारी मूर्ख वारंवार माझा तिरस्कार करून, बोलू नये ते बोलले. इंद्र इत्यादी लोकपालही ज्यांच्या आज्ञेचे पालन करतात, ते भोज, वृष्णी आणि अंधकवंशी यादवांचे राजे उग्रसेन यांना आज्ञा करू शकत नाहीत काय ? सुधर्मासभेत जे विराजमान असतात, ज्यांनी देववृक्ष पारिजातक आणून आपल्या उपवनात लावला, ते भगवान श्रीकृष्णसुद्धा राजसिंहासनाचे अधिकारी नाहीत काय ? सगळ्या जगाची स्वामिनी भगवती लक्ष्मी स्वतः ज्यांच्या चरणकमलांची सेवा करते, ते लक्ष्मीपती भगवान श्रीकृष्ण छत्र, चामरे इत्यादी राजोचित सामग्री जवळ बाळगू शकत नाहीत

काय ? ज्यांच्या चरणकमलांची धूळ संत पुरुष सेवन करीत असलेल्या गंगा इत्यादी तीर्थांनासुद्धा तीर्थपणा आणून देणारी आहे, सगळे लोकपाल आपापल्या श्रेष्ठ मुगुटावर जिला धारण करतात, ज्यांच्या अंशांचे अंश असलेले ब्रह्मदेव, शंकर, मी आणि लक्ष्मी जी नेहमी मस्तकांवर धारण करतो, त्या ''श्रीकृष्णांना राजसिंहासन कोठून ?'' असे म्हणता ! बिचारे यादव म्हणे कौरवांनी दिलेला जमिनीचा तुकडा भोगतात. आम्ही म्हणे पायातील जोडे ! आणि हे कौरव म्हणे मस्तक ! वाहवा रे ! अहो ! ऐश्वर्याने माजलेल्या, घमेंडखोर, वेड्याप्रमाणे बडबडणाऱ्या यांची असंबद्ध, निरर्थक बडबड, यांना शासन करू शकणारा माझ्यासारखा कसा सहन करू शकेल ? आज मी सगळी पृथ्वी कौरवरहित करून टाकीन, असे म्हणत बलराम अत्यंत क्रोधाने जणू त्रैलोक्याचे भस्म करून टाकण्यासाठी आपला नांगर हातात घेऊन उभे राहिले. त्यांनी त्याच्या टोकाने हस्तिनापूर उखडले आणि ते बुडविण्यासाठी अतिशय क्रोधाने गंगेकडे ओढू लागले.(२९-४१)

नांगराच्या ओढण्याने, पाण्यामध्ये नाव जशी डगमगते, त्याप्रमाणे हस्तिनापूर हलू लागले. आपले नगर गंगेमध्ये बुडवण्यासाठी ओढले जात असलेले पाहून कौरव घाबरले. नंतर त्यांनी लक्ष्मणेसह सांबाला पुढे केले आणि आपल्या प्राणांचे रक्षण करण्यासाठी, कुटुंबियांसह हात जोडून, सर्वशक्तिमान अशा भगवान बलरामांना ते शरण गेले. ''हे लोकाभिराम बलराम ! आपण सगळ्या जगताचे आधार आहात. आम्ही आपला प्रभाव जाणला नाही. हे प्रभो ! आम्हां मूर्खांच्या अपराधाबद्दल आम्हांला क्षमा करावी. आपण जगाची उत्पत्ती, स्थिती आणि प्रलयाचे कारण आहात आणि स्वत: कोणत्याही आधाराविना राहाता. हे सर्वशक्तिमान प्रभो ! हे त्रैलोक्य आपली खेळणी आहेत, असे ज्ञानी म्हणतात. हे अनंता ! आपली हजारो मस्तके आहेत आणि आपण सहजपणे हे भूमंडल आपल्या मस्तकावर ठेवले आहे. जेव्हा प्रलय होतो, तेव्हा आपण साऱ्या जगाला आपल्यामध्ये लीन करून घेता आणि शिल्लक असलेले एकटेच आपण शयन करीत असता. हे भगवन ! आपण जगताची स्थिती आणि पालन करण्यासाठी विशुद्ध सत्त्वमय शरीर धारण केले आहे. आपला हा क्रोध, द्वेष किंवा मत्सर यांमुळे नसून सर्वांना शिक्षण देण्यासाठी आहे. हे सर्व शक्तींना धारण करणाऱ्या सर्वप्राणिस्वरूप अविनाशी भगवन ! आम्ही आपल्याला नमस्कार करीत आहोत. हे विश्व निर्माण करणाऱ्या देवा ! आम्ही आपणांस नमस्कार करीत आहोत. आम्ही आपणास शरण आलो आहोत. (४२-४८)

श्रीशुक म्हणतात - नगर डगमगू लागल्याने भयभीत झालेले कौरव भगवान बलरामांना शरण आले आणि त्यांनी त्यांची स्तुती केली. तेव्हा अत्यंत प्रसन्न होऊन, 'भिऊ नका'' असे म्हणून त्यांनी त्यांना अभय दिले. कन्येवरील प्रेमामुळे दुर्योधनाने वरदक्षिणा म्हणून साठ साठ वर्षांचे बाराशे हत्ती, दहा हजार घोडे, सूर्यासारखे चमकणारे सोन्याचे सहा हजार रथ आणि सोन्याचे हार घातलेल्या एक हजार दासी दिल्या. आप्तांनी सत्कार केलेले यदुश्रेष्ठ भगवान बलराम त्या सर्वांचा स्वीकार करून नवदांपत्याला बरोबर घेऊन द्वारकेकडे परतले. नंतर बलराम द्वारकापुरीत पोहोचले व आपल्या प्रिय बांधवांना भेटले. त्यांनी हस्तिनापुरात कौरवांशी जे काही घडले, ते सर्व यादवसभेत सांगितले. आजही दक्षिणेकडे उंच असलेले आणि गंगेकडे थोडेसे झुकलेले हे हस्तिनापूर बलरामांच्या पराक्रमाचे सूचक आहे. (४९-५४)

अध्याय अडुसष्टावा समाप्त

अध्याय एकोणसत्तरावा

देवर्षी नारदांनी भगवंतांचा गृहस्थाश्रम पाहाणे

श्रीशुक म्हणतात - देवर्षी नारदांनी जेव्हा ऐकले की, भगवान श्रीकृष्णांनी नरकासुराला मारून एकट्यानेच हजारो राजकुमारींशी विवाह केला आहे, तेव्हा भगवंतांचा गृहस्थाश्रम पाहावा अशी इच्छा त्यांच्या मनात निर्माण झाली. ते विचार करू लागले, ''अहो ! श्रीकृष्णांनी एकाच शरीराने, एकाच वेळी, सोळा हजार महालांमध्ये वेगवेगळ्या सोळा हजार राजकुमारींचे पाणिग्रहण केले, हे केवढे आश्चर्य आहे !'' या उत्सुकतेने देवर्षी नारद भगवंतांची ही लीला पाहाण्यासाठी द्वारकेत आले. तेथील उपवने आणि उद्याने फुलांनी लहडलेली होती. त्यावर निरनिराळ्या प्रकारचे पक्षी किलबिलत होते आणि भ्रमर गुंजारव करत होते. निर्मळ पाण्याने भरलेल्या सरोवरांमध्ये निळी, लाल आणि शुभ्र रंगाची निरनिराळ्या जातींची कमळे उमललेली होती. त्यामध्ये हंस आणि सारस किलबिल करीत होते. तेथे स्फटिकाचे आणि चांदीचे नऊ लक्ष महाल होते. तेथील पाचूच्या फरशा कांतीने झगमगत होत्या. तेथे सोने आणि रत्नांच्या पुष्कळ वस्तू होत्या. राजमार्ग, इतर रस्ते, चौक, बाजार, घोडे, हत्ती, जनावरे इत्यादी बांधण्याची ठिकाणे, सभागृहे आणि मंदिरे यांमुळे नगराचे सौंदर्य अधिकच खुलून दिसत होते. तेथील सडका, अंगणे, चौक, आणि देवड्या याठिकाणी सडे घातले होते. पताका व ध्वज यांमुळे रस्त्यांवर ऊन लागत नव्हते. (१-६)

त्या द्वारका नगरीत श्रीकृष्णांचे अत्यंत सुंदर असे अंत:पुर होते. सर्व लोकपाल त्यांची पूजा आणि प्रशंसा करीत असत. ते निर्माण करण्यामध्ये विश्वकर्म्याने आपले सारे कौशल्य पणाला लावले होते. त्या अंत:पुरात भगवंतांच्या राण्यांचे सोळा हजाराहून अधिक शोभिवंत महाल होते. त्यांपैकी एका विशाल भवनामध्ये देवर्षी नारदांनी प्रवेश केला. त्या महालांत पोवळ्यांचे खांब, वैदूर्य मण्यांच्या उत्तम फळ्या आणि इंद्रनील मण्यांच्या भिंती झगमगत होत्या. तसेच तेथील फरशा चमकदार इंद्रनील मण्यांच्या बनविलेल्या होत्या. विश्वकर्म्याने पुष्कळसे असे चांदवे बनविलेले होते की, ज्यांना मोत्यांच्या माळा लावल्या होत्या. तेथे रत्नजडित हस्तिदंती आसने आणि पलंग होते. गळ्यांत सोन्याचे हार घातलेल्या आणि सुंदर वस्त्रांनी नटलेल्या दासी तसेच अंगरखे व पगडी घातलेले आणि रत्नजडित कुंडले धारण केलेले सेवक त्या महालांची शोभा वाढवीत होते. अनेक रत्नजडित दिवे आपल्या झगमगाटाने त्यांतील अंधकार नाहीसा करीत होते. अगुरू धूप घातल्यामुळे झरोक्यातून धूर बाहेर पडत होता. तो पाहून रंगी-बेरंगी रत्नमय सज्जांवर बसलेले मोर ते ढग आहेत, असे वाटून मोठ्याने केकारव करीत थुई थुई नाचू लागत. देवर्षी नारदांना तेथे असे दिसले की, भगवान श्रीकृष्ण रुक्मिणीबरोबर तेथे असून ती स्वत: भगवंतांना सोन्याची दांडी असलेल्या चवरीने वारा घालीत आहे. तसेच तेथे रुक्मिणीसारख्याच गुण, रूप, वय आणि वेष-भूषा असलेल्या हजारो दासीसुद्धा नेहमी असत. (७-१३)

नारदांना पाहाताच सर्व धार्मिक लोकांचे मुकुटमणी भगवान श्रीकृष्ण रुक्मिणीच्या पलंगावरून लगेच उठून उभे राहिले. देवर्षी नारदांच्या चरणी त्यांनी मुगुट असलेल्या मस्तकाने प्रणाम केला आणि हात जोडून त्यांना आपल्या आसनावर बसविले. भगवान श्रीकृष्ण चराचर जगाचे परम गुरू आहेत आणि त्यांच्या चरणांपासून निघालेले गंगाजल सगळ्या जगाला पवित्र करणारे आहे.

यात बिलकुल शंका नाही. तरीसुद्धा ते संतांचे परम आदर्श होते. शिवाय त्यांचे 'ब्रह्मण्यदेव' (ब्राह्मणांना देव मानणे) हे त्यांच्या गुणांना अनुरूप असेच नावही आहे. म्हणूनच त्यांनी स्वत: नारदांची पाद्यपूजा करून ते चरणामृत आपल्या मस्तकी धारण केले. नराचे मित्र पुराण ऋषी भगवान नारायणांनी शास्त्रोक्त पद्धतीने देवर्षी नारदांची पूजा केली. नंतर अमृतापेक्षाही मधुर व मोजक्या शब्दांनी त्यांचे स्वागत करून त्यांना म्हटले - "प्रभो! आपण स्वत: समग्र ज्ञान, वैराग्य, धर्म, यश, श्री आणि ऐश्वर्याने परिपूर्ण आहात. तरीही आम्ही आपली कोणती सेवा करावी ?" (१४-१६)

नारद म्हणाले - भगवन ! आपण सर्व लोकांचे स्वामी आहात. आपली सर्वांशी मैत्री आहे. तरीही आपण दुष्टांना शासन करता, यात काही आश्चर्य नाही. हे परमयशस्वी प्रभो ! आपण जगाचे पालन आणि रक्षण करण्याबरोबरच जीवांचे श्रेष्ठ कल्याण करण्यासाठी स्वेच्छेने अवतार धारण केला आहे, हे आम्ही चांगल्या रीतीने जाणतो. आज आपल्या चरणकमलांचे मला दर्शन झाले, ही अत्यंत भाग्याची गोष्ट आहे. आपली ही चरणकमले सर्व लोकांना मोक्ष देण्यास समर्थ आहेत. ज्यांचे ज्ञान अमर्याद आहे, असे ब्रह्मदेव, शंकर इत्यादी देव आपल्या हृदयामध्ये त्यांचे चिंतन करीत असतात. आपले हे चरणच संसाररूप विहिरीत पडलेल्या लोकांना बाहेर येण्याचे साधन आहे. आपण माझ्यावर अशी कृपा करा की, आपल्या चरणकमलांचे मला नेहमी स्मरण राहावे आणि मी त्यांच्या ध्यानात तन्मय असावे. (१७-१८)

परीक्षिता ! यानंतर देवर्षी नारद योगेश्वरांचे सुद्धा ईश्वर अशा भगवान श्रीकृष्णांच्या योगमायेचे रहस्य जाणून घेण्यासाठी त्यांच्या दुसऱ्या पत्नीच्या महालात गेले. तेथेही त्यांनी असे पाहिले की, भगवान आपली प्रिया आणि उद्धव यांच्याबरोबर द्यूत खेळत आहेत. तेथेसुद्धा भगवंतांनी उभे राहून त्यांचे स्वागत केले, आसनावर बसविले आणि मोठ्या भक्तिभावाने त्यांची पूजा केली. यानंतर भगवंतांनी आपल्याला काहीच माहीत नाही असे दाखवीत नारदांना विचारले, "आपण केव्हा आलात ? आपण तर सर्व दृष्टींनी परिपूर्ण आहात. अपूर्ण अशा आम्ही आपली काय सेवा करावी ? तरीसुद्धा हे ब्रह्मन ! आपण आम्हांला आपल्या सेवेची संधी देऊन आमचा जन्म सफळ करा." हे ऐकून चकित झालेले नारद तेथून गुपचूपपणे दुसऱ्या महालाकडे निघून गेले. नारदांना त्या महालात श्रीकृष्ण आपल्या लहान लहान मुलांना खेळवीत आहेत, असे दिसले. तेथून पुढच्या महालात गेले, तर भगवान स्नानाला जाण्याची तयारी करीत आहेत, असे त्यांनी पाहिले. कोठे ते हवन करीत आहेत, तर कोठे पंचमहायज्ञ करीत आहेत. कोठे ब्राह्मणांना भोजन देत आहेत, तर कोठे त्यांच्या भोजनानंतर स्वत: अन्न ग्रहण करीत आहेत. कोठे संध्या करीत आहेत, तर कोठे मौन धारण करून गायत्रीमंत्राचा जप करीत आहेत. कोठे हातात ढाल-तलवार घेऊन ते चालवण्याचा सराव करीत आहेत. कोठे घोडे, हत्ती किंवा रथावर स्वार होऊन फिरत आहेत. तर कोठे पलंगावर झोपले आहेत. कोठे भाट त्यांची स्तुती करीत आहेत. एखाद्या महालात उद्धव इत्यादी मंत्र्यांबरोबर राजकीय विषयावर चर्चा करीत आहेत, तर कोठे उत्तमोत्तम स्त्रियांसमवेत जलक्रीडा करीत आहेत. कोठे वस्त्रालंकारांनी सुशोभित अशा गाईंचे श्रेष्ठ ब्राह्मणांना दान करीत आहेत, तर कोठे मंगल अशा इतिहास पुराणांचे श्रवण करीत आहेत. कोठे आपल्या प्रियेबरोबर हास्यविनोद करीत खिदळत आहेत. तर कोठे धर्मशास्त्राचा अभ्यास करीत आहेत. कोठे अर्थार्जन चालू आहे, तर कोठे धर्माला अनुकूल

अशा विषयांचा उपभोग घेत आहेत. कोठे एकांतात बसून प्रकृतीच्या पलीकडे असणाऱ्या पुरुषाचे ध्यान करीत आहेत, तर कोठे गुरुजनांना त्यांच्या इच्छेनुसार हवे ते अर्पण करून त्यांची सेवाशुश्रूषा करीत आहेत. (१९-३०)

ते कोणाबरोबर युद्धासंबंधी बोलत आहेत, तर कोणाबरोबर तहासंबंधी ! कोठे ते बलरामांबरोबर बसून सत्पुरुषांचे कल्याण करण्याबाबत विचार करीत आहेत. योग्य वेळ आल्याने कोठे पुत्र आणि कन्या यांचे उचित अशा पत्नी आणि वरांबरोबर शास्त्रानुसार थाटामाटात विवाह लावून देत आहेत. कोठे सासरी चाललेल्या कन्यांना निरोप देत आहेत, तर कोठे त्यांना बोलावण्याच्या तयारीत आहेत. योगेश्वरेश्वर श्रीकृष्णांचे हे थाटमाट पाहून लोक आश्चर्यचकित होत होते. कोठे मोठमोठे यज्ञ करून सर्व देवतांचे पूजन करीत आहेत, तर कोठे विहिरी, बगीचे, मठ इत्यादी बांधून पूर्त धर्माचे आचरण करीत आहेत. कोठे श्रेष्ठ यादवांच्या समवेत घोड्यावर बसून यज्ञाला योग्य पशूंची शिकार करीत आहेत. आणि काही वेळा लोक, अंत:पुरे इत्यादी ठिकाणी सर्वांचे मत जाणून घेण्यासाठी गुप्त वेषात ते योगेश्वर फिरत आहेत. (३१-३६)

अशा प्रकारे मनुष्यासारखी लीला करीत असलेल्या श्रीकृष्णांच्या योगमायेचे वैभव पाहून नारद हसत हसत त्यांना म्हणाले. ''हे योगेश्वरा ! ब्रह्मदेव इत्यादी मायावींनासुद्धा दिसण्यास कठीण अशी योगमाया आपल्या चरणकमलांची सेवा केल्याने स्वत:च आमच्यासमोर प्रगट झाली आहे. हे भगवंता ! मला आता निरोप द्या. यानंतर आपल्या सुयशाने परिपूर्ण असलेल्या त्रिभुवनात मी आपल्या त्रिभुवनाला पावन करणाऱ्या लीलेचे गायन करीत विहार करीन.'' (३७-३९)

श्रीकृष्ण म्हणाले - नारदमुनी ! मीच धर्माचा उपदेशक, पालन करणारा आणि त्याचे अनुष्ठान करणाऱ्यांना अनुमोदन देणाराही आहे. म्हणून जगाला धर्माचे शिक्षण देण्याच्या उद्देशानेच मी अशा प्रकारे धर्माचरण करतो. वत्सा ! या मायेने तू मोहित होऊ नकोस. (४०)

श्रीशुक म्हणतात - अशा प्रकारे भगवान श्रीकृष्ण गृहस्थाश्रमातील लोकांना पवित्र करणाऱ्या श्रेष्ठ धर्मांचे आचरण करीत होते. सर्व प्रासादांतून ते एकटेच वावरत आहेत, असे नारदांनी पाहिले. (४१)

अनंत शक्ती असणाऱ्या श्रीकृष्णांच्या योगमायेचे परम ऐश्वर्य वारंवार पाहून देवर्षी नारदांच्या आश्चर्याला आणि कुतूहलाला सीमाच राहिली नाही. धर्म, अर्थ आणि काम या पुरुषार्थांच्या ठायी श्रद्धा असणाऱ्या श्रीकृष्णांनी नारदांचा चांगला सन्मान केला. त्यामुळे आनंदित होऊन, भगवंतांचेच स्मरण करीत ते तेथून निघून गेले. राजन ! भगवान नारायण सगळ्या जगाच्या कल्याणासाठी आपल्या अचिंत्य मायेचा स्वीकार करून मनुष्यासारख्या लीला करीत सोळा हजारांहूनही अधिक पत्न्यांच्या लज्जायुक्त आणि प्रेमपूर्ण नजरांनी तसेच मंद स्मितहास्यांनी केलेली सेवा घेऊन त्यांच्याबरोबर रममाण होत होते. परीक्षिता ! विश्वाची उत्पत्ती, स्थिती आणि प्रलयाचे परम कारण असणाऱ्या श्रीकृष्णांनी ज्या लीला केल्या, त्या दुसरा कोणीही करू शकणार नाही. जे त्यांच्या लीलांचे गायन, श्रवण करतात आणि गायन, श्रवण करणाऱ्यांना उत्तेजन देतात, त्यांच्या ठिकाणी मोक्षाला मार्गस्वरूप अशा भगवंतांविषयी भक्ती उत्पन्न होते. (४२-४५)

अध्याय एकोणसत्तरावा समाप्त

अध्याय सत्तरावा

भगवान श्रीकृष्णांची दिनचर्या आणि जरासंधाच्या कैदी राजांच्या दूताचे त्यांच्याकडे येणे.

श्रीशुक म्हणतात - जेव्हा पहाटे कोंबडे आरवू लागत, तेव्हा ज्यांच्या गळ्यात श्रीकृष्णांचा हात असे, त्या श्रीकृष्णपत्न्या विरहाच्या भयाने व्याकूळ होऊन त्या कोंबड्यांना शिव्याशाप देत. त्यावेळी पारिजातकांच्या वनातील वाऱ्याने जागे झालेले पक्षी भाटांप्रमाणे भगवान श्रीकृष्णांना जागविण्यासाठी मधुर किलबिलाट करीत आणि भ्रमर गुंजारव करीत. प्रियतमाच्या बाहूंत असलेल्या रुक्मिणीला तर आता आलिंगन सोडावे लागणार, म्हणून अत्यंत पवित्र असा ब्राह्ममुहूर्तसुद्धा येऊच नयेसा वाटत असे. श्रीकृष्ण दररोज ब्राह्ममुहूर्तावर उठून हात-पाय, तोंडधुऊन प्रसन्न अंत:करणाने मायातीत आत्मस्वरूपाचे ध्यान करीत. ते आत्मस्वरूप अखंड, स्वयंप्रकाश, निरुपाधिक व अविनाशी आहे. ते स्वभावत:च अविद्यारहित आहे. या जगाच्या उत्पत्ती, स्थिती व लयाला कारण असणाऱ्या त्या आत्म्याच्या शक्तींमुळेच त्याची सत्ता व आनंद यांचा अनुभव येतो. त्यालाच ब्रह्म असे नाव आहे. नंतर सदाचरणतत्पर असे ते विधिपूर्वक निर्मळ आणि पवित्र पाण्याने स्नान करीत. मग स्वच्छ धोतर नेसून व उपरणे पांघरून संध्यावंदनादी कर्मे करीत. त्यानंतर हवन करून मौन धरून गायत्रीमंत्राचा जप करीत. यानंतर ज्ञानी असे ते सूर्योदयाच्या वेळी सूर्याचे उपस्थान करीत आणि आपल्या अंशस्वरूप असलेल्या देव, ऋषी व पितरांना उद्देशून तर्पण करीत. नंतर ज्येष्ठ व आदरणीय ब्राह्मणांची विधिपूर्वक पूजा करून त्यांना वस्त्रालंकार देऊन दररोज प्रत्येकी एकेक बद्द (तेरा हजार चौऱ्याऐंशी) दुधाळ, प्रथमच व्यालेल्या, वासरू असणाऱ्या, शांत स्वभावाच्या गाई, रेशमी वस्त्र, मृगचर्म आणि तीळ यांसह दान करीत. त्यावेळी त्यांना सुंदर वस्त्रे आणि मोत्यांच्या माळा घातल्या जात. त्यांच्या शिंगांना सोने आणि खुरांना चांदी मढविलेली असे. त्यानंतर आपल्याच विभूतिरूप असलेल्या गाई, ब्राह्मण, देवता, वडील माणसे, गुरुजन आणि सर्व प्राण्यांना प्रणाम करून मंगल वस्तूंना स्पर्श करीत. परीक्षिता ! भगवंत जरी या मनुष्यलोकाचा अलंकार असले, तरीसुद्धा ते आपली दिव्य वस्त्रे, अलंकार, फुलांचे हार, आणि चंदन इत्यादी वस्तूंनी स्वत:ला अलंकृत करीत. यानंतर ते तूप आणि आरशात आपले मुख पाहात. गाय, बैल, ब्राह्मण आणि देवता यांचे दर्शन घेत. मग पुरवासी आणि अंत:पुरात राहाणाऱ्या चारही वर्णांच्या लोकांच्या कामना पूर्ण केल्यानंतर आपल्या अन्य प्रजेची इच्छापूर्ती करून त्यांना संतुष्ट करीत. आणि या सर्वांना प्रसन्न पाहून स्वत: आनंदी होत. फुलांच्या माळा, तांबूल, चंदन इत्यादी वस्तू ते अगोदर ब्राह्मणांना देत. नंतर स्वजन, मंत्री आणि राण्यांना वाटीत व नंतर स्वत: उपयोगात आणीत. तोपर्यंत त्यांचा सारथी सुग्रीव इत्यादी घोडे जुंपलेला अत्यंत अद्भुत रथ घेऊन येई आणि प्रणाम करून भगवंतांच्या समोर उभा राही. यानंतर ते सात्यकी आणि उद्धवासह आपल्या हाताने सारथ्याचे हात पकडून सूर्य ज्याप्रमाणे उदयाचलावर आरूढ होतो, त्याप्रमाणे रथावर स्वार होत. त्यावेळी अंत:पुरातील स्त्रिया लज्जा आणि प्रेमपूर्ण नजरांनी त्यांच्याकडे पाहात आणि मोठ्या कष्टाने त्यांना निरोप देत. तेव्हा भगवान स्मित हास्य करून त्यांचे मन बरोबर घेऊन महालाच्या बाहेर पडत. (१-१६)

परीक्षिता ! त्यानंतर भगवान श्रीकृष्ण सर्व यादवांसह सुधर्मा नावाच्या सभेत प्रवेश करीत. जे लोक त्या सभेत बसत, त्यांना तहान-भूक, शोक-मोह आणि जरा-मृत्यू हे सहा विकार बाधत नसत.

भगवान तेथे जाऊन जेव्हा श्रेष्ठ सिंहासनावर विराजमान होत, तेव्हा त्यांच्या अंगकांतीने सर्व दिशा उजळून जात. जसा आकाशात तारकांनी वेढलेला चंद्र शोभून दिसतो, त्याप्रमाणे श्रेष्ठ यदुवीरांच्या मध्ये यदुपती श्रीकृष्ण शोभून दिसत. राजा ! सभेमध्ये विदूषक निरनिराळ्या प्रकारच्या हास्यविनोदांनी, नटाचार्य अभिनयांनी आणि नर्तकी कलापूर्ण नृत्यांनी, अशा वेगवेगळ्या प्रकारे भगवंतांची सेवा करीत. त्यावेळी मृदंग, वीणा, पखवाज, बासरी, झांज आणि शंख या वाद्यांच्या घोषात सूत, मागध व भाट नाचत, गात आणि भगवंतांची स्तुती करीत. काही वेदवेत्ते ब्राह्मण तेथे बसून वेदमंत्रांचे विवेचन करीत आणि काहीजण पवित्रकीर्ती राजांची चरित्रे ऐकवीत. (१७-२१)

एके दिवशी तेथे एक नवीन मनुष्य आला. द्वारपालांनी भगवंतांना तो आल्याची सूचना देऊन त्याला सभागारात आणले. त्या मनुष्याने भगवान श्रीकृष्णांना हात जोडून नमस्कार केला आणि त्या राजांचे दुःख सांगितले की, जे वीस हजार राजे जरासंधाच्या दिग्विजयाच्या वेळी त्याला शरण आले नव्हते, त्यांना जरासंधाने बळजबरीने कैद करून एका किल्ल्यात ठेवले होते. ''हे भगवन श्रीकृष्ण ! आपले स्वरूप कोणालाही न कळणारे आहे. जे आपल्याला शरण येतात. त्यांचे सर्व भय आपण नाहीसे करता. हे प्रभो ! आमची भेदबुद्धी नाहीशी झालेली नाही. आम्ही संसारामुळे भयभीत होऊन आपल्याला शरण आलो आहोत. हे भगवन ! बहुतेक लोक निषिद्ध कर्मे करण्यात गुंतलेले असतात. ते आपण सांगितलेली आपली उपासनारूप कल्याणकारी कर्मे करीत नाहीत. जीवनासंबंधी आशा-अभिलाषांमध्ये भ्रमाने भटकत असतात. जे बलवान असे आपण कालरूपाने त्यांची जीवनाची आशा तत्काळ धुळीला मिळविता, त्या कालरूप आपल्याला आम्ही नमस्कार करतो. जगदीश्वर अशा आपण जगामध्ये संतांचे रक्षण आणि दुष्टांना शासन करण्यासाठी बलरामांसह अवतार घेतला आहे. असे असता हे प्रभो ! एखादा राजा आपल्या आज्ञेविरुद्ध वागून आम्हांला दुःख देतो, की आमचीच कर्मे आम्हांला दुःख देत आहेत, हे आम्हांला कळत नाही. हे प्रभो ! राज्योपभोगाचे सुख विषयसाध्य असून स्वप्नाप्रमाणे क्षणभंगुर आहे. तरीही नेहमी भयग्रस्त अशा नाशवंत शरीराने आम्ही हे ओझे ओढतोच. तुमच्याच मायेमुळे अत्यंत दीनवाणे झालेले आम्ही, निष्काम भक्तांना तुमच्यापासून मिळणारे आत्मसुख सोडून अकारण हे कष्ट भोगत आहोत. हे भगवन ! आपले चरण शरणागतांचे दुःख नाहीसे करणारे आहेत. म्हणून आपणच जरासंधरूप कर्मांच्या बंधनातून आम्हांला सोडवा. हे प्रभो ! त्या एकट्याजवळ दहा हजार हत्तींचे बळ आहे आणि जसा सिंह मेंढ्यांना जरबेत ठेवतो, त्याप्रमाणे त्याने आम्हांला आपल्या वाड्यात बंदिस्त करून ठेवले. हे चक्रपाणी ! आपण जरासंधाशी अठरा वेळा युद्ध करून सतरा वेळा त्याचा पराभव करून त्याला सोडून दिले; परंतु एक वेळ त्याने आपल्यावर विजय प्राप्त केला. आपला पराक्रम अनंत आहे, हे आम्ही जाणतो; असे असूनही साधारण माणसासारखे वागत आपण पराभूत झाल्याचा अभिनय केलात; परंतु यामुळे त्याची घमेंड वाढली. कधीही जिंकले न जाणारे हे भगवन ! आपली प्रजा असलेल्या आम्हांला तो त्रास देणार नाही, असे करावे.'' (२२-३०)

दूत म्हणाला- जरासंधाचे बंदी असलेले राजे आपल्या पायाशी शरण आले आहेत आणि ते आपले दर्शन घेऊ इच्छितात. तरी आपण त्या दीनांचे कल्याण करावे. (३१)

श्रीशुकदेव म्हणतात- राजांचा दूत असे सांगत होता, तेवढ्यात सोनेरी जटा असलेले परमतेजस्वी देवर्षी नारद सूर्योदय व्हावा तसे तेथे येऊन पोहोचले. ब्रह्मदेव इत्यादी सर्व लोकपालांचे स्वामी भगवान श्रीकृष्ण त्यांना पाहाताच सभासद आणि सेवकांसह

आनंदाने उठून उभे राहिले आणि मस्तक लववून त्यांना वंदन करू लागले. देवर्षी नारद जेव्हा आसनावर बसले, तेव्हा भगवंतांनी त्यांची विधिपूर्वक पूजा केली आणि आपल्या श्रद्धेने त्यांना संतुष्ट करीत मधुर वाणीने ते म्हणाले. हे देवर्षे ! सध्या तिन्ही लोकांचे कुशल आहे ना ? आपण तिन्ही लोकांमध्ये जात असता. यामुळेच आम्हांला आपल्याकडून सर्वांची खुशाली समजते. ईश्वराने रचलेल्या तिन्ही लोकांमधील अशी कोणतीही घटना नाही की, जी आपल्याला माहीत नाही. म्हणून आम्ही तुम्हांला विचारतो की, ''पांडवांचे यावेळी काय चालले आहे ?'' (३२-३६)

श्रीनारद म्हणाले- ''हे सर्वव्यापी अनंता ! आपण विश्वाचे निर्माते असणाऱ्या ब्रह्मदेव इत्यादींनासुद्धा कळण्यास कठीण अशी आपली माया मी अनेक वेळा पाहिली आहे. लाकडात गुप्त असलेला अग्नी जसा स्वत:चे तेज लपवून ठेवतो, तसे आपण चराचरामध्ये आपल्या अचिंत्य शक्तीने गुप्तपणे व्यापून राहिलेले आहात. म्हणून आपण जे हे विचारीत आहात, त्याबद्दल मला काहीही आश्चर्य वाटत नाही. हे भगवन ! आपण आपल्या मायेनेच या जगाची निर्मिती आणि संहार करता. आपल्या मायेमुळेच ते असत्य असूनही सत्य असल्यासारखे वाटते. आपण केव्हा काय करू इच्छिता, हे चांगल्या तऱ्हेने कोणाला कळणार आहे ? ज्यांचे स्वरूप अचिंतनीय आहे, त्या आपल्याला मी नमस्कार करतो. या अनर्थकारक शरीरांमुळे जीव जन्म-मृत्यूच्या चक्रात फिरत राहातो व यातून मुक्त कसे व्हावे, हे तो जाणत नाही. वास्तविक त्याच्याच हितासाठी आपण नाना प्रकारचे लीलावतार धारण करून आपल्या पवित्र यशाचा दीप प्रज्वलित करता. त्या आपणांस मी शरण आलो आहे. प्रभो ! आपण स्वत: परब्रह्म असून माणसासारखी लीला करीत मला विचारीत आहात. म्हणून मी आपला आतेभाऊ आणि भक्त, राजा युधिष्ठिर काय करू इच्छितो, ते सांगतो. आपल्या पूजेला योग्य अशी श्रेष्ठ संपत्ती मिळावी म्हणून राजा युधिष्ठिर, यज्ञांत श्रेष्ठ अशा राजसूय यज्ञाने आपली आराधना करू इच्छितो. आपण याला संमती द्यावी. हे भगवन ! त्या श्रेष्ठ यज्ञामध्ये आपले दर्शन घेण्यासाठी देव आणि यशस्वी राजे येणार आहेत. हे प्रभो ! ब्रह्मस्वरूप अशा आपले श्रवण, कीर्तन आणि ध्यान केल्याने अंत्यजसुद्धा पवित्र होतात. तर मग जे आपले दर्शन आणि स्पर्श प्राप्त करून घेतात, त्यांच्याबद्दल काय सांगावे ! हे त्रिभुवनमंगला ! ज्याप्रमाणे आपली चरणामृतधारा स्वर्गामध्ये मंदाकिनी, पाताळात भोगवती आणि मृत्युलोकात गंगा या नावाने वाहात जाऊन साऱ्या विश्वाला पवित्र करीत आहे, त्याचप्रमाणे आपली निर्मळ कीर्ती सर्व दिशांमध्ये विस्तारली असून तिने स्वर्ग, पृथ्वी आणि पाताळ व्यापले आहेत. (३७-४४)

श्रीशुक म्हणतात- जरासंधाला जिंकू इच्छिणाऱ्या यादवांना नारदांचे हे म्हणणे पसंत पडले नाही. तेव्हा श्रीकृष्ण स्मितहास्य करीत अतिशय गोड वाणीने उद्धवाला म्हणाले. (४५)

श्रीकृष्ण म्हणाले - ''उद्धवा ! तू माझा सुहृद, दिव्य नेत्र आणि राजनीती चांगल्या प्रकारे जाणणारा आहेस. म्हणून याविषयी काय करावे, ते तू सांग. तुझ्या म्हणण्यावर आमची श्रद्धा आहे म्हणून तुझ्या सल्ल्यानुसारच आम्ही वागू. उद्धवाने पाहिले की, आपले स्वामी सर्वज्ञ असूनही अजाणत्यासारखे सल्ला विचारीत आहेत. तेव्हा त्यांची आज्ञा शिरोधार्य मानून तो म्हणाला. (४६-४७)

अध्याय सत्तरावा समाप्त

अध्याय एकाहत्तरावा

श्रीकृष्णांचे इंद्रप्रस्थाला जाणे

श्रीशुक म्हणतात - श्रीकृष्णांचे म्हणणे ऐकून अत्यंत बुद्धिमान उद्धवाने देवर्षी नारद, सभासद आणि श्रीकृष्णांच्या मतावर विचार केला आणि नंतर तो बोलू लागला. (१)

उद्धव म्हणाला- भगवन ! देवर्षी नारदांनी सांगितल्याप्रमाणे आपण आतेभाऊ पांडवांच्या यज्ञात जाऊन त्यांना साहाय्य केले पाहिजे. त्याचबरोबर शरणागतांचे रक्षण करणे हेही आपले कर्तव्यच आहे. हे प्रभो ! जो सर्व दिशांवर विजय मिळवतो, तोच राजसूय यज्ञ करू शकतो. तेव्हा जरासंधाला जिंकण्यामुळे पांडवांचा यज्ञ आणि शरणागतांचे रक्षण या दोन्ही गोष्टी साधतील असे मला वाटते. शिवाय यामुळेच हे गोविंदा ! आमचेही मोठे काम होईल. त्याचबरोबर कैद केलेले राजे मुक्त केल्याने आपली सर्वत्र कीर्ती होईल. जरासंध इतर बलवानांनाही जिंकण्यासारखा नाही. कारण त्याला दहा हजार हत्तींचे बळ आहे. त्याला फक्त तुल्यबल भीमसेनच पराभूत करू शकतो. त्याला द्वंद्वयुद्धातच जिंकले पाहिजे. तो शंभर अक्षौहिणी सेना घेऊन युद्धात उतरेल, तेव्हा नको. जरासंध हा ब्राह्मणभक्त आहे. जर ब्राह्मणांनी त्याच्याकडे याचना केली, तर तो त्याला विन्मुख पाठवीत नाही. म्हणून भीमसेनाने ब्राह्मणाचा वेष घेऊन त्याच्याकडे भिक्षा मागावी. आपल्या उपस्थितीमध्ये द्वंद्वयुद्धात भीमसेन त्याला मारील, याविषयी शंका नाही. हे प्रभो ! आपण सर्वशक्तिमान, रूपरहित कालस्वरूप आहात. विश्वाची निर्मिती आणि प्रलय आपल्याच शक्तीने होतात. ब्रह्मदेव आणि शंकर हे केवळ निमित्तमात्र आहेत. (त्याचप्रमाणे जरासंधाचा वध आपल्या शक्तीने होईल, भीमसेन त्याला फक्त निमित्तमात्र असेल.) तेव्हा कैदखान्यात पडलेल्या राजांच्या राण्या स्वत:च्या महालांत आपल्या या विशुद्ध लीलेचे गायन करतील की, आपण त्यांच्या शत्रूंचा नाश केलात आणि त्यांच्या पतींना सोडविलेत. यापूर्वी ज्याप्रमाणे गोपी स्वत:ला शंखचूडापासून सोडविण्याचा पराक्रम गात, शरणागत मुनिगण, गजेंद्र आणि जानकीच्या उद्धाराची लीला गात तसेच आम्ही आपल्या माता-पित्यांना कंसाच्या कारागृहातून सोडविलेल्या लीलेचे गायन करीत असतो. म्हणून हे श्रीकृष्णा ! जरासंधाचा वध पुष्कळ गोष्टी साध्य करून देईल. बंदिस्त राजांच्या पुण्यप्रभावाने किंवा जरासंधाच्या पापप्रभावाने, आपणही यावेळी राजसूय यज्ञ होणेच पसंत करीत आहात. (२-१०)

श्रीशुक म्हणतात- परीक्षिता ! उद्धवाचा हा सल्ला सर्वप्रकारे हितकारक होता. शिवाय खोडून काढता येणारा नव्हता. देवर्षी नारद, यदुवंशातील ज्येष्ठ-श्रेष्ठ आणि स्वत: श्रीकृष्णांनीसुद्धा त्याचे म्हणणे मनापासून मान्य केले. अंतर्यामी भगवान श्रीकृष्णांनी यानंतर वसुदेव इत्यादी गुरुजनांची संमती घेऊन दारुक, जैत्र इत्यादी सेवकांना इंद्रप्रस्थाकडे जाण्यासाठी तयारी करण्याची आज्ञा केली. यानंतर शत्रुसंहारक श्रीकृष्णांनी यदुराज उग्रसेन व बलरामांची आज्ञा घेऊन मुलाबाळांसह राण्या आणि त्यांचे सर्व सामान पुढे पाठविले व पाठोपाठ दारुकाने आणलेल्या गरुडध्वज रथावर ते स्वत: आरूढ झाले. त्यानंतर रथ, हत्ती, घोडेस्वार आणि पायदळ यांची प्रचंड सेना घेऊन ते निघाले. त्यावेळी मृदंग, नगारे, ढोल, शंख आणि रणशिंगांच्या उच्च स्वराने सर्व दिशा दुमदुमून गेल्या. रुक्मिणी इत्यादी श्रीकृष्णांच्या हजारो पतिव्रता पत्न्या आपल्या मुलांसह सुंदर वस्त्रालंकार, चंदन, फुलांचे हार इत्यादींनी नटूनथटून, डोल्या, रथ आणि सोन्याने मढविलेल्या पालख्यांत बसून पतींच्या मागून निघाल्या. यावेळी पायदळ

शिपाई हातात ढाल-तलवारी घेऊन त्यांचे रक्षण करीत चालले होते. याच प्रकारे त्यांच्या सेवकांच्या स्त्रिया आणि वारांगना चांगल्या प्रकारे वेषभूषा करून गवताच्या झोपड्या, वेगवेगळ्या प्रकारचे तंबू, कनाती, कांबळी तसेच अंथरूण-पांघरूण इत्यादी सामग्री बैल, म्हशी, गाढवे आणि खेचरांवर लादून तसेच स्वत: पालख्या, उंट, छकडे आणि हत्तिणी यांवर बसून चालू लागल्या. जसा सुसरी-मगरी आणि लाटांच्या उसळण्याने क्षुब्ध झालेला समुद्र शोभून दिसतो, तशी अतिशय गोंगाट होत असलेली, फडफडणाऱ्या मोठमोठ्या पताका, छत्रे, चामरे, श्रेष्ठ शस्त्रास्त्रे, वस्त्रालंकार, मुगुट, कवचे यांनी युक्त आणि दिवसा त्यांच्यावर पडलेली सूर्याची किरणे यांमुळे भगवान श्रीकृष्णांची सेना अतिशय शोभून दिसत होती. नंतर श्रीकृष्णांनी सत्कार केलेले नारद त्यांचा निश्चय ऐकून व त्यांचे दर्शन झाल्यामुळे प्रसन्न झाले. त्यानंतर त्यांनी केलेली पूजा स्वीकारून देवर्षी नारदांनी त्यांना प्रणाम केला आणि त्यांची दिव्य मूर्ती हृदयात धारण करून आकाशमार्गाने प्रस्थान केले. यानंतर भगवान श्रीकृष्ण जरासंधाच्या बंदी राजांच्या दूताला आपल्या मधुर वाणीने आश्वासन देत म्हणाले - "दूता ! तू तुझ्या राजांना जाऊन सांग की, भिऊ नका ! तुम्हा सर्वांचे कल्याण असो ! मी जरासंधाला मारवीन." भगवंतांचा निरोप घेऊन गेलेल्या दूताने त्यांचा संदेश राजांना सांगितला. ते राजेसुद्धा कारागृहातून सुटण्यासाठी, भगवंतांच्या दर्शनाची वाट पाहू लागले. (११-२०)

नंतर श्रीकृष्ण आनर्त, सौवीर, मरू, कुरुक्षेत्र आणि तेथे जाताना मध्ये लागणारे पर्वत, नद्या, नगरे, गावे, गौळवाडे, खाणी इत्यादी पार करून पुढे जाऊ लागले. (२१)

भगवान मुकुंद दृषद्वती व सरस्वती नदी पार करून तसेच पांचाल आणि मत्स्य हे देश मागे टाकून इंद्रप्रस्थाला जाऊन पोहोचले. ज्यांचे दर्शन माणसांना होणे दुर्मिळ आहे, ते श्रीकृष्ण जवळ आलेत, ही बातमी समजली, तेव्हा आचार्य आणि संबंधितांसह युधिष्ठिर त्यांच्या स्वागतासाठी नगराच्या बाहेर आला. मंगल गीते गायिली जाऊ लागली, वाद्ये वाजू लागली. ब्राह्मण उच्च स्वरात वेदमंत्र म्हणू लागले. इंद्रियांनी मुख्य प्राणाला भेटण्यासाठी आतुरतेने जावे, त्याप्रमाणे धर्मराज अत्यंत आदराने हृषीकेशांचे स्वागत करण्यासाठी निघाला. श्रीकृष्णांना पाहून युधिष्ठिराचे हृदय अत्यंत स्नेहाने सद्गदित झाले. पुष्कळ दिवसांनंतर आपला प्रियतम भेटल्यामुळे तो पुन्हा पुन्हा त्यांना आपल्या हृदयाशी कवटाळू लागला. लक्ष्मीचे पवित्र निवासस्थान असलेल्या श्रीकृष्णांच्या श्रीविग्रहाला दोन्ही बाहूंनी आलिंगन दिल्यामुळे युधिष्ठिराचे सारे पाप नष्ट झाले. तो परमानंदसमुद्रात डुंबू लागला. त्याच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले. अंग-अंग रोमांचित झाले. त्याला या मायिक प्रपंचाचे स्मरणही राहिले नाही. त्यानंतर भीमसेनाने मंद हास्य करून आपले मामेभाऊ श्रीकृष्णांना आलिंगन दिले. त्यावेळी झालेल्या आनंदाने आणि प्रेमोत्कर्षाने त्याची सारी इंद्रिये उचंबळून आली. नकुल, सहदेव आणि अर्जुन यांनी सुद्धा आपले परम प्रियतम आणि अकारण परम हितचिंतक अशा भगवान श्रीकृष्णांना मोठ्या आनंदाने आलिंगन दिले. त्यावेळी त्यांच्याही नेत्रांतून अश्रूंचा पूर वाहू लागला. अर्जुनाने भगवान श्रीकृष्णांना पुन्हा आलिंगन दिले. नकुल आणि सहदेवाने अभिवादन केले आणि स्वत: भगवान श्रीकृष्णांनी ब्राह्मणांना आणि कुरुवंशातील वृद्धांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे नमस्कार केला. कुरू, सृंजय आणि कैकय देशांच्या राजांनी भगवान श्रीकृष्णांचा सन्मान केला आणि भगवान श्रीकृष्णांनीसुद्धा त्यांचा यथायोग्य सत्कार केला. सूत, मागध, वंदी आणि ब्राह्मण भगवंतांची स्तुती करू लागले. तसेच गंधर्व, नट, विदूषक इत्यादी मृदंग, शंख, नगारे, वीणा, ढोल आणि शिंगे वाजवून भगवान श्रीकृष्णांना प्रसन्न करण्यासाठी नाचू गाऊ लागले. पुण्यकीर्तीचे चूडामणी अशा श्रीकृष्णांनी अशाप्रकारे आपल्या

सुहृदबांधवांसह सर्व प्रकारे सुशोभित केलेल्या इंद्रप्रस्थ नगरीत लोकांकडून स्तुती घेत प्रवेश केला. (२२-३१)

इंद्रप्रस्थ नगरातील मार्ग हत्तींच्या मदरसाने व सुगंधित पाण्याने सुगंधित झाले होते. जागोजागी रंगीबेरंगी ध्वज लावले होते. सोन्याची तोरणे बांधली गेली होती. आणि पाणी भरलेले सुवर्णकलश ठेवलेले होते. नगरातील स्त्री-पुरुष स्नान करून नवीन वस्त्रे, अलंकार, फुलांचे हार आणि सुवासिक द्रव्यांनी नटलेले होते. घराघरात फुलांनी सजवलेले दिवे पेटवलेले होते. प्रत्येक घराच्या झरोक्यांतून धुपाचा सुगंधी धूर बाहेर पडत होता. त्या घरांवर पताका फडकत होत्या. ज्यांच्यावर सोन्याचे कळस बसवले होते, अशी चांदीची शिखरे झगमगत होती. अशा प्रकारचे वाडे असलेली पांडवांची राजधानी पाहात भगवान श्रीकृष्ण चालले होते. तरुणींना जेव्हा समजले की मानवी डोळ्यांचे पारणे फेडणारे भगवान श्रीकृष्ण राजमार्गावरून निघाले आहेत, तेव्हा त्यांच्या दर्शनाच्या उत्कंठेने त्यांच्या वेण्या आणि निरगाठी ढिल्या पडल्या. काहींनी घरातील काम अर्धवट सोडून दिले तर काहीजणी शय्येवर झोपलेल्या पतींनासुद्धा सोडून देऊन श्रीकृष्णांच्या दर्शनासाठी धावतच राजमार्गावर आल्या. सडकेवर हत्ती, घोडे, रथ आणि पायदळ सेना यांची एकच गर्दी झाली होती. त्या स्त्रियांनी गच्च्यांवर चढून सपत्नीक श्रीकृष्णांचे दर्शन घेतले. त्यांच्यावर पुष्पवर्षाव केला आणि मनोमन त्यांना आलिंगन देऊन प्रेमपूर्ण मंद हास्ययुक्त नजरेने त्यांचे स्वागत केले. चंद्राभोवती असणाऱ्या ताऱ्यांप्रमाणे श्रीकृष्णांच्या पत्न्यांना राजमार्गावर पाहून नगरातील स्त्रिया आपापसात म्हणू लागल्या की, ''या भाग्यवान राण्यांनी असे कोणते पुण्य केले असावे की, ज्यामुळे पुरुषोत्तम श्रीकृष्ण आपले दिव्य हास्य आणि विलासपूर्ण नजरेने त्यांच्याकडे पाहून त्यांच्या डोळ्यांना परम आनंद देत आहेत.'' श्रीकृष्ण अशा प्रकारे जात असता निष्पाप शिल्पकारांनी ठिकठिकाणी त्यांना भेटून अनेक मंगल वस्तूंनी त्यांची पूजा करून त्यांचे स्वागत केले. (३२-३७)

श्रीकृष्णांना पाहून अंत:पुरातील स्त्रियांनी घाईघाईने येऊन प्रेमपूर्ण डोळ्यांनी भगवंतांचे स्वागत केले. त्याचा स्वीकार करीत श्रीकृष्ण राजवाड्यात आले. (३८)

आपला त्रिभुवनपती भाचा श्रीकृष्ण याला जेव्हा कुंतीने पाहिले, तेव्हा तिचे हृदय प्रेमाने भरून आले. पलंगावरून उठून ती सुनांसह पुढे आली आणि तिने भाच्याला छातीशी धरले. युधिष्ठिराने देवदेवेश्वर भगवान श्रीकृष्णांना राजमहालात आदरपूर्वक आणले. पण तेव्हा आनंदाच्या भरात भगवंतांची पूजा कशी करावी, हेच राजा विसरून गेला. राजा ! भगवान श्रीकृष्णांनी आत्या कुंती आणि वडील मंडळींच्या पत्न्यांना अभिवादन केले. त्यांची बहीण सुभद्रा आणि द्रौपदीने भगवंतांना नमस्कार केला. सासूने सांगितल्याप्रमाणे द्रौपदीने वस्त्रे, अलंकार, पुष्पहार इत्यादींद्वारा रुक्मिणी, सत्यभामा, भद्रा, जांबवती, कालिंदी, मित्रविंदा, लक्ष्मणा आणि सत्या या भगवान श्रीकृष्णांच्या पट्टराण्यांचा व तेथे आलेल्या अन्य राण्यांचाही यथायोग्य सत्कार केला. युधिष्ठिराने श्रीकृष्णांना त्यांची सेना, सेवक, मंत्री आणि पत्न्यांना नित्य नवे वाटेल अशा ठिकाणी आरामात राहाण्याची व्यवस्था केली. अर्जुनाच्या बरोबर राहून श्रीकृष्णांनी खांडव वन देऊन अग्नीला तृप्त केले होते आणि त्यातून मयासुराला वाचविले होते. त्या मयासुरानेच युधिष्ठिराला एक दिव्य सभागृह तयार करून दिले. युधिष्ठिराला आनंद देण्यासाठी श्रीकृष्ण काही महिने तेथेच राहिले. ते अर्जुनासह वेळोवेळी रथावर स्वार होऊन विहार करण्यासाठी सैनिकांसह इतरत्र जात असत. (३९-४६)

अध्याय एकाहत्तरावा समाप्त

अध्याय बाहत्तरावा

पांडवांच्या राजसूय यज्ञाचे आयोजन आणि जरासंधाचा उद्धार

श्रीशुक म्हणतात- युधिष्ठिर एके दिवशी मुनी, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, बंधू, आचार्य, कुळातील ज्येष्ठ, नातलग, संबंधित आणि कुटुंबियांच्या बरोबर राजसभेत बसला होता. सर्वांच्या देखतच श्रीकृष्णांना उद्देशून तो म्हणाला. (१-२)

युधिष्ठिर म्हणाला - हे गोविंदा ! यज्ञांचा राजा अशा राजसूय यज्ञाने मी आपल्या पावन विभूतिस्वरूप देवतांचे पूजन करू इच्छितो. हे प्रभो ! आपण माझा हा संकल्प पुरा करावा. हे कमलनाभा ! सर्व अमंगल नष्ट करणाऱ्या आपल्या चरणकमलांची जे लोक निरंतर सेवा करतात, ध्यान आणि स्तुती करतात तेच खरे पवित्र होत. ते संसारापासून आपली सुटका करून घेतात. आणि जर त्यांनी संसारातील विषयांची इच्छा केली, तर त्यांचीसुद्धा त्यांना प्राप्ती होते; परंतु अभक्तांना मात्र काहीच मिळत नाही. हे देवदेवा ! या लोकांना आपल्या चरणकमलांच्या सेवेचा प्रभाव पाहू दे ! कुरुवंशी आणि सृंजयवंशी राजांपैकी जे लोक आपले भजन करतात आणि जे करीत नाहीत, त्यांच्यामधील अंतर हे प्रभो ! आपण लोकांना दाखवा. प्रभो ! आपण सर्वांचे आत्मा, समदर्शी आणि आत्मानंदाचे साक्षात्कारी आहात. स्वत: ब्रह्म आहात. आपल्या ठायी आपपरभाव नाही. तरीसुद्धा, जे आपली सेवा करतात, त्यांना कल्पवृक्षाप्रमाणे फळ मिळतेच. त्या फळामध्ये जो कमीअधिकपणा असतो, तो सेवेनुसार असतो. याउलट कधी होत नाही. (३-६)

श्रीभगवान म्हणाले- हे शत्रूवर विजय मिळविणाऱ्या धर्मराजा ! आपला निश्चय अतिशय चांगला आहे. हा यज्ञ केल्याने सर्व लोकांमध्ये आपल्या मंगलमय कीर्तीचा विस्तार होईल. (७)

हे राजन ! आपला हा महायज्ञ ऋषी, पितर, देवता, संबंधित आम्ही व सर्व प्राणी या सर्वांना प्रिय आहे. पृथ्वीवरील सर्व राजांना जिंकून सर्व पृथ्वी आपल्या ताब्यात घे आणि सर्व सामग्री एकत्रित करून हा महायज्ञ कर. महाराज ! तुझे हे चारही भाऊ लोकपालांच्या अंशापासून जन्मले आहेत. संयमी अशा तू इंद्रियांवर ताबा नसणाऱ्यांना प्राप्त न होणाऱ्या मला जिंकून घेतले आहेस. जगात देवसुद्धा तेज, यश, लक्ष्मी, किंवा ऐश्वर्य यांच्या बळावर माझ्या भक्ताचा पराभव करू शकणार नाही. मग एखाद्या राजाची काय कथा !(८-११)

श्रीशुक म्हणतात - भगवंतांचे म्हणणे ऐकून संतुष्ट झालेल्या युधिष्ठिराचे मुखकमल प्रफुल्लित झाले. त्याने श्रीकृष्णतेजाने अधिक प्रभावशाली बनलेल्या आपल्या भावांना दिग्विजय करण्याची आज्ञा दिली. त्याने सृंजयवंशी वीरांसह सहदेवाला दक्षिण दिशेकडे, नकुलाला मत्स्यदेशीय वीरांसह पश्चिमेकडे, अर्जुनाला केकयदेशीय वीरांसह उत्तरेकडे आणि भीमसेनाला मद्रदेशीय वीरांसह पूर्व दिशेकडे पाठविले. परीक्षिता ! त्या वीरांनी आपल्या सामर्थ्याने सर्व दिशांकडील राजांना जिंकले आणि यज्ञ करू इच्छिणाऱ्या युधिष्ठिराला विपुल धन आणून दिले. अजून जरासंध अजिंक्य आहे, हे ऐकून राजाला काळजी वाटू लागली. त्यावेळी श्रीकृष्णांनी उद्धवांनी सांगितलेला उपाय त्याला सांगितला. परीक्षिता ! यानंतर भीमसेन, अर्जुन आणि श्रीकृष्ण हे तिघेही ब्राह्मणांचा वेष घेऊन गिरिव्रजाला गेले. तेथेच जरासंध राहात होता. राजा जरासंध ब्राह्मणांचा भक्त आणि गृहस्थोचित धर्मांचे पालन करणारा होता. वरील तिघे क्षत्रिय ब्राह्मणाचा वेष घेऊन अतिथिसत्काराच्या वेळी जरासंधाकडे गेले आणि त्यांनी त्याच्याकडे याचना केली. (१२-१७)

"राजन ! आपले कल्याण असो ! आम्ही

तिघेजण आपले अतिथी म्हणून आलो आहोत आणि फार लांबून आलो आहोत. म्हणून आम्ही मागू ते आपण आम्हांला द्यावे. सहनशील माणसे काय सहन करू शकत नाहीत ? दुष्ट माणसांना न करण्यासारखे काय असते ? उदार पुरुष काय देऊ शकत नाहीत आणि समदर्शी असणाऱ्याला परका कोण आहे ? जो मनुष्य स्वत: समर्थ असूनही या नाशवान शरीराने सज्जनांनी वाखाणण्याजोगे अविनाशी यश मिळवत नाही, त्याची निंदा करावी, तेवढी थोडीच. त्याच्याविषयी शोक करणेच योग्य आहे. राजन ! हरिश्चंद्र, रंतिदेव, धान्याचे शेतात पडलेले दाणे वेचून उदरनिर्वाह करणारे मुद्गल, शिबी, बली, व्याध, कपोत इत्यादी पुष्कळशा व्यक्तींनी अतिथीला आपले सर्वस्व देऊन या नाशवान शरीराने अविनाशी पद प्राप्त करून घेतले.

(१८-२१)

श्रीशुक म्हणतात - जरासंधाने त्या लोकांचा आवाज, त्यांचे रूप, मनगटांवर धनुष्याच्या दोरीचे पडलेले घट्टे, ही चिह्ने पाहून ते क्षत्रिय आहेत, हे ओळखले. आता त्यांना पूर्वी कोठे पाहिले असावे, याविषयी तो आठवू लागला. हे खात्रीने क्षत्रिय असून ब्राह्मणाचा वेष घेऊन आले आहेत. म्हणून त्यांना मी याचना केल्यास, देण्यास कठीण असे माझे शरीरही देईन. भगवंतांनी ब्राह्मणाचा वेष धारण करून बलीचे सारे ऐश्वर्य हिरावून घेतले, तरीसुद्धा त्याची सगळीकडे पसरलेली पवित्र कीर्ती आजसुद्धा ऐकिवात आहे. भगवंतांनी इंद्राची राज्यलक्ष्मी बलीकडून काढून घेऊन त्याला परत देण्यासाठीच ब्राह्मणाचे रूप धारण केले होते, हे माहीत असूनही आणि शुक्राचार्यांनी अडवूनही दैत्यराजाने त्यांना पृथ्वीचे दान दिलेच ना ! जो क्षत्रिय ब्राह्मणासाठी आपले जीवन खर्ची घालून या नाशवान शरीराने विपुल यश संपादन करीत नाही, त्याच्या जगण्याला काय अर्थ आहे ?

(२२-२६)

उदार अंत:करणाच्या जरासंधाने असा विचार करून श्रीकृष्ण, अर्जुन आणि भीमसेनाला म्हटले, "ब्राह्मणांनो ! आपणास पाहिजे ते मागा. मी आपल्याला माझे मस्तकसुद्धा द्यायला तयार आहे."

(२७)

श्रीकृष्ण म्हणाले - राजेंद्रा ! आम्हांला अन्न नको. आम्ही क्षत्रिय आपल्याकडे युद्धासाठी आलो आहोत. आपली इच्छा असेल, तर आपण आम्हांस द्वंद्वयुद्धाची भिक्षा द्यावी. हे पहा ! हा पांडुपुत्र भीमसेन आहे आणि हा याचा भाऊ अर्जुन आहे. मी या दोघांचा मामेभाऊ व तुझा शत्रू कृष्ण आहे." श्रीकृष्णांनी असे सांगितले, तेव्हा राजा जरासंध खो खो करून हसू लागला. आणि मग चिडून म्हणाला, "अरे मूर्खांनो ! तुम्हांला जर युद्धच हवे असेल तर ते देतो. परंतु कृष्णा ! तू भित्रा आहेस ! युद्धामध्ये तू माझ्या भीतीने मथुरा नगरी सोडून समुद्राला शरण गेलास. म्हणून मी तुझ्याशी लढणार नाही. हा अर्जुनसुद्धा वयाने माझ्यापेक्षा लहान असून माझ्या बरोबरीचा बलवान वीर नाही. म्हणून मी याच्याबरोबर लढणार नाही. हा भीमसेन मात्र माझ्यासारखाच बलवान आहे." असे म्हणून जरासंधाने भीमसेनाला एक मोठी गदा दिली आणि स्वत: दुसरी गदा घेऊन तो नगराच्या बाहेर आला. नंतर युद्धाची खुमखुमी असलेले दोन्ही वीर सपाट रणभूमीवर येऊन एकमेकांना भिडले आणि आपल्या वज्रासारख्या प्रचंड गदेने एकमेकांवर प्रहार करू लागले. ते डावीकडे उजवीकडे असे वेगवेगळे पवित्रे बदलत असता असे शोभून दिसत होते की, जणू काही दोन श्रेष्ठ नट रंगमंचावर युद्धाचा अभिनय करीत आहेत. परीक्षिता ! जेव्हा एकाची गदा दुसऱ्याच्या गदेला टक्कर देत असे, तेव्हा वाटे की, झुंजणाऱ्या दोन हत्तींच्या दातांचा खटखट आवाज होत आहे किंवा विजांचा कडकडाट होत आहे.

(२८-३६)

जेव्हा दोन हत्ती अतिशय रागाने झुंजू लागतात

आणि रुईच्या फांद्या तोडून एकमेकांवर त्यांचे तडाखे देतात, त्यावेळी त्या फांद्यांचे तुकडे तुकडे होतात. त्याप्रमाणे जेव्हा जरासंध आणि भीमसेन बाहुबलाने आपापल्या गदांनी एकमेकांचे खांदे, कंबर, पाय, हात, मांड्या आणि खांद्याचे सांधे यांवर वार करू लागले, तेव्हा त्यांच्या गदांचा चुराडा झाला. अशा प्रकारे जेव्हा गदांचा चक्काचूर झाला, तेव्हा ते दोघेही वीर रागाने ठोसे लगावून एकमेकांचे चूर्ण करण्याचा प्रयत्न करू लागले. त्यांचे ठोसे म्हणजे जणू लोखंडी हातोड्यांचेच वार होते. दोन हत्तींप्रमाणे लढणाऱ्या त्यांच्या थपडा आणि ठोशांचा आवाज विजेच्या कडकडाटाप्रमाणे भासत होता. परीक्षिता ! जरासंध आणि भीमसेन या दोघांचेही युद्धातील कौशल्य, बळ आणि उत्साह सारखाच होता. दोघांची शक्ती जराही कमी झाली नव्हती. त्यामुळे जय-पराजयाचे चिह्न दिसेना. दोघेही वीर रात्रीच्या वेळी मित्रांसारखे राहात आणि दिवसा अटीतटीने लढत. महाराज ! अशा प्रकारे लढता लढता त्यांचे सत्तावीस दिवस निघून गेले. (३७-४०)

राजा ! अठ्ठाविसाव्या दिवशी भीमसेन आपल्या मामेभाऊ श्रीकृष्णाला म्हणाला - "माधवा ! युद्धामध्ये मी जरासंधाला जिंकू शकणार नाही." श्रीकृष्णांना जरासंधाचे जन्म-मृत्यू माहीत होते. तसेच जरा नावाच्या राक्षसिणीने जरासंधाच्या शरीराचे दोन तुकडे जोडून त्याला जीवदान दिले आहे, हेही ते जाणत होते. म्हणून त्यांनी भीमसेनाच्या शरीरामध्ये आपल्या शक्तीचा संचार करून त्याला बळ देत जरासंधाच्या वधाच्या युक्तीविषयी विचार केला. त्यांनी त्याच्या मृत्यूचा उपाय जाणून एक फांदी मधोमध चिरून ती खूण म्हणून भीमसेनाला दाखविली. वीराग्रणी परम शक्तिशाली भीमसेनाने श्रीकृष्णांचा अभिप्राय जाणून जरासंधाचे पाय धरून त्याला जमिनीवर आपटले. नंतर त्याने त्याचा एक पाय आपल्या पायाने खाली दाबला आणि दुसरा आपल्या दोन्ही हातांनी पकडला. यानंतर भीमसेनाने हत्ती ज्याप्रमाणे झाडाची फांदी चिरतो, त्याप्रमाणे गुदद्वारापासून त्याला मधोमध चिरले. तेव्हा लोकांना जरासंधाच्या शरीराचे एक पाय, मांडी, अंडकोश, कंबर, पाठ, स्तन, खांदा, भुजा, डोळे, भुवया आणि कान वेगवेगळे झालेले दोन तुकडे दिसले. (४१-४६)

मगधराज जरासंधाचा मृत्यू झाल्यावर तेथील प्रजेमध्ये हाहाकार उडाला. त्याचवेळी श्रीकृष्ण आणि अर्जुनाने भीमसेनाला मिठी मारून त्याचा गौरव केला. सर्वशक्तिमान, ज्यांचे स्वरूप जाणणे कठीण, जे सर्व प्राण्यांचे जीवनदाते आहेत, त्या श्रीकृष्णांनी जरासंधाच्या राज्यावर त्याचा मुलगा सहदेव याला मगधाधिपती म्हणून अभिषेक केला. आणि जरासंधाने ज्या राजांना कैद करून ठेवले होते, त्यांची कारागृहातून सुटका केली. (४७-४८)

अध्याय बाहत्तरावा समाप्त

अध्याय त्र्याहत्तरावा

जरासंधाच्या कारागृहातून सुटलेल्या राजांना निरोप आणि भगवंतांचे इंद्रप्रस्थाला परतणे

श्रीशुक म्हणतात - जरासंधाने अगदी सहजपणे वीस हजार आठशे राजांना जिंकून डोंगराच्या दरीत ठेवले होते. ते जेव्हा तेथून बाहेर आले, तेव्हा त्यांची शरीरे मळकट आणि वस्त्रे गलिच्छ दिसत होती. भुकेमुळे ते दुर्बळ झाले होते आणि त्यांची तोंडे वाळून गेली होती. कैदखान्यात बंद राहिल्यामुळे ते खंगले होते. तेथून बाहेर पडताच त्यांनी पावसाळ्यातील ढगाप्रमाणे सावळ्या, पीतांबरधारी

भगवंतांचे दर्शन घेतले. त्यांच्या चार हातांमध्ये गदा, शंख, चक्र आणि कमळ शोभून दिसत होते. वक्ष:स्थळावर श्रीवत्सचिह्न आणि कमळाच्या गाभ्याप्रमाणे त्यांचे डोळे लालसर होते. त्यांचे सुंदर मुखकमल प्रसन्न असून कानांमध्ये मकराकृती कुंडले चमकत होती. त्यांच्या श्रीविग्रहावर सुंदर मुगुट, मोत्यांचा हार, हातामध्ये कडे, करदोटा आणि बाजूबंद शोभून दिसत होते. गळ्यामध्ये कौस्तुभमणी झगमगत होता आणि तेथे वनमाला शोभत होती. त्यांना पाहाताच त्या राजांची अशी स्थिती झाली की ते जणू डोळ्यांनी त्यांना पीत आहेत, जिभेने चाटीत आहेत, नाकाने हुंगत आहेत आणि बाहूंनी आलिंगन देत आहेत. त्यामुळे त्यांची सारी पापे धुतली गेली. त्यांनी त्यांच्या चरणांवर डोकी टेकवून त्यांना प्रणाम केला. श्रीकृष्णांच्या दर्शनाने त्या राजांना इतका आनंद झाला की कैदेत राहिल्याचे त्यांचे दु:ख एकदम नाहीसे झाले. हात जोडून ते श्रीकृष्णांची स्तुती करू लागले. (१-७)

राजे म्हणाले, शरणागतांचे सगळे दु:ख नाहीसे करणाऱ्या हे देवदेवेश्वरा ! हे अविनाशी श्रीकृष्णा ! आम्ही आपणांस नमस्कार करीत आहोत. या घोर संसाराला कंटाळून आपल्याला शरण आलेल्या आमचे रक्षण करा. हे मधुसूदना ! हे आमचे स्वामी ! या मगधराजाला आम्ही दोष देत नाही. भगवन ! कारण राज्यलक्ष्मीपासून राजांना दूर करणे ही आपली कृपाच होय. राज्यैश्वर्याच्या घमेंडीने उन्मत्त झालेल्या राजाला कल्याणाची प्राप्ती कधीही होऊ शकत नाही. आपल्या मायेने मोहित होऊन तो अनित्य अशा संपत्तीलाच स्थिर समजतो. अज्ञानी लोक ज्याप्रमाणे मृगजळाच्या पाण्यालाच जलाशय समजतात, त्याचप्रमाणे इंद्रियलोलुप, अज्ञानी माणसे या बदलणाऱ्या मायेला सत्य वस्तू समजतात. भगवन ! आम्ही अगोदर संपत्तीच्या नशेने आंधळे झालो होतो. या पृथ्वीला जिंकून घेण्यासाठी एकमेकांशी स्पर्धा करीत होतो आणि क्रूरपणे आपल्याच प्रजेला नष्ट करीत होतो. आम्ही इतके मस्तवाल झालो होतो की, आपण मृत्युरूपाने आमच्यासमोर उभे आहात, याचीही आम्हांला पर्वा नव्हती. हे श्रीकृष्णा ! त्याच आम्हांला आज अतिशय वेगवान व असामान्य बलशाली अशा आपलेच स्वरूप असलेल्या काळाने राज्यापासून दूर केले. ज्यांच्या कृपेनेच आमचा गर्व नाहीसा झाला, अशा आपल्या चरणकमलांचे आम्ही स्मरण करीत आहोत. हे विभो ! दिवसेंदिवस क्षीण होणाऱ्या व रोगांची जन्मभूमी असलेल्या या शरीराने मृगजळासारखे राज्य भोगण्याची आम्हांला अभिलाषा नाही, तसेच कानाला भुरळ पाडणाऱ्या मृत्यूनंतरच्या स्वर्गादी कर्मफलांचीसुद्धा आम्हांला इच्छा नाही. आता आपण आम्हांला हा उपाय सांगा की, जेणेकरून येथे संसारात राहूनही आपल्या चरणकमलांची सदैव आठवण राहील. नमस्कार करणाऱ्यांच्या दु:खाचा नाश करणाऱ्या हे श्रीकृष्णा ! वासुदेवा ! हरे ! परमात्मन ! गोविंदा ! आमचा आपल्याला वारंवार नमस्कार असो ! (८-१६)

श्रीशुक म्हणतात- परीक्षिता ! कारागृहातून मुक्त झालेल्या राजांनी जेव्हा अशा प्रकारे भगवान श्रीकृष्णांची स्तुती केली, तेव्हा शरणागतरक्षक, दयाळू प्रभू मधुर वाणीने त्यांना म्हणाले. (१७)

श्रीकृष्ण म्हणाले- हे राजांनो ! तुम्ही सर्वांनी जी इच्छा प्रगट केली, त्यानुसार आजपासून सर्वांचा आत्मा आणि सर्वांचा स्वामी अशा माझ्या ठायी तुमची खात्रीने सुदृढ भक्ती राहील. हे राजांनो ! तुम्ही जे मागितले, तेच उत्तम आहे. तुम्ही केलेली स्तुती खरी आहे; कारण मीसुद्धा पाहातो की, संपत्ती आणि ऐश्वर्याच्या घमेंडीने पुष्कळसे लोक उच्छृंखल होतात. हैहय, नहुष, वेन, रावण, नरकासुर इत्यादी अनेकजण तसेच देव, दैत्य आणि राजे ऐश्वर्याच्या गर्वामुळे पदभ्रष्ट झाले. तुम्ही हेही समजून घ्या की, शरीरादी उत्पन्न होणाऱ्या सर्व गोष्टी नाश पावतात. म्हणून मन आपल्या ताब्यात ठेवून यज्ञांनी माझे पूजन करा आणि धर्माप्रमाणे प्रजेचे रक्षण करा. तुम्ही आपल्या वंशपरंपरेचे रक्षण करण्यासाठी संतान उत्पन्न करा आणि प्रारब्धानुसार जन्म-मृत्यू,

सुख-दुःख इत्यादी जे काही प्राप्त होईल, ते समभावाने स्वीकारून आपले चित्त माझ्या ठिकाणी लावून आपले जीवन चालवा. देहादिकांविषयी उदासीन राहा आणि स्वस्वरूपात रममाण व्हा. त्याचप्रमाणे आपल्या आश्रमाला योग्य अशा व्रतांचे पालन करीत जा. आपले मन योग्य प्रकारे माझ्या ठिकाणी लावल्याने शेवटी तुम्ही ब्रह्मस्वरूप अशा मलाच प्राप्त व्हाल. (१८-२३)

श्रीशुक म्हणतात- भुवनेश्वर भगवान श्रीकृष्णांनी राजांना हा आदेश देऊन त्यांना स्नान इत्यादी घालण्यासाठी अनेक स्त्री-पुरुषांची नियुक्ती केली. (२४)

परीक्षिता ! सहदेवाकडून त्यांना राजाला योग्य अशी वस्त्रे, आभूषणे, पुष्पमाला, चंदन इत्यादी देववून त्यांचा सन्मान करविला. जेव्हा ते राजे अभ्यंग स्नान करून वस्त्रे, आभूषणे परिधान करून तयार झाले, तेव्हा भगवंतांनी त्यांना उत्तमोत्तम पदार्थांचे भोजन देवविले आणि तांबूल इत्यादी विविध प्रकारचे राजोचित भोग देवविले. अशा प्रकारे भगवान श्रीकृष्णांनी त्या राजांचा बंधमुक्त करून सन्मान केला, तेव्हा पावसाळा संपल्यानंतर तारे शोभावेत, त्याप्रमाणे तेजस्वी कुंडले घातलेले ते शोभू लागले. नंतर श्रीकृष्णांनी त्यांना सुवर्णाने आणि रत्नांनी मढविलेल्या, उत्तम घोडे जुंपलेल्या रथांमध्ये बसवून, गोड शब्दांनी तृप्त करून आपापल्या देशाकडे पाठविले. महात्म्या श्रीकृष्णांनी अशा प्रकारे त्या राजांना मोठ्या संकटातून मुक्त केले. आता ते श्रीकृष्णांचेच रूप, गुण आणि लीलांचे चिंतन करीत आपापल्या राजधानीकडे गेले. त्या राजांनी तेथे जाऊन आपापल्या प्रजाजनांना त्या परमपुरुषाची अद्भुत लीला ऐकविली. त्यानंतर अत्यंत काळजीपूर्वक भगवंतांच्या आज्ञेनुसार ते राज्य करू लागले. (२५-३०)

अशा प्रकारे श्रीकृष्णांनी भीमसेनाच्या हस्ते जरासंधाचा वध करवून, भीमसेन आणि अर्जुनासह जरासंधपुत्र सहदेवाकडून सन्मानित होऊन इंद्रप्रस्थाकडे प्रयाण केले. इंद्रप्रस्थाजवळ पोहोचल्यावर त्या विजयी वीरांनी आपापले शंख वाजविले. त्यामुळे त्यांच्या इष्ट-मित्रांना सुख आणि शत्रूंना अतिशय दुःख झाले. तो शंखध्वनी ऐकून इंद्रप्रस्थवासियांची मने आनंदित झाली. जरासंध मारला गेला, हे त्यांना कळले. युधिष्ठिराचे संकल्पही पूर्ण झाले. भीमसेन, अर्जुन आणि श्रीकृष्णांनी राजाला वंदन केले. तसेच जरासंधाचा वध करण्यासाठी त्यांना जे जे करावे लागले, ते सर्व त्यांनी सांगितले. (३१-३४)

श्रीकृष्णांची ही आपल्यावरील कृपा ऐकून युधिष्ठिर सद्गदित झाला. त्याच्या नेत्रांतून आनंदाश्रू वाहू लागले. भगवंतांचे ते प्रेम पाहून त्याच्या तोंडून शब्द फुटेना ! (३५)

अध्याय त्याहत्तरावा समाप्त

अध्याय चौऱ्याहत्तरावा

भगवंतांची अग्रपूजा आणि शिशुपालाचा उद्धार

श्रीशुक म्हणतात - जरासंधाचा वध आणि सर्वशक्तिमान श्रीकृष्णांचा तो महिमा ऐकून राजा युधिष्ठिर प्रसन्न होऊन म्हणाला. (१)

युधिष्ठिर म्हणाला- ब्रह्मदेवादी त्रैलोक्याचे स्वामी आणि इंद्रादी लोकपाल आपली दुर्मिळ आज्ञा मिळताच ती शिरोधार्य मानून तिचे पालन करतात. हे अनंता ! तेच कमलनयन आपण स्वतःला राजे समजणाऱ्या क्षुद्र अशा आमची आज्ञा पाळता !

खरे तर, ही आपल्याला न शोभणारीच लीला होय ! ज्याप्रमाणे उदय किंवा अस्तामुळे सूर्याचे तेज अधिक किंवा कमी होत नाही, त्याचप्रमाणे कोणत्याही कर्मांमुळे आपला प्रभाव कमी-जास्त होत नाही; कारण आपण एकमेवाद्वितीय परब्रह्म परमात्मा आहात. हे अजिंक्य माधवा ! ''मी-माझे किंवा तू-तुझे'' या प्रकारची पशूंप्रमाणे विकृत भेदबुद्धी आपल्या भक्तांच्या चित्तामध्ये कधीही असत नाही. (२-५)

श्रीशुक म्हणतात- असे म्हणून युधिष्ठिराने श्रीकृष्णांच्या अनुमतीने, यज्ञासाठी योग्य मुहूर्तावर वेदज्ञ ब्राह्मणांना ऋत्विज म्हणून वरले. व्यास, भरद्वाज, सुमंतू, गौतम, असित, वसिष्ठ, च्यवन, कण्व, मैत्रेय, कवष, त्रित, विश्वामित्र, वामदेव, सुमती, जैमिनी, क्रतू, पैल, पराशर, गर्ग, वैशंपायन, अथर्वा, कश्यप, धौम्य, परशुराम, शुक्राचार्य, आसुरी, वीतिहोत्र, मधुच्छंदा, वीरसेन आणि अकृतव्रण अशी त्यांची नावे होती. (६-९)

तसेच द्रोणाचार्य, भीष्म, कृपाचार्य, धृतराष्ट्र व त्याचे पुत्र आणि बुद्धिमान विदुर यांनाही आमंत्रित केले. राजन ! राजसूय यज्ञ पाहाण्यासाठी सर्व देशांतील राजे, त्यांचे मंत्री व सेवक, तसेच ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र असे सर्व वर्णांचे लोकही तेथे आले. (१०-११)

यानंतर ऋत्विजांनी सोन्याच्या नांगराने यज्ञभूमी नांगरून युधिष्ठिराला शास्त्रानुसार यज्ञाची दीक्षा दिली. प्राचीन काळी वरुणदेवाच्या यज्ञामध्ये ज्याप्रमाणे यज्ञपात्रे सोन्याची होती, त्याचप्रमाणे युधिष्ठिराच्या यज्ञामध्येसुद्धा होती. पांडुनंदन युधिष्ठिराच्या निमंत्रणानुसार ब्रह्मदेव, शंकर, इंद्रादी लोकपाल, आपल्या गणांसह सिद्ध आणि गंधर्व, विद्याधर, नाग, मुनी, यक्ष, राक्षस, पक्षी, किन्नर, चारण, राजे, राण्या वगैरे निरनिराळ्या ठिकाणांहून तेथे आले. (१२-१५)

कृष्णभक्ताने राजसूय यज्ञ करणे हे योग्यच आहे, असेच सर्वांना वाटले. त्यात त्यांना आश्चर्य वाटले नाही. जसा पूर्वी देवांनी वरुणाकडून यज्ञ करविला होता, त्याप्रमाणे यावेळी देवांसारख्या तेजस्वी ऋत्विजांनी युधिष्ठिराकडून विधिपूर्वक राजसूय यज्ञ करविला. सोमरस काढण्याच्या दिवशी युधिष्ठिराने पूज्य याजक आणि सदसस्पतींचे मनापासून विधिपूर्वक पूजन केले. (१६-१७)

त्या यज्ञात कोणत्या सर्वश्रेष्ठ सदस्याची अग्रपूजा करावी यावर सभासद विचार-विनिमय करू लागले. जितक्या मती, तितकी मते ! म्हणून काहीच निर्णय होऊ शकला नाही. तेव्हा सहदेव म्हणाला. ''यदुश्रेष्ठ भगवान श्रीकृष्णच सर्व सदस्यांमध्ये श्रेष्ठ आहेत. कारण तेच देव, देश, काल, धन इत्यादी सर्व काही आहेत. हे सर्व विश्व ज्यांचे रूप आहे, सर्व यज्ञसुद्धा ज्यांची रूपे आहेत, तसेच अग्नी, आहुती, मंत्र हीही ज्यांची रूपे आहेत, ज्ञानमार्ग आणि भक्तिमार्ग हे दोन्हीही ज्यांच्या प्राप्तीसाठीच आहेत, असे हे एकटेच आहेत. सभासदांनो ! हेच एक अद्वितीय ब्रह्म आहेत. हे संपूर्ण जगत यांचेच स्वरूप आहे. ते अजन्मा असून स्वत:मध्येच स्वत:च विश्वाची उत्पत्ती, पालन आणि संहार करतात. सगळे जग ज्यांच्या कृपेने अनेक प्रकारच्या कर्मांचे अनुष्ठान करून चारही पुरुषार्थांचे फळ प्राप्त करून घेते. म्हणून त्याच या सर्वांमध्ये श्रेष्ठ अशा भगवान श्रीकृष्णांचीच अग्रपूजा करा. त्यांची पूजा करण्याने चराचराच्या आत्म्याचीच पूजा होणार आहे. आपण दिलेले अनन्त व्हावे, असे वाटत असेल, तर चराचराचा अंतरात्मा, भेदरहित, विकाररहित तसेच परिपूर्ण अशा भगवान श्रीकृष्णांची अग्रपूजा करावी.'' भगवंतांचा महिमा जाणणारा सहदेव एवढे बोलून गप्प बसला. ते ऐकून सर्व महात्म्यांनी ''अगदी योग्य ! अगदी योग्य !'' असे म्हणून सहदेवाच्या म्हणण्याचे समर्थन केले. सर्वांचा हा पाठिंबा ऐकून

व सभासदांचे मनोगत जाणून युधिष्ठिराने मोठ्या आनंदाने व प्रेमभराने श्रीकृष्णांची यथासांग पूजा केली. प्रथम त्याने भगवंतांचे चरण प्रक्षालन केले आणि ते त्रिभुवनाला पावन करणारे चरणतीर्थ पत्नी, भाऊ, मंत्री आणि कुटुंबियांसह अतिशय आनंदाने आपल्या मस्तकावर धारण केले. त्याने भगवंतांना पीतांबर आणि मौल्यवान अलंकार अर्पण केले. त्यावेळी त्याचे डोळे आनंदाश्रूंनी इतके भरून आले होते की, तो भगवंतांना नीट पाहूही शकत नव्हता. (१८-२८)

भगवान श्रीकृष्णांची अशा प्रकारे केलेली पूजा पाहून सर्व लोक हात जोडून ''नमो नमः ! जय जय !'' असा त्यांचा जयजयकार करून त्यांना नमस्कार करू लागले. त्याचवेळी आकाशातून आपोआप पुष्पवृष्टी होऊ लागली. (२९)

शिशुपालाने हे सर्व पाहिले. श्रीकृष्णांचे गुण ऐकून त्याला अतिशय राग आला आणि तो आसनावरून उठून उभा राहिला आणि भर सभेत हात उंचावून, मोठ्या क्रोधाने कोणाची भीड न ठेवता, भगवंतांना अर्वाच्य शब्द बोलू लागला. ''सभासदांनो ! अटळ काळच ईश्वर आहे, हे वेदांचे म्हणणे अक्षरशः खरे आहे. त्यामुळेच येथे बालबुद्धी व्यक्तीच्या बोलण्याने ज्ञानवृद्धांची बुद्धीसुद्धा चक्रावून गेली आहे. अग्रपूजेसाठी कोण योग्य आहे, याचा निर्णय करण्यास आपण समर्थ आहात. म्हणून हे सदसस्पतींनो ! 'कृष्ण अग्रपूजेसाठी योग्य आहे' हे अजाण सहदेवाचे बोलणे तुम्ही मान्य करू नका. येथे तपस्वी, विद्वान, व्रते धारण करणारे, ज्ञानाने पाप नाहीसे केलेले, लोकपालांनीही पूजिलेले ब्रह्मनिष्ठ श्रेष्ठ ऋषी आहेत. सभेतील श्रेष्ठांना सोडून हा कुलाला कलंक असलेला गोपाळ अग्रपूजेचा अधिकारी कसा होऊ शकेल बरे ? कावळा कधी यज्ञाच्या पुरोडाशाचा अधिकारी होऊ शकतो काय ? याला कोणताही वर्ण नाही की आश्रम नाही. हा उच्च कुळातही जन्मलेला नाही. हा सर्व धर्मांच्या बाहेर आहे. हा स्वैर वर्तन करणारा आहे. याच्या अंगी कोणतेही गुण नाहीत. अशा स्थितीत हा अग्रपूजेला कसा पात्र होऊ शकतो ? ययातीने याच्या वंशाला शाप दिलेला आहे, म्हणूनच सत्पुरुषांनी याच्या वंशालाच बहिष्कृत केले आहे. हा नेहमी धर्मबाह्य मधुपानात आसक्त असतो. तर मग हा अग्रपूजेला कसा पात्र असू शकेल ? या सर्वांनी ब्रह्मर्षी राहात असलेल्या देशांचा त्याग केला आणि वेदचर्चा नसलेल्या समुद्रात किल्ला बांधून हे राहू लागले. तेथे राहून हे चोर सर्व प्रजेला त्रास देतात.'' शिशुपालाचे सर्व पुण्य संपले होते; म्हणूनच तो यासारखे अर्वाच्य बोल श्रीकृष्णांना उद्देशून बोलत होता. परंतु सिंह जसा कोल्ह्याच्या कोल्हेकुईकडे लक्ष देत नाही, त्याप्रमाणे भगवान श्रीकृष्ण त्यावर काहीच बोलले नाहीत. परंतु भगवंतांची निंदा ऐकणे सभासदांना असह्य झाले. त्यांपैकी काहीजण कानांवर हात ठेवून क्रोधाने शिशुपालाला शिव्या-शाप देत बाहेर निघून गेले. कारण भगवंतांची किंवा भक्तांची निंदा ऐकून जो तेथून निघून जात नाही, त्याचे पुण्य नाहीसे होऊन तो अधोगतीला जातो. (३०-४०)

त्यावेळी शिशुपालाला मारण्यासाठी पांडव, मत्स्य, कैकय आणि सृंजयवंशी राजे संतापून हातात शस्त्रे घेऊन एकदम उभे राहिले. हे राजा ! परंतु शिशुपाल बिलकुल घाबरला नाही. त्याने मागचा-पुढचा काहीही विचार न करता आपली ढाल-तलवार उचलली आणि भर सभेत श्रीकृष्णांची बाजू घेणाऱ्या राजांची तो निंदा करू लागला. तेवढ्यात भगवान श्रीकृष्ण उभे राहिले. त्यांनी आपली बाजू घेणाऱ्या राजांना थांबवले आणि स्वतः क्रोधाने आपल्यावर चालून येणाऱ्या शिशुपालाचे मस्तक आपल्या तीक्ष्ण धारेच्या चक्राने तोडले. शिशुपाल मारला गेल्यानंतर तेथे अतिशय गोंधळ माजला. त्याचे अनुयायी असलेले राजे

आपापले प्राण वाचविण्यासाठी तेथून पळून जाऊ लागले. आकाशातून निखळून पडलेली उल्का ज्याप्रमाणे जमिनीत शिरते, त्याप्रमाणे सगळ्यांच्या देखतच शिशुपालाच्या शरीरातून एक ज्योत बाहेर पडून ती श्रीकृष्णांमध्ये प्रविष्ट झाली. शिशुपालाच्या अंत:करणामध्ये सलग तीन जन्मांपासून वैरभाव वाढत गेला होता आणि अशा वैरभावयुक्त बुद्धीने भगवंतांचेच चिंतन करीत करीत तो भगवद्रूप झाला. कारण नव्या जन्माला भावच कारणीभूत असतो. नंतर चक्रवर्ती राजाने सदस्य आणि ऋत्विजांना पुष्कळ दक्षिणा दिली. तसेच सर्वांचा सत्कार करून विधिपूर्वक यज्ञाच्या शेवटी करावयाचे अवभृथ-स्नान केले. (४१-४७)

योगेश्वरेश्वर भगवान श्रीकृष्णांनी अशा प्रकारे राजाचा यज्ञ पूर्ण केला आणि बांधवांच्या विनंतीवरून काही महिने ते तेथेच राहिले. त्यानंतर युधिष्ठिराची इच्छा नसतानाही भगवान श्रीकृष्णांनी त्यांचा निरोप घेऊन आपल्या राण्या व मंत्र्यांसह द्वारकेकडे प्रयाण केले. (४८-४९)

वैकुंठवासी जय आणि विजय यांना सनकादी ऋषींच्या शापामुळे वारंवार जन्म घ्यावा लागला, हे आख्यान मी तुला अतिशय विस्तारपूर्वक सांगितले. अवभृथ स्नान करून महाराज युधिष्ठिर ब्राह्मण आणि क्षत्रियांच्या सभेमध्ये देवराज इंद्राप्रमाणे शोभून दिसू लागला. राजाने देव, मनुष्य आणि गंधर्वादिकांचा यथायोग्य सत्कार केला. नंतर ते सर्वजण भगवान श्रीकृष्ण व राजसूय यज्ञाची प्रशंसा करीत आनंदाने आपापल्या लोकी निघून गेले. ज्याला पांडवांच्या या उज्ज्वल राज्यलक्ष्मीचा उत्कर्ष सहन झाला नाही, तो पापी, कलहप्रेमी आणि कुरुकुलाचा रोग असलेला दुर्योधन मात्र दु:खी झाला. (५०-५३)

जो कोणी शिशुपालवध, जरासंधवध, कैदी राजांची मुक्तता आणि यज्ञ या श्रीकृष्णांच्या लीलांचे कीर्तन करील, त्याची सर्व पापांपासून सुटका होईल. (५४)

अध्याय चौऱ्याहत्तरावा समाप्त

अध्याय पंचाहत्तरावा

राजसूय यज्ञाची पूर्तता आणि दुर्योधनाचा अपमान

परीक्षिताने विचारले - मुनिवर्य ! अजातशत्रू धर्मराजाचा राजसूय यज्ञमहोत्सव पाहून जे राजे, ऋषी, मुनी, देव इत्यादी आले होते, ते सर्वजण आनंदित झाले; पण दुर्योधन मात्र नाही. ही गोष्ट मी आपल्या तोंडून ऐकली. भगवन ! आपण याचे कारण सांगावे. (१-२)

श्रीशुक म्हणाले- परीक्षिता ! तुझे थोर आजोबा युधिष्ठिर यांच्यावरील प्रेमामुळे त्यांच्या बांधवांनी राजसूय यज्ञामध्ये वेगवेगळी सेवाकार्ये स्वीकारली होती. भीमसेन भोजनप्रमुख होता. दुर्योधन खजिनदार होता. सत्काराचे काम सहदेवाकडे होते आणि वेगवेगळ्या प्रकारची सामग्री गोळा करण्याचे काम नकुल पाहात होता. अर्जुन गुरुजनांची सेवा करीत होता आणि श्रीकृष्ण अतिथींचे पाय धुण्याचे काम करीत होते. भोजन वाढण्याचे काम द्रौपदी करीत होती आणि उदार कर्ण दाने देत होता. परीक्षिता ! याचप्रमाणे सात्यकी, विकर्ण, हार्दिक्य, विदुर इत्यादी, तसेच भूरिश्रवा इत्यादी बाल्हीकाचे पुत्र आणि संतर्दन इत्यादींना राजसूय यज्ञामध्ये निरनिराळ्या कामांवर नियुक्त केले होते. ते सर्वजण राजाला आवडेल अशा प्रकारे कामे करीत होते. (३-७)

ऋत्विज, सदस्य, ज्ञानी पुरुष, इष्ट-मित्र व बांधव यांचा, गोड वाणी, पूजा आणि दक्षिणा

इत्यादींनी उत्तम प्रकारे सत्कार झाला, तसेच शिशुपाल भक्तवत्सल भगवंतांच्या चरणी विलीन झाला. त्यानंतर सर्वांनी गंगेत अवभृथस्नान केले. या स्नानाच्या सोहळ्याच्या वेळी मृदंग, शंख, ढोल, नौबती, नगारे, शिंगे इत्यादी निरनिराळी वाद्ये वाजू लागली. नर्तकी आनंदाने नाचू लागल्या. गवयी गटागटांनी गाऊ लागले. वीणा, बासऱ्या, टाळ-झांजा वाजू लागल्या. यांचा तुंबळ आवाज सगळ्या आकाशात दुमदुमू लागला. सोन्याचे हार गळ्यात घातलेले यदू, सृंजय, कांबोज, कुरू, केकय आणि कोसल देशाचे राजे युधिष्ठिर महाराजांना पुढे करून रंगी-बेरंगी ध्वजापताकांनी युक्त आणि खूप सजविलेल्या अशा हत्ती, रथ, घोडे व सैनिक अशा चतुरंग सेनेसह पृथ्वीचा थरकाप करीत चालले होते. यज्ञाचे सदस्य, ऋत्विज आणि पुष्कळसे विद्वान ब्राह्मण वेदमंत्रांचे उच्च स्वराने पठन करीत चालले होते. त्यावेळी देव, ऋषी, पितर, गंधर्व आकाशातून फुलांचा वर्षाव करीत त्यांची स्तुती करीत होते. यावेळी स्त्री-पुरुष सुगंधी द्रव्ये, फुलांचे हार, रंगी-बेरंगी वस्त्रे आणि बहुमूल्य अलंकारांनी नटून-थटून एकमेकांवर पाणी, तेल, दूध, लोणी इत्यादी टाकून त्यांना भिजवीत, ते एकमेकांच्या अंगाला लावीत खेळ करीत होते. वारांगना पुरुषांना तेल, दूध, सुगंधित पाणी, हळद आणि दाट केशर लावीत आणि पुरुषसुद्धा त्यांना त्याच वस्तूंनी चिंब भिजवीत. (८-१५)

तो उत्सव पाहाण्यासाठी त्यावेळी ज्याप्रमाणे उत्तमोत्तम विमानात बसून आकाशामध्ये पुष्कळशा देवी आल्या होत्या, त्याचप्रमाणे रक्षणासाठी बरोबर असलेल्या सैनिकांसह राण्या निरनिराळ्या वाहनांत बसून आल्या होत्या. पांडवांचे मामेभाऊ श्रीकृष्ण आणि त्यांचे मित्र त्या राण्यांवर निरनिराळ्या प्रकारचे रंग टाकीत होते. यामुळे त्या राण्यांचे लाजेने चूर झालेले चेहरे स्मित हास्याने खुलून दिसत होते. त्या राण्यांची वस्त्रे भिजल्यामुळे त्यांच्या शरीराचे वक्षःस्थळ, मांड्या, कंबर इत्यादी अवयव दिसू लागले होते. त्यासुद्धा पिचकाऱ्यांनी आपले दीर आणि त्यांच्या मित्रांवर रंग उडवीत होत्या. या धावपळीमुळे त्यांच्या वेण्या सुटून त्यांमध्ये माळलेली फुले ओघळून पडत होती. त्यांचा हा मनोहर विहार पाहून कामी पुरुषांचे चित्त चंचल होत होते. (१६-१७)

चक्रवर्ती राजा युधिष्ठिर द्रौपदी इत्यादी राण्यांसह सुंदर घोडे जुंपलेल्या व सोन्याच्या हारांनी सजविलेल्या रथात बसला होता. त्यावेळी तो प्रयाजादी क्रियांनी युक्त असा मूर्तिमंत राजसूय यज्ञ वाटत होता. ऋत्विजांनी पत्नीसंयाज नावाचा याग व यज्ञान्त-स्नानासंबंधी कर्म करवून द्रौपदीसह युधिष्ठिराकडून आचमन व संकल्प करवून गंगास्नान करविले. त्यावेळी माणसे आणि देवतासुद्धा दुंदुभी वाजवू लागल्या. तसेच देव, ऋषी, पितर आणि लोक फुलांचा वर्षाव करू लागले. युधिष्ठिराने स्नान केल्यानंतर सर्व वर्णांच्या आणि आश्रमांच्या लोकांनी गंगेमध्ये स्नान केले. कारण या स्नानामुळे महापापी-सुद्धा पापराशीतून ताबडतोब मुक्त होतात. त्यानंतर धर्मराजाने नवी रेशमी वस्त्रे परिधान केली व बहुमोल अलंकार घातले. नंतर ऋत्विज, सदस्य, ब्राह्मण इत्यादींना वस्त्रे, अलंकार व दक्षिणा देऊन त्यांचे पूजन केले. भगवत्परायण राजाने बांधव, कुटुंबीय, राजे, इष्ट-मित्र, हितचिंतक आणि इतरही लोक यांचा वारंवार सत्कार केला. त्यावेळी सर्व लोकांनी रत्नजडित कुंडले, फुलांचे हार, पगड्या, लांब अंगरखे, रेशमी वस्त्रे व रत्नांचे बहुमोल हार घातल्याने ते देवतांसारखे शोभून दिसत होते. कानांमधील कुंडले आणि कुरळे केस यांमुळे ज्यांची मुखकमले शोभून दिसत होती, अशा स्त्रिया कमरपट्ट्यांमुळे विशेष सुंदर दिसत होत्या. (१८-२४)

परीक्षिता ! राजसूय यज्ञामध्ये चारित्र्यसंपन्न ऋत्विज, वेदवेत्ते सदस्य, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, राजे, देव, ऋषी, पितर, अनुयायांसह लोकपाल

इत्यादी जे आले होते, त्या सर्वांचा युधिष्ठिराने सत्कार केला. त्यानंतर ते सर्वजण धर्मराजांचा निरोप घेऊन आपापल्या निवासस्थानाकडे गेले. अमृतपान करीत असताना माणूस जसा कधीच तृप्त होत नाही, त्याप्रमाणे सर्व लोक भगवद्भक्त राजर्षी युधिष्ठिराच्या राजसूय महायज्ञाची कितीही प्रशंसा करून तृप्त होत नव्हते. यानंतर धर्मराजाने मोठ्या प्रेमाने आपले आप्तेष्ट, संबंधी, बांधव आणि भगवान श्रीकृष्ण यांना थांबवून ठेवले. कारण त्यांच्या विरहाच्या कल्पनेनेच त्याला दु:ख होत होते. परीक्षिता ! भगवान श्रीकृष्णांनी सांब इत्यादी यादववीरांना द्वारकापुरीला पाठविले आणि स्वत: युधिष्ठिराला आनंद देण्यासाठी ते तेथेच राहिले. अशाप्रकारे पार करण्यास अत्यंत कठीण असा राजसूय यज्ञाच्या मनोरथाचा महासागर धर्मनंदन राजाने श्रीकृष्णांच्या कृपेने सहजपणे पार केला आणि त्याची सर्व काळजी मिटली. (२५-३०)

एके दिवशी भगवंतांचा भक्त असलेल्या युधिष्ठिराच्या अंत:पुरातील संपत्ती व राजसूय यज्ञ केल्यामुळे त्याला प्राप्त झालेले महत्त्व पाहून दुर्योधनाला मत्सर वाटू लागला. परीक्षिता ! मय नावाच्या दानवाने पांडवांसाठी जे प्रासाद बनविले होते, त्यांमध्ये राजे, दैत्यराजे आणि सुरेन्द्र या सर्वांजवळ असणारे नाना प्रकारचे ऐश्वर्य एकवटले होते. त्या सर्वांच्याद्वारा द्रौपदी तेथे आपल्या पतींची सेवा करीत होती. त्यावेळी त्या राजभवनांत श्रीकृष्णांच्या हजारो राण्या राहात होत्या. त्या जेव्हा राजभवनात नितंबांच्या भारामुळे हळूहळू चालत, तेव्हा त्यांच्या नूपुरांचा आवाज सगळीकडे पसरत असे. त्यांचे कटिप्रदेश अत्यंत सुंदर होते. तसेच त्यांच्या वक्ष:स्थळावर लावलेल्या केशराच्या लालिम्याने मोत्यांचे शुभ्र हार लालसर वाटत होते. कुंडले घातलेली व कुरळे केस भुरभुरत असलेली त्यांची मुखकमले विशेषच शोभून दिसत होती. हे सर्व पाहून द्रौपदीच्या ठिकाणी आसक्त असलेल्या दुर्योधनाच्या अंत:करणात जळफळाट होऊ लागला. (३१-३३)

राजाधिराज युधिष्ठिर एके दिवशी आपले बंधू, संबंधी आणि आपला नेत्रच असे श्रीकृष्ण यांच्यासह मय दानवाने बनविलेल्या सभेत सुवर्णसिंहासनावर इंद्राप्रमाणे विराजमान झाला होता. त्याचे ऐश्वर्य ब्रह्मदेवाच्या ऐश्वर्यासारखे होते. भाट त्याची स्तुती करीत होते. त्याच वेळी अभिमानी दुर्योधन आपल्या भावांसह तेथे आला. त्याच्या डोक्यावर मुकुट, गळ्यामध्ये हार आणि हातात तलवार होती. परीक्षिता ! तो रागाने तेथील सेवकांना दरडावीत होता. मय दानवाने त्या सभेत अशी किमया केली होती की, दुर्योधन मोहित होऊन जमिनीला पाणी समजून त्याने आपली वस्त्रे वर केली आणि पाण्याला जमीन समजून तो तेथे आपटला. तो पडल्याचे पाहून भीमसेन, राण्या आणि अन्य राजे हसू लागले. त्यावेळी युधिष्ठिर जरी त्यांना मनाई करीत होता, तरी श्रीकृष्णांची त्यांना संमती होती. या घटनेमुळे दुर्योधन लज्जित झाला. तो क्रोधाने जळू लागला. आता तो मान खाली घालून गुपचुपपणे सभाभवनातून बाहेर पडून हस्तिनापुरला गेला. ही घटना पाहून सत्पुरुषांमध्ये हाहाकार माजला आणि धर्मराज काहीसा खिन्न झाला. भगवान श्रीकृष्ण मात्र गप्प बसले होते. कारण कोणत्याही प्रकारे का होईना, पृथ्वीचा भार त्यांना कमी करायचा होता. खरे तर त्यांनी पाहिल्यामुळेच दुर्योधनाला तो भ्रम झाला होता. परीक्षिता ! त्या महान राजसूय यज्ञामध्ये दुर्योधनाचा जळफळाट का झाला, हे तू मला विचारले होतेस. ते सर्व मी तुला सांगितले. (३४-४०)

अध्याय पंचाहत्तरावा समाप्त

अध्याय शाहत्तरावा

शाल्वाबरोबर यादवांचे युद्ध

श्रीशुक म्हणतात - परीक्षिता ! मनुष्यासारखी लीला करणाऱ्या भगवान श्रीकृष्णांचे आता आणखी एक अद्भुत चरित्र ऐक. त्यांनी शाल्वाला कसे मारले, ते सांगतो. शाल्व हा शिशुपालाचा मित्र होता आणि रुक्मिणीच्या विवाहाच्या वेळी तो आलेला होता. त्यावेळी यादवांनी युद्धामध्ये जरासंध इत्यादींच्याबरोबर शाल्वालाही जिंकले होते. सर्व राजांच्या समक्ष त्या दिवशी शाल्वाने प्रतिज्ञा केली होती की, ''मी पृथ्वीवरून यादवांचे नाव पुसून टाकीन. पाहाच माझे सामर्थ्य !'' परीक्षिता ! अशी प्रतिज्ञा करून मूर्ख शाल्वाने देवाधिदेव पशुपतींची आराधना सुरू केली. त्याकाळी तो दिवसभरात फक्त एक वेळ मूठभर धूळ खात असे. भगवान शंकर लवकर प्रसन्न होणारे असल्याने त्यांनी एक वर्षानंतर प्रसन्न होऊन शरण आलेल्या शाल्वाला वर मागण्यास सांगितले. त्यावेळी शाल्वाने असा वर मागितला की, ''मला आपण एक असे विमान द्या की, जे देव, असुर, मनुष्य, गंधर्व, नाग आणि राक्षस यांना नष्ट करता येणार नाही. इच्छा असेल तिकडे जाईल आणि यदुवंशियांसाठी अत्यंत भयानक असेल.'' भगवान शंकर म्हणाले, 'तथास्तु'. त्यानंतर त्यांच्या आज्ञेनुसार पराक्रमी मय दानवाने लोखंडाचे सौभ नावाचे विमान तयार केले आणि ते शाल्वाला दिले. ते विमान म्हणजे एक नगरच होते. ते इतके अंधकारमय होते की, त्याला पाहाणे किंवा पकडणे अतिशय अवघड होते. शाल्वाची इच्छा असेल, तेथे ते जात असे. यादवांनी केलेला पराभव आठवून शाल्वाने ते विमान घेऊन द्वारकेवर चढाई केली. (१-८)

शाल्वाने आपल्या अवाढव्य सेनेद्वारा द्वारकेला चारी बाजूंनी घेरले आणि नंतर तेथील फळा-फुलांनी लहडलेली उपवने, उद्याने, तो उध्वस्त करू लागला. तसेच नगरातील गोपुरे, दारे, राजवाडे, गच्च्या, भिंती व नागरिकांची मनोरंजनस्थळे नष्ट करू लागला. त्या श्रेष्ठ विमानातून शस्त्रांचा वर्षाव होऊ लागला. शिलाखंड, झाडे, विजा, साप आणि गारा पडू लागल्या. अत्यंत तुफान वादळ सुरू झाले. धुळीने दिशा दिसेनाशा झाल्या. पूर्वी ज्याप्रमाणे त्रिपुरासुराने पृथ्वीला त्रस्त करून सोडले होते, त्याचप्रमाणे शाल्वाच्या विमानाने द्वारकापुरीला अतिशय त्रस्त केले. तेथील लोकांची सुखशांती नष्ट झाली. आपल्या प्रजेला अतिशय कष्ट होत आहेत, असे जेव्हा परमयशस्वी वीर प्रद्युम्नाने पाहिले, तेव्हा तो रथावर आरूढ होऊन सर्वांना धीर देत म्हणाला, ''भिऊ नका.'' त्यांच्या पाठोपाठ सात्यकी, चारुदेष्ण, सांब, भावांसह अक्रूर, कृतवर्मा, भानुविंद, गद, शुक, सारण इत्यादी अनेक वीर मोठमोठी धनुष्ये हातात घेऊन निघाले. ते सर्वजण महारथी होते. सर्वांनी कवचे घातली होती आणि सर्वांचे रक्षण करण्यासाठी रथ, हत्ती, घोडे तसेच पायदळ सेना बरोबरीने चालत होती. यानंतर, पूर्वी जसे देवांबरोबर असुरांचे घनघोर युद्ध झाले होते, त्याचप्रमाणे शाल्वाचे सैनिक आणि यादव यांचे युद्ध होऊ लागले. ते बघून लोकांच्या अंगावर शहारे येत. ज्याप्रमाणे सूर्य आपल्या प्रखर किरणांनी रात्रीचा अंधार नाहीसा करतो, त्याचप्रमाणे प्रद्युम्नाने आपल्या दिव्य अस्त्रांनी क्षणातच सौभपती शाल्वाच्या सर्व माया नष्ट केल्या. प्रद्युम्नाच्या बाणांना सोन्याचे पंख व लोखंडी फाळ लावलेले होते. त्यांच्या गाठी दिसत नव्हत्या. अशा पंचवीस बाणांनी त्याने शाल्वाच्या सेनापतीला घायाळ केले. तसेच शाल्वालासुद्धा शंभर बाण मारले. नंतर प्रत्येक

सैनिकाला एक एक, सारथ्यांना प्रत्येकी दहा आणि वाहनांना तीन तीन बाण मारले. महावीर प्रद्युम्नाचे हे अद्भुत आणि महान कृत्य पाहून त्याचे आणि शत्रुपक्षाचेही सैनिक त्याची प्रशंसा करू लागले. मय दानवाने तयार केलेले शाल्वाचे ते विमान मायावी होते. ते इतके विचित्र होते की, कधी ते अनेक रूपांत दिसे, तर कधी एकाच रूपात. कधी दिसत असे तर कधी अदृश्य होत असे. शत्रूंना त्याचा पत्ताही लागत नसे. ते कधी जमिनीवर दिसे, तर कधी आकाशात उडत असे. कधी पर्वताच्या शिखरावर चढत असे, तर कधी पाण्यावर तरंगू लागे. ते कोलिताप्रमाणे फिरत राही. ते कोठेच स्थिर राहात नसे. आपले विमान आणि सैनिक यांच्यासह जेथे जेथे शाल्व त्यांच्या दृष्टीस पडत असे, तेथे तेथे यादव सेनापती बाणांचा वर्षाव करीत होते. सूर्य आणि अग्नीप्रमाणे जळत जाणारे त्यांचे बाण विषारी सापांप्रमाणे असह्य होत होते. शाल्वाचे नगराकार विमान आणि सेना त्यामुळे अत्यंत व्याकूळ झाली. शाल्वही मूर्च्छा येऊन पडला. (९-२४)

शाल्वाच्या सेनापतींनीसुद्धा यादवांवर पुष्कळ शस्त्रांचा वर्षाव केला होता. त्यामुळे त्यांना अतिशय क्लेश होत होते. परंतु त्यांनी रणांगण सोडले नाही. कारण ते विचार करीत होते की, मरण आले तर स्वर्ग मिळेल आणि जिवंत राहिलो तर विजय मिळेल. ज्याला आधी प्रद्युम्नाने पंचवीस बाण मारले होते, त्या शाल्वाच्या द्युमान नावाच्या बलवान मंत्र्याने झेप घेऊन प्रद्युम्नावर पोलादी गदेचा जोराने प्रहार केला आणि "मारले ! मारले !" म्हणून तो मोठ्याने ओरडला. शत्रूंचे दमन करणाऱ्या प्रद्युम्नाचे वक्षःस्थळ गदेच्या आघाताने जखमी झाले. दारुकाचा पुत्र त्याचा सारथी होता. सारथिधर्मानुसार त्याने त्याला रणभूमीवरून बाजूला नेले. दोन घटकांनंतर प्रद्युम्न शुद्धीवर आला. तेव्हा तो सारथ्याला म्हणाला, "हे सूता ! तू मला रणभूमीवरून बाजूला आणलेस, हे अगदी वाईट केलेस. आमच्या वंशातील कोणताही वीर रणभूमी सोडून निघून गेला, असे आम्ही कधी ऐकले नाही. हा कलंक फक्त माझ्या माथ्यावरच लागला आहे. हे सूता ! खरोखर तू षंढ आहेस. आता मी माझे चुलते बलराम आणि वडील श्रीकृष्ण यांच्यासमोर जाऊन काय सांगू ? मी युद्धातून पळून आलो, असेच आता सर्वजण म्हणतील. त्यांनी विचारल्यावर मी त्यांना योग्य असे काय उत्तर देऊ ?" माझ्या भावजया माझी खिल्ली उडवीत मला स्पष्टपणे विचारतील की, "सांग ना ! हे वीरपुरुषा ! तू षंढ कसा निपजलास ? युद्धात तुझे शत्रूंशी युद्ध कसे झाले ?" (२५-३१)

सारथी म्हणाला- कुमार ! मी जे काही केले ते सारथ्याचा धर्म जाणूनच केले. हे स्वामी ! संकट आल्यावर सारथ्याने रथात बसलेल्याचे रक्षण करावे आणि रथीने सारथ्याचे, हाच धर्म होय. हे जाणूनच मी आपल्याला रणभूमीवरून दूर नेले. शत्रूने आपल्यावर गदेचा प्रहार केल्यामुळे आपण बेशुद्ध झाला होतात. (३२-३३)

अध्याय शाहत्तरावा समाप्त

अध्याय सत्त्याहत्तरावा

शाल्वाचा उद्धार

श्रीशुक म्हणतात - प्रद्युम्नाने हात-तोंड धुऊन कवच चढवून धनुष्य घेतले आणि तो सारथ्याला म्हणाला, "मला वीर द्युमानाकडे घेऊन चल." द्युमान त्यावेळी यादवसेनेची धूळधाण करीत होता. प्रद्युम्नाने त्याचा प्रतिकार करून हसत हसत त्याच्यावर आठ बाण सोडले. चार बाणांनी त्याचे चार घोडे

आणि एकेका बाणाने सारथी, धनुष्य, ध्वज आणि त्याचे मस्तक उडविले. इकडे गद, सात्यकी, सांब इत्यादी वीरसुद्धा शाल्वाच्या सेनेचा संहार करू लागले. सौभ विमानात बसलेल्या सैनिकांची मस्तके तुटून समुद्रात जाऊन पडत. अशा प्रकारे यादव आणि शाल्वाचे सैनिक एकमेकांवर प्रहार करीत राहिले. असे हे अतिशय घनघोर आणि भयंकर युद्ध सत्तावीस दिवस चालले. (१-५)

त्यावेळी युधिष्ठिरांच्या आमंत्रणावरून भगवान श्रीकृष्ण इंद्रप्रस्थाला गेले होते. राजसूय यज्ञाची पूर्तता झाली होती आणि शिशुपालाचाही मृत्यू झाला होता. तेथे श्रीकृष्णांनी मोठे भयानक अपशकुन होत असलेले पाहून कुरुवंशातील ज्येष्ठ, ऋषी, कुंती आणि पांडव यांचा निरोप घेऊन द्वारकेकडे प्रयाण केले. ते मनात म्हणू लागले की, "मी वडील बंधूसह येथे आलो. आता शिशुपालाच्या पक्षातील राजे द्वारकेवर निश्चितच आक्रमण करतील. द्वारकेला पोहोचल्यावर ते युद्ध पाहून श्रीकृष्णांनी नगराचे रक्षण करण्याचे काम बलरामांच्याकडे सोपविले आणि सौभपती शाल्वाला पाहून आपला सारथी दारुक याला म्हटले. "दारुका ! तू लवकर माझा रथ शाल्वाजवळ घेऊन चल. हा शाल्व अतिशय मायावी आहे, तरीसुद्धा तू भिऊ नकोस. भगवंतांची अशी आज्ञा होताच दारुक गरुडध्वज रथावर आरूढ झाला आणि तो रथ शाल्वाकडे घेऊन चालला. दोन्ही सेनेतील सैनिकांनी युद्धभूमीवर प्रवेश करताना तो पाहिला. आतापर्यंत शाल्वाची बहुतेक सेना नष्ट झाली होती. श्रीकृष्णांना पाहाताच त्याने त्यांच्या सारथ्यावर प्रचंड आवाज करणारी शक्ती फेकली. ती शक्ती एखाद्या उल्केसारखी आकाशातून वेगाने चालली होती. तिच्या प्रकाशाने सर्व दिशा उजळून निघाल्या. ती सारथ्याकडे येत असलेली पाहून श्रीकृष्णांनी आपल्या बाणांनी तिचे शेकडो तुकडे केले. त्यानंतर त्यांनी शाल्वाला सोळा बाण मारले आणि आकाशात फिरणारे विमानसुद्धा, सूर्याने आपल्या किरणांनी आकाश व्यापावे, त्याप्रमाणे असंख्य बाणांनी व्यापून टाकले. शाल्वाने शार्ङ्गधनुष्याने शोभून दिसणाऱ्या श्रीकृष्णांच्या डाव्या हातावर बाण मारला. त्यामुळे शार्ङ्गधनुष्य भगवंतांच्या हातातून गळून पडले. ही एक अद्‌भुत अशीच घटना घडली. जे लोक हे युद्ध पाहात होते, त्यांच्यात मोठा हाहाकार उडाला. तेव्हा शाल्व गर्जना करून श्रीकृष्णांना म्हणाला. (६-१६)

"अरे मूर्खा ! तू आमच्या देखतच आमचा भाऊ आणि मित्र असलेल्या शिशुपालाच्या भावी पत्नीला हिरावून घेतलेस आणि तो बेसावध असताना भर सभेत त्याला मारलेस. तू स्वत:ला अजिंक्य समजतोस, हे मला माहीत आहे. तू आज जर माझ्यासमोर थांबलास, तर मी तुला माझ्या तीक्ष्ण बाणांनी अशा ठिकाणी पाठवीन की, जेथून कोणी परत येत नाही. (१७-१८)

श्रीभगवान म्हणाले- "अरे निर्बुद्धा ! तू विनाकारणच बडबड करीत आहेस. तुझा मृत्यू तुझ्या डोक्यावर घिरट्या घालीत आहे, हे तुला माहीत नाही. खरे शूर आपले शौर्य दाखवितात, व्यर्थ बडबड करीत नाहीत." असे म्हणून श्रीकृष्णांनी रागाने वेगवान अशा भयानक गदेने शाल्वाच्या खांद्यावर प्रहार केला. त्यामुळे तो रक्त ओकीत थरथर कापू लागला. इकडे गदा जेव्हा भगवंतांकडे परत आली, तेव्हा शाल्व अदृश्य झाला. यानंतर थोड्याच वेळात एक मनुष्य श्रीकृष्णांकडे आला व मस्तक लववून त्यांना नमस्कार करून, रडत रडतच म्हणाला, "मला देवकींनी पाठविले आहे. त्यांनी सांगितले आहे की, पित्याबद्दल अत्यंत प्रेम असणाऱ्या हे महाबाहो श्रीकृष्णा ! एखादा कसाई ज्याप्रमाणे पशूला बांधून नेतो, त्याप्रमाणे शाल्व तुझ्या पित्याला बांधून घेऊन गेला आहे." ही दु:खद बातमी ऐकून श्रीकृष्ण सामान्य माणसाप्रमाणे झाले. त्यांच्या चेहऱ्यावर औदासीन्य दिसू लागले.

न्य माणसाप्रमाणे ते व्याकूळ होऊन मनात
ादून घेऊन म्हणू लागले. "अहो ! देवदानवांना
वध्य व नेहमी सावध असणाऱ्या बलरामाला
क्षित शास्त्राने जिंकून माझ्या वडिलांना कसे
ा बांधून नेले ? प्रारब्ध बलवत्तर असते, हेच
!" श्रीकृष्ण असे म्हणत आहेत, तेवढ्यात
देवासारख्याच एका पुरुषाला घेऊन शाल्व तेथे
ला आणि श्रीकृष्णांना म्हणू लागला. "अरे
र्खा ! पहा ! हाच तुला जन्म देणारा तुझा पिता
ाहे, ज्याच्यासाठी तू जगत आहेस. तुझ्या देखतच
ी याला आता ठार मारतो. तुझ्या अंगात ताकद
असेल, तर याला वाचव !" मायावी शाल्वाने
अशाप्रकारे श्रीकृष्णांची निर्भर्त्सना करून वसुदेवाचे
मस्तक तलवारीने उडविले आणि ते घेऊन तो
आकाशात असलेल्या सौभ विमानात जाऊन बसला.
श्रीकृष्ण स्वत: सिद्ध ज्ञानस्वरूप आणि महाप्रभावी
असूनही पित्यावरील प्रेमामुळे क्षणभर सामान्य
माणसाप्रमाणे दु:खसागरात बुडून गेले. परंतु नंतर
त्यांच्या लक्षात आले की, ही शाल्वाने पसरलेली
माया आहे. ही त्याला मय दानवाने शिकविली
होती. श्रीकृष्णांनी सावध होऊन युद्धभूमीवर पाहिले,
तर तेथे दूत नव्हता की पित्याचे ते शरीरही नव्हते.
ते जसे एखादे स्वप्न होते. दुसरीकडे पाहिले, तर
शाल्व विमानात बसून आकाशात फिरत आहे.
तेव्हा ते त्याचा वध करण्यासाठी उद्युक्त झाले.
(१९-२९)

हे परीक्षिता ! मागचा पुढचा विचार न करणारे काही ऋषी अशा प्रकारची घटना घडल्याचे सांगतात. श्रीकृष्णांच्या बाबतीत असे म्हणणे हे ते 'मायापती' असल्याचे जे पूर्वी वर्णन केले, त्याच्या विरोधी आहे, हे त्यांच्या लक्षात येत नाही. अज्ञानी लोकांच्या ठिकाणी असणारे शोक, मोह, स्नेह आणि भय हे कोठे ! आणि कोठे ते परिपूर्ण भगवान की ज्यांचे चरणकमलांचा
झालेल्या आत्मविद्येने
आत्मबुद्धिरूप अनादी अज्ञान नाहीसे करतात व
आत्म्यासंबंधीचे अनंत ऐश्वर्य प्राप्त करून घेतात,
त्या संतांचे परम गतिस्वरूप असणाऱ्या श्रीकृष्णांच्या
ठिकाणी मोह कसा असू शकेल बरे ? (३०-३२)

शाल्व श्रीकृष्णांच्यावर अतिशय त्वेषाने
शस्त्रांचा वर्षाव करू लागला. अमोघ पराक्रम
असलेल्या भगवान श्रीकृष्णांनीसुद्धा आपल्या
बाणांनी शाल्वाला घायाळ केले आणि त्याचे कवच,
धनुष्य आणि डोक्यावरील मणी हे सर्व छिन्न-
भिन्न करून टाकले. त्याचबरोबर गदेच्या प्रहाराने
त्याचे विमानही तोडून फोडून टाकले. श्रीकृष्णांनी
फेकलेल्या गदेमुळे त्या विमानाचे हजारो तुकडे
होऊन ते समुद्रात पडले. त्यापूर्वीच हातात गदा
घेऊन शाल्वाने जमिनीवर उडी मारली आणि वेगाने
त्याने श्रीकृष्णांवर झेप घेतली. (३३-३४)

शाल्व आक्रमण करीत आहे असे पाहाताच
त्यांनी भाल्याने त्याचा हात गदेसह उखडून टाकला.
नंतर त्याला मारण्यासाठी त्यांनी प्रलयकालीन
सूर्याप्रमाणे तेजस्वी आणि अत्यंत अद्भुत असे सुदर्शन
चक्र धारण केले. त्यावेळी ते सूर्य उगवत असलेल्या
उदयाचलाप्रमाणे दिसत होते. ज्याप्रमाणे इंद्राने वज्राने
वृत्रासुराचे मस्तक उडवले होते त्याप्रमाणे भगवान
श्रीकृष्णांनी त्या चक्राने परम मायावी शाल्वाचे
किरीटकुंडलयुक्त डोके धडापासून वेगळे केले.
त्यावेळी शाल्वाच्या सैनिकांत हाहाकार उडाला.
परीक्षिता ! पापी शाल्व जेव्हा मरण पावला आणि
त्याच्या विमानाचासुद्धा गदेच्या प्रहाराने चक्काचूर
झाला, तेव्हा देव आकाशात दुंदुभी वाजवू लागले.
याचवेळी मित्रांच्या वधाचा बदला घेण्यासाठी
दंतवक्त्र अत्यंत क्रुद्ध होऊन तेथे आला. (३५-३७)

अध्याय सत्त्याहत्तरावा समाप्त

अध्याय अठ्ठ्याहत्तरावा

दंतवक्त्र आणि विदूरथाचा उद्धार व तीर्थयात्रेमध्ये बलरामांच्या हातून सूताचा वध

श्रीशुक म्हणतात - महाराज ! शिशुपाल, शाल्व आणि पौंड्रक मारले गेल्यानंतर त्यांच्याशी असलेल्या मैत्रीचे ऋण फेडण्यासाठी संतापलेला दुष्ट दंतवक्त्र हातात गदा घेऊन एकटाच, पायी-पायीच, युद्धभूमीवर येऊन थडकला. तो इतका शक्तिमान होता की, त्याच्या चालण्याने जमीन हादरत होती. श्रीकृष्णांनी त्याला अशाप्रकारे येताना पाहून ताबडतोब हातात गदा घेऊन रथातून खाली उडी मारली आणि किनाऱ्याने समुद्राला अडवावे, तसे त्याला अडविले. उन्मत्त दंतवक्त्राने गदा उगारून श्रीकृष्णांना म्हटले- "तू आज माझ्या दृष्टीसमोर आलास, हे फार चांगले झाले !" (१-४)

हे कृष्णा ! तू माझा मामेभाऊ असलास, तरी तू माझ्या मित्रांना मारले असून मलासुद्धा मारू इच्छितोस. म्हणून मूर्खा ! आज मी तुला या वज्रासारख्या गदेने ठार करीन. अरे मूर्खा ! तू माझा भाऊ असलास तरी शत्रूही आहेस. मी माझ्या मित्रांवरील प्रेमामुळे, शरीरातील रोग नाहीसा करावा, तसा तुला मारूनच त्यांच्या ऋणातून मुक्त होईन. माहुत जसा अकुंशाने हत्तीला टोचतो, त्याप्रमाणे दंतवक्त्राने आपल्या कडवट शब्दांनी श्रीकृष्णांना टोचत त्यांच्या डोक्यावर गदा मारून सिंहाप्रमाणे गर्जना केली. रणभूमीवर गदेचा प्रहार झाला, तरी यदुश्रेष्ठ जागेवरून जराही हालले नाहीत. त्यांनी आपल्या प्रचंड अशा कौमोदकी गदेने दंतवक्त्राच्या छातीवर प्रहार केला. गदेच्या प्रहाराने दंतवक्त्राची छाती फुटून तो तोंडातून रक्त ओकू लागला. त्याचे केस विखुरले, हात-पाय पसरले गेले आणि तो निष्प्राण होऊन जमिनीवर कोसळला. परीक्षिता ! शिशुपालाच्या मृत्यूच्यावेळी जसे झाले होते तसेच, सर्वांच्या देखतच दंतवक्त्राच्या मृत शरीरातून एक अत्यंत सूक्ष्म आश्चर्यकारक ज्योत बाहेर पडून श्रीकृष्णांमध्ये सामावून गेली. (५-१०)

त्याचा भाऊ विदूरथ भावाच्या मृत्यूने शोकाकुल झाला. तो क्रोधाने सुस्कारे टाकीत, हातात ढाल-तलवार घेऊन श्रीकृष्णांना मारण्यासाठी आला. राजेंद्रा ! तो चाल करून येत असलेला पाहून श्रीकृष्णांनी तीक्ष्ण धार असलेल्या चक्राने किरीट-कुंडले असलेले त्याचे डोके उडविले. अशा प्रकारे ज्यांना मारणे दुसऱ्या कोणालाही अशक्य होते, त्या शाल्व, त्याचे सौभ नावाचे विमान, दंतवक्त्र आणि विदूरथ यांना मारून श्रीकृष्णांनी सुशोभित द्वारकेत प्रवेश केला. त्यावेळी देव, माणसे, मुनी, सिद्ध, गंधर्व, विद्याधर, महानाग व पितर त्यांची स्तुती करीत होते. तसेच अप्सरा, यक्ष, किन्नर चारण त्यांच्यावर पुष्पवर्षाव करीत त्यांच्या विजयाचे गायन करीत होते. यावेळी वृष्णिवंशी यादव वीर त्यांच्याबरोबर चालले होते. योगेश्वर जगदीश्वर भगवान श्रीकृष्ण अशा लीला करीत असता सदोदित विजयी होत असले तरी अविवेकी लोकांना पराजित झाल्यासारखे वाटतात. (११-१६)

बलरामांनी जेव्हा ऐकले की, कौरव, पांडवांशी युद्ध करण्याची तयारी करीत आहेत, तेव्हा तटस्थ राहण्याच्या इच्छेने तीर्थयात्रेचा बहाणा करून ते द्वारकेतून बाहेर पडले. तेथून बाहेर पडून त्यांनी प्रभास क्षेत्रामध्ये स्नान केले आणि तेथे तर्पणाने देव, ऋषी, पितर यांना आणि भोजन घालून माणसांना तृप्त केले. नंतर काही ब्राह्मणांसह ते सरस्वती नदीच्या उगमाच्या दिशेने निघाले. ते अनुक्रमे पृथूदक, बिंदुसर, त्रितकूप, सुदर्शनतीर्थ, विशालतीर्थ,

ब्रह्मतीर्थ, चक्रतीर्थ आणि पूर्ववाहिनी सरस्वती नदी इत्यादी तीर्थक्षेत्रांवर गेले. परीक्षिता ! त्यानंतर यमुना तटावरील आणि गंगातटावरील तीर्थे करीत ते त्या दिवसात जेथे ऋषी ज्ञानयज्ञ करीत होते, त्या नैमिषारण्यात गेले. दीर्घकाल यज्ञ करणारे ऋषी बलराम आलेले पाहाताच आसनावरून उठले आणि त्यांनी त्यांचे स्वागत केले. तसेच योग्यतेनुसार नमस्कार करून व आशीर्वाद देऊन त्यांचा सन्मान केला. ते आपल्या बरोबरच्या ब्राह्मणांसह आसनावर बसले. नंतर त्यांची पूजा केली गेली. तेव्हा त्यांना दिसले की, व्यासांचा शिष्य रोमहर्षण व्यासपीठावर बसलेलाच आहे. सूतकुळात जन्मलेला असूनही हा रोमहर्षण त्या ब्राह्मणांपेक्षाही उच्च आसनावर बसला आहे. शिवाय आपण ब्राह्मणांसह आलो असता त्याने उठून आपले स्वागत केले नाही की हात जोडून प्रणामही केला नाही. यामुळे बलरामांना क्रोध आला. ते म्हणाले की, ''हा रोमहर्षण प्रतिलोम (क्षत्रियापासून ब्राह्मणस्त्रीला झालेला) असूनही या श्रेष्ठ ब्राह्मणांपेक्षा तसेच धर्माचे रक्षक असलेल्या आमच्यापेक्षाही उच्च आसनावर बसला असल्या-कारणाने, हा अविवेकी मृत्युदंडास पात्र आहे. भगवान व्यासमहर्षींचा शिष्य असून याने इतिहास, पुराणे, धर्मशास्त्रे इत्यादी पुष्कळशा शास्त्रांचे अध्ययनसुद्धा केले आहे. परंतु अजून याचा आपल्या मनावर संयम नाही. हा उद्दाम आहे. या गर्विष्ठाने स्वत:ला व्यर्थ पंडित मानले आहे. नटाप्रमाणे याचे अध्ययन हे केवळ सोंग आहे. याच्यापासून याला स्वत:लाही लाभ नाही की दुसऱ्यालाही नाही.

(१७-२६)

जे लोक धार्मिकतेचे ढोंग करून धर्माचे पालन करीत नाहीत, ते अधिक पापी होत. त्यांना शासन करण्यासाठीच मी या जगात अवतार घेतला आहे.'' तीर्थयात्रा करीत असल्याकारणाने जरी भगवान बलराम दुष्टांचा वध करण्यापासून परावृत्त झाले होते, तरीसुद्धा त्यांनी आपल्या हातातील दर्भाच्या टोकाने त्याच्यावर प्रहार केला व तो मरण पावला. कारण हे असेच व्हायचे होते. सूत मरण पावताच सर्व ऋषी हळहळले. देव बलरामांना ते म्हणाले, ''प्रभो ! हा आपण मोठा अधर्म केलात. हे यदुनंदना ! आम्हीच त्यांना ब्रह्मासन दिले होते आणि जोपर्यंत हे सत्र समाप्त होत नाही, तोपर्यंत शारीरिक कष्टरहित आयुष्यही दिले होते. आपण अजाणतेपणाने का असेना, केलेली ही ब्रह्महत्याच आहे. आपण योगेश्वर आहात, त्यामुळे वेदसुद्धा आपल्याला आज्ञा करू शकत नाहीत. तरीसुद्धा आपला अवतार लोकांना पवित्र करण्यासाठी झाला असल्यामुळे आपण कोणाच्याशी प्रेरणेशिवाय स्वत:च आपल्या इच्छेने या ब्रह्महत्येचे प्रायश्चित्त घ्यावे. त्यामुळे लोकांना धडा मिळेल.''

(२७-३२)

श्रीबलराम म्हणाले- लोकांपुढे आदर्श ठेवण्याची कृपा करण्यासाठी या ब्रह्महत्येसाठी मी प्रायश्चित्त घेईन. म्हणून यासाठी प्रथम श्रेणीचे प्रायश्चित्त आपण मला सांगावे. या सूताला आपण दीर्घायुष्य, बळ, इंद्रियांची शक्ती इत्यादी जे काही देऊ इच्छिता, ते मला सांगा. मी आपल्या योगमायेने सर्व काही साध्य करून देईन. (३३-३४)

ऋषी म्हणाले- हे बलरामा ! आपण असे करा की, ज्यायोगे आपले शस्त्र, पराक्रम आणि याचा मृत्यूसुद्धा व्यर्थ होणार नाही. शिवाय आमचेही वरदान खरे ठरेल. (३५)

श्रीबलराम म्हणाले- ऋषींनो ! वेदवचन असे आहे की, आत्माच पुत्राच्या रूपाने जन्म घेतो. म्हणून रोमहर्षणाच्या जागी त्याचा पुत्र आपल्याला कथा सांगेल. तसेच त्याला दीर्घायुष्य, इंद्रियांची शक्ती आणि बल प्राप्त होईल. (३६)

ऋषींनो ! याखेरीज आपण जे काही इच्छित असाल, ते मला सांगा. मी आपली इच्छा पूर्ण

करीन. अजाणतेपणाने माझ्या हातून जो अपराध घडला आहे, त्याचे प्रायश्चित्त आपण विचार करून मला सांगावे. कारण आपण ज्ञानी आहात.(३७)

ऋषी म्हणाले- बल्वल नावाचा इल्वलाचा पुत्र एक भयंकर दानव आहे. तो प्रत्येक पर्वकाळी येथे येऊन आमचे सत्र दूषित करतो. हे यदुनंदना ! तो येथे येऊन पू, रक्त, विष्ठा, मूत्र, दारू आणि मांस टाकू लागतो. त्या पाप्याला आपण मारा. ही आमची तुमच्याकडून फार मोठी सेवा होईल. त्यानंतर आपण एकाग्र चित्ताने तीर्थांमध्ये स्नान करीत एक वर्षपर्यंत भारतवर्षाची प्रदक्षिणा करा. त्यामुळे आपण शुद्ध व्हाल. (३८-४०)

अध्याय अठ्ठ्याहत्तरावा समाप्त

अध्याय एकोणऐंशीवा

बल्वलाचा उद्धार आणि बलरामांची तीर्थयात्रा

श्रीशुक म्हणतात - परीक्षिता ! पर्वकाळ सुरू झाल्यावर मोठा झंझावात सुरू झाला. धुळीचा वर्षाव होऊ लागला आणि सगळीकडे पुवाची दुर्गंधी येऊ लागली. त्यानंतर यज्ञशाळेमध्ये बल्वल दानवाने मल-मूत्र इत्यादी अपवित्र वस्तू टाकल्या. एवढे झाल्यावर हातात शूळ घेतलेला तो स्वत: दिसला. काजळाच्या ढिगासारखे त्याचे प्रचंड काळेकुट्ट शरीर होते. त्याची शेंडी आणि दाढी-मिशा तापलेल्या तांब्याप्रमाणे लालबुंद होत्या. उग्र दाढी आणि भुवयांच्यामुळे त्याचा चेहरा अतिशय भयानक दिसत होता. त्याला पाहून बलरामांनी शत्रुसेनेचा संहार करणारे मुसळ आणि दैत्यांचा नाश करणाऱ्या नांगराचे स्मरण केले. तत्काळ ती दोन्ही शस्त्रे तेथे आली. (१-४)

आकाशात संचार करणाऱ्या बल्वलाला बलरामांनी आपल्या नांगराच्या टोकाने ओढून घेऊन, त्या ब्रह्मद्रोहीच्या डोक्यावर अत्यंत क्रोधाने मुसळाचा घाव घातला. त्यामुळे वज्राच्या प्रहाराने कावेने लाल झालेला एखादा पहाड पडावा, त्याप्रमाणे कपाळ फुटून रक्ताच्या धारा वाहात असलेला तो आर्त किंकाळी फोडीत जमिनीवर कोसळला. नंतर त्या भाग्यवान मुनींनी बलरामांची स्तुती केली, कधीही व्यर्थ न होणारे आशीर्वाद दिले आणि देवांनी वृत्रासुराला मारणाऱ्या इंद्राला अभिषेक करावा, त्याप्रमाणे त्यांना अभिषेक केला. त्यावेळी ऋषींनी बलरामांना दिव्य वस्त्रे आणि दिव्य अलंकार अर्पण केले. तसेच कधीही न कोमेजणाऱ्या कमळांची वैजयंती माळा अर्पण केली. (५-८)

त्यानंतर ऋषींचा निरोप घेऊन बलराम ब्राह्मणांसह कौशिकी नदीवर आले व तेथे स्नान करून, जेथून शरयू नदी उगम पावते, त्या सरोवरावर गेले. तेथून शरयू नदीच्या काठाने जात जात प्रयागावर आले. तेथे स्नान व देवादिकांचे तर्पण करून तेथून पुलहाश्रमाला गेले. तेथून गंडकी, गोमती व विपाशा या नद्यांमध्ये स्नान करून नंतर शोणनदात स्नान केले. यानंतर गयेला जाऊन पितृतर्पण केले. तेथून गंगासागर संगमावर जाऊन तेथेही स्नान केले. नंतर महेंद्र पर्वतावर जाऊन तेथे परशुरामांचे दर्शन घेऊन त्यांना अभिवादन केले. त्यानंतर सप्त गोदावरी, वेणा, पंपा आणि भीमरथी इत्यादी नद्यांमध्ये स्नान करीत कार्तिक स्वामींच्या दर्शनासाठी ते गेले. तसेच तेथून महादेवांचे निवासस्थान असलेल्या श्रीशैल पर्वतावर जाऊन पोहोचले. यानंतर द्रविड देशातील परम पुण्यमय अशा वेंकटाचलावर जाऊन श्रीव्यंकटेशांचे दर्शन घेतले आणि तेथून ते कामाक्षी, शिवकांची, विष्णुकांची करीत कावेरी नावाच्या श्रेष्ठ नदीत स्नान करून श्रीहरींचा निवास असलेल्या पुण्यमय अशा श्रीरंगक्षेत्री जाऊन पोहोचले. तेथून पुढे त्यांनी श्री विष्णूंचे क्षेत्र असलेला ऋषभ पर्वत, दक्षिण मथुरा आणि महापापे नष्ट करणाऱ्या सेतुबंधाची यात्रा केली. (९-१५)

बलरामांनी तेथे ब्राह्मणांना दहा हजार गाई

दान दिल्या. नंतर तेथून कृतमाला आणि ताम्रपर्णी नद्यांमध्ये स्नान करून सात कुलपर्वतांपैकी एक अशा मलयपर्वतावर ते गेले. तेथे असलेल्या अगस्त्य मुनींना त्यांनी नमस्कार आणि अभिवादन केले. त्यांचा आशीर्वाद व निरोप घेऊन बलराम दक्षिण समुद्रावर गेले. तेथे त्यांनी कन्याकुमारीचे दर्शन घेतले. यानंतर श्रीविष्णूंचे स्थान असलेल्या अनंतशयनम्-क्षेत्री ते गेले आणि तेथील श्रेष्ठ अशा पंचाप्सरस तीर्थामध्ये स्नान केले. तेथे त्यांनी दहा हजार गाई दान केल्या. (१६-१८)

भगवान बलराम तेथून निघून केरळ आणि त्रिगर्त देशांना जाऊन तेथून शंकरांचे क्षेत्र असलेल्या गोकर्णाला आले. तेथे भगवान शंकर नेहमी विराजमान असतात. तेथून त्यांनी द्वीपामध्ये निवास करणाऱ्या आर्यादेवीचे दर्शन घेतले आणि तेथून शूर्पारक क्षेत्रात ते गेले. यानंतर तापी, पयोष्णी आणि निर्विन्ध्या नदीमध्ये स्नान करून ते दंडकारण्यात गेले. तेथे माहिष्मती नगराजवळ असणाऱ्या नर्मदेवर गेले. तेथे मनुतीर्थात स्नान करून ते पुन्हा प्रभासक्षेत्री परतले. तेथेच ब्राह्मणांकडून, कौरव-पांडवांच्या युद्धामध्ये पुष्कळशा क्षत्रियांचा संहार झाला आहे, हे ऐकून पृथ्वीवरील बराचसा भार कमी झाला, असे त्यांना वाटले. रणभूमीवर ज्या दिवशी भीमसेन आणि दुर्योधन यांचे गदायुद्ध चालू होते, त्याच दिवशी त्यांना थांबवण्यासाठी बलराम कुरुक्षेत्रात जाऊन पोहोचले. (१९-२३)

परंतु युधिष्ठिर, नकुल, सहदेव, श्रीकृष्ण आणि अर्जुन यांनी ते आल्याचे पाहून त्यांना वंदन केले व ते गप्प राहिले. हे काय सांगण्यासाठी येथे आले आहेत, हे त्यांच्या लक्षात येईना ! भीमसेन आणि दुर्योधन असे दोघेही त्यावेळी हातात गदा घेऊन एकमेकांवर विजय मिळविण्यासाठी म्हणून क्रोधाने निरनिराळे पवित्रे घेत होते. त्यांना पाहून बलराम म्हणाले. "हे राजा दुर्योधना ! हे भीमसेना ! तुम्ही दोघेही तुल्यबळ वीर आहात. त्यांपैकी भीमसेनामध्ये ताकद अधिक आहे, आणि दुर्योधनामध्ये गदायुद्धाचे कौशल्य अधिक आहे, असे मी समजतो. म्हणून सारखेच बळ असणाऱ्या तुमच्यांपैकी एकाचा जय व दुसऱ्याचा पराजय होईल, असे मला वाटत नाही. म्हणून हे व्यर्थ युद्ध तुम्ही थांबवा." (२४-२७)

परीक्षिता ! बलरामांचे म्हणणे बरोबर होते; परंतु त्या दोघांमधील वैर इतके वाढले होते की, त्यांनी ते ऐकले नाही. कारण एकमेकांना पूर्वी केलेली दुरुत्तरे आणि एकमेकांशी केलेले दुर्व्यवहार यांचीच त्यांना एकसारखी आठवण येत होती. त्यांचे प्रारब्धच तसे आहे, असे म्हणून त्यांना विशेष आग्रह न करता ते द्वारकेला परतले. तेथे उग्रसेन वगैरे प्रियजनांना ते भेटले. तेथून बलराम पुन्हा नैमिषारण्यात गेले. तेथील ऋषींनी, वैर, युद्ध इत्यादींचा त्याग केलेल्या बलरामांकडून आनंदाने सर्व प्रकारचे यज्ञ करविले. वास्तविक यज्ञ हे बलरामांचे अंगच होते. सर्वसमर्थ भगवान बलरामांनी त्या ऋषींना विशुद्ध तत्त्वज्ञानाचा उपदेश केला. त्यामुळे ते सर्वजण, या संपूर्ण विश्वाला स्वत:मध्ये आणि स्वत:ला सगळ्या विश्वामध्ये असल्याचा अनुभव घेऊ लागले. नंतर नातलग व इष्टमित्रांसमवेत बलरामांनी पत्नीसह यज्ञान्त स्नान करून सुंदर वस्त्रालंकार धारण केले. त्यावेळी चंद्र चांदण्यामुळे शोभून दिसावा, त्याप्रमाणे ते शोभू लागले. भगवान बलराम अनंत असून त्यांचे स्वरूप, मनालाही न कळणारे आहे. त्यांनी मायेने मनुष्यासारखे शरीर धारण केले आहे. त्या बलशाली बलरामांच्या अशा चरित्रकथांची गणतीच करणे कठीण. जो मनुष्य अनंत व अद्भुत कर्मे करणाऱ्या भगवान बलरामांच्या चरित्रकथांचे सायंकाळी आणि प्रात:काळी स्मरण करतो, तो भगवंतांना प्रिय होतो. (२८-३४)

अध्याय एकोणऐंशीवा समाप्त

अध्याय ऐंशीवा

सुदाम्याचे श्रीकृष्णांकडून स्वागत

परीक्षित म्हणाला- गुरुवर्य ! अनंत शक्ती असणाऱ्या भगवान श्रीकृष्णांच्या ज्या दुसऱ्या लीला आहेत, त्यांचे वर्णन आम्ही ऐकू इच्छितो. हे ब्रह्मन ! विषयबाणांनी दुःखी झालेला व वारंवार पवित्रकीर्ती श्रीकृष्णांच्या मंगलमय लीलांचे श्रवण करणारा कोणता ज्ञानी मनुष्य त्यांपासून विन्मुख होईल ? जी भगवंतांचे गुणगान करते, तीच खरी वाणी. जे त्यांची सेवा करतात, तेच खरे हात. जे चराचरांत निवास करणाऱ्या त्यांचे स्मरण करते, तेच खरे मन. आणि जे भगवंतांच्या पुण्यमय कथांचे श्रवण करतात, तेच खरे कान. जे चराचर जगताला त्यांची प्रतिमा समजून नमस्कार करते, तेच मस्तक आणि जे सगळीकडे त्यांच्या स्वरूपाचेच दर्शन करतात, तेच खरे नेत्र होत. शरीराचे जे अवयव भगवंत आणि त्यांच्या भक्तांच्या चरणोदकांचे नित्य सेवन करतात, तेच खरे अवयव. (१-४)

सूत म्हणतात- परीक्षिताने जेव्हा असा प्रश्न केला, तेव्हा श्रीशुकदेवांचे हृदय भगवान श्रीकृष्णांच्या ठिकाणी तल्लीन झाले व ते परीक्षिताला म्हणाले. (५)

श्रीशुक म्हणाले- एक ब्राह्मण श्रीकृष्णांचा मित्र होता. तो मोठा ब्रह्मज्ञानी, विषयांपासून विरक्त, शांतचित्त आणि जितेंद्रिय होता. गृहस्थाश्रमात असूनही तो प्रारब्धानुसार जे काही मिळे त्यातच संतुष्ट असे. त्याची वस्त्रे सामान्यच होती. परंतु त्याची पत्नीही तशीच होती. तीसुद्धा अर्धपोटी राहून कृश झाली होती. दारिद्र्याने ग्रासलेली ती दुःखी पतिव्रता एके दिवशी भुकेने व्याकूळ होऊन कापत कापत पतीजवळ गेली आणि खिन्न चेहऱ्याने म्हणाली. "पतिदेवा ! साक्षात लक्ष्मीपती भगवान श्रीकृष्ण आपले मित्र आहेत. ते भक्तांची इच्छा पूर्ण करणारे, शरणागतवत्सल आणि ब्राह्मणांचे भक्त आहेत. हे महाभाग ! साधूंचा आश्रय असणाऱ्या त्यांच्याकडे आपण जा. आपण कुटुंबवत्सल असून दरिद्री आहात, हे कळल्यावर ते आपल्याला पुष्कळ धन देतील. भोज, वृष्णी, अंधक इत्यादी यादवांचे अधिपती असे ते सध्या द्वारकेत आहेत. जे त्यांच्या चरणकमलांचे स्मरण करतात, त्यांना ते स्वतःचे सुद्धा दान करतात. तर मग ते जगद्गुरू आपल्या भक्तांना, जे फारसे इच्छा करण्यासारखे नाही, ते धन आणि ईप्सित विषय देतील, यात आश्चर्य ते कोणते ?" त्या ब्राह्मणाला पत्नीने जेव्हा अशा प्रकारे पुष्कळ वेळा नम्रतेने विनंती केली, तेव्हा त्याने विचार केला की, "या निमित्ताने श्रीकृष्णांचे दर्शन होईल. हा आपला मोठाच लाभ आहे." असा विचार करून त्याने जाण्याचा निश्चय केला आणि पत्नीला म्हटले, "हे कल्याणी ! घरात काही त्यांना भेट देण्याजोगी वस्तू असेल तर दे !" तेव्हा तिने शेजार-पाजारच्या ब्राह्मणांच्या घरांतून चार मुठी पोहे मागून आणले आणि एका कपड्यात बांधून भगवंतांना भेट देण्यासाठी आपल्या पतीकडे दिले. तो श्रेष्ठ ब्राह्मण ते पोहे घेऊन द्वारकेकडे जाण्यास निघाला. वाटेत तो विचार करीत होता की, "श्रीकृष्णांचे दर्शन आपल्याला कसे होईल, बरे ?" (६-१५)

द्वारकेला पोहोचल्यावर तो ब्राह्मण अन्य ब्राह्मणांबरोबर सैनिकांच्या तीन चौक्या आणि तीन चौक पार करून, जेथे जाणे अत्यंत अवघड, अशा भगवद्धर्माचे पालन करणाऱ्या यादवांच्या निवासस्थानात जाऊन पोहोचला. तेथेच श्रीकृष्णांच्या सोळा हजार राण्यांचे प्रासाद होते. त्यांपैकी वैभवसंपन्न अशा एकामध्ये ब्राह्मणाने प्रवेश केला.

त्यात प्रवेश करताच त्याला वाटले की, आपण जणू ब्रह्मानंदाच्या समुद्रातच बुंबत आहोत. (१६-१७)

श्रीकृष्ण त्यावेळी रुक्मिणीच्या पलंगावर बसले होते. ब्राह्मण येत असल्याचे लांबून पाहाताच ते ताबडतोब उठून उभे राहिले आणि त्याच्याजवळ येऊन त्यांनी मोठ्या आनंदाने त्याला मिठी मारली. प्रिय मित्र असलेल्या श्रेष्ठ ब्राह्मणाच्या अंगस्पर्शाने कमलनयन भगवान अत्यंत आनंदित झाले. तेव्हा त्यांच्या नेत्रांतून प्रेमाश्रू वाहू लागले. परीक्षिता ! नंतर त्याला श्रीकृष्णांनी पलंगावर बसवून स्वत: पूजेचे साहित्य आणून मित्राची पूजा केली. तसेच सर्वांना पवित्र करणाऱ्या त्यांनी आपल्या हातांनी ब्राह्मणाचे पाय धुऊन ते चरणोदक आपल्या मस्तकी धारण केले आणि त्याच्या शरीराला चंदन, केशर इत्यादी दिव्य गंधांची उटी लावली. नंतर त्यांनी मोठ्या आनंदाने सुगंधित धूप आणि दीपाने आपल्या मित्राला आरती ओवाळली. अशा प्रकारे पूजा करून तांबूल आणि गाय देऊन "तुझे स्वागत असो" असे म्हणून त्याचे स्वागत केले. जीर्ण वस्त्रे नेसलेल्या मळकट शरीर असलेल्या त्या कृश ब्राह्मणाच्या शरीरावरील शिरा स्पष्ट दिसत होत्या. अशा त्याची स्वत: रुक्मिणी चवऱ्या ढाळून सेवा करू लागली. पवित्रकीर्ती श्रीकृष्ण अतिशय प्रेमाने त्या मलिन अंगाच्या ब्राह्मणाची पूजा करीत आहेत, हे पाहून अंत:पुरातील स्त्रिया अत्यंत आश्चर्यचकित झाल्या. त्या म्हणू लागल्या, "या निर्धन, निंदनीय, अंगावर धड वस्त्रे नसलेल्या य:कश्चित भिकाऱ्याने असे कोणते पुण्य केले असावे की, ज्यामुळे त्रैलोक्याचे गुरू असणाऱ्या श्रीकृष्णांनी स्वत: त्याचा आदर-सत्कार केला ! इतकेच नव्हे तर, आपल्या पलंगावर असलेल्या रुक्मिणीला सोडून या ब्राह्मणाला थोरल्या भावासारखी मिठी मारली !" परीक्षिता ! नंतर श्रीकृष्ण आणि तो ब्राह्मण एकमेकांचे हात हातात घेऊन पूर्वी गुरुकुलात राहात असतानाच्या आनंददायक गोष्टी बोलू लागले. (१८-२७)

श्रीकृष्ण म्हणाले- धर्म जाणणाऱ्या हे ब्राह्मणा ! गुरुदक्षिणा देऊन गुरुकुलातून परत आल्यावर समावर्तन करून तू अनुरूप अशा स्त्रीबरोबर विवाह केलास की नाही ? मला माहीत आहे की, तुझे चित्त गृहस्थाश्रमात असूनही विषयभोगात आसक्त नाही. हे विद्वाना ! मला हे पण माहीत आहे की, धनाविषयीसुद्धा तुला मुळीच प्रेम नाही. जगात फारच थोडे लोक भगवंतांच्या मायेने निर्माण केलेल्या विषयवासनांचा त्याग करतात आणि चित्तामध्ये विषयांची वासना नसतानाही माझ्यासारखी फक्त लोकशिक्षणासाठी कर्मे करीत असतात. हे ब्रह्मन ! आपण दोघे गुरुकुलात राहात होतो, त्याची तुला आठवण आहे का ? गुरुकुलातच खरोखर द्विजांना आत्मज्ञान होते व त्यामुळे ते अज्ञानांधकार पार करून जातात. हे मित्रा ! या जगामध्ये जन्मदाता पिता हा प्रथम गुरू होय. त्यानंतर उपनयन (मुंज) संस्कार करून सत्कर्मांचे शिक्षण देणारा हा दुसरा गुरू होय. तो माझ्यासारखाच पूज्य आहे. त्यानंतर ज्ञानोपदेश करून परमात्म्याची प्राप्ती करून देणारा गुरू हा तर माझेच स्वरूप होय. वर्णाश्रमियांचे हे तीन गुरू असतात. हे ब्राह्मणा ! या मनुष्यजन्मात वर्णाश्रमींमध्ये जे लोक मत्स्वरूप गुरूंच्या उपदेशा-नुसार वागून अनायासे हा भवसागर पार करून जातात, तेच स्वार्थ आणि परमार्थाचे खरे जाणकार होत. प्रिय मित्रा ! सर्वांचा आत्मा असणारा मी जितका गुरुदेवांच्या सेवेने संतुष्ट होतो, तितका मी गृहस्थाचे धर्म पंचमहायज्ञ इत्यादींनी, ब्रह्मचाऱ्याचे धर्म उपनयन, वेदाध्ययन इत्यादींनी, वानप्रस्थाचे धर्म तपश्चर्या इत्यादींनी किंवा संन्याशाच्या सर्वस्व-त्यागरूप धर्मानेही संतुष्ट होत नाही. (२८-३४)

हे ब्रह्मन ! ज्यावेळी आम्ही गुरुकुलात निवास करीत होतो, त्यावेळची ही गोष्ट तुझ्या लक्षात आहे

काय की जेव्हा आम्हा दोघांना एके दिवशी आपल्या गुरुपत्नींनी लाकडे आणण्यासाठी जंगलात पाठविले होते ते ? त्यावेळी आपण एका घोर जंगलात गेलो होतो आणि पावसाळ्याचे दिवस नसतानाही भयंकर ढगाळी पाऊस आला होता. विजांचा कडकडाटही होत होता. मग सूर्यास्त झाला. सगळीकडे अंधार पसरला. जमिनीवर इतके पाणी झाले की, उंचसखल भागाचा पत्ताच लागत नव्हता. (३५-३७)

त्या पुरात वादळाने आणि पावसाने आम्ही अतिशय झोडपले जात होतो. दिशा कळत नव्हत्या. आम्ही भांबावून एकमेकांचे हात धरून जंगलात इकडे तिकडे भटकत राहिलो. गुरुदेव सांदीपनी मुनींना जेव्हा ही गोष्ट समजली, तेव्हा सूर्योदय झाल्यावर, आपले शिष्य असलेल्या आम्हांला शोधीत ते जंगलात पोहोचले. तेव्हा आम्हांला अतिशय त्रास झाल्याचे त्यांनी पाहिले. ते म्हणाले - "बाळांनो ! तुम्ही आमच्यासाठी खूप कष्ट घेतलेत. सर्व प्राण्यांना आपले शरीर सर्वाधिक प्रिय असते. परंतु तुम्ही त्याचीही पर्वा न करता आमच्या सेवेत मग्न राहिलात. गुरूंच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी चांगल्या शिष्यांचे एवढेच कर्तव्य असते की, त्यांनी विशुद्ध भावनेने आपले सर्वस्व, एवढेच काय पण शरीरसुद्धा गुरुदेवांच्या सेवेसाठी समर्पित करावे. हे श्रेष्ठ द्विजांनो ! मी तुम्हांवर संतुष्ट आहे. तुमचे सगळे मनोरथ पूर्ण होवोत आणि तुम्ही माझ्याकडून जे वेदाध्ययन केले, ते या आणि परलोकीसुद्धा निष्फळ न होवो !" प्रिय मित्रा ! आम्ही गुरुकुलात निवास करीत असताना अशा अनेक घटना घडल्या होत्या. गुरुदेवांच्या कृपेमुळेच मनुष्य शांती आणि पूर्णतेला प्राप्त करून घेतो. (३८-४३)

ब्राह्मण म्हणाला- हे देवा, जगद्गुरो ! आता आम्हांला मिळवायचे काय शिल्लक आहे ? कारण, सत्यसंकल्प परमात्मा असलेल्या आपल्याबरोबर आम्हांला गुरुकुलात राहाण्याचे भाग्य प्राप्त झाले ! हे प्रभो ! छंदोबद्ध वेद आणि सर्व कल्याणे यांचे उत्पत्तिस्थान आहे तुमचे शरीर ! तेच आपण गुरुकुलात राहिलात, हा केवळ मनुष्यासारखा अभिनय नव्हे तर काय ? (४४-४५)

अध्याय ऐंशीवा समाप्त

अध्याय एक्याऐंशीवा

सुदाम्याला ऐश्वर्याची प्राप्ती

श्रीशुक म्हणतात - सर्वांच्या मनातील जाणणारे ब्राह्मणांचे भक्त, संतांचे एकमेव आश्रयस्थान असे श्रीहरी अशा रीतीने त्या ब्राह्मणाबरोबर पुष्कळ वेळपर्यंत गप्पागोष्टी करीत राहिले. नंतर ते आपला प्रिय मित्र जो ब्राह्मण त्याच्याकडे प्रेमपूर्ण दृष्टीने पाहात स्मित हास्य करून थट्टेने त्याला म्हणाले. (१-२)

श्रीकृष्ण म्हणाले- "हे ब्रह्मन ! तू आपल्या घरून माझ्यासाठी भेट म्हणून काय आणले आहेस ? माझे प्रेमळ भक्त जेव्हा प्रेमाने मला लहानशीसुद्धा वस्तू अर्पण करतात, तेव्हा ती मला फार मोठी वाटते. परंतु अभक्तांनी मला पुष्कळ जरी काही दिले तरी त्यामुळे मी संतुष्ट होत नाही. जो मनुष्य भक्तीने पान, फूल, फळ किंवा पाणी मला अर्पण करतो, त्या शुद्धचित्त भक्ताने भक्तीने दिलेले ते मी स्वीकारतो." राजा ! असे म्हटल्यावरसुद्धा त्या ब्राह्मणाने संकोचाने त्या लक्ष्मीपतीला ते पसाभर पोहे दिले नाहीत. लज्जेने त्याने मान खाली घातली. श्रीकृष्ण सर्व प्राण्यांच्या मनातील जाणतात. त्यांनी ब्राह्मणाच्या येण्याचे

कारण जाणूनही विचार केला की, "याने यापूर्वी कधीही धनाच्या इच्छेने माझे भजन केलेले नाही. यावेळी हा आपला मित्र पतिव्रता पत्नीला बरे वाटावे म्हणून तिच्याच आग्रहावरून येथे आला आहे. म्हणून देवांनासुद्धा दुर्लभ अशी संपत्ती मी याला देईन." भगवान श्रीकृष्णांनी असा विचार करून त्याच्या वस्त्रातून एका फडक्यात बांधलेले पोहे "हे काय आहे ?" असे म्हणून, स्वत:च ओढून घेतले. आणि म्हणाले, "प्रिय मित्रा ! ही तर माझ्या अत्यंत आवडीची भेट तू माझ्यासाठी आणलीस. हे पोहे केवळ मलाच नव्हे, तर सगळ्या जगाला तृप्त करतील." असे म्हणून त्यांनी त्यातून एक मूठभर पोहे खाल्ले आणि दुसरी मूठ भरून घेतले, तोच पतिपरायण रुक्मिणीने श्रीकृष्णांचा हात धरला. रुक्मिणी म्हणाली, "हे विश्वात्मन ! माणसाला या लोकी किंवा परलोकातसुद्धा आपल्याला संतुष्ट करून सर्व प्रकारच्या संपत्तीची समृद्धी प्राप्त करण्यासाठी हे एक मूठभर पोहेसुद्धा पुरेसे आहेत." (३-११)

ब्राह्मण त्या रात्री श्रीकृष्णांच्या महालातच राहिला. तेथे खाऊन-पिऊन तो इतका खूष झाला की, आपण स्वर्गात असल्यासारखे त्याला वाटले. हे राजा ! दुसऱ्या दिवशी विश्वनिर्मात्या व भक्तांना आनंद देणाऱ्या श्रीकृष्णांनी त्याला वंदन केले व त्याच्या मागोमाग काही अंतर जाऊन त्याला निरोप दिला. नंतर तो आपल्या गावी निघाला. ब्राह्मणाला श्रीकृष्णांकडून धन मिळाले नाही. तरीसुद्धा त्याने स्वत: काही मागितले नाही. उलट या देवदेवेश्वरासाठी आपण य:कश्चित पोहे ते काय आणले, या विचाराने तो लज्जित झाला, परंतु श्रीकृष्णांच्या दर्शनामुळे आनंदितही होऊन तो आपल्या घराकडे परतला. जाताना तो मनात विचार करू लागला- "अहो ! ब्राह्मणांना देव मानणाऱ्या श्रीकृष्णांची ब्राह्मणभक्ती आज मी पाहिली. धन्य झालो ! ज्यांच्या वक्ष:स्थळावर स्वत: लक्ष्मी विराजमान असते, त्यांनी सर्वांत दरिद्री अशा मला आपल्या हृदयाशी कवटाळले. कुठे मी अत्यंत पापी, दरिद्री आणि कुठे लक्ष्मीचे आश्रयस्थान भगवान श्रीकृष्ण ! परंतु त्यांनी 'मी केवळ ब्राह्मण' म्हणून मला आपल्या बाहूंनी हृदयाशी घट्ट धरले. एवढेच नव्हे, तर ज्या पलंगावर त्यांची प्राणप्रिया रुक्मिणी शयन करते, त्या पलंगावर त्यांनी मला भाऊ मानून बसविले. मी थकलेलो होतो, म्हणून स्वत: त्यांच्या पट्टराणीने आपल्या हातांनी चवऱ्या ढाळून मला वारा घातला. ब्राह्मणांना देव मानणाऱ्या देवाधिदेवांनी पाय चेपणे इत्यादी रीतीने माझी चांगली सेवा करून देवाप्रमाणे माझी पूजा केली. त्यांच्या चरणांची पूजाच स्वर्ग, मोक्ष, पृथ्वी आणि रसातळातील संपत्ती व सर्व सिद्धींच्या प्राप्तीचे कारण होय. तरीसुद्धा 'हा दरिद्री धन मिळाल्यावर उन्मत्त होईल आणि माझे याला विस्मरण होईल,' असा विचार करूनच दयाळू श्रीकृष्णांनी मला थोडेसेसुद्धा धन दिले नाही.' (१२-२०)

मनात असा विचार करीतच ब्राह्मण आपल्या घराजवळ येऊन पोहोचला. ते ठिकाण, सूर्य, अग्नी आणि चंद्र यांच्या तेजाप्रमाणे तेजस्वी प्रासादांनी वेढलेले होते. ठिकठिकाणी वेगवेगळ्या प्रकारची उपवने आणि उद्याने तयार केलेली होती. आणि त्यांमध्ये पक्ष्यांचे थवे चिवचिवाट करीत होते. सरोवरांमध्ये कुमुदे, पांढरी, तांबडी, निळी अशी सुगंधी कमळे उमलली होती. उत्तम वस्त्रालंकार घातलेल्या सुंदर स्त्रिया तेथे वावरत होत्या. ते पाहून ब्राह्मण विचार करू लागला, "हे मी काय पाहात आहे ? हे कोणाचे ठिकाण आहे ? जेथे मी राहात होतो, ते हे ठिकाण असे कसे झाले ?" तो असा विचार करीत होता, तेवढ्यात देवतांसारखे सुंदर स्त्री-पुरुष वाजत-गाजत, मंगल गीते गात, त्या भाग्यवान ब्राह्मणाच्या स्वागतासाठी आले. (कारण, भगवंतांनी स्वर्गातून त्यांना येथे आणले होते.) पती आल्याचे ऐकून त्याच्या पत्नीला अतिशय आनंद

झाला आणि ती गडबडीतच ताबडतोब घराच्या बाहेर आली. त्यावेळी ती अशी दिसत होती की, जणू कमलवनातून आलेली लक्ष्मीच. पतीला पाहाताच त्या पतिव्रता पत्नीच्या डोळ्यांत अत्युत्कट प्रेमामुळे अश्रू तरळू लागले. (ते जमिनीवर पडू नयेत म्हणून) तिने आपले डोळे बंद केले. यांना वंदनच केले पाहिजे, असे ठरवून त्यांना नमस्कार केला आणि मनोमन आलिंगनही दिले. (२१-२६)

सुवर्णालंकार घातलेल्या दासींच्या समुदायात देवांगनेप्रमाणे अत्यंत शोभणाऱ्या पत्नीला पाहून तो आश्चर्यचकित झाला. तिच्यासह त्याने मोठ्या आनंदाने आपल्या प्रासादात प्रवेश केला. तो प्रासाद इंद्राच्या प्रासादासारखा शेकडो रत्नजडित खांबांचा होता. हत्तींच्या दातांपासून बनविलेल्या आणि सोन्याच्या पत्र्यांनी मढविलेल्या पलंगावर दुधाच्या फेसाप्रमाणे पांढऱ्या शुभ्र आणि कोमल गाद्या अंथरल्या होत्या. सोन्याच्या दांड्यांच्या चवऱ्या आणि पंखे तेथे ठेवलेले होते. सोन्याची सिंहासने होती. त्यांच्यावर मऊमऊ गाद्या अंथरल्या होत्या. तेथे मोत्यांच्या लडी लावलेले तेजस्वी चांदवे लावले होते. स्फटिकांच्या शुभ्र भिंतींवर पाचूची नक्षी होती. आणि रत्ननिर्मित स्त्रियांच्या हातात रत्नांचे दिवे झगमगत होते. (२७-३१)

अशा प्रकारे सर्व प्रकारच्या संपत्तीची अकारण समृद्धी पाहून ब्राह्मण त्याविषयी शांतपणे विचार करू लागला. तेव्हा त्याच्या लक्षात आले की, "मी तर जन्मत:च भाग्यहीन आणि दरिद्री. त्याअर्थी या संपत्तीचे कारण परमऐश्वर्यशाली यदुश्रेष्ठ भगवान श्रीकृष्णांच्या कृपाकटाक्षाशिवाय दुसरे असूच शकत नाही. ज्यांच्याकडे अनंत भोगसामग्री आहे, असे माझे मित्र दशार्हाधिपती भगवान, याचक भक्ताच्या मनातील भाव ओळखून समोर काही न बोलता त्याला पुष्कळ काही देतात. ज्याच्याजवळ समुद्र भरून टाकण्याचे सामर्थ्य आहे, तो मेघ शेतकऱ्याच्या शेतात त्याला नकळत पुष्कळ वर्षाव करूनही थोडाच केला, असे समजतो, तसे माझ्या मित्राचे आहे. ते पुष्कळ देतात, परंतु थोडेच दिले असे समजतात. त्यांच्या भक्ताने थोडेसे काहीही करू दे, ते त्यांना फार वाटते. पहा ना ! मी त्यांना फक्त एक मूठभर पोहे भेटीदाखल दिले, पण त्या महात्म्याने किती प्रेमाने त्यांचा स्वीकार केला बरे ! मला जन्मोजन्मी त्यांचेच प्रेम, त्यांचेच सख्य, त्यांचीच मैत्री आणि त्यांचीच सेवा करावयास मिळो. मला संपत्ती नको, तर गुणांचे एकमेव निवासस्थान असलेल्या त्या महानुभावांच्या चरणी माझे मन जडून राहो आणि त्यांच्याच भक्तांचा सत्संग मला प्राप्त होवो. संपत्तीचे दोष जाणणारे अजन्मा भगवान श्रीकृष्ण धनाढ्य लोकांचा ऐश्वर्याच्या मदाने अध:पात होतो, हे पाहून आपल्या पूर्ण ज्ञान न झालेल्या भक्ताला, निरनिराळ्या प्रकारची संपत्ती, राज्य किंवा इतर वैभव देत नाहीत. आपल्या बुद्धीने असा निश्चय करून तो ब्राह्मण त्यागपूर्वक, अनासक्त भावाने, आपल्या पत्नीसह प्रापंचिक विषय उपभोगू लागला. कारण भगवंतांचा तो परम भक्त होता. (३२-३८)

देवाधिदेव यज्ञपती भगवान श्रीहरी ब्राह्मणांना आपले प्रभू, आपले दैवत मानतात. म्हणून त्यांच्या दृष्टीने ब्राह्मणांपेक्षा श्रेष्ठ कोणी नाही. अशा प्रकारे भगवंताचा प्रिय मित्र असलेल्या त्या ब्राह्मणाने जाणले की, भगवान जरी अजिंक्य असले, तरी त्यांचे भक्त त्यांना जिंकतात. हे जाणून तो त्यांच्याच ध्यानात तन्मय झाला. ध्यानाच्या उत्कटतेमुळे त्याची अविद्येची गाठ तुटली आणि त्याने लवकरच भक्तांचा आश्रय असलेल्या भगवंतांचे स्थान प्राप्त करून घेतले. ब्राह्मणांना आपले देव मानणाऱ्या भगवान श्रीकृष्णांची ही ब्राह्मणभक्ती जो श्रवण करतो, त्याला भगवंतांच्या चरणांविषयी प्रेमभाव निर्माण होतो आणि तो कर्मबंधनातून मुक्त होतो. (३९-४१)

अध्याय एक्याऐंशीवा समाप्त

अध्याय ब्याऐंशीवा

श्रीकृष्ण-बलरामांशी गोप-गोपींची भेट

श्रीशुकाचार्य म्हणतात - असेच एकदा भगवान श्रीकृष्ण आणि बलराम द्वारकेत निवास करीत असताना प्रलयाच्या वेळी लागावे, तसे खग्रास सूर्यग्रहण लागले. परीक्षिता ! लोकांना त्या ग्रहणाबद्दल अगोदरच समजले होते, म्हणून सर्वजण आपले कल्याण व्हावे, या उद्देशाने स्नान-दान इत्यादी करण्यासाठी समंतपंचक नावाच्या तीर्थक्षेत्रावर आले. जेथे शस्त्र धारण करणाऱ्यांमध्ये श्रेष्ठ अशा परशुरामांनी सगळी पृथ्वी क्षत्रियहीन करून राजांच्या रक्ताने मोठमोठे डोह बनविले होते, तेच हे क्षेत्र. जसा एखादा सामान्य मनुष्य आपले पाप नाहीसे करण्यासाठी प्रायश्चित्त घेतो, त्याचप्रमाणे सर्वशक्तिमान भगवान परशुरामांनी, स्वत:शी पापकर्माचा काहीही संबंध नसूनही लोकांना सदाचाराचे शिक्षण देण्यासाठी तेथे यज्ञ केला होता. (१-४)

परीक्षिता ! या महान तीर्थयात्रेसाठी भारतवर्षाच्या सर्व प्रांतातील जनता कुरुक्षेत्री आली होती. त्यांमध्ये अक्रूर, वसुदेव, उग्रसेन इत्यादी वृष्णी, तसेच गद, प्रद्युम्न, सांब इत्यादी अन्य यादवसुद्धा आपापल्या पापांचा नाश करण्यासाठी तेथे आले होते. अनिरुद्ध आणि सेनापती कृतवर्मा हे दोघेजण सुचंद्र, शुक, सारण इत्यादींसह नगराचे रक्षण करण्यासाठी म्हणून द्वारकेत राहिले होते. अत्यंत तेजस्वी यादवांनी गळ्यांत सोन्याचे हार, दिव्य पुष्पमाळा, बहुमोल वस्त्रे आणि कवचे धारण केली होती. ते आपल्या पत्न्यांसह जाताना देवांसारखे शोभत होते. देवतांच्या विमानांसारखे रथ, समुद्रावरील लाटांप्रमाणे चालणारे घोडे, ढगांसारखे विशालकाय गर्जना करणारे हत्ती आणि विद्याधरांसारखी कांती असणारे पायदळ त्यांच्याबरोबर होते. त्या थोर यादवांनी तेथे पोहोचल्यावर एकाग्रचित्ताने स्नान करून उपवास केला. नंतर त्यांनी ब्राह्मणांना, ज्यांना सुंदर वस्त्रांच्या झुली, फुलांच्या माळा आणि सोन्याच्या साखळ्या गळ्यात घातल्या होत्या, अशा गाई दान दिल्या. यानंतर ग्रहण सुटल्यावर त्यांनी परशुरामतीर्थात विधिपूर्वक स्नान केले आणि सत्पात्र ब्राह्मणांना सुंदर पक्वान्नांचे भोजन दिले. हे सर्व त्यांनी श्रीकृष्णांच्या ठिकाणी भक्ती जडावी, म्हणून केले होते. श्रीकृष्णांनाच आपला देव मानणाऱ्या त्यांनी ब्राह्मणांच्या अनुमतीने स्वत: भोजन केले आणि मग दाट सावली असलेल्या वृक्षांच्याखाली आपापल्या इच्छेनुसार ते बसले. नंतर त्यांनी आपल्या सुहृद आणि संबंधित राजांच्या भेटी-गाठी घेणे सुरू केले. तेथे मत्स्य, उशीनर, कोसल, विदर्भ, कुरू, सृंजय, कांबोज, कैकय, मद्र, कुंती, आनर्त, केरळ इत्यादी ठिकाणचे स्वपक्षांचे आणि अन्य पक्षांचे शेकडो राजे आले होते. परीक्षिता ! याव्यतिरिक्त नंद इत्यादी गोपमित्र तसेच भगवंतांच्या दर्शनासाठी पुष्कळ दिवसांपासून उत्कंठित झालेल्या गोपीसुद्धा तेथे आल्या होत्या. यादव या सर्वांना भेटले. एकमेकांना भेटून सर्वांना अतिशय आनंद झाला. त्यामुळे सर्वांची हृदयकमळे आणि मुख-कमळे प्रफुल्लित झाली. सर्वजण एकमेकांना मिठीत घेऊन आलिंगन देत, त्यावेळी परस्परांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहात. अंगावर रोमांच येत. प्रेमाने तोंडातून शब्द फुटत नसे आणि सर्वजण आनंदसमुद्रात डुंबू लागत. (५-१५)

स्त्रियासुद्धा एकमेकींना पाहून अत्यंत स्नेहाने, मंदहास्ययुक्त नजरेने एकमेकींकडे पाहात एकमेकींना बाहूंनी घट्ट धरून आलिंगन देऊ लागल्या. त्यावेळी केशर लावलेली त्यांची वक्ष:स्थळे एकमेकींच्या वक्ष:स्थळांना भिडू लागली आणि डोळ्यांतून प्रेमाश्रू वाहू लागले. तेथे वयाने लहान असणाऱ्यांनी मोठ्यांना

नमस्कार केला आणि त्या नमस्कार करणाऱ्यांना त्यांच्यापेक्षा लहान असलेल्यांनी नमस्कार केला. नंतर एकमेकांचे स्वागत करून आणि ख्याली-खुशाली विचारून ते श्रीकृष्णांच्या मधुर लीलांविषयी आपापसात बोलू लागले. (१६-१७)

कुंती, आपले भाऊ, बहिणी, त्यांची मुले, माता-पिता, भावजया आणि श्रीकृष्णांना भेटून व त्यांच्याशी बोलून आपले दु:ख विसरली. (१८)

कुंती वसुदेवांना म्हणाली- दादा ! मी स्वत:ला फार दुर्दैवी समजते. कारण आपल्यासारखे श्रेष्ठ बांधव असून त्यांना आपत्तीच्या वेळी माझी आठवण आली नाही. दादा ! दैव ज्याला प्रतिकूल असते, त्याला हितचिंतक, संबंधी, पुत्र, भाऊ, किंबहुना माता-पितासुद्धा विसरतात, हेच खरे ! (१९-२०)

वसुदेव म्हणाले- ताई ! आम्हांला दोष देऊ नकोस. सगळेजण दैवाच्या हातातील खेळणे आहेत. कारण सगळे लोक ईश्वराच्या इच्छेनेच कर्मे करतात किंवा तसे त्यांना करावे लागते. ताई ! कंसाच्या छळामुळे आम्ही देशोधडीला लागलो होतो. थोड्याच दिवसांपूर्वी, सुदैवाने पुन्हा आमच्या जागी आलो. (२१-२२)

श्रीशुक म्हणतात- तेथे आलेल्या राजांचा वसुदेव, उग्रसेन इत्यादी यादवांनी सत्कार केला. श्रीकृष्णांच्या दर्शनामुळे त्यांना परमानंद झाला. (२३)

परीक्षिता ! भीष्म, द्रोणाचार्य, धृतराष्ट्र, पुत्रांसह गांधारी, पत्न्यांसह पांडव, कुंती, सृंजय, विदुर, कृपाचार्य, कुंतिभोज, विराट, भीष्मक, नग्नजित, पुरुजित, द्रुपद, शल्य, धृष्टकेतू, काशिराज, दमघोष, विशालाक्ष, मिथिलानरेश, मद्रनरेश, केकयनरेश, युधामन्यू, सुशर्मा, पुत्रांसह बाल्हीक आणि युधिष्ठिराचे अनुयायी राण्यांसह अन्य राजे, भगवान श्रीकृष्णांचा लक्ष्मीचे निवासस्थान असलेला श्रीविग्रह पाहून अत्यंत आश्चर्यचकित झाले. नंतर राम-कृष्णांकडून चांगल्या प्रकारे सन्मान प्राप्त झालेले ते मोठ्या आनंदाने श्रीकृष्णांचे स्वजन असणाऱ्या यादवांची प्रशंसा करू लागले. ते म्हणाले, "हे भोजराज ! या जगामध्ये, मनुष्यमात्रात तुमचेच जीवन धन्य आहे. कारण योग्यांनाही दुर्लभ असे श्रीकृष्णांचे दर्शन तुम्हांला नेहमीच होत असते. ज्यांची वेदांनी गाइलेली कीर्ती, चरणतीर्थ असे गंगाजल, आणि ज्यांची वाणी म्हणजेच वेद या जगाला अत्यंत पवित्र करीत आहे. काळामुळे सगळे वैभव नष्ट झालेली पृथ्वी ज्यांच्या चरणकमलांच्या स्पर्शाने पुन्हा सर्वशक्तिसंपन्न होऊन आमच्या सर्व अभिलाषा पूर्ण करू लागली, त्या श्रीकृष्णांशी तुमचा कौटुंबिक आणि गोत्रसंबंध आहे. एवढेच काय, तुम्हांला नेहमी त्यांचे दर्शन होऊन त्यांना स्पर्श करता येतो. तुम्ही त्यांच्याबरोबर चालता, बोलता, निजता, बसता आणि खाता-पिता. खरे तर संसारचक्राचे कारण असलेल्या गृहस्थाश्रमामध्ये राहाणाऱ्या तुमच्या घरी स्वर्ग-मोक्ष मिटविणारे सर्वव्यापक विष्णू स्वत: अवतरले आहेत. (२४-३१)

श्रीशुक म्हणतात- श्रीकृष्ण इत्यादी यदू तेथे आले आहेत, असे जेव्हा नंदबाबांना समजले, तेव्हा ते गोपांसह आपली सगळी सामग्री गाड्यांवर घालून त्यांना भेटण्यासाठी तेथे आले. त्यांना पाहून यादवांना अतिशय आनंद झाला. मृत शरीरामध्ये प्राणाचा संचार झाल्याप्रमाणे ते उठून उभे राहिले. पुष्कळ दिवसांपासून ते एकमेकांना भेटण्यासाठी आतुर झाले होते. म्हणूनच ते एकमेकांना बराच वेळपर्यंत गाढ आलिंगन देत राहिले. अत्यंत प्रेम आणि आनंदाने मन भरून येऊन वसुदेवांनी नंदांना हृदयाशी कवटाळले. कंसाने दिलेला त्रास आणि पुत्राला गोकुळात नेऊन ठेवणे, या गोष्टी त्यांना यावेळी आठवल्या. नंद-यशोदा यांनी राम-कृष्णांना मिठीत घेतले. नंतर त्यांनी माता-पित्यांच्या चरणांना वंदन केले. परीक्षिता ! प्रेमाने त्यांचे गळे दाटून आल्याने त्यांच्या तोंडून शब्द फुटेना. भाग्यवती यशोदा आणि नंद यांनी त्या दोन्ही पुत्रांना आपल्या मांडीवर

बसवून घेतले आणि दोन्ही हातांनी त्यांना गाढ आलिंगन दिले. त्यामुळे त्यांचे दु:ख नाहीसे झाले. रोहिणी आणि देवकी या दोघींनी व्रजराणी यशोदेला आलिंगन दिले. त्यांच्याशी यशोदेने जे मैत्रीपूर्ण वर्तन केले होते, त्याची आठवण होऊन दोघींचे गळे दाटून आले. त्या म्हणाल्या. ''अग यशोदे ! आमच्याशी तुमची जी अतूट मैत्री आहे, तिची त्याबदल्यात इंद्राचे ऐश्वर्य देऊनही आम्ही कधी परतफेड करू शकणार नाही. हे देवी ! बलराम आणि श्रीकृष्णांनी जेव्हा आपल्या आई-वडिलांना पाहिलेही नव्हते, अशा वयात यांच्या वडिलांनी या दोघांना आपल्या स्वाधीन केले होते. त्यावेळी पापण्या डोळ्यांतील बुबुळांचे रक्षण करतात, त्याप्रमाणे आपण या दोघांचे रक्षण केलेत. तसेच आपण यांना प्रेम दिले. यांचे पालन-पोषण करून यांच्या उत्कर्षासाठी अनेक गोष्टी केल्या. आपल्यामुळे हे निर्भय राहिले. हेही बरोबरच आहे. कारण आपल्यासारख्या सत्पुरुषांच्या दृष्टीत आपला-परका असा भेदभाव नसतो. (३२-३९)

श्रीशुक म्हणतात- परम प्रियतम श्रीकृष्ण फार दिवसांनी दिसल्यामुळे त्यांना पाहाताना जेव्हा गोपींच्या पापण्यांची उघडझाप होई, तेव्हा त्या, पापण्या निर्माण करणाऱ्यालाच शिव्याशाप देऊ लागल्या. डोळ्यांमधून त्यांनी प्रियतमाला हृदयात नेऊन गाढ आलिंगन दिले आणि त्या तन्मय होऊन गेल्या. नेहमी ध्यान करणाऱ्या योग्यांनाही जो भाव प्राप्त होणे दुर्लभ, तो भाव आज त्यांना प्राप्त झाला. श्रीकृष्णांनी त्यांची ही स्थिती पाहून ते एकांतात त्यांच्याजवळ गेले. नंतर त्यांना आलिंगन देऊन त्यांची खुशाली विचारून हसत हसत त्यांना म्हणाले. सख्यांनो ! आम्ही आमच्या बांधवांचे काम करण्यासाठी म्हणून व्रजाबाहेर गेलो आणि तेथे शत्रूंचा नाश करण्यात गुंतल्यामुळे मध्ये पुष्कळ दिवस निघून गेले. तुम्हांला आमची कधी आठवण येत होती काय ? मी कृतघ्न आहे, अशी शंका येऊन आमच्याविषयी तुमच्या मनात वेडेवाकडे विचार आले नाहीत ना ? खरे तर प्राण्यांची भेट आणि वियोग घडविणारे भगवंतच आहेत. (त्याला मी तरी काय करणार ?) वायू ज्याप्रमाणे ढग, गवत, कापूस आणि धूळ यांना एकमेकांजवळ आणतो आणि पुन्हा वेगवेगळे करतो, त्याचप्रमाणे विश्वनिर्माते भगवानसुद्धा सगळ्यांचा संयोग-वियोग करीत असतात. सुदैवाने तुम्हांला माझे असे प्रेम मिळाले आहे की, जे माझी प्राप्ती करून देणारे आहे, कारण माझ्या ठिकाणी असलेली भक्ती प्राण्यांना मोक्ष देण्याला समर्थ आहे. गोपींनो ! ज्याप्रमाणे भौतिक पदार्थांच्या आधी, मध्ये, शेवटी आणि आत-बाहेर त्यांना कारणीभूत असणारी पृथ्वी, पाणी, अग्नी, वायू व आकाश ही पंचमहाभूते असतात, त्याचप्रमाणे सर्व पदार्थांच्या आधी, मध्ये, शेवटी व आत-बाहेर फक्त मीच असतो. सर्व पदार्थांमध्ये हीच पंचमहाभूते कारणरूपाने राहिली आहेत आणि आत्मा जीवरूपाने राहिला आहे. परंतु या दोघांच्याही पलीकडील अविनाशी सत्य असणाऱ्या माझ्यामध्येच भूते व जीव प्रतीत होतात, असे जाणा. (४०-४७)

श्रीशुक म्हणतात- अशा प्रकारे श्रीकृष्णांनी गोपींना अध्यात्मज्ञान दिले. या उपदेशाचे वारंवार स्मरण करून गोपींच्या जीवाचे पंचकोश नष्ट झाले आणि त्या भगवंतांशी एकरूप झाल्या. (४८)

त्या म्हणाल्या, ''हे कमलनाभ ! अगाध-बोधसंपन्न योगेश्वर आपल्या हृदयात ज्या आपल्या चरणकमलांचे चिंतन करीत असतात, संसाररूपी विहिरीत पडलेले लोक त्यातून बाहेर पडण्यासाठी ज्यांचा आश्रय घेतात, ते आपले चरणकमल, प्रपंचातील कामे करीत असतानाही, नेहमी आमच्या हृदयात विराजमान राहोत, एवढीच कृपा करा. (४९)

अध्याय ब्याऐंशीवा समाप्त

अध्याय त्र्याऐंशीवा

भगवंतांच्या पट्टराण्यांशी द्रौपदीचा संवाद

श्रीशुक म्हणतात - गोपींचे गुरू आणि प्राप्तव्य अशा भगवान श्रीकृष्णांनी त्यांच्यावर कृपा केली. नंतर त्यांनी युधिष्ठिराला व अन्य संबंधितांना खुशाली विचारली. भगवान श्रीकृष्णांच्या चरणकमलांचे दर्शन घेण्यानेच ज्यांचे सर्व पाप नष्ट झाले, त्यांचा जेव्हा त्रैलोक्यनाथाने सत्कार केला व त्यांची खुशाली विचारली, तेव्हा आनंदित होऊन ते म्हणाले. "भगवन ! महापुरुषांच्या मनातील आपल्या चरणारविंदांचा मकरंद जेव्हा त्यांच्या मुखातून कथामृताच्या रूपाने बाहेर पडतो, तो जे लोक आपल्या कानांच्या द्रोणात भरभरून पितात, त्यांचे अमंगल कोठून होणार ? कारण प्राण्यांना देह प्राप्त करून देणारे आपले विस्मरण ते कथामृत नाहीसे करते. भगवन ! आपण एकरस ज्ञानस्वरूप आणि अखंड आनंदाचे सागर आहात. बुद्धिवृत्तीमुळे होणाऱ्या जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तिन्ही अवस्था आपल्या स्वयंप्रकाश स्वरूपापर्यंत पोहोचू शकत नाहीत. परमहंसांचे आपण प्राप्तव्य आहात. काळाच्या ओघात वेदांचा ऱ्हास होत असलेला पाहून त्यांच्या रक्षणासाठी आपण आपल्या योगमायेने मनुष्यरूप धारण केले आहे. आम्ही आपल्या चरणांना नमस्कार करीत आहोत." (१-४)

श्रीशुक म्हणतात- ज्यावेळी इतर लोक याप्रमाणे भगवान श्रीकृष्णांची स्तुती करीत होते, त्याचवेळी यादव आणि कौरव यांच्या स्त्रिया एकत्र येऊन आपापसात भगवंतांच्या त्रिभुवनविख्यात लीलांचे वर्णन करीत होत्या. तेच मी तुला सांगतो, ऐक. (५)

द्रौपदी म्हणाली - हे रुक्मिणी ! भद्रे ! जांबवती ! सत्ये ! सत्यभामे ! कालिंदी ! शैब्ये ! लक्ष्मणे ! रोहिणी ! आणि अन्य श्रीकृष्णपत्न्यांनो ! स्वत: भगवान श्रीकृष्णांनी आपल्या मायेने लोकांचे अनुकरण करीत तुमचे कोणत्या प्रकारे पाणिग्रहण केले, ते आम्हांला सांगा. (६-७)

रुक्मिणी म्हणाली- माझा विवाह शिशुपालाबरोबर व्हावा, म्हणून जरासंधादिक राजे शस्त्रास्त्रांनी सुसज्ज होऊन आले असता, सिंहाने शेळ्या-मेंढ्यांच्या कळपातून आपली शिकार न्यावी, त्याप्रमाणे अजिंक्य वीरांच्या मस्तकावर पाय देऊन भगवंत मला घेऊन आले. त्या लक्ष्मीनिवासांच्या चरणांचीच सेवा करायला मला मिळावी. (एवढीच माझी इच्छा आहे.) (८)

सत्यभामा म्हणाली- आपला भाऊ प्रसेनाच्या मृत्यूने अतिशय दु:खी झालेल्या माझ्या वडिलांनी त्या वधाचा आरोप भगवंतांच्यावर ठेवला. तो कलंक दूर करण्यासाठी त्यांनी ऋक्षराज जांबवानाला जिंकून त्याच्याकडून ते रत्न आणून माझ्या पित्याला दिले. खोटा आरोप ठेवल्याकारणाने माझे वडील घाबरून गेले. जरी त्यांनी माझा विवाह दुसऱ्याशी ठरविला होता, तरीसुद्धा त्यांनी स्यमंतकमण्यासह मला भगवंतांच्या हाती सोपविले. (९)

जांबवती म्हणाली- हेच आपले स्वामी भगवान सीतापती आहेत, हे माझ्या वडिलांना-जांबवानाला न कळल्यामुळे ते सत्तावीस दिवसपर्यंत यांच्याशी लढत राहिले. परंतु जेव्हा लक्षात आले, तेव्हा वडिलांनी यांचे पाय धरून स्यमंतकमण्यासह भेट म्हणून मला यांना अर्पण केले. अशी आहे या दासीची कथा. (१०)

कालिंदी म्हणाली- त्यांच्या चरणांची प्राप्ती व्हावी, म्हणून मी तपश्चर्या करीत आहे, असे जेव्हा भगवंतांना समजले, तेव्हा ते मित्र अर्जुनासह यमुनातीरावर आले आणि त्यांनी माझे पाणिग्रहण केले. तीच मी त्यांच्या घरची झाडलोट करणारी दासी आहे. (११)

मित्रविंदा म्हणाली- स्वयंवरामध्ये ज्यांनी येऊन विरोध करणाऱ्या माझ्या भावांना व सर्व राजांना जिंकून कुत्र्यांच्या झुंडीमधून सिंहाने आपली शिकार घेऊन जावी, त्याप्रमाणे मला आपल्या वैभवसंपन्न द्वारकापुरीला नेले, त्यांचे जन्मोजन्मी पाय धुण्याचे भाग्य मला प्राप्त व्हावे, एवढीच माझी इच्छा आहे. (१२)

सत्या म्हणाली- मला वरू इच्छिणाऱ्या राजांचे बळ पाहाण्यासाठी माझ्या वडिलांनी अतिशय बलाढ्य आणि पराक्रमी, टोकदार शिंगे असलेले सात बैल सोडले होते. मोठमोठ्या वीरांची घमेंड जिरवणाऱ्या त्या बैलांना भगवंतांनी अगदी सहजपणे झेप घेऊन पकडले आणि त्यांना वेसण घातली. लहान मुलांनी शेळीची करडे पकडावीत, त्याप्रमाणे. ज्यांनी अशा प्रकारे सामर्थ्याचा पण लावलेल्या मला प्राप्त करून घेऊन चतुरंग सेना आणि दासींसह द्वारकेला आणले. मार्गामध्ये ज्या क्षत्रियांनी विघ्न आणले, त्यांनाही जिंकले. माझी हीच इच्छा आहे की, यांच्या सेवेची संधी मला सदैव मिळो ! (१३-१४)

भद्रा म्हणाली- हे द्रौपदी ! माझ्या पित्याने स्वत: माझे मामेभाऊ असलेल्या भगवंतांना बोलावून आणून अक्षौहिणी सेना आणि पुष्कळशा दासी यांसह त्यांच्या ठायी चित्त जडलेल्या मला त्यांना अर्पण केले. माझ्या कर्मानुसार मला जेथे जेथे जन्म घ्यावा लागेल, त्या सगळीकडे त्यांच्याच चरणकमलांचा स्पर्श मला प्राप्त व्हावा, यातच मी माझे परम कल्याण समजते. (१५-१६)

लक्ष्मणा म्हणाली- हे राणी ! देवर्षी नारदांच्या मुखातून वारंवार भगवंतांचे अवतार आणि लीलांचे गायन ऐकून आणि लक्ष्मीने सर्व लोकपालांचा त्याग करून भगवंतांनाच वरले, याचाही विचार करून माझे चित्त भगवंतांच्या चरणी आसक्त झाले. हे साध्वी ! माझे पिता बृहत्सेन यांचे माझ्यावर अतिशय प्रेम होते. माझे मनोगत जेव्हा त्यांना समजले, तेव्हा त्यांनी माझी इच्छा पूर्ण करण्यासाठी हा उपाय केला. महाराणी ! अर्जुनाच्या प्राप्तीसाठी ज्याप्रमाणे तुमच्या पित्याने स्वयंवरामध्ये मत्स्यवेधाची योजना आखली होती, त्याचप्रमाणे माझ्या पित्यानेसुद्धा केले. फरक एवढाच की, हा मासा बाहेरून झाकलेला होता. फक्त पाण्यातच त्याचे प्रतिबिंब दिसत होते. राजे लोकांना हे कळले, तेव्हा सर्व ठिकाणांहून शस्त्रास्त्रवेत्ते हजारो राजे आपापल्या गुरूंसह माझ्या पित्याच्या राजधानीत आले. माझ्या पित्याने त्या राजांचा पराक्रम आणि वय पाहून चांगल्या तऱ्हेने पाहुणचार केला. मला प्राप्त करून घेण्याच्या इच्छेने त्या लोकांनी स्वयंवर मंडपात ठेवलेले धनुष्य आणि बाण मत्स्यवेधासाठी उचलले. त्यांपैकी काही राजे धनुष्याला दोरीही लावू शकले नाहीत. त्यांनी धनुष्य जसेच्या तसे ठेवून दिले. काहींनी धनुष्याची दोरी एका टोकाला बांधून दुसऱ्या टोकापर्यंत ती ओढली, परंतु दुसऱ्या टोकाला ते बांधू शकले नाहीत. त्याच्या झटक्याने ते खाली पडले. जरासंध, अंबष्ठ, शिशुपाल, भीमसेन, दुर्योधन, कर्ण अशा वीरांनी धनुष्याला दोरी बांधली. परंतु मासा कुठे आहे, हे त्यांना समजलेच नाही. अर्जुनाने पाण्यामध्ये त्या माशाचे प्रतिबिंब पाहिले आणि तो कोठे आहे हेही जाणले. अत्यंत सावधपणे त्याने बाण सोडला, परंतु त्याला लक्ष्यवेध करता आला नाही. बाणाने माशाला फक्त स्पर्श केला. (१७-२४)

अशाप्रकारे अभिमानी राजांचा मानभंग झाला व ते मागे फिरले. तेव्हा भगवंतांनी धनुष्य उचलून सहजपणे त्याला दोरी लावली, बाण जोडला आणि पाण्यात फक्त एकदाच माशाचे प्रतिबिंब पाहून बाण मारून त्याला खाली पाडले. त्यावेळी सूर्य 'अभिजित' नक्षत्रात होता. त्यावेळी पृथ्वीवर जयजयकार होऊ लागला आणि आकाशात दुंदुभी वाजू लागल्या. देवांनी आनंदविभोर होऊन पुष्प-वर्षाव केला. त्याचवेळी भगवंतांच्या ठिकाणी मन

जडलेल्या मी स्वयंवरमंडपात प्रवेश केला. माझ्या पायातील नूपुरे मधुर आवाज करीत होती. मी नवी उत्तम रेशमी वस्त्रे परिधान केली होती. वेणीत गजरा माळलेला होता आणि चेहऱ्यावर लज्जामिश्रित हास्य विलसत होते. मी हातात सुवर्णजडित तेजस्वी रत्नहार घेतला होता. त्यावेळी दाट कुरळ्या केसांमुळे आणि गालांवर कुंडलांची किरणे पडल्यामुळे शोभणारा माझा चेहरा वर करून सौम्य हास्ययुक्त नजर चारी बाजूंना बसलेल्या राजांकडे टाकून, नंतर हळुवारपणे माझ्या हातातील वरमाला मी भगवंतांच्या गळ्यात घातली. त्याबरोबर मृदंग, पखवाज, शंख, ढोल, नगारे इत्यादी वाद्ये वाजू लागली. नट आणि नर्तकी नाचू लागल्या. गवई गाऊ लागले.(२५-३०)

हे द्रौपदी ! अशा प्रकारे मी जेव्हा सर्वेश्वर भगवंतांना वरले, तेव्हा कामातुर राजांना मत्सरामुळे ते सहन झाले नाही. आपल्या चार घोड्यांच्या रथावर चतुर्भुज भगवंतांनी मला घेतले आणि हातात शार्ङ्गधनुष्य घेऊन व कवच धारण करून ते युद्धासाठी सज्ज झाले. परंतु हे राणी ! जसे एखाद्या सिंहाने पशूंची पर्वा न करता त्यांच्यातून निघून जावे, त्याप्रमाणे दारुकाने सोन्याच्या सामानाने भरलेला रथ सर्व राजांच्या देखतच द्वारकेकडे हाकला. त्यांपैकी काही राजांनी धनुष्य घेऊन, युद्धासाठी सज्ज होऊन, भगवंतांना अडविण्याच्या उद्देशाने, कुत्र्यांनी सिंहाचा पाठलाग करावा तसा त्यांचा पाठलाग सुरू केला. युद्धामध्ये शार्ङ्ग धनुष्यातून सुटलेल्या बाणांनी काही-जणांचे हात तुटले, कोणाचे पाय तुटले आणि कोणाच्या माना तुटून ते धारातीर्थी पडले. तर काहीजण युद्धभूमी सोडून पळून गेले. (३१-३५)

त्यानंतर यदुराज भगवंतांनी सूर्याप्रमाणे, स्वर्गात आणि पृथ्वीवर प्रशंसा केल्या गेलेल्या आपल्या निवासस्थानी, द्वारका नगरीत प्रवेश केला. त्या दिवशी ती विशेषरूपाने सजविली गेली होती. ध्वज, पताका आणि तोरणे इतकी लावली होती की, त्यांच्यामुळे सूर्याची किरणे खाली येऊ शकत नव्हती. माझ्या वडिलांनी सुहृद, संबंधी आणि बांधवांना बहुमोल वस्त्रे, अलंकार, बिछाने, आसने आणि विविध प्रकारची सामग्री देऊन सन्मानित केले. भगवान सर्व प्रकारच्या संपत्तींनी परिपूर्ण होते, तरीसुद्धा माझ्या पित्याने प्रेमाने त्यांना पुष्कळ दासी, सर्व प्रकारची संपत्ती, सैनिक, हत्ती, रथ, घोडे तसेच पुष्कळशी बहुमूल्य शस्त्रास्त्रे समर्पण केली. आम्ही पूर्वजन्मी सर्व आसक्ती सोडून फार मोठी तपश्चर्या केली असावी, म्हणूनच आम्ही या जन्मी आत्माराम भगवंतांच्या घरातील दासी झालो आहोत. (३६-३९)

सोळा हजार पत्न्यांच्या वतीने रोहिणी म्हणाली- दिग्विजयाच्या वेळी भौमासुराने पुष्कळ राजांना जिंकून त्यांच्या आम्हा कन्यांना आपल्या महालांत बंदी करून ठेवले होते. भगवंतांनी हे जाणले व युद्धामध्ये भौमासुराचा त्याच्या सेनेसह संहार करून, स्वत: पूर्णकाम असूनही, आम्हांला तेथून सोडवून आणून आमचे पाणिग्रहण केले. जन्म-मृत्यूरूप संसारचक्रातून मुक्त करणाऱ्या त्यांच्या चरणकमलांचेच आम्ही सदा-सर्वदा चिंतन करीत असतो. हे साध्वी ! आम्हांला सार्वभौम पद, इंद्रपद या दोहोंचे भोग, अणिमा इत्यादी सिद्धींमुळे प्राप्त होणारे ऐश्वर्य, ब्रह्मदेवाचे पद, मोक्ष किंवा सालोक्य, सारूप्य इत्यादी मुक्ती, हे काहीही नको. आम्हांला फक्त एवढेच पाहिजे की, लक्ष्मीच्या वक्ष:स्थळाला लावलेल्या केशराने सुगंधित झालेली, गदाधारी प्रभूंच्या चरणांची धूळ, नेहमी आमच्या मस्तकावर आम्ही धारण करावी. महात्मा गोपालकृष्ण गाई चारत असताना गोप, गोपी, भिल्लिणी, गवत आणि वेलीसुद्धा ज्या चरणकमलांना स्पर्श करू इच्छित असत, तोच आम्हांला हवा आहे. (४०-४३)

अध्याय त्र्याऐंशीवा समाप्त

अध्याय चौऱ्याऐंशीवा

वसुदेवांचा यज्ञोत्सव

श्रीशुक म्हणतात- सर्वात्मा, भक्तभयहारी, भगवान श्रीकृष्णांबद्दल त्यांच्या पत्न्यांना किती प्रेम आहे, हे कुंती, गांधारी, द्रौपदी, सुभद्रा, इतर राजपत्न्या आणि भगवंतांच्या प्रियतम गोपी, यांनीही ऐकले. त्यांचे हे अलौकिक प्रेम पाहून सगळ्याजणी अत्यंत मुग्ध झाल्या आणि सर्वांच्या डोळ्यांतून प्रेमाश्रू वाहू लागले. अशा प्रकारे ज्या वेळी स्त्रिया स्त्रियांशी आणि पुरुष पुरुषांशी बोलत होते, त्याचवेळी पुष्कळसे मुनी, भगवान श्रीकृष्ण आणि बलराम यांचे दर्शन घेण्यासाठी तेथे आले. व्यास, नारद, च्यवन, देवल, असित, विश्वामित्र, शतानंद, भरद्वाज, गौतम, शिष्यांसह परशुराम, वसिष्ठ, गालव, भृगू, पुलस्त्य, कश्यप, अत्री, मार्कंडेय, बृहस्पती, द्वित, त्रित, एकत, सनक, सनंदन, सनातन, सनत्कुमार, अंगिरा, अगस्त्य, याज्ञवल्क्य, वामदेव इत्यादी इतरही बरेच विश्ववंद्य ऋषी आलेले पाहून, अगोदरपासूनच तेथे असलेले राजे, पांडव, श्रीकृष्ण आणि बलराम लगेच उठून उभे राहिले आणि सर्वांनी त्यांना प्रणाम केला. यानंतर स्वागत, आसन, पाद्य, अर्घ्य, पुष्पमाला, धूप, चंदन इत्यादींनी, सर्व राजांनी व राम-कृष्णांनी त्यांची विधिपूर्वक पूजा केली. जेव्हा सर्व ऋषी आरामात बसले, तेव्हा धर्मरक्षणासाठी अवतीर्ण झालेले भगवान श्रीकृष्ण त्यांना म्हणाले. त्यावेळी ती सभा अतिशय शांतपणे भगवंतांचे भाषण ऐकत होती. (१-८)

भगवान श्रीकृष्ण म्हणाले - आम्ही धन्य झालो ! जन्म घेतल्याचे फळ आज आम्हांला पुरेपूर मिळाले; कारण ज्या योगेश्वरांचे दर्शन देवतांनासुद्धा दुर्लभ आहे, ते आज आम्हांला झाले. ज्यांची तपश्चर्या अगदी थोडी आहे आणि जे देवाला फक्त विशिष्ट मूर्तीमध्येच पाहातात, अशांना आपले दर्शन, स्पर्श, कुशल-प्रश्न, प्रणाम, पाद्यपूजा इत्यादींची संधी कशी मिळू शकेल बरे ? (९-१०)

केवळ पाणी म्हणजे तीर्थ नव्हे आणि फक्त दगडामातीच्या प्रतिमा म्हणजेच देवता नव्हेत, तर संत पुरुषच खरे तीर्थ किंवा देवता आहेत. कारण त्यांचे पुष्कळ काळपर्यंत सेवन करावे, तेव्हाच फळ मिळते. परंतु संत पुरुष दर्शनानेच कृतार्थ करतात. अग्नी, सूर्य, चंद्र, तारे, पृथ्वी, जल, आकाश, वायू किंवा वाणी आणि मनाची अधिष्ठात्री देवता, यांची उपासना केली असता भेदबुद्धिरूप अज्ञानाचा नाश होत नाही. परंतु ज्ञानी महापुरुषांची सेवा क्षणभर केली गेली, तरी ते सर्व अज्ञान नाहीसे करतात. जो मनुष्य वात, पित्त आणि कफ या तीन धातूंनी बनलेल्या शवासारख्या शरीरालाच आत्मा, स्त्री-पुत्र इत्यादींनाच आपले आणि माती, लाकूड इत्यादी पार्थिव वस्तूंनाच देव मानतो, तसेच जो फक्त पाण्यालाच तीर्थ समजतो, ज्ञानी पुरुषांना नव्हे, तो मनुष्य असूनही पशूंपेक्षाही अविचारी समजावा. (११-१३)

श्रीशुक म्हणतात- अखंड ज्ञानसंपन्न भगवान श्रीकृष्णांचे हे गूढ भाषण ऐकून सर्व ऋषी स्तब्ध झाले. हे काय म्हणत आहेत, तेच त्यांना कळेना ! पुष्कळ वेळपर्यंत विचार केल्यावर त्यांच्या लक्षात आले की, भगवान सर्वेश्वर असूनही जे कर्माधीन जीवांप्रमाणे असे बोलत आहेत, ते फक्त लोकशिक्षणासाठीच होय. नंतर ते हसत हसत त्या जगद्गुरूंना म्हणाले. (१४-१५)

मुनी म्हणाले- भगवन ! ज्यांच्या मायेने प्रजापतींचे अधीश्वर मरीची इत्यादी, तसेच मोठ-मोठे तत्त्वज्ञानी असे आम्ही मोहित होत आहोत, ते आपण स्वतः ईश्वर असूनही माणसासारखे व्यवहार

करून, स्वत:ला लपवून ठेवीत आहात. भगवन ! आपली लीला अगाध आहे ! जशी पृथ्वी स्वत:च झाडे, दगड, घट इत्यादी रूपांमुळे अनेक नामे धारण करते, त्याचप्रमाणे आपण एक आणि कृतिरहित असूनही अनेक रूपे धारण करून या जगाची रचना, रक्षण आणि संहार करता. परंतु हे सर्व करीत असतानाही या कर्मांनी आपण लिप्त होत नाही. सर्वव्यापी, परिपूर्ण अशा आपले हे चरित्र म्हणजे केवळ लीलाच नव्हे काय ? आपण जरी प्रकृतीच्या पलीकडील स्वत: परब्रह्म आहात, तरीसुद्धा वेळोवेळी भक्तजनांचे रक्षण आणि दुष्टांचा नाश करण्यासाठी विशुद्ध सत्त्वमय स्वरूप प्रगट करता आणि आपल्या लीलांच्या द्वारे सनातन वैदिक मार्गाचे रक्षण करता. कारण सर्व वर्ण आणि आश्रम हे आपलेच रूप आहे. वेद आपले विशुद्ध हृदय आहे, तपश्चर्या, स्वाध्याय, धारणा, ध्यान आणि समाधीच्या योगाने त्यातच आपल्या साकार, निराकार आणि त्यांच्या अधिष्ठानस्वरूप परब्रह्माचा साक्षात्कार होतो. हे परमात्मन ! वेदांना आधारभूत ब्राह्मणच, वेदप्रमाण अशा आपल्या रूपाच्या जाणिवेचे स्थान आहेत. म्हणूनच आपण त्यांचा सन्मान करता. त्यामुळेच आपण ब्राह्मणभक्त असणाऱ्यांमध्ये अग्रगण्य आहात. आपण कल्याण करून घेण्याच्या सर्व प्रकारच्या साधनांची अंतिम सीमा आहात आणि संतांचे एकमेव प्राप्तव्य आहात. आपले दर्शन होऊन आज आमचा जन्म, विद्या, तप आणि ज्ञान सफल झाले. प्रभो ! आपले ज्ञान अनंत आहे. आपण स्वत: परमात्मा भगवान आहात. आपण आपल्या योगमायेने आपला महिमा झाकून ठेवला आहे. आम्ही आपणांस नमस्कार करतो. येथे असलेले हे राजे तसेच आपल्याबरोबर आहार-विहार करणारे यादवसुद्धा आपले खरे स्वरूप जाणत नाहीत.कारण जे सर्वांचा आत्मा, जगताचे आदिकारण आणि नियंत्रक आहे, अशा आपल्या स्वरूपाला आपण मायेने झाकून ठेवले आहे. जेव्हा माणूस स्वप्न पाहू लागतो, त्यावेळी स्वप्नातील पदार्थांनाच खरे मानतो आणि मनाने जाणवणाऱ्या नाममात्र शरीरालाच खरे शरीर मानतो. त्यावेळी त्याला आपले जागृत शरीर जाणवत नाही. त्याचप्रमाणे, स्वप्नतुल्य विषयांकडे इंद्रियांच्या प्रवृत्तिरूप मायेने चित्त मोहित होऊन जीवांची विवेकशक्ती झाकली जाते. त्यामुळेच ते सत्यस्वरूप अशा आपल्याला ओळखत नाहीत. सर्व पापराशी नष्ट करणाऱ्या गंगाजलाचे सुद्धा आश्रयस्थान असलेल्या, ज्या आपल्या चरणकमलांना योगी अत्यंत परिपक्व अशा योगसाधनेने स्वत:च्या हृदयात धारण करतात, त्यांचेच दर्शन आज आम्हांला झाले, ही मोठी भाग्याची गोष्ट आहे. प्रभो ! आम्ही आपले भक्त आहोत. आपण आमच्यावर कृपा करावी. कारण ज्यांचा लिंगशरीररूप जीवकोश आपल्या उत्कृष्ट भक्तीमुळे नष्ट होतो, त्यांनाच आपल्या परम पदाची प्राप्ती होते. (१६-२६)

श्रीशुक म्हणतात- हे राजर्षे ! अशा प्रकारे भगवंतांची स्तुती करून, त्यांचा, धृतराष्ट्राचा तसेच धर्मराजाचा निरोप घेऊन त्यांनी आपापल्या आश्रमात जाण्याचा विचार केला. त्यांचा जाण्याचा विचार पाहून, कीर्तिमान वसुदेव त्यांच्या जवळ आले, त्यांना नमस्कार केला आणि त्यांचे पाय धरून अतिशय नम्रपणे त्यांना म्हणाले. (२७-२८)

वसुदेव म्हणाले- ऋषींनो ! सर्वदेवस्वरूप आपणांस मी नमस्कार करीत आहे. आपण माझी एक प्रार्थना ऐकावी. ती अशी की, कर्मांच्या अनुष्ठानाने कर्मवासनांचा नाश कसा होतो, ते आपण मला सांगावे. (२९)

नारद म्हणाले- ऋषींनो ! वसुदेव, श्रीकृष्णाला मूल समजून विशेष जाणून घेण्याच्या शुद्ध भावनेनेच आपल्या कल्याणाचे साधन आम्हांला विचारीत आहेत, ही काही आश्चर्याची गोष्ट नाही. नेहमी

जवळ राहाणे माणसाबद्दलच्या अनादराला कारण ठरते ! गंगेजवळ राहाणारा माणूस पवित्र होण्यासाठी दुसऱ्या तीर्थावर जातो. श्रीकृष्णांचे ज्ञान कालगतीनुसार होणारी जगताची उत्पत्ती, स्थिती आणि प्रलय यांमुळे नाहीसे होत नाही. तसेच ते आपोआप कोणत्याही दुसऱ्या कारणाने, गुणांनी किंवा अन्य कशानेही नष्ट होत नाही. त्यांचे ज्ञान अविद्या, राग-द्वेष, पुण्य-पापरूप कर्मे, सुख-दुःखादी कर्मफले, किंवा सत्त्वादी गुणांच्या प्रवाहांनी खंडित झालेले नाही. ते स्वत: अद्वितीय परमात्मा आहेत. जेव्हा ते स्वत:ला आपल्याच प्राण इत्यादी शक्तींनी झाकून घेतात, तेव्हा सामान्य लोकांना ते मनुष्य वाटतात. ढग, धुके किंवा ग्रहण यांमुळे सूर्यच झाकला गेला आहे, असे वाटते, त्याप्रमाणे. (३०-३३)

परीक्षिता ! यानंतर श्रीकृष्ण, बलराम आणि अन्य राजांच्या समक्षच वसुदेवांना संबोधून ऋषी म्हणाले. ''कर्मवासना आणि कर्मफलांचा, कर्मांच्या द्वारेच सर्वथैव नाश करण्याचा सगळ्यात उत्तम उपाय हाच आहे की, यज्ञांनी सर्व यज्ञांचे अधिपती भगवान विष्णूंची श्रद्धापूर्वक आराधना करणे. (३४-३५)

त्रिकालाचे ज्ञान असणाऱ्या ऋषींनी शास्त्रदृष्टीने हाच उपाय चित्ताच्या शांतीसाठी सुलभ मोक्षसाधन आणि अंत:करणात आनंद निर्माण करणारा धर्म म्हणून सांगितला आहे. आपण न्यायाने मिळविलेल्या धनाने श्रद्धापूर्वक भगवंतांची आराधना करणे, हाच गृहस्थाश्रमी द्विजातींसाठी परम कल्याणाचा मार्ग आहे. हे वसुदेवा ! विवेकी पुरुषाने यज्ञ, दान इत्यादी करून धनाची इच्छा, गृहस्थोचित भोगांनी स्त्री-पुत्रांची इच्छा, आणि कालानुसार स्वर्ग इत्यादी लोकसुद्धा नष्ट होतात, हे जाणून त्याही इच्छेचा त्याग करावा. अशा रीतीने घरात राहूनही या तिन्ही इच्छांचा त्याग करून वनामध्ये जावे. हे वसुदेवा ! ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य हे तिन्ही द्विज, देवता, ऋषी आणि पितरांचे ऋण माथ्यावर घेऊनच जन्माला आलेले असतात. यज्ञ, अध्ययन आणि संतान यांद्वारेच या ऋणांतून मुक्तता होते. यांतून मुक्त झाल्याशिवाय जो संसाराचा त्याग करतो, त्याचे पतन होते. हे बुद्धिमान वसुदेवा ! ऋषी आणि पितरांच्या ऋणातून आपण मुक्त झाला आहात. आता यज्ञ करून देवऋणातून मुक्त व्हा आणि गृहत्याग करा. हे वसुदेवा ! आपण परम भक्तीने निश्चितच जगदीश्वर भगवंतांची आराधना केलेली असल्यानेच ते आपले पुत्र झाले आहेत.'' (३६-४१)

श्रीशुक म्हणतात - ऋषींचे हे म्हणणे ऐकून उदार वसुदेवांनी, त्यांच्या चरणांवर मस्तक टेकवून त्यांना नमस्कार केला, त्यांना प्रसन्न केले आणि यज्ञासाठी ऋत्विज म्हणून त्यांचीच योजना केली. राजन ! वसुदेवांनी जेव्हा अशा प्रकारे धर्मविधिपूर्वक ऋषींना ऋत्विज म्हणून नेमले, तेव्हा त्या ऋषींनी त्या कुरुक्षेत्रामध्ये धर्मशील वसुदेवांकडून उत्तमोत्तम सामग्रीने युक्त असे यज्ञ करविले. परीक्षिता ! वसुदेवांनी जेव्हा यज्ञाची दीक्षा घेतली, तेव्हा यदुवंशियांनी स्नान करून सुंदर वस्त्रे परिधान केली आणि कमलपुष्पांच्या माळा गळ्यात घातल्या. अन्य राजांनीही सुंदर वस्त्रालंकार धारण केले. वसुदेवांच्या पत्नींनी सुंदर वस्त्रे, सुगंधित उटणी आणि सोन्याचे हार घातले आणि त्या मोठ्या आनंदाने आपल्या हातात कलश इत्यादी मंगल सामग्री घेऊन यज्ञशाळेत आल्या. (४२-४५)

मृदंग, पखवाज, शंख, ढोल, नगारे इत्यादी वाद्ये वाजू लागली. नट आणि नर्तकी नाचू लागल्या. सूत आणि मागध स्तुती करू लागले. गंधर्वांच्या बरोबर त्यांच्या गोड आवाज असणाऱ्या गायिका पत्न्या गाणी गाऊ लागल्या. वसुदेवांनी शास्त्राप्रमाणे डोळ्यांत अंजन घातले व शरीराला लोणी लावले.

त्यानंतर त्यांच्या देवकी इत्यादी अठरा पत्न्यांसह ऋत्विजांनी त्यांना, प्राचीनकाळी नक्षत्रांसह चंद्राला अभिषेक झाला होता, त्याप्रमाणे अभिषेक केला. यज्ञाची दीक्षा घेतल्यामुळे मृगचर्म धारण केलेले वसुदेव सुंदर पैठण्या, कंकणे, हार, नूपुरे आणि कुंडले इत्यादी वस्त्रालंकारांनी नटलेल्या पत्न्यांसह अतिशय शोभून दिसत होते. महाराज ! इंद्राच्या यज्ञाप्रमाणे वसुदेवांच्या यज्ञातील ऋत्विज आणि सभासद, रत्नजडित अलंकार व रेशमी वस्त्रे परिधान करून सुशोभित झाले. सर्व जीवांचे ईश्वर असलेले श्रीकृष्ण आणि बलराम आपल्याच विभूतिस्वरूप बांधव आणि स्त्री-पुत्रांसह शोभू लागले.

(४६-५०)

वसुदेवांनी प्रत्येक यज्ञामध्ये ज्योतिष्टोम, दर्श, पूर्णमास इत्यादी प्राकृत यज्ञ, सौरसत्र इत्यादी वैकृत यज्ञ आणि अग्निहोत्र इत्यादी अन्य यज्ञांच्या द्वारा द्रव्य, ज्ञान व क्रिया यांचे अधिपती असणाऱ्या ईश्वराची आराधना केली. एवढे झाल्यावर त्यांनी योग्यवेळी वस्त्रालंकार घातलेल्या ऋत्विजांना शास्त्रानुसार दक्षिणा व पुष्कळ धनासह अलंकृत गाई, भूमी आणि कन्या अर्पण केल्या. नंतर महर्षींनी पत्नीसंयाज व अवभृथस्नान ही कर्मे करवून, वसुदेवांसह परशुराम तीर्थात स्थान केले. स्नान केल्यानंतर वसुदेव व त्यांच्या पत्न्यांनी आपली सगळी वस्त्रे व अलंकार बंदी लोकांना दिले आणि स्वत: नवी वस्त्रे व अलंकार परिधान करून ब्राह्मणांपासून कुत्र्यापर्यंत सर्वांना भोजन दिले. त्यानंतर आपले बांधव, त्यांच्या पत्न्या, पुत्र तसेच विदर्भ, कोसल, कुरू, काशी, केकय, सृंजय इत्यादी देशांचे राजे, सभासद, ऋत्विज, देवता, माणसे, भूतमात्र, पितर आणि चारणांना पुष्कळ भेटवस्तू देऊन त्यांचा सन्मान केला. नंतर श्रीकृष्णांचा निरोप घेऊन, यज्ञाची प्रशंसा करीत ते आपापल्या ठिकाणी गेले. त्या वेळी धृतराष्ट्र, विदुर, पांडव, भीष्म, द्रोणाचार्य, कुंती, नारद, भगवान व्यास, तसेच अन्य सोयरे, संबंधित आणि बांधव, आपल्या आप्त अशा यादवांना सोडून जावे लागत असल्याकारणाने अत्यंत दु:खित झाले. अतिशय स्नेहाने त्यांनी त्यांना आलिंगन दिले आणि दु:खी अंत:करणाने कसेतरी ते आपापल्या देशाकडे गेले. इतर लोकही त्यांच्याचबरोबर तेथूनच रवाना झाले. श्रीकृष्ण, बलराम तसेच उग्रसेन इत्यादींनी नंदबाबांसह सर्व गोपांचा उत्तम वस्तू देऊन सन्मान केला. तेव्हा आपापसातील प्रेमामुळे ते काही काळ तेथेच राहिले. वसुदेवांनी आपल्या मोठ्या मनोरथाचा महासागर आप्तांसमवेत पार केला होता. एकदा नंदांचा हात आपल्या हातात घेऊन प्रेमाने ते म्हणाले.

(५१-६०)

वसुदेव म्हणाले - हे बंधो ! माणसाला भगवंतांनी अशा प्रेमपाशात जखडून टाकले आहे की, मोठमोठे शूर आणि योगीसुद्धा ते तोडण्यास असमर्थ आहेत. आम्ही कृतघ्न असूनही आपल्यासारख्या सज्जनांनी आमच्याशी जी मैत्री केली, तिला तोड नाही. याच्या मोबदल्यात आपणास काहीही मिळणार नसले, तरीसुद्धा आपण ती कधीच तोडणार नाही. हे बंधो ! पूर्वी आम्ही कैदेत असल्याकारणाने आपली काही मदत करू शकलो नाही. आणि आता संपत्तीच्या गर्वाने आंधळे झाल्यामुळे आपण आमच्यासमोर असूनही आम्ही आपल्याकडे लक्ष देत नाही. दुसऱ्यांना मान देणाऱ्या हे बंधो ! ज्याला आपले कल्याण करून घ्यावयाचे आहे, त्याला राज्यलक्ष्मी कधीच मिळता कामा नये. कारण तिने आंधळा झालेला मनुष्य आप्तेष्टांशीही संपर्क ठेवीत नाही. (६१-६४)

श्रीशुक म्हणतात - असे म्हणता म्हणता वसुदेव प्रेमाने सद्गदित झाले. आणि नंदांची मैत्री आठवून त्यांच्या डोळ्यांतून अश्रू येऊ लागले व ते रडू लागले. आपल्या मित्राला प्रसन्न करण्यासाठी तसेच

राम-कृष्णांवरील प्रेमामुळे आज उद्या करता करता नंद तीन महिने तेथेच राहिले. यादवांनीही त्यांना मानाने वागवले. यानंतर बहुमोल अलंकार, रेशमी वस्त्रे, अनेक प्रकारची उत्तमोत्तम सामग्री आणि उपभोगाच्या वस्तू, नंद, त्यांचे व्रजातील सहकारी आणि बांधव यांना देऊन त्यांना तृप्त केले. वसुदेव, उग्रसेन, श्रीकृष्ण, बलराम, उद्धव इत्यादी यादवांनी त्यांना दिलेल्या भेटी घेऊन त्यांनी निरोप दिल्यानंतर नंद आपल्या व्रजाकडे गेले. नंद, गोप आणि गोपी यांचे चित्त भगवान श्रीकृष्णांच्या चरणी इतके आसक्त झाले होते की, प्रयत्न करूनही तेथून काढून घेण्यास असमर्थ असलेले ते तसेच मथुरेला गेले. (६५-६९)

सर्व आप्तेष्ट निघून गेल्यावर श्रीकृष्णांनाच दैवत मानणारे यादव पावसाळा जवळ आलेला पाहून द्वारकेला गेले. तेथे गेल्यावर त्यांनी वसुदेवांचा यज्ञमहोत्सव, आप्तेष्टांची भेट इत्यादी तीर्थयात्रेतील प्रसंग तेथील लोकांना सांगितले. (७०-७१)

अध्याय चौऱ्याऐंशीवा समाप्त

अध्याय पंचाऐंशीवा

श्रीभगवंतांचा वसुदेवांना ब्रह्मज्ञानाचा उपदेश व देवकीच्या सहा पुत्रांना परत आणणे

श्रीशुक म्हणतात - असेच एके दिवशी राम-कृष्णांनी वडिलांना नमस्कार केल्यावर वसुदेवांनी मोठ्या प्रेमाने दोन्ही भावांचे कौतुक करून म्हटले. ऋषींच्या तोंडून वसुदेवांनी भगवंतांचा महिमा ऐकला होता. तसेच त्यांचे ऐश्वर्यपूर्ण कार्यसुद्धा त्यांनी पाहिले होते. यामुळे पूर्ण विश्वास उत्पन्न होऊन पुत्रांना उद्देशून ते म्हणाले. ''हे श्रीकृष्णा ! हे महायोगीश्वर संकर्षणा ! तुम्ही दोघेही सनातन आहात. तुम्ही दोघे सर्व जगाचे साक्षात कारणस्वरूप प्रधान आणि पुरुषाचे सुद्धा नियामक असे परमेश्वर आहात, हे मी जाणतो. तुम्ही या जगाचे आधार, निर्माते, निर्माण सामग्री आणि स्वामी असून क्रीडेसाठी तुम्ही याची निर्मिती केली आहे. हे ज्यावेळी, ज्या रूपात, जे काही असते, होते, ते सर्व तुम्हीच आहात. प्रकृती व पुरुष आपणच असून त्यांच्या पलीकडे असणारे त्यांचे नियामक असे साक्षात भगवानसुद्धा तुम्हीच आहात. हे इंद्रियातीता ! हे अजन्मा ! परमात्मन ! हे नाना प्रकारचे विश्व तुम्हीच निर्माण केले असून यामध्ये तुम्हीच आत्मरूपाने प्रवेश केला आहे. तसेच तुम्हीच प्राण (क्रियाशक्ती) आणि जीव (ज्ञानशक्ती) होऊन याचे पालन-पोषण करीत आहात. क्रियाशक्तिप्रधान प्राण इत्यादींमध्ये जगातील वस्तूंची निर्मिती करण्याचे जे सामर्थ्य आहे, ते तुमचेच आहे. कारण ते तुमच्यासारखे चेतन नसल्यामुळे तुमच्याअधीन आहेत. तुमच्यामुळेच त्यांच्या क्रिया होतात. हे प्रभो ! चंद्राचे चांदणे, अग्नीचे तेज, सूर्याची प्रभा, नक्षत्रे आणि वीज इत्यादींचे चमकणे, पर्वतांचे स्थैर्य, पृथ्वीची आधारशक्ती व गंधरूप गुण, हे सर्व वास्तविक तुम्हीच आहात. हे परमेश्वरा ! ज्याच्यामध्ये तृप्त करण्याची व जीवन देण्याची शक्ती आहे ते पाणी आणि त्याचे द्रवत्व तुम्हीच आहात. हे प्रभो ! इंद्रियशक्ती, अंत:करणाची शक्ती, शरीराची शक्ती, त्याची हालचाल, चालणे-फिरणे इत्यादी वायूच्या शक्ती या सर्व तुमच्याच आहेत. दिशा आणि त्यांच्या आजूबाजूला असणारे आकाश हेसुद्धा तुम्हीच आहात. आकाश आणि त्याच्या आश्रयाने व्यक्त होणारा शब्द (परा), नाद (पश्यंती), ॐकार तसेच

वर्ण (मध्यमा) व पदार्थांचे वेगळेपण दाखविणारी पदरूप (वैखरी) वाणीसुद्धा तुम्हीच आहात. इंद्रिये, त्यांची विषयांना ग्रहण करणारी शक्ती आणि त्यांच्या देवता तुम्हीच आहात. बुद्धीची निश्चय करण्याची शक्ती आणि जीवाची शुद्ध स्वरूपात असणारी स्मृतीसुद्धा तुम्हीच आहात. भूतमात्रांमध्ये त्यांचे कारण तामस अहंकार, इंद्रियांमधील त्यांना कारणीभूत असणारा राजस अहंकार आणि इंद्रियांच्या देवतांमध्ये त्यांना कारण असणारा सात्त्विक अहंकार त्याचप्रमाणे जीवांच्या जन्म-मरणाला कारणीभूत असणारी अविद्या तुम्हीच आहात. हे भगवन ! जसे माती इत्यादी वस्तूंचे कार्य असणाऱ्या घडा, झाडे इत्यादींमध्ये माती असते, त्याचप्रमाणे सर्व नाशवंत पदार्थांमधील अविनाशी तत्त्व तुम्ही आहात. हे प्रभो ! सत्त्व, रज व तम हे तीन गुण आणि त्यांची कार्ये, परब्रह्मस्वरूप तुमच्यामध्ये योगमायेच्या द्वारा कल्पिली गेली आहेत. म्हणून हे जन्म इत्यादी भाव वास्तविक तुमच्यामध्ये नाहीत. जेव्हा तुमच्या ठायी यांची कल्पना केली जाते, तेव्हा तुम्ही या विकारांमध्ये असल्यासारखे दिसता. एरव्ही निर्विकल्प परमार्थस्वरूप फक्त तुम्हीच शिल्लक राहाता. सत्त्व, रज व तम या तीन गुणांच्या प्रवाहरूप या देहात तुमचे सर्वात्मक असे सूक्ष्मस्वरूप जे अज्ञानी जाणत नाहीत, ते आपल्या देहाभिमानरूप अज्ञानामुळेच कर्मांच्या जाळ्यात अडकून वारंवार जन्म-मृत्यूच्या चक्रात फिरत राहातात. हे परमेश्वरा ! योगायोगाने मला सर्व सामर्थ्याने युक्त अत्यंत दुर्लभ असे मनुष्य-शरीर प्राप्त झाले आहे. परंतु तुमच्या मायेमुळे मी माझ्या खऱ्या कल्याणरूप स्वार्थाच्या बाबतीत बेसावध राहिलो आणि माझे सगळे आयुष्य फुकट गेले. हे प्रभो ! हे शरीर म्हणजेच मी आणि या शरीराशी संबंधित असणारे माझे, या प्रकारच्या स्नेहाच्या दोऱ्यांनी तुम्ही हे सर्व जग बांधून टाकले आहे. तुम्ही दोघे आमचे पुत्र नाहीत, तर प्रकृती आणि सर्व जीवांचे स्वामी आहात. पृथ्वीला भारभूत झालेल्या राजांचा नाश करण्यासाठीच तुम्ही अवतार धारण केला आहे, ही गोष्ट तुम्ही मला सांगितली होतीच ! म्हणून हे दीनबंधो ! मी आज तुमच्या चरणकमलांना शरण आलो आहे. कारण शरणागतांचे संसारभय नाहीसे करणारे तेच आहेत. पुरे झाली ही इंद्रियांची विषयलोलुपता ! यांमुळेच मी शरीराला आत्मा आणि परमात्मा असणाऱ्या तुम्हांला पुत्र समजलो. प्रभो ! प्रसूतिगृहातच तुम्ही आम्हांला सांगितले होते की, ''मी जरी अजन्मा असलो, तरीसुद्धा मीच तयार केलेल्या धर्ममर्यादेचे रक्षण करण्यासाठी, प्रत्येक युगामध्ये, तुम्हा दोघांच्या द्वारा अवतार धारण करतो.'' हे भगवन ! तुम्ही आकाशाप्रमाणे अलिप्त राहूनही अनेक शरीरे धारण करता आणि सोडता. सर्वव्यापी अशा तुमच्या विभूतिरूप योगमायेला कोण जाणू शकेल बरे ?'' (१-२०)

श्रीशुक म्हणतात - वसुदेवांचे हे बोलणे ऐकून भक्तवत्सल भगवान श्रीकृष्ण विनम्रतेने मान खाली घालून मधुर वाणीने हसत हसत म्हणाले. (२१)

श्रीकृष्ण म्हणाले - बाबा ! आम्हा मुलांना उद्देशून आपण जो हा ब्रह्मज्ञानाचा उपदेश केला, तो पूर्ण तर्कसंगत आहे, असे आम्ही मानतो. हे यदुश्रेष्ठ ! आपण सर्वजण, मी, बलरामदादा, हे द्वारकानिवासी किंबहुना संपूर्ण चराचर जग असे सगळे आपण ब्रह्मस्वरूपच आहोत, असे समजले पाहिजे. आत्मा हा स्वयंप्रकाश, नित्य, निर्गुण, असूनही त्याने स्वत:च गुणांच्या द्वारा निर्मिलेल्या पंचमहाभूतांमध्ये तो एक असूनही अनेक रूपांनी प्रतीत होतो. आकाश, वायू, अग्नी, पाणी आणि पृथ्वी ही पंचमहाभूते कारणरूपात एक असूनही ज्याप्रमाणे आपले कार्य असणाऱ्या वस्तूंमध्ये प्रगट-अप्रगट, लहान-मोठी, एक-अनेक अशा रूपांत प्रगट होतात, त्याप्रमाणे आत्मा एक असूनसुद्धा उपाधींच्या भेदामुळे अनेक भासतो. (२२-२५)

श्रीशुक म्हणतात - परीक्षिता ! श्रीकृष्णांची

ही वचने ऐकून वसुदेवांनी अनेकत्वबुद्धीचा त्याग केला आणि आनंदात मग्न होऊन ते स्वस्थ राहिले. हे कुरुश्रेष्ठा ! सर्वदेवस्वरूप देवकी आपल्या मुलांनी पूर्वी मृत गुरुपुत्राला परत आणलेले ऐकून अत्यंत आश्चर्यचकित झाली होती. आता कंसाने मारलेल्या आपल्या पुत्रांची आठवण होऊन दु:खाने देवकीच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या. ती दीनपणे श्रीकृष्ण-बलरामांना उद्देशून म्हणाली. (२६-२८)

देवकी म्हणाली - हे लोकाभिरामा रामा ! मन आणि वाणीला आकलन होणार नाही अशी तुझी शक्ती आहे. हे श्रीकृष्णा ! तू योगेश्वरांचासुद्धा ईश्वर आहेस. तुम्ही दोघेही प्रजापतींचे सुद्धा ईश्वर, आदिपुरुष नारायण आहात, हे मला कळले. कालगतीनुसार सत्त्वगुण नाहीसा होऊन जे शास्त्राच्या आज्ञांचे उल्लंघन करून स्वच्छंदीपणे वागत होते, अशा भूमीला भार झालेल्या राजांचा नाश करण्यासाठी तुम्ही दोघे माझे पुत्र म्हणून अवतीर्ण झालात, हेही मला माहीत आहे. (२९-३०)

हे विश्वात्मन ! ज्यांच्या पुरुषरूप अंशापासून उत्पन्न झालेल्या मायेचे अंश असणाऱ्या गुणांच्या केवळ अंशाने जगाची उत्पत्ती, स्थिती आणि प्रलय होतो, त्या तुम्हांला आज मी शरण आले आहे. तुमचे गुरू सांदीपनी यांच्या पुत्राचा मृत्यू होऊन पुष्कळ दिवस झाले होते. त्यांना गुरुदक्षिणा देण्यासाठी तुम्ही दोघांनी काळाच्या प्रेरणेने त्यांचा पुत्र यमपुरीहून आणून त्यांना परत दिला होता. तुम्ही दोघे योगेश्वरांचे सुद्धा ईश्वर आहात. म्हणून आज माझीसुद्धा इच्छा पूर्ण करा. ज्यांना कंसाने मारले होते, त्या माझ्या पुत्रांना तुम्ही दोघांनी घेऊन यावे. मी त्यांना डोळे भरून पाहीन. (३१-३३)

श्रीशुक म्हणतात- हे परीक्षिता ! मातेचे हे म्हणणे ऐकून श्रीकृष्ण आणि बलराम दोघांनीही योगमायेचा आश्रय घेऊन सुतल लोकात प्रवेश केला. जगाचे व आपले आत्मा आणि इष्टदेव असे राम-कृष्ण आलेले पाहून त्यांच्या दर्शनाने बलीचे हृदय आनंदात मग्न झाले. त्याने आपल्या कुटुंबियांसह ताबडतोब आपल्या आसनावरून उठून भगवंतांच्या चरणांना प्रणाम केला. अत्यंत आनंदित होऊन त्याने त्या महापुरुषांना श्रेष्ठ आसन दिले आणि जेव्हा ते दोघे त्यावर विराजमान झाले. तेव्हा त्याने त्यांचे पाय धुऊन जे चरणतीर्थ ब्रह्मदेवापर्यंत सर्वांना पवित्र करते, ते परिवारासह, आपल्या मस्तकी धारण केले. नंतर बहुमोल वस्त्रे, अलंकार, चंदन, तांबूल, दीपक, अमृतासारखे भोजन तसेच अन्य विविध सामग्रींनी त्यांची उत्तम पूजा केली आणि आपला सर्व परिवार, धन तसेच स्वत:लाही त्यांच्या चरणांवर समर्पित केले. हे राजा ! बलीने प्रेमपूर्ण बुद्धीने वारंवार भगवंतांचे चरणकमल घट्ट धरले. त्यावेळी त्याच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. अंग रोमांचित झाले. तो सद्गदित होऊन भगवंतांची स्तुती करू लागला. (३४-३८)

बली म्हणाला- महान अशा अनंताला माझा नमस्कार असो. सर्व जगाचे निर्माते, ज्ञानयोग आणि भक्तियोग यांचे प्रवर्तक, परब्रह्मस्वरूप अशा आपल्यालाही नमस्कार असो. भगवन ! आपल्या दोघांचे दर्शन प्राण्यांना अत्यंत दुर्लभ असूनसुद्धा आपल्या कृपेने ते सुलभ असावे; कारण आज आपण कृपा करून रजोगुणी आणि तमोगुणी स्वभाव असलेल्या आम्हां दैत्यांनाही दर्शन दिलेत. हे प्रभो ! आम्ही आणि आमच्याचसारखे दुसरे दैत्य, दानव, गंधर्व, सिद्ध, विद्याधर, चारण, यक्ष, राक्षस, पिशाच्च, भूत आणि प्रमथनायक इत्यादी आपल्याशी नेहमी वैरभावाने वागतात; परंतु असे असूनही साक्षात वेदमय आणि विशुद्ध सत्त्वस्वरूप अशा आपली काहींनी वैरभावाने, काहींनी भक्तीने आणि काहींनी काही कामना धरून प्राप्ती करून

घेतली. जी आपल्याजवळ राहूनही सत्त्वप्रधान देवादिकांना झाली नाही. हे योगेश्वरांचे अधीश्वर ! आपली योगमाया ही आहे आणि अशी आहे, हे जर योगेश्वरसुद्धा प्राय: जाणत नाहीत, तर आमच्या-विषयी काय सांगावे ? म्हणून, हे स्वामिन ! माझ्यावर अशी कृपा करा की, कशाचीही अपेक्षा न ठेवणारे परमहंस ज्यांचा शोध घेत असतात, अशा आपल्या चरणकमलांच्या ठायी माझी चित्तवृत्ती जडावी आणि त्यायोगे मी, त्यापासून अत्यंत वेगळ्या अशा या गृहस्थाश्रमाच्या अंधाऱ्या विहिरीतून वर यावे. हे प्रभो ! अशा प्रकारे, जे सगळ्या विश्वाचे एकमेव आश्रय आहेत, त्या आपल्या चरणकमलांना मी शरण जाऊन शांतचित्त व्हावे. सर्वांचे हितचिंतक अशा संतांचीच मी संगत धरावी. चराचराचे नियंते असणाऱ्या हे प्रभो ! आपण आम्हांला आज्ञा करून आमच्या पापांचा नाश करा. कारण जो पुरुष श्रद्धेने आपल्या आज्ञेचे पालन करतो, तो विधि-निषेधाच्या बंधनातून मुक्त होतो. (३९-४६)

श्रीकृष्ण म्हणाले- ''स्वायंभुव मन्वन्तरामध्ये मरीचीला ऊर्जेपासून सहा पुत्र झाले होते. ते सर्व देव होते. ब्रह्मदेव आपल्या कन्येशीच समागम करण्यासाठी उद्युक्त झालेला पाहून ते हसू लागले. त्या अपराधामुळे ब्रह्मदेवाने त्यांना शाप दिला आणि ते असुरयोनीमध्ये हिरण्यकशिपूचे पुत्र झाले. आता योगमायेने त्यांना तेथून आणून देवकीच्या गर्भामध्ये ठेवले आणि त्यांचा जन्म होताच कंसाने त्यांना मारून टाकले. हे दैत्यराजा ! देवकी त्या पुत्रांसाठी अतिशय शोकाकुल झाली आहे. ते पुत्र तुझ्याजवळ आहेत. म्हणून आम्ही आपल्या मातेचा शोक नाहीसा करण्यासाठी त्यांना येथून घेऊन जाऊ. यानंतर हे शापातून मुक्त होतील आणि आनंदाने आपल्या लोकात जातील. स्मर, उद्गीथ, परिष्वंग, पतंग, क्षुद्रभृत आणि घृणी अशी या सहाजणांची नावे आहेत. माझ्या कृपेने यांना पुन्हा सद्गती प्राप्त होईल. असे सांगितल्यावर बलीने त्या दोघांची पूजा करून ती मुले त्यांच्या स्वाधीन केली. यानंतर बालकांना घेऊन ते दोघे द्वारकेला परत आले व त्यांनी माता देवकीकडे तिचे पुत्र सोपविले. त्या मुलांना पाहून देवकीच्या स्तनांतून पुत्रस्नेहाने दुधाच्या धारा वाहू लागल्या. वारंवार त्यांना मांडीवर घेऊन व छातीशी धरून ती त्यांची मस्तके हुंगू लागली. पुत्रांच्या स्पर्शाने आनंदित झालेल्या देवकीने त्यांना स्तनपान करविले. कारण ज्याच्यामुळे हे सृष्टिचक्र चालते, त्या भगवंतांच्या मायेने ती मोहित झाली होती. देवकीच्या स्तनांतील श्रीकृष्णांनी पिऊन उरलेले अमृतमय दूध प्याल्यामुळे आणि भगवान श्रीकृष्णांच्या अंगाचा स्पर्श झाल्याने त्यांना आत्मसाक्षात्कार झाला. यानंतर त्या सर्वांनी श्रीकृष्ण, देवकी, वसुदेव आणि बलराम यांना नमस्कार केला आणि सर्वांच्या देखतच ते देवलोकाकडे गेले. परीक्षिता ! मेलेली मुले परत आली आणि पुन्हा निघूनही गेली. हे पाहून देवकीला अत्यंत आश्चर्य वाटले. ही श्रीकृष्णांचीच माया आहे, हे तिला कळले. परीक्षिता ! अनंतशक्ती भगवान श्रीकृष्णांची अशी अद्भुत चरित्रे अनंत आहेत. (४७-५८)

सूत म्हणतात- अमरकीर्ती श्रीकृष्णांचे हे श्रीशुकांनी वर्णन केलेले चरित्र सर्व जगाचे पाप पूर्णपणे मिटविणारे व भक्तांच्या कानांचे भूषण आहे. जो याचे श्रवण करतो किंवा ते दुसऱ्याला ऐकवितो, त्याच्या चित्तवृत्ती भगवंतांचे ठिकाणी लागतात आणि तो त्यांचा परम कल्याणस्वरूप लोक प्राप्त करून घेतो. (५९)

अध्याय पंचाऐंशीवा समाप्त

अध्याय शाऐंशीवा

सुभद्राहरण आणि मिथिलापुरीमध्ये राजा जनक आणि श्रुतदेव ब्राह्मण यांच्या घरी भगवंतांचे एकाच वेळी जाणे

राजाने म्हटले- मुनिश्रेष्ठ ! राम-कृष्णांची बहीण व माझी आजी सुभद्रा, हिच्याशी अर्जुनाने कोणत्या प्रकारे विवाह केला, हे जाणण्याची आम्हांला इच्छा आहे. (१)

श्रीशुक म्हणाले- पराक्रमी अर्जुन एकदा तीर्थयात्रेच्या निमित्ताने पृथ्वीपर्यटन करीत असता प्रभासक्षेत्री जाऊन पोहोचला. तेथे त्याने ऐकले की, आपली मामेबहीण सुभद्रा, हिचा विवाह बलराम दुर्योधनाबरोबर करू इच्छितात. पण इतर त्यांच्याशी सहमत नाहीत. अशावेळी अर्जुन, सुभद्रा आपल्याला मिळावी, म्हणून त्रिदंडी संन्याशाचा वेष घेऊन द्वारकेला पोहोचला. आपली इच्छा पुरी करून घेण्यासाठी अर्जुन तेथे पावसाळ्याचे चार महिने राहिला. तेथे नगरवासीयांनी आणि तो अर्जुन आहे, हे न कळलेल्या बलरामांनी त्याचा चांगला आदरसत्कार केला. त्याचे आतिथ्य करावे, म्हणून एकदा बलरामांनी त्याला घरी आमंत्रित केले. तेथे बलरामांनी अत्यंत श्रद्धेने वाढलेली भिक्षा त्याने ग्रहण केली. (२-५)

अर्जुनाने तेथे वीरांचे मन मोहित करणाऱ्या उपवर सुभद्रेला पाहिले. अर्जुनाचे डोळे प्रेमाने प्रफुल्लित झाले. प्रेम जागृत झालेले त्याचे मन तिच्या ठायी जडले. स्त्रियांना आवडणाऱ्या त्याला पाहिल्यावर सुभद्रेचेसुद्धा मन त्याच्यावर जडले. आणि ती थोडीशी हसून लाजऱ्या नजरेने त्याच्याकडे पाहू लागली. आता अर्जुन फक्त तिचेच चिंतन करू लागला. आणि तिला पळवून मिळवण्याची संधी शोधू लागला. सुभद्रेला प्राप्त करण्याच्या उत्कट इच्छेने त्याचे चित्त सैरभैर झाले. त्याला थोडीसुद्धा शांती मिळेनाशी झाली. (६-८)

सुभद्रा एकदा देवाच्या मोठ्या जत्रेसाठी रथात बसून द्वारकेच्या बाहेर पडली. त्याचवेळी महारथी अर्जुनाने देवकी-वसुदेव आणि श्रीकृष्णांच्या संमतीने, सुभद्रेचे अपहरण केले. वीर अर्जुनाने रथावर स्वार होऊन धनुष्य हातात घेतले आणि जे सैनिक त्याला अडविण्यासाठी आले, त्यांना पिटाळून लावले. इकडे सुभद्रेचे आप्तेष्ट ओरडत असताना ज्याप्रमाणे सिंह आपली शिकार घेऊन जातो, त्याप्रमाणे अर्जुनाने सुभद्रेला नेले. हे ऐकून, पौर्णिमेच्या दिवशी समुद्र जसा खवळतो, त्याप्रमाणे बलराम खवळून उठले. परंतु श्रीकृष्णांनी आणि अन्य बांधवांनी त्यांचे पाय धरून त्यांची समजूत घातली, तेव्हा ते शांत झाले. बलरामांनी नंतर वरदक्षिणा म्हणून वधू-वरांसाठी पुष्कळसे धन, अन्य सामग्री, हत्ती, रथ, घोडे आणि दास-दासी पाठविल्या. (९-१२)

श्रीशुक म्हणतात- विदेहाची राजधानी मिथिला नगरीमध्ये श्रुतदेव नावाचा एक गृहस्थाश्रमी श्रेष्ठ ब्राह्मण श्रीकृष्णांचा परम भक्त होता. तो फक्त भगवद्भक्ती करूनच पूर्णमनोरथ, शांत, ज्ञानी आणि विरक्त होता. तो कोणत्याही प्रकारचा उद्योग न करता जे काही अनायासे मिळेल, त्यावरच आपला निर्वाह चालवी. दररोज त्याला प्रारब्धानुसार उदरनिर्वाहासाठी पुरेशी सामग्री मिळत असे. त्यापेक्षा अधिक मिळत नसे. पण तो त्यातच संतुष्ट राही आणि आपल्या वर्णाश्रमानुसार योग्य ती धर्मकर्मे करीत असे. परीक्षिता ! तसाच, त्या देशाचा बहुलाश्व नावाचा राजासुद्धा निरहंकारी होता. हे दोघेही श्रीकृष्णांचे प्रिय भक्त होते. (१३-१६)

श्रीकृष्णांनी त्या दोघांवरही प्रसन्न होऊन एके दिवशी दारुकाला सांगून आपला रथ मागविला

आणि त्यात बसून ते विदेह देशाकडे जाण्यास निघाले. भगवंतांच्याबरोबर नारद, वामदेव, अत्री, वेदव्यास, परशुराम, असित, आरुणी, मी, बृहस्पती, कण्व, मैत्रेय, च्यवन इत्यादी ऋषीसुद्धा होते. परीक्षिता ! ते जेथे जेथे जाऊन पोहोचत, तेथे तेथे तेथील नागरिक आणि ग्रामवासी, ग्रहांच्याबरोबर असलेल्या उगवत्या सूर्यनारायणाला अर्घ्य द्यावे, तसे हातात पूजेचे साहित्य घेऊन उपस्थित असत. परीक्षिता ! त्या प्रवासात आनर्त, धन्व, कुरु-जांगल, कंक, मत्स्य, पांचाल, कुंती, मधू, केकय, कोसल, अर्ण इत्यादी अनेक देशांतील स्त्री-पुरुष भगवान श्रीकृष्णांच्या मुक्त हास्य आणि प्रेमपूर्ण नजरेने युक्त असे मुखकमल डोळे भरून पाहात असत. त्रिलोकगुरु भगवान श्रीकृष्ण आपल्या दर्शनाने त्या लोकांची अज्ञानदृष्टी नाहीशी करून, त्यांना ज्ञान देऊन त्यांचे परम कल्याण करीत चालले होते. जी सर्व दिशांना उजळून टाकणारी आणि सर्व अशुभांचा नाश करणारी आहे, अशा कीर्तीचे गायन, जागोजागी माणसे आणि देव करीत होते. ते ऐकत श्रीकृष्ण हळू हळू विदेह देशात जाऊन पोहोचले. (१७-२१)

परीक्षिता ! भगवान श्रीकृष्णांच्या शुभागमनाची बातमी ऐकून नागरिक आणि ग्रामवासी आनंदाने हातात पूजेचे साहित्य घेऊन त्यांचे स्वागत करण्यासाठी सामोरे येत. भगवान श्रीकृष्णांचे दर्शन घेऊन त्यांचे हृदय आणि चेहरे आनंदाने प्रफुल्लित होत. ते भगवंतांना आणि ज्यांचे फक्त नाव ऐकले होते, त्या मुनींना हात जोडून, मस्तक लववून नमस्कार करीत. जगद्गुरू भगवान श्रीकृष्ण आपल्यावर कृपा करण्यासाठी आलेले आहेत, असे पाहून बहुलाश्व आणि श्रुतदेव यांनी त्यांच्या चरणांवर लोटांगण घातले. बहुलाश्व आणि श्रुतदेव या दोघांनीही एकाच वेळी हात जोडून मुनींसह श्रीकृष्णांना आपल्याकडून आतिथ्य स्वीकारण्यासाठी आमंत्रित केले. (२२-२५)

दोघांच्या प्रार्थनेचा स्वीकार करून भगवान श्रीकृष्ण दोघांनाही संतुष्ट करण्यासाठी एकाच वेळी वेगवेगळी रूपे धारण करून त्यांच्या नकळत दोघांच्याही घरी गेले. विदेहराज बहुलाश्व अतिशय बुद्धिमान होता. दुर्जनांना ज्यांचे नावसुद्धा ऐकू येणे कठीण तेच भगवान श्रीकृष्ण आणि ऋषी आपल्या घरी आले आहेत, हे पाहून बहुलाश्वाने सुंदर सुंदर आसने आणवून त्यांना आरामात त्यावर बसविले. प्रेमभक्तीच्या उद्रेकाने त्याचे हृदय भरून आले. नेत्रांतून अश्रूंच्या धारा वाहात होत्या. त्याने त्या अतिथींच्या चरणांना नमस्कार करून त्यांचे पाय धुतले आणि आपल्या कुटुंबियांसह लोकांना पावन करणारे त्यांच्या चरणांचे तीर्थ मस्तकी धारण केले. नंतर भगवान तसेच भगवत्स्वरूप ऋषींना, गंध, पुष्पमाळा, वस्त्रे, अलंकार, धूप, दीप, अर्घ्य, गाई, बैल इत्यादी समर्पण करून त्यांची पूजा केली. जेव्हा सर्वजण भोजन करून तृप्त झाले, तेव्हा राजाने श्रीकृष्णांचे चरण आपल्या मांडीवर घेतले आणि मोठ्या आनंदाने हळू हळू पाय चेपीत, अत्यंत मधुर वाणीने तो भगवंतांची स्तुती करू लागला. (२६-३०)

राजा म्हणाला- हे प्रभो ! आपण सर्व प्राण्यांचे आत्मा, साक्षी तसेच स्वयंप्रकाश आहात. आपल्या चरणकमलांचे स्मरण करणाऱ्या आम्हांला आज आपण दर्शन देऊन कृतार्थ केले. माझ्या अनन्य भक्तापेक्षा मला बलराम, लक्ष्मी किंवा ब्रह्मदेव हेही प्रिय नाहीत हे आपले वचन सत्य करण्यासाठीच आपण आम्हांला दर्शन दिले आहे. ज्यांनी जगातील सर्व वस्तूंचा त्याग केला आहे, अशा शांत मुनींना जे स्वत:लासुद्धा देऊन टाकतात, अशा आपल्या चरणकमलांचा कोण बरे त्याग करील ? ज्या आपण यदुवंशात अवतार घेऊन, जन्म-मृत्यूच्या फेऱ्यात सापडलेल्यांना मुक्त करण्यासाठी जगामध्ये आपल्या विशुद्ध यशाचा विस्तार केला आहे की, जो त्रैलोक्याचे पाप-ताप शांत करणारा आहे. ज्यांचे ज्ञान अनंत

आहे, जे परम शांती स्थापन करण्यासाठी नारायण-ऋषींच्या रूपात तपश्चर्या करीत आहेत, त्या भगवान श्रीकृष्णांना मी नमस्कार करीत आहे. हे अनंता ! मुनिवर्यांसह आपण काही दिवस आमच्या येथे राहावे आणि आपल्या चरणधुळीने हा निमिवंश पवित्र करावा.'' सर्वांना जीवन देणारे भगवान श्रीकृष्ण, राजाच्या या प्रार्थनेचा स्वीकार करून, मिथिलावासी स्त्री-पुरुषांचे कल्याण करीत काही दिवस तेथेच राहिले. (३१-३७)

राजा बहुलाश्वाप्रमाणे श्रुतदेव ब्राह्मणसुद्धा भगवान श्रीकृष्ण मुनिवर्यांसह आपल्या घरी आल्याचे पाहून आनंदविभोर झाला आणि त्यांना नमस्कार करून आपल्या अंगावरील उपरणे हवेत उडवून नाचू लागला. श्रुतदेवाने चटया, पाट आणि कुशासने अंथरून त्यांवर श्रीकृष्ण आणि मुनिवर्यांना बसविले. नंतर त्यांचे स्वागत करून अभिनंदन केले. तसेच आपल्या पत्नीसह मोठ्या आनंदाने त्यांचे चरण धुतले. त्यानंतर महान भाग्यवान अशा श्रुतदेवाने ते चरणोदक स्वत:सह आपले घर आणि कुटुंबियांवर शिंपडले. यावेळी आपले सर्व मनोरथ पूर्ण झाल्याचा त्याला विलक्षण आनंद झाला होता. त्यानंतर त्याने फळे, वाळा घातलेले अमृतमधुर पाणी, कस्तुरी, तुळस, कुश, कमळे इत्यादी जी मिळाली, ती पूजासामग्री घेऊन त्यांची पूजा केली आणि सत्त्वगुण वाढविणारे अन्न सर्वांना वाढले. त्यावेळी श्रुतदेव मनातल्या मनात विचार करू लागला की, मी प्रपंचरूप अंधाऱ्या विहिरीत पडलेलो असताना ज्यांच्या चरणांची धूळच सर्वतीर्थस्वरूप आहे, त्या श्रीकृष्ण आणि त्यांचे निवासस्थान असलेले ऋषी यांचा सहवास मला कसा प्राप्त झाला ? आतिथ्याचा स्वीकार करून जेव्हा सर्वजण आरामात बसले, तेव्हा आपले स्त्री-पुत्र, आप्तेष्ट यांच्यासह श्रुतदेव तेथे आला आणि भगवान श्रीकृष्णांचे पाय चेपीत म्हणू लागला. (३८-४३)

श्रुतदेव म्हणाला - जेव्हा आपण आपल्या शक्तींच्या द्वारा हे जग निर्माण करून त्यात स्वत: प्रवेश केला, ते पुरुषोत्तम आपण आहात. म्हणून आपण मला आजच दर्शन दिले, असे काही नाही. जसा झोपी गेलेला पुरुष स्वप्नावस्थेमध्ये अविद्येमुळे दुसरी स्वप्नसृष्टी निर्माण करतो आणि तीत स्वत:च प्रवेश करून अनेक रूपात अनेक कर्मे करणारा असा दिसतो, त्याचप्रमाणे आपण आपल्यातच आपल्या मायेने जगाची निर्मिती केली आणि नंतर त्यात प्रवेश करून आपण अनेक रूपांनी प्रकाशित होत आहात. जे लोक नेहमी आपल्या कथांचे श्रवण-कीर्तन करतात, तसेच आपल्या प्रतिमांची पूजा करून त्यांना वंदन करतात, आणि आपापसात आपल्याविषयीच चर्चा करतात, त्यांचे हृदय शुद्ध होते व त्यामुळे आपण त्यात प्रकाशित होता. ज्या लोकांचे चित्त कर्मांच्या वासनांनी बहिर्मुख झालेले असते, त्यांच्या हृदयात असूनसुद्धा आपण त्यांच्यापासून खूप लांब असता. परंतु ज्यांनी आपले गुणगान करून आपले अंत:करण सद्गुणसंपन्न बनविलेले असते, त्यांच्या बाबतीत मात्र आपण मनाला समजण्यासारखे नसूनही अत्यंत जवळ असता. हे प्रभो ! जे लोक आत्मतत्त्वाला जाणणारे आहेत, त्यांचे परमात्मा आपण असता आणि जे शरीरादींनाच आत्मा मानतात, त्यांच्यासाठी आपण जन्ममृत्युरूप संसार आहात. आपण महत्तत्त्व इत्यादी कार्यद्रव्ये आणि प्रकृतिरूप कारणाचे नियंत्रण करणारे आहात. तुमची माया तुमच्या स्वत:च्या दृष्टीवर पडदा टाकू शकत नाही, परंतु तिने इतरांची दृष्टी मात्र झाकून टाकली आहे. मी आपणास नमस्कार करीत आहे. हे स्वयंप्रकाश प्रभो ! आम्ही आपले सेवक आहोत. आम्ही काय करावे, याची आपण आम्हांला आज्ञा करावी. आपल्या दर्शनानेच आम्हा जीवांचे सर्व क्लेश नाहीसे झाले आहेत. (४४-४९)

श्रीशुक म्हणतात - शरणागतांचे भय नाहीसे करणाऱ्या भगवान श्रीकृष्णांनी श्रुतदेवांची प्रार्थना ऐकून त्यांचा हात आपल्या हातात घेतला आणि हसत हसत ते त्याला म्हणाले. (५०)

श्रीकृष्ण म्हणाले - हे ब्रह्मन ! हे ऋषी तुमच्यावर कृपा करण्यासाठीच येथे आले आहेत. हे आपल्या चरणधुळीने लोकांना पवित्र करीत माझ्याबरोबर संचार करीत असतात. देवता, पुण्यक्षेत्रे आणि तीर्थे इत्यादी दर्शन, स्पर्श, पूजन इत्यादींद्वारा हळू हळू पुष्कळ दिवसांनंतर पवित्र करतात; परंतु संत पुरुष आपल्या केवळ दृष्टीनेच सर्वांना पवित्र करतात. एवढेच नव्हे तर देवता इत्यादींमध्ये पवित्र करण्याची जी शक्ती आहे, तीसुद्धा त्यांना संतांच्या दृष्टीतूनच प्राप्त होते. जगामध्ये ब्राह्मण जन्मानेच सर्व प्राण्यांमध्ये श्रेष्ठ आहेत. ते जर तपश्चर्या, विद्या, संतोष आणि माझी उपासना यांनी युक्त असतील, तर मग त्यांच्या श्रेष्ठत्वाविषयी काय सांगावे ? (५१-५३)

मला माझे हे चतुर्भुज रूपसुद्धा ब्राह्मणांपेक्षा अधिक प्रिय नाही. कारण ब्राह्मण सर्व वेदमय आहेत आणि मी सर्वदेवमय आहे. अजाण माणसे ही गोष्ट समजून न घेता फक्त मूर्ती इत्यादीमध्येच पूज्यबुद्धी ठेवतात आणि मत्सरामुळे माझे स्वरूप असलेले व लोकगुरू जे ब्राह्मण त्यांचा तिरस्कार करतात. ब्राह्मण माझा साक्षात्कार करून घेऊन आपल्या चित्तात असा निश्चय करतात की, हे चराचर जग आणि याला कारण असणारे महत्तत्त्वादी पदार्थ ही भगवंतांचीच रूपे आहेत. म्हणून हे श्रुतदेवा ! तू या ब्रह्मर्षींना माझेच स्वरूप समजून पूर्ण श्रद्धेने यांची पूजा कर. तू जर असे करशील, तर ते माझेच पूजन केले, असे होईल. नाहीतर पुष्कळ ऐश्वर्यानेही माझी पूजा होऊ शकत नाही. (५४-५७)

श्रीशुक म्हणतात- श्रीकृष्णांची ही आज्ञा शिरोधार्य मानून श्रुतदेवाने श्रीकृष्णांसह त्या ब्रह्मर्षींची एकात्मभावाने आराधना केली व त्यांच्या कृपेने तो भगवत्स्वरूपाला प्राप्त झाला. बहुलाश्वालासुद्धा तीच गती प्राप्त झाली. परीक्षिता ! अशा रीतीने भक्तांची भक्ती करणाऱ्या भगवंतांनी दोन्ही भक्तांसाठी तेथे काही दिवस राहून त्यांना वेदमार्गाचा उपदेश करून ते द्वारकेला परतले. (५८-५९)

अध्याय शाऐंशीवा समाप्त

अध्याय सत्त्याऐंशीवा

वेदस्तुती

परीक्षिताने विचारले - भगवन ! ब्रह्म हे कार्य आणि कारणाच्या सर्वथैव पलीकडचे आहे. सत्त्व, रज आणि तम हे तिन्ही गुण त्यात नाहीतच. वाणीने किंवा मनानेसुद्धा ते सांगता येत नाही. दुसऱ्या बाजूला, सर्व श्रुतींचा विषय तर तीन गुण हाच आहे. अशा स्थितीत श्रुती निर्गुण ब्रह्माचे प्रतिपादन कसे काय करतात ? (१)

श्रीशुक म्हणतात- भगवंतांनी जीवांना अर्थ, धर्म, काम व मोक्ष यांच्या प्राप्तीसाठी त्यांच्या ठिकाणी बुद्धी, इंद्रिये, मन आणि प्राणांची निर्मिती केली. ब्रह्माचे प्रतिपादन करणाऱ्या उपनिषदांचे हेच ज्ञान पूर्वजांचेसुद्धा पूर्वज असलेल्या सनकादी ऋषींनी स्वीकारले. जो कोणी श्रद्धापूर्वक यांचे श्रवण-मनन करतो, तो सर्व उपाधींपासून मुक्त होऊन परमकल्याणस्वरूप परमात्म्याला प्राप्त होतो. याविषयी मी तुला नारायणांशी संबंधित एक कथा ऐकवितो. ती कथा म्हणजे नारद आणि नारायण ऋषींचा संवाद होय. (२-४)

भगवंतांचे भक्त नारद एकदा निरनिराळ्या लोकांमध्ये फिरत फिरत सनातन ऋषी भगवान नारायणांचे दर्शन घेण्यासाठी बद्रिकाश्रमात गेले. मनुष्यमात्राचे लौकिक कल्याण आणि त्यांना मोक्ष-प्राप्ती व्हावी, म्हणून भगवान नारायण या भारतवर्षामध्ये या कल्पाच्या सुरुवातीपासूनच धर्म, ज्ञान आणि संयम धारण करून तपश्चर्या करीत आहेत. परीक्षिता ! एके दिवशी ते कलापग्रामवासी सिद्ध ऋषींच्याबरोबर बसले होते. त्यावेळी नारदांनी त्यांना प्रणाम करून हाच प्रश्न विचारला होता. भगवान नारायणांनी सर्व ऋषी ऐकत असता जनलोकांमध्ये राहाणाऱ्या पूर्वीच्या लोकांचा जो ब्रह्मविचार झाला होता, तो नारदांना सांगितला. (५-८)

भगवान नारायण म्हणाले- नारदमुने ! पूर्वी एकदा जनलोकांमध्ये राहाणारे ब्रह्मदेवाचे मानस पुत्र नैष्ठिक ब्रह्मचारी सनक, सनंदन, सनातन इत्यादी ऋषींचे ब्रह्मसत्र (ब्रह्मविषयक चर्चासत्र) झाले होते. त्यावेळी तू माझ्या श्वेतद्वीपाधिपती अनिरुद्धांचे दर्शन घेण्यासाठी श्वेतद्वीपाकडे गेला होतास. त्यावेळी तेथे ज्या ब्रह्माच्या विषयात श्रुती मौन धारण करतात, त्यासंबंधी अतिसुंदर चर्चा झाली होती. जो तू मला आता विचारलास, तोच प्रश्न त्यावेळी तेथे उपस्थित केला गेला होता. सनक, सनंदन, सनातन आणि सनत्कुमार हे चारही भाऊ शास्त्रीय ज्ञान, तपश्चर्या आणि स्वभाव याबाबतीत समान आहेत. त्यांना शत्रू, मित्र आणि उदासीन एकसारखेच वाटतात. त्यांनी आपल्यापैकी सनंदन यांना वक्ता म्हणून नियुक्त केले आणि अन्य भाऊ श्रोते झाले. (९-११)

सनंदन म्हणाले- पहाटे झोप घेत असलेल्या सम्राटाला जागे करण्यासाठी जसे त्याचे नोकर भाट त्याच्याजवळ येतात आणि त्याचे पराक्रम व सुयशाचे गायन करून त्याला जागे करतात, त्याचप्रमाणे जेव्हा परमात्मा आपणच निर्माण केलेल्या संपूर्ण जगाला आपल्यामध्ये लीन करून आपल्या शक्तींसहित झोपी जातो, तेव्हा प्रलयाच्या शेवटी श्रुती, त्यांचे प्रतिपादन करणाऱ्या वचनांनी त्यांना जागे करतात. (१२-१३)

श्रुती म्हणतात- ज्यांना कोणी जिंकू शकत नाही, अशा हे प्रभो ! आपला जयजयकार असो ! जयजयकार असो ! आपण स्वभावतःच सर्व ऐश्वर्यांनी परिपूर्ण आहात. म्हणून चराचर जीवांच्या आनंदमय अशा मूळ स्वरूपाला आच्छादित करून त्यांना बंधनात अडकविणाऱ्या त्रिगुणांना धारण करणाऱ्या मायेचा नाश करा. प्राण्यांमधील ज्ञानादी सर्व शक्तींना जागृत करणारे आपणच आहात. कधी आपण मायेच्या द्वारा जगाची उत्पत्ती करून सगुण रूप धारण करता तर कधी मूळ सच्चिदानंदस्वरूपात राहाता. आम्ही वेद आपले असेच वर्णन करतो. (१४)

ज्याप्रमाणे घटादी कार्ये मातीरूप कारणातून उत्पन्न होऊन त्यातच लय पावतात, त्याप्रमाणे ज्या आपल्यामध्येच कोणताही बदल न घडता, हे सारे इंद्रियांना कळणारे विश्व ज्या आपल्यापासून उत्पन्न होऊन आपल्यातच विलीन होते आणि विश्व नसते, तेव्हाही केवळ आपणच शिल्लक असता, म्हणून वेदमंत्र आणि मंत्रद्रष्टे ऋषी हे सर्व विश्व ब्रह्मच मानतात. तसेच मनाचे चिंतन असो की वाणीचे उच्चारण तेही आपल्यासंबंधीच आहे, असे त्यांना वाटते. (कारण आपल्याशिवाय अन्य वस्तूच नाही ना !) जसे, माणसांनी कोठेही पाय ठेवला तरी तो पृथ्वीवर ठेवला, असेच होते. (मग तो लाकडावर ठेवो, की दगडावर. कारण हे सर्व पदार्थ पृथ्वीस्वरूपच आहेत.) (१५)

म्हणूनच हे त्रिगुणात्मकमायाधिपते ! विवेकी लोक, सर्व लोकांचे सर्व पाप नाहीसे करणाऱ्या तुमच्या कथामृतसागरात डुंबत राहून सर्व प्रकारचे

1776 Pi... Section_28_1_Back

पाप-ताप नाहीसे करतात. तर मग हे पुरुषोत्तमा ! ज्यांनी आत्मज्ञानाने अंत:करणातील विकार आणि काळामुळे उत्पन्न होणारे वार्धक्यादी दोष दूर केले आहेत आणि त्यामुळे जे अखंड आनंदस्वरूप अशा आपल्या परमपदाला प्राप्त झाले आहेत, त्यांचे पाप-ताप नाहीसे होतील, यात काय शंका ! हे भगवन ! मनुष्यप्राणी जर तुमची सेवा करतील, तरच त्यांचे जीवन सफल होय. नाहीतर त्यांचे श्वासोच्छ्वास म्हणजे लोहाराच्या भात्यासारखेच होत. आपल्या अनुग्रहामुळेच महत्तत्त्व, अहंकार इत्यादी जड तत्त्वांनी ब्रह्मांड रचले. अन्नमयादी पाच कोशात त्या त्या आकाराने (परंतु त्यांच्याशी लिप्त न होता) राहून आपण त्यांना चैतन्यमय केले. या पाच कोशांचा आधार असलेले ब्रह्मही आपणच आहा. किंबहुना कार्यकारणात्मक विश्वाच्याही पलीकडे असणारे व त्याच्या नाशानंतरही शिल्लक राहाणारे साक्षिभूत सत्य तत्त्व आपणच आहात. (१६-१७)

ऋषींनी आपल्या प्राप्तीचे जे मार्ग सांगितले आहेत, त्यांपैकी मणिपूर चक्रात असणाऱ्या ब्रह्माची उपासना स्थूलदृष्टीचे साधक करतात. जेथून सर्व नाड्या शरीरभर पसरल्या आहेत, त्या हृदयात दहर ब्रह्माची उपासना 'आरुणी' साधक करतात. हे अनन्ता ! त्या हृदयातून 'सुषुम्ना' नावाची जी एक नाडी, तुमच्या साक्षात्काराचे श्रेष्ठ स्थान असलेल्या ब्रह्मरंध्रात गेली आहे, तेथे काही साधक तुमची उपासना करतात. या साधकांना तेथे तुमचा साक्षात्कार झाल्यानंतर पुन्हा या संसारात यावे लागत नाही. (१८)

स्वत:च निर्माण केलेल्या निरनिराळ्या योनींमध्ये उपादान कारणरूपाने आपणच असून जीवरूपाने जणू प्रवेश केला आहे. अग्नी जसा लहान-मोठ्या लाकडामुळे लहान-मोठा वाटतो, त्याप्रमाणे त्या त्या योनीत राहाण्यामुळे आपण लहान-मोठे भासता. म्हणूनच निर्मल अंत:करण असलेले निष्काम भक्त, मिथ्या असणाऱ्या या सर्व योनींत सत्य, सर्वत्र समान, एकरस असे तुमचे स्वरूपच असल्याचा अनुभव घेतात. (१९)

स्वत:च्या कर्माने निर्माण केलेल्या या शरीरांत राहाणारा कार्य-कारणरहित असा जो जीवात्मा तो सर्वशक्तिसंपन्न अशा आपलेच स्वरूप आहे. ज्ञानी लोक जीवाच्या या वास्तविक स्वरूपाचा विचार करून या भूलोकात सर्व वेदोक्त कर्मांच्या समर्पणाचे स्थान व मोक्षस्वरूप अशा आपल्या चरणांची पूर्ण श्रद्धेने उपासना करतात. (कारण या उपासनेनेच जीवाला 'मीच ब्रह्म आहे', हा साक्षात्कार होतो.) हे परमेश्वरा ! कळण्यास अत्यंत कठीण अशा आत्मतत्त्वाचे ज्ञान करून देण्यासाठी अवतार घेणाऱ्या आपल्या चरित्ररूप अमृताच्या महासागरात पोहून जे आपले त्रिविध ताप नाहीसे करतात, त्यांना मोक्षाचीही इच्छा नसते. इतकेच काय, पण काहीजण तर, आपल्या चरणकमलांचे हंस बनून सेवा करणाऱ्या भक्तांच्या सहवासात राहाण्यासाठी आपल्या घरादाराचाही त्याग करतात. (२०-२१)

जर हे शरीर तुमच्या सेवेसाठी उपयोगात आणले तर तेच आपला आत्मा, हितचिंतक आणि मित्र बनते. शिवाय आपणही जीवाचे हितचिंतक, मित्र व आत्मा असल्यामुळे त्याला भेटायला नेहमी उत्सुक असता. अशी सर्व सोय असूनही जीवांचे केवढे हे दुर्दैव की, ते आपल्या उपासनेत रमत नाहीत. उलट शरीर, घरदार इत्यादी विनाशी वस्तूंत रमून स्वत:ची अधोगती करून घेतात. परिणामी त्यांच्या ठिकाणीच वासना जडल्याने पशुपक्ष्यादी क्षुद्र शरीरे त्यांना प्राप्त होतात आणि या भयंकर जन्ममृत्युरूप प्रपंचातच ते भटकत राहातात. योगीजन प्राण, मन, इंद्रिये यांचा निग्रह करून दृढ योगाभ्यासाने अंत:करणात ज्या तत्त्वरूप आपली उपासना करतात, त्याच तत्त्वाला तुमचे शत्रूसुद्धा निरंतर तुमच्या स्मरणाने प्राप्त होतात. शेषनागाच्या शरीराप्रमाणे असणाऱ्या तुमच्या बाहूंवर आसक्त होणाऱ्या स्त्रिया आणि

तुमची चरणकमले नित्य धारण करणाऱ्या आम्ही श्रुती समदर्शी अशा तुमच्या दृष्टीने सारख्याच. (योगाने असो, द्वेषाने असो, प्रेमाने असो की अद्वितीय भावनेने असो तुमचे स्मरणच तुमची प्राप्ती करून देणारे आहे.) (२२-२३)

हे भगवन ! अनादी व अनन्त अशा ज्या आपल्यापासून प्रथम ब्रह्मदेव व त्यानंतर आध्यात्मिक व आधिदैविक देवगण उत्पन्न झाले, त्या आपल्याला या जगात ज्यांचे जन्म-मृत्यू त्याहीनंतरचे आहेत, त्यांपैकी कोण बरे जाणू शकेल ? शिवाय ज्यावेळी आपण सारे विश्व आपल्यात समाविष्ट करून झोपी जाता, त्यावेळी तर स्थूल-सूक्ष्म जग, काळाचा वेग किंवा शास्त्र काहीच नसते. (तर मग तुमचे ज्ञान कोणाला कसे होणार ?) वैशेषिक पूर्वी नसलेले जग नवीन उत्पन्न झाले असे मानतात. नैयायिक एकवीस प्रकारच्या दु:खांचा नाश हाच मोक्ष मानतात. सांख्य आत्मे अनेक मानतात. मीमांसक कर्मफलालाच सत्य मानतात. श्रुतिविरोधामुळे हे सर्व भ्रमात्मक ज्ञान आहे. परमात्मा त्रिगुणात्मक आहे, ही भेदबुद्धी तुमच्या बाबतीत अज्ञानमूलक आहे. अज्ञानाच्या पलीकडे केवळ ज्ञानस्वरूप असणाऱ्या आपल्या ठिकाणी हा भेद कोठून असणार ? (२४-२५)

तुमच्या अधिष्ठानावर पुरुषापासून सर्व त्रिगुणात्मक जग, मनामुळे नसूनही असल्यासारखे भासते. आत्मज्ञानी मात्र हे सर्व विश्व आत्म्यापासून उत्पन्न झाल्यामुळे आत्म्याप्रमाणेच सत्य मानतात. सोन्याचा दागिनाही सोने म्हणूनच स्वीकारला जातो ना ? तसेच आपल्यापासून उत्पन्न झालेले व आपण ज्यात प्रवेश केला आहे, असे हे जग आत्मज्ञानी निश्चयाने आत्मरूपच मानतात. सर्व चराचर हे आपले निवासस्थान आहे, असे समजून जे तुमची सेवा करतात, ते जन्म-मृत्यूची पर्वा न करता मृत्यूच्या मस्तकावर पाय ठेवतात. (अर्थात मुक्त होतात) परंतु तुमच्यापासून जे दूर जातात, ते जरी विद्वान असले, तरी त्यांना तुम्ही जनावरांना बांधावे तसे वेदवाणीरूपी दाव्याने बांधून टाकता. याउलट जे तुमची भक्ती करतात, ते स्वत:ला आणि इतरांनाही पवित्र करतात. (भक्तिहीन विद्वानांना केवळ शब्दज्ञान होते आणि भक्तांना साक्षात्कार होतो.) (२६-२७)

हे प्रभो ! आपण इंद्रियरहित आहात, पण स्वयंप्रकाश आहात. (आपल्या ज्ञानाला इंद्रियांची जरूर नाही.) साऱ्या प्राण्यांची इंद्रिये आपल्यामुळेच कार्ये करतात. म्हणूनच मायावेष्टित ब्रह्मदेवासह सर्व देव आपली पूजा करतात आणि मनुष्यांनी दिलेले हव्यकव्यादी भक्षण करतात. ज्याप्रमाणे मांडलिक राजे प्रजेकडून कर घेऊन सम्राटाला देतात, त्याचप्रमाणे सर्व देव त्यांना ज्या ज्या कार्यासाठी नेमलेले असेल, ते ते कार्य तुमच्या भीतीने ते पार पाडतात. (हे कार्य करणे, हीच तुमची पूजा आहे आणि मनुष्यांनी केलेली देवांची पूजा हे त्यासाठी देवांना मिळालेले वेतन आहे.) हे मायारहित प्रभो ! जेव्हा आपण मायेसह क्रीडा करू इच्छिता, तेव्हा मायेचा संग नसलेल्या तुमच्या केवळ संकल्पाने, मायेमुळे उत्पन्न होणाऱ्या सूक्ष्म शरीरांनी युक्त होऊन निरनिराळ्या चराचराचा जन्म होतो. (आपल्या संकल्पाने निर्माण झालेल्या सृष्टीत जरी विषमता असली, तरी त्याला कारण आपण नाही.) कारण आपण आकाशाप्रमाणे सर्वांशी सम असून परमदयाळू आहात. आपल्याला कोणी स्वकीय नाही की परकीय नाही. या सृष्टीच्या प्रारंभी वाणीला किंवा मनाला न कळणारे आपण शून्यवत होता. (२८-२९)

हे नित्य एकरस प्रभो ! जर जीव वास्तविक अनंत, नित्य आणि सर्वव्यापी असतील, तर ते आपल्यासारखेच असल्यामुळेच आपण त्यांचे नियंत्रक होऊ शकणार नाही. मात्र असे नसेल, तरच आपण त्यांचे नियंत्रण करू शकाल. उपाधीने का असेना, पण जीवरूप कार्य ज्या परमात्मरूप कारणापासून निर्माण झाले, ते कारण सर्व जीवांमध्ये

असल्यामुळे परमात्माच सर्व जीवांचा नियन्ता ठरतो. जे लोक आपल्याला जाणले, असे म्हणतात, त्यांना आपण कधीच कळलेले नसता ! कारण जाणली जाणारी वस्तू प्रत्येकाच्या मतानुसार वेगळी ठरते. आणि आपण तर नित्य एकरूप आहात. प्रकृती आणि पुरुष हे दोन्हीही जन्मरहित असल्यामुळे यांपैकी कोणीही एक जीवरूपाने जन्मले असे म्हणता येत नाही. (जर प्रकृती जीवरूपाने जन्मली म्हटले तर जीव अचेतन ठरेल आणि पुरुष जन्मला म्हटले, तर निर्विकार पुरुषात विकार उत्पन्न झाला, असे होईल.) म्हणून वारा हे निमित्तकारण आणि पाणी हे उपादानकारण यांपासून बुडबुडे तयार होतात, तसेच पुरुष व प्रकृती या दोहोंच्या संयोगाने जीव तयार होतात, असे म्हटले पाहिजे. त्यामुळेच हे सारे जीव अनेक प्रकारच्या नामरूपांसह परमकारण अशा तुमच्यामध्येच विलीन होतात. जशा नद्या समुद्रात किंवा जसे सर्व फुलांचे रस मधात विलीन होतात. (३०-३१)

हे प्रभो ! तुमच्या मायेमुळे हे जीव जन्म-मृत्यूच्या चक्रात फिरत आहेत, हे पूर्णपणे जाणून ज्ञानी लोक संसार-निवर्तक अशा आपल्याला शरण येतात. जे आपल्याला अनुसरतात, त्यांना संसारभय कोठून असणार ? मात्र ज्यांची भृकुटी हाच तीन ऋतू असणारा काळ आहे, तो आपल्याला शरण न येणाऱ्यांना भयभीत करतो. (आपल्याला शरण आल्यास संसाराचे वा काळाचे भय उरत नाही.) हे अजन्मा प्रभो ! ज्यांनी इंद्रिये व प्राण यांचा निग्रह केलेला आहे, पण जे गुरुचरणांना शरण गेले नाहीत, ते जर उच्छृंखल व अत्यंत चंचल अशा मनरूप घोड्याला ताब्यात आणण्याचा प्रयत्न करतील, तर त्याचे त्यांना फक्त कष्टच होतील व त्यांच्यावर शेकडो संकटे येतील. जशी नावाड्याशिवाय नाव घेऊन समुद्रप्रवास करणाऱ्या व्यापाऱ्यांची गत होते, तशी त्या साधकांची गत होते. (३२-३३)

सर्व रसस्वरूप असे तुम्ही जीवांचा आत्मा असताना तुमचा आश्रय करणाऱ्या माणसाला आप्तेष्ट, पुत्र, शरीर, पत्नी, धन, घर, जमीन-जुमला, प्राण किंवा रथ इत्यादी गोष्टींची काय जरूर आहे ? याउलट 'आत्मसुख हेच सत्यसुख आहे,' हे न जाणणाऱ्या आणि सुखासाठी मैथुनादी गोष्टींचा अवलंब करणाऱ्या अज्ञानी लोकांना मुळातच नश्वर व निःसार अशा या संसारातील कोणती वस्तू आनंद देऊ शकणार आहे ? या पृथ्वीतलावर हृदयात आपल्या चरणकमलांना धारण करणारे व त्यामुळेच ज्यांचे चरणतीर्थ पाप नाहीसे करते, असे ऋषीसुद्धा अहंकाररहित होऊन अतिशय पुण्यमय अशा तीर्थांचा व आश्रमांचा आश्रय करतात. माणसांनी नित्य आनंदमय आत्मस्वरूप अशा आपल्या ठिकाणी एकवेळ जरी मन लावले तरी ते पुन्हा माणसाचे विवेक-वैराग्यादी गुण नाहीसे करणाऱ्या घराकडे फिरकत नाहीत. (३४-३५)

कारण व कार्य एकरूप असतात, या नियमाप्रमाणे हे विश्व सत्तत्त्वापासून उत्पन्न झाल्यामुळे सत् आहे, असे म्हणावे, तर ते तर्कशुद्ध ठरत नाही. (कारण जग हे असत्य आहे.) कारण व कार्य एकरूप असतात, हा नियमही निरपवाद नाही. जसा पिता व पुत्र यांच्यात कार्यकारणभाव असला, तरी एकरूपता नसते. काही ठिकाणी तर कार्य काल्पनिक असते. जसे दोरी हे साप भासण्याचे कारण असले, तरी त्या ठिकाणचे कार्य साप हा काल्पनिक असतो. या ठिकाणी सर्पाभासाचे कारण केवळ दोरी नसून दोरीचे अज्ञान हेही एक कारण आहे. याचप्रमाणे सत्तत्त्वाच्या ठिकाणी अज्ञानाने भासणारे हे जग असल्यामुळे ते सापाप्रमाणे मिथ्या किंवा काल्पनिक आहे. व्यवहाराच्या सिद्धीसाठी जग सत्य मानले, तरी त्यामुळे काही बिघडत नाही. (त्यामुळे ब्रह्माद्वैताच्या पारिमार्थिकतेला बाध येत नाही. कारण जगाची सत्ता ही व्यावहारिक सत्ता आहे.) आणि ही अन्धपरंपरा अनादी काळापासून चालू आहे. अशा स्थितीत कर्मफल नित्य मानणारी

तुमची वेदवाणी कर्मावर अत्यंत श्रद्धा ठेवणाऱ्या मंदमतींना भ्रमित करते. (वास्तविक वेद कर्मफलाला नित्य मानीत नाहीत, तर ते आत्मज्ञानाला पात्र नसलेल्यांना कर्माकडे प्रवृत्त करण्यासाठी कर्माची लक्षणावृत्तीने प्रशंसा करतात, एवढेच.) (३६)

हे विश्व उत्पत्तीच्या पूर्वी नव्हते आणि प्रलयानंतरही असणार नाही. त्यावरून हे सिद्ध होते की, मध्येसुद्धा नित्य अशा तुमच्या अधिष्ठानावरच ते मिथ्या भासते. म्हणूनच माती इत्यादी कारणांपासून उत्पन्न झालेल्या घडा इत्यादी कार्यद्रव्यांची जगाला उपमा दिली जाते. (घडा म्हणजे वास्तविक विशिष्ट आकार व नाव असलेली मातीच. तसेच विविध नावारूपांनी नटलेले विश्व म्हणजे एकमेवाद्वितीय परब्रह्मच) पण अज्ञानी लोक मात्र मनाच्या या खोट्या कल्पनारूप जगाला सत्य मानतात.(३७)

तोच अज्ञानी जीव जेव्हा मायेमुळे अविद्येला कवटाळतो आणि त्यामुळे देहेन्द्रियांना आपलेच खरे रूप समजतो, तेव्हा त्याचे मुळचे नित्य-शुद्ध-बुद्धादी स्वरूप लोप पावते व तो जन्म-मृत्यूच्या चक्रात फिरत राहातो. परंतु हे प्रभो ! आपण मात्र सापाने कात टाकावी, तसा मायेचा त्याग करता, म्हणून आपले ऐश्वर्य नित्य आपल्याबरोबरच राहाते. त्यामुळे अष्टसिद्धियुक्त अनंत ऐश्वर्यात आपण विराजमान राहाता. (३८)

हे भगवन ! अज्ञानी लोकांनी योगी होऊनसुद्धा जर आपल्या हृदयांतील विषयवासनांना उखडून फेकून दिले नाही, तर आपण त्यांच्या हृदयांत असूनसुद्धा, एखाद्याने आपल्याच गळ्यातील मणी आठवण नसल्याने इकडे तिकडे धुंडाळावा, त्याप्रमाणे ते आपल्याला शोधत राहातात, पण आपण त्यांना सापडत नाही. जे लोक आपल्या इंद्रियांना तृप्त करण्यातच मग्न असतात, त्यांना इहलोकी उपभोगासाठी द्रव्यार्जन इत्यादींसाठी कष्ट करावे लागतात. शिवाय जन्म मृत्यूपासून त्यांची सुटका झालेली नसते. आणि आपले स्वरूप समजून न घेतल्यामुळे स्वत:च्या वर्णाश्रमधर्माचे उल्लंघन त्यांच्याकडून होते. म्हणून परलोकात गेल्यावर नरकाची भीतीही राहाते. (३९)

हे भगवन ! आपले वास्तविक स्वरूप जाणणाऱ्या मनुष्याला आपण दिलेल्या पुण्य-पापाच्या सुख-दु:खरूप फळाची जाणीव होत नाही. त्यावेळी विधि-निषेध प्रतिपादन करणारे शास्त्रसुद्धा त्याला लागू होत नाही. शिवाय ज्या माणसांनी दररोज आपल्या प्रत्येक युगामध्ये केलेल्या उपदेशांचे संतांकडून श्रवण करून त्याद्वारा तुम्हांला स्वत:च्या हृदयात प्रतिष्ठित केले, त्यांनाही आपणच मोक्ष प्राप्त करून देता. (४०)

हे भगवन ! स्वर्ग इत्यादी लोकांचे अधिपतीच आपला थांग लावू शकले नाहीत असे नाही, तर आपल्यालासुद्धा तो लागला नाही. कारण जर आपल्याला शेवटच नाही, तर तो कोण कसा जाणू शकेल ? प्रभो ! जसे आकाशात हवेमुळे धुळीचे अनंत कण उडत असतात, त्याचप्रमाणे आपल्यामध्ये कालगतीनुसार उत्तरोत्तर दसपट सात आवरणांसहित असंख्य ब्रह्मांडे एकाच वेळी फिरत असतात. आम्ही श्रुतीसुद्धा तुमच्या स्वरूपाचे तुमच्या व्यतिरिक्त वस्तूंचा (हे नव्हे, ते नव्हे, असा) निषेध करीत करीत शेवटी तुमच्यापर्यंत येऊन थांबतो. (४१)

भगवान नारायण म्हणाले- अशा प्रकारे सनकादी ऋषींनी आत्मा आणि ब्रह्म यांचे ऐक्य सांगणारा उपदेश ऐकून आत्मस्वरूपाला जाणले आणि स्वत: ते नित्य सिद्ध असूनही या उपदेशाने कृतकृत्य होऊन त्यांनी सनंदनांची पूजा केली. अशा प्रकारे सर्वांचे पूर्वज असणाऱ्या त्या आकाशगामी महात्म्यांनी सर्व वेद, पुराणे आणि उपनिषदांचे सार काढले आहे. हे ब्रह्मदेवांच्या मानसपुत्रा ! तूसुद्धा श्रद्धायुक्त अंत:करणाने ही ब्रह्मविद्या धारण करून स्वच्छंदपणे पृथ्वीतलावर विहार कर. ही विद्या माणसांच्या सर्व वासना भस्म करणारी आहे. (४२-४४)

श्रीशुक म्हणतात- परीक्षिता ! संयमी, ज्ञानी, पूर्णकाम आणि नैष्ठिक ब्रह्मचारी अशा नारदांनी भगवान नारायणांनी केलेला उपदेश श्रद्धेने ग्रहण करून म्हटले. (४५)

नारद म्हणाले- भगवन ! परम पवित्र कीर्ती असणाऱ्या श्रीकृष्णांना नमस्कार असो. आपण सर्व प्राण्यांच्या मोक्षप्राप्तीसाठी रमणीय कलावतार धारण करता. (४६)

नारदांनी अशा प्रकारे आदिऋषींना आणि त्यांच्या शिष्यांना नमस्कार करून माझे साक्षात पिता असलेल्या कृष्णद्वैपायनांच्या आश्रमाकडे ते गेले.* व्यासांनी त्यांचा यथोचित सत्कार केला. आसनावर बसल्यावर नारायणांच्या तोंडून जे काही ऐकले होते, ते सर्व नारदांनी त्यांना सांगितले. राजन ! मन- वाणीच्या पलीकडे असणाऱ्या गुणरहित अशा परमात्म्यामध्ये मनाचा प्रवेश कसा होतो, हे तुझ्या प्रश्नाचे उत्तर मी तुला सांगितले. भगवानच या विश्वाचा संकल्प करतात. तसेच त्याच्या सुरुवातीला, मध्ये आणि शेवटी तेच असतात. प्रकृती आणि जीव या दोघांचे ते स्वामी आहेत. तेच ही सृष्टी निर्माण करून जीवाबरोबर हिच्यामध्ये प्रवेश करतात आणि शरीरांची निर्मिती करून तेच त्यांचे नियंत्रण करतात. गाढ झोपेत मनुष्य ज्याप्रमाणे शरीराचे अनुसंधान सोडतो, त्याचप्रमाणे ज्यांची प्राप्ती झाल्यावर मायेतून मुक्त होतो, अशा चिन्मात्र स्वरूपाने मायेचा निरास केलेल्या, संसारभय दूर करणाऱ्या श्रीहरींचे निरंतर चिंतन करीत राहावे. (४७-५०)

अध्याय सत्त्याऐंशीवा समाप्त

अध्याय अठ्ठ्याऐंशीवा

शिवांचे संकटमोचन

राजाने म्हटले- सर्व भोगांचा त्याग केलेल्या शंकरांना जे देव, असुर किंवा मनुष्य भजतात, ते बहुतेक धनसंपन्न होतात, पण लक्ष्मीपती विष्णूंची उपासना करणारे मात्र साधारणत: तसे नसतात. दोन्ही प्रभू एकमेकांच्या विरुद्ध स्वभावाचे आहेत. परंतु त्यांच्या उपासकांना त्यांच्या स्वरूपाच्या विपरीत असे फळ मिळते. याविषयी माझ्या मनात मोठा संदेह आहे. मी आपल्याकडून याचे कारण जाणून घेऊ इच्छितो. (१-२)

श्रीशुक म्हणतात- शिव नेहमी आपल्या शक्तीने युक्त असतात. ते सत्त्वादी गुणांनी युक्त असून अहंकाराचे अधिष्ठाते आहेत. वैकारिक, तैजस आणि तामस असे अहंकाराचे तीन भेद आहेत. या त्रिविध अहंकारापासून दहा इंद्रिये, पंचमहाभूते आणि एक मन असे सोळा पदार्थ उत्पन्न झाले. म्हणून या सर्वांच्या अधिष्ठात्या देवतांपैकी कोणाचीही उपासना केल्यावर त्या देवतेनुरूप ऐश्वर्याची प्राप्ती होते. परंतु श्रीहरी प्रकृतीपलीकडील स्वत: पुरुषोत्तम असून प्राकृत गुणरहित आहेत. ते सर्वज्ञ व सर्वांच्या अंत:करणाचे साक्षी आहेत. जो त्यांचे भजन करतो, तो स्वत:सुद्धा गुणातीत होतो. तुझे आजोबा धर्मराज युधिष्ठिर यांनी, अश्वमेध यज्ञ पूर्ण झाल्यावर, भगवंतांकडून विविध प्रकारच्या धर्मांचे वर्णन ऐकतेवेळी हाच प्रश्न विचारला होता. जे मनुष्यमात्रांच्या कल्याणासाठी यदुवंशामध्ये अवतरले होते, त्या भगवंतांनी युधिष्ठिरांची ऐकण्याची इच्छा पाहून संतुष्ट होऊन असे उत्तर दिले होते. (३-७)

भगवान श्रीकृष्ण म्हणाले- ज्याच्यावर मी

* जनक राजाच्या यज्ञाच्या वेळी अग्निमंथन करताना योगायोगाने अरणीत पडलेल्या वीर्याचे व्यासांनी मंथन केले. त्यापासून शुकांना व्यासांना साक्षात पिता म्हटले आहे.

कृपा करतो, त्याचे सर्व धन मी हळू हळू काढून घेतो. तो जेव्हा निर्धन होतो, तेव्हा त्याचे बांधव दु:खाकुल झालेल्या त्याला सोडून जातात. मग तो धन मिळविण्यासाठी उद्योग करू लागतो, तेव्हा मी त्याचे ते प्रयत्नसुद्धा निष्फळ करतो. त्यामुळे तो कंटाळून माझ्या भक्तांशी मैत्री करतो, तेव्हा मी त्याच्यावर कृपा करतो. माझ्या कृपेने त्याला परम सूक्ष्म, अनंत, सच्चिदानंदस्वरूप अशा परब्रह्माची प्राप्ती होते. अशा प्रकारे माझी आराधना करणे अत्यंत कठीण आहे, हे जाणून लोक मला सोडून इतर देवतांची आराधना करतात. नंतर ते लवकर प्रसन्न होणाऱ्या देवतांकडून राज्य, वैभव इत्यादी मिळवून उन्मत्त होतात आणि आपल्याला वर देणाऱ्या देवतेलाही विसरतात. उलट त्यांची अवहेलना करतात. (८-११)

श्रीशुक म्हणतात- परीक्षिता ! ब्रह्मदेव, विष्णू, महादेव इत्यादी देव शाप आणि वर देण्यास समर्थ आहेत; परंतु यांपैकी महादेव आणि ब्रह्मदेव लवकर वर किंवा शाप देतात. परंतु श्रीविष्णू तसे नाहीत. याविषयी हा एक प्राचीन इतिहास सांगतात. एकदा वृकासुराला वर देऊन भगवान शंकर संकटात सापडले होते. वृकासुर हा शकुनीचा पुत्र होता. तो दुष्ट होता. एके दिवशी वाटेत त्याने नारदांना पाहून विचारले, ''तिन्ही देवांपैकी लवकर प्रसन्न होणारे कोण ?'' नारद म्हणाले - ''तू भगवान शंकरांची आराधना कर. त्यामुळे तुझी इच्छा लवकर पूर्ण होईल. ते थोड्याशा गुणांनी चटकन प्रसन्न होतात आणि थोड्याशा अपराधाने चटकन रागावतात. रावणाने आणि बाणासुराने भाटांप्रमाणे त्यांची थोडीशी स्तुती केली, तेव्हा ते त्यांच्यावर प्रसन्न झाले आणि त्यांनी त्यांना अतुलनीय ऐश्वर्य दिले. नंतर रावणाने कैलास उचलल्यामुळे आणि बाणासुराच्या नगररक्षणाचा भार घ्यावा लागल्याने ते संकटात सापडले होते.'' (१२-१६)

हे ऐकून वृकासुर केदारक्षेत्री गेला आणि अग्नीला भगवान शंकरांचे मुख समजून आपल्या शरीराचे मांस तोडून अग्नीमध्ये हवन करून त्यांची आराधना करू लागला. अशा प्रकारे सहा दिवस उपासना करूनसुद्धा शंकरांचे दर्शन झाले नाही, तेव्हा त्याला अतिशय दु:ख झाले. सातव्या दिवशी केदारतीर्थात स्नान करून त्याने आपले केस ओले झालेले मस्तक कुऱ्हाडीने तोडून त्याचे हवन करावे, असे ठरविले. जगामध्ये जसा एखादा दु:खाने आत्महत्या करू लागला, तर आपण त्याला वाचवितो, त्याप्रमाणे परम दयाळू भगवान शंकरांनी अग्निदेवाप्रमाणे अग्निकुंडातून प्रगट होऊन आपल्या दोन्ही हातांनी त्याचे दोन्ही हात पकडले आणि त्याला अडविले. त्यांचा स्पर्श होताच वृकासुराचे शरीर जसेच्या तसे परिपूर्ण झाले. भगवान शंकर वृकासुराला म्हणाले- ''वत्सा ! थांब. थांब. मी तुला पाहिजे तो वर देतो. माग. मला फक्त पाणी अर्पण केल्यानेही मी माझ्या शरणागत भक्तांवर संतुष्ट होतो. अरे ! तू विनाकारण शरीराला का कष्ट देतोस ?'' अत्यंत पापी अशा त्याने सर्व प्राण्यांना भयभीत करणारा असा वर मागितला की, ''मी ज्याच्या डोक्यावर हात ठेवीन, तो मरून जावा.'' परीक्षिता ! त्याची ही विनंती ऐकून भगवान रुद्र सुरुवातीला थोडेसे नाराज झाले, पण नंतर हसून म्हणाले, ''ठीक आहे.'' असे म्हणून या वराने त्यांनी जणू सापाला अमृत पाजले. (१७-२२)

भगवान शंकर असे म्हणाल्यावर वृकासुराच्या मनात पार्वतीदेवींचे हरण करण्याची इच्छा उत्पन्न झाली आणि त्या वराची परीक्षा घेण्यासाठी तो असुर त्यांच्याच मस्तकावर हात ठेवण्याचा प्रयत्न करू लागला. तेव्हा आपण दिलेल्या वराने शंकर भयभीत झाले. तो त्यांचा पाठलाग करू लागला आणि ते त्याला भिऊन कापत कापत पळू लागले. ते पृथ्वी, स्वर्ग आणि दिशांच्या शेवटापर्यंत पळाले

गेले. तरीसुद्धा तो पाठलाग करीत असल्याचे पाहून ते उत्तरेकडे गेले. मोठमोठे देव हे संकट टाळण्याचा काही उपाय न सुचल्याने स्तब्ध राहिले. शेवटी ते अंधाराच्या पलीकडे असलेल्या प्रकाशमय अशा वैकुंठलोकी गेले. जगताला अभय देऊन स्वत: शांत असणाऱ्या संन्याशांचे एकमेव आश्रयस्थान असलेले नारायण जेथे निवास करतात व जेथे गेल्यावर जीवाला परत पृथ्वीतलावर यावे लागत नाही, त्या वैकुंठात श्रीशंकर गेले. भक्तांचे भय नाहीसे करणाऱ्या भगवंतांनी पाहिले की, शंकर मोठ्या संकटात सापडले आहेत. तेव्हा ते आपल्या योगमायेने ब्रह्मचाऱ्याचे रूप घेऊन दुरूनच वृकासुराकडे येऊ लागले. त्यांच्या कमरेला मुंज गवताची दोरी, हरिणाजिन, एका हातात दंड आणि दुसऱ्या हातात रुद्राक्षांची माळ होती. त्यांचे तेज धगधगत्या आगीसारखे होते. त्यांनी हातात कुश घेतले होते. वृकासुराला त्यांनी नम्रतेचा बहाणा करून नमस्कार केला. (२३-२८)

श्रीभगवान म्हणाले- शकुनिनंदना ! तू अत्यंत थकलेला आहेस, हे स्पष्टच दिसत आहे. तू फार लांबून आलास काय ? थोडीशी विश्रांती तर घे ! पहा. हे शरीरच सर्व सुखे उपभोगण्याचे साधन आहे.

हे समर्थ गृहस्था ! यावेळी तू काय करू इच्छितोस ? मला सांगण्यासारखे असेल तर सांग. कारण या जगामध्ये असे दिसते की, लोक सहायकांच्या द्वारा आपली कामे करून घेतात. (२९-३०)

श्रीशुक म्हणतात - भगवंतांनी अमृतमधुर वाणीने असे विचारल्यावर थकवा दूर झालेल्या त्याने आपली तपश्चर्या, वरप्राप्ती व शंकरांचा पाठलाग, हे सर्व पहिल्यापासून सांगितले. (३१)

श्रीभगवान म्हणाले - "असे असले तरी आम्ही त्याच्या म्हणण्यावर विश्वास ठेवीत नाही. कारण दक्ष प्रजापतीच्या शापाने तो पिशाच झाला आहे आणि स्वत: तो प्रेतपिशाच्चांचा राजा आहे. हे दानवराज ! जर तू त्या जगद्गुरूवर विश्वास ठेवीत असशील, तर लगेच स्वत:च्या डोक्यावर हात ठेवून परीक्षा कर. हे दानवश्रेष्ठा ! शंकराचे म्हणणे जर कोणत्याही प्रकारे खोटे ठरले, तर त्या खोटे बोलणाऱ्याला मारून टाक. ज्यामुळे तो पुन्हा कधीही खोटे बोलणार नाही." भगवंतांच्या अशा अतिशय गोड वाणीमुळे त्याची विवेकबुद्धी नाहीशी झाली. आणि त्या मूर्खाने वर विसरून स्वत:च्याच डोक्यावर हात ठेवला. त्याच क्षणी त्याचे डोके फुटले आणि तो डोक्यावर वज्र पडल्यासारखा जमिनीवर कोसळला. त्यावेळी आकाशात देव जयजयकार, नमस्कार आणि वाहवा ! वाहवा ! असा घोष करू लागले. पापी वृकासुर मेल्याबरोबर देवता, ऋषी, पितर आणि गंधर्व भगवंतांवर पुष्पवर्षाव करू लागले. अशा रीतीने शंकर त्या संकटातून मुक्त झाले. भगवान पुरुषोत्तम भयमुक्त झालेल्या भगवान शंकरांना म्हणाले की, "देवाधिदेवा ! या दुष्टाला त्याच्या पापांनीच नष्ट केले. हे परमेश्वरा ! महापुरुषांचा अपराध करणारा कोणता दळभद्री प्राणी सुखात राहील ? आपण तर स्वत: जगद्गुरू विश्वेश्वर आहात ! मग आपल्या बाबतीत काय सांगावे ! (३२-३९)

अनंत शक्तींचे समुद्रच अशा साक्षात परमात्मा श्रीहरींची शंकरांना संकटातून सोडविण्याची ही लीला जो कोणी दुसऱ्यांना सांगतो किंवा स्वत: ऐकतो, तो संसारबंधनातून व शत्रुभयापासून मुक्त होतो. (४०)

अध्याय अठ्ठ्याऐंशीवा समाप्त

अध्याय एकोणनव्वदावा

भृगूकडून तीन देवांची परीक्षा व मेलेल्या ब्राह्मणबालकांना भगवंतांनी परत आणणे

श्रीशुक म्हणतात - परीक्षिता ! एकदा सरस्वती नदीच्या तीरावर यज्ञासाठी ऋषी एकत्र आले होते. ब्रह्मदेव, शंकर आणि विष्णू यांमध्ये सर्वश्रेष्ठ कोण, याविषयी त्यांच्यामध्ये तर्क-वितर्क चालू होते. परीक्षिता ! हे समजून घेण्यासाठी त्यांनी ब्रह्मदेवाचा पुत्र भृगू याला पाठविले. तो सर्वप्रथम ब्रह्मदेवांच्या सभेत गेला. ब्रह्मदेवांची सत्त्वपरीक्षा घेण्यासाठी त्याने त्यांना नमस्कार केला नाही की, त्यांची स्तुती केली नाही. तेव्हा आपल्या तेजाने तळपणाऱ्या ब्रह्मदेवांना त्याचा राग आला. परंतु समर्थ ब्रह्मदेवांनी तो आपलाच पुत्र आहे, असे पाहून आलेला क्रोध विवेकबुद्धीने आतल्या आत शांत केला. जसा अग्नी स्वत:च्या पुत्ररूपी पाण्याने शांत होतो. (१-४)

तेथून भृगू कैलासावर गेला. भगवान शंकरांनी आपला भाऊ भृगू आलेला पाहून आनंदाने ते उठून उभे राहिले आणि त्याला आलिंगन देण्यासाठी पुढे झाले. परंतु भृगूने "तू मर्यादा सोडून वागणारा आहेस," असे म्हणून त्याच्या आलिंगनाचा स्वीकार केला नाही. ते ऐकून शंकरांचे डोळे क्रोधाने लाल झाले. आपला त्रिशूळ उचलून ते भृगूला मारायला सरसावले. परंतु त्याचवेळी देवी सतीने त्यांच्या चरणांवर लोटांगण घालून गोड बोलून त्यांचे सांत्वन केले. नंतर भृगू श्रीविष्णूंचे निवासस्थान असलेल्या वैकुंठलोकात गेले. त्यावेळी भगवान विष्णू लक्ष्मीदेवींच्या मांडीवर आपले डोके ठेवून पहुडले होते. भृगूंनी तेथे जाऊन त्यांच्या वक्ष:स्थळावर एक लाथ मारली. भक्तवत्सल भगवान विष्णू लक्ष्मीसह उठून पलंगावरून खाली उतरले आणि त्यांनी मुनींना नमस्कार केला. नंतर म्हणाले- "ब्रह्मन ! आपले स्वागत असो. या आसनावर बसून थोडा वेळ विश्रांती घ्या. महर्षी ! आपण आल्याचे मला माहीत नव्हते. म्हणून मी आपले स्वागत करू शकलो नाही. माझ्या या अपराधाची आपण क्षमा करावी. हे महामुने ! आपले चरण अत्यंत कोमल आहेत." असे म्हणून भगवान, भृगूंचे चरण आपल्या हाताने चेपू लागले. आणि म्हणाले, "महर्षे ! तीर्थांनाही पवित्र करणाऱ्या आपल्या चरणतीर्थाने वैकुंठलोक, मी आणि माझ्या आत राहाणाऱ्या लोकपालांना पवित्र करावे. मुनिवर्य ! आज मी लक्ष्मीचे एकमेव आश्रयस्थान झालो. आपल्या चरणांच्या स्पर्शाने पापे नष्ट झालेल्या माझ्या वक्ष:स्थळावर लक्ष्मी नेहमी निवास करील." (५-१२)

श्रीशुक म्हणतात- अत्यंत भावपूर्ण वाणीने जेव्हा भगवान असे म्हणाले, तेव्हा भृगू अतिशय आनंदित आणि तृप्त झाला. भक्तीच्या उद्रेकाने त्याचा कंठ दाटून आला, डोळ्यांत अश्रू तरारले आणि तो स्तब्ध झाला. परीक्षिता ! तेथून परत फिरून भृगू ब्रह्मवेत्त्या मुनींच्याकडे आला आणि त्याला तिन्ही ठिकाणी जो काही अनुभव आला, तो त्याने विस्तृतपणे सांगितला. ते ऐकून सर्व मुनींना अतिशय आश्चर्य वाटले व त्यांची शंकाही दूर झाली. तेव्हापासून ते भगवान विष्णूंनाच सर्वश्रेष्ठ मानू लागले. कारण तेच शांती आणि अभयाचे उगमस्थान असून, त्यांच्यापासूनच साक्षात धर्म, ज्ञान, वैराग्य, आठ प्रकारची ऐश्वर्ये आणि चित्त शुद्ध करणारे यश प्राप्त होते, असा त्यांनी निश्चय केला. शांत, समचित्त, नि:स्पृह आणि सर्वांना अभय देणाऱ्या साधूंचे व मुनींचे तेच एकमेव परम प्राप्तव्य आहेत, असे सगळी शास्त्रे सांगतात. (१३-१७)

सत्त्वगुण ही त्यांची प्रिय मूर्ती आहे आणि ब्राह्मण इष्टदेव आहेत. निष्काम, शांत आणि विवेकसंपन्न लोकच त्यांचे भजन करतात.

भगवंतांच्या गुणमय मायेने राक्षस, असुर आणि देवता असे त्यांचे तीन प्रकार निर्माण केले आहेत. त्यांपैकी सत्त्वमय देवमूर्तीच त्यांच्या प्राप्तीचे साधन आहे. (१८-१९)

श्रीशुक म्हणतात- सरस्वती नदीच्या तटावरील ऋषींनी लोकांचा संशय दूर करण्यासाठी ही युक्ती योजिली होती. पुरुषोत्तमांच्या चरणकमलांची सेवा करून त्यांनी त्यांचे परमपद प्राप्त करून घेतले. (२०)

सूत म्हणतात- पुरुषोत्तमांची ही कमनीय कीर्तिकथा जन्म-मृत्युरूप संसाराचे भय नाहीसे करणारी आहे. श्रीशुकदेवांच्या मुखारविंदाचा सुगंध असलेले हे अमृत आहे. जन्म-मरणाचा दीर्घ प्रवास करणारा जो वाटसरू आपल्या कानांच्या द्रोणांनी हिचे निरंतर पान करतो, त्याचा सारा थकवा हिच्यामुळे नाहीसा होतो. (२१)

श्रीशुक म्हणतात- परीक्षिता ! एकदा द्वारकेत एका ब्राह्मणस्त्रीने एका पुत्राला जन्म दिला, परंतु जमिनीवर ठेवताच तो मरण पावला. आपल्या मृत बालकाचे प्रेत घेऊन ब्राह्मण राजवाड्याच्या दाराशी आला आणि त्याला तेथे ठेवून दुःखी अंतःकरणाने शोक करीत असे म्हणू लागला. ''ब्राह्मणद्रोही, धूर्त, लोभी आणि विषयी राजाच्या कर्मदोषानेच माझ्या बालकाचा मृत्यू झाला आहे. जो राजा हिंसा करण्यात आनंद मानणारा, दुष्ट आणि इंद्रिये न जिंकलेला असा असतो, त्याला राजा मानून त्याची सेवा करणारी प्रजा दारिद्र्यात पडून दुःखच-दुःख भोगते.'' परीक्षिता ! अशा प्रकारे आपले दुसरे आणि तिसरे अपत्यसुद्धा जन्मतःच मरण पावल्यानंतर तो ब्राह्मण त्या पुत्रांची प्रेते राजवाड्याच्या दरवाजासमोर टाकून तेच म्हणून गेला. नववे मूल मरण पावल्यावर जेव्हा त्या ब्राह्मणाने ते प्रेत तेथे टाकून पूर्वीप्रमाणेच म्हटले, त्यावेळी श्रीकृष्णांच्या शेजारी बसलेल्या अर्जुनाने ते ऐकून ब्राह्मणाला म्हटले. ''हे ब्राह्मणा ! आपण राहात असलेल्या द्वारकेमध्ये कोणी धनुर्धारी नाममात्र क्षत्रियही नाही काय ? हे यादव म्हणजे यज्ञ करण्यासाठी बसलेले ब्राह्मण असावेत ! ज्या राज्यामध्ये धन, स्त्री किंवा पुत्राचा वियोग झाल्यामुळे ब्राह्मण दुःखी होतात, ते राजे क्षत्रियांचा वेष धारण केलेले, पोटभरू नटच होत. हे ब्राह्मणा ! पुत्रांच्या मृत्यूमुळे दुःखी असलेल्या तुमच्या संतानाचे मी रक्षण करीन. जर मी माझी प्रतिज्ञा पूर्ण करू शकलो नाही, तर अग्निप्रवेश करून प्रायश्चित्त घेईन.'' (२२-३०)

ब्राह्मण म्हणाला- येथे बलराम, श्रीकृष्ण, श्रेष्ठ धनुर्धर प्रद्युम्न, अद्वितीय योद्धा अनिरुद्धसुद्धा जेथे माझ्या बालकांचे रक्षण करू शकले नाहीत, या जगदीश्वरांनासुद्धा जे काम करणे अवघड झाले, ते तुम्ही कसे काय करू इच्छिता ? हा तुमचा मला पोरकटपणा वाटतो. आमचा या म्हणण्यावर विश्वास नाही. (३१-३२)

अर्जुन म्हणाला- ब्रह्मन ! मी बलराम, श्रीकृष्ण किंवा प्रद्युम्न नाही. ज्याचे गांडीव नावाचे धनुष्य आहे, तो मी अर्जुन आहे. हे ब्राह्मणा ! माझ्या पराक्रमाला नावे ठेवू नकोस. मी माझ्या पराक्रमाने भगवान शंकरांना संतुष्ट केले आहे. युद्धामध्ये मी मृत्यूला जिंकून तुझे मूल आणून देईन. (३३-३४)

परीक्षिता ! त्या ब्राह्मणाला अर्जुनाने जेव्हा असे आश्वासन दिले, तेव्हा तो लोकांना त्याच्या पराक्रमाचे वर्णन ऐकवीत प्रसन्न मनाने घरी गेला. पत्नीच्या प्रसूतीची वेळ जवळ आल्यावर ब्राह्मण व्याकूळ होऊन अर्जुनाकडे येऊन म्हणू लागला, ''वाचवा. माझ्या मुलाला मृत्यूपासून वाचवा.'' हे ऐकून अर्जुनाने पवित्र पाण्याने आचमन केले, शंकरांना नमस्कार केला, दिव्य अस्त्रांचे स्मरण केले आणि गांडीव धनुष्य सज्ज करून हातात घेतले. (३५-३७)

बाणांना अनेक प्रकारच्या अस्त्रमंत्रांनी अभिमंत्रित करून अर्जुनाने प्रसूतिगृहाच्या सर्व बाजूंनी त्या बाणांचा एक पिंजरा तयार केला. यानंतर ब्राह्मणस्त्रीने एका पुत्राला जन्म दिला, जो सारखा

रडत होता. परंतु पाहाता पाहाताच तो आपल्या शरीरासह आकाशात दिसेनासा झाला. तेव्हा तो ब्राह्मण श्रीकृष्णांच्या देखतच अर्जुनाची निंदा करू लागला. तो म्हणाला- ''माझा मूर्खपणा तर पहा ! मी या नपुंसकाच्या फुशारकीच्या शब्दांवर विश्वास ठेवला. ज्याला प्रद्युम्न, अनिरुद्ध एवढेच काय, पण बलराम आणि श्रीकृष्णसुद्धा वाचवू शकले नाहीत, त्याचे रक्षण करण्यास दुसरा कोण समर्थ असू शकेल बरे ? खोटारड्या अर्जुनाचा धि:कार असो ! आपल्याच तोंडाने बढाई मारणाऱ्या अर्जुनाच्या धनुष्याचा धि:कार असो ! जो मंदबुद्धी, प्रारब्धाने आमच्यापासून हिरावून घेतलेल्या बालकाला मूर्खपणाने परत आणू पाहातो.'' (३८-४२)

जेव्हा तो ब्राह्मण असे शिव्याशाप देऊ लागला, तेव्हा अर्जुन ताबडतोब योगबळाने यमराजांचे निवासस्थान असलेल्या संयमनीपुरीला गेला. तेथे त्याला ब्राह्मणबालक मिळाला नाही, मग तो धनुष्य घेऊन इंद्र, अग्नी, निर्ऋती, सोम, वायू आणि वरुण यांच्या नगरांत, रसातळ व स्वर्गाच्या वर असणाऱ्या लोकांत तसेच इतरही पुष्कळ ठिकाणी गेला. परंतु त्याला ब्राह्मणबालक मिळाला नाही. त्याची प्रतिज्ञा पूर्ण होऊ शकली नाही. तेव्हा त्याने अग्नीमध्ये प्रवेश करण्याचा विचार केला. परंतु श्रीकृष्णांनी त्याला अडवून म्हटले. अर्जुना ! तू असा स्वत:च स्वत:चा तिरस्कार करू नकोस. ब्राह्मणाची सर्व मुले मी तुला आता दाखवितो. जे लोक आज आपली निंदा करीत आहेत, तेच नंतर आपली निर्मळ कीर्ती प्रस्थापित करतील. (४३-४६)

सर्वशक्तिमान भगवान श्रीकृष्णांनी अशा प्रकारे समजूत घालून ते अर्जुनासह आपल्या दिव्य रथात बसून पश्चिम दिशेकडे निघाले. त्यांनी सात सात पर्वत असणारी सात द्वीपे, सात समुद्र आणि लोकालोक पर्वत ओलांडून घोर अंधकारात प्रवेश केला. (४७-४८)

परीक्षिता ! त्या अंधकारामध्ये शैब्य, सुग्रीव, मेघपुष्प आणि बलाहक नावाचे चारही घोडे रस्ता न दिसल्यामुळे इकडे तिकडे भटकू लागले. योगेश्वरांचेसुद्धा परमेश्वर भगवान श्रीकृष्णांनी घोड्यांची ही अवस्था पाहून आपल्या हजारो सूर्याप्रमाणे तेजस्वी अशा सुदर्शन चक्राला पुढे पाठविले. आपल्या तेजाने सुदर्शन चक्र भगवंतांनीच निर्माण केलेल्या घनदाट भयंकर अंधकाराला कापीत, मनासारख्या तीव्र वेगाने, पुढे पुढे चालू लागले. श्रीरामांच्या धनुष्यापासून सुटलेल्या बाणाने राक्षसांच्या सेनेत प्रवेश करावा तसे. अशा प्रकारे सुदर्शन चक्राने दाखविलेल्या मार्गावरून तो रथ अंधकाराच्या पलीकडे असलेल्या सर्वश्रेष्ठ पारावार नसलेल्या, व्यापक अशा प्रकाशसागरात पोहोचला. ते तेज पाहून अर्जुनाचे डोळे दिपून गेले आणि त्याने आपले डोळे मिटून घेतले. यानंतर त्या रथाने दिव्य अशा महासागरात प्रवेश केला. झंझावाताने उसळणाऱ्या मोठमोठ्या लाटांनी तो शोभत होता. तेथे एक आश्चर्यकारक अत्यंत तेजस्वी भवन होते. चमकणाऱ्या रत्नांच्या हजारो खांबांनी ते शोभत होते. त्याच भवनामध्ये भगवान शेष विराजमान झाले होते. त्यांचे शरीर अत्यंत भयानक तसेच अद्‌भुत होते. त्यांना एक हजार फणा होत्या. आणि त्या तेजस्वी रत्नांनी चमकत होत्या. प्रत्येक फणेला भयानक दोन दोन डोळे होते. त्यांचे शरीर कैलासपर्वताप्रमाणे शुभ्र होते आणि गळे व जिभा निळ्या रंगाच्या होत्या. त्या शेषाच्या सुखमय शय्येवर सर्वव्यापक महान प्रभावशाली परम पुरुषोत्तम भगवान विराजमान झाल्याचे अर्जुनाने पाहिले. त्यांचे शरीर पावसाळ्यातील मेघाप्रमाणे श्यामल वर्णाचे होते. अत्यंत सुंदर असा पीतांबर त्यांनी धारण केला होता. सुंदर आकर्ण नेत्र असलेले त्यांचे मुख प्रसन्न होते. बहुमोल रत्नजडित मुकुट आणि रत्नजडित कुंडले यांच्या तेजाने हजारो कुरळे केस चमकत होते. त्यांना लांब असे सुंदर आठ हात होते, गळ्यात कौस्तुभमणी होता. वक्ष:स्थळावर श्रीवत्सचिह्न आणि गळ्यात वनमाला होती. तेथे

नंद-सुनंद इत्यादी त्यांचे पार्षद, सुदर्शन चक्र इत्यादी मूर्तिमंत आयुधे, पुष्टी, श्री, कीर्ती आणि माया या चार शक्ती, तसेच सर्व ऋद्धी, ब्रह्मदेव इत्यादी लोकपालांचे अधीश्वर अशा भगवंतांची सेवा करीत असल्याचे अर्जुनाने पाहिले. आपलेच स्वरूप असलेल्या भगवान अनंतांना श्रीकृष्णांनी नमस्कार केला. त्यांच्या दर्शनाने भयभीत झालेल्या अर्जुनानेही त्यांना नमस्कार केला आणि दोन्ही हात जोडून ते उभे राहिले. तेव्हा ब्रह्मदेव इत्यादी लोकपालांचे स्वामी असलेल्या त्या पुरुषोत्तमाने स्मित हास्य करीत गंभीर वाणीने त्यांना म्हटले. ''तुम्हा दोघांना पाहाण्यासाठी मी ब्राह्मणाची मुले माझ्याकडे आणली. धर्माचे रक्षण करण्यासाठी तुम्ही दोघांनी माझ्या कलांसह पृथ्वीवर अवतार घेतला आहे. पृथ्वीला भारभूत झालेल्या दैत्यांचा संहार करून लवकरच तुम्ही माझ्याकडे परत या. तुम्ही दोघे नर आणि नारायण ऋषी आहात. तुम्ही पूर्णकाम आणि सर्वश्रेष्ठ आहात. तरीसुद्धा जगाच्या कल्याणासाठी लोकांना शिक्षण देणाऱ्या धर्माचे आचरण करा.''

(४९-६०)

भगवान अनंतांनी जेव्हा त्या दोघांना अशी आज्ञा केली, तेव्हा त्यांनी तिचा स्वीकार केला, त्यांना नमस्कार केला आणि अतिशय आनंदित होऊन, ब्राह्मणबालकांना घेऊन ते जसे आले होते, तसे द्वारकेला परतले. त्या मुलांची जी वये व जशी रूपे होती, तसेच त्यांना त्या ब्राह्मणाकडे सोपविले. भगवान विष्णूंचे ते परमधाम पाहून अर्जुनाच्या आश्चर्याला सीमा राहिली नाही. जीवांमध्ये जे काही बळ आहे, ते श्रीकृष्णांच्याच कृपेचे फळ आहे, हा त्याला अनुभव आला. भगवंतांनी अशा अनेक पराक्रमी लीला केल्या. सामान्य लोकांप्रमाणे संसारातील विषयांचा भोग घेतल्यासारखे दाखविले आणि श्रेष्ठतम असे यज्ञही केले. जसा इंद्र प्रजेसाठी वेळेवर पाऊस पाडतो, त्याप्रमाणे भगवान श्रीकृष्णांनी आदर्श महापुरुषांसारखे आचरण करीत ब्राह्मणादी सर्व प्रजेचे सगळे मनोरथ पूर्ण केले. त्यांनी काही अधर्मी राजांना स्वत: मारून इतर कित्येकांना अर्जुन इत्यादींकडून मारविले. अशा प्रकारे धर्मराज इत्यादींकडून त्यांनी अनायासे धर्माची स्थापना केली.

(६१-६६)

अध्याय एकोणनव्वदावा समाप्त

अध्याय नव्वदावा

भगवान कृष्णांच्या लीला-विहाराचे वर्णन

श्रीशुक म्हणतात - परीक्षिता ! द्वारकेची शोभा अलौकिक (अशीच) होती. तेथील सडका मदरसाचा स्राव करणारे मदोन्मत्त हत्ती, उत्तम पोषाख घातलेले योद्धे, घोडे आणि सुवर्णांचे रथ यांच्या गर्दीने नेहमी फुललेल्या असत. जिकडे पहावे तिकडे हिरवीगार उपवने आणि उद्याने होती. तेथे फुलांनी लहडलेल्या झाडांच्या राई होत्या. त्यांच्यावर बसून भ्रमर गुणगुणत होते आणि पक्षी किलबिल करीत होते. सर्व प्रकारच्या संपत्तींनी ती नगरी परिपूर्ण होती. जगातील श्रेष्ठ वीर यादव तेथे राहात होते. नवतारुण्याची झळाळी असलेल्या तेथील स्त्रिया सुंदर वेषभूषा करून नटलेल्या असत. विजेसारखी कांती असणाऱ्या त्या आपापल्या महालात चेंडू इत्यादी खेळ खेळत. लक्ष्मीपती भगवंत अशा या आपल्या द्वारकेत निवास करीत असत. सोळा हजार पत्न्यांचे एकटेच प्राणवल्लभ भगवान श्रीकृष्ण ऐश्वर्याने संपन्न अशा त्यांच्या प्रासादांत तितकीच सुंदर रूपे धारण करून त्यांच्याबरोबर विहार करीत असत. सर्व पत्न्यांच्या वाड्यांच्या परिसरांत सुंदर-सुंदर अशी सरोवरे होती. त्यांतील निर्मळ पाणी, उमललेल्या निळ्या, पिवळ्या, शुभ्र, लाल अशा निरनिराळ्या कमळांच्या परागांनी सुगंधित होत असे.

त्यांमध्ये पक्ष्यांचा किलबिलाट चालू असे. त्या जलाशयांमध्ये प्रवेश करून श्रीकृष्ण पत्नींसह जलविहार करीत असत. त्यांच्याबरोबर विहार करणाऱ्या पत्न्यांच्या अंगाच्या केशराची उटी आलिंगनाच्या वेळी भगवंतांच्या अंगाला लागत असे. त्यावेळी गंधर्व गायन करीत आणि सूत, मागध तसेच भाट अतिशय आनंदाने मृदंग, ढोल, नगारे आणि वीणा वाजवीत. (१-८)

भगवंतांच्या पत्न्या हसत हसत पिचकाऱ्यांनी पाणी उडवून त्यांना भिजवून टाकीत. तेसुद्धा पुन्हा त्यांच्यावर पाणी उडवीत. यक्षराजाने यक्षिणींसह विहार करावा, त्याप्रमाणे भगवान आपल्या पत्न्यांबरोबर क्रीडा करीत. त्यावेळी त्यांची वक्षःस्थळे आणि मांड्या ओल्या वस्त्रांमुळे दिसू लागत. पाणी उडवताना त्यांच्या अंबाड्यातील फुले खाली पडू लागत. त्या पिचकारी काढून घेण्याचा बहाणा करून प्रियतमाजवळ जात आणि त्या बहाण्याने त्यांना आलिंगन देत. त्यांच्या स्पर्शाने पत्न्यांच्या हृदयामध्ये प्रेमभाव उचंबळून येत असे. त्यामुळे त्यांची मुखकमले प्रफुल्लित होऊन त्यांचे सौंदर्य आणखीच खुलून दिसे. त्यावेळी श्रीकृष्णांची वनमाला त्या राण्यांच्या वक्षःस्थळावर लागलेल्या केशराच्या रंगाने रंगून जाई. जलक्रीडेमध्ये मग्न झाल्यामुळे त्यांचे कुरळे केस भुरभुर उडत असत. ते आपल्या राण्यांना वारंवार भिजवीत आणि त्यासुद्धा त्यांना ओलेचिंब करीत. जशी हत्तिणींनी घेरलेल्या गजराजाने क्रीडा करावी, त्याप्रमाणे श्रीकृष्ण त्यांच्याबरोबर विहार करीत. श्रीकृष्ण आणि त्यांच्या पत्न्या जलक्रीडा केल्यानंतर आपापली वस्त्रे व अलंकार उतरवून गाणे, बजावणे या व्यवसायावरच ज्यांची उपजीविका आहे, अशा नट-नर्तकींना ती देऊन टाकीत. अशा प्रकारे भगवान त्यांच्याबरोबर विहार करीत. त्यावेळचे त्यांचे मोहक चालणे, वार्तालाप करणे, त्यांचे पाहाणे, स्मित हास्य, हसणे-खिदळणे आणि आलिंगन देणे इत्यादींमुळे त्यांना आणखी कशाचेच भान राहात नसे. काही वेळा श्यामसुंदरांच्या चिंतनात त्या इतक्या मग्न होऊन जात की, त्या पुष्कळ वेळपर्यंत स्तब्ध राहात आणि पुन्हा त्यांचेच चिंतन करीत वेड्याप्रमाणे असंबद्ध बडबड करीत. मी त्यांचे बोलणेच तुला ऐकवतो. (९-१४)

राण्या म्हणत- अग टिटवे ! रात्रीच्या यावेळी आपले अखंड ज्ञान झाकून ठेवून स्वतः भगवानही झोपी गेले आहेत आणि तू मात्र झोपत नाहीस का ? झोप उडालेली तू अशीच रात्रभर जागून आक्रोश का करीत आहेस ? गडे ! कमलनयन भगवंतांचे मधुर हास्य आणि लीलायुक्त उदार नजरेने तुझ्या हृदयालासुद्धा आमच्याप्रमाणे घरे पडली नाहीत ना ? (१५)

अग चक्रवाकी ! तू रात्रीच्या वेळी प्रियकर दिसत नसल्यामुळे आपले डोळे बंद करून अशा प्रकारे करुण स्वराने त्याला बोलावीत आहेस का ? आमच्याप्रमाणेच भगवंतांची दासी होऊन त्यांच्या चरणांवर वाहिलेली पुष्पमाळ तू आपल्या वेणीत घालू इच्छितेस काय ? (१६)

अरे समुद्रा ! तू तर नेहमी गर्जनाच करीत असतोस. तुला झोप येत नाही का ? तुला सदैव जागे राहाण्याचाच रोग जडला आहे. आमच्या प्रिय श्यामसुंदराने तुझे धैर्य, गांभीर्य इत्यादी स्वाभाविक गुण हिरावून घेतले आहेत. म्हणूनच तुझी अशी कठीण अवस्था झाली आहे काय ? (१७)

हे चंद्रा ! असाध्य असा क्षयरोग तुला झाला आहे. म्हणूनच तू इतका क्षीण झाला आहेस. त्यामुळे तू आपल्या किरणांनी अंधार नाहीसा करू शकत नाहीस. आमच्या प्रिय श्यामसुंदराच्या गोड गोड गोष्टी विसरल्यामुळे आमचे जसे बोलणे कमी झाले, तसेच तुझे किरण कमी झाले असावेत, असेच आम्हांला वाटते. (१८)

हे मलयपर्वतावरील वायो ! आम्ही तुझे काय वाकडे केले आहे की, ज्यामुळे तू भगवंतांच्या नेत्रकटाक्षांनी अगोदरच घायाळ झालेल्या आमच्या मनात पुन्हा कामदेवाला पाठवतोस ? (१९)

श्रीमान मेघा ! तू निश्चितच यादवराजांचा लाडका आहेस. म्हणूनच तू आमच्याचप्रमाणे त्यांच्या प्रेमपाशात बांधला जाऊन त्यांचे ध्यान करीत आहेस.

त्यांच्या भेटीसाठी तुझे मन कासावीस झाले आहे. त्यामुळेच तू त्यांची वारंवार आठवण काढून आमच्याप्रमाणेच अश्रुधारा गाळीत आहेस ! अरे बाबा ! त्यांच्याशी संबंध जोडणे म्हणजे खरोखर विकतचे दुखणे घेणेच होय ! (२०)

सुरेल गळा असणाऱ्या कोकिळा ! आमच्या प्राणप्रियासारखेच, मधुर स्वरात तू बोलतोस. प्रियकराच्या विरहामुळे मेलेल्यांना जीवन देणाऱ्या या गोड शब्दांत मला सांग की, मी तुझ्या आवडीचे काय करू ? (२१)

हे उदार मनाच्या पर्वता ! तू हलत-डोलत नाहीस की काही सांगत-ऐकत नाहीस. तू कोणत्या तरी गहन चिंतेमध्ये बुडाला आहेस, असे वाटते. आमच्याप्रमाणेच तुलाही असे वाटते का की, आमच्या स्तनांप्रमाणे असणाऱ्या तुझ्या शिखरांवर वासुदेवांचे चरणकमल धारण करावेत ! (२२)

हे समुद्रपत्नी नद्यांनो ! तुमचे डोह सुकून जाऊन तुम्ही अत्यंत कृश झाला आहात. तुमच्यामध्ये उमललेल्या कमळांचे सौंदर्यही आता दिसत नाही. जशा आम्ही आमच्या प्रियतम श्यामसुंदरांची प्रेमळ नजर आमच्यावर न पडल्यामुळे बेचैन होऊन अत्यंत कृश झालो आहोत, त्याचप्रमाणे तुम्हीसुद्धा मेघांच्या द्वारा आपल्या प्रियतम समुद्राचे पाणी न मिळाल्यामुळे अशा दीन झाला आहात, असे वाटते.(२३)

हंसा ! अरे ये !! तुझे स्वागत असो. बैस. हे दूध पी ! बाबा रे ! श्यामसुंदरांविषयी काही सांग. तू त्यांचा दूत आहेस, असे आम्हांला वाटते. श्रीकृष्ण सुखरूप आहेत ना ? त्यांची मैत्री फारच अस्थिर आहे. त्यांनी आम्हांला सांगितलेले त्यांना आठवते का ? ते आमची पर्वा करीत नाहीत, तर आम्ही तरी त्यांच्यामागे कशाला धावावे ? हे क्षुद्राच्या दूता ! आमची इच्छा पूर्ण करणाऱ्या त्यांना बोलावून आण. परंतु लक्ष्मीला मात्र बरोबर आणू नकोस. भगवंतांवर अनन्य प्रेम असणारी सर्व स्त्रियांमध्ये एकटी लक्ष्मीच आहे काय ? (२४)

श्रीकृष्णपत्न्यांचा योगेश्वरेश्वर श्रीकृष्णांविषयी असाच अनन्य प्रेमभाव होता. म्हणूनच त्यांनी परमपद प्राप्त करून घेतले. ज्यांच्या लीला अनेक प्रकारे अनेक गीतांच्या द्वारा गाइल्या गेल्या आहेत, त्या केवळ ऐकूनच स्त्रियांचे मन बळेच त्यांच्याकडे ओढ घेत असे. मग ज्या त्यांना आपल्या डोळ्यांनी प्रत्यक्ष पाहात होत्या, त्यांच्या बाबतीत काय बोलावे ? (२५-२६)

ज्या स्त्रियांनी जगद्गुरू श्रीकृष्णांना आपले पती मानून प्रेमाने त्यांचे चरण चुरणे इत्यादी वेगवेगळ्या प्रकारे त्यांची सेवा केली, त्यांच्या तपश्चर्येचे काय वर्णन करावे ? (२७)

सत्पुरुषांचे एकमेव आश्रय असणाऱ्या श्रीकृष्णांनी वेदोक्त धर्माचे स्वत: आचरण करून लोकांना दाखवून दिले की, धर्म, अर्थ आणि काम साध्य करण्याचे गृहस्थाश्रम हेच स्थान आहे. म्हणूनच ते गृहस्थाला उचित अशा धर्माचा आश्रय घेऊन व्यवहार करीत होते. त्यांच्या सोळा हजार एकशे आठ राण्या होत्या. राजा ! त्या श्रेष्ठ पत्न्यांपैकी रुक्मिणी इत्यादी आठ पट्टराण्या आणि त्यांच्या पुत्रांचे मी यापूर्वीच क्रमाने वर्णन केले आहे. त्यांव्यतिरिक्त सत्यसंकल्प भगवान श्रीकृष्णांच्या आणखी जेवढ्या पत्न्या होत्या, त्या प्रत्येकीचे दहा दहा पुत्र होते. त्या अत्यंत पराक्रमी पुत्रांमध्ये अठरा महारथी होते. त्यांचे यश सर्वत्र पसरले होते. त्यांची नावे माझ्याकडून ऐक. प्रद्युम्न, अनिरुद्ध, दीप्तिमान, भानू, सांब, मधू, बृहद्भानू, चित्रभानू, वृक, अरुण, पुष्कर, वेदबाहू, श्रुतदेव, सुनंदन, चित्रबाहू, विरूप, कवी आणि न्यग्रोध. हे राजेंद्रा ! श्रीकृष्णांच्या या पुत्रांपैकीसुद्धा रुक्मिणीनंदन प्रद्युम्न हा पित्याप्रमाणेच सर्वांत श्रेष्ठ होता. महारथी प्रद्युम्नाने रुक्मीच्या कन्येशी विवाह केला होता. तिच्यापासून अनिरुद्ध झाला. त्याला दहा हजार हत्तींचे बळ होते. रुक्मीच्या मुलीचा मुलगा अनिरुद्ध याने रुक्मीच्या मुलाच्या मुलीशी विवाह केला. तिच्यापासून वज्रनाभ याचा जन्म झाला. ऋषींच्या शापाने यदुवंशाचा नाश झाल्यावर हाच एकटा वाचला होता. वज्रनाभाचा पुत्र प्रतिबाहू. प्रतिबाहूचा सुबाहू, सुबाहूचा शांतसेन आणि शांतसेनाचा शतसेन.

या वंशात कोणीही पुरुष निर्धन, निपुत्रिक, अल्पायुषी, अशक्त किंवा ब्राह्मणभक्त नसलेला जन्मला नाही. परीक्षिता ! यदुवंशांमध्ये असे यशस्वी आणि पराक्रमी पुरुष होऊन गेले की, ज्यांची गणती हजारो वर्षांमध्ये पूर्ण होऊ शकणार नाही. यदुवंशातील मुलांना शिक्षण देण्यासाठी तीन कोटी अठ्ठावीस लाख आचार्य होते, असे ऐकिवात आहे. अशा स्थितीत महात्म्या यादवांची संख्या कशी सांगता येईल ? स्वत: महाराज उग्रसेन यांच्या आधिपत्याखाली जवळ जवळ एक महापद्म सैनिक होते. (२८-४२)

प्राचीन काळी देव आणि असुर यांच्या संग्रामाच्या वेळी पुष्कळसे उग्र स्वभावाचे असुर मारले गेले होते. ते मनुष्यजातीत जन्माला येऊन घमेंडीने जनतेला त्रास देऊ लागले. त्यांना शासन करण्यासाठी भगवंतांच्या आज्ञेने देवांनी यदुवंशामध्ये अवतार घेतला होता. परीक्षिता ! त्यांच्या कुळांची संख्या एकशे एक होती. ते सर्वजण श्रीकृष्णांनाच आपला स्वामी मानीत होते. जे त्यांचे अनुयायी होते, त्यांची सर्व प्रकारे भरभराट झाली. यदुवंशियांचे चित्त श्रीकृष्णांमध्ये इतके जडले होते की, त्यांचे निजणे-उठणे, हिंडणे-फिरणे, बोलणे-चालणे, खेळ, स्नान इत्यादी कामांच्या बाबतीत त्यांना आपल्याला शरीर आहे, याचीही शुद्ध राहात नसे. परीक्षिता ! जेव्हा परमतीर्थ अशा भगवंतांनी स्वत: यदुवंशामध्ये अवतार घेतला, तेव्हा त्या तीर्थापुढे गंगाजलाचा महिमा आपोआपच कमी झाला. प्रेमाने वा द्वेषाने श्रीकृष्णपरायण झालेले त्यांच्या स्वरूपालाच प्राप्त झाले. जिला प्राप्त करण्यासाठी देवदानवादी प्रयत्न करीत असतात, तीच लक्ष्मीदेवी श्रीकृष्णांच्या सेवेत स्वत: व्यग्र असते. श्रीकृष्णांचे नाव एक वेळ ऐकल्याने किंवा उच्चारल्याने सर्व अमंगल नाहीसे करते. सर्व कुळांचे धर्म श्रीकृष्णांनीच स्थापन केले आहेत. त्यांनी आपल्या हातामध्ये कालस्वरूप चक्र घेतलेले आहे. अशा स्थितीत, त्यांनी पृथ्वीवरील भार उतरविला, यात आश्चर्य ते काय ? भगवान श्रीकृष्णच सर्व जीवांचे आश्रयस्थान आहेत. त्यांनी देवकीच्या उदरी जन्म घेतला ही केवळ त्यांची लीला आहे. यदुवंशातील वीर पार्षद होऊन त्यांची सेवा करीत असतात. त्यांनी आपल्या बाहुबळाने अधर्माचा अंत केला आहे. ते चराचराचे दु:ख नाहीसे करणारे आहेत. मंद हास्याने युक्त असे त्यांचे श्रीमुख व्रजस्त्रिया आणि नगरातील स्त्रियांच्या हृदयात प्रेम भाव वाढविते. अशा त्यांचा जयजयकार असो ! प्रकृतीच्याही पलीकडे असलेल्या परमात्म्याने स्वत:च स्थापन केलेल्या धर्ममर्यादेचे रक्षण करण्यासाठी दिव्य लीलाशरीर धारण केले आणि त्याला अनुरूप अशा अनेक अद्‌भुत घटनांचा अभिनय केला. त्यांचे एक एक कर्म, स्मरण करणाऱ्यांच्या कर्मबंधनाला तोडून टाकणारे आहे. यदुश्रेष्ठ श्रीकृष्णांच्या चरणकमलांच्या सेवेचा अधिकार जो प्राप्त करून घेऊ इच्छितो, त्याने त्यांच्या लीलांचेच श्रवण करावे. जेव्हा मनुष्य क्षणाक्षणाला श्रीकृष्णांच्या मनोहर लीलाकथांचे श्रवण, कीर्तन आणि चिंतन करू लागतो, तेव्हा त्याची क्षणोक्षणी वाढणारी हीच भक्ती त्याला भगवंतांच्या परमधामाला नेऊन पोहोचविते. काळाच्या गतीच्या पलीकडे जाणे जरी अत्यंत कठीण असले, तरीसुद्धा तेथे काळाची डाळ शिजत नाही. त्या धामाच्या प्राप्तीसाठी अनेक सम्राटांनी आपले राज्य सोडून अरण्याची वाट धरली आहे. (४३-५०)

अध्याय नव्वदावा समाप्त

स्कन्ध दहावा समाप्त.

॥ हरि: ॐ तत्सत् ॥